गोपाळ गोडसे

गांधीहत्या आणि मी

गांधीहत्या आणि मी

गोपाळ गोडसे

मृत्युंजय प्रकाशन

शोध / ग. वा. बेहेरे

मी राजकारणी नाही. कोणत्याच पक्षाचा सभासद नाही. कोणत्याही राजकीय तत्त्वज्ञानाचा प्रचारक नाही. त्यामुळे या पुस्तकाच्या प्रकाशनामागे काही उद्देश चिकटविले जाणार नाहीत. जे घडते त्याचा अन्वयार्थ लावणे हा माझा पेशा आहे, आणि म्हणून घडले त्याची नोंद करणे माझे कर्तव्य ठरते. तरीही हे पुस्तक मी प्रसिद्ध करू नये, असा मित्रांनी सल्ला दिला. जुनी मढी उकरण्यात काय फायदा, असेही विचारले गेले. मी एवढेच म्हणालो की, इतिहासाचा उद्देशच मुळी तो असतो. इतिहास अप्रिय असला तरी तो लिहिण्यावाचून गत्यंतर काय?

हे पुस्तक तुमच्या कधी काळी हाती पडेल असे मला वाटले नव्हते. विषय सनसनाटी, राज्यकर्ते असहिष्णू, लोक काही शब्दांनीच बुजणारे, अशा परिस्थितीत एका गुन्हेगाराची कहाणी छापण्याचे धाडस कोण करणार ?

आणि तो गुन्हेगारही सामान्य नव्हे ! महात्मा गांधींचा खुनी. महात्मा गांधी त्या काळातले श्रेष्ठ पुरुष. पुन्हा त्यांच्या लौकिकात संतपणाचा प्रवाह मिसळलेला. अशा माणसाचा खून - तोही अगदी विचारपूर्वक कट करून केला गेला. गोपाळ गोडसे, या कहाणीचा निवेदक, त्या कटातील एक प्रमुख आरोपी, प्रत्यक्ष खून करणाऱ्या नथुरामचा धाकटा भाऊ. हा गुन्हेगार आपल्या १९ वर्षांच्या कारावासानंतर आपली हकिकत - विशेषतः गांधीखुनाच्या कटाची हकिकत सांगतो आहे. कसलाही राजकीय हेतू न ठेवता.

गांधींचा खुनी जर गावंढळ, मतलबी, अडाणी किंवा वेडसर असता तर गांधींच्या नावाचा व्यापार करणारे दुःखी झाले, तरी संतापले नसते. गांधीवादाची किंवा गांधींची प्रतिमा त्यामुळे डागाळली

नसती; पण खुनी - खून करणारे - खुनाला प्रत्यक्ष सहाय्य करणारे किंवा दुर्लक्ष करणारे हे सारे सुशिक्षित होते, सुजाण होते, देशभक्त होते...

होय, ते देशभक्त तर होतेच होते, या देशावर जेवढे गांधींचे प्रेम होते, तितकेच प्रेम या सर्व मंडळींचे या भूमातेवर होते किंबहुना या मायभूमीवरच्या काही बऱ्या-वाईट प्रेमामुळेच गांधीहत्येसारखे कृत्य त्यांच्या हातून घडले. त्या कृत्याचे उत्तरदायित्व गेल्या पाच-पन्नास वर्षांतील राजकीय नेतृत्व विशेषतः गांधीजींचे मुसलमानविषयक धोरण व म्हणून देशाची झालेली फाळणी, हजारो सिंधी, पंजाबी, बंगाली भारतीयांचा सर्वनाश, अशा अनेक कारणांवरही टाकता येईल. केवळ एक खून, गांधीहत्या एवढेच घटनेकडे पाहून चालणार नाही. ती एक राजकीय हत्या होती. त्या हत्येत वैयक्तिक स्वार्थ किंवा सत्तेचा हव्यास नव्हता, तर अगतिकता होती. चुकीच्या मार्गाने हे थांबवण्याचा अडाणी यत्न होता. खून करणाऱ्यांना हे कळले नाही की, खून माणसाचा करता येतो - तत्त्वाचा नाही - म्हणून गांधी तेवढेच मारता आले - गांधीवाद तसाच राहिला, फोफावत.

आजच्या बदलत्या परिस्थितीत आम्ही एवढे तरी छापू शकतो. आज गांधी तत्त्वज्ञान आचके देत लाहोरच्या वेशीवर रक्तबंबाळ होऊन उभे आहे. अहिंसा-सत्य यांच्या चिंध्या साऱ्या भारतभर विखुरल्या आहेत आणि एकोणीस-वीस वर्षांत स्वातंत्र्याला नरकाची कळा आली आहे.

गांधीहत्या हा आता इतिहास आहे. इतिहासाला सत्याशिवाय पर्याय नसतो. म्हणून हा ग्रंथ सत्यशोधनाच्या रस्त्यावरचा एक नम्र यत्न आहे. लेखकाचा अधिकार मर्यादित आहे, याची त्याला आणि मला जाण आहे. कायद्याची बंधने गृहीत धरलेली आहेत आणि म्हणून आमच्या शक्तींना काही मर्यादाही आहे, हेही सर्वांनी ध्यानी ठेवावे.

वर्षे निघून जातील. नथुराम गोडसे विस्मृतीत जाईल. सावरकर विस्मृतीत जातील. कदाचित गांधी-नेहरू ही आजची दैवते विसरली जातील. विसरण्याजोगी परिस्थिती निर्माण होईलही; पण हा भूभाग तसाच राहील. तिथे माणसे असतील. ती इतिहासाची मागची पाने चाळतील. या वैभवशाली देशाचे खंड का पडले याचा इतिहास वाचतील. एका भेकड राजनीतीवरचा तो कलंकित भाग, त्यातील रक्तरंजित गंगा-सिंधू नद्यांच्या खोऱ्यांचा इतिहास त्यांच्या नजरेसमोर येईल, तेव्हा गांधी जरूर आठवतील - नेहरू आठवतील - सावरकर तर निश्चित आठवतील; निरनिराळ्या संदर्भात. अशा इतिहासकारांना नथुराम गोडसे या अत्यंत लहान माणसाची कदाचित पुसटशी आठवण तेव्हा होईल.

मनुष्य जातीला उन्नत करणारी भाबडी तत्त्वज्ञाने चुकीच्या ठिकाणी वापरली की, देशाची भूमी लाल होते याचा आणखी एक धडा मिळेल. जसा पृथ्वीराजाला मिळाला, जसा देवगिरीच्या रामदेवरायाला मिळाला.

आणि तेव्हाचे इतिहासकार या देशाचा आजचा इतिहास लिहितील, त्यात मृत झालेल्या बुद्धवादाप्रमाणेच मृत झालेल्या गांधीवादाची चिकित्सा करणारी काही पाने असतील.

काळ कोणी रोखू शकत नाही. तो रोखावा म्हटले तरी ते शक्य नाही. झाली - बघता बघता वीस वर्षे झाली. इतिहास निराळीच सत्ये सांगू लागेल आणि काही वर्षांत येथे निरनिराळी स्वप्ने स्फुरतील, कोणी सांगावे.

कुणास ठाऊक, त्या वेळेस कुणाच्या पदरात काळ काय न्याय टाकील ?

पुणे,
दि. १२-१०-१९६७

ग. वा. बेहेरे

गांधीहत्या आणि मी पंचावन्न कोटीचे बळी या पुस्तकांचे अनुवाद दुसऱ्या भाषांतून झाले आहेत. त्याचे विवरण :-

१. गांधी वध और मैं
२. गांधी वध क्यों
३. गांधी हत्या मत्तनानू (कन्नड)
४. गांधी हत्या - ओ मू (उडिया)
५. Gandhiji's Murder And After
६. May It Please Your Honour
७. नथूराम गोडसे वाङ्गमूलम (तेलगू)
८. शुनुन धर्मावतार (बंगाली)
९. गांधी हत्या शा माटे (गुजराती)
१०. पंचावन्न कोटीचे बळी (मराठी)

हिंदी अनुवादाच्या अनेक आवृत्या निघाल्या आहेत. श्री. सूर्य प्रकाशन, नयी सडक, दिल्ली ११० ००६ हे हिंदी आणि इंग्रजी आवृत्यांचे प्रकाशन आणि वितरण करतात.

उपलब्ध पुस्तकांचे प्राप्तिस्थान :

गोपाळ गोडसे

७५४/२ सदाशिव पेठ,

कुमठेकर मार्ग, पुणे ४११ ०३०.

(जनता सहकारी बँक वास्तू-पहिला मजला)

पहिले पान

दिनांक ५ फेब्रुवारी १९४८ ला मी पुणे-मुंबई मार्गावरील कामशेत स्थानकापासून दहा मैलावर असलेल्या उकसाण या माझ्या गावी गेलो होतो. मुंबई आरक्षी दलाचे (Police Force) एक पथक तेथे त्या दिवशीच येऊन पोहोचले. मला त्या पथकाने अटक केली आणि मुंबईस नेले. माझा गांधीहत्येशी संबंध आहे, अशा आरोपावरून ही अटक झाली होती.

दिल्लीच्या लाल किल्ल्यातील विशेष न्यायालयात हा खटला चालला. आरोप सिद्ध करण्याचे दायित्व आरोप ठेवणाऱ्यावर असते. आरोपी मूक राहील किंवा आरोप नाकारील. माझा गांधीहत्येशी कसलाच संबंध नाही हे माझे प्रतिपादन होते. अर्थात, शपथेवर नव्हे. अभियोजकांनी (Prosecutors) आरोप सिद्ध केला. मला दिनांक १०-१-१९४९ ला जन्मठेपेची शिक्षा झाली. दिनांक १३-१०-१९६४ ला मी शिक्षेतून मुक्त झालो.

गांधीजींचा शस्त्राचाराने अंत ही घटना हिंदुस्थानच्या अलीकडील इतिहासाचे एक पान आहे. गांधीजींच्या चरित्राचे ते अंतिम प्रकरण आहे. ते प्रकरण विकृत करून लिहिले गेले, तर त्यांचे चरित्र इतिहास या संज्ञेला पात्र राहणार नाही. ते प्रकरण गाळले, तर गांधीजींचे चरित्र अपुरेच राहील.

न्यायासनाला योग्य ते मोल द्यावयाचे असेल, तर माझा या हत्येशी संबंध होता हे मानणे क्रमप्राप्त आहे. मी जरी आरोप नाकारला असला तरी आवश्यक तेवढ्या पुराव्यानिशी तो आरोप माझ्या पदरात टाकला गेला आणि म्हणून मला शिक्षा झाली हे सत्य आहे.

न्यायालयात खटल्याशी संबंधित किंवा वादग्रस्त व्यक्तीशी, वस्तूशी वा आरोपीशी संबंधित अशा सर्वच घटना पुढे येतात असे नाही. काही गोष्टी पुढे आणणे आरोप सिद्ध होण्याच्या दृष्टीने हितावह


नाही, या दृष्टीने अभियोजक पक्ष वगळतो. याउलट काही गोष्टी पुढे आणल्या, तर त्या आपल्या बचावाला हानिकारक होतील अशी आरोपीची धारणा असते, म्हणून ते त्या गोष्टी वगळतात. आज त्या हत्येशी संबंधित आणि जन्मठेप शिक्षा झालेले सर्व अभियुक्त मुक्त झालेले आहेत. मी त्यातला एक आहे. या घटनेकडे - एका अप्रिय प्रकरणाकडे - इतिहास या दृष्टीने पाहण्याची इच्छा असेल अशा वाचकांसाठी या प्रकरणाशी संबद्ध घटना वस्तुनिष्ठ भूमिकेतून लिहिण्याचा माझा मानस आहे. लेखमालेतील अधली-मधली प्रकरणे जशी सिद्ध होतील तशी विनाविलंब वाचकांना द्यावी, अशी माझी इच्छा आहे.

या 'अंतिम पर्वात' हत्येच्या परिणामांचा वृत्तान्तही समाविष्ट आहे, कारण गांधीजींच्या अंतिम कालखंडाशी त्याचे धागेदोरे निगडित आहेत.

आज गांधीजी जिवंत नाहीत. नथुराम जिवंत नाही. नाना आपटे जिवंत नाहीत. उरलेले तीन दंडित आपापले प्रायश्चित्त भोगल्यानंतर मुक्त केले गेले आहेत. 'मरणान्तानि वैराणि' या आपल्या विचारसरणीप्रमाणे गांधीजींशी ते जिवंत असताना, कधी कोणाचा द्वेष असलाच, तर आज त्यांच्या स्मृतीशी कटू भावना वागविल्या जाणे योग्य होणार नाही. बंदिगृहातील गांधीजयंतीच्या मेळाव्यात मी सहभागी होत असे. पुष्कळदा अशा मेळाव्यांची योजनाही मी करीत असे. आज हे सांगताना मला कोणताही संकोच वाटत नाही. आपण तत्त्वभ्रष्ट झालो असे वाटत नाही किंवा बंदिगृहाचा दबाव असल्याने आपण त्या त्या प्रसंगी सहभागी झालो असेही मला वाटत नाही. तसेच हत्येशी संबंधित व्यक्तीशी किंवा दिवंगतांच्या स्मृतीशी कटू भावना वागविल्या जाणेही योग्य होणार नाही. इतिहास याच दृष्टीने या प्रश्नाकडे बघितले जावे, अशी माझी विनंती मानणे न मानणे मी वाचकांवर सोडीत आहे.

दिनांक २७-३-६६ — **गोपाळ विनायक गोडसे**

अखंड हिंदुस्थानचे मानचित्र
सिंधू नदी



चित्रे : डावीकडे : नारायण आपटे, उत्सर्ग १५.११.४९
उजवीकडे : स्वातंत्र्यवीर सावरकर, आत्मार्पण दिवस २६.२.६६
मानचित्रात : नथुराम गोडसे, उत्सर्ग १५.११.४९

प्रतिवर्षी १५ नोव्हेंबरला इच्छापत्र पुनरुच्चार समारोहपूर्वक केला जातो. सिंधू नदी स्वतंत्र हिंदुस्थानच्या छत्रछायेत स्वच्छंदतेने वाहू लागली म्हणजे अस्थींचे विसर्जन त्या नदीत कर ! तोवर अस्थींचे भावी पिढ्यांना हस्तांतरण करीत रहा.

समारोहात उभे करण्यात येणारे प्रमुख दृष्य

आरक्षींनी मुंबईत घेतलेली चित्रे. १२.५.१९४८



नथूराम गोडसे : उत्सर्ग १५.११.४९



नारायण आपटे : उत्सर्ग १५.११.४९

आरक्षींनी मुंबईत घेतलेली चित्रे. १२.५.१९४८



विष्णु करकरे : (दिवंगत दि. ६.४.१९७३)



मदनलाल पाहवा : मुक्तता १३.१०.६४

आरक्षींनी मुंबईत घेतलेली चित्रे. १२.५.१९४८



स्वातंत्र्यवीर सावरकर : निर्दोष मुक्तता



गोपाळ गोडसे : मुक्तता ३०.११.६५

परिचय

अखिल भारत हिन्दू महासभेच्या कार्यासाठी गेली आठ-नऊ वर्षे सभेच्या केन्द्र कार्यालयात म्हणजे हिन्दुमहासभा-भवन, नवी दिल्ली येथे माझे वास्तव्य होते. सर्व प्रदेशांच्या लोकांचा त्यामुळे संपर्क येऊ शकला. कधी त्यांच्या प्रांतात तर कधी दिल्लीत.

धार्मिक परिधीत हिन्दू जितके भावुक तितकेच ते राजनैतिक परिधीत उदासीन आहेत. कुंभपर्वासारख्याप्रसंगी कोटी-कोटी संख्येने, श्रद्धेने एकत्र जमणारे हिन्दू राजनैतिक स्तरावर धर्मनिरपेक्ष दलांना समर्थन देतात.

हिन्दुंना त्यांच्या ऱ्हासाची किंवा हानीची जाणीव होऊ लागली आहे; पण त्यांना नेतृत्व नाही.

हिन्दू संघटना स्पष्ट रूपाने हिन्दुत्व हेच राष्ट्रीयत्व या भूमिकेवर राजकीय क्षेत्रात येत नाहीत. प्रसंगोपात हे संघटनवादी हिन्दुत्वाच्या सिद्धान्तांचा पुनरुच्चार करतात; पण हे सिद्धान्त हिन्दू महासभेने प्रतिपादिले आहेत हे न सांगता, आणि राजकीय पातळीवर गोलमोल भूमिका घेऊन हिन्दुंना धर्मनिरपेक्ष दलांच्या गोटात ढकलतात.

दुसऱ्या पक्षी हिन्दुसभेजवळ आपले सिद्धान्त समाजापर्यंत वाहून नेणारे समर्थ संघटन नाही. जे थोडे लोक आहेत ते निष्ठेने, आत्मीयतेने, तळमळीने कार्यरत आहेत आणि आजही सर्व धर्मनिरपेक्ष दलांकडून उपहासाचे किंवा तिरस्काराचे ते लक्ष्य होत राहिले आहेत. या वस्तुस्थितीचे जवळून निरीक्षण मला करता आले.

हिन्दुसभेच्या अनेक पदांवर मी कामे केली. माझी पत्नी सौ. सिन्धू मला माझ्या कार्यात सदा साथ देत राहिली आहे. आज मी अखिल भारत हिन्दू महासभेचा महामंत्री आहे. प्रकृतीच्या कारणासाठी वास्तव्य सध्या अधिक काळ पुण्याला असते.

हिन्दुस्थान स्वतंत्र झाला. हिन्दुस्थानच्या भूमीवरच मुसलमान, मुसलमान म्हणून स्वतंत्र झाला आणि त्याने पाकिस्तान हे नाव घेतले. शेष हिन्दुस्थानातही हिन्दू स्वतंत्र झाला नाही. स्वत्व असते ते स्वराज्य ही व्याख्या वस्तुस्थितीत उतरवण्याची असेल तर हिन्दुमहासभेच्या

आणि मूळ प्रवाह नष्ट करण्याचे धडे घेऊ लागले, हिन्दू करून मूळ प्रवाहात मिळविण्याच्या स्थानी आपल्या धर्मनिरपेक्ष म्हणविणाऱ्या शासनाने त्यांच्या अलगतेला प्रोत्साहन दिले, नव्या मशिदी उभ्या करविल्या, हजभवने बांधली, मुस्लिम जनसंख्या प्रमाणापेक्षा अधिक वाढविण्याची मोकळीक ठेवली. 'धर्म' या परिघीच्या बुरख्यात त्यांना अनेक लग्ने करण्याची वैध मुक्तता दिली आणि एक संविधान एक विधी या सूत्राचीच विटंबना केली आणि राष्ट्रीय एकात्मतेसारखे जल्लोष हिन्दुंच्याच कानावर आदळले.

शासनाच्या या शांतिजीवन विरोधी नीतीने प्रोत्साहित होऊन मुस्लीम समाज जशी संधी मिळेल तसे कुराणचे आचरण करीत आहे. मूर्तीचे अस्तित्व अल्लाला सहन होत नसल्यामुळे मूर्तींच्या रथावर आणि रथयात्रा काढणाऱ्या मूर्तिपूजक काफरांवर आक्रमण करण्याचे प्रकार सदैव घडत आले आहेत. सामूहिक इस्लामीकरणाचे प्रयोग धर्मनिरपेक्षांच्या राज्यात चालू आहेत. भ्रष्ट केलेली मंदिरे मशिदीच्या रूपात उभी आहेत आणि बाटगे त्या मूळ मंदिरापेक्षा मशिदीचाच अभिमान आणि आग्रह धरीत आहेत. सर्व धर्मनिरपेक्ष दले हिन्दुंची आहेत. तरीही ती दले बाटग्या मुसलमानांच्या अभिनिवेशाने हिन्दू संस्थांवर तुटून पडत आहेत.

या सर्व कल्लोळात, हिन्दुत्व हेच राष्ट्रीयत्व या सिद्धान्ताचा पुरस्कार करणाऱ्या संस्थेच्या कार्यात जीवन व्यतीत करणारे कोणीतरी हवेत. मी तिथे उभा आहे, बुद्धिभ्रष्ट स्वजनांकडूनही तिरस्कृत होत राहिलो तरीही.

साहित्य काही संस्कार घडविते. सध्या इतिहास विकृत करण्याचा शासनाचा प्रयत्न चालू आहे. तो निष्प्रभ करण्यासाठी पंचावन्न कोटींचे बळी, गांधीहत्या आणि मी, अशी पुस्तके अल्पसे कार्य करू शकतील.

एप्रिल १९९०

प्रस्तुत ग्रंथाची आठवी आवृत्ती वीस महिन्यांत संपली ! नव्या पिढीच्या ज्ञानलालसेला, जे घडले ते स्वच्छ स्वरूपांत बघण्याच्या इच्छेला हार्दिक धन्यवाद.

नवीनतम साधनांनी आवृत्ती मुद्रित करून सुंदर स्वरूपांत प्रस्तुत करणाऱ्या सर्वश्री रविराज प्रकाशनचे मनःपूर्वक अभिनंदन.

मार्च १९९२ – गोपाळ गोडसे

सिद्धान्तावाचून हिन्दुमात्राला पर्याय नाही. राज्याचे स्वराज्य करणे आवश्यक आहे.

आज माझे वय ७९ वर्षे आहे. न. चिं. केळकर यांच्या भाषेत आयुष्याच्या ओळींची टंकलेखन यंत्रावरील सूचनाघंटा केव्हाच वाजून गेली आहे.

हिन्दू समाज राहणार आहे, चिरंतनपणे राहणार आहे, तोच एक मानवधर्म आहे; पण जसे इस्लामी आक्रमण झाले आहे, चालू आहे, तसेच इसाई आक्रमणही फार मोठ्या प्रमाणावर हिन्दुस्थानला पोखरू लागले आहे.

सिद्धान्त आहेत, नेतृत्व हवे. तेही मिळणार आहे याच आशेवर जीवनाचा अंतिम चरण मार्गक्रमण करीत राहिलो आहे.

राष्ट्रीय एकात्मतेचे पाठ द्यावे लागत आहेत, डिंडिम बडवावे लागत आहेत. याचा अर्थच इतिहासाभिमान प्रवाह, परंपराभिमान प्रवाह, पुण्यस्थान किंवा तीर्थाभिमान प्रवाह म्हणजे संस्कृती प्रवाह म्हणजेच राष्ट्रीय प्रवाह एक नाहीत या वस्तुस्थितीची स्वीकारोक्ती आहे. प्रवाह एक असता तर हिन्दुस्थानच्या भूमीवर इस्लामी प्रवाहाचे पाकिस्तान झालेच नसते. एक राष्ट्र, एक संस्कृती, एक देश, एक सिद्धान्त, एक संविधान, एक विधी हा समूहजीवनाचा नियम आहे. संस्कृती आणि विकृती यांचा संघर्ष होतो, समन्वय होत नाही.

इस्लाम हे एक राजनैतिक आक्रमणकारी, असहिष्णु विस्तारवादी आंदोलन आहे. अल्ला ही परिकल्पना न मानणाऱ्या, कुराणावर विश्वास न ठेवणाऱ्या किंवा उपासनेचे साधन म्हणून मूर्तिपूजा करणाऱ्या जनसमूहांच्या देशावर आक्रमण करणे, त्यांना पराभूत करणे, त्यांना बाटवून मुसलमान करणे, त्यांची संपत्ती लुटणे, त्यांच्या स्त्रिया लुट म्हणून सैनिकांकडून त्यांच्यावर बलात्कार करणे, त्यांचा लिलाव करणे आणि न बाटलेल्या समूहावर अशा नवीन मुसलमान उत्पत्तीकरवी अत्याचार करण्याची शृंखला अविरत ठेवणे ही कुराणाची शिकवण मशिदी-मशिदीतून हिन्दुस्थानात इस्लामी आक्रमणाचा प्रादुर्भाव झाला तेव्हापासून दिली गेली. त्यामुळेच हिन्दुस्थानच्या भूमीतील पाकिस्तान हे इस्लामी विस्तारवादी आक्रमण हिन्दुस्थानातील बाटग्यांनी कार्यान्वित केले. अरबस्तानातील मुसलमानांची त्या तोडफोडीसाठी आयात करण्याचे कारण राहिले नाही.

आजही खंडित हिन्दुस्थानातील मशिदी-मशिदीतून तीच शिकवण स्वतःला मुसलमान म्हणविणारे मुल्ला देत आहेत.

मुसलमानांना, की जे कोण्या पिढीत हिन्दू परिवारातूनच भ्रष्ट केले गेले

अनुक्रम

१. गांधीहत्या टळली नसती काय ? / १७
२. कट केव्हा झाला असेल ? / २५
३. नथुरामची मनःस्थिती / ३९
४. गांधीहत्येचा तो दिवस / ४३
५. नथुराम ! हे राम ! / ५९
६. उत्सर्ग / ९५
७. माझी रक्षा सिंधूत टाका / १०६
८. आरोपी क्रमांक आठ - विनायक दामोदर / ११९
९. दूरत्वाचे दिवस / १५७
१०. अटक ते लाल किल्ला / १८०
११. प्रकाशातून अंधाराकडे / २०१
१२. अंधारातील वाटचाल / २२१
१३. अंधार ! अंधार ! / २४३
१४. कोंडमारा / २७०
१५. श्वासासाठी धडपड / २८६
१६. पुन्हा प्रकाश / ३०७
१७. प्रयोजन / ३२७
१८. पुन्हा एकदा / ३३१
१९. मृत्युपत्र / ३३३
२०. निर्णयपत्र / ३३४

एक

गांधीहत्या टळली नसती काय ?

मनुष्य जन्मताच त्याच्या कपाळावर त्याचे भवितव्य लिहिलेले असते असे आपण म्हणतो. ते भवितव्य वाचण्याचा प्रयत्न मनुष्य करीत असतो; पण आजपर्यंत तरी त्याला ते शक्य झाले नाही. ते शक्य झाले असते, तर स्वतःच्या जीवनातील अपयश टाळणे त्याच्या हातची गोष्ट राहिली असती. विधिलिखित या संज्ञेला अर्थ राहिला नसता.

आयुष्याची परिणती मृत्यूत होते हे मनुष्य पुरेपूर जाणतो. प्रत्येकाच्या मृत्यूचा काल आणि मार्ग मात्र विधीने ठरविलेला असतो. तो काल आणि मार्ग मनुष्याला अज्ञात असतो.

मनुष्य प्रयत्नवादी आहे. मृत्यू अटळ आहे, त्याचा काल आणि मार्ग अज्ञात आहे; मग तो काल दूर ढकलण्याची किंवा तो मार्ग बंद करण्याची धडपड कशाला करा, अशी त्याची 'जगन्मिथ्या' विचारधारणा नसते. इतकेच नव्हे तर ज्ञानलालसेने भारावला जाऊन मनुष्य पुष्कळदा अतिशय धोक्याच्या मार्गाने जातो. काही दुर्घटना झाली तरी ती दुर्घटना का झाली याची छाननी तो करतो आणि अशी दुर्घटना पुन्हा होऊ नये म्हणून आपापल्या परीने दुर्घटनेच्या कारणांचे निराकरण करण्याचा प्रयत्न करतो.

दुर्घटनेतील मृत व्यक्तींना त्यानंतरच्या उपाययोजनांचा काही लाभ नसला तरी मानवजातीची सुरक्षितता आणि प्रगती हे उद्दिष्ट मनुष्याच्या डोळ्यांसमोर असते. रोगांचे नीट निदान न झालेल्या कोणा रोग्याच्या मरणाचे कारण त्याच्या शवपरीक्षेत कळते आणि त्यायोगे त्यासारख्या इतर रोग्यांवर प्रभावी उपाययोजना करता येते, असे आपण नेहमी पाहतो.

गांधीहत्या टाळता येणे शक्य होते काय, याविषयीची चर्चा करणारे काही लेख लिहिले गेले आहेत. शासनाने आरक्षी दलाची व्यवस्था गांधीजींच्या संरक्षणासाठी केली होती. तेव्हा त्या सुरक्षाव्यवस्थेत काही उणीव राहिली होती काय किंवा कोणी ढिलाई केली काय, हे बघण्यासाठी या चर्चा प्रामुख्याने झाल्या आहेत. अगदी अलीकडे, पाठक समितीचे

(नंतर कपूर आयोगाचे) प्रयोजन प्रत्यक्ष शासनाने पाच कारणासाठी मांडले होते हे वाचकांना ठाऊक आहेच.

रक्षणकार्याशी संबंध असलेल्या अधिकारी व्यक्तींची मनोधारणा काय असेल याचा विचार या हाती घेतलेल्या विषयाच्या चर्चेतून करावयाचा आहे. मानसशास्त्राच्या अभ्यासकांना त्यातून कदाचित काही निष्कर्ष काढता येतील.

प्रस्तुत प्रश्नाची तीन अंगे आहेत. एक तांत्रिक, दुसरे तात्त्विक. तिसरे अंग दैव. येथे तांत्रिक अंगाची चर्चा अभिप्रेत आहे.

२० जानेवारी १९४८ या दिवशी सायंकाळी दिल्लीतील बिर्ला गृहातील गांधीजींच्या प्रार्थनास्थळाजवळ स्फोट झाला होता. मदनलाल पाहवा तेथेच पकडला गेला.

मदनलाल, आपण असे करणार आहोत, ही गोष्ट कटाशी संबंध नसलेल्या व्यक्तीजवळ बोलला होता, असा पुरावा न्यायालयात गांधीहत्या अभियोग चालू असताना आला. त्याचे विवरण असे आहे -

श्री. जगदीशचंद्र जैन यांची साक्ष दिल्लीच्या लाल किल्ल्यातील न्यायालयात दि. ४-८-१९४८ ते ९-८-१९४८ पर्यंत झाली. श्री. जैन बनारस हिन्दू विश्वविद्यालयाचे एम्. ए. आणि मुंबई विश्वविद्यालयाचे पीएच.डी. आहेत. ते तेव्हा माटुंग्याच्या रामनारायण रुईया महाशाळेत अर्धमागधीचे आणि हिन्दीचे प्राध्यापक होते. त्यांनी काही पुस्तके लिहिली आहेत. मदनलाल निर्वासित होता. त्याला सहाय्य म्हणून श्री. जैन त्याला आपली पुस्तके २५ टके सूट देऊन विकण्यास देत.

प्राध्यापक जैन आपल्या साक्षीत म्हणतात, "जानेवारी (१९४८) च्या पहिल्या आठवड्याच्या शेवटच्या दिवसाच्या आसपास मदनलाल मला भेटला. त्याच्याबरोबर एक गृहस्थ होते. त्यांचे नाव करकरे असे त्याने सांगितले... त्यानंतर दोन-तीन दिवसांनी रात्री आठ वाजता मदनलाल माझ्याकडे आला... त्याने मला सांगितले की, 'त्याच्या गटाने (Party) एका पुढाऱ्याला नाहीसे करण्याचा कट केला आहे.' मी त्याला त्या पुढाऱ्याचे नाव विचारले. मला ते ठाऊक नाही असे म्हणून प्रथम त्याने टाळाटाळ केली. तेव्हा मी आग्रहाने त्याला म्हटले की, तुला नाव ठाऊक असलेच पाहिजे. मग त्याने महात्मा गांधींचे नाव सांगितले. ते ऐकून मला धक्का बसला. मी त्याला सांगितले की, असे मूर्खासारखे करू नको. नंतर तो म्हणाला, की प्रार्थनासभेत स्फोट-गोल उडविण्याचे काम माझ्याकडे आहे. त्यायोगे गोंधळ होईल आणि इतरजण गांधीजींना घेरतील (overpower). मी मग त्याला सांगितले की, तू निर्वासित आहेस आणि पंजाबातील दंग्यात तुझी आधीच फार हानी झाली आहे आणि अशी गोष्ट करणे योग्य नव्हे, त्यानंतर मी त्याला त्या विचारापासून परावृत्त करण्यासाठी त्याच्याशी पुष्कळ बोललो. मग तो निघून गेला. त्याच्या बोलण्याला मी तेव्हा

फार महत्त्व दिले नाही कारण त्या काळात त्या भागातील निर्वासित गांधींना आणि काँग्रेसला शाप देत असत.

'... दोन-एक दिवसांनी मदनलाल पुन्हा माझ्याकडे आला. माझ्या उपदेशाचा विचार केलास का, म्हणून मी त्याला विचारले. त्याने सांगितले की, मी आपल्याला पितृतुल्य मानतो आणि आपला उपदेश मी ऐकला नाही, तर माझे बाटोळे होईल. दोन-एक दिवसांनी तो पुन्हा माझ्याकडे आला. मी दिल्लीला जात आहे, असे तो म्हणाला.

'... झेवियर कॉलेज हॉलमध्ये एक सभा होती. श्री. जयप्रकाश नारायण बोलणार होते. मदनलाल दिल्लीला गेल्यावर बहुधा दोन-तीन दिवसांनी ही सभा असावी. मी सभेला गेलो होतो. मी श्री. जयप्रकाश यांना भेटण्याचा प्रयत्न केला. मदनलालने मला सांगितलेली माहिती त्यांना सांगण्यासाठी मला त्यांना भेटावयाचे होते कारण ते दिल्लीला जाणार होते. दिल्लीच्या अधिकाऱ्यांना या माहितीचा उपयोग होईल असे मला वाटले; पण त्यांच्याभोवती (श्री. जयप्रकाश यांच्याभोवती) गर्दी असल्याने मला त्यांना भेटता आले नाही. तथापि, दिल्लीत एखादा मोठा कट शिजत असावा इतपत मी त्यांना बोलू शकलो.

'गांधीजींच्या प्रार्थनासभेत मदनलालने स्फोट केल्याचे आणि त्याला पकडल्याचे वृत्त मी दि. २१-१-४८ ला वाचले आणि सरदार पटेल यांना दूरध्वनी करून भेटण्याचे ठरविले. माझा प्रयत्न विफल झाला. श्री. स. का. पाटील यांना भेटण्याचा प्रयत्न केला; पण तोही अयशस्वी ठरला. मग मी दूरध्वनीने माननीय मुख्यमंत्री श्री. बा. गं. खेर यांची भेट ठरविली. संध्याकाळी चार वाजता सचिवालयात त्यांना भेटलो. माननीय गृहमंत्री श्री. मोरारजी देसाई हेसुद्धा उपस्थित होते. मदनलालसंबंधी मला ठाऊक असलेल्या सर्व गोष्टी मी त्यांना सांगितल्या.

(Criminal Appeals Nos. 66 to 72 of 1949 East Punjab High Court Simla, Printed Record Vol. I, pages 130-138)

त्या वेळचे मुंबई राज्याचे गृहमंत्री माननीय श्री. मोरारजी देसाई यांची साक्ष दि. २३-८-१९४८ ते २५-८-१९४८ या दिवसांत झाली. ते आपल्या साक्षीत प्राध्यापक जैन यांच्या विधानांना पुष्टी देतात. ते पुढे म्हणतात, 'श्री. जैन यांचा वृत्तान्त ऐकल्यानंतर मी गुप्तचर विभागाचे (इंटेलिजन्स ब्रँचचे) मुख्य अधिकारी श्री. नगरवाला यांना बोलावणे पाठविले. ते त्या वेळी काही कामात असल्याने लगेच येऊ शकले नाहीत, म्हणून मी त्यांना उशिरात उशिरा मला मुंबई स्थानकावर येऊन भेटण्यास सांगितले कारण मला अहमदाबाद येथे जावयाचे होते. ते मला त्या रात्री सव्वाआठ वाजता स्थानकावर भेटले. मी श्री. नगरवाला यांना श्री. जैन यांनी सांगितलेला वृत्तान्त सांगितला. मी त्यांना त्या संबंधात कृती करण्यास सांगितले. करकरे यांना पकडा म्हणून मी सांगितले.

'मी दि. २३-१-१९४८ ला सकाळी अहमदाबादला पोहोचलो. मी अहमदाबादला सरदार वल्लभभाई पटेल यांना भेटलो आणि प्राध्यापक जैन यांनी मला सांगितलेल्या गोष्टीप्रमाणे आवश्यक ती माहिती त्यांनी दिली आणि मी जी कृती त्यासंबंधात केली तीही सांगितली.' (Printed Record Vol. I, pages 166-167)

श्री. नगरवाला यांची साक्ष दि. ५-१०-१९४८ ते १८-१०-१९४८ या दिवसांत झाली. त्यांनी आपल्या साक्षीत श्री. मोरारजी देसाई यांच्या कथनाला दुजोरा दिला आहे. ते आपल्या साक्षीत पुढे म्हणतात, 'डेप्युटी सुपरिंटेंडेंट (दिल्ली पोलिस) जसवंतसिंग आणि एक सब इन्स्पेक्टर दि. २२-१-१९४८ ला दिल्लीहून मला भेटण्यास आले. करकरे आणि आणखी कटवाले कोणी असतील, तर त्यांना पकडावे म्हणून त्यांनी इच्छा दर्शवली. दिल्लीच्या स्फोटाच्या संबंधात ही अटक करण्याची त्यांची इच्छा होती. ते गेल्यावर मी करकरेचा आणि त्याचे साथीदार असले, तर त्यांचा शोध घेऊ लागलो. मुंबईनगर आरक्षी दलाला करकरे त्यापूर्वी ठाऊक नव्हता. काही माहितीच्या आधारे मी दि. २४-१-१९४८ ला श्री. बडगे पास पकडावे म्हणून आज्ञा दिली.' (Printed Record Vol. I, pages 278-293)

श्री. जसवंतसिंग सब-इन्स्पेक्टर (दिल्ली) यांची साक्ष दि. १४-९-१९४८ ते १५-९-१९४८ या दिवसांत झाली. ते केन्द्र शासनाच्या गृह विभागाच्या गुप्तचर विभागाचे एक अधिकारी होते. जानेवारी १९४८ मध्ये ते तुघलक रोड पोलिस स्टेशनचे प्रमुख होते. बिर्ला भवन त्यांच्या सीमेत होते. एक हेड कॉन्स्टेबल आणि चार कॉन्स्टेबल्स बिर्ला गृहाच्या दारावर असत, असे त्यांनी आपल्या साक्षीत सांगितले. (Printed Record Vol. I, pages 283-298)

सरदार जसवंतसिंग, डेप्युटी सुपरिंटेंडेंट, दिल्ली यांची साक्ष दि. १६-९-१९४८ ते २९-९-१९४८ या दिवसांत झाली. त्यांची आणि श्री. नगरवाला यांची नंतर झालेली साक्ष त्या त्या भागापुरती मिळतीजुळती आहे. बिर्ला भवनावरील संरक्षणव्यवस्थेसंबंधी साक्ष देताना त्यांनी सांगितले की, १९४७ च्या डिसेंबरपासून बिर्ला भवनावर आरक्षी दल ठेवले होते. महात्मा गांधी तेथे आले तेव्हा हे दल ठेवले गेले. काही दुर्घटना घडू नये म्हणून ही व्यवस्था होती... बाँबस्फोटानंतर बिर्ला भवनावर अधिक लक्ष दिले गेले... साध्या वेषातील आणि गणवेशातील आरक्षी अधिकारी बिर्ला भवनावर ठेवले होते. (Printed Record Vol. I, pages 239-247)

वरील पुराव्यावरून असे दिसून येते की, एक कट शिजत आहे, अशी कल्पना प्राध्यापक जैन यांना बाँबस्फोटापूर्वी होती, तर त्याची अधिक स्पष्ट कल्पना बाँबस्फोटानंतर त्यावेळचे गृहमंत्री श्री. मोरारजी देसाई, सरदार वल्लभभाई पटेल, आरक्षीप्रमुख श्री. नगरवाला आणि जसवंतसिंग यांना होती. मदनलाल अटकेत होता. त्याने एक विस्तृत वक्तव्य आरक्षींना

दिले होते. कटातील व्यक्ती दिल्लीत जेथे राहिल्या किंवा गेल्या होत्या त्या ठिकाणी मदनलालच्या सांगण्याने आरक्षी दलाने तपास केला होता, असा पुरावाही आला आहे. मदनलालनी कटवाल्यांची नावे सांगितली नसली (करकरे सोडून इतरांची) तरी त्यांचे वर्णन आरक्षींना मिळाले होते.

न्यायमूर्ती श्री. आत्मचरण यांनी आपला निर्णय दिनांक १०-२-१९४९ ला दिला. निर्णयपत्रात त्यांनी म्हटले आहे -

२० जानेवारी १९४८ ते ३० जानेवारी १९४८ या काळात आरक्षी दलाची या प्रकरणातील तपासाची दिलाई मला केन्द्र शासनाच्या निदर्शनास आणावयाची आहे. दि. २०-१-१९४८ ला मदनलाल पकडला गेल्यावर लगोलग त्याचे विस्तृत वक्तव्य दिल्ली आरक्षी दलाने मिळविले होते. डॉ. जे. सी. जैन यांनी माननीय गृहमंत्र्यांना दिलेले निवेदन मुंबई आरक्षी दलाला दि. २१-१-१९४८ ला मिळाले होते. दिल्लीचे आरक्षी आणि मुंबई आरक्षी वरील निवेदने दिली गेल्यानंतर लगेच एकमेकांना भेटले होते. इतके असूनही या वक्तव्यांचा लाभ आरक्षी दलाला घेता आला नाही याची कीव वाटते. (Yet the police miserably failed to derive any advantage from those two statements) या प्रकरणाचा तपास करण्यात थोडी जरी आतुरता (Keenness) दाखविली गेली असती तरी ही दुःखांतिका कदाचित टाळता आली असती. (Printed Record Vol. III, pages 119)

न्यायमूर्तींची वरील धारणा त्यांच्यासमोर आलेल्या पुराव्यावरून झाली. नथुराम आणि आपटे हे पुण्याच्या आरक्षी दलाला चांगले परिचित होते. करकरे अहमदनगरच्या आरक्षी दलाला ठाऊक होते. पुण्याच्या आणि नगरच्या आरक्षी दलातील काही कार्यक्षम आरक्षी अधिकाऱ्यांचा समावेश बिर्ला भवनावरील आरक्षी दलात केला गेला असता, तर ही दुर्घटना होण्यापूर्वीच संबंधित व्यक्तींना पकडणे शक्य झाले असते. रक्षणकार्यातील आणि तपासातील ही उणीव भरली गेली असती, तर पुढे होणारी दुर्घटना टळली असती असे न्यायमूर्तींच्या अभिमताचे स्पष्टीकरण करता येईल.

तरी पण, न्यायमूर्तींनी, ही दुःखांतिका कदाचित् टळली असती असे म्हटले आहे हे लक्षात घेण्यासारखे आहे. अशा प्रकारच्या उपायपोजनेने कटाशी संबंधित प्रमुख व्यक्ती पकडल्या जाणे शक्य होते. त्या पकडल्या गेल्या असत्या, तर निदान या कटातील व्यक्तींकडून तरी गांधीहत्या झाली नसती इतपत निष्कर्ष सयुक्तिक होईल. तथापि, त्या व्यक्ती पकडल्या गेल्या असत्याच असे निश्चितपणे म्हणता येत नाही. कारण जिवाचे मोल देऊन एकदा एक अवैध कृत्य करायचे आहे असा कोणी संकल्प वा दुःसंकल्प सोडला की विधिसंरक्षक, विशेषतः ते जागे केल्यावर, ते संकल्प वा दुःसंकल्प हाणून पाडतील, याचा विचार बुद्धिचा पोहोच

असेल तितका दूरवर तो करतो. विधिरक्षकांच्या सहस्र डोळ्यांना आपले दोन डोळे पुरून उरतील, इतकी सावधानता ठेवण्याचा तो प्रयत्न करतो. जेथे त्याला अशी शक्यता नसेल तेथे तो त्या वेळेपुरती माघार घेतो.

इतके सारे करूनही दैव किंवा Chance किंवा परिस्थितीची अनुकूलता वा प्रतिकूलता हा भाग उरतोच. खरोखर आपली दक्षता पुरी पडेल हा त्याला कधीच विश्वास वाटत नाही. पुष्कळदा दक्षतेने नव्हे, तर दैवानेच त्याला संधी मिळते. उदाहरण म्हणून असे देता येईल की, दिल्ली आरक्षी दलाने त्या रात्रीपासून नुसत्या मुंबईकडेच जाणाऱ्या नव्हे, तर इतरत्रही जाणाऱ्या गाड्या तपासल्या असत्या तर ? मदनलाल बरोबर होताच तर कानपूरकडे जाणाऱ्या गाडीत त्यांना नथुराम आणि आपटे अलगद सापडले असते. आणि पुढील दुर्घटना या व्यक्तींकडून झाली नसती आणि ती टाळण्याचे श्रेय आरक्षी दलाला मिळाले असते; पण आरक्षी दलाला दैव अनुकूल नव्हते.

पंजाब उच्च न्यायालयाचा निर्णय दि. २९-६-१९४९ ला लागला. न्यायमूर्ती तीन होते. सर्वश्री भंडारी, अच्छरू राम आणि खोसला. उच्च न्यायालयाने आपण न्यायमूर्ती श्री. आत्मचरण यांच्या अभिमताशी सहमत नसल्याचे लिहिले आहे. न्यायमूर्ती श्री. भंडारी आपल्या निर्णयपत्रात म्हणतात,

'... नथुरामने मनाशी निश्चय केला होता आणि गांधीजींचा जीवनान्त करण्यासाठी स्वतःचा जीव संकटात टाकण्याची त्याने सिद्धता केली होती. पिस्तूल घेऊन बिर्ला भवनात प्रवेशिण्याचा त्याने धोका पत्करला आणि त्याने गोळ्या झाडल्याही. समुदायाने त्याला घेरले. पळून जाण्याचे त्याने मनातही आणले नाही. (He did not care to run away) तो एका विशिष्ट उद्देशाने बिर्ला भवनात आला होता आणि ते उद्दिष्ट तडीस नेण्याचा त्याचा निश्चय होता. कोणताही धोका पत्करण्याची आणि तज्जन्य अटळ अशा परिणामांना तोंड देण्याची त्याची सिद्धता होती. आपल्याला ज्ञात नसलेल्या मनुष्याला किंवा खोट्या नावांनी या ठिकाणाहून त्या ठिकाणी वावरणाऱ्या मनुष्याला किंवा विशिष्ट अवैध कृत्य त्याच्या परिणामांची क्षिती न बाळगता करण्याचा निश्चय केलेल्या मनुष्याला अडविणे आरक्षी दलाला शक्य होते काय ? काहीतरी घडत आहे हे इतपत आरक्षी जाणत होते; परंतु केव्हा, कुठे आणि कोणाकडून आघात होणार आहे हे त्यांना ठाऊक नव्हते. ते अंधारात चाचपडत होते आणि त्यांना मार्ग सापडत नव्हता. काय झाले आहे हे आपण जाणतो आणि त्या अनुरोधाने हे अमोल आयुष्य अशा प्रकारे वाचविता आले असते असे आपल्याला म्हणताही येईल; पण घटना घडून गेल्यावर शहाणपण सुचणे सोपे आहे.

'... समोर आलेल्या पुराव्यावरून माझे असे मत आहे की,

(अ) तीस जानेवारीपूर्वी नथुरामला पकडण्यास आणि त्यायोगे गांधीजींचे आयुष्य

बाचविण्यास आपणास काय अडथळे आले त्या परिस्थितीचे स्पष्टीकरण करण्यास आरक्षी दलाला संधी दिली गेली नाही.

(ब) मदनलाल याने कटवाल्यांची नावे आरक्षींना दिली नाहीत.

(क) जरी ती नावे दिली गेली असती तरी नथुरामला की जो दुसऱ्या नावांनी ठिकठिकाणी हिंडत होता आणि ज्याने स्वत:च्या आयुष्याचे मोल देऊन गांधीजींची हत्या करण्याचा निश्चय केला होता-पकडणे अशक्य नसले तरी-बिकट होते.' (टंकित निर्णयपत्र, पृष्ठ १९५)

न्यायमूर्ती श्री. अच्छरू राम यांनी म्हटले आहे -

'आरक्षींना दिनांक २० ते ३० जानेवारी १९४८ या अवधीत तपासात शिथिलता केली नसती, तर ही दुर्घटना टळली असती, असे विद्वान न्यायमूर्तींनी (श्री. आत्मचरण यांनी) म्हटले आहे त्याचे मला समारोपापूर्वी निराकरण करण्याचे आहे. त्या अभिमताच्या पुष्टीसाठी मला काहीही आढळले नाही आणि माझ्या मताने अभिमत पूर्णतया आगंतुक होते.' (wholly uncalled for) (टंकित निर्णयप्रत, पृष्ठ ५५९)

तिसरे न्यायमूर्ती श्री. खोसला यांनी अनुमोदनात्मक निर्णयपत्र लिहिले आहे. ते या न्यायमूर्तींशी या प्रश्नात सहमत आहेत.

तेव्हा या मानीव (हायपोथेटिकल) प्रश्नाच्या तांत्रिक अंगाचा विचार करता ही हत्या टळली असती असाही आपला तर्क धावेल, तसेच ही हत्या टळली नसती, असेही म्हणणे मांडता येईल. समजा, नथुरामचा मृत्यू तीस जानेवारीपूर्वीच ओढवला असता तर ? पुराव्याशी संबंध नसलेला - पण ही हत्या टळली असती, असा सुसंगत तर्क करता येण्यासारखा एक प्रसंग घडला होता.

बीस जानेवारीच्या थोडेसे पूर्वी नथुराम आणि नाना आपटे एका फटफटीवरून मुंबईहून पुण्याला येत होते. नाना फटफटी चालवत होते. थंडी फार होती म्हणून नानांनी लोकरीची कानटोपी घातली होती. घाटातून येताना एका ठिकाणी त्यांची कानटोपी चट्कन सरकली आणि डोळ्यांवर आली. ती इतकी घट्ट बसली की, एका हाताने वर सरकवणे अशक्य झाले. गाडी वेगात होती. ती थांबविता थांबविता पुष्कळ पुढे गेली. गाडी थांबता थांबता कलंडली. दोघेही खाली पडले.

नथुराम मागे बसला होता. त्याला सर्व दिसत होते; पण त्याला काही करता येण्यासारखे नव्हते !

ते पडले ते रस्त्याच्या कडेवर. रस्त्यालगत खोल दरी होती. रस्त्याची कड आणि गाडीची चाके यात थोडेसुद्धा अंतर नव्हते. जीवन आणि मृत्यू यांची ती सीमारेषा होती.

गाडी दुसऱ्या अंगाला कलंडली असती तर ? तर कदाचित चार-सहा दिवसांनी

त्यांची अर्धवट कुजलेली प्रेते कोणा वाटसरूला आढळली असती.

मला वाटते की, एकदा प्रयत्न फसल्यानंतर त्या प्रयत्नांशी संबंध असणाऱ्या व्यक्तींकडूनच गांधीजींच्या हत्येचा प्रयत्न केला जाईल, अशी त्या अधिकाऱ्यांना कल्पना येणे अवघड होते. आगळीक घडलेली आहे, एक मनुष्य पकडला गेला आहे, आता इतर संबंधितांना पकडण्याचे तेवढे उरले आहे, शासनाचे हात लांब आहेत, तेव्हा इतर लोकांची अटक थोड्या दिवसांचाच प्रश्न आहे, अशा भावनेने अधिकारीगण वागला असला पाहिजे. गांधीजींच्या भोवती आरक्षी दल पुष्कळ प्रमाणात वाढविलेले होते. तेवढे भय संबंधित व्यक्तींना पुरेल आणि ते तरी पुन्हा हालचाल करणार नाहीत अशी त्यांची धारणा असावी.

प्रथम म्हटल्याप्रमाणे, कोणाचा मृत्यू कसा आणि केव्हा ओढवेल हे मनुष्याला अज्ञात असते. गांधीजींच्या मृत्यूला नथुराम आणि आपटे हे निमित्त होणे असे गांधीजींचे विधिलिखित होते. तर इतर कोण्या अपघाताने नव्हे, तर फाशीने मृत्यू हे नथुराम आणि नाना यांचे विधिलिखित होते !

कालाय तस्मै नमः !

卐 卐

दोन

कट केव्हा झाला असेल ?

गांधीहत्येचा कट निश्चितपणे केव्हा झाला याचा पुरावा न्यायालयात आला नाही. कट (कॉन्स्पिरसी) सिद्ध करण्यासाठी तशी निश्चित तिथी शोधून काढण्याची आवश्यकता अभियोजकांना नसते. म्हणून 'तुम्ही आरोपी अमुक अमुक यांनी दि. १ डिसेंबर १९४७ ते ३० जानेवारी १९४८ या दिवसांत, मोहनदास करमचंद गांधी यांची, सर्वसामान्यपणे महात्मा गांधी म्हटले जाते त्यांची, हत्या करण्यासाठी संगनमत केलेत आणि कट केलात...' असा मोघम अवधी आरोपपत्र देताना दिला आहे. (पंजाब उच्च न्यायालय, मुद्रित अभिलेख (Printed Record) ग्रंथ ३, पृष्ठ ११) पुढे अभियोग चालल्यावर आपल्या न्यायपत्रात न्यायमूर्ती श्री. आत्मचरण यांनी असे म्हटले आहे की, जानेवारी १९४८ च्या प्रारंभापासूनच हा कट अस्तित्वात होता आणि तो कट ३० जानेवारी १९४८ पर्यंत राहिला हे सिद्धच झाले आहे (ग्रंथ ३, पृष्ठ ९७.) कटाच्या आरंभाचा निश्चित दिवस सांगण्याचे न्यायमूर्तींनाही काही कारण नव्हते.

गांधीहत्येपूर्वीच्या सात-आठ महिन्यांत नथुराम आणि आपटे यांनी अनेक शस्त्रास्त्रे गोळा केली होती, त्यांची देवाणघेवाण केली होती, आणखी शस्त्रास्त्रांच्या यातायातीतही त्यांचा हात होता असा पुरावा हा अभियोग चालू असताना पुढे आला. पुराव्याच्या आधारे त्या शस्त्रास्त्रांच्या व्यवहारांचे परीक्षण केले, तर गांधीहत्या हे उद्दिष्ट ठेवून त्यांचा हा खटाटोप चाललेला नव्हता असे दिसून येईल. त्या परीक्षणातून गांधीहत्येचा कट केव्हा ठरला असेल याचे पुष्कळ जवळचे अनुमान करता येणे शक्य होईल.

या अभियोगात ज्या काही प्रतिष्ठित व्यक्तींच्या साक्षी झाल्या त्यात गोस्वामी श्री. श्रीकृष्ण जीवनजी महाराज हे एक होते. त्यांना दादा महाराज म्हणत. ते वल्लभाचार्यांचे वंशज मानले जातात आणि त्या पीठाचे धर्मगुरू आहेत. त्यांची साक्ष दिनांक ९-८-१९४८

आणि १०-८-१९४८ अशी दोन दिवस चालली.

हैद्राबाद संस्थान तेव्हा विलीन झालेले नव्हते. रझाकारांचे हिन्दूंवर अनन्वित अत्याचार चालत असत. हैद्राबाद स्टेट काँग्रेस मुक्तिआंदोलनाच्या योजना आखीत असे. रझाकारांच्या अत्याचारांच्या प्रतिकाराच्या आणि सशस्त्र प्रत्याघाताच्या त्या योजना असत. श्री. दादा महाराजांच्या साक्षीवरून असे दिसते की, ते या हैद्राबाद स्टेट काँग्रेसला शस्त्रास्त्रे पुरविण्याची खटपट करीत असत.

नाना आपटे आणि दादा महाराज यांचा चांगला परिचय होता. नाना आपटे हैद्राबादच्या मुक्तीसाठी काही योजना आखीत. ते दादा महाराजांकडून साहाय्य मिळविण्याच्या प्रयत्नात होते.

पाकिस्तान-निर्मितीनंतर त्या राष्ट्राची पहिली संविधानसभा (कॉन्स्टिटचूअंट असेंब्ली) दिल्लीत भरविली जाण्याचे घाटत होते. आपटे यांच्या योजनेतील एक योजना ती संविधानसभा उधळून देण्याची होती, असे दादा महाराजांना पंडित मदनमोहन मालवीय यांचे पुत्र श्री. गोविंद मालवीय यांचेकडून कळले होते, असे त्यांनी आपल्या साक्षीत सांगितले. दादा महाराजांची आणि आपटे यांची पुण्यात गाठ पडल्यावर दादा महाराजांनी आपटे यांना सांगितले की, निदानपक्षी, जिना आणि लियाकतअली उडविले जातील एवढे बघा, असेही त्यांनी आपल्या साक्षीत सांगितले.

दोन मॉर्टरसाठी आपटे यांना चार सहस्र रुपये हवे होते. दि. १६-१०-१९४७ ला एक शस्त्रास्त्रांची गाडी पाकिस्तानकडे धाडली जात होती, ती उडविण्याचा त्यांचा बेत होता. अग्निक्षेपक (Flame Thrower) हे शस्त्र दाखविण्यासाठी ते दादा महाराजांना पुष्कळ ठिकाणी घेऊन गेले होते. अशा प्रकारची पुष्कळ माहिती दादा महाराजांनी आपल्या साक्षीत सांगितली. (मुद्रित अभिलेख, ग्रंथ १, पृष्ठ १३९-१४२)

दादा महाराज काँग्रेसचे सभासद होते तरी हिन्दूंना संरक्षणक्षम आणि प्रतिकारक्षम बनविण्यात ते अग्रेसर होते. सुऱ्हावर्दीच्या अधिपत्याखाली नौखालीच्या हिन्दू हत्याकांडानंतर सामूहिक भ्रष्टीकरण झाले होते. त्यांच्या निराकरणासाठी दादा महाराजांनी तेथे शुद्धिकार्य घडवून आणले होते. हैद्राबादचा मुक्तिसंग्राम हिन्दूंनाच फलदायी होणार असल्याने त्या संग्रामात करता येईल ते साहाय्य त्यांनी केले होते. गांधीजींच्या मुस्लीम अनुनयाच्या धोरणाच्या ते विरुद्ध होते, अशा प्रकारचे कथनही त्यांनी आपल्या साक्षीत केले. 'हिन्दुराष्ट्र' दैनिकाच्या प्रकाशनाला ऑक्टोबर १९४६ मध्ये ते आलेले होते.

दादा महाराजांचे बंधू गोस्वामी दीक्षित ही महाराज यांची साक्षही तितकीच महत्त्वाची होती. आपटे आणि दीक्षित महाराज यांच्यात शस्त्रास्त्रांचे व्यवहार होते, असे त्यांच्याही साक्षीवरून दिसते. त्यांची साक्ष दि. २०-८-१९४८ ते २४-८-१९४८ पर्यंत झाली. ती

मुद्रित अभिलेखाच्या पहिल्या ग्रंथात पृष्ठ १५७ ते १७१ वर आहे.

गांधीहत्या या उद्दिष्टातून वरील शस्त्रास्त्रांचे संबंध नव्हते हे त्या साक्षी वाचून अनुमान करता येते.

गांधीहत्येशी संबंध असणाऱ्या व्यक्ती शस्त्रास्त्रात वावरत असत, हे दाखविणारा वरील पुरावा तोंडी होता. अभियोग चालू असताना काही प्रत्यक्ष पुरावाही आणला गेला. श्री. गणपत संभाजी खरात यांची साक्ष त्या दृष्टीने महत्त्वाची झाली.

श्री. खरात हे विधानसभेचे सभासद होते. या अभियोगाच्या तपासात आरक्षींनी ठिकठिकाणी झडत्या घेतल्या, त्यात आमदार श्री. खरात यांच्या घरीही झडती घेतली. दि. ९-२-१९४८ ला त्यांच्या घरी झालेल्या झडतीत पुष्कळ दारूगोळा मिळाला. त्याचा पंचनामा पी. २१९ या क्रमांकाने नोंदलेला आहे. (मुद्रित अभिलेख ग्रंथ ४,पृष्ठ १४५-१४६)

श्री. खरात यांच्या म्हणण्याप्रमाणे, बडगे यांनी तीन एक आठवड्यापूर्वी त्यांच्याकडे दोन पिशव्या नेल्या. श्री. खरात यांनी त्यातील एक त्यांचे मित्र श्री. शेलार यांच्याकडे दिली आणि दुसरी श्री. नागमोडे यांच्याकडे दिली. झडतीच्या वेळी त्या पिशव्या त्यांच्याकडे (श्री. खरात यांच्याकडे) नव्हत्या. त्यांनी आरक्षींना श्री. नागमोडे आणि शेलार यांच्या घरी नेले. त्या पिशव्या उघडल्या तेव्हा त्यात काही शस्त्रे, स्फोटके आणि गोळ्या होत्या असे आढळले.

त्या साहित्याची टिपणी अशी आहे !

दोन हॅण्ड ग्रेनेड भरलेले, फ्यूज असलेली दोन पाकिटे, पिस्तूल नव्हे पण पिस्तूलाप्रमाणे दिसणारे, मोठे बॅरल जोडलेले एक शस्त्र, वरीलप्रमाणे आणखी एक शस्त्र, पुठ्ठ्याच्या एका खोक्यात १४ काडतुसे, पाच मॅगेझीन, त्यात प्रत्येकी पाच काडतुसे, चार काडतुसे सुट्टी, १९ काडतुसे असलेला एक डबा, वेगळ्या वेगळ्या आकारांची ६८ काडतुसे असलेला डबा, १८८ काडतुसे असलेला डबा, त्यात चार काडतुसे सुट्टी.

श्री. खरात यांची साक्ष दि. २६-८-१९४८ ला झाली. (मुद्रित अभिलेख ग्रंथ १, पृष्ठ १७८-७९)

दि. २०-९-१९४८ ला श्री. नामदेव आयप्पा नागमोडे आणि श्री. होनाजी गणपत शेलार यांच्या साक्षी झाल्या. श्री. खरात यांनी आरक्षींना श्री. नागमोडे यांचेकडे दि. ८-२-१९४८ ला नेले होते. तेथे झालेल्या झडतीतील वस्तू अशा होत्या.

एक डबा, त्यावर गनकॉटन स्लॅब्ज पाइल्ड वजन, एलबी मार्क १ नो. ४; ड्राय गनकॉटन पौंड ५-०; पाणी ०-१३, मॅन्युफॅक्चर्ड सी एफ डेट... १९४२ ग्रॉसवेट पौंड... डेट २-१२-१९४२ अशी अक्षरे होती.

एका पुड्यात स्फोटकाच्या ३४ कांड्या होत्या. त्यातील तेरा कांड्यांवर पोलरा एन्. एस्. गेलिग्नाइट, एकवीस कांड्यावर नोबलूस एक्सप्लोझिव, अलफ्रेड नोबल ग्लासगो अशी

अक्षरे होती.

चार पांढरट चिपा, त्यावर मध्यावर दीड इंच छिद्र होते. त्यावर सी. एफ ७५४४, ७८, ७५४४, १ पौंड १९४२, ४३, १९४२ अशी अक्षरे होती.
साडेतीन इंच लांब दोन काडतुसे.

पंधरा पांढऱ्या कांड्या, त्यावर वेगवेगळे क्रमांक होते. फ्यूज वायरच्या चार गुंडाळ्या. तांबूस रंगाच्या फ्यूजच्या गुंडाळ्या, तीन फ्यूजच्या गुंडाळ्या. एका पाकिटात एक काळी फ्यूज वायर, १४ डिटोनेटर, त्यातले ९ वातींसह, ५ वातीवाचून, तीन बारीक तांबूस कांड्या, एक तांब्याच्या तारेचे वलय. (मुद्रित अभिलेख ग्रंथ १, पृष्ठ २४७, २४८, २४९ पंचनामा क्र. पी. २५२ मुद्रित अभिलेख ग्रंथ ४, पृष्ठ १८१-१९१.)

नथुराम ज्या खोलीत राहात असे त्या खोलीची झडती दि. ३१-१-१९४८ ला झाली. त्याचा पंचनामा क्रमांक पी २२२ हा आहे. नथुरामच्या खोलीत एक पदार्थ मिळाला तो स्फोटक होता, असे श्री. शापूर खुश्रो भावनागरी, इन्स्पेक्टर ऑफ एक्सप्लोजिवज् वेस्ट सर्कल, मुंबई, यांनी आपल्या दि. ४-८-१९४८ च्या साक्षीत सांगितले. (मुद्रित अभिलेख ग्रंथ १, पृष्ठ २७५-७६.)

आम्ही आरोपी मुंबईच्या आरक्षी कार्यालयात तपासासाठी ठेवले गेलो होतो. त्या दिवसांत फ्लेम थ्रोअर नावाचे शस्त्र आम्हाला दाखविले गेले होते. त्या शस्त्राचे वर्णन केव्हा तरी माझ्या वाचण्यात आले होते. घनरूप पेट्रोल लक्ष्यावर फेकले जाते; जाताना ते पेट घेऊनच जाते. लक्ष्यावर पडताच त्याच्या उष्णतेने लोखंडही वितळते. रणगाडासुद्धा निकामी करणारे ते प्रभावी शस्त्र आहे.

एखादी लहानशी लढाई करता येईल एवढा हा शस्त्रसंग्रह पुढे आणला गेला होता. गांधीहत्या या मर्यादित अभियोगाच्या संबंधात तरी हा शस्त्रास्त्रांचा प्रपंच असंबद्ध होता; पण अभियोजकांना सिद्ध करायचे होते की, संबंधित व्यक्ती शस्त्रांच्या यातायातीत गुरफटलेल्या होत्या. त्या भागापुरता या पुराव्याचा उपयोग त्यांना झाला. गांधीहत्येसाठी म्हणून हा शस्त्रसंग्रह होता, असे त्यांचेही प्रतिपादन नव्हते. त्यामुळे नथुराम आणि नाना आपटे यांचे उद्दिष्ट या शस्त्रास्त्रांच्या व्यवहारांच्या दिवसांत आणखी कोणते तरी असले पाहिजे, हा सुसंगत तर्क निघतो. अगदी अलीकडील काळात काही तरुणांनी नगर-हवेली स्वाधीन करून घेतली, तसे हैद्राबाद हस्तगत करून हिन्दुस्थानच्या संघराज्यात ते विलीन करण्याचे नथुराम आणि आपटे यांचे उद्दिष्ट असेल किंवा श्री. श्रीकृष्ण जीवनजी महाराज यांच्या साक्षीप्रमाणे, पाकिस्तानची संविधानसभा उडविण्याचा हेतू असेल किंवा पाकिस्तानला धाडल्या जाणाऱ्या सेनासाहित्यात अडथळा निर्माण करण्याचा त्यांचा उद्देश असेल; पण तेव्हा तरी गांधीहत्या हा हेतू त्यांच्या डोळ्यांसमोर नव्हता.

दि. १५-१-१९४८ ला कट अस्तित्वात होता असे मानण्याजोगा एक पुरावा पुढे आणला गेला तो श्री. दीक्षितजी यांच्या साक्षीचा. 'दि. १५-१-१९४८ ला आपटे, बडगे, मदनलाल, नथुराम आणि करकरे माझ्याकडे आले होते.' असे त्यांनी सांगितले. कटातील आरोपी म्हणून ज्यांच्यावर पुढे अभियोग भरला त्यात हे पाचजण होते.

दीक्षितजी महाराज म्हणतात, 'मी बाहेर गेलो होतो... पंचवीस-तीस मिनिटांनी परत आलो. बडगेजवळ असलेल्या पिशवीतील वस्तू तो इतरांना तेव्हा दाखवीत होता. ते आपापसांत हळूहळू बोलत होते. मी पाहिलेल्या वस्तूत दोन पांढऱ्या विटा आणि दोन हँड ग्रेनेड होते. बडगे हँड ग्रेनेड कसा वापरावा ते दाखवीत होता. मला वाटले, बडगे दाखवीत असलेली पद्धत चुकीची होती. मी त्यांना पद्धत दाखविली. मग त्या वस्तू पिशवीत ठेवल्या गेल्या. नंतर ते जाऊ लागले. बडगे आणि आपटे मागे राहिले. येथे येऊन या वस्तूंचे प्रदर्शन करण्याचा हेतू काय, असे मी त्यांना विचारले. माझा त्यांचा संबंध हैद्राबाद संस्थानापुरता काय तो त्या वेळेपर्यंत होता. मला वाटले, त्यांची खेपही त्या संबंधात असेल. म्हणून मी त्यांना या त्यांच्या येण्याचे कारण विचारले. त्या दोघांनी सांगितले की, ते एका महत्त्वाच्या कामाला जात आहेत. त्यांना एक पिस्तूल किंवा रिव्हॉल्वर हवे आहे. मी त्यांना त्यांचे महत्त्वाचे काम विचारले. ते कळल्यावर मी पिस्तूल किंवा रिव्हॉल्वर देण्याचा विचार करीन असे मी त्यांना सांगितले. दोघांनी त्यांच्या या कामासंबंधी बोलण्याचे नाकारले. ते जाऊ लागले, तसे मी बडगेला थांबविले. 'थोड्या वेळात परत येतो.' असे बडगे म्हणाला आणि ते दोघे निघून गेले. पंधरा-वीस मिनिटांनी बडगे आला. त्याला मी त्याच्या कामासंबंधी विचारले. बडगेने पुन्हा येण्याचे मान्य केले. तेव्हा 'ते काम' सांगेन असे तो म्हणाला...' (मुद्रित अभिलेख ग्रंथ १, पृष्ठ १५८-१५९.)

साक्षीतील विसंगती दाखविण्याची झाली, तर बडगेला ते महत्त्वाचे काम तेव्हा ठाऊक नव्हते, असे त्याच्या साक्षीवरून दिसते. त्याच्या म्हणण्याप्रमाणे, 'दीक्षितजी महाराजांच्या घरातून आम्ही तिघे (आपटे, नथुराम, बडगे) बाहेर अंगणात आलो. तिथे आपटेने मला दिल्लीला येण्यासंबधाने विचारले. बडगे याने दिल्लीला जाण्याचे कारण विचारल्यावर गांधीहत्येचे कारण त्याला कळले. (मुद्रित अभिलेख ग्रंथ १, पृष्ठ ८४) ही विसंगती सोडली तरी दि. १५ ला तो कटात समाविष्ट झाला असे मानता येईल. कारण पुढे तो त्याप्रमाणे दिल्लीला गेला होता.

डॉ. जगदीशचंद्र जैन यांनी आपल्या साक्षीत मदनलाल, गांधीजींना मारण्याच्या विचाराविषयी त्याच्याजवळ बोलला होता असे म्हटले आहे. पण दिवसाच्या संबंधात ते फार अस्थिर आहेत. ते म्हणतात, जानेवारीच्या पहिल्या आठवड्याच्या शेवटच्या दिवसाच्या आसपास मदनलाल त्यांना भेटला होता. त्यानंतर आणखी दोन दिवसांनी भेटला होता.

पुन्हा एक-दोन दिवसांनी भेटला तो दिल्लीला जाण्याच्या सिद्धतेत असताना. कारण आपण दिल्लीहून परतल्यावर पुन्हा भेटू, असे मदनलाल म्हणाल्याचे डॉ. जैन सांगतात. (मुद्रित अभिलेख ग्रंथ १, पृष्ठ १३१-३२.)

मदनलाल डॉ. जैन यांच्याजवळ आम्ही एका नेत्याला मारणार आहोत, असे ज्या दिवशी म्हणाला, असे डॉ. जैन यांचे म्हणणे होते, त्या दिवशी श्री. अंगदसिंग म्हणून आणखी एक गृहस्थ उपस्थित होते, असे त्यांनी सांगितले. मात्र, नेमक्या याच वेळी ते निघून गेलेले होते, असे त्यांचे म्हणणे. श्री. अंगदसिंग यांची साक्ष दि. १३-८-१९४८. ते १६-८-१९४८ या दिवसांत झाली. 'तो दिवस १० किंवा ११ जानेवारी १९४८ हा असावा. तो कदाचित शनिवार किंवा रविवार असावा. दिनांक किंवा वार यासंबंधी मी निश्चित नाही.' असे त्यांनी आपल्या साक्षीत सांगितले (मुद्रित अभिलेख ग्रंथ १, पृष्ठ १४७). अंगदसिंग यांनी आपल्या जैन यांच्याशी नंतर झालेल्या संभाषणाचे टिपण ठेवले नव्हते.

डॉ. जैन यांनी श्री. मोरारजींची भेट दि. २१-१-१९४८ ला घेतली होती. श्री. मोरारजींच्या आठवणीप्रमाणे प्रा. जैन यांच्या बोलण्यात कोणी अंगदसिंग आला नव्हता. (So far as I remember professor Jain while he was narrating his story to us had referred to no Angadsingh.) (मुद्रित अभिलेख ग्रंथ १, पृष्ठ १६९) पुन्हा डॉ. जैन आणि श्री. मोराराजी यांची भेट दि. २४-१-१९४८ ला आणि नंतर ३ किंवा ४ फेब्रुवारी १९४८ ला झाली होती. (श्री. मोरारजींची साक्ष मुद्रित अभिलेख ग्रंथ १, पृष्ठ १६७) डॉ. जैन यांच्या म्हणण्याप्रमाणे त्या कोणत्याच वेळी त्यांनी कोणालाही त्यांचे वक्तव्य लेखी दिले नव्हते. (I did not give the facts of the case to any one in writing between the period with effect from 21st January 1948 till 17th February 1948) (मुद्रित अभिलेख ग्रंथ १, पृष्ठ १३३)

श्री. मोरारजींच्या साक्षीप्रमाणे 'स्फोटाच्या घटनेपूर्वी तीन-चार दिवस मदनलाल दिल्लीला गेला होता, असे त्यांना डॉ. जैन यांनी सांगितले. दिवसासंबंधी मला निश्चित आठवत नाही. मदनलाल आणि त्याचे मित्र यांनी एका मोठ्या नेत्याला मारण्याचे ठरविले आहे, असे तो दिल्लीला निघण्यापूर्वी मला बोलला होता, असे डॉ. जैन म्हणाले.' (मुद्रित अभिलेख ग्रंथ १, पृष्ठ १६६)

वर म्हटल्याप्रमाणे डॉ. जैन यांचे वक्तव्य दि. १७-२-१९४८ पर्यंत लेखी झालेले नव्हते. जे लेखी नाही त्यात नंतर थोडे मागे पुढे करण्याला अवसर असतो. कोणतातरी धागा खरा आहे आणि नंतर त्या अनुरोधाने घटना घडत गेल्या, असे म्हटल्यावर कोणीही मूळच्या गोष्टीत कळत नकळत बदल करतो. त्यात त्याचा काही हेतू असतो असे नाही. कदाचित त्याला त्या बदलातील परिणामांचे महत्त्व नसते.

दि. १५ ला रात्री मदनलाल आणि करकरे दिल्लीला निघाले आणि दि. १७ ला सकाळी ते दिल्लीला पोहोचले असा पुरावा आहे. मदनलाल श्री. जैन यांच्याशी या भावी घटनेसंबंधी बोललाच असेल, तर ते दि. १४ ते १५ जानेवारी १९४८ या दिवसातच शक्य होते. श्री. जैन इत्यादिकांच्या साक्षीवरून एवढे म्हणता येईल की, दिल्लीला निघण्यापूर्वी मदनलाल कटाचा एक घटक होता; पण दिनांकासंबंधी कोणाला निश्चितपणे सांगता येत नसल्याने कटाची तिथी हुडकण्याच्या दृष्टीने त्यांचा पुरावा उपयुक्त होणार नाही.

दि. १३-१-१९४८ आणि १४-१-१९४८ ला नथुरामने स्वत:च्या दोन बिम्यांना अनुक्रमे सौ. चंपूताई (नाना आपटे यांची पत्नी) आणि सौ. सिंधू गोडसे (गोपाळ गोडसेची पत्नी) यांना उत्तराधिकारी केले, अशी साक्ष ओरिएन्टल (गव्हर्न्मेन्ट सिक्युरिटी लाइफ इन्शुअरन्स कंपनीच्या वतीने दि. १०-८-१९४८ ला झाली. (मुद्रित अभिलेख ग्रंथ १, पृष्ठ १४४-१४५)

बिम्याला उत्तराधिकारी नेमणे ही वस्तुत: नेहमीच्या व्यवहारातील एक साधी घटना असते. सर्वसामान्यपणे, त्या त्या व्यक्तीच्या जीविताच्या स्थिरतेच्या किंवा अस्थिरतेच्या दृष्टीने उत्तराधिकारपत्र करण्याचे काही संकेत असतात. वृद्धत्व आले आहे, काही रोग झाला आहे, अपंगत्व आले आहे, कोठला तरी दूरचा किंवा परदेशाचा प्रवास करण्याचा आहे, कोठल्यातरी कामात अपघाताची शक्यता आहे, रणक्षेत्रावर जायचे आहे, अशा वेळी मृत्यू आलाच तर पैसे मिळण्यास इतरांना अडचण पडू नये म्हणून उत्तराधिकारपत्र केले जाते. तरीही एखी कोणी उत्तराधिकारपत्र केले तर त्यात वरील संकेताविरुद्ध असे काहीच नसते. कारण कोणाचा मृत्यू केव्हा होईल हे कोणास सांगता येत नाही. म्हणून बिम्याची योजना असते, म्हणूनच उत्तराधिकारपत्राची योजना असते.

उत्तराधिकारपत्र करण्यात अवैध असे ते काय आहे ? पण नथुरामने केलेल्या उत्तराधिकारपत्राचे अभियोजकांना महत्त्व वाटले ते पुढे घडलेल्या घटनांमुळे.
ते महत्त्व त्यांना तीन अंगांनी वाटले.

पहिले अंग : दि. १३ आणि १४ जानेवारी १९४८ या दोन दिवसांत नथुरामच्या मनात काहीतरी निश्चित निर्णय ठरला होता. उत्तराधिकारपत्राचे दिनांक या वस्तुस्थितीचे निदर्शक होते हे त्यांना न्यायालयात दाखविण्याचे होते.

दुसरे अंग : त्या लेखाची भाषा अशी होती. (विमापत्र क्रमांक ११६६१०२; राशी रु. २०००/-) 'मला मृत्यू आला तर या बिम्याचे पैसे माझ्या मित्राची पत्नी सौ. चंपूताई नारायण आपटे, २२ बुधवार पेठ, पुणे, वय ३२ यांना दिले जावेत, असे उत्तराधिकारपत्र मी, नथुराम विनायक गोडसे या ठिकाणी करतो. पुणे दि. १३ जानेवारी १९४८ स्वाक्षरी न. वि. गोडसे.'

(विमापत्रक्रमांक ११६६०१. राशी रुपये ३०००/-) 'या बिम्याचे पैसे माझ्या

धाकट्या भावाची पत्नी सौ. सिंधूताई गोपाळ गोडसे, वय २५ यांना दिले जावेत. पुणे दिनांक १४ जानेवारी १९४८.

(मुद्रित अभिलेख-प्रमाण पी. १२९. पी. १२८. ग्रंथ ४, पृष्ठे ७६ ते ८४)

मनात ठरविलेल्या गोष्टीच्या अनुषंगाने स्वतःचा मृत्यू लवकरच ओढवण्याची शक्यता आहे, असे नथुरामला वाटले हे या लेखावरून दाखविणे. कारण सर्वसामान्य संकेतात बसेल अशी नथुरामची अवस्था नव्हती.

तिसरे अंग : नथुरामने हे लेख आपटे आणि गोपाळ यांच्या नव्हे, तर यांच्या पत्नीच्या नावे केले. अर्थात; आपटे आणि गोपाळ यांचेही जीवित वादळात येण्याचा संभव आहे, असे नथुरामला वाटले हे दाखविणे.

कट म्हणजे एकापेक्षा अधिक व्यक्तींनी म्हणजेच दोन किंवा त्याहून अधिक व्यक्तींनी काही अवैध कृत्य करण्याचा विचार करणे आणि त्या दृष्टीने संगनमताने पावले टाकणे. (भारतीय दंडविधान धारा १२० अ). केवळ नथुरामच्या मनात किंवा कोणा एका व्यक्तीच्या मनात विचार आला आणि त्याने त्या विचारपूर्तीसाठी पावले टाकली, तर तो कट ठरत नाही. केवळ नथुरामने उत्तराधिकारपत्र अमक्याशी संबंधित व्यक्तींच्या नावे केले यात दुसरे दोषार्ह ठरत नाहीत; परंतु प्रस्तुत प्रकरणी गोपाळ गोडसेच्या संबंधात एक पुरावा आणला गेला तो दिनांक १४-१-१९४८ चा.

भारतीय सेनेच्या खडकी येथील वह्नि-वचन-साहित्यालयात (मोटार ट्रान्सपोर्ट स्टोअर सब डेपोमध्ये) गोपाळ गोडसे तेव्हा साहित्य-आवेक्षक (स्टोअर-कीपर) म्हणून काम करीत असे. त्याने दिनांक १४-१-१९४८ ला वरिष्ठांना एक आवेदन दिले. त्यात त्याने दि. १५-१-१९४८ पासून २१-१-१९४८ पर्यंत अशी सात दिवसांची सुट्टी मागितली. (प्रमाण क्रमांक पी. १३२. मुद्रित अभिलेख ग्रंथ ४, पृष्ठ ८६). पण दि. १६-१-१९४८ या दिवशी त्याला परमार्शदात्री समितीपुढे (Advisory Board) उभे राहण्याचे असल्याने त्यांची सुट्टी दि. १७-१-१९४८ पासून सात दिवस संमत केली गेल्याचे त्याला कळविले गेले.

अभियोजकांचे लक्ष आवेदनाच्या १४ जानेवारी या दिनांकावर केन्द्रित होते. नथुरामने गोपाळच्या पत्नीच्या नावे केलेला दि. १४-१-१९४८ चा लेख आणि गोपाळने सुट्टीसाठी केलेले १४-१-१९४८ चे आवेदन यांची सांगड घालता आणि गोपाळच्या पुढील हालचाली लक्षात घेता, गोपाळ गोडसे दि. १४-१-१९४८ ला कटाचा घटक झाला होता, असे अभियोजकांना सिद्ध करण्याचे होते.

आपटे यांच्या संबंधातही १४-१-१९४८ चा पुरावा पुढे आणला गेला. आपटे आणि नथुराम दि. १४-१-१९४८ ला दुपारच्या ३.३० च्या गाडीने पुण्याहून मुंबईला गेल्याचे दि. ३-८-१९४८ ला झालेल्या एका साक्षीने मांडले गेले. (मुद्रित अभिलेख ग्रंथ

१, पृष्ठे १२३-१२४) आपटे यांच्या पत्नीचे नावे नथुरामने दि. १३-१-१९४८ ला केलेले उत्तराधिकारपत्र आणि आपटे यांचे नथुरामबरोबर त्यावेळचे म्हणजे दिनांक १४-१-१९४८ चे मुंबईस जाणे यांची संगती लावली असता अणि आपटे यांच्या नंतरच्या हालचाली लक्षात येता आपटे दिनांक १३ किंवा १४ जानेवारीला कटात मिसळले, असे प्रतिपादन अभियोजकांना करावयाचे होते.

अशा प्रकारे दि. १३-१-१९४८ आणि १४-१-१९४८ हे अभियोजकांच्या दृष्टीने फार महत्त्वाचे दिवस होते. दि. १३-१-१९४८ ला नथुरामने पहिले उत्तराधिकारपत्र केले. त्या दिवशीच त्याने मनाशी काही ठरविले असेल काय याची चिकित्सा करण्यासाठी, हिन्दुस्थानच्या राजकारणावर परिणाम करणाऱ्या त्या दोन-तीन दिवसांत घडलेल्या दिल्लीतील घटना बघणे स्थलोचित ठरेल.

सरदार वल्लभभाई पटेल तेव्हा हिन्दुस्थानचे उपपंतप्रधान होते. पाकिस्तान आणि हिन्दुस्थान यातील काही वादग्रस्त आणि ज्वलंत प्रश्नांवर गेल्या काही महिन्यांपासून श्रेष्ठ पातळीवर वाटाघाटी चालू होत्या. हिन्दुस्थानच्या विभाजनाच्या वेळी पाकिस्तानच्या वाट्याचे असलेले पंचावन्न कोटी रुपये देण्याचाही प्रश्न चर्चेचा आणि वाटाघाटीचा एक मुख्य विषय होता.

हा प्रश्न ज्वलंत तर राहोच, वादग्रस्त होण्याचेही एखी काही कारण नव्हते. फाळणीच्या वेळी पाकिस्तानच्या अंगावर असलेल्या ऋणाची परतफेड हिन्दुस्थानने करावयाची आणि चार वर्षांच्या अवधीनंतर पाकिस्तानने सवडीने त्याची परतफेड भारताला करावयाची, अशी उदारता हिन्दुस्थानाने आधीच दाखविली होती. तेव्हा जे वास्तविक पाकिस्तानचे आहे ते धन अडविण्याचा विचारही हिन्दुस्थानच्या मनात येणे शक्य नव्हते.

पण प्रश्न तेवढाच एकाकी नव्हता. काश्मीरवर पाकिस्तानने टोळीवाल्यांकरवी केलेले आक्रमण आणि मग स्वतः पाकिस्तानने त्या आक्रमणाचा केलेला पाठपुरावा या वस्तुस्थितीशी पंचावन्न कोटींचा प्रश्न निगडित होता. सरदार पटेल यांनी दि. १२-१-१९४८ या दिवशी पत्रकारांना जे निवेदन दिले त्यांत त्यांनी हिन्दुस्थानची भूमिका अतिशय स्पष्ट शब्दांत मांडली आहे.

ते म्हणाले, 'काश्मीरवरील आक्रमणाचा प्रतिरोध करण्याचा उपचार म्हणून आम्ही या संधीचे (आर्थिक व्यवहाराच्या कराराचे) कार्यवहन विलंबिले यात आम्ही न्यायोचित व्यवहार केला आहे. आम्ही आमच्या संधीने बांधलेले आहोत, असे आम्ही पाकिस्तान शासनाला एकदा नव्हे, अनेकदा सांगितले आहे. पैसे देण्यासाठी नियत अवधीचे बंधन त्या संधीत आम्हावर नाही. सध्या पाकिस्तानने आपल्या सैन्यानिशी आमच्याशी सशस्त्र संघर्ष चालविला आहे, त्याची व्याप्ती अधिक भयानक होईल अशी चिन्हे दिसत आहेत, त्यायोगे

आर्थिक संधीचा पायाच उद्ध्वस्त होण्याची शक्यता आहे. संधीत समाविष्ट असलेल्या ऋणाचे उत्तरदायित्व स्वीकारणे, साहित्याची विभागणी करणे इत्यादी भागांवरही त्याचा अनिष्ट परिणाम होईल. अशा स्थितीत उरलेले पैसे चावेत, असा वाद आमच्याशी पाकिस्तानला कोणत्याही न्यायाने घालता येणार नाही. (Indian Information dated 22-2-1948)

'काश्मीरच्या प्रश्नांचा निर्णय झाल्यावाचून आम्ही कोणतेही पैसे देण्याला मान्यता देणार नाही, असे मी तेव्हा मागील भेटीतून स्पष्ट केले होते,' असे सरदार पटेल यांनी त्या निवेदनात सांगितले होते.

तेव्हाचे अर्थमंत्री श्री. षण्मुख चेट्टी यांनी आपल्या बलाबलाचा विचार करून हिन्दुस्थानच्या वतीने यापुढे पाकिस्तानला बजावले, 'आम्ही तोपर्यंत (सर्व प्रश्न सुटेपर्यंत) आमच्या न्याय्य मार्गापासून आमच्या शेजारी राष्ट्राच्या उत्तरदायी मंत्र्यांच्या दादागिरीच्या प्रचारामुळे विचलित होणार नाही.' (Indian Information dated 2-2-1948)

आग विझविण्याचे दोन उपाय म्हणजे आगीवर पाणी मारणे आणि आगीला इंधन म्हणून पूरक होतील अशा वस्तू आगीपासून तोडणे. काश्मीर आघाडीवर आपले सैन्य आक्रमकांना थोपविण्याची आणि त्यांना पिटाळून लावण्याची पराकाष्ठा करीत होते. हिन्दुस्थानच्या शासनाचा हा आर्थिक व्यवहारातील रणनीतीचा पवित्रा, इंधन म्हणून उपयोगी पडणाऱ्या वस्तूंना अटकाव करण्याइतका मोलाचा होता. १९६५ या वर्षी पाकिस्तानचे काश्मीरवरील आक्रमण थोपविण्यासाठी, शास्त्रीजींच्या प्रधानमंत्रिपदाच्या छायेखालील हिन्दुस्थानच्या सेनेने लाहोरकडे धडक मारली ही घटना जशी समयोचित आणि अभिनंदनीय होती, तितकाच गौरवास्पद हिन्दुस्थानच्या शासनाचा त्या वेळचा तो निर्णय होता. रक्तपात लवकर थांबविण्याचा, शांती प्रस्थापित करण्याचा, तो एक दूरदर्शी उपाय होता. काश्मीरचा प्रश्न मिटला नसला तरी पैसे देऊन टाकू, आपण दाखविलेल्या सद्भावाने आणि औदार्याने पाकिस्तान शासनाचे हृदयपरिवर्तन होईल, ते आक्रमण थांबवतील, असे आपल्या शासनाला वाटले नाही. पूर्वीच्या अनुभवाने त्यांचे हात पोळले होते. विषाची परीक्षा पुन्हा बघण्याची त्यांची इच्छा नव्हती.

गांधीजींचे वास्तव्य त्या दिवसांत दिल्लीलाच होते. शासनश्रेष्ठींच्या आणि त्यांच्या भेटी होत असत, राजकीय विषयांवर चर्चाही होत असत. हिन्दुस्थान शासनाचा हा निर्णय गांधीजींना आवडला नाही. पाकिस्तानची अशी कोंडी करताना हिन्दुस्थान, गांधीजींच्या मनातील अहिंसा या तत्त्वापासून घसरत आहे, अशी त्यांची धारणा झाली. शासनाला हा निर्णय फिरवण्यास लावण्याचे त्यांनी प्रयत्न केले पण ते विफल झाले, असा संकेत गांधीजींच्या दि. १३-१-१९४८ च्या प्रवचनातील भागातून मिळतो. ते म्हणाले,

'... मगर ऐसा मौका भी आता है जब अहिंसा का पुजारी समाज के किसी अन्याय

के सामने विरोध प्रकट करने के लिए उपवास करनेपर मजबूर हो जाता है। वह ऐसा तभी करता है जब अहिंसा के पुजारी की हैसियतसे उसके सामने दुसरा कोई रास्ता खुला नही रह जाता। ऐसा मोका मेरे लिये आ गया है ।' (दिल्ली डायरी, नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद, पृष्ठ ३४४)

बहुधा सरदार पटेल यांच्या कणखरपणामुळे गांधीजींवर वरील उद्‌गार काढण्याचा प्रसंग आला. याउलट गांधीजींच्या उपवसाचा निर्णय सरदार पटेल यांना आवडला नाही. ते दिल्ली सोडून गेले, असे आझादांनी आपल्या पुस्तकात म्हटले आहे.

प्रकट केलेल्या विचाराप्रमाणे गांधीजींनी दुसऱ्या दिवसापासून उपवासाला आरंभ केला.

पंचावन्न कोटी रुपये अडविण्याच्या निर्णयाच्या पाठोपाठ गांधीजींच्या उपोषणाचा निर्णय झाला. या दोन घटकांची संगती लावणे राजकारणाच्या अभ्यासकांना अवघड नव्हते. गांधीजींच्या त्या दिवसांतील वक्तव्ये लोकांच्या डोळ्यांसमोर होती. स्वतःची हानी पत्करून मुसलमानांना आणि मुसलमान राष्ट्राला सुख देण्यास लावण्याचा त्यांचा आग्रह लोकांना परिचित होता. हिन्दू समाजाचे हे राष्ट्र आहे असे मानण्यात सांप्रदायिकता आहे, असे त्यांचे मत होते. याउलट पाकिस्तान हे मुसलमान समाजाचे धर्माधिष्ठित राष्ट्र हिन्दुस्थानातच प्रस्थापित झालेले होते. या मुस्लीम राष्ट्राच्या मार्गात आपण रणनीतीचे एक पाऊल म्हणून Strategy म्हणून जरी अडचण निर्माण केली तरी त्यायोगेसुद्धा आपण तत्त्वभ्रष्ट झालो, अशी जगाची भावना होईल, असे त्यांना वाटत असले पाहिजे, असा तर्क करता येण्याइतकी त्यांची मते आणि त्यांचे व्यवहार लोकांना परिचित होते. स्वाभाविकपणेच, शासन तसे ऐकत नाही तर आपले प्राण संकटात टाकून आपण शासनाला विचार करावयास लावू, अशा हेतूने त्यांनी उपवासाचा मार्ग अवलंबला असला पाहिजे, असे अनुमान राजनीतीची ओळख असणाऱ्या लोकांना करता येणे शक्य होते.

पुढे, म्हणजे गांधीजींचा उपवास चालू असताना, भारतशासनाने एक पत्रक काढले. ज्यांनी गांधीजींच्या उपवासाची संगती वरीलप्रमाणे लावली असेल. त्यांची ती संगती बरोबर होती, याचा पडताळा त्या पत्रकावरून येईल. पंचावन्न कोटींची अडवणूक हे त्या उपवासाचे एक कारण होते, हे त्या पत्रकावरून दिसेल.

'गांधीजींनी देशाला जे निवेदन केले आहे त्याला अनुसरून, (हिन्दुस्थान आणि पाकिस्तान या) दोन राष्ट्रांतील संदेशाचे आणि संघर्षाचे एक कारण दूर करण्याचे हिन्दुस्थान शासनाने ठरविले आहे. राष्ट्रीय सन्मान आणि राष्ट्रीय हित यांच्याशी असे करणे सुसंगत आहे आणि ते शासनाच्या कक्षेत आहे.

'या उत्स्फूर्त भावनेच्या बुडाशी शासनाची अशी तळमळ आहे की, यातील सद्‌भावना

ओळखली जावी आणि परस्परप्रेमबंधाचे वातावरण निर्माण व्हावे, या स्नेहबंधासाठी गांधीजी आज यज्ञवेदीवर देह झिजवीत आहेत, या सद्भावनेने त्यांचा उपवास थांबावा आणि त्यांना हिन्दुस्थानच्या त्यांच्या अतुल सेवेत आणखी भर घालण्याची संधी मिळावी.

'उरलेल्या पैशांच्या भागाचे कार्यवहन त्वरित करण्याचे हिन्दुस्थान शासनाने ठरविले आहे...'

'हा निर्णय म्हणजे, या देशाच्या देदीप्यमान परंपरेला अनुसरून शांती आणि सदिच्छा टिकविण्याकरता गांधीजींच्या अहिंसक आणि उदात्त प्रयत्नाला हिन्दुस्थान शासनाची मनःपूर्वक देणगी आहे.' (Indian Information dated 2-2-1948)

पंतप्रधानांनी काढलेल्या पत्रकातही, 'हिन्दुस्थान शासनाचा हा निर्णय लक्षपूर्वक विचारानंतर आणि गांधीजींशी केलेल्या विचारविनिमयानंतर घेतला गेला आहे,' असे म्हटले आहे. (Indian Information dated 2-2-1948)

भारताच्या या सद्भावनेच्या ओतप्रोत ओघानेही पाकिस्तानचे हृदय भिजू शकले नाही. त्यांनी आक्रमण आखडते घेतले नाही; अन्य सीमांवर हुसण्या देऊन हिन्दुस्थानला त्रस्त करण्याचे सोडले नाही, पाकिस्तानातील उरलेल्या हिन्दुंना छलबलाने हुसकावून लावण्याचे सत्र चालूच ठेवले, हा त्यानंतरचा इतिहास वाचकांना ज्ञात आहेच. त्या भागाशी सध्या काही संबंध नाही. १३-१-१९४८ चे महत्त्व काय हा प्रस्तुत विषय आहे.

नथुराम आणि आपटे 'हिन्दुराष्ट्र' दैनिक चालवीत असत. पूर्वीच्या अग्रणी वृत्तपत्राचे 'हिन्दुराष्ट्रात' रूपांतर केले होते. जातीय तत्त्वावर आधारलेले मुस्लीम राष्ट्र येथे जन्म घेणार अशी चिन्हे दिसू लागल्यापासून या वृत्तपत्राची संपादकीये अधिक प्रखर होऊ लागली होती. काही संपादकीये अभियोजकांनी प्रमाण म्हणून पुढे आणली ती मुद्रित अभिलेख ग्रंथ ४ मधील पृष्ठ ९२ ते १२३ मध्ये ग्रंथित आहेत.

या वृत्तपत्राकडून अनेक वेळी प्रतिभू (जामीन किंवा security) मागितला गेला. पाकिस्तान बोलून चालून मुस्लीम राष्ट्र. तेथे त्यामुळे हिन्दुंचा छळ, तर मुसलमानांचा अनुनय करण्यास हिन्दुत्ववादी विरोध करतात म्हणून हिन्दुस्थानात हिन्दुत्ववाद्यांचा छळ हे सर्व गांधीजींच्या विशिष्ट धोरणामुळे घडत आहे, असा सूर त्यांच्या पुष्कळ संपादकीयात दिसतो. गांधीजींविरुद्ध त्यांच्या भावना दिवसेंदिवस तीव्र होत होत्या. गांधीजींनी राजकारणातून निवृत्त व्हावे, असे त्यांना वाटत होते. नथुराम आणि आपटे शस्त्रास्त्रात वावरत होते; पण इतके असूनही गांधीजींना मारावे, अशा प्रकारची हालचाल त्यांच्याकडून झालेली आढळत नाही.

गांधीजी उपवास करणार ही वार्ता दि. १२ ला दूरमुद्रकावर पाहताच, हा उपवास भारताच्या लोकशासनाने घेतलेला पंचावन्न कोटींसंबंधीचा निर्णय फिरविण्यासाठी दडपण

आणावे म्हणून असला पाहिजे, असे अनुमान नथुराम आणि आपटे यांनी केले असले पाहिजे. तो वेळपर्यंतच्या तीव्र भावनांनी अत्युच्च बिंदू गाठला असला पाहिजे.

येथे एक-दोन गोष्टी स्पष्ट करणे आवश्यक वाटते. कटातील एक घटक म्हणून माझ्यावर आरोप ठेवला गेला, तो सिद्ध झाला, मला त्यासाठी शिक्षा झाली. अर्थात, कटाची सर्व माहिती मला असली पाहिजे असे कोणासही वाटेल; पण वस्तुस्थिती तशी नव्हती. आम्ही सर्व आरोपी न्यायाधीन म्हणून लाल किल्ल्यातील बंदिगृहात कोंडले गेल्यावर मोकळेपणाने आपापसात बोलत असू. त्यातून एरवी ठाऊक नसलेल्या घटना ठाऊक होत. कट नेमका केव्हा झाला हे पण तसे निश्चितपणे ठाऊक नसले तरी पुराव्यावरून योग्य तो तर्क करण्यास काही प्रत्यवाय नाही. दुसरे, राजकीय कटात काही घटना नंतरही अंधारातच राहतात.

'इतिहासाचे पहिले पान न मिळणे कधी पहायाते ।
आरंभ तुझा दुसऱ्या पानापासून शाप हा याते ।'

असे स्वातंत्र्यवीर सावरकरांनी म्हटले आहे. कोणत्याही राजकीय कटाच्या इतिहासात तर अधलीमधली पानेच लुप्त असतात आणि ती उजेडात येण्याची कधीच शक्यता नसते. सरदार भगतसिंगांवरील एक बोलपट १९६४ च्या नोव्हेंबरमध्ये वर्धा येथे असताना पाहिला होता. अतिशय बरवरच्या घटना आपल्याला ठाऊक असतात, सर्व कथेत भरीवपणा आणण्यास कल्पनेचा आधार प्रमाणाबाहेर घ्यावा लागतो आणि तसे करताना वस्तुस्थितीपासून आपण कितीतरी दूर जातो, याची जाणीव मला तो बोलपट बघत असताना वारंवार होत होती. Facts are at times stranger than fiction किंवा कित्येकदा खऱ्या घटनाच कादंबरीपेक्षा विचित्र असतात, या इंग्रजी म्हणीचे प्रत्यंतर आले.

'Nine Hours to Rama' या अमेरिकन पुस्तकात झाले आहे ते हेच.

त्याचे कारण असे दिसते की, कटाच्या निमित्ताने कटातील व्यक्तींचे आणि इतर व्यक्तींचे काही परस्पर संबंध आले असतील तर त्याची वाच्यता प्राण जाईपर्यंत उभयपक्षी होणार नाही, एवढा परस्पर विश्वास असला पाहिजे. हे लेख लिहिताना मला पुष्कळदा वाटते, अमुकअमुक संदर्भ किंवा धागा नथुराम किंवा आपटे यांना विचारून घ्यावयास हवा होता. त्यायोगे मला तो आज लिहिता आला असता; परंतु ती त्यांनी न उघडलेली पाने त्यांच्याबरोबर गेली ती गेलीच ! असो.

शस्त्रास्त्रांमध्ये शावरणाऱ्या नथुराम आणि नाना यांच्या दृष्टीपुढे आणखी काही योजना असल्या पाहिजे, असे पुराव्यात आलेल्या शस्त्रसंभारावरूनच दिसते; पण कदाचित निश्चित अशी योजना आणि तिचे कार्यवहन करण्याच्या दृष्टीने प्रत्यक्ष हालचाल या अवस्थेपर्यंत पोहोचले नसावेत. म्हणूनच स्वतःच्या जीवितासंबंधी एरवी वाटणारा निश्चितपणा तो वेळेपर्यंत तसाच होता. दि. १३ च्या पुराव्यावरून मात्र नथुरामला तशी निश्चितता त्यापुढे वाटली

नाही असे दिसते.

अमुक कारणासाठी म्हणून राखून ठेवलेले द्रव्य पुष्कळदा समोर आलेल्या कोणत्यातरी त्वर्य कामासाठी वापरावे लागते, असा अनुभव आपल्याला प्रत्यहीच्या व्यवहारात येतो. भाड्यासाठी किंवा वाण्यासाठी म्हणून पैसे ठेवावेत आणि मध्यंतरी, चरितार्थाच्या साधनाचा एक मुख्य भाग जे वाहन त्याचीच मोडतोड व्हावी किंवा स्वतःलाच अपघात होऊन हातपाय दुखावलेला असावा. अशा परिस्थितीत वाहन नीट करणे किंवा स्वतःवर उपचार करणे ही त्वर्य कामे ठरतात. आलेले द्रव्य त्या त्वर्य कामासाठी लावले जाते. देणेकऱ्यांची देणी लांबणीवर पडतात.

उपोषणाचे वृत्त वाचताच, इतर सर्व योजना दूर साराव्यात, गांधीजींचा हस्तक्षेप शासनाच्या लोकसत्ताक कार्यपद्धतीत न होईल इकडे लक्ष द्यावे, त्यासाठी गांधीहत्या करण्याचे कार्य प्रथम हाती घ्यावे, आपले सर्वस्व त्यासाठी वेचावे कारण तो नथुरामच्या मताप्रमाणे राष्ट्राच्या जीवनमरणाचाच प्रश्न आहे, असा विचार नथुरामच्या मनात असला पाहिजे.

पण त्याच्या मनात आलेला विचार म्हणजे कट असे समीकरण ठरू शकत नाही.

दि. १२ च्या संध्याकाळपासून दि. १३ च्या संध्याकाळपर्यंत केव्हातरी नथुराम आपला विचार नानांजवळ बोलला असेल. नानांनी संमती दाखवली असेल आणि त्या हेतूच्या सिद्धीसाठी दोघांनी मिळून संगनमताने पुढच्या योजना आखल्या असतील. कटाचा उद्‌भव तेथे झाला, तो ज्या घटकेला झाला तो तो दुर्दैवी क्षण.

卐 卐

तीन

नथुरामची मनःस्थिती

गांधीजींनी जनजागृतीसाठी केलेल्या उपक्रमांशी नथुराम अपरिचित नव्हता. त्यांचे मूल्यही तो जाणत होता. अशा स्थितीत गांधीजींच्या हत्येचा निर्णय मनाशी ठरविताना त्याची मनःस्थिती कशी असेल हे बघणे उद्‌बोधक ठरेल.

दि. २४-११-१९६४ ला म्हणजे माझी शिक्षेतून मुक्तता झाल्यानंतर चाळीस दिवसांनी मला भारत-रक्षण-विधीखाली अटक केली गेली. चार एक महिन्यांनी म्हणजे दि. २९-३-१९६५ ला मी माननीय श्री. बाळासाहेब देसाई, महाराष्ट्राचे गृहमंत्री यांना त्या वेळच्या चालू विषयावर एक पत्र लिहिले होते. त्या पत्रात वरील विषयाची चर्चा केली आहे. गांधीजींचा जनमानसावर कसा प्रभाव पडलेला होता याचे वर्णन दिलेला भाग असा - (छेदकांपूर्वीचे क्रमांक मूळ पत्रकातील छेदकांचे आहेत.)

३९. गांधीहत्या ही घटना 'चे पिस्तूल आणि चाल गोळी' अशी सहज होती काय ? जे असे प्रामाणिकपणे समजत असतील ते अज्ञानी आहेत कारण त्यांना अनुभूती नाही. कोणतीही मनुष्यहत्या तशी नसतेच. ही तर नव्हतीच !

४०. शेवटच्या घटनांविषयी गांधीजींसंबंधी मतभेद कितीही तीव्र असले तरी गांधीजींच्या मागे एक चरित्रच्या चरित्र उभे होते.

४१. सत्याग्रह या कृतीसंबंधी कोणाचे काहीही मत असो. लोकमान्यांनंतर निर्माण झालेल्या पोकळीत गांधीजींनी सत्याग्रह या उपक्रमाने आपला देश म्हणजे काय, पारतंत्र्य म्हणजे काय, याचे ज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविले.

४३. सत्याग्रह उपक्रमाने गांधीजींनी सर्वसामान्य लोकांची बंदिगृहाची भीती नाहीशी करून टाकली.

४४. मला महात्मा म्हणा, असे लोकांना गांधीजींनी सांगितले नव्हते. लोकांनी त्यांना ती

आदराची उपाधी दिली होती.

४५. होऊ घातलेली पिढी स्वातंत्र्यगीते चोखतच वाढत होती. मला आठवते, नथुरामचे वय तेव्हा सतरा-अठरा वर्षांचे असेल, माझे सात-आठ वर्षांचे होते. (वर्ष १९२७-२८) गीते करण्याचा छंद त्याला होता. तो ती माझ्याकडून पाठ करून घेत असे. 'ही परवशता झणि सोडी, तोडी पारतंत्र्यबेडी' अशासारखी एखाददुसरी ओळ मला अद्यापही आठवते. अर्थ तेव्हा कळत नव्हता. आणखी एका-दोन वर्षांनी गणपती उत्सवातील एका मेळ्यात, विघ्नहर्त्या, आमचे पारतंत्र्य दूर कर, शत्रूचा संहार करण्याची आम्हाला शक्ती दे, असा अर्थ असलेले त्याने केलेले पद मी म्हटले होते. तात्पर्य, त्या वेळेची तरुण पिढी स्वातंत्र्य या कल्पनेने झेपावत चालली होती. तर तारुण्याकडे जात असलेली पिढी त्या कल्पनेचे संस्कार ग्रहण करीत होती. गांधीजींच्या उपक्रमांनी हे घडत होते.

४६. 'महात्मा गांधी की जय' हा त्यावेळचा जणू रणघोष होता, तर गांधीटोपी हा गणवेश. विद्यार्थ्यांत हे वारे एवढे संचारले होते की, आपण जणू युद्धच लढवीत आहोत या अभिनिवेशाने, अट्टाहासाने ते हा गणवेश आणि रणघोष करीत आणि छड्या खात. जरीची टोपी लुप्त होत होती. परदेशी वस्तूसंबंधीचा तिरस्कार मनात ठसत होता.

४७. गांधी कोण, कुठले हे ज्या वयात कळणे शक्य नव्हते; त्या वयातच 'साबरमती संत जेलमा छे' किंवा 'जालिम सरकार नही रखना' अशी अर्थ न समजणारी गाणी मुलांच्या ओठावर रुळत होती.

४८. सशस्त्र क्रांती हे गांधीजींचे तत्त्व नव्हते; पण लोकजागृतीच अशी झाली होती की, लोक 'सरदार भगतसिंग की जय' हे घोष जनजागृतीच्या भरात करीत होते. त्यावेळी 'भेटेन नऊ महिन्यांनी' हे कोणाचे तरी भगतसिंगावरील गीत घरोघर म्हटले जात होते.

४९. सारांशाने त्यावेळी त्या पिढीत गांधीजी लोकांच्या अंतःकरणात असे खोलवर मुरलेले होते. एक व्यापक चरित्र गांधीजींच्या मागे होते.

वरील चरित्र ज्ञात असल्याने, गांधीजींच्या आयुष्याला पूर्णविराम देण्याचा निर्णय घेण्यापूर्वीच नथुरामच्या मनःस्थितीची कल्पना येण्याइतपत वर्णन त्याच पत्रात मी दिले आहे. संबंधित भाग असा :

५०. जातीय समस्येवरील गांधीजींचे धोरण अंगाशी आले आहे. त्यांनी आता राजसंन्यास घ्यावा, राष्ट्राच्या निर्णयात हस्तक्षेप करू नये, असे अनेक काँग्रेस श्रेष्ठींना वाटत होते हे खरे; पण असे वाटणे वेगळे आणि गांधीजींचा जगण्याचा अधिकार जो निसर्गाने त्यांच्या वाट्याला दिला असेल तो अधिकार जाणूनबुजून संपविणे वेगळे.

५१. सरदार पटेल यांचा गांधीजींच्या धोरणाविषयी उल्लेख आणि गांधीजींची, 'मला पटेल

आता विचारीत नाहीत, माझ्याकडे दुर्लक्ष करतात,' अशी प्रकट निर्भर्त्सना, या पार्श्वभूमीवर गांधीहत्येत सरदार पटेलांचा हात होता, असा संशय व्यक्त केला जातो; तो पटेलांवर अन्याय करणारा आहे. अधिकांत अधिक पटेलांनी त्यागपत्र दिले असते. मी असे ऐकले की, तीस जानेवारीला किंवा त्यानंतर दोन-चार दिवस गांधीहत्या झाली नसती, तर त्या अवधीत 'सरदार पटेलांचे त्यागपत्र' अशी वार्ता आपल्याला वाचायला मिळाली असती. श्री. एच. व्ही. आर. अय्यंगार या संबंधात काही प्रकाश पाडू शकतील असे वाटते.

५२. निर्वासितांच्या भावना अर्थातच अतिशय तीव्र होत्या. स्वराज्य कसले मिळाले, भूकंप न होताच पायाखालची भुई सरकावी, अशी त्यांची स्थिती झाली होती. लोंढ्याच्या लोंढे प्रत्यही रक्ताने भिजून येत होते. शेक्सपीअरने एका ठिकाणी एक अलंकारात्मक वाक्य घातले आहे 'झालेल्या घावांना जर जिभा असत्या, तर त्यांनी त्या वेदना बोलून दाखविल्या असत्या.' तेथे तर प्रत्येक निर्वासित हा एक घावच होता आणि त्याला जीभ होती. तीव्र भावना पसरवू म्हटले तरी वृत्तपत्रांना शक्य झाले नसते इतक्या व्यापकपणे त्या जिभेजिभेतून निघणाऱ्या उद्‌गारांगणिक, हृदयाच्या उच्छ्वासागणिक सर्व आसपासचे वातावरण तीव्र भावनांनी भारावले होते. अणुस्फोटाने वायुलहरीच दूषित व्हाव्यात, रेडिॲक्टिव्ह व्हाव्यात, तसे !

५३. उद्‌वेगात मनुष्य शाप उच्चारतो. गांधीजींनी जगू नये, त्यांच्यामुळे आमचा निवारा उखडला गेला आहे, असे उद्‌गार घरात नव्हे तर सार्वजनिक ठिकाणी, चारचौघांकडून नव्हे तर असंख्यांकडून निघत होते.

५४. पण इतके असूनही, शाप उच्चारणे वेगळे आणि गांधीजींचे जीवन प्रत्यक्षात संपुष्टात आणणे वेगळे !

५५. मारले नसते तर स्वतःच मेलो असतो अशा स्थितीतूनही मनुष्यहत्या होतात. गांधीजींना मारले नसते तर त्यांनीच मारकांना मारले असते, अशासारखे द्वंद्वही येथे नव्हते.

५६. आत्मार्पणाची उदाहरणे मधूनमधून घडतात. स्वतः हत्या केली आहे आणि रक्तांकित शस्त्रानिशी मारणारी व्यक्ती चौकीवर किंवा न्यायालयात जाऊन उभी राहिली, अशा घटना आपण कधीकधी वाचतो. 'मला अधिकार नसला तरी मी विधी हाती घेतला आणि अमक्याला मारले, आत्मरक्षण हे कारण नव्हते; कारण अमुक होते; विधी उल्लंघण्याची माझी इच्छा नाही; मला न्यायपूर्वक दंड द्या.' असे ती व्यक्ती स्वतः होऊन सांगते आणि प्रसंगी फाशीही पत्करते. तेही आत्मार्पणच असते. या ठिकाणी आत्मार्पणापेक्षाही मुळात हत्या हीच गोष्ट अत्यंत कटू होती.

५७. ते हलाहल प्राशन होते ! आपण कल्पना करू शकाल. गांधीजींनी एका पिढीला

कार्यप्रवृत्त केले होते. नथुराम त्या पिढीत वाढला होता. पुढे प्रवाह बदलला असला तरी मनावर उमटलेला तो ठसा पुसणे शक्य नव्हते. गांधीजींकडे श्रद्धायुक्त भावनेने बघणारे असंख्य होते. हत्या म्हणजे त्यांच्या भावनांना धक्का देणे होते. नथुराम निर्वासित नव्हता, त्याचे आणि गांधीजींचे व्यक्तिगत शत्रुत्व नव्हते. मानवी जीवनाचे मूल्य न कळणाऱ्यांपैकी तो नव्हता. अशा पार्श्वभूमीवर हत्या हे एक कटू-कर्तव्य म्हणून ठरविताना त्याच्या स्वतःच्या मनात क्षोभकारक संघर्ष झाला नसेल काय? गुरुजन आणि आप्तजन प्रत्यक्ष रणभूमीवर जीव घेण्यासाठी म्हणून उभे राहिले होते ही स्थिती असूनही 'गांडीवं संसते हस्तात् !' असा अर्जुनाला झालेला विषाद या हत्येपूर्वीच्या नथुरामच्या मनःस्थितीची काहीशी कल्पना देऊ शकेल.

५८. मुळात आधी रक्तपात हा धर्म नव्हे. गीतेतही रक्तपात हा धर्म म्हणून पुरस्कारिलेला नाही. ते दोषलिप्त कर्म आणि कर्म हा धर्म, म्हणून युद्ध कर, असा अभिप्राय आहे. शांतता हा मनुष्याचा सहजस्वभाव, तोच धर्म. रक्तपात हा अपघात.

५९. वर म्हटल्याप्रमाणे, हा रक्तपात हे युद्ध नव्हते, द्वंद्व नव्हते. अशा रक्तपातात एक गुण असतो. हत्येपर्यंत जनमनाच्या भावना तीव्र असतात. हत्या होताच, मरणाराचे दोष त्याच्या रक्तात धुतले जातात, त्याच्या चरित्राचा उज्ज्वल भाग आणखी उजळतो. याउलट, मारणाराचे गुणमय चरित्रही रक्ताच्या कलंकाने झाकाळून जाते, आणि जन्मभर त्याने जणू मनुष्यहत्याच केल्या आहेत, असे त्याचे क्रूर रूप जनमनासमोर राहते.

६०. स्वतःचे चरित्र धुळीला मिळवून त्या स्थितीत जगासमोर उभे राहायचे आणि जगाकडून अवहेलना सहन करायची, हे आत्मार्पणापेक्षाही भयंकर होते.

६१. तेव्हा, ही हत्या म्हणजे सहज मनात विचार आला, शस्त्र घेतले आणि गोळी झाडून टाकली, अशातली नव्हती. वरील भूमिका आणि हत्या करणाऱ्याच्या मनातील द्वंद्व यांची त्यांना काही कल्पना आली, तर ते अशा हत्या या नित्य तर नव्हेतच तर युगायुगात केव्हा तरी होणाऱ्या, किंबहुना युगायुगात न होणाऱ्या घटना असतात हे जाणू शकतील.

स्वतःचे प्राण गेलेले परवडले, अवहेलना परवडली; पण गांधीजींचे अस्तित्व नको एवढ्या पराकोटीला मन पोहोचण्यास अर्थातच काही कारण झाले असले पाहिजे किंवा कारणपरंपरा असली पाहिजे हे उघड आहे. संकल्पित 'अंतिम पर्वात' त्याचा उल्लेख अटळ आहे. योग्य ठिकाणी त्या विषयाची काही प्रकरणात चर्चा होईल.

卐 卐

चार

गांधीहत्येचा तो दिवस

'डॉक्टर, माझी शारीरिक परीक्षा करा. माझे हृदय, नाडी इत्यादी व्यवस्थित आहे की नाही त्याची नोंद करून ठेवा.'

गांधीहत्येच्या घटनेनंतर थोड्या वेळाने जेव्हा डॉक्टर नथुरामच्या परीक्षेसाठी आणले गेले, तेव्हा वरील विनंती त्याने डॉक्टरांना केली होती. त्याच्या विनंतीप्रमाणे डॉक्टरांनी त्याला तपासले आणि त्याचे हृदय आणि नाडी सुव्यवस्थित असल्याचे त्यांनी घोषित केले.

लाल किल्ल्यातील विशेष बंदिगृहात आम्ही अभियुक्त न्यायाधीन असताना एकमेकांशी बोलत असू. पूर्वी एका लेखात म्हटल्याप्रमाणे, या कटातील प्रत्येक आरोपीचा संबंध प्रत्येक घटनेशी नसे. आपणास ठाऊक नसलेल्या घटनांसंबंधी त्याला कुतूहल असे. आमच्या बोलण्यात तो एक विषय असे.

त्या त्या दिवशी ज्या साक्षी होत त्यात आलेली विधाने, न आलेली विधाने आणि टाळलेली विधाने यासंबंधीही आमची आपापसात चर्चा होई. त्या त्या साक्षीदारांची उलट तपासणी होण्याची असेल, तर आपापल्या वकिलांना त्या साक्षीदारास कोणते प्रश्न विचारण्यास सांगावे, याचाही विचार होई.

साक्षीदाराच्या कथनाची सत्यासत्यता प्रत्यक्ष घटनेशी आम्ही पडताळून पाहत असू. पुष्कळदा असे होई की, साक्षीदार खरा; पण त्याने सांगितलेल्या काही गोष्टी पूर्णतया खोट्या असत. उलटतपासणीत जेथे जेथे असे खोटे विधान उघडे पडे तेथे तेथे न्यायमूर्ती ती साक्ष त्या भागापुरती अग्राह्य धरीत; पण केव्हा कव्हा उलटतपासणीतही ते खोटे खोडून काढणे शक्य होत नसे. त्यामुळे कागदोपत्री ते खोटेच शपथेवरील सत्य समजले जाई.

केव्हा केव्हा, कोणता तरी दुवा जोडण्यासाठी कोणी साक्षीदार उभा केला जाई. संबंधित घटना खऱ्या असत. मात्र, तो साक्षीदार खोटा असे. अतिशय कुशलतेने आणि दक्षतापूर्वक

उभ्या केलेल्या त्या साक्षीदारास खोटे ठरविणे केवळ अशक्य असे. आमच्या आपापसातील बोलण्यात तोही एक विषय असे.

शासनाने आरोपीवर खोटा आरोप लादला, खोटा खटला भरला, असे संकेत करण्याचा वरील विवेचनात प्रस्तुत लेखकाचा हेतू नाही. त्याच अभियोगाची पुन्हा मांडणी किंवा शिक्षांचे निराकरण या गोष्टी आज कालबाह्य आहेत आणि न्यायदानपद्धतीच्या पलीकडच्या आहेत. तेव्हा खोटा खटला भरला असा संकेत दूरान्वयानेही करणे अवास्तव, अप्रस्तुत आणि तर्कविरुद्ध होईल.

हेतू असा आहे की, गांधीहत्या या घटनेशी निगडित असलेले सत्य आपणास बघण्याचे असेल तर केवळ भिंतीबाहेरील कागदपत्रांवरून, न्यायालयाच्या पत्रांवरून, आपणास पूर्ण सत्य मिळणार नाही हे लक्षात यावे. भिंतीआड चालणाऱ्या चर्चेतील काही भाग आपल्या कानावर आला, तर न्यायालयातील कागदपत्र अधिक असा हा भाग मिळून आपण सत्याच्या पुष्कळ जवळ जाऊ शकू. सत्यान्वेषणाच्या हेतूसाठी शासनालाही हे लेखन उपयुक्त ठरेल, अशी माझी धारणा आहे.

भिंतीआड असताना नथुराम आणि आपटे यांच्याशी झालेल्या बोलण्यातील जो भाग मनःपटलावर उमटला आणि अद्यापही विस्मृतीने विटला नाही, त्यात नथुरामचे प्रारंभी दिलेले बोलणे मला आठवते.

आपल्या हातून होणाऱ्या गांधीहत्या या घटनेनंतर लोक आपणाला अनेक विशेषणे लावतील, त्यात माथेफिरू, वेडा, पागल हीही असणार आहेत याची नथुरामला कल्पना होती. शरीरांतर्गत मनाची त्या प्रकाराची विकृती आपल्याला नाही, आपण त्या अवस्थेतील किंवा त्या व्याख्येतील वेडे नाहीत हे त्याच क्षणी नोंदले गेलेले असावे, अशी त्याची इच्छा होती. आपण कोण्या मानसिक विकृतीत असताना ही हत्या झाली असे म्हणून दया लादण्यास अभियोजकांना अवसर राहू नये किंवा बचावपक्षालाही तसले पांघरूण घेऊन दया-याचना करण्याची संधी मिळू नये, असे त्याला वाटत होते. तेवढ्याचसाठी त्याने, त्याचे प्रकृतिस्वास्थ्य नीट आहे, नाडी उत्तेजित नाही, हे परीक्षून घेतले होते.

काही असले तरी, नथुरामचे अवैध कृत्य मनाच्या एका टोकाला पोहोचलेल्या अवस्थेत झालेले होते हे कोणासही मान्य करावे लागेल. नथुरामलाही ते मान्य होते. त्या कृत्याला वैध समर्थन नव्हते. फाशी हीच शिक्षा उचित ठरेल ही त्याची धारणा होती.

मनाच्या अशा अवस्थेत असूनही मानवी मनाचे जे दुसरे भाव असतात त्यापासून तो दूर गेलेला नव्हता. आपल्या कृत्याने आपण गांधी कुटुंबावर आघात करणार आहोत याची त्याला जाणीव होती. त्याविषयीचा खेद व्यक्त करण्याची संधी त्याला गांधीहत्येनंतर थोड्या वेळातच मिळाली.

अटकेनंतर नथुरामला थोडा वेळ तुघलक रोड आरक्षी-कोठडीत आणि मग पार्लमेंट स्ट्रीट आरक्षी कोठडीत ठेवले होते. अधिकाऱ्यांच्या समवेत काही लोक त्याला बघण्यास येत असत. कोठडीत येरझारा घालणारा नथुराम गजांशी उभा राही.

एका व्यक्तीची त्याची दृष्टादृष्ट झाली. तो गजांशी उभा राहिला.

'मला वाटते, आपण श्रीयुत देवदास गांधी ?' नथुरामने विचारले.

'हो. तुम्ही कसे ओळखले ?' त्या व्यक्तीने प्रतिप्रश्न केला. आपण कोणी अक्राळविक्राळ सभ्यताविहीन व्यक्ती गजाआड बघणार आहोत ही कल्पना करून ते आले होते. नथुरामचे सौम्य पण स्पष्ट बोलणे त्यांच्या कल्पनेशी विसंगत ठरले.

'आपण एका पत्रकार परिषदेत नुकतेच एकत्र आलो होतो. आपण हिन्दुस्थान टाइम्सचे संपादक म्हणून आला होतात.'

'आणि आता तुम्ही ?'

'मी नथुराम विनायक गोडसे, हिन्दुराष्ट्र दैनिकाचा संपादक. मीही तेथे होतो. आपण आज पितृहीन झालेले आहात. त्या घटनेला मी कारण झालो आहे. आपण आणि अन्य कुटुंबीय यांच्यावर हा जो दुःखाघात झाला आहे, त्याने मला खेद वाटतो. आपण विश्वास ठेवा, कोणत्याही प्रकारच्या व्यक्तिगत हेव्यादाव्यांतून, द्वेषातून किंवा आपले वाईट व्हावे, या इच्छेने हे कृत्य करण्यास मी प्रवृत्त झालो नाही.'

ज्याच्या हत्याकारी हातावरील रक्त अद्याप वाळलेही नाही, तो मनुष्य आपणाशी इतका शांतपणे, समतोलपणे आणि व्यवस्थाने बोलावे तसे बोलत आहे हे पाहून श्री. देवदास यांचे कुतूहल चाळवले. आपल्या वडिलांचा अंत करणाऱ्या व्यक्तीचा त्यांना तिरस्कार वाटला असता, तर त्यात अस्वाभाविक असे काहीच नव्हते. तसा तिरस्कार त्यांना वाटला असेल, तर त्यांनी तो पळभर दूर ठेवला, पितृवियोगाचे दुःखही थोडा वेळ बाजूला ठेवले आणि त्यांनी नथुरामला विचारले, 'मग तुम्ही असे का केलेत ?'

नथुराम म्हणाला, 'प्रश्न केवळ राजकीय आणि राजकीयच आहे. आपण अर्धापाऊण तास ऐकाल का ? अधिकाऱ्यांना विचारा. आपण संपादक आहात. पार्श्वभूमी आपल्या लवकर लक्षात येईल.'

जवळ असलेल्या आरक्षी-अधिकाऱ्याने 'बोलू नये. आणि निघू या' अशी देवदासांना विनंती केली. केवळ गांधीजींचे पुत्र म्हणूनच त्या अधिकाऱ्याने हा दोन-तीन मिनिटांचा संवाद होऊ दिला होता. कुतूहल तेथेच सोडून श्री. देवदास आरक्षी-अधिकाऱ्यांबरोबर बाहेर पडले.

या अभियोगातील प्रमाण क्रमांक पी. ८० हे एका गोळीच्या टरफलासंबंधी आहे.

'महात्मा गांधींचे पुत्र श्री. देवदास गांधी यांनी पिस्तूलाच्या गोळीचे टरफल हाती

दिले. त्यावर GEGO 19 MMK अशी अक्षरे आहेत. ते या लेखाद्वारे स्वाधीन घेतले. पुढके बनविले. राजमुद्रा अंकित केली. स्वाक्षरी जयवंतसिंग डी. एस. पी. नवी दिल्ली. साक्ष, श्री. देवदास गांधी, श्री. गुगन लंबरदार दि. ३१-१-१९४८ (मुद्रित अभिलेख ग्रंथ ४, पृष्ठ २७).'

वरील प्रमाण सिद्ध करण्यास श्री. देवदास गांधी यांना साक्षीदार म्हणून आणले नव्हते. या प्रमाणासंबंधी श्री. गुगनसिंग यांचीच तेवढी साक्ष न्यायालयात दिनांक १६-७-१९४८ ला झाली. (मुद्रित अभिलेख ग्रंथ १, पृष्ठ ७४) श्री. देवदास यांना साक्षीदार म्हणून आणले गेले असते, तर त्यांचे नथुरामशी झालेले बोलणे त्यांच्या साक्षीतूनच उद्धृत करता आले असते.

तरी पण, गांधीजींचे दुसरे पुत्र श्री. रामदास गांधी यांना लिहिलेल्या पहिल्याच पत्रात नथुरामने श्री. देवदास यांच्याशीच बोललेल्या भावना व्यक्त केल्या आहेत. पानशेतच्या पुरात कागदपत्रे भिजली तरीही संबंधित पत्रे वाचण्याजोगी राहिल्याने हा संदर्भ देता येणे शक्य होत आहे. त्याचे असे झाले.

मे आणि जून १९४९ या महिन्यात सिमला येथील उच्च न्यायालयात या अभियोगातील पुनर्न्यायाच्या आवेदनाचे श्रवण चालू होते. नथुरामला अंबाला बंदिगृहातून तेथे नेले होते.

एके दिवशी अवचितपणे बंदिपालांनी नथुरामला एक पत्र दिले. पत्र फोडण्याचा त्रास अधिकारीच घेत असत. त्यामुळे जिज्ञासापूर्तीतील विलंब तेवढाच घटत असे.

श्री. रामदास गांधी यांचे नागपूरहून धाडलेले ते दि. १७-५-१९४९ चे पत्र होते. 'प्रिय नथुराम गोडसे' असे संबोधून श्री. रामदास गांधींनी स्वतःची ओळख करून दिली आहे. 'ज्यांची हत्या केल्यामुळे आपणास विलक्षण अभिमान वाटत असेल त्या व्यक्तींचा प्रस्तुत पत्रलेखक मुलगा आहे.'

पत्र भावपूर्ण आहे, आत्मीयतेने लिहिलेले आहे. किंचित विषयांतर करूनही ते पत्र येथे द्यावेसे वाटते, पुढील आशयाचा अनुवाद असा आहे.

'माझ्या बडिलांच्या नाशवंत देहाचाच केवळ आपण अंत केलात, आणखी कसला नव्हे, याची एक दिवस आपणास जाणीव होईल, असा मला विश्वास वाटतो. कारण माझ्या एकट्याच्याच नव्हे, तर जगभर लक्षावधी लोकांच्या हृदयावर माझ्या बडिलांच्या तत्त्वाचा (Spirit) अद्यापही प्रभाव आहे. अखिल जगतातील लोकांनी आणि राष्ट्रांनी माझ्या बडिलांना जी श्रद्धांजली वाहिली त्यानेच हे सिद्ध झाले आहे.

'सर्व जगात प्रत्येकजण शांततेसाठी हपापलेला आहे हे आपण जाणता. आण्विक शक्ती नव्हे, तर परस्परांना समजून घेणे (Mutual understanding) आणि

एकमेकांविषयी आदराची भावना वाढविणे याच गोष्टी जगात शांतता आणतील असे जे म्हणतात, अशी ज्यांची श्रद्धा आहे त्यात आमच्या युगातील महान युद्धप्रवर्तक (War Lords) आहेत हे बघून आपण दिङ्मूढ झाला असाल. सत्य आणि अहिंसा या साध्या आणि अर्थवाही शब्दात अधिककरून ती भावना या देशातील लक्षावधी लोक जाणतात.

'आपल्या मनाला आणि दृष्टीला ज्या धुक्याने आणि अपसमजाने झाकाळून टाकलेले आहे ते धुके आणि अपसमज विरघळून जाण्यास वरील वस्तुस्थिती आपणास साहाय्यभूत होईल, अशी मला आशा आहे. त्या अपसमजाचे एकदा निर्मूलन झाले की, आपणास पश्चाताप होईल आणि आपण केलेत ते कृत्य पुन्हा कधीच करण्यासारखे नाही, तर सदासर्वकाळ त्याज्य मानण्याचे आहे, मग ते एखाद्याच्या धर्मकारणासाठी असो किंवा राजकारणासाठी असो किंवा आणखी काही कारणासाठी असो, याचा आपणास साक्षात्कार होईल, यात मला शंका नाही. आपण शास्त्रशुद्ध आणि तर्ककठोर विचारसरणीचे आहात, (You are a man of reason and logic) असे आपणासंबंधी बोलले गेल्याचे अगदी अलीकडील प्रतिवृत्त आहे. म्हणून माझ्यावरील हृद्गताचे आपण मनन करावे, असा माझा आपणास आग्रह आहे आणि आपण तसे केलेत, तर आपण जे कृत्य केले त्यायोगे आपणास अतिशय प्रिय असलेल्या कार्याला आपण थोडाही हातभार लावला नाहीत, असे आपणास दिसेल.'

आपला सत्यैषी

आर. एम्. गांधी

पश्चालेख - दि. १-५-१९४९ ला हिन्दुस्थानच्या महाशासकांना (Governer General) पत्र धाडले आहे हे आपणास कळवीत आहे. आपल्या विरुद्धचा अभियोग चालविणाऱ्या विशेष न्यायासनाने आपणास दिलेली शिक्षा आपणास का भोगावयास लावू नये याचे कारण मी त्या पत्रात दिले आहे.

आर. एम्. गांधी

पत्र मिळाल्यावर नथुरामने दुसऱ्याच दिवशी म्हणजे दि. ३ जून १९४९ ला उत्तर लिहिले आणि नियमाप्रमाणे डेप्युटी कमिशनर सिमला यांच्या द्वारे धाडून दिले. श्री. रामदास गांधी यांना 'प्रिय बंधो,' असे संबोधून त्याने आपल्या मनोव्यथा व्यक्त केल्या आहेत. तो म्हणतो, 'माझ्या हातांनी आपल्या परमपूजनीय पित्याचा दुःखद अंत झाला, त्यायोगे आपण आणि आपले नातेवाईक यांना जे मानसिक आघात झाले, त्याविषयी माझ्या भावना एक मानव या नात्याने व्यक्त करण्यास मजजवळ शब्दच नाहीत.' त्या पत्राच्या शेवटीही पुन्हा नथुरामने लिहिले आहे, आपल्या पित्याच्या माझ्या हातून झालेल्या निधनाने आपणास ज्या यातना झाल्या त्यासाठी मी पुन्हा गहन खेद व्यक्त करतो.

श्री. रामदास गांधी यांच्या पत्रातील इतर भागासंबंधीही त्याने त्याच पत्रात लिहिले

आहे. याच ओघात त्यांचीही थोडी चर्चा येथे योग्य होईल.

गांधीजींनी काही तत्त्वे आणि त्या तत्त्वपूर्तीसाठी काही प्रणाली प्रचारिली, असे मानले जाते. गांधीजींचे भक्त त्या प्रणालीचे उपासक असल्याचे म्हटले जाते. श्री. रामदास यांच्याच शब्दात गांधीजींच्या तत्त्वाचा जनमनावर तेव्हा तरी प्रभाव होता. अशा स्थितीत नथुरामला सहानुभूती म्हणून नव्हे, तर निदान त्याचे मतपरिवर्तन घडवून आणण्याच्या हेतूने त्याला तशी पत्रे गांधीजींच्या भक्तांकडून यावयास हवी होती. कारण गांधीजींचा पार्थिव देह नाहीसा झाला, त्यांची तत्त्वे नाहीशी झाली नाहीत, असे श्री. रामदास यांचेही म्हणणे होते. पण त्या दृष्टीने केवळ श्री. रामदास गांधी यांचेच पत्र नथुरामला आले होते.

मतपरिवर्तन हे न्यायासनाचे काम नसते, तू अमुक कृत्य केले आहेस, ते अमुक प्रमाणात विधिविरुद्ध आहे, एवढेच सांगण्यासाठी न्यायालयाची कक्षा आहे.

न्यायापलीकडील कोणा व्यक्तीने आपले मतपरिवर्तन करावे, असे नथुरामला वाटे. कारण शस्त्राचारी लोकांचे मतपरिवर्तन करणे हा गांधींच्या प्रणालीचा पाया होता, आणि गांधीजींचे शिष्यत्व तंतोतंत करणारे लोक हिन्दुस्थानातच अनेक होते असा सर्वदूर समज होता. नथुरामला तात्त्विक विषयाची ग्रहणशक्ती नव्हती, अशीही वस्तुस्थिती नव्हती, किंवा चर्चा अथवा वादविवाद करण्यास तो अक्षम होता अशातलाही भाग नव्हता. त्याची मनःस्थितीही शेवटपर्यंत स्थिर होती. फाशीच्या शिक्षेसंबंधी किंचितही कुरकूर न करता त्याने उच्च न्यायालयात नऊ दिवस स्वतःच आपला युक्तिवाद मांडला होता. त्याला कोणतीच महाविद्यालयीन उपाधी नव्हती हे खरे, तरीपण वाचनाच्या, चिंतनाच्या आणि मननाच्या व्यासंगाने त्याची बुद्धी प्रगल्भ झाली होती. न्यायमूर्तींनीही आपल्या निर्णयपत्रात त्याच्यासंबंधी म्हटले आहे. 'शालान्त परीक्षा उत्तीर्ण होण्यात जरी त्याला यश आले नसले तरी त्याचे वाचन प्रचंड आहे, या न्यायालयात आपला युक्तिवाद मांडताना इंग्रजी भाषेचे उत्तम ज्ञान असल्याचा आणि स्वच्छ विचार करण्याच्या लक्षणीय क्षमतेचा त्याने प्रत्यय दिला.'

(Although he did not succeed in passing the Marticulation Examination, he is quite widely read. In arguing his appeal in this court he displayed a very fair knowledge of English language and a remarkable capacity for clear thinking) (चक्रीटंकित निर्णयपत्र पृष्ठ २०६)

म्हणून हृदयपरिवर्तन या प्रणालीची प्रचिती आपणास कोणीतरी द्यावी आणि एकमेकांस समजणे एवढी तरी त्यातून निष्पत्ती व्हावी, अशी त्याची इच्छा होती. काही विशिष्ट ध्येयाने प्रेरित होऊन कोणी व्यक्ती जेव्हा त्या कार्याशी एकमत होते आणि मनाच्या एका अंतिम अवस्थेत पोहोचते, तेव्हा ती व्यक्ती भयातीत आणि प्रलोभनातीत होते. नथुराम ज्या अवस्थेत पोहोचला होता त्या अवस्थेच्या कार्यकारण संबंधाच्या इष्टानिष्टतेची चर्चा येथे अभिप्रेत नाही. विशेष न्यायमूर्तींनी दि. १०-२-१९४९ या दिवशी फाशीची शिक्षा

सुनावल्यावर नथुराम आणि मृत्यू समोरासमोर तिष्ठत होते. फाशीच्या दोराचे भय किंवा दयेचे प्रलोभन या गोष्टी त्याच्यात पश्चात्ताप निर्माण करण्यास केवळ असमर्थ होत्या. मनाच्या उद्दीपित अवस्थेत आपण कोणतीतरी कृती करतो आणि ती कृती घडल्यावर मात्र आपण कसे उद्दीपित झालो, या विचाराने आपले मन आपणास पोखरू लागते, तो पश्चात्ताप. पण मनाच्या त्या उद्दीपनाला जर कोणा व्यक्तीने काही बैठक ठेवली असेल, काही अधिष्ठान मांडले असेल, तर त्या बैठकीतील किंवा अधिष्ठानातील दोष त्याच्या दृष्टीस आणल्यानेच केवळ त्याला आपला प्रमाद कळू शकेल आणि प्रमाद कळणे ही पश्चात्तापासाठी प्रथम भूमिका असते.

पुन्हा, पश्चात्तापाची भावना ही तत्त्वतः निर्लेप आणि निरपेक्ष असली पाहिजे. मला पश्चात्ताप झाला आहे म्हणून दया करा, या म्हणण्यात अपेक्षा आली. आपल्या बैठकीतील प्रमाद कोणी पटवून दिला, तर पश्चात्तापाची भावना मी प्रांजळपणे व्यक्त करीन, आणि तशी ती केल्याने मी केलेल्या कृत्याचे परिमार्जन होऊ शकत नाही म्हणून पश्चात्तापाची भावना मनावर तरंगत ठेवूनच मी माझ्या अवैध कृत्याचे वैध फळ भोगीन, ही नथुरामची विचारधारणा होती.

आपण करीत असलेल्या आघाताची जाणीव त्या घटनेपूर्वीही नथुरामला होती आणि म्हणूनच आपल्या मनोवेदना बोलण्याची संधी मिळताच त्याने त्या गांधीजींच्या कुटुंबीयांना बोलून दाखविल्या. मनाच्या एका टोकावर तो इतक्या स्थिरपणे आरूढ झाला होता की, 'कर्तुमिच्छसि यन्मोहात् करिष्यस्यवशोपितत्' असेच जणू त्याचा अंतरात्मा त्याला सांगत होता. त्याची बैठक नंतरही स्थिर असल्याने, श्री. रामदास गांधी यांनी व्यक्त केलेल्या सद्भावाची शिडी करून वधस्तंभावरून खाली उतरण्याचा मोहही त्याला झाला नाही. त्याला चर्चा हवी होती; पण ती गांधीजींच्या अशा शिष्यवरांशी, की जे सत्तास्पर्धेने लिप्त नाहीत. कारण त्यामुळे त्यांच्याकडून काही मागण्याचा प्रश्नही उद्भवणार नव्हता. त्याने श्री. रामदास गांधी यांना लिहिलेल्या समग्र पत्राचा अनुवाद असा आहे.

सिमला, ३ जून १९४९

प्रिय बंधो, श्री. रामदास गांधी,

आपले १७ मे १९४९ चे अतीव दयापूर्ण पत्र काल मिळाले. माझ्या हातांनी आपल्या परमपूजनीय पित्याचा दुःखद अंत झाला. त्यायोगे आपण आपले नातेवाईक यांना जे मानसिक आघात झाले, त्याविषयी माझ्या भावना एक मानव या नात्याने व्यक्त करण्यास मजजवळ शब्दच नाहीत; पण त्याचबरोबर दुसरीही एक बाजू बघण्याजोगी आहे, असे माझे प्रतिपादन आहे. माझे सर्व विचार कागदावर उतरविण्याच्या आणि आपणास समक्ष भेटण्याच्या परिस्थितीतही मी नाही; पण माझ्या फाशीपूर्वी माझी बंदिगृहात भेट घेण्याच्या परिस्थितीत

आपण निश्चितपणे आहात.

मी एक तर्ककठोर आणि शास्त्रशुद्ध विचारांचा मनुष्य आहे, असे आपण ऐकलेत असे आपण म्हणता; पण मी प्रखर संवेदनाक्षम आहे हे आपणास समजले, तर आपणास आश्चर्य वाटेल. त्या माझ्या प्रखर संवेदनात मातृभूमीवरील भक्ती ही माझी सर्वतोपरी संवेदना आहे.

एकदा माझ्या मनातून अपसमज दूर केला की, मला पश्चात्ताप होईल आणि माझा प्रमाद मला कळून येईल असे आपण म्हणता.

बंधो ! माझे मन विचारग्रहणास मोकळे आहे; (I am an openminded man) आणि मनाच्या धारणेतील चूक सुधारण्यासही मी सदैव सिद्ध आहे; पण माझा अपसमज काही असला, तर तो दूर करून माझ्यात उपरती घडवून आणण्याचा मार्ग कोणता ?

निश्चित, बधस्तंभ नव्हे. दयेचा देखावाही नव्हे आणि माझ्या शिक्षेचे न्यूनीकरणही (Commutation) नव्हे. मला भेटणे आणि मला माझ्या चुकीची जाणीव करून देणे हा एकच मार्ग आहे. मला पश्चात्ताप करावयास लावील, असे काहीच मला या घटकेपर्यंत तरी आढळले नाही.

काही प्रमुख ख्रिस्ती धर्मप्रचारकांकडून मला कित्येक पत्रे आली आहेत. त्यांच्या श्रद्धेला अनुसरून आणि 'पवित्र बायबल'च्या शिकवणुकीला अनुसरून त्यांनी मला काही उपदेश करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांची ती बैठक अर्थात समजण्याजोगी आहे. पण आपलेच पहिले पत्र असे आहे की, आपल्या बडिलांच्या सुविदित किंवा अधिकविदित तत्त्वांशी काही मर्यादेपर्यंत मिळतेजुळते आहे. खरोखर हे आश्चर्यजनक आहे. मला अनेक पत्रे शिव्याशापाने भरलेली आलेली आहेत. आपल्या बडिलांच्या कोणा शिष्यांनी ती लिहिली असतील, असे मी समजत नाही.

काही असो, आपण मला भेटावे आणि शक्य असेल, तर आपल्या बडिलांच्या कोणा प्रमुख शिष्यांसमवेत भेटावे, अशी मला आपणास विनंती करावयाची आहे. विशेषतः असा शिष्यवर राज्यासनाच्या स्पर्धेने लिप्त असलेला नसावा. त्या भेटीत मला माझा अतिघोर प्रमाद निदर्शनास आणावा.

अन्यथा हा दयेचा देखावा आणखी काही नसून केवळ धूळफेक (eye wash) आहे, असे मला नेहमी वाटेल.

आपण मला समक्ष भेटलातच आणि माझ्याबरोबर बोललात, मग ते बोलणे भावनात्मक पातळीवरून असो किंवा शास्त्रशुद्ध वादाच्या पातळीवरून असो. तर कोणी सांगावे आपण माझ्यात परिवर्तन घडवून आणाल आणि माझ्यात उपरती निर्माण कराल किंवा मी आपणात परिवर्तन घडवून आणीन आणि माझी बैठक आपणास पटवीन.

आपण केवळ खऱ्यालाच धरून बोलले पाहिजे ही अट मात्र आपल्या संभाषणाला असली

पाहिजे.

आपल्या पित्याच्या माझ्या हातून झालेल्या निधनाने आपणास ज्या यातना झाल्या त्यासाठी मी पुन्हा गहन खेद व्यक्त करतो.

आपला सद्भावी
नथुराम वि. गोडसे

पश्चाल्लेख : आपणास योग्य वाटेल, तर आपण या पत्राची प्रत भारताच्या महाशासकांना धाडावी.

वर उद्धृत केलेल्या दोन पत्रानंतरही आणखी पत्रव्यवहार झालेला आहे, तो आवश्यकतेप्रमाणे यथाकाल दिला जाईल. तात्पर्य असे आहे की, आचार्य विनोबा भावे आणि किशोरीलाल मश्रूवाला यांच्यासमवेत नथुरामला भेटावे असा श्री. रामदास गांधी प्रयत्न करीत होते. त्यांचा प्रयत्न यशस्वी झाला नाही. कारणांची चिकित्सा मी येथे करीत नाही. भेट झाली नाही हे फार वाईट झाले कारण अशा भेटीतून कदाचित नथुरामचे फाशीपूर्वी हृदयपरिवर्तन झाले असते आणि गांधीवाद ही तर्ककठोर, शास्त्रशुद्ध आणि व्यवहार्य प्रणाली आहे, याचे उदाहरण आजच्या पिढीपुढे ठेवता आले असते.

असो. श्री. रामदास गांधी यांच्या पत्राने नथुरामला समाधान वाटले ते असे की, मानसिक विकृतीमुळे मनुष्य वेडा समजला जातो तसा तो समजला गेला नव्हता. उलट तो एक विचारवंत आहे, याची थोडीफार कल्पना बाहेरील जगाला आली होती.

दिनांक तीस जानेवारीच्या घटनेसंबधी जे साक्षीदार आणले जातील त्यांची त्या भागापुरती उलटतपासणी घ्यायची नाही, हे नथुरामने आधीच ठरविले होते. त्यामुळे असे झाले की, अशा साक्षीदारांची जी विधाने अतिरंजित, स्वतःचीच प्रौढी मिरवणारी आणि असत्य होती, त्या विधानांची छाननी झाली नाही. पण तीस जानेवारीच्या घटनेला मीच उत्तरदायी आहे, आणि त्या साक्षीदारांच्या विधानांतील विसंगती उघडी पाडून मला कोणताच लाभ मिळवायचा नाही, हीच नथुरामची भूमिका असल्याने त्या साक्षीदारांनी केलेली विधाने त्याने जशीच्या तशीच राहू दिली.

गांधीहत्येचे दायित्व संपूर्णपणे स्वतःच्या अंगावर घेऊन नथुराम आपल्या इच्छेप्रमाणे फाशी गेला आहे. गांधीहत्येच्या आगचेमागचे काही क्षण कसे होते, हे आपणास येथे बघावयाचे आहे.

त्या तीन गोळ्या सुटण्याचे काम थांबून थांबून होत होते किंवा संथपणे चालले होते, असे काही साक्षीदारांच्या विधानावरून आपणास वाटते.

आपण फार चपलतेने, तत्परतेने आणि कौशल्याने नथुरामला धरले, असे काही साक्षीदार सांगतात.

आपण पहिल्याने नथुरामला धरले असे तर बहुतेक साक्षीदार सांगतात किंवा सूचित करतात.

नथुरामजवळ ३०६८२४ या क्रमांकाचे एक ऑटोमॅटिक पिस्तूल होते. त्यात सात गोळ्या होत्या. रिव्हॉल्व्हरमध्ये बहुधा सहा गोळ्या बसविण्याची व्यवस्था असते. प्रत्येक गोळी सोडण्यास घोडा पुन्हा ओढावा लागतो. स्वयंचलित पिस्तूलाचा घोडा एकदा ओढला की, सर्व गोळ्या एका पाठोपाठ एक सुटतात. त्या फार वेगाने सुटतात. घोडा ओढून सोडण्याची क्रिया लवकरात लवकर केली तरीही एकच गोळी सोडणे केवळ अशक्य असते. दोन गोळ्या तरी तेवढ्या अवधीत सुटतात.

नथुरामने एकदाच घोडा झटकन सोडला होता. दोन गोळ्या सुटल्या अशी बराच वेळ त्याची कल्पना होती; पण तीन गोळ्या सूटून गेल्या होत्या हे त्याला नंतर समजले. अशा अतिशीघ्र क्रमाने गोळ्या गेल्या तरीही प्रत्येक गोळी उडाल्याचा आवाज वेगळा होणार यात संशय नाही. मात्र, एका गोळीच्या आवाजापासून दुसरीचा आवाज यातील अंतर मनातच टिपणे शक्य आहे. जिभेच्या भरभर उचारानेही ते शक्य नाही; कारण उचारशक्तीचा वेग कितीही भरभर केला तरी तो गोळ्या सुटण्याच्या वेगापेक्षा कितीतरी मंद असणार. जिज्ञासा असेल, तर अधिकारी व्यक्तींना वरील वस्तुस्थितीची प्रचिती बघता येईल.

पोलिस सबइन्स्पेक्टर श्री. अमरनाथ यांची साक्ष दि. ९-४-१९४९ ला विशेष न्यायालयात झाली. बिर्ला भवनात गांधीजींच्या रक्षणासाठी ठेवलेल्या आरक्षीसमूहाचे हे नायक होते. ते म्हणाले,' मी तेव्हा गांधीजींपासून अडीच ते तीन पावले डाव्या बाजूच्या अंतरावर होतो. मी गोळीचा एक आवाज ऐकला आणि पाठोपाठ धूर बघितला. कोणीतरी गोळीबार करीत आहे, असे मला वाटले. मग मी पुढे घुसलो आणि असा गोळीबार करणाऱ्या व्यक्तीस धरले. तोपर्यंत तीन गोळ्या उडविल्या गेल्या होत्या. या गोळ्या महात्मा गांधींना लागल्या होत्या. गर्दीतून सार्जंट देवराज सिंगही पुढे आला होता. त्याने मारणाराचे मनगट धरले आणि रिव्हॉल्व्हर हिसकावून घेतले. रिव्हॉल्व्हरमधून धूर येत होता. मारणारा गांधीजींपासून अडीच पावले अंतरावर होता...'

तीस जानेवारीच्या घटनेसंबंधीची तीच पहिली साक्ष होती. साक्ष होताच उलट तपासणीसाठी नथुरामचे वकील श्री. व्ही. व्ही. ओक यांनी नथुरामकडे पाहिले. त्यांच्याकरवी नथुरामने न्यायालयात सांगितले की, तीस जानेवारीच्या घटनेच्या संबंधात अभियोजक जे साक्षीदार आणतील त्यांची उलटतपासणी घेण्याची माझी इच्छा नाही. न्यायमूर्तींनी नथुरामला पुन्हा विचारले, कारण बचावाला संधी मिळाली नाही असा आक्षेप घेतला जाऊ नये. नथुरामने पुन्हा तेच सांगितले.

श्री. नंदलाल मेथा हे एक दिल्लीचे व्यापारी. त्या दिवशी ते बिर्ला भवनात होते.

त्यांचीही साक्ष दि. २-८-१९४८ या दिवशी झाली. ते म्हणतात, 'गांधीजी आपल्या खोलीतून प्रार्थनापीठाकडे निघाले, तेव्हा त्यांच्या समवेत दहा-बारा मंडळी होती. त्यात मी होतो. मी दोन-तीन गोळीबार भराभर झालेले ऐकले. मी पुढे उडी मारली. माझे हात मारणाराबर पडले. मारणाऱ्याच्या हातात पिस्तूल होते. मग थोड्याच वेळात तीन-चार लोकांनी मारणाराला धरले.'

श्री. नंदनलालजींनी आपली साक्ष शेवटी सुधारली आहे. ते म्हणतात, 'माझा हात मारणाराबर पडेपर्यंत तीन-चार लोकांनी आधीच त्याला धरले होते.'

उलटतपासणी नव्हती.

फूट कॉन्स्टेबल रतनसिंग यांची साक्षही त्याच दिवशी झाली. बिर्ला भवनात जे आरक्षी ठेवले होते त्यात ते एक होते. ते म्हणाले, 'मी एकाएकी दोन-तीन गोळीबार ऐकले. मी त्या दिशेने धावलो. अमरनाथ, धरमसिंग आणि एक सैनिकी अधिकारी यांनी मारणाराला पकडले होते, हे मी पाहिले.'

न्यायालयाने एक प्रश्न रतनसिंग यांना विचारला. त्याला उत्तर म्हणून त्यांनी नथुराम आणि आपटे यांना दाखविले आणि सांगितले, 'यांच्यापैकी एकाला तीस जानेवारीला पकडले. नेमका कोण याची मला कल्पना येत नाही.'

हेड कॉन्स्टेबल श्री. धरमसिंग (क्रमांक १५७६) आपल्या दि. ९-७-१९४८ च्या साक्षीत म्हणाले, 'मी त्या दिवशी प्रार्थनास्थळी कामावर होतो. मी गोळीचा एक आवाज ऐकला. मी मोकळ्या जागेत घुसलो. मध्यंतरी आणखी दोन गोळ्या सुटल्याचा आवाज मी ऐकला. पिस्तूल घेतलेला एक मनुष्य मी पाहिला. मी, त्याचा उजवा म्हणजे पिस्तूल असलेला हात धरला. मी त्याचा हात बर केला. तेवढ्यात एक सैनिक आला. त्याने मारणाऱ्याच्या हातून पिस्तूल घेतले. मारणारा गांधीजींपासून दीड फूट अंतरावर होता.'

श्री. रघुनाथ नाईक हे बिर्ला भवनात माळ्याचे काम करीत. दि. २०-८-१९४८ या दिवशी त्यांची साक्ष झाली. ते म्हणाले, 'मी त्या वेळी गांधीजींच्या उजव्या बाजूला पाच-दहा पावलांच्या अंतराबर होतो. मारणारा गांधीजींच्या पुढ्यात नुकताच आला होता. तो तसा कोणत्या दिशेने आला हे मला सांगता येणार नाही. मी मग पिस्तूलाचा गोळीबार ऐकला. मी मारणाराकडे झेप घेतली. मध्यंतरी मी तीन आवाज ऐकले. माझ्या हातात खुरपे होते. मी मारणाराबर मागच्या बाजूने खुरप्याचे दोन वार केले. खुरपे सात-आठ इंच लांबीचे असेल. मी मागच्या बाजूने मारणाराला धरले. मारणाराला दोन आरक्षी आणि एक सैनिक यांनीही धरले होते. त्या आरक्षींनी मारणाराचे पिस्तूल घेतले होते.'

श्री. गुरुबचनसिंग हे दिल्लीचे आणखी एक व्यापारी होते. गांधीजींकडे त्यांचे पुष्कळ जाणे-येणे असे. ते केन्द्रीय निर्वासित समितीचे एक सदस्य होते. श्री. गुरुबचनसिंग घोंगड्या

आणि खेस (पासोड्या) निर्माण करण्याचा उद्योग करीत असत. ते त्या दिवशी बिर्ला भवनात दुपारी तीन वाजल्यापासूनच होते. त्यांची साक्ष दि. ३०-८-१९४८ या दिवशी झाली. ते म्हणाले, 'पाच वाजण्याच्या आसपास मी गांधीजींना प्रार्थनेची आठवण करून देण्यासाठी डोळ्याने खुणावले. प्रार्थनेला मी निघत असतानाच एकदोघांशी काही बोलण्यात माझा वेळ गेला. महात्मा गांधी प्रार्थनेसाठी जात तेव्हा एक-दोन माणसे वाट मोकळी करण्यासाठी म्हणून गांधीजींच्या पुढे असत आणि एक -दोघे मागे असत. एरवी मी गांधीजींच्या कडेला किंवा त्यांच्यापुढे राहिलो असतो. त्या दिवशी मात्र गांधीजींच्या मेळाव्यापैकी कोणीच त्यांच्या पुढे नव्हते. नंदलाल डाव्या बाजूला, तर ब्रिजकिशन मागे होते. प्रार्थना पटांगणावर मोठा समुदाय तिष्ठत होता. मी गांधीजींच्या पुढ्यात होण्याचा प्रयत्न केला. गांधीजींच्या पुढ्यात काही मुली आणि स्त्रिया असल्याने मी तसे करू शकलो नाही. मग मी दुसऱ्या बाजूने गांधीजींच्या पुढ्यात जाण्याचा प्रयत्न केला. मग मी गोळीचा एक आवाज ऐकला. तो आवाज कुठून आला हे मला उमगले नाही. गांधीजींच्या पुढ्यात जाण्यासाठीच मी हालत होतो. मी गोळीचा आणखी एक आवाज ऐकला. गोळ्या झाडणारा मनुष्य मी माझ्या समोरच बघितला. त्याच्या हातात मी पिस्तूल पाहिले. मी त्या मारणाराच्या हातावर तडाखा मारला. मी तडाखा मारताच तिसरी गोळी मारली गेली होती. मला वाटते, तिसरी गोळी उडाल्यानंतर मी त्याच्या हातावर तडाखा मारला. लागलीच पुष्कळ लोकांनी मारणाराला पकडले. मग मी माझे लक्ष महात्मा गांधींकडे वळविले.'

वरील आशयाची विधाने साक्षीदारांकडून आली. ती सर्वच्या सर्व देण्याचे काही प्रयोजन नव्हते म्हणून दिली नाहीत. त्या त्या ठिकाणाचे संदर्भ अनुक्रमे मुद्रित अभिलेख ग्रंथ १ पृष्ठे ५० ते ५४, १५७, १७९ १८० येथे मिळतील.

ती घटना न बघितलेल्या आम्हा लोकांना, काय झाले हे समजून घेण्याची जिज्ञासा असे. शंका उपस्थित होई तेथे आम्ही आपापसात चर्चा करीत असू. 'धूर पाहिला' या विधानासंबंधी नथुरामला विचारता तो म्हणाला, 'माझ्या कल्पनेप्रमाणे धूर आलाच नव्हता. सूक्ष्म वास मात्र आला होता.'

'मग शस्त्रतज्ज्ञाला विचारून घेतले तर ? त्याची साक्ष अथाप झालेली नाही.' (डॉक्टर श्री. डी. एन. गोयल यांची साक्ष पुढे दि. २-८-१९४८ ला झाली होती. ते सायंटिफिक लॅबोरेटरीचे डायरेक्टर होते. शस्त्राचे ते तज्ज्ञ होते.) (ग्रंथ १, पृष्ठ ११८.)

नथुराम म्हणाला, 'समजा, त्याने सांगितले की धूर निघत नाही, तर साक्षीदार श्री. अमरनाथ त्याने न बघितलेलीच गोष्ट बघितली म्हणून सांगत आहे एवढे फार तर सिद्ध होईल. पण मलाच जिथे पळवाटा शोधायच्या नाहीत तिथे या छाननीचा प्रपंच हवा कशाला ? आपल्या साक्षी निदान शास्त्रशुद्ध आहेत की नाहीत, हे अभियोजकांनी बघावे हवे तर.'

दिल्लीच्या आयर्विन रुग्णालयाचे प्रमुख कर्नल बी. एल्. तनेजा यांनी आपल्या साक्षीत गांधीजींच्या शरीरावरील पाच घावांचे वर्णन दिले. पिस्तूलाच्या गोळ्यांमुळे मृत्यू आला, असे आपले मत असल्याचेही त्यांनी सांगितले.

ते सांगणार असलेल्या विधानांची प्रत बचाव पक्षाला आधीच दिली गेली होती. त्यामुळे वकील मंडळीत त्या विधानांची चर्चा, चिकित्सा होत होती. उत्तरीय परीक्षा (पोस्ट मार्टेम) झाली नव्हती. पुन्हा काही तज्ज्ञांच्या ग्रंथावरून असे दिसत होते की, श्री. तनेजा यांनी पाहिलेले आणि तशी नोंद करून ठेवलेले घाव या पिस्तूलाच्या गोळीने जसे घाव होतील, त्याच्याशी मिळतेजुळते नव्हते.

श्री. तनेजा यांचे गांधीजींच्या मृत्यूचे कारणासंबंधीचे मत ग्राह्य मानू नये, मृत्यू गोळ्यांनीच आला हे गृहीत धरू नये, तो गोळ्यांनी आला असे मानले तरी नथुरामजवळ मिळालेल्या पिस्तूलातील गोळ्यांनी आला हे गृहीत धरू नये, आणि त्याच पिस्तूलाच्या गोळ्यांनी मृत्यू आला असे मानायचे असेल, तर नथुरामने ते पिस्तूल वापरले नव्हते हे गृहीत धरावे कारण त्याच्या शस्त्रातून धूर येत असल्याची साक्ष आहे, असे युक्तिवाद मांडण्याची वकिलांनी सिद्धता चालविली होती.

परंतु, 'मी वापरलेल्या पिस्तूलाच्या गोळ्यांच्या घावामुळेच गांधीजींचा मृत्यू झाला.' असे न्यायालयाला सांगण्याचे नथुरामने ठरविले होते. त्यामुळे श्री. तनेजा यांची साक्ष झाल्यावर नथुरामने आपल्या वकिलांना एकही प्रश्न त्यांना विचारू दिला नाही. दिनांक १२-७-१९४८ ला श्री. तनेजा यांच्या साक्षीवर न्यायमूर्तींनी लिहून ठेवले आहे, 'उलटतपासणी नाही. (cross examination nil) (ग्रंथ १, पृष्ठ ५५) म्हणून आज नथुरामच्या स्वीकारोक्तीला मृत्यूच्या कारणाविषयी मुख्य संपुष्टी (collaboration) असेल, तर ती श्री. तनेजा यांनी दिलेल्या अभिमताची.

श्री. तनेजा यांचीही उलटतपासणी होणार नाही, अशी अभियोजकांची कल्पना नव्हती. श्री. दफ्तरी यांनी तसे आश्चर्य व्यक्त केले. ते तेव्हा प्रमुख अभियोजक होते. साक्ष थोड्या वेळातच संपली होती. त्याच साखळीतील आणखी साक्षीदार त्यांनी सिद्ध ठेवलेले नव्हते. त्यामुळे त्या साखळीशी विसंवादी साक्षीदार नंतर आणले गेले आणि तो दिवस संपला. असो.

नथुरामच्या डोक्यावर गांधीहत्येच्या दिवशी दोन-तीन घाव झाले होते. त्यातून रक्त वाहत होते. रघुनाथ माळी या साक्षीदाराने आपण नथुरामला खुरप्याचे वार केल्याचे सांगितले होते. नथुराम आम्हाला म्हणाला, 'माळी पूर्णपणे खोटे बोलला. हाताला धरण्याच्या काठीचे दोन-तीन तडाखे माझ्या डोक्यावर बसले होते; पण घटनेनंतर चार-पाच मिनिटांनी मला डॉक्टरांनी तपासले तेव्हा रक्त थिजलेले होते. माझ्या घावांचे वर्णन डॉक्टरांनी लिहून ठेवले

आहे. त्यात घावांचे स्वरूप 'किरकोळ' (all apparent simple) असे लिहिले असून, शस्त्र ठोक किंवा भरीव (blunt) होते, असे म्हटले आहे. (सर्व प्रतिवृत्त ग्रंथ ४, पृष्ठ १८७ वर क्रमांक पी २४९ म्हणून आहे.)

नथुरामला पकडण्यात आपण फार तत्परता दाखविली, असे बहुतेक साक्षीदार म्हणतात. त्याबर नथुराम आमच्याशी बोलत होता. तो म्हणाला, 'माझ्या हातात शस्त्र होते. मी गोळ्या मारलेल्या होत्या. आणखी गोळ्या मी मारणारच नाही; असा कोणास विश्वास बाटत नव्हता. शस्त्रधारी आरक्षीपिकी कोणीही त्याबेळी मला गोळी घातली असती, तर ते निःसंशयपणे समर्थनीय ठरले असते.

'पण झाले असे की, एकाएकी झालेल्या गोळीबाराने सर्वजण दिङ्मूढ आणि आतंकित झाले. अगदी जवळच्या लोकांनी माझ्या हातात शस्त्र बघितले होते. अशा स्थितीत आपल्यावरच गोळी येते की काय, अशी प्रत्येकाची धारणा होती. म्हणून प्रत्येकजण पाच-सात पावले तरी झटकन मागे सरले. गांधीजींना जाऊ देण्यासाठी थोडीशी मोकळी बाट केली गेली होती. मी त्या बाटेवरच उभा होतो. ती बाट आणखी रुंदावली. चार पावलांबरच गांधीजी पडले होते. माझ्याभोबती एक लांबट रिंगण निर्माण झाले होते. माझा हात बर होता हे बघितल्यामुळे कदाचित लोक आणखी मागे सरले नाहीत.

'गोळ्या झाडताच मी पिस्तूलाचा हात बर केला होता आणि 'पोलीस, पोलीस' असे ओरडलो होतो. अर्धे मिनिट झाले तरी कोणीही जवळ येईना ! क्षणाक्षणाला माझ्या मनाबरील ताण बाढू लागला. मी अतिशय अस्वस्थ होऊन गेलो. मला बाटते, मी उत्तेजित होत होतो.'

'तुझ्या मनाबर ताण येण्याचे आणि तुला उत्तेजित होण्याचे कारण काय ? तेव्हा तरी तुझ्याबर कोणी तुला मारण्यासाठीही हात टाकला नव्हता.' मी मध्येच नथुरामला बिचारले.

'कोणी मला मारतो आहे की नाही किंवा कोणी मारण्यास आला, तर त्याला प्रतिकार कसा करायचा, या गोष्टी तेव्हा माझ्या मनात नव्हत्या. आज मला माझ्या तेव्हाच्या मनःस्थितीची संगती लावता येते. गांधीहत्या या कृत्याच्या कोणत्याही परिणामाला माझी सिद्धता होती; पण मला तीन आरोप नको होते. मी पळून जाण्याचा प्रयत्न केला, असा संकेतही कोणी करण्यास मला नको होता. अर्ध्या मिनिटाने मी पुन्हा 'पोलीस, पोलीस म्हणून ओरडलो. समोर गणबेशातील आरक्षीही मी बघत होतो. पण ते तर मला पकडण्यास धजत नव्हते. पिस्तूल फेकून घावे तर पळबाटा निर्माण करण्याचा प्रयत्न केला असा अर्थ लाबला गेला असता. तोही आरोप मला नको होता. माझ्या शस्त्रासहित मला आरक्षीच्या स्वाधीन व्हायचे आहे हे त्यांना आणखी कोणत्या मार्गाने पटबावे हे मला सुचेना !'

'आणखी कोणता आरोप तुला नको होता ?' मी बिचाले.

'बीस जानेबारी. ज्या आरोपाच्या भीतीने कार्यान्वित झाली नाही तो आरोप !'

'म्हणजे ?'

'मला चुकूनही आणखी कोणास धक्का लावायचा नव्हता. म्हणून तर पिस्तूलाचा हात वर करून मी आरक्षीची वाट बघत राहिलो. अनवधानानेही मी पिस्तूल खालीच हातात खेळवत ठेवले असते तर, 'आमच्यावर याने पिस्तूल रोखले होते.' अशा काही साक्षी आल्या असत्या.'

'मग तुला धरले कसे ?'

'माझी दृष्टी मी आसमंतात फिरवू लागलो. बहुधा अमरनाथची आणि माझी किंवा जो सैनिक म्हणून म्हणतात त्यांची आणि माझी दृष्टादृष्ट झाली. दृष्टीनेच मी 'जवळ ये' असा त्याला संकेत केला. 'दृष्टीतील विश्वास बहुधा त्याला पटला. तो माझ्याजवळ आला. माझे मनगट त्याने बरच्या वर धरले. ते प्रतिकारहीन आहे हे त्याला जाणवले. माझ्या मनावरील दडपण चटकन मावळले. मी सुटकेचा निःश्वास सोडला. पाठोपाठ दुसरा मनुष्य आला. त्याने माझ्या शस्त्राला हात घातला. मी शस्त्र त्याच्या हातात सोडून दिले.

'आणि त्यानंतर लोक माझ्याजवळ आले, त्यांनी मला घेरले, काहींनी लाथांनी मारले. आरक्षींचा अजागळपणा असा होता की, ते पिस्तूल कुतूहलाने या हातातून त्या हातात फिरत होते. कोणा एकाने पिस्तूल माझ्या पुढ्यात धरले आणि तो म्हणाला, 'मी तुला याच पिस्तूलाने ठार करतो.' मी त्याला शांतपणे पण त्या धुमाळीत त्याला स्पष्ट ऐकू जाईल इतक्या मोठ्याने म्हणालो, 'आनंदाने. पण तुला पिस्तूल हाताळण्याची माहिती दिसत नाही. सेफ्टी कॅच उघडा आहे. सहज धक्का लागला, तर तुझ्या हातून आणखी कोणीतरी मरेल. आत आणखी गोळ्या आहेत. लक्षात ठेव.' मग मी जवळच्या आरक्षी अधिकाऱ्यांना म्हटले,

'ते पिस्तूल आधी तुमच्या स्वाधीन घ्या. सेफ्टी कॅच उघडाच राहिलेला दिसत आहे. तो बंद करा. नाहीतर हा माणूस मला मारण्याऐवजी आणखी कोणाला तरी मारून बसेल.' त्या अधिकाऱ्याने लगेच ते पिस्तूल आपल्या हातात घेतले. त्याचा सेफ्टी कॅच बंद केला आणि ते आपल्या खिशात टाकले. ही धुमाळी पाच एक मिनिटे चालली. आणखी एक-दोन आरक्षींनी मला तो वेळेपर्यंत धरले होते. अधिकाऱ्यांच्या सांगण्याप्रमाणे मला ते त्या गर्दीतून तंबूकडे नेऊ लागले होते. निघण्याच्या वेळी मला काठीचे वार लागले होते. रक्त वाहू लागले होते त्या घावातून.'

'प्रत्यक्ष घटनेसंबंधी तू काही बोलला नाहीस.' मी विचारले.

'संध्याकाळी पाचच्यापूर्वी दहा एक मिनिटे मी बिर्ला भवनच्या दाराशी गेलो होतो. दारावरील पहारेकरी प्रार्थनेला जाणाऱ्यांचे निरीक्षण करीत होते. त्यांचे मला सर्वांत अधिक भय होते. म्हणून चार-पाच लोक जात होते. त्यांच्यातला मी एक आहे असे समजले जावे, अशी दक्षता घेऊन मी आत गेलो. पुन्हा परिसर मोकळा होता आणि इकडे-तिकडे बावरणाऱ्या

आरक्षींची दृष्टी जणू माझ्यावरच आहे की काय, असे मला काही वेळ वाटले. तेव्हा आसपास आणखी लोक असतील अशा समुदायात मी शक्य तितक्या लवकर जाऊन थांबलो.

'पाच वाजल्यावर दहा एक मिनिटे होऊन गेली होती. गांधीजी आणि त्यांच्या जवळचे लोक खोलीच्या परिसरातून प्रार्थनास्थळाकडे निघू लागल्याचे मला दिसले. ते जेथून अंगणाच्या पायऱ्या चढतील त्या ठिकाणच्या आसपास लोकांच्या आवरणात मी उभा राहिलो.

'गांधीजी पायऱ्या चढून पाच सहा पावले पुढे आले होते. त्यांचे हात दोन बालिकांच्या खांद्यावर होते.'

'खिशातल्या खिशात मी पिस्तूलाचा सेफ्टी कॅच उघडला. गांधीजींच्या भोवताली लोक असले तरी मला हवी असलेली मोकळीक मला मिळते आहे एवढे मी बघितले होते.'

'मला आणखी तीन एक सेकंदांचा वेळ हवा होता. दोन पावले पुढे सरून गांधींच्या पुढ्यात जाणे, शस्त्र बाहेर काढणे आणि गांधींनी आपल्या जीवनात जी म्हणून उपयुक्त देशसेवा केली, त्यासाठी जो त्याग केला, त्यासाठी त्यांना वंदन करणे.'

'त्या दोन मुलींतील एक गांधीजींच्या जवळ होती. तिला दुखापत होईल, अशी मला भीती वाटली. त्यावरील उपाय मनात योजून मी पुढे सरलो. गांधीजींना 'नमस्ते' या शब्दात आणि शस्त्रासहित हातांनी वंदन केले. आणखी एक पाऊल पुढे झालो. या मुलीला डाव्या हाताने दूर केले.

'पुढच्या क्षणाच्या कोणत्या तरी अंशात बार झाले, क्षणांशाच्या पुढच्याच क्षणांशात आधीच कृश असलेले गांधीजी 'अः' अशा अतिशय अस्पष्ट, जणू आतल्या आत होत असलेल्या उद्‌गारासरशीच अचेतन होऊन धरणीवर पडले.

'गांधीजींचा अच्छेद्य, अदाह्य, अक्लेद्य, अशोष्य आत्मा अंतर्धान पावत होता. मी माझ्या जिवंत समाधीत प्रवेश करीत होतो.'

卐 卐

पाच

नथुराम ! हे राम !

नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा त्वत्प्रसादान्मयाच्युत ।
स्थितोऽस्मि गतसन्देहः करिष्ये वचनं तव ॥

"तोवर आपण आत्मनिरीक्षण करा. म्हणजे आपल्या संकल्पित भेटीच्या अंती आमच्या समवेत आपण हा गीतेचा श्लोक म्हणू शकाल."

श्री. रामदास गांधी यांनी नथुरामच्या पत्राला उत्तर लिहिले होते. दिनांक १३-६-१९४९ चे त्यांचे पत्र नथुरामला अंबाला बंदिशाळेत २३-६-१९४९ ला दिले गेले होते. पत्राच्या शेवटच्या भागाचा सारांश वरीलप्रमाणे होता.

संबोधित वाचकाला आपले लेखन कितपत समजेल याचा तर्क बांधून जो लिहितो तो उत्तम लेखक असे आपण समजतो. जाड भाषा आणि अगडबंब शब्दप्रयोग अनुलक्षित वाचकाच्या डोक्यात नव्हे, तर डोक्यावरून जात असतील, तर तो दोष वाचकाचा नसून लिहिणाराचा असतो.

वरील श्लोकाचा शब्दार्थ संस्कृतची तीन-चार पुस्तके झालेल्याला सहज समजू शकेल, पण गीतेचे महत्त्व गीतेतील श्लोकांच्या शब्दार्थांसाठी नव्हे, तर भावार्थांसाठी आहे. म्हणूनच गीतेचा संदेश काय हे लोकांना समजवण्यासाठी जगद्गुरुंच्या कालापासून लोकमान्यांच्या कालापर्यंत लेखन झालेले आहे. यापुढेही होईल.

ज्या संदर्भात श्री. रामदास गांधी यांनी वरील श्लोक उद्धृत केला, त्या संदर्भात नथुरामला त्या श्लोकाचा भावार्थ समजेल हे त्यांचे अनुमान होते. नथुरामासंबंधी त्यांनी तो बेळेपर्यंत थोडेफार ऐकले होते. फाशीचा दोर स्वतःच्या गळ्याभोवती सावरीत असतानाच नथुरामने श्री. रामदास गांधींना पत्र लिहिले होते, ते पत्र श्री. रामदास यांच्या पुढ्यात होते. त्या स्थितीत असूनही नथुरामची विचारशक्ती कार्यक्षम होती, तो सुविध होता, हे त्यांच्या

निदर्शनास त्या पत्रावरूनही आले होते. म्हणून, उल्लेखिलेल्या श्लोकाचे विवरण काय, तो कोणी कोणास उद्देशून कोणत्या प्रसंगी म्हटला आहे, हे नथुरामला विस्ताराने किंवहुना त्रोटकपणानेही सांगण्याचे त्यांना काही कारण वाटले नाही.

वर उल्लेखलेले पत्र आणि नथुरामने लिहिलेले उत्तर यांचा आशय कळण्यापूर्वी, तात्त्विक विचार करण्याची शक्ती नथुरामला कशी आली, याची कल्पना येणे समयोचित होईल. गांधीजींचे महत्त्व हिन्दुस्थानच्या राजकारणात त्यांच्या निधनापूर्वीच्या पस्तीस एक वर्षात किती होते, याची बहुतेकांना कल्पना आहे. अशा प्रभावी राजकारणी व्यक्तीच्या मृत्यूला नथुराम कारण झाला होता. त्याच्या पूर्ववृत्ताची चर्चा तेव्हा थोडी फार झाली ती यामुळेच.

मनुष्य संकटात सापडला म्हणजे त्याला तत्त्वज्ञानाचे आकलन होते, अशातला भाग नाही. मनुष्याला निसर्गतःच मिळालेल्या बुद्धीवर परिसराचे संस्कार होतात, त्यामुळे त्याची मानसिक घडण होत जाते. परंपरेने आलेले विचार, रीती आणि राहणी यांचे तर बालपणापासूनच त्याच्यावर सतत ठसे उमटतात. त्या ठशांचा अंशही त्याच्या मनाच्या घडणीत असतो.

बुद्धिचे वाटप समसमान झालेले नसते असे आपण पाहतो. कदाचित निसर्गाने साम्यवादाचा अंगीकार अद्याप केलेला नाही हेही त्याचे कारण असेल. त्यामुळे इतर घटक समान असूनही प्रत्येकाच्या मनाच्या ठेवणीत आणि ग्रहणशक्तीत अंतर असते. 'वितरति गुरुः प्राज्ञे विद्यां' या श्लोकात असमानतेची ही वस्तुस्थिती उदाहरणासहित सांगितलेली वाचकांना ठाऊक असेलच.

कोणाची तात्त्विक विचार करण्याची किंवा विशिष्ट विचारधारणेची शक्ती कशी वाढत गेली, एवढे आपणास त्या व्यक्तीच्या पूर्वचरित्राच्या काही घटकांवरून बघता येणे शक्य आहे. परंतु एखाद्याच्या चित्तवेधक वर्तनांची संगती आपणास त्याच्या पूर्वायुष्यातील घटकांशी लावता येईलच असे नाही. मग ते वर्तन काही शास्त्रीय शोधाचे असो, स्वतःचा जीव संकटात घालून दुसऱ्याला वाचविण्याच्या साहसाचे असो किंवा शस्त्राचाराचे असो. त्याचे कारण, मला वाटते, तशा वर्तनाचा त्या व्यक्तीच्या मनाच्या घडणीच्या आपणास ठाऊक नसलेल्या घटकांशी संबंध असावा.

मनुष्यहत्या ही घटना अतिशय अप्रिय असते. नथुरामलाही ती आधी आणि नंतर अप्रियच वाटली. त्याचे पूर्ववृत्त बघून, तो असले अप्रिय कृत्य करील का, असला तर्क करीत बसण्याचे काही कारण नाही. त्याने ते कृत्य केले होते. ते कृत्य आणि नथुरामच्या पूर्वायुष्यातील ज्ञात घटक यांची संगती कितपत लागते हे वाचकांनी ठरवावे.

मानवी मनाच्या अभ्यासासाठी आणखी एक गोष्ट बघणे उद्‌बोधक होईल. हिन्दुस्थानचे स्वातंत्र्य हे ध्येय डोळ्यांपुढे ठेवून अनेकांनी आपण होऊन मरणाला आवाहन

केलेले आपणास ठाऊक आहे. एक उदाहरण म्हणून, एरवी सामान्य वाटणाऱ्या बाबू गेनूने ज्या पद्धतीने मरण पत्करले, त्या पद्धतीतील त्याची निश्चलता पाहून इतक्या वर्षांनंतरही अंग थरारून जाते. ज्या इंग्रज सैनिकाने बाबू गेनूवरून गाडी घातली तो खाली उतरला आणि मृताला वंदन म्हणून, त्याने दाखविलेल्या निश्चलतेचा सन्मान म्हणून, आपली टोपी उतरवून अभिवादन केले, असे मी पुष्कळ वर्षांपूर्वी वाचल्याचे मला स्मरते. तो गोरा सैनिक प्रत्यक्ष मृत्यूच होता; पण तोही ते लोकविलक्षण धैर्य बघून शहारला असला पाहिजे.

तू मला भीतोस की मी तुला भीतो, या आव्हान-प्रतिआव्हानाच्या संघर्षात अनेक दिवस मृत्यूशी एकटक बघत बघत शेवटी मृत्यूला हरवून मृत्युंजय झालेले क्रांतिवीरही आपण बघितले आहेत. काळकोठडीत ते कसे राहिले असतील, त्यांची दिनचर्या कशी असेल, त्यांची स्थिरता कशी टिकली असेल त्याचे कुतूहल आपणास वाटणे स्वाभाविक आहे. मला तरी वाटते, नथुरामच्या उदाहरणावरून आपल्याला त्या क्रांतिवीरांच्या मनाची कल्पना येऊ शकेल. ही तुलना मात्र त्या मर्यादेपुरतीच लक्षात घेण्याची आहे. नथुरामची घटना स्वातंत्र्यानंतरची होती, त्यामुळे 'स्वातंत्र्यप्राप्तीसाठी' या कक्षेत त्याची घटना येऊ शकत नाही, हे वाचकांनी ध्यानात ठेवावे. मानवी मनाच्या अभ्यासासाठी जो घटक बघण्याचा आहे तो हा की, अशा अवस्थेत मनुष्य स्थिरचित्त कसा राहू शकतो ? त्याच्या पूर्वायुष्याशी त्याच्या स्थिरतेचा काही संबंध असतो काय ? ही स्थिरता नंतर उद्भवते की आधी ? निष्कर्ष वाचकांनीच काढण्याचे आहेत.

नथुराम अविचलित होता या वस्तुस्थितीच्या संपुष्टीला आजवरच्या लेखात दिलेल्या अधिकृत प्रमाणाव्यतिरिक्त आणखी प्रमाणे लागतील असे मला वाटत नाही. चार-दोन क्षण नव्हे, तर क्षणाक्षणांनी बनणारे तास, तासातासांनी बनणारे दिवस आणि दिवसादिवसांनी बनणारे महिने कोणी मनुष्य मृत्यूच्या मिठीत राहून मनाने स्थिर राहू शकेल काय, असा तर्क करणेही अनावश्यक आहे. लोक तसे राहिलेले आहेत हा आपल्यापुढे न्यास (data) आहे. गांधीहत्येपासून नथुरामच्या फाशीपर्यंत साडेएकवीस महिने म्हणजे सहाशे पंचावन्न दिवस उलटले. फाशीची शिक्षा सुनावल्यापासून हा काल मोजला तरीही ते दोनशे सत्याहत्तर दिवस होते. या सर्व दिवसांत नथुरामचे आन्हिकादी सर्व व्यवहार व्यवस्थित चालू होते. खाण्या-पिण्यात विरक्ती किंवा उदासीनता आली नव्हती. निद्रानाश झालेला नव्हता. खाण्यापिण्यातील अपरिहार्य नियमितपणा हे आणखी एक कारण असेल. त्याला कधी ताप, खोकला, पडसे, डोके दुखणे असे किरकोळ विकारही त्या दिवसांत कधी झाले नव्हते.

एरवी कधी कधी डोके दुखणे हा नथुरामला विकार होता. ते दुखू लागले की, कोणतेही काम त्याला करता येत नसे. संध्याकाळपर्यंत पडून राहावे लागे. एका विधेयापुरता न्यायालयात या त्याच्या विकाराचा खल झाला होता.

बडगेची साक्ष अशी होती की, दिनांक २० जानेवारीला नथुरामचे डोके दुखत होते. तो (नथुराम) बिर्ला भवनात त्याच्या (बडगेच्या) बरोबरच्या लोकांबरोबर गेला नव्हता, हेही त्याने सांगितले होते. आपटे यांचा बचाव असा होता की, दि. २० ला बिर्लाभवनावर जाण्यात, गांधीजींसमोर काही लोक बरोबर घेऊन जाऊन निदर्शन करावे, एवढाच त्याचा हेतू होता.

नथुरामने उच्च न्यायालयात असा युक्तिवाद मांडला होता की, बडगेच्या म्हणण्याप्रमाणे माझे डोके दुखत होते. त्याच्या म्हणण्याप्रमाणे मी त्याच्याबरोबर किंवा आपटे यांच्याबरोबरही त्या दिवशी बिर्ला भवनाकडे निघालो नव्हतो. तेव्हा मी तेथे त्या दिवशी गेलो नव्हतो, हे न्यायमूर्तींनी गृहीत धरावे.

डोके दुखत असेल हे न्यायमूर्ती अमान्य करीत नाहीत; पण त्याच्या या युक्तिवादासंबंधी आपल्या निर्णयपत्रात ते म्हणाले आहेत, 'पाच आठवड्यांवर आमच्यापुढे ही आवेदने चालली, तेवढ्या वेळात आणि विशेषतः जे आठ-नऊ दिवस नथुराम स्वतः आपले आवेदन चालवीत होता, त्या वेळात आम्ही त्याला फार फार बघितले आहे. अशा क्षमतेचा मनुष्य असला (मागे राहण्याचा) विचारही मनात बागवील, अशी मला कल्पना करता येत नाही.'

'We have seen quite enough of Nathuram during the period of more than five weeks, we were hearing these appeals and particularly during the eight or nine days while he was arguing his own case, and I cannot imagine that a man of his caliber could have entertained the idea (of reamaining behind)' (Cyclostyled judgement, page 439)

नथुरामची प्रकृती आणि चित्तवृत्ती इतकी चांगली दिसत होती की, घटनेपूर्वी त्याला डोकेदुखीसारखा एखादा तीव्र विकार असेल आणि तो काम करण्यास असमर्थ होत असेल, असा विश्वास न्यायमूर्तींना वाटला नाही.

नथुरामचे लेखन आणि वाचन शेवटपर्यंत चालू होते. फाशीच्या आदल्या दिवशी त्याने श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्यासाठी एक मोठे पत्र लिहून पुरे केले होते. आणखीही काही पत्रे त्याने त्याच दिवशी लिहिली होती. फाशीच्या दिवशीही अधिकाऱ्यांच्या अनुज्ञेने कोणी कोणी त्याची स्वाक्षरी आपल्या दैनंदिनीत घेतली होती.

नाना आपटे यांनी तर प्रशासन (Administration) या विषयावर फाशीच्या छायेत राहूनच एक प्रबंध लिहिला आहे. सध्या तो शासनाच्या स्वाधीन आहे.

काळ तोच असतो. कालगणनेतील विकला किंवा सेकंद या परिमाणांची लांबी घटतही नाही किंवा वाढतही नाही. दिवस मोठा किंवा लहान आहे हे आपण पृथ्वीच्या स्वतःभोवतीच्या परिक्रमेला अनुलक्षून नव्हे, तर पूर्ण दिवसाच्या उजळ भागाला अनुलक्षून म्हणतो. एरवी

काळ मोठा किंवा लहान या संज्ञा तौलनिक असतात. त्या संज्ञांवर आपल्या मनाची त्या त्या वेळची भावना आरोपित असते.

सापेक्षवाद किंवा Theory of Relativity च्या तत्त्वाचा पाया लक्षात आणून देण्यासाठी आईनस्टाईनने एक गमतीचे उदाहरण दिले होते. मनाच्या आकुल स्थितीत प्रेयसीची किंवा प्रियकराची वाट पाहताना पाच मिनिटे आपणास दोन तासांसारखी वाटतात. याउलट, प्रिय व्यक्तीच्या सहवासात आपणास दोन तास पाच मिनिटांसारखे वाटतात. या ठिकाणी मनाच्या विशिष्ट अवस्थेमुळे सापेक्षता निर्माण होते.

रखरखीत प्रदेशातील उन्हातान्हात काही काळ काढावा लागणे आणि आल्हाददायक वातावरणात, त्यात पुन्हा वातानुकूल प्रासादात तेवढाच काळ काढावा लागणे यात एक वास्तव्य दुःसह होऊन जाते म्हणून तो काळ दीर्घ वाटतो, तर दुसरे वास्तव्य सुखद असते म्हणून तो काळ लवकर संपला, असे आपणास वाटते. काळ तेवढाच असतो.

युद्धाचे वातावरण आहे; पण प्रत्यक्ष युद्ध नाही, असा काळ युद्धाच्या प्रत्यक्ष धुमश्चक्रीच्या काळापेक्षा फार कठीण जातो, असा सैनिकांचा अनुभव असतो.

फाशीची क्रिया ही फाशीच्या शिक्षेतील भयानकता नव्हे. फाशीच्या शिक्षेचा मृत्यू त्या व्यक्तीसाठी यातनाविरहित असतो. भयानकता असते फाशीची प्रतीक्षा करीत क्षणामागून क्षण एकलकोंडीत काढण्यात.

इतर बंदीही त्याच भिंतीआड असतात; परंतु ते आपल्या 'कळपात' असतात. फाशीच्या बंद्याला कळप असेल तर त्याचे मन आणि तो एवढाच. दिवसाचा बहुतेक भाग त्याला या मर्यादित ठेवले जाते.

वास्तविक, फाशीची शिक्षा ही बंदिवासाची शिक्षा नव्हे. पण ते तांत्रिक अर्थाने, विधीच्या अपरिहार्यतेमुळे बंदिवास फाशीवाल्याच्या वाट्याला येतोच. तो कोणत्याही दुसऱ्या बंदिवासापेक्षा खडतर असतो.

प्रातर्विधीसाठी दहा ते पंधरा मिनिटे फाशी-कोठीतील बंद्याला बाहेर काढतात. त्याला केव्हाही बाहेर काढण्याचे झाले, तर एक नियम असतो. आपल्या कोठडीच्या गजाच्या एका पोकळीतून त्याने हात बाहेर काढायचे. पहारेकऱ्याने त्याला हातकडी अडकावायची आणि मग दार खोलायचे. बद्ध हातांनीच त्याने हातपाय धुण्याच्या क्रिया करायच्या. त्याला बंद करताना तो बंद झाल्यावर दार लावून घ्यायचे आणि मग त्याने गजातून हात बाहेर देऊन आपली हातकडी सोडवून घ्यायची.

साधारणपणे साडेदहाला जेवण असते. त्यापूर्वी अर्धा तास किंवा अधिकाऱ्यांच्या सौजन्याने एक तासापर्यंत त्याला कोठडीच्या बाहेरील अंगणात फिरू द्यायचे. संध्याकाळीही असेच हातपाय धुण्यासाठी पंधरा मिनिटे आणि जेवणापूर्वी थोडे फिरण्यासाठी त्याला बाहेर काढले जाते.

कोठडीत त्याची चटई, कांबळे, चादर एवढा संसार असतो. थंडीच्या दिवसांत आवश्यकतेप्रमाणे कांबळी दोन किंवा तीन देतात. रात्री शौचासाठी किंवा लघवीसाठी त्या वेळी मातीची कुंडी आत ठेवीत. कधी कधी नुसता मातीचा ढिगारा एका कोपऱ्यात ठेवीत. त्याला पाणी लागले, तर ते पहारेकऱ्याने बाहेरून त्याच्या हातावर ओतापचे.

दिवा असे तो पहारेकऱ्याला कोठडी आणि आतील मनुष्य नीट दिसण्यासाठी.

प्रत्येक तीन तासांनी पहारा बदलतो. रात्री फाशीचा बंदी झोपलेला असेल, तर तो जिवंत आहे हे लक्षात यावे म्हणून पहारा बदलताना नवा पहारेकरी फाशीच्या बंद्याला हाक मारतो आणि त्याची झोप चाळवली, त्याने ओ दिली, म्हणजे 'काही नाही, झोप, सहज बघितले' या शब्दांत त्याला थोपटण्याचा प्रयत्न करतो. हा काय त्रास आहे, असे त्या बंद्याला वाटू लागते. तो दोन-चार दिवसांतच त्याला तो नियम असल्याचे कळून येते. या जाचातून त्याची सुटका तो फाशी गेल्यावर आपोआप होते किंवा फाशीकोठडीतून उन्मुक्त (discharge) झाल्यावर होते.

सकाळी आणि संध्याकाळी आणि जेव्हा अधिकाऱ्यांच्या मनात येईल त्यावेळी फाशीवाल्याची आणि त्याच्या खोलीची झडती होते. गज कोठे कापलेले नाहीत ना, हे बघण्यासाठी गजावरून दंडा फिरवून आणि हलवून बघून परीक्षा होते. फाशीवाल्याला तशा प्रकारची कोणतीच संधी मिळू नये म्हणून त्याची खोली प्रत्येक दिवशी बदलली जाते.

फाशीवाल्याच्या जेवणातील प्रत्येक पदार्थ तेथील अधिकाऱ्याने आणि पहारेकऱ्याने आधी खाऊन बघण्याचा असतो. मग ते जेवण बंद्याला दिले जाते.

नथुराम आणि नाना आपटे यांना या कोणत्याच नियमांतून मुक्तता नव्हती. त्यांना सुविधा होती ती दिव्याची आणि लेखन-वाचनाच्या साहित्याची. त्यांच्या कोठडीच्या दारालगत बाहेर एक पटल म्हणजे टेबल असे, त्यावर त्यांचे लेखन-वाचनाचे साहित्य असे. एक वेगळा दिवा त्यांच्यासाठी दिला जाई.

पूर्वीच्या एका लेखात म्हटल्याप्रमाणे, सरदार वल्लभभाई पटेल यांच्या सौजन्याने त्यांना 'ब' वर्ग दिला होता. नथुराम आणि नाना आळीपाळीने जेव्हा बाहेर येत, तेव्हा कधी ते पटलावर बुद्धिबळाचा डाव मांडीत आणि एकजण गजातून आणि एकजण बाहेरून खेळत असत. वेळ घालविण्यासाठी कधी कधी ते पत्तेही मांडून बसत. आम्हीही कधी कधी त्यांच्याशी बुद्धिबळ खेळत असू. फाशीतील त्या बंद्यांना तेव्हा मिळालेल्या त्या अल्पशा सुविधेने आजही कृतज्ञता वाटते.

घरबसल्या बंदीजीवनाची कल्पना करणे अवघड आहे. फाशी कोठडीतील जीवनाची कल्पना करणे त्यापेक्षाही अवघड आहे. स्वातंत्र्याच्या आंदोलनात बंदिवास भोगलेले थोडे फार लोक अद्यापही जीवमान आहेत. त्यांना बंदीजीवन म्हणजे काय याची कल्पना आहेच. काळ-कोठडीतील जीवनाची ते अधिक जवळून कल्पना करू शकतील.

इतक्या जाचातही फाशीचा मनुष्य राहतो. आज फाशी सुनावली की उद्या ती उरकून टाकायची, अशी पद्धत नसते. वरिष्ठ न्यायालयातून अभियोगाचा आणि फाशीच्या शिक्षेचा विचार होण्याचा असतो. त्यातून आपली फाशी कदाचित दुसऱ्या शिक्षेत परिवर्तित होईल, कदाचित आपण सुटूनही जाऊ, अशी त्याला आशा असते. त्या आशेने तो सर्व जाच सहन करीत असतो.

नथुरामने तसली कोणतीच आशा ठेवली नव्हती. ज्या दोष-सिद्धीविरुद्ध आणि शिक्षेविरुद्ध दंडितांचे गाऱ्हाणे नाही, त्या दोष-सिद्धीचा आणि शिक्षेचा पुनर्विचार करण्याचे वरिष्ठ न्यायालयांना काही कारण नसते. नथुरामने आपल्या फाशीच्या शिक्षेविरुद्ध पुनः न्याय मागितला नव्हता. उच्च न्यायालयानेही तशी नोंद आपल्या निर्णयपत्रात केली आहे. (चक्रीटंकित निर्णयपत्र, पृष्ठ २०४) त्याने दयेसाठी आवेदन केले नव्हते. तेव्हा फाशीतून सुटका होण्याच्या आशेने सर्व जाच सहन करत राहण्याचा त्याच्या संबंधात तरी प्रश्न नव्हता. फाशी निश्चित जाण्याचे आहे हे ठाऊक असूनही तो काळ-कोठडीतील दिवस अतिशय धीराने काढीत होता.

नाना आपटे यांच्या वर्तनाचा एक प्रसंग माझ्या मनावर कोरला गेला आहे.

नाना सिगारेट ओढीत असत. फाशी कोठडीत मी गेलो की नाना म्हणत, 'गोपाळ, सिगारेट ?'

मी ओढीत नसे हे त्यांना ठाऊक असे; पण मी त्यांच्याबरोबर सिगारेट ओढावी, अशी त्यांची इच्छा असे. कदाचित त्या वस्तूचा उपभोग कोणा सहकाऱ्याच्या सहवासात अधिक आनंदाने घेता येतो, अशी भावना असेल; पण मी सिगारेट घेत नसे.

केन्द्र शासनाकडून अद्याप फाशीच्या दिवसाची आज्ञा आली नव्हती. नानांना फाशी होणार नाही, अशी आशा होती. अशा दिवसांत मी एकदा नानांकडे गेलो. ते सिगारेट ओढीत होते. नेहमीप्रमाणे म्हणाले, ''गोपाळ सिगारेट घे. पंडित (नथुराम) 'म्याडोबा' आहे. तो ओढणार नाही.''

मी त्यांना म्हटले, 'नाना, तुम्ही मला म्हणता खरे; पण माझ्या कल्पनेप्रमाणे, सिगारेट ही काही जीवनावश्यक वस्तू नाही. ती चैन किंवा हौस आपण काही सुखाच्या प्रसंगी करतो. तुम्हाला फाशी होत नाही हे ठरू दे आणि मी तुमच्याबरोबर अवश्य सिगारेट ओढीन.'

'किती वेडा रे तू, गोपाळ !' नाना मला हसले, 'अरे जीवनावश्यक वस्तू आम्हाला दिल्या गेल्या आहेत तेवढ्याच ! राहायला निवारा, दोन वेळचे जेवण आणि अंथरुण-पांघरुण. प्रत्येकाच्या घरात तेवढ्याच वस्तू असतात का ?'

'पण इतर सर्वच वस्तू अनावश्यक या व्याख्येत येत नाहीत.' मी नानांच्या म्हणण्याला

विरोध केला.

नाना म्हणाले, 'अनावश्यक वस्तू आपणास केव्हा आवश्यक वाटू लागतात हे आपणास कळत नाही. सवयीने त्यातील 'अनावश्यकता' नाहीशी होते. लहान मुलाला आपण खेळणे देतो. का ? तर त्याने हसावे, असे आपणास वाटते म्हणून. काटेकोर अर्थाने खेळणे ही काही जीवनावश्यक वस्तू नव्हे. मनुष्याला अवांतर वस्तू लागतात त्या हसण्यासाठी, मन उल्हसित राहण्यासाठी. त्या मिळविण्यासाठी त्याची धडपड चालते. जेव्हा शक्य असेल तेव्हा सर्व गोष्टींचा उपभोग घ्यावा. आपल्याला ऐहिक सुख कशात मिळते हे ज्याचे त्याने ठरवावे.'

'ही काहीशी भोगवृत्ती नाही का ?' मी नानांना म्हटले.

'मी तुला जीवनाचे उद्दिष्ट नाही सांगितले. जीवन कशासाठी जगायचे हे पुन्हा वेगळेच आहे. आपल्याला मिळणारे सुखही न उपभोगण्यासाठी काही कारणे असतात. समाजाचे आपल्यावर ऋण असते. जसे संस्कार घडतील त्या प्रमाणात मनुष्याला त्याची जाणीव असते. काही प्रसंग असे येतात की, ही जाणीव अतिशय तीव्र व्हावी. अशा वेळी मनुष्य काही प्रमाणात आपल्या अवांतर गोष्टीत काटछाट करतो. जीवन यासाठीही जगायचे असते. सर्वसाधारणपणे त्याला आपण त्याग म्हणतो. कोणी कोण्या संस्थेला पाच रुपये, पाच सहस्र रुपये किंवा पाच लाख रुपये जरी दिले तरी तो दाता आपल्या जीवनावश्यक गोष्टींना धक्का लावीत नाही. अपवाद वेगळे.

'त्यापुढची पायरी. जीवनावश्यक वस्तूच नव्हे, तर प्रत्यक्ष जीवन हेही अवांतर समजून, समाजाच्या ऋणांची परतफेड म्हणून प्रसंगी त्याचाच त्याग करण्याची सिद्धता असली की, तुम्हाला प्राप्त असलेले ऐहिक सुख तुम्ही उपभोगलेत, तर त्यात तुम्ही समाजाचे ऋण विसरलात, असा अर्थ होत नाही. ती जाणीव न ठेवता तुम्ही उपभोग घेत राहिलात तर ती भोगवृत्ती. 'सैन्य पोटावर चालते' हे ठाऊक आहे ना तुला ? पण सैन्याच्या जीविताचे उद्दिष्ट पोट पाळणे हे नसते. ते आणखी काही तरी असते.'

'मला फाशी होणे न होणे नियतीच्या मर्यादेतील गोष्ट आहे. त्यावर तू काही अवलंबून ठेवू नकोस. तुला ज्यात रस वाटत नाही ती गोष्ट तुला करावयास लावण्याची माझी इच्छा नाही; पण तू जीवनावश्यक गोष्टींचे तत्त्वज्ञान मला सांगायला लागलास म्हणून तुला आपले थोडे पाजले !'

आणखी काही गोष्टी होऊन मी परत आलो होतो. मी सिगारेट घेतली नव्हती.

चार दिवसांनी मी पुन्हा नानांना भेटलो. आदल्या दिवशीच त्यांची फाशी निश्चित झाल्याचे आणि दिवस ठरल्याचे कळले होते. नथुरामची फाशी निश्चित होणार हे विधिलिखित जवळजवळ वाचता येण्याइतके स्पष्ट थोडे आधीपासून दिसत होते. नथुरामला प्रथम न भेटता

मी नानांकडे गेलो होतो. त्यांना फाशी दिले जाऊ नये, असे मला मनातून वाटत होते. निर्णय तर प्रतिकूल आला होता. माझ्या मनावर खिन्नता आली होती आणि तोंडावरही तीच छटा होती.

नानांनी वाचनातून दृष्टी वर केली, 'हं काय रेऽ !' म्हणून त्यांनी हसतमुखानेच माझे स्वागत केले. त्यांचे स्मित बघून माझ्या उदासवाणेपणाला मी लाजलो, वरमलो, खिन्नता बळपूर्वक हटवून मी पुढे गेलो. गजापाशी उभा राहिलो. 'नाना, या कोठडीतून तुम्ही बाहेर यावे ही इच्छा होती. चारच दिवसांपूर्वी सुखाच्या कल्पनांवर तुम्ही मला प्रवचन दिले होतेत. माझ्या कल्पनेतला सुखाचा उत्सव मला प्राप्त झालेला नाही; पण आपल्या हाती नसलेल्या गोष्टीवर मी माझ्या सुखाची कल्पना आधारलेली होती.'

मी पुढे म्हणालो, 'मला सिगारेट द्या. आज तरी मी तुमच्या सहवासात आहे. तेवढा आनंद मानून घेणे आणि उपभोगणे आपल्या हातात आहे.'

'आता तू खरा शोभतोस.' (Now you are a man) नाना प्रसन्न मुद्रेने म्हणाले. त्यांनी डबा उघडला, मला सिगारेट दिली, स्वतः घेतली.

धुराची वलये सोडता सोडताच त्यांच्या मनाला गती आली. मला ते म्हणाले, 'गोपाळ, अत्युच्च आनंद कोणता तुला ठाऊक आहे ?'

मी प्रश्नार्थक मुद्रेने त्यांच्याकडे बघितले.

ते म्हणाले, 'पिंडी ते ब्रह्मांडी याचा अर्थ 'ब्रह्मांडी ते पिंडी' असा आहे. आपले मन, आपली विचार करण्याची शक्ती, हे त्या ब्रह्मांडातील अज्ञात आणि अदृश्य शक्तीचेच अंश आहेत. आनंद असतो तो ज्ञात शोधण्यात नव्हे, तर अज्ञात शोधण्यात. अंतर्मनाने त्या अज्ञात शक्तीशी-त्या निपतीशी एकरूपता आणण्याचा प्रयत्न करणे आणि त्याशी तादात्म्य पावणे, एकरूपता आणणे, हा अत्युच्च आनंद. त्यापलीकडे आनंद नाही. त्याखालचा कोणताही आनंद बाह्य वस्तूवर अवलंबून. ती वस्तू नाहीशी झाली की आनंद नाहीसा होणार. ब्रह्मांड नियंत्रित करणारी शक्ती अविनाशी आहे. त्या शक्तीशी एकरूप होण्यातील आनंद त्याच कारणामुळे अविनाशी असतो, चिर असतो.

'आता परावलंबी आनंदाचेही बघ. मी उद्याला मरणार आहे म्हणून आजपासूनच रडत बसण्यात मी आजच्या उपभोग्य वस्तूपासून मिळणारा आनंदही घालवून बसतो ! आपला आनंद टिकविण्याचा असेल, तर मरणाच्या आदल्या क्षणापर्यंत मरणाचे दुःख न करण्यानेच तो मिळेल आणि प्रत्यक्ष मरणाच्या क्षणी तुम्ही तुमचे राहत नाही. आनंद किंवा दुःख करण्याच्या पलीकडे तुमचे अवयव पोहोचलेले असतात !'

आम्ही अभियुक्त लाल किल्ल्यातील बंदिगृहात न्यायाधीन असताना नथुराम, नाना आणि सावरकर यांच्यात कधीकधी पातंजल योगसूत्रावर चर्चा होत असे. वेळ मिळाल्यामुळे

नानांनी ती सूत्रे मुखोद्‌गत केली होती. ज्ञानेश्वरी, गीतारहस्य, तुकारामगाथा हे ग्रंथही ते वाचत असत. नथुरामचा तौलनिक अभ्यास असे. अमुक तात्त्विक विषयासंबंधी कोणत्या भाष्यकाराने काय म्हटले आहे हे तो लगेच सांगत असे. नाना आणि नथुराम यांच्यातही केव्हा केव्हा काही चर्चा होई, त्या वेळी नाना मला त्या ग्रंथातील सार साकल्याने सोप्या भाषेत सांगत. त्यांना चांगलीच गती आली होती. माझी उदासीनता त्यांनी माझ्या नकळत नाहीशी केली होती.

नाना पुढे बोलत होते. त्यांच्या शब्दांना भावनेचा स्पर्श होता. ते म्हणाले, 'घरादाराचे पाश तोडून टाकून जिवाला जीव देण्यासाठी तुझ्यासारखे मित्र आज माझ्या सान्निध्यात आहेत. ज्ञात जगापुरते बोलायचे तर मरणाच्या दारापर्यंत हातात हात घालून जाण्याइतकी नथुरामची आणि माझी दृढ आणि चिरमित्रता नियतीने घडवून आणली आहे. नियतीच्या शक्तीशी एकरूप होण्याच्या प्रयत्नात तुम्ही असल्यावर या गोष्टीचे दुःख का करायचे, गोपाळ ?'

मी नानांना विचारले, 'नाना, तुम्ही पुष्कळ वेळ ध्यानस्थ बसता. तुम्हाला सिद्धी मिळाली आहे ?'

नाना म्हणाले, 'सिद्धी म्हणजे मी आणि ती शक्ती वेगळे आहोत हा भाव नाहीसा होणे. सिद्धीच्या प्रयत्नातील सुख मी सध्या अनुभवतो. सिद्धी मिळेल थोड्याच दिवसांत !' नाना अर्थपूर्वक म्हणाले.

आणखी काही गोष्टी झाल्या आणि मग मी नथुरामची भेट घेतली.

अतिशयोक्तीच्या अलंकाराने नाना विलासी आणि नथुराम संन्यासी म्हणून त्यांचे समवयस्क मित्र त्यांना ओळखतात. मी अमुक गोष्ट करतो म्हणजे काही विशेष करतो, असे प्रदर्शन नानांनी कधी केले नाही. मी अलिप्त आहे म्हणजे माझ्यात काही विशेषता आहे, असे स्तोम नथुरामनेही कधी माजविले नाही. मित्रता होण्यास आणि ती टिकण्यास काही समान घटक लागतात. वरील प्रदर्शनपराङ्मुखतेचा घटक अशा समान घटकांपैकी एक होता. आपले वैयक्तिक जीवन कसे जगावे, याचे एकमेकांवर कोणतेही बंधन न लादणे हा आणखी एक समान घटक त्यांच्यात होता.

नानांचे जीवन विलासी असेल, असे गृहीत धरले तरीही ते काळकोठडीत स्थिरचित्त होते किंवा नाही याचा तर्क करण्यासाठी माझा आणि नानांचा त्या दिवसांत झालेला संवाद वाचकांना पुरेल.

माझ्या लिखाणात नथुरामचे किंवा नानांचे उदात्तीकरण कोणास वाटले, तर त्यांच्यासाठी किंवा गांधीजींचे अवमूल्यन वाटले, तर त्यांच्यासाठी थोडी चर्चा येथे करणे मला आवश्यक वाटते. नथुराम काय, नाना आपटे काय किंवा गांधीजी काय, त्यांना

हिन्दुस्थानच्या इतिहासात नियतीने विशिष्ट स्थान दिलेले आहे आणि ते आपापल्या स्थानांवर अढळपणे बसलेले आहेत. पुन्हा चुका होऊ नयेत म्हणून आपण सर्वच दक्ष राहण्याचा प्रयत्न करतो; परंतु झालेल्या गोष्टी बदलणे आपल्या हातची गोष्ट नसते. म्हणून इतिहासातील त्यांच्या स्थानाचे अवमूल्यन किंवा मूल्यवृद्धी करणे कोणाच्याच हातात नाही. इतिहासाचे परीक्षण करणे एवढीच गोष्ट आपल्या हातात असते.

मानचित्र फडफडल्याने वादळे होत नाहीत, असे गडकऱ्यांनी म्हटले आहे. त्याच चालीवर इतिहासाची पाने झाकून टाकल्याने घडलेल्या गोष्टी आणि त्याचे भोगावे लागणारे परिणाम नाहीसे होत नाहीत. हिन्दुस्थानच्या राजकारणातील एका क्रांतिकारक दुर्दैवी घटनेच्या घटकांचा आणि त्यांच्या पूर्वापार संबंधांचा इतिहास आपण समतोलपणे बघत आहोत, ही भावना जागृत ठेवली म्हणजे 'अवमूल्यन' किंवा 'मूल्यवृद्धी' अशांसारख्या भावना मनात येणार नाहीत.

हत्या हे कृत्य विधिविहित नाही, ते निषिद्ध आहे. अवैध कृत्याचा विचार करण्यासाठी आपणच न्यायपीठ उभे केले आहे. ते न्यायपीठ अशा अवैध कृत्याचा कागदोपत्री निषेध करून थांबत नाही. कोण्या परराष्ट्राने कोण्या देशाची आगळीक करावी, त्या देशाने परराष्ट्राला निषेधपत्र धाडीत राहावे, त्या परराष्ट्राने त्या निषेधपत्रांमधील सामर्थ्य ओळखून बसावे आणि त्या निषेधपत्रांना दादच देऊ नये, अशी स्थिती न्यायपीठाची नसते. कारण न्यायपीठामागे आपण शक्ती उभी केलेली असते. अवैध कृत्याचा निषेध न्यायपीठप्रसंगी अपराध्याच्या प्राणाचा निषेध कार्यवाहीत आणून करते.

आता हत्या किंवा आणखी कोणते अवैध कृत्य ही गोष्ट वेगळी आणि त्या अपराध्याचे गुण किंवा भावना ही गोष्ट वेगळी. कोण्या व्यक्तींच्या प्राणाचाच निषेध करताना न्यायासन त्या व्यक्तींच्या गुणांचा किंवा विशिष्ट कृत्यांमागील भावनांचा, त्या भावना निषिद्ध असल्याबाबून, निषेध करण्याचा उपक्रम करीत नाही. कारण त्या भावना 'अपराधी' असतात असे नव्हे; ते गुण अवैध असतात असे नाही. पुष्कळदा त्या व्यक्तींचे गुण किंवा त्यांच्या भावना गौरवास्पद असतात. सहानुभूती वाटण्याजोग्या असतात किंबहुना अनुकरणीय असतात. शासनाधिष्ठित व्यक्तीसुद्धा कधी कधी त्या गुणांचा गौरव करतात. एखादे उदाहरण अस्थानी होणार नाही.

सरदार भगतसिंगांचे एक सहकारी बटुकेश्वर दत्त यांना भगतसिंगांच्या पहिल्या अभियोगात १२-६-१९२९ या दिवशी जन्मठेप झाली. नऊ एक वर्षांनी म्हणजे १९३८ मध्ये ते जन्मठेप भोगून सुटले. दि. २० किंवा २१ जुलै १९६५ या दिवशी त्यांचे निधन झाले.

अनेकांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली. त्यात राज्यासनावर असलेले पुष्कळजण होते.

राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन यांनीही त्यांना फूल वाहिले. राष्ट्रपतींनी गौरव कशाचा केला ? दत्त ज्या कृत्यात सहभागी होते त्या कृत्याचा ? तशी कल्पना करणे राष्ट्रपतींवर हेतू चिकटविण्यासारखे होईल. त्यांनी गौरव केला तो दत्त यांच्या देशप्रीती या गुणाचा. कारण ती कल्पना 'अपराधी' नव्हती, निषिद्ध नव्हती. ती गौरवास्पद होती, वंदनीय होती, अनुकरणीय होती.

गुण असतील तर त्यांना गुण म्हणून मानणे याची उदाहरणे ब्रिटिशांच्या राजवटीतही झालेली आपणास कोठे कोठे आढळतात. एक-दोन उदाहरणे आपणास इतिहासावरून पडताळून पाहता येतील.

मदनलाल धिंग्रा यांचा अभियोग जुलै १९०९ मध्ये लंडनमध्ये चालू होता. त्यांचे वर्तन धीरोदात्त होते. त्या वर्तनाने काही इंग्रज भारावले. त्यांनी कोणतीही भीती न बाळगता, मदनलाल यास फाशी देऊ नये म्हणून खटपट केल्याचे आपण त्या वेळच्या इतिहासात वाचतो. ही जी सहानुभूती वाटली त्याचा अर्थ हत्या या कृत्याचा त्यांनी पुरस्कार केला, असा लावला गेला नाही.

अनंत कान्हेरे यांचा अभियोग फेब्रुवारी-मार्च १९१० मध्ये मुंबई न्यायालयात चालला. तीन न्यायमूर्तींत श्री. स्कॉट आणि हीटन हे इंग्रज होते. बॅरिस्टर जयकर अभियोग ऐकण्यास न्यायालयात बसत असत. त्या दिवसातच एकदा त्या दोन इंग्रज न्यायाधीशांपैकी एकाची जयकर यांच्याशी गाठ पडली. अगदी अनपेक्षितपणे ते जयकरांना म्हणाले, 'कान्हेरेविषयी आपणास काय वाटते ? आपण प्रत्यही न्यायालयात बसता. अशा कोवळ्या सुरेख धैर्यमूर्तीला मला वधस्तंभावर चढवावे लागत आहे ! काय दुर्दैव आहे !'

(What a pity that I have to send a handsome and courageous youth to gallows !) (The Story of My Life : M. R. Jaykar, Page 117-118)

न्यायमूर्तींच्या या उद्‌गारात कान्हेरे यांच्या धैर्य या गुणाचा गौरव होता. हत्या या कृत्याचे अनुमोदन नव्हते.

वरील विवेचनाव्यतिरिक्त न्यायालयाचा एक अभिप्राय वाचकांच्या लक्षात असलेला बरा. त्यामुळे उदात्तीकरणासारख्या शंकांचे परस्पर निरसन होईल.

दि. १५-११-१९४९ या दिवशी नथुराम आणि आपटे यांना अंबाला कारागृहात फाशी दिले. त्या दिवशी पुण्याच्या 'केसरी' या द्विसाप्ताहिकाने 'देहान्त शासनाचे राष्ट्रीय बळी' हा अग्रलेख लिहिला. दि. २९-१२-१९४९ ला मुंबई राज्याने एक आदेश काढला. त्या आदेशाने 'केसरी'कडून ३००० रुपयांची प्रतिभूती म्हणजे Security मागितली गेली. शासनाचे म्हणणे असे की, 'केसरी'ने इंडियन प्रेस ॲक्ट (१९३१) या विधीची मर्यादा

ओलांडली. कारण शासनाच्या म्हणण्याप्रमाणे गांधीहत्येतील दंडितांची त्याने स्तुती केली होती.

'केसरी'चे तेव्हाचे संपादक श्री. ग. वि. केतकर यांनी मुंबईच्या उच्च न्यायालयात पुनरावेदन केले. ते आवेदन Criminal Application No. 116 of 1950 या क्रमांकाने नोंदले गेले. न्यायासनावर श्री. छगला, श्री. बावडेकर आणि श्री. शहा होते. दि. १३-४-१९५० या दिवशी निर्णय सांगण्यात आला. तो न्यायमूर्ती श्री. छगला यांनी लेखापित (Dictate) केला. इतर न्यायमूर्तींनी त्याचे अनुमोदन केले.

'केसरी'ने विधीचा भंग केला नाही, असे न्यायमूर्तींनी सांगितले. त्यांच्या म्हणण्याचे तात्पर्य असे की, हत्या या घटनेचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष अनुमोदन होत असेल किंवा हत्येसाठी हत्या करणाराची स्तुती केली असेल, तर लिखाण आक्षेपार्ह ठरेल. एका टोकाचे एक उदाहरण म्हणून त्यांनी असे दिले की, समजा कोणा चित्रकारावर हत्येचा आरोप आला. त्याला फाशीची शिक्षा झाली. तो फाशी गेला आणि मग कोणा वृत्तपत्राने त्या दंडिताच्या कुंचलीच्या कलेचे कौतुक केले, तर ते वृत्तपत्र त्या दंडिताच्या हत्या या कृत्याचा गौरव करीत आहे, असा अर्थ काढणे असंगत (Absurd) होईल. न्यायमूर्तींनी शासनाच्या आदेशाचे उत्सादन केले. (set aside)

कोणताही अपराध केला नसताना किंवा करण्याचा हेतू नसताना माझ्या वाट्याला बंदिवास यावा, या गोष्टीला मी फार भीतो. त्यामुळे वरील विवेचन करणे मला आवश्यक वाटले. जेथे निष्ठा ठेवावी असा हिन्दुस्थानवाचून मला दुसरा देश नाही. दुर्दैव असे की, आडमाप जन्मठेप भोगून आल्यावरही चाळीस दिवसांनी मला अटक केली गेली ती भारत संरक्षण विधीच्या आधाराने. २४-११-१९६४ पासून ३०-११-१९६५ पर्यंत मला बंदिवास भोगावा लागला. स्थानबद्धतेत असताना मी संबंधित अधिकाऱ्यांना लिहिले होते की, देशाच्या संरक्षणात सुकरता यावी म्हणून आपणाला मला स्थानबद्ध ठेवावेसे वाटते ना ! देश माझा आहे, त्याच्या संरक्षणासाठी कोणत्याही यातना भोगण्याच्या असतील, तर त्या भोगणे माझे कर्तव्य आहे. आपले समाधान होईपर्यंत आपण मला कोंडून ठेवा; पण माझा दोष काय हे मला कळू द्या.

जन्मठेप भोगीत असताना ज्याप्रमाणे पुष्कळदा प्रतिदान न घेता मी रक्त दिले होते त्याप्रमाणे स्थानबद्धतेत असतानाही पाकिस्तानशी संघर्ष उभा राहिल्यानंतर मी रक्तदान केले होते. प्रतिदान देऊ केले असतानाही मी ते घेतले नाही. देशनिष्ठेपोटी काही केले म्हणून त्याचे प्रतिदान घ्यावे ही भावना कधीच नव्हती; परंतु कोणीतरी कांगावा करावा. त्या कांगाव्यामागील हेतू काय हे लक्षात घेतले जाऊ नये आणि अपराध काय झाला हे सांगितले न जाताच बळाने बंदिवास लादला जावा यायोगे मनस्वी यातना होतात. फाशी कोठीचा

अनुभव मला मिळाला नव्हता. म्हणूनच की काय, माझ्या स्थानबद्धतेचे कार्यवहन करण्यासाठी येरवडा बंदिगृहात माझ्यासाठी एक फाशी-कोठीच्या ओळीतील आणि आवारातील कोठी निवडली गेली होती. The order is to be executed त्याऐवजी The prisoner is to be executed... असा समज तेथल्या अधिकाऱ्यांचा झाला असल्यास न कळे ! पाच दिवसांनी औरंगाबादला हलविले. तेथील बंदिगृहातही एकलकोंडीपेक्षाही कठीण परिसरात मला ठेवले गेले होते. कांगाऱ्यातून उत्पन्न होणाऱ्या असल्या यातनांची मला भीती वाटते. नाहीतर वरील विवेचनाचे कारण पडले नसते.

दंडितांच्या गुणांच्या गौरवांची वर दिलेली उदाहरणे अप्रत्यक्ष स्वरूपाची आहेत. नथुरामच्या संबंधात पंजाब (सिमला) येथील न्यायमूर्तींनी आपल्या निर्णयपत्रातच त्याच्याविषयी गौरवोद्‌गार काढलेले आपणास आढळतात. त्यातील एक न्यायमूर्ती श्री. खोसला यांनीही पंधरा वर्षांनंतर लिहिलेल्या पुस्तकात, नथुरामचे वक्तृत्व ही काय वस्तू होती, लोकांना हेलावून सोडण्याची त्याच्या भाषेत किती शक्ती होती, याचे चक्षुर्वैसत्यं वृत्त दिले आहे.

न्यायासनावर बसलेल्या त्याच व्यक्तींनी नथुरामच्या अवैध कृत्याचा निषेध त्याला प्राणदंड देऊन केला आणि त्याच व्यक्तींनी नथुरामच्या 'अपराधी' नसलेल्या आणि त्यांच्या निदर्शनास आलेल्या गुणांचे कौतुक केले. न्यायाचा हा समतोलपणा न्यायमूर्तींना भूषणावह तर आहेच; पण आपल्या न्यायपीठाचा आपल्याला अभिमान वाटावा असाही आहे.

नथुरामच्या गुणांचे हे जे प्रकटपणे आणि निर्भयपणे मूल्यमापन झाले त्याला काही भूमिका असेल काय ? नथुरामचे वर्तन त्याला कारणीभूत असेल काय ? सिद्ध संदर्भांसाठी थोडा इतिहास बघितला आणि काही गोष्टी माहीत करून घेतल्या, तर वाचकांना याचे उत्तर मिळू शकेल.

इंग्रजी राजवटीतील क्रांतिकारकांचे अभियोग आपण बघितले, तर आपणास बहुतांशाने असे दिसेल की, अभियुक्तांचा त्या राज्यावरच विश्वास नव्हता, तर त्या राज्यातील तथाकथित न्यायाचा काटा स्थिर ठेवण्यासाठी उघडलेल्या न्यायाच्या विपणीवर (दुकानावर) कुठून असणार ? दोन-तीन उदाहरणे बघायची झाली, तर प्रथम आपण अठराशे सत्तावन्नच्या स्वातंत्र्ययुद्धाच्या घटनांची काही पाने चाळू.

तात्या टोपे यांच्यावर अभियोग चालविला गेला. दि. १० एप्रिल १८५९ ला त्यांनी न्यायालयात सांगितले, 'तुम्ही कोण ? तुम्ही आमचे नव्हेत. तुमचा मी प्रजाजन असणे संभवतच नाही. तुम्हाला आमचे राज्य हिसकावून घेण्याचा अधिकार कोणी दिला ? तुम्ही अन्यायाने बळकावलेले आमचे राज्य आम्ही परत मिळवू बघितले, तर आम्ही अपराधी झालो काय ?

'माझा जन्म तुमच्या राज्यात झालेला नाही. जो माझा राजा नाही त्याशी राजनिष्ठेची शपथ मी कशी घेईन ? मी तुमचा नोकर नाही. सेवक नाही आणि मला बंडखोर म्हणता ?'

'हे राज्य आमचे आहे, हे पेशव्यांचे राज्य आहे. मी एकनिष्ठ आहे तो त्यांच्याशी. त्यांची आज्ञा मला शिरसावंद्य आहे. शिर धडावेगळे झाले तरीही शिरोधार्य आहे. मी सेनानी आहे.'

'दैवाचा फासा उलटा पडला आहे, मी जित आहे; तुम्ही जेते आहात. पण त्यामुळे तुम्ही शूर ठरत नाही, न्यायी ठरत नाही. माझी स्वामिनिष्ठा माझ्या राज्याशी, माझ्या स्वामीशी.'

दि. १८-४-१८५९ या दिवशी तात्या टोपे यांना फाशीची शिक्षा सुनावली गेली आणि त्याच दिवशी ती कार्यवाहीत आणली, हा इतिहास वाचकांना ठाऊक असेलच.

दुसरे उदाहरण. सरदार भगतसिंग आणि त्यांचे सहकारी यांनी जितेन्द्रनाथांच्या आत्मार्पणानंतर अभियोगासाठी न्यायालयात जाण्याचे नाकारले होते. ज्यांच्या राज्याचा पायाच मुळी अन्यायी आहे ते राज्यकर्ते आपल्या न्यायासनाकरवी तो अन्याय मूलतः दूर करण्याची खटपट करणारांना न्याय काय देणार हीच त्यांची भावना होती. राजकारणाच्या आखाड्यात उतरणाऱ्या प्रत्येकाने दंडविधानाकडे आणि न्यायासनाकडे दुर्लक्षच केले पाहिजे, असे भगतसिंग यांचे उद्‌गार होते. ऑक्टोबर १९३० मध्ये त्यांना शिक्षा झाल्या. सुखदेव, भगतसिंग आणि राजगुरू यांना दि. २३-३-१९३१ ला संध्याकाळी लाहोरच्या बंदिगृहात फाशी देण्यात आले.

तिसरे उदाहरण म्हणजे १९१० मधील अभियोगात सावरकरांनी एक वस्तुस्थितीपूर्ण भूमिका घेतली होती. मी तुमचा बंदी नव्हे. मला फ्रान्सच्या भूमीवर इंग्रजांनी केलेली अटक अवैध आहे. या उपर अभियोग चालविण्याचाच असेल, तर त्याशी संबंध ठेवण्याची माझी इच्छा नाही. ब्रिटिश न्यायालये किंवा ब्रिटिशांच्या सत्तेखाली हिन्दुस्थानची न्यायालये यांना माझा अभियोग चालविण्यासाठी अधिकारच नाही, हे त्यांचे प्रतिपादन होते.

दि. २४-१२-१९१० या दिवशी त्यांना जन्मठेप झाली. त्यांची स्थावर मिळकत समपहृत (Confiscate) झाली. त्यांना दुसरी जन्मठेप दि. ३०-१-१९११ या दिवशी झाली.

गांधीहत्या अभियोगाच्या वेळी परिस्थिती वेगळी होती. आता राज्य आपलेच होते. नथुराम किंवा दुसरे आरोपी याच राज्याचे प्रजाजन होते. त्यांचा राज्यकर्त्यांविरुद्ध असा आक्षेप नव्हता की, ज्यामुळे त्यांनी त्यांच्याविरुद्ध शस्त्राचार करावा. राज्याशी ते एकनिष्ठ असल्यामुळे राज्य उलथून पाडण्याचा त्यांचा मानसही नव्हता आणि अभियोजकांनीही तसला कल्पित किंवा खोटा आरोप या अभियुक्तांवर ठेवला नाही.

एकदा राज्याशी एकनिष्ठ म्हटल्यावर, आपल्या राज्यानेच आयोजित केलेल्या न्यायपीठाच्या सर्व न्यायासनांना एकनिष्ठ राहणेच सुसंगत होते. अभियोजक आणि बचाव पक्ष यांनी न्यायासनाला न्यायाच्या कामात साहाय्य करण्याचे असते. आपल्याविरुद्ध जाईल तो निर्णय अन्यायकारक आणि आपल्याला अनुकूल होईल तो निर्णय खरा न्याय, अशी न्यायाची आत्मावलंबी व्याख्या नसते.

वरील धारणेमुळेच नथुरामने न्यायासनाला संपूर्ण सहकार्य दिले होते. ३० जानेवारीच्या घटनेसंबंधीच्या आणखी साक्षी कशाला आणावयास लावता, असे त्याने आपल्या वकिलांना सुचविले होते. घटनेच्या बारकाव्यातील विसंगती सोडून दिली तरी मुख्य घटना संशयातीत सिद्ध करण्याचे काही कारण नव्हते. गांधीजींचे हात ज्या मुलींच्या खांद्यावर होते, त्यांच्याही साक्षी अभियोजक घेणार होते. गांधीजी ठेच लागून पडले नाहीत. काही तरी वेगळा प्रकार आहे हे त्या मुलींच्या लक्षात आल्यावर त्या इतक्या बावरल्या की, त्या भीती या भावनेच्या पलीकडे गेल्या. त्या गांधीजींजवळ खाली बसल्या. ते दृश्य नथुरामच्या डोळ्यांसमोर होते. म्हणून त्या मुलींना साक्षीला आणणे आणि त्यांच्याकडून काय प्रकार झाला हे वदवून घेणे हे त्याला कठोर वाटले. त्या मुलींना आणि आणखी काही साक्षीदारांना पुढे आणले गेले नाही. प्रत्यक्ष घटनेचे उत्तरदायित्व स्वीकारून न्यायालयाशी सहकार्य करण्याचे त्याने ठरविले होते.

न्यायालयाने फाशीची शिक्षा सुनावल्यावर ती शिक्षा नथुरामने न्यायालयाला आदर दाखवून मान्य केली होती. न्यायालयाने दिलेली शिक्षा आकसाची नव्हती. पुन्हा, हिन्दुस्थानच्या न्यायालयाने तो निर्णय दिलेला होता. समजा, नथुरामने फाशीविरुद्ध पुनरावेदन केले असते तरीही त्यात देशनिष्ठेला किंवा न्यायपीठनिष्ठेला बाध आला नसता. कारण वरिष्ठ न्यायालयेही आपल्याच राज्याने आयोजित केलेली होती किंवा मानलेली होती. उच्च न्यायालयात त्याने बाद घातला, तो कट या आरोपाविरुद्ध. पण त्यातही ती न्यायालये जो निर्णय देतील तो मानाने स्वीकारण्याची त्याची सिद्धता होती.

फाशीच्या कार्यवहनापूर्वीच आत्मार्पण केल्याचा प्रकार आपण इतिहासात कोठे कोठे वाचतो. शासनाला चकविण्याचा तो प्रकार असतो. नथुरामला शासनाला किंवा न्यायासनाला असला चकमा देण्याचा नव्हता. कारण राज्य आणि न्यायपीठ दोन्ही आपली आहेत ही त्याची धारणा होती.

नथुरामची ही वैचारिक बैठक पंजाबच्या उच्च न्यायालयाला दिसली होती. कोणत्याही पक्षाच्या वकिलाने न्यायालयाला न्यायदानाच्या कामात साहाय्य करण्याचे असते, हे वर सांगितलेच आहे. नथुरामने स्वतःचे आवेदन चालवताना तसे साहाय्य न्यायालयाला केले होते हे न्यायालयाच्या शब्दांवरून दिसून येते. फाशीच्या शिक्षेविरुद्ध त्याने शब्दही उच्चारला

नाही आणि कोणाही वकिलाला भूषणावह होईल इतक्या समर्थतेने त्याने आपले म्हणणे मांडले. पुनरुक्तीचा दोष पत्करूनही सिद्ध संदर्भासाठी न्यायपत्राच्या पृष्ठ २०४ वरील शब्द देत आहे.

'Of the appellants Nathuram V. Godse has not challenged his conviction under Section 302 of the Indian Penal Code for the offence of the murder of Mahatma Gandhi on the 30th January 1948 nor has he appealed for the sentence of death passed on him in respect of the offence. He has confined his appeal and also his arguments at Bar he personally argued his appeal I must say with conspicuous ability evidencing a mastery of facts which would have done credit to any counsel-only to the other charges which have been found proved against him..'

सहकार्य देण्याच्या भावनेच्या या नथुरामच्या वर्तनाचा न्यायालयावर परिणाम झाला असला पाहिजे.

तत्कालीन देशांतर्गत परिस्थितीचा एक दुर्दैवी परिपाक म्हणजे ही हत्या होती हे न्यायमूर्ती जाणत होते. फाळणीच्या हलकल्लोळाने त्यांचा प्रांत आणि ते कदाचित स्वतःही होरपळलेले होते. त्यामुळे त्यांना त्या परिस्थितीचा वेगळा प्रत्यय आणून देण्याचे कारण नव्हते. हिन्दुस्थानच्या संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव लाहोर येथे १९२९ मध्ये झाला होता. आपण २६ जानेवारीला गणतंत्र दिवस म्हणून मानतो तो, तो दिवस होता. ते पवित्र लाहोर हिन्दुस्थानात असूनही स्वातंत्र्य मिळाल्यावर परराष्ट्रात समाविष्ट झाले. तेथे हिन्दुंना स्थान नाही म्हणून ते राष्ट्र पवित्र किंवा पाक, ते मुस्लिम धर्माधिष्ठित राष्ट्र म्हणून पवित्र किंवा पाक, असे मानण्याची आपल्यावर पाळी आली. हा इतिहास न्यामूर्तींच्या डोळ्यासमोर घडत होता. घडला होता. त्या राष्ट्रातील त्या लाहोरातील हिन्दूंप्रमाणेच तेथील न्यायासनही निर्वासित झाले होते. एरवी लाहोर येथे बसणारे ते न्यायासन आता उर्वरित हिन्दुस्थानात आणावे लागले आहे आणि कशीतरी सोय करून घ्यावी लागत आहे, याचा अनुभव न्यायमूर्ती क्षणोक्षणी घेत होते. म्हणून नथुरामच्या अवैध कृत्याचा त्याला प्राणदंड देऊन विधिपूर्वक निषेध करतानासुद्धा नथुराम देशनिष्ठ नव्हता, न्यायनिष्ठ नव्हता, असे त्यांना वाटले नाही. आणि म्हणूनच, त्यांच्या निदर्शनास आलेल्या नथुरामच्या गुणांचा गौरव त्यांनी समतोलपणे, निर्भयपणे, स्पष्टपणे आणि प्रकटपणे केला. त्याला फाशीची शिक्षा हा जसा जनतेला न्याय होता त्याचप्रमाणे त्याच्या भावनांचे मूल्यमापन हाही जनतेला न्याय होता. परकीय राजवट आणि स्वकीय राजवट यामुळे क्रांतिप्रवण अभियुक्तांच्या भूमिकेत आणि न्यायपीठाच्या या अभियुक्तांकडे बघण्याच्या भूमिकेत जे अंतर पडले ते या अभियोगावरून दिसून आले.

मला हेतू चिकटविला जाऊ नये एवढ्यासाठी येथवर दिलेली प्रास्ताविक भूमिका पुरी होईल. यानंतर आपण नथुरामच्या पूर्ववृत्ताकडे जाऊ.

ब्रिटिशांच्या विरुद्ध शस्त्राचार कसे होतात याची मीमांसा करण्यासाठी १९११ मध्ये एक समिती नेमली गेली. न्यायमूर्ती एस्. ए. टी. रौलट (Rowlatt) हे त्या समितीचे मुख्य होते. १५-४-१९१८ या दिवशी त्यांनी आपले प्रतिवृत्त प्रस्तुत केले. ते प्रतिवृत्त सेडिशन कमिटी रिपोर्ट म्हणून ओळखले जाते.

क्रांतिकारी कटाच्या उद्भवाचे मूळ त्यांनी लोकमान्यांनी प्रसारित केलेल्या गणेशोत्सवाला आणि शिवाजी उत्सवाला नेऊन भिडविले आहे. लोकमान्य टिळक, चाफेकर बंधू, रानडे, कान्हेरे, शिवराम महादेव परांजपे, सावरकर बंधू अशा ज्वलंत आणि क्रांतिकारक व्यक्तीतील साधारण घटक या समितीने शोधला, तो म्हणजे सर्व लोक चित्पावन ब्राह्मण होते. ब्रिटिशांचे हिन्दुस्थानातील राज्य उखडून टाकण्याची या लोकांची भावना फार तीव्र असल्याचा समितीचा अभिप्राय आहे. सर्व कटवाले ब्राह्मण होते हा त्यांचा निष्कर्ष आहे.

वास्तविक, ब्रिटिशांच्या राज्याविरुद्ध असलेली भावना या लहानशा जातीपुरतीच मर्यादित नव्हती, हे हिन्दुस्थानच्या स्वातंत्र्याचा आणि त्यातील क्रांतिकारी फळीच्या अंगाचा वरवरचा इतिहास बघूनही लक्षात येईल. रौलट प्रतिवृत्ताची धारणा या जातीविरुद्ध एककल्ली होती. कान्हेरे यांच्या कटातील सातजणांना शिक्षा झाली ते सर्व चित्पावन होते, असे या प्रतिवृत्तातील पृष्ठ १० वर म्हटले आहे. कान्हेरे, कर्वे आणि देशपांडे यांना फाशी झाली. त्यातील देशपांडे चित्पावन नव्हते, हे लोकांना ठाऊक आहे.

सर्वसाधारणपणे ब्राह्मणांविरुद्धही या प्रतिवृत्तात एक विशिष्ट पूर्वग्रह दिसतो. कदाचित, तुम्ही ब्राह्मणेतर चांगले आहात, ब्राह्मण राजद्रोही असतात, असा बहुजन समाजाच्या त्या वेळच्या अज्ञानाचा लाभ घेऊन जातीजातीत फूट पाडण्याचा हेतूही या निष्कर्षात असेल. ते काहीही असो, ब्रिटिशांच्या दृष्टीतून दुष्कीर्त ठरलेल्या चित्पावन ब्राह्मण जातीतील एका कुटुंबात नथुरामचा जन्म झाला. या कुटुंबाचे गोत्र शांडिल्य, पाठपरंपरा ऋग्वेद.

नथुरामच्या स्वतःच्या आठवणींच्या फार पूर्वीच्या काळात जाण्याचे काही कारण नाही. कितीही मागे गेले तरी पहिले पान सापडणार नाही. नथुरामचे आजोबा म्हणजे वडिलांचे वडील वामनराव. ते एक विद्वान ब्राह्मण होते. शेतीबरोबरच ते भिक्षुकीचाही व्यवसाय करीत.

पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील उकसाण हे त्यांचे गाव होते. तेव्हा बैलगाडी हे वाहतुकीचे साधन असे. रस्ते नैसर्गिक असत. म्हणजे त्यांच्यावर संस्कार असे घडलेले नसत. गाड्यांच्या चाकोरीने पडेल तो रस्ता. पावसाळ्यातले जवळ जवळ चार महिने वाहतूक बंद असे.

सर्वसामान्यपणे त्या वेळी बहुतेक खेड्यातील जीवन असे कष्टमय असे. वाहने किंवा

उद्योग वाढलेले नव्हते. चरितार्थाला तेथील साधने अपुरी पडत. मुलांना इंग्रजी शिक्षण द्यावे, त्यायोगे त्यांना नोकरी मिळेल आणि वाढत्या तोंडांची सोय होऊ शकेल या विचाराने खेड्यातील एकेक घर उठून नगरात जात असे.

वामनरावांना तीन मुली आणि एक मुलगा अशी चार अपत्ये होती. मुलाचे नाव विनायक. त्याचा जन्म १८७५ मध्ये झाला. मुलीचे अक्षरओळख एवढे शिक्षण घरीच करण्याची तेव्हा पद्धत असे. त्यामुळे त्यांच्या शिक्षणाचा प्रश्न नव्हता. विनायकचे प्राथमिक शिक्षण उकसाण येथे झाल्यावर वामनरावांनी आपले घर मुलांच्या इंग्रजी शिक्षणाच्या सोयीसाठी पुणे येथे आणले. ते मात्र उकसाणला जाऊन-येऊन असत.

विनायक शालेय शिक्षणाच्या शेवटच्या वर्षाला होता. त्याला सतरावे वर्ष लागले होते. त्या वेळच्या पद्धतीप्रमाणे सतराव्या वर्षीच त्याचा विवाह झाला. पुण्याचे एक वैद्य श्री. विनायकराव फडके यांची कन्या गोदावरी ही विनायकची पत्नी. तिचे वय तेव्हा दहाएक वर्षांचे होते. विवाहानंतर तिचे नाव लक्ष्मी ठेवले.

शालान्त परीक्षा झाल्यावर विनायकला प्रेषणालयात म्हणजे पोस्टात नोकरी मिळाली. मासिक वेतन तीनएक महिन्यांपर्यंत पाच रुपये आणि नंतर पंधरा रुपये होते. पंधरा रुपये मासिक वेतन ही आज थट्टा वाटते; पण त्या वेळच्या वस्तूंच्या मूल्यमापनाप्रमाणे विनायक दहा रुपयांत आपला चरितार्थ चालवी आणि पाच रुपये वडिलांकडे धाडी. कारण वामनराव आता कधी उकसाणला राहत तर कधी मुलाकडे. नोकरीच्या निमित्ताने विनायकच्या बदल्या होत म्हणून नेहमी त्याच्याकडे राहणे त्यांना जमत नसे. शेती व्यवसायावरच त्यांची उपजीविका मुख्यत्वे अवलंबून होती.

लग्नानंतर पाच-सहा वर्षांनी विनायकच्या संसाराला प्रारंभ झाला. मुलगा झाला. त्याचे नाव रामचंद्र ठेवले. पितृपद आल्याने विनायक आता विनायकराव झाले.

दोन वर्षांनी तो मुलगा वारला. पाठीवर एक मुलगी झाली, तिचे नाव मथुरा. पुढे दोन मुलगे झाले; पण ते वर्षभराचे होऊन वारले. मुलगा जगत नाही या जाणिवेने माता-पित्यांना आणि आजीआजोबांना खिन्नता आली.

आजच्या यंत्रयुगात वावरणाऱ्या व्यक्तीतही श्रद्धाळूपणा आढळतो. मग त्यावेळी श्रद्धाळूपणाचा पगडा समाजात असल्यास नवल नाही.

विनायकराव तेव्हा बारामतीला होते. लक्ष्मीला दिवस गेले होते. सुनेला मुलगा होऊ दे, त्याचे नाक टोचू, त्याला सुईणीच्या ओटीत घालू, सुईणीचा मुलगा म्हणून तो वाढवू, त्याची मुंज देवळात करू, असा नवस विनायकरावांचे आई-वडील कुलदेवतेपाशी बोलले.

लक्ष्मीला मुलगा झाला. १९ मे १९१० हा तो दिवस. नवसाला देव पावला अशी घरच्या मंडळींची धारणा झाली. मुलाला सुईणीच्या ओटीत घातले. त्याचे नाव रामचंद्र

ठेवले. त्याचे नाक टोचल्यामुळे त्याला सर्वजण नथू म्हणू लागले. त्याचे नथुराम असे नाव पुढे रूढ झाले.

बारामतीनंतर विनायकरावांच्या बदल्या खेड, लोणावळे, खंडाळे, तळेगाव, कर्जत आणि रत्नागिरी येथे झाल्या. नथुरामच्या पाठीवर बरामती येथे दत्तात्रय (१९१५), शांता (१९१७), खेड (आता राजगुरूनगर) येथे गोपाळ (१२ जून १९२०) आणि तळेगाव येथे गोविंद (१९२२) अशी विनायकरावांना अपत्ये झाली. (श्री. दत्तात्रय यांचे पुणे येथे दि. १०-९-१९९० ला निधन झाले.)

नथुरामचे प्राथमिक शिक्षण बारामतीला चालू झाले. त्याची मुंज नवस बोलल्याप्रमाणे बारामतीच्या राममंदिरात झाली. संध्यावंदन आणि सूर्यनमस्कार त्या दिवसांत बहुतेक घरातून माता-पिता मुलांकडून करवून घेत. नथुरामचे ते उपक्रम चालू असत. शालेय शिक्षण एकीकडे चालू असतानाच घरी मुलांचे पाठांतर करून घेण्याचीही तेव्हा घरोघर प्रथा असे. बुद्धिविकासाला त्याचा उपयोग होतो असे त्या काळच्या पिढीत आणि प्रथेत वाढलेले लोक सांगू शकतील.

पाठांतरात नथुरामची बुद्धी अतिशय तीव्र होती. संध्याकाळी नवनीतातील वेचे, मनाचे श्लोक, करुणाष्टके, आरत्या, रामायणातील आणि महाभारतातील काही ओवीबद्ध आणि श्लोकबद्ध वेचे वाचून आणि म्हणून घेण्याची पद्धत घरी असल्याने नथुरामचे पाठांतर चांगले झाले होते.

महाराष्ट्रातील, विशेषतः पुण्यातील राष्ट्रीय वृत्तींच्या वृत्तपत्रांना रौलटने, 'चित्पावन प्रेस' म्हणूनच संबोधले आहे ! (The Report of the Sedition Committee Page 13) 'केसरी' हे त्या वृत्तपत्रात मुख्य होते. ब्रिटिश राज्याविरुद्ध असंतोष निर्माण करण्याच्या या वृत्तपत्रांच्या धोरणामुळे शासकीय सेवेतील लोकांनी 'केसरी'वाचणे तेव्हा अलिखितपणे आक्षेपार्ह समजले जाई. पण विपरीत वस्तुस्थिती अशी असे की, 'केसरी' वाचण्याची अशा लोकांनाच फार तळमळ लागे. बंधन घातल्याने कुतूहल वाढते, यातलाही तो प्रकार असेल. आपल्यावर आक्षेप येतला जाऊ नये म्हणून विनायकरावांनी नथुराम सात-आठ वर्षांचा झाला तेव्हा त्याच्या नावाने 'केसरी' चालू केला.

नथुरामला वाचण्याचा नादही फार लहान वयात लागला. तो 'केसरी' वाचे किंवा समजे असे नव्हे; पण स्वातंत्र्यप्राप्तीसाठी म्हणून जे लिखाण येई त्याचा प्रथम प्रथम न कळत आणि मागावून कळत त्याच्या मनावर परिणाम होत असे. आपसात होणाऱ्या चर्चा आणि व्याख्याने यांचीही त्याला गोडी वाटे. वडिलांच्याबरोबर तो कोणत्यातरी व्याख्यानाला गेला होता. व्याख्यानातील विषयाच्या अनुरोधाने घरी आल्यावर त्याने परदेशी साखर घरात वापरायची नाही, असा हट्ट धरला. त्याचा त्या बालवयातील उत्साह बालिश होता, परिपक्व

नव्हता हे वडील जाणत होते. पण मुलाचे कौतुक म्हणून आणि त्याचा हट्ट पुरविण्यात काही हानी नव्हती म्हणून या घरात तेव्हापासून परदेशी साखर आणणे बंद झाले. पुढे पुढे परदेशी वस्तूही घरात घ्यायच्या नाहीत हीही पद्धत पडून गेली.

बदल्या लहान गावी होत असल्याने नथुरामच्या शिक्षणाची आबाळ होऊ लागली. त्याची मराठी चौथी झाल्यावर इंग्रजी शिक्षणासाठी त्याला त्याच्या आत्याकडे पुण्याला ठेवले. नंतर तीन-चार मुलांनी मिळून एक खोली घेतली. सुट्टीच्या दिवसांत नथुराम घरी येई.

कविता वाचण्याचा, पाठ करण्याचा आणि पुढे कविता स्वतःच बनविण्याचा नाद नथुरामला तो शाळेत असताना लागला. लोकमान्यांच्या उद्देशाप्रमाणे गणपती उत्सवानंतरही ही प्रथा मोडली नाही. मेळ्यात म्हणण्यासारखी देशभक्तिपर पदे नथुराम करीत असे. एक लहानशी पद्यावली लक्ष्मीतनय या नावाने त्याने त्या दिवसांत प्रकाशित केली होती. रामरक्षेचे श्लोकबद्ध रूपांतर त्याने केले होते. कारण त्या मानाने ते श्लोक अर्थ समजण्यास सोपे होते.

नथुरामची विचारसरणी तर्ककठोर होती; पण ती वय वाढल्यावर. लहान वयात तो भाविक होता. थोरली बहीण मथुरा हिचे लग्न झाले होते. तिला बरे वाटत नव्हते म्हणून माहेरी आणले होते. औषधोपचार चालू होते; पण गुण येत नव्हता. दैवी उपाय म्हणून कोणीतरी करपुतळीची पूजा करा असे सुचविले. घरी ती पूजा केली जाऊ लागली. बोलाफुलाला गाठ पडली असेल, बहिणीला बरे वाटू लागले.

ही पूजा नथुरामच करी. पूजेचा प्रपंच असा असे : काशाच्या थाळ्यावर मध्यभागी काजळ धरीत. तेलाच्या बोटाने ते तळहाताएवढे गोलाकार पसरवीत. देवघरात किंवा सोयीच्या दुसऱ्या ठिकाणी भिंतीजवळ भुई सारवीत. पाट मांडून थाळा भिंतीशी उभा ठेवीत. पाटावर पुढे दोन निरांजने तेवत. निरांजनाच्या ज्योतींचे प्रतिबिंब थाळ्यातील काजळीत दिसे. वेळ बहुधा तिन्हीसांजा होऊन गेल्यानंतरची असे.

पूजा करणारा त्या थाळ्यासमोर पाट मांडून बसे. तो गंधाक्षतांनी पूजा करी. एक-दृष्टीने तो त्या थाळ्यातील काजळीकडे बघे.

पूजा करणाराला प्रश्न विचारले जात. त्याच्या मुखातून आलेली उत्तरे देवीची आहेत असे मानले जाई. पूजकाला त्या काजळीत कधी मूर्ती, कधी आकृती, तर कधी अक्षरे दिसत. प्रश्न विचारल्यापासून पूजा करणारा त्याला जे दिसे ते सांगे. पुष्कळदा ते त्या प्रश्नांचे प्रत्यक्ष उत्तर नसे. मग त्याचे अर्थ लावण्यासाठी तर्क केले जात. अर्धा-एक तास हा प्रकार चाले.

घरातील सर्वांनी काजळीत असे काही दिसते का, असे पाहण्याचा प्रयत्न केला. नथुरामलाच केवळ ही दृश्ये दिसत. कधी कधी प्रश्न विचारलेला नसतानाही त्याने कधीतरी कोठेतरी बघितलेली मूर्ती त्या काजळीत दिसे. कधी लेण्या तर कधी देखावे दिसत. केव्हातरी वाचलेली पण पाठ नसलेली स्तोत्रे, रुद्राचे काही भाग, त्याला त्या काजळीत अक्षरबद्ध

होऊन झरझर पुढे सरत असलेली दिसत. तो ती अक्षरे वाचीत असे आणि त्याच्या मुखातून एखादे सुसूत्र स्तोत्र किंवा स्तवाचा भाग बाहेर पडे.

पूजा संपल्यावर त्याला ती स्तोत्रे किंवा तो भाग म्हणण्यास सांगितले, तर त्याला ते आठवत नसत. पाठांतराला हा चांगलाच उपाय आहे या भावनेने तो करपुतळीची पूजा मंगळवार आणि शुक्रवार या दिवशी करू लागला; पण पुढच्या पूजेस त्याला मागच्या पूजेतील अक्षरे दिसत असे होत नसे. आणखी कोणती तरी दिसत. नथुराममध्ये काही दैवी शक्ती आहे, असे घरचे लोक भाविकपणे म्हणू लागले.

गुण्याला शिक्षणासाठी राहिल्यावर नथुराम सुट्टीत जेव्हा घरी येई तेव्हा तो ही पूजा करी. तो पंधरा-सोळा वर्षांचा झाल्यावर त्याने पूजा सोडून दिली. त्याच्या म्हणण्याप्रमाणे त्याची श्रद्धा मावळू लागली होती.

नथुरामला त्या काजळीत मूर्ती किंवा अक्षरे दिसत असे मानले, तर भौतिकशास्त्राच्या कसोटीने त्यांची संगती लागत नाही. आध्यात्मिक शास्त्राने मात्र त्याची थोडीफार संगती लागेल अशी कल्पना आहे.

आपण कल्पिलेली आदिशक्ती किंवा माया सत्व, रज आणि तम या तीन गुणांनी युक्त आहे, असे आपण मानतो. मनुष्य हा शक्तीचाच एक परिणाम आहे. हे तीन गुण माया या शक्तीचे जीवन असल्याने ते मनुष्याच्या मनाचे वातावरण आहे.

मनुष्याचे व्यवहार म्हणजे त्या त्या वेळी त्याच्यात प्रभावीपणे वास्तव्य करीत असलेल्या त्या त्या गुणांचा पडसाद.

मन केंद्रित करण्याची क्रिया म्हणजे सत्त्वगुण वाढविण्याची क्रिया. म्हणजेच रज आणि तम या गुणांच्या प्रभावाने उत्पन्न होणारी विक्षेपशक्ती हटविण्याची क्रिया, हे मनाचे केन्द्रीकरण कोणत्या विषयात आहे हा प्रश्न गौण आहे.

त्या त्या विषयातील भाविकता किंवा श्रद्धा हा एक गुण मन एकाग्र होण्यास पूरक असतो. केव्हातरी बघितलेल्या, वाचलेल्या किंवा ऐकलेल्या गोष्टींचा ठसा मनावर उमटलेला असतो, हे भौतिकशास्त्रही मानते. याचे उदाहरण म्हणजे कोणी व्यक्ती भेटली की, एखाद्या वेळी आपल्याला त्या व्यक्तीचे नाव आठवत नाही आणि आपली पंचाईत होते. नाव न विचारताच आपले काम उरकून गेलेले असते आणि ती व्यक्ती समोर नसताना आपल्याला तिचे नाव आठवते. मनाचा तो ठसा तेव्हा जागृत होतो.

मन एकाग्र होताना कोठल्यातरी ठश्यावर ते केन्द्रित होत असेल आणि समोर अक्षरे दिसत आहेत, अशी धारणा होऊन पाठ केलेल्या स्तोत्राप्रमाणे मुखावाटे शब्द येत असतील; अक्षरे दिसत आहेत अशा धारणेचा पायाही अक्षराचे ज्ञान हा असला पाहिजे. त्या वेळापुरती ती एक प्रकारची समाधी.

वाढलेल्या वयात विक्षेपशक्तीचा प्रभाव अधिक असल्याने मन त्या विषयावर एकाग्र होणे कठीण झाले असेल.

सार्वजनिक कामात उत्साह दाखविणे ही काही तरुण मुलांची विशेषता असते. तशी तरुण मुले प्रत्येक पिढीत आढळतात. नथुराम त्या वयात सार्वजनिक कामात भाग घेई. 'सार्वजनिक' याचा अर्थ तेव्हा एवढाच असे की, ती कामे स्वतःच्या व्यवहाराव्यतिरिक्त असत. विहिरीतील वस्तू काढून देणे, विहिरीतील गाळ काढणे, कोणाला प्रवासाला साहाय्य करणे, देवळातील उत्सवात अग्रेसर असणे, आजाऱ्यांची सेवा करणे, लग्नकार्यात पाणी भरणे-वाढणे, अशांसारखी ती 'सार्वजनिक' कामे असत.

पोहण्याचा त्याला फार नाद असे. तो आणि त्याचे मित्र कर्जतला येत तेव्हा चौघांनी मिळून एक मोठा दगड नदीपलीकडे नेण्याचा त्यांचा खेळ असे.

लोणावळा येथे असताना त्याचे वय तसे अधिक नव्हते; पण तो चांगले पोहत असे. एकदा एक विहिरीत एक मूल पडले. मुलाची आई, दुसऱ्या बाया आरडाओरडा करू लागल्या. नथुराम आणि त्याचा एक मित्र विहिरीवरून जात होते. नथुराम पुढे झाला. विहीर सोपी होती. मूल बुडालेले नव्हते. त्याने विहिरीत उडी मारली, मुलाला घेतले, आणि पायऱ्या चढून तो वर आला.

घरी त्याला बोलणी बसली ती बुडते मूल काढले म्हणून नव्हे, तर घरी आल्यावर आधी आंघोळ केली नाही म्हणून ! ते मूल महाराचे होते ! जन्मजात जातीचे निर्मूलन करण्याच्या उपक्रमात नथुराम पुढे हिरिरीने पडला, त्याला जी काही कारणे झाली असतील त्यात हेही एक कारण असले पाहिजे.

कर्जतला शांता म्हणजे धाकटी बहीण घाटावर नदीत पडली आणि वाहत जाऊ लागली. नथुराम नदीत दूरवर पोहत होता. आरडा-ओरडा झाला तेव्हा तो घाटाकडे येऊ लागला. येताना त्याने बहिणीला काठावर आणले, तिला एक-दोन उलट्या झाल्या पण चालतच ती घरी येऊ शकली.

पाठांतर, भाषा, इतिहास इत्यादी विषयांत नथुरामचे प्राविण्य असले तरी सर्व अभ्यासात तो विशेष चमक दाखवी, असा प्रकार नव्हता. इंग्रजी हा विषय त्याला फार जड जाई; पण त्यातूनही एक काळ असा होता की उनाड मुलांची लक्षणे त्याच्यात दिसू लागली होती. त्याचे एक सहाध्यायी मला नुकतेच भेटले होते. ते मोठ्या अधिकारपदावर आहेत. ते म्हणाले, 'त्या उनाडक्यात मीही समाविष्ट असे. सात रुपयांत दोन वेळचे जेवळ आम्हाला मिळत असे. त्यावेळी चित्रगृहात मूकपट दाखविले जात. ते बघण्याचा आम्हाला नाद लागला. पैसे पुरेनात म्हणून आम्ही दोन वेळचे जेवण एका वेळचे केले, ते चार रुपयांत भागत असे. तरीही पैसे पुरेनात तेव्हा जेवण खोलीवरच शिजवावे, असा आम्ही बेत केला, 'खाणावळीचे

जेवण महाग पडते. आम्ही घरीच जेवण करण्याचा कार्यक्रम आखला आहे.' असे प्रत्येकाने घरी सांगून त्या महिन्याला घरी एक कार्यक्रम दिला आणि प्राथमिक वस्तूच्या क्रयणासाठी पाच पाच रुपये अधिक मागविले आणि मिळविले.

'घरी जेवण करण्याचे आम्ही योजिले होते त्याप्रमाणे दोन पदार्थ सकाळीच करून ठेवायचे आणि दोन्ही वेळा जेवायचे, असा आमचा कार्यक्रम असे. परंतु धान्य, पीठे हे सोडून पातेली, तवा इत्यादी भांडी आम्ही आमच्या कोणा ना कोणा नातेवाईकांकडून आणली होती. आलेले पैसे आम्ही चित्रपटाच्या कारणी लावले होते.

'एकदा आमच्यापैकी एकाचे वडील अनपेक्षित खोलीवर आले. खोली बंद होती. शेजाऱ्यापाजाऱ्याकडून त्यांनी चौकशी केली. कोणा शेजाऱ्याने या शाळकरी मुलांचे स्वावलंबन त्यांना सांगत कथन केले. त्या मुलाचे वडील आम्ही येईपर्यंत थांबले होते.

'वडील एकाएकी आलेले पाहताच मुलगा चपापला ! चटकन सुचलेले निमित्त 'आम्ही अभ्यासाला गेलो होतो' म्हणून त्याने वेळ मागविण्याचा प्रयत्न केला. वडील बोलले नाहीत. थोडे पुढे आले, मुलाच्या खिशात हात घातला.

मुलाचे दुर्दैव ! चित्रपटाच्या चारी दर्शिका त्याच्याच खिशात ! लगेच हातातोंडाची गाठ पडली. म्हणजे वडिलांचा हात आणि मुलाचे तोंड !

'उपदेश पाजून ते दुसऱ्या दिवशी निघून गेले. थोडक्यात निभावले म्हणूनच आम्ही सुस्कारा सोडला !'

'आणि आठच दिवसांत उरलेल्या तिघांच्याही घरून प्रत्येक पैशाचे गणन आणि घेतलेल्या वस्तूंचे देयक म्हणजे बिल मागितले गेले ! त्या मुलाच्या वडिलांनी उरलेल्या मुलांच्या वडिलांना पत्रे धाडून 'चुगली' केली होती !

'सर्वांत वाईट म्हणजे, माझ्या मुलावर आणि त्याच्या इतर तीन मित्रांवर लक्ष ठेवा, असे त्या मुलाच्या वडिलांनी मुख्याध्यापकांना पत्र लिहिले होते. त्याचा परिणाम म्हणजे दुसऱ्या कोणत्याही कारणाने आमचा अभ्यास झाला नाही, तरी उनाडक्यांमुळेच तो झाला नाही, असे समजले जाऊन छड्यांचे आमच्यावर उद्घाटन आणि समाप्ती होई.

'पण परीक्षा जवळ येत होती आणि आम्ही अभ्यासाला लागलो होतो.

राजकीय हालचालींकडे मात्र नथुरामचे लक्ष असे. त्याचाही एक परिणाम असा झाला की, अभ्यासावरील त्याचे लक्ष उडू लागले. सत्याग्रहात मी जाऊ का असे त्याने वडिलांना विचारले : कारण गांधीजींच्या नेतृत्वाने सत्याग्रहाचे आंदोलन तेव्हा गती घेत होते. शिक्षण आधी, मग या गोष्टी, असे वडिलांनी नथुरामला सांगितले. पुन्हा वडिलांच्या नोकरीचाही प्रश्न होता. नथुरामने आंदोलनात भाग घेतल्याने नोकरी जाण्याची भीती होती. नथुरामने विचार केला आणि सत्याग्रहात भाग न घेण्याचे त्याने ठरविले.

मात्र, त्याचे मन स्वस्थ नव्हते. आपण बाहेरून काहीतरी सहाय्य करावे असे त्याला वाटे. तो स्वतः माता-पित्यांच्या छत्राखाली म्हणजे परावलंबी. तो बाहेरून साहाय्य असे काय करणार ? पण मुलगा या नात्याने घरात हट्ट धरण्याचा एक अधिकार असतो तो वापरण्याचे त्याने एकदा ठरविले.

वडील तेव्हा पुणे-मुंबई मार्गावरील कर्जतला होते. सुट्टीच्या दिवसात नथुराम एकदा कर्जतला आला होता. बारा-पंधरा सत्याग्रहांचे एक पथक मुंबईला निघाले होते. ते वाटेत कर्जतला थांबले होते. तेथील देवळात ते लोक उतरले होते. गाव लहान. सत्याग्रह या विषयाचेही कुतूहल फार. सर्व गावात ही वार्ता पसरली. नथुरामही तेथे गेला. तो त्या पथकाच्या प्रमुखाला भेटला. 'जेवणाची सोय काय?' म्हणून नथुरामने विचारले, 'बघू कुठेतरी' असे उत्तर मिळाले. नथुरामने कोणताच विचार केला नाही. बहुधा मनात त्याने ती गोष्ट आधीच योजली होती. तो म्हणाला, 'आज तुम्हा सर्वांचे जेवण आमच्याकडे. तुम्हाला माझ्या वडिलांनी आमंत्रण दिले आहे. मी इथे समोर राहतो.' त्यांचा होकार घेऊन तो घरी आला.

नथुराम घरी काही बोलला नाही. तो वेळापेक्षा थोडा आधीच जेवला आणि पुन्हा मंदिरात गेला. 'जेवण शिजत आहे. तुम्ही चला, ओटीवर बसा. स्नान उरकून घ्या. अधाप दोन तास लागतील.' अशी त्यांना सूचना दिली. ते लोक नथुरामबरोबर निघाले.

नथुराम आणि त्याच्या पाठोपाठ खांद्याला पिशव्या अडकविलेले बारा-पंधरा लोक बघून आई बघतच राहिली. नथुराम पुढे झाला. आईला म्हणाला, 'आई ही मंडळी जेवायची आहेत. नुसते पिठले-भात केलेस तरी चालेल. त्यांना दुपारी चारच्या गाडीने पुढे जायचे आहे.'

आई रागावली. म्हणाली, 'आधी का नाही सांगितले ? आता निदान दीड-दोन तास तरी लागतील !'

'दीड-दोन तास ते थांबतील. तोवर ते स्नान करून घेतील. तात्या (वडील) रागावतील म्हणून मी तुला आधी बोललो नाही.' नथुरामने स्पष्टीकरण केले.

दोन-एक तासांत स्वैपाक झाला. पिठले, भात आणि त्याबरोबर पापड, लोणचे हे कोकणातले नेहमीचे पदार्थ. ताक या वस्तूचीही आजच्यासारखी दुर्मिळता नव्हती. पत्रावळी मांडण्यापासून उष्टी उचलण्यापर्यंत नथुरामने सर्व सहाय्य केले. जेवायला वाढण्यात गृहिणींना आनंद असतो. नथुराम ज्या चपलतेने आज या कामात सहाय्य करीत होता हे बघून आईला त्याचे कौतुक वाटले.

मधेच वडील येऊन गेले. प्रेषणालयाला जोडलेलेच राहण्याचे घर होते. सर्व प्रकार त्यांच्या लक्षात आला ! सत्याग्रही ! आणि शासकीय वास्तूत एका शासकीय कर्मचाऱ्याकडे जेवत आहेत ! गाव लहान ! वरिष्ठांना हे कळण्याचा अवकाश होता. आणि नोकरीवर गंडांतर

आले असते !

आईला या गोष्टीची कल्पना नव्हती, असे नाही; पण ती फार व्यवहार-चतुर होती. वडिलांची स्थिती तिने जाणली. म्हणाली, 'दुपारच्या वेळी जेवायला आलेल्याला आपण कधी परत का धाडतो ? हे लोक कोण आहेत, ते सत्याग्रहाला जात आहेत की काशीयात्रेला जात आहेत, आपल्याला काय करायचे आहे ! 'तुम्ही कुठे निघालात' हे आपण विचारू नये म्हणजे झाले.'

मारून मुटकून का होईना; पण वडिलांचे समाधान झाले, त्याबाचून गत्यंतर नव्हते. कदाचित त्यांना नंतरही काही दिवस अस्वस्थता वाटली असली तरी त्यांनी नथुरामवर राग काढला नाही. ते एवढेच म्हणाले, 'अरे, पुन्हा केव्हा असे बोलावयाचे झाले तर परस्पर व्यवहार करू नको. माझ्या आधी कानावर घाल. आपण त्यांची व्यवस्था निश्चित करू; पण आणखी कोठे तरी. गावातले लोक मला ठाऊक आहेत.'

सत्याग्रही आपल्याकडे जेवून गेले हे सात्त्विक समाधान नथुराम आपल्या मनावर कितीतरी दिवस बागवीत होता.

नूतन मराठी विद्यालयात नथुरामचे शिक्षण चालले होते. तो शालान्त परीक्षेला बसला होता; पण अनुत्तीर्ण झाला. तो कर्जत येथे येऊन राहिला.

पुन्हा परीक्षेस बसण्याचा आग्रह वडिलांनी केला होता; परंतु शिक्षणात आपली गती नाही. आपण काही शिल्प शिकावे, हस्तव्यवसाय शिकावा, असे त्याला वाटे. त्याने सुतारीची काही उपकरणे गोळा केली होती आणि घरच्या फळ्या रांधून त्याचे एखादे कपाट, एखादी पेटी अशा वस्तू केल्या होत्या.

तेवढ्यात वडिलांची बदली रत्नागिरी येथे झाली. वर्ष १९२९-३० वडिलांच्या आयुष्याला नव्हे तर नथुरामच्या आयुष्याला एक वळण लागणारी ती घटना ठरली.

स्वा. सावरकरांचे वास्तव्य तेव्हा रत्नागिरीला असे. रत्नागिरी जिल्ह्याच्या सीमेत राहण्याचे त्यांच्यावर बंधन होते. राजकीय विषयावर चर्चा, व्याख्याने, लिखाण इत्यादी करण्यास त्यांना बंदी होती.

सावरकर तेव्हा लोकांना दबून दबूनच ठाऊक होते. त्यांची 'माझी जन्मठेप' ही लेखमाला प्रसिद्ध झाली होती. त्यांचे पुस्तक नंतर समपहृत म्हणजे जप्त झाले होते. जे समपहृत त्यात काहीतरी विशेष आहे अशी धारणा होते. अर्थात ज्यात काहीतरी विशेष असते तेच समपहृत होते हा त्याचा विलोम किंवा प्रतिसिद्धान्त म्हणजे converse आहे. समाजाचा एक वर्ग त्या दडपून टाकलेल्या वस्तूकडे आकृष्ट होतो.

नथुरामला सावरकरांची महती ठाऊक झाली होती. हिन्दुस्थानच्या स्वातंत्र्यासाठी ज्या विभूती झगडत होत्या त्यांच्याविषयी आदराची भावना तो बागवीत असे. सावरकर हे

ज्वलंत देशभक्त होते, हे वाचनाच्या त्याच्या व्यासंगामुळे त्याला ठाऊक झाले होते. त्या क्रांतिकारकाला आता आपणास अनायसे भेटता येईल असे वाटल्याने, बडिलांची बदली रत्नागिरीला झालेली कळताच त्याला अपरिमित आनंद झाला.

कर्जतहून पुणे-कोल्हापूर मार्गाने आम्ही रत्नागिरीला पोहोचलो. आठ-दहा दिवस आम्ही एका घरी बिऱ्हाड मांडले. पण ते सोयीचे न वाटल्याने मधल्या आळीतील एक घर घेतले.

ते घर स्वर्गीय श्री. बाळ गंगाधर खेर यांच्या बडिलांचे होते. त्यांचे बंधील त्याच वाड्यात राहात. त्या घरातील एका भागात आम्ही राहात असू.

घरात राहणारी माणसे ते घर सोडल्यावर त्या निर्जीव वास्तूवर काही भावनात्मक संस्कार ठेवीत नसतात. निर्जीव वास्तूंना माणसे भावना चिकटवितात. ध्यानीमनी नसताना झाले असे की, ज्या घरात आम्ही आता राहण्यास गेलो होतो त्याच घरात सावरकर प्रथम रत्नागिरीला आल्यावर राहात होते. मग ते त्याच आळीच्या टोकाला दुसऱ्या एका घरात राहण्यास गेले होते. रत्नागिरीचे सर्व म्हणजे दीड वर्षांचे आमचे वास्तव्य श्री. खेर यांच्या वाड्यातील घरात होते. सावरकर आपल्या व्याख्यानातून कधी कधी म्हणत, 'माझ्याशी ज्याचा संबंध जवळून अथवा दुरून येईल ते लोक आगीत पोळावेत, होरपळून जावेत, असाच नियतीचा खेळ दिसतो.' सावरकरांच्या घराशी गोडसे घराच्या १९२९ च्या आसपास आलेल्या या संबंधाची परिणती जवळजवळ बीस वर्षांनी शब्दशः तशी झाली होती !

रत्नागिरीला आम्ही गेल्यावर तीनच दिवसांनी नथुराम सावरकरांची भेट घेऊन आला होता. ती त्याची पहिली भेट. पुढे तो त्यांच्याकडे नेहमी जाऊ लागला. एकोणीस-बीस वर्षांच्या या तरुणात सावरकरांना काही गुण दिसले. त्याचे वाचन त्याच्या वयाच्या मानाने पुष्कळच होते हे त्यांनी पाहिले. कथा कादंबऱ्याच नव्हे, तर तत्त्वज्ञानविषयक आणि धार्मिक ग्रंथांचेही त्याने वाचन केलेले त्यांना आढळले. त्याची स्मरणशक्ती चांगली असल्याने वाचलेल्याचा उपयोग तो आपल्या चर्चात करी असेही त्यांच्या निदर्शनास आले. त्याच्यात वक्तृत्वाची कला आहे हेही त्यांना थोड्या दिवसांनी कळले.

सावरकरांचे लंडनमधील कार्य त्यांच्या तोंडून नथुरामला अधूनमधून ऐकावयास मिळे. त्याने सावरकरांच्या मध्यस्थीने 'War of Independance' या पुस्तकाची एक प्रत घरी आणली. रात्री त्याचे वाचन होत असे. नथुरामला जेथे अर्थ लागत नसे तेथे बडील तो सांगत. समजणारे श्रोते तीनच. आई-बडील आणि नथुराम. दत्ता ऐकत असे. पण आकलन होण्याचे त्याचे वय झालेले नव्हते.

सावरकरांचे जे लेखन चाले त्याची प्रत करण्याचे काम नथुराम आनंदाने करीत असे. सर्वांच्या आधी आपल्याला हे कळत आहे हाच त्याचा आनंद असे. संदर्भग्रंथ सावरकर

काही वेळी नथुरामकडून आणवून घेत. पुस्तके परत दिल्यावरही केव्हा केव्हा त्यातील एखादे पुस्तकच ते आणावयास लावीत.

संदर्भ पाहिलेला आहे. तेव्हा पुन्हा पुस्तक कशाला आणावयाचे असे नथुरामला वाटे. एकदा तो तसे बोलला. सावरकरांनी त्याला एक सूत्र सांगितले, 'लिहिण्यात साधायचे असते ते हे की, आपले विधान मागे घ्यावे लागू नये. म्हणून शंका आली तर पुन्हा संदर्भ बघणे आवश्यक असते.'

काय वाचावे, टिपणे कशी ठेवावीत, विषय मांडताना संगती कशी ठेवावी, असे मार्गदर्शन सावरकर करीत असत. राजकीय प्रश्नावरील सभात नथुराम भाग घेऊ लागला होता.

गांधीजींच्या सत्याग्रहाच्या आंदोलनाचा तेव्हा भर होता. या ना त्या मार्गाने लोकजागृती होत आहे याचे सावरकरांना समाधान वाटत होते. ते स्वतः बंदिस्त होते. काय करायला हवे आहे याचे दिग्दर्शन करणे त्यांना या स्थितीतून शक्य नव्हते.

रत्नागिरीच्या विठ्ठल मंदिरात धार्मिक विषयांवर सभा होत. एकदा ध्रुवाख्यान हा विषय होता. काही वक्ते बोलले. नथुराम भाषण ऐकत होता. पौराणिक विषयाचा आणि मंदिराच्या व्यासपीठाचा देशभक्तीच्या प्रचारासाठी उपयोग केला जावा असे त्याला वाटले. ते शक्य आहे असाही त्याला विश्वास वाटला. बोलण्यासाठी त्याने अनुज्ञा मागितली. ती मिळाली.

नथुराम बोलू लागला. 'ध्रुवाचा स्वाभिमान जागृत झाला होता. त्याला अढळ स्थान हवे होते. आमचा स्वाभिमान जागृत झाला आहे. आम्हाला केवळ अढळ स्थान हवे आहे. आम्हाला आमचे स्वातंत्र्य हवे आहे. ध्रुव आपल्या ध्येयासाठी तपश्चर्येला निघाला. प्रत्यक्ष पित्याने पुढे टाकलेल्या प्रलोभनांना तो बधला नाही. फिर मागे देईन एक गाव । ध्रुव बोले देईल देवराव । पाच गावे दिधली फिर मागे । ध्रुव बोले मागेन रमारंगे । अर्ध राज्य दिधले फिर आता । ध्रुव बोले मागेन रमाकांता । सर्व राज्य दिधले तुवा आता । ध्रुव बोले मागेन जगन्नाथा ।

'आम्ही तपश्चर्येला लागलो आहोत. शासनाने कितीही आघात केले, अडविले, आमचे नेते बंदीत टाकले, त्यांना लाठ्या मारल्या, त्यांना गळफास अडकविले, आम्हाला आमिष दाखविले, तरी आता मागे फिरणे नाही. कष्टेविण फळ नाही काही एक। हे ध्यानात ठेवले पाहिजे. अवघड वाटणारी गोष्ट आपल्याच प्रयत्नाने साध्य होईल. असाध्य ते साध्य करता सायास । कारण अभ्यास तुका म्हणे, ही उक्ती ध्यानात ठेवून स्वातंत्र्य हा ध्रुवतारा डोळ्यासमोर ठेवून बाळ ध्रुवाइतकी प्रखर चिकाटी आपण दाखविली पाहिजे.'

नवनीतातील वेचे, दासबोध, तुकारामाची गाथा, यातील वचनांनी त्याने आपले भाषण नटविले होते. उच्चारलेल्या शब्दांचे वाक्य पूर्ण करण्यास त्याला आपले शब्द कधी

बदलावे लागले नाहीत. शब्द आठवण्यासाठी थांबावे लागले नाही. त्याने आणखी बोलावे असे लोकांना वाटू लागते न लागते तोच त्याने भाषणाचा समारोप केल्याने योग्य तो परिणाम त्याने लोकांच्या मनावर करून ठेवला. सावरकरांना त्याच्या भाषणाचे वृत्त अनेकांकडून कळले, त्यांनी नथुरामची पाठ थोपटली.

त्या बंदिस्त अवस्थेत सावरकरांचे अस्पृश्यता निवारणाचे कार्य चालू असे. त्यांच्याशी वादविवाद करण्यास मान्यवर विद्वान येत असत, ते वाद नथुराम तन्मयतेने ऐकत असे.

रत्नागिरीचे पतितपावन मंदिर सर्व हिन्दुस्थानात चातुर्वर्ण्य हिन्दुंना सामावून घेणारे पहिलेच मंदिर असावे. सर्व हिन्दुंना पूजाअर्चा करण्यास ते मुक्त होते. तेथे सहभोजनाचे उपक्रम होत. नथुराम त्यात भाग घेई. घरी ते पटत नसे, सावरकरांचे हिन्दुंच्या भोळ्या रूढीवरील विचारही घरी पटत नसत; पण नथुराम तसा लहान नव्हता. त्यामुळे काही वेळी वादविवाद करून तर काही वेळी आग्रहाने तो आपले ठरलेले कार्यक्रम पुरे करी.

सावरकरांच्या निमंत्रणाने एकदा नेपाळचे राजपुत्र आणि प्रधान रत्नागिरीत आले होते. पतितपावन मंदिराच्या आवारात त्यांचे आणि सावरकरांचे व्याख्यान झाले होते. व्यवस्था ठेवण्याचे काम मुख्यतः नथुरामने केले होते.

आपण व्यवसाय काही करीत नाही याची जाणीव नथुरामला मध्यंतरीच्या काळात होती. त्याला प्रेषणालयात 'चिकटवून' घेण्याची वडिलांची इच्छा होती. पण शासकीय सेवावृत्ती पत्करू नये असे त्याला वाटे. आपल्या आवडीच्या व्यवसायात प्रगती करण्याच्या संधीची तो वाट बघत होता.

थोरली बहीण मथुरा माहेरपणाला रत्नागिरीला आली होती. तिचे यजमान संयान विभागात म्हणजे रेल्वेमध्ये कर्मचारी होते. ते इटारसी येथे होते. बहिणीला पोहोचविण्यास म्हणून नथुराम इटारसिला गेला. त्याने मेहुण्यांच्या सहाय्याने उपकरणे जमविली आणि तो फळ्यांच्या कातकामाचा - फ्रेट वर्कचा - उद्योग करू लागला. त्याने त्या उद्योगात बरीच प्रगती केली होती.

पण त्याचे मन स्थिर राहिना. राजकीय क्षेत्रापासून आपण अलिप्त राहत आहोत याचे त्याला वैषम्य वाटे. तो हिन्दी शिकला, कारण त्या भागात सर्वसाधारपणे हिन्दी भाषा बोलली जात असे. लोकजागृतीसाठी हिन्दीतून कीर्तने करण्यास त्याने प्रारंभ केला. कधी कधी तो तेथे होणाऱ्या मेळाव्यात व्याख्यानेही देत असे.

तो तेथल्या आरक्षी विभागाच्या डोळ्यावर आला. एका प्रसंगी त्याला सकाळपासून संध्याकाळपर्यंत एका आरक्षी चौकीत ठेवले होते आणि सोडून दिले होते. चौकशी झाली. आपल्या मुलावर लक्ष ठेवा, अशी वडिलांना रत्नागिरीला सूचना आली.

आपला मुलगा निदान आपल्या दृष्टीत असावा म्हणून नथुरामला वडिलांनी

रत्नागिरीला बोलावले. तो आपले कातकामाचे साहित्य घेऊन आला होता. परंतु रत्नागिरीला आल्यावर सावरकरांच्या कार्यक्रमाकडे त्याचा ओढा होता. त्याचा व्यवसाय तेथेच राहिला.

वडील रत्नागिरीला सेवानिवृत्त झाले. दत्ता, शांता, गोपाळ आणि गोविंद यांचे शिक्षण अद्याप पुरे झालेले नव्हते. पुण्याच्या मानाने सांगलीला राहणे परवडण्याजोगे असल्याने हे कुटुंब सांगलीला आले.

वर्षभरात शांताचे लग्न झाले. इतर मुलांचे शिक्षण चालू होते. नथुराम शिवणकाम शिकला. 'उद्यम मंडळ' नावाचे त्याने शिवणालय काढले.

हिन्दुंना संघटित करण्याच्या हेतूने राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही संस्था नावारूपास येत होती. डॉक्टर हेडगेवार संघाचे प्रणेते होते. डॉक्टर मुंजे, बाबाराव सावरकर यांचे सक्रिय सहकार्य डॉक्टर हेडगेवार यांना मिळाले होते. रत्नागिरीला सावरकरांच्या कानावर संघाचे कार्य येत असे. काही वाचून आणि काही ऐकून नथुरामला संघ या संस्थेविषयी समजले होते, पण प्रत्यक्ष संबंध आला नव्हता.

स्वराज्यप्राप्तीच्या कामात मुसलमान समाजाची वृत्ती कधी उदासीन असे तर कधी विरोधी असे हे तेव्हाही लक्षात येण्यासारखे स्पष्ट झाले होते. या अडचणीला पुरून उरेल इतका संघटित आणि बलशाली हिन्दुसमाज व्हावा अशी संघाची दृष्टी होती. सावरकरांनी हा दृष्टिकोण पुढे सूत्रबद्ध केला होता. 'पाल तर तुमच्यासह' इत्यादी ते सूत्र होते.

नथुरामला संघाची भूमिका पटली. रत्नागिरीचे पतितपावन मंदिर ही दगडविटांची वास्तू होती आणि ती त्या आसपासच्या परिसरापुरती मर्यादित होती. संघ हे सर्व हिन्दुंना सामावून घेणारे वास्तुविहीन मंदिर होते. संपूर्ण हिन्दुस्थान हे त्याचे आयोजित कार्यक्षेत्र होते. राष्ट्र बलशाली करण्याचीच त्यांची प्रतिज्ञा असल्याने स्वराज्य मिळविण्याचा भाग त्या प्रतिज्ञेत समाविष्ट होता. संघाच्या शाखा हळूहळू वाढत होत्या.

सांगली येथे संघाची शाखा निघाली. श्री. काशिनाथपंत लिमये संघचालक होते. नथुराम संघाचे कार्य आत्मीयतेने करू लागला. तो थोड्याच दिवसांत तेथील बौद्धिक कार्यवाह झाला.

सावरकर तेव्हा 'किर्लोस्कर' मासिकामधून हिन्दूसमाजातील विसंगत, संकुचित आणि हानिकारक रूढींवर टीकात्मक लेख लिहीत. सावरकरांशी प्रत्यक्ष परिचय झालेला असल्याने त्यांची तर्कशुद्ध मांडणी नथुरामने बघितली होती. या लेखांमुळेही तो प्रभावित होत असे.

नथुरामचा शिवणाचा व्यवसाय चालू होता. पण घरात आवश्यक तेवढे सहाय्य होत नसल्याने त्याने काही दिवस फळे विकण्याचा पूरक व्यवसाय केला होता. पण एकंदरीत यशस्वी व्यवसाय करणे त्याला जमले नाही.

रत्नागिरीस असल्यापासूनच नथुरामच्या लग्नाचा विषय अधूनमधून निघत असे. पण लग्नाला आलेल्या बहिणीचे लग्न व्हायचे असल्याने त्या प्रश्नाला तशी चालना मिळाली नाही. तरीही प्रश्न निघे तेव्हा 'मला लग्न करायचे नाही' असे त्याचे सांगणे असे. थोडे वय वाढल्यावर त्याला लग्न करावेसे वाटेल असे आईवडिलांना वाटे.

सांगलीला दत्ताची इंटर सायन्सची परीक्षा झाली. त्याला बरचा वर्ग मिळू शकला नाही, त्यामुळे शिष्यवृत्ती मिळाली नाही. त्याने शिक्षण तेथेच सोडले. यंत्रविषयक शिक्षणाचा एक लहानसा अभ्यासक्रम पुरा करून तो व्यवसायाला लागला होता. त्याचे वय लग्नाचे झाले होते. शांताचे लग्न होऊन गेले होते.

वडील एकदा पुष्कळ आजारी पडले. नथुरामचे लग्न करावे हा त्यांना ध्यास होता. नथुरामसाठी ती परीक्षाच होती.

'लग्नासंबंधी मी जर काही विचार केला असेल तर लग्न करावयाचे नाही हाच केला आहे.' असे त्याने सांगितले. त्याचे म्हणणे असे की, मी सुखी व्हावे म्हणून मी संसारी व्हावे अशी आपली अपेक्षा आहे. पण लग्न करून मी सुखी होणार नाही. माझे मन तशा संसारात नाही. आपल्या शब्दांसाठी मी लग्न करावे आणि मी कष्टी झालेला आपण बघावे याचे आपणास दुःखच वाटेल. आपल्या घरापुरते बोलायचे तर, आपल्या घरातील वडील मुलगा या नात्याने दुसऱ्यांचे संसार सुखी झालेले बघण्यात मला आनंद वाटेल. आपण दत्ताच्या लग्नासाठी स्थळे बघा, मीही बघेन. तो लग्नाचा झाला आहे. केवळ माझ्या सुखासाठी म्हणूनच, आपल्या मोठ्या मुलाच्या सुखासाठी म्हणूनच, मला लग्नाचा आग्रह धरू नका.'

आई-वडिलांचा निरुपाय झाला. नथुरामचे लग्न करावे हा विचार वडिलांनी आपल्या मनातून काढून टाकला. काही दिवसांनी त्यांना बरे वाटू लागले. वर्ष-सहा महिन्यांनी दत्ताचे लग्न झाले.

कूपर-जमनादास मंत्रिमंडळाने १९३७ मध्ये सावरकरांची मुक्तता करविली. मुंबईस जाता जाता सावरकरांची कोल्हापूर, मिरज, सांगली या ठिकाणी व्याख्याने झाली.

नथुराम सावरकरांच्याबरोबर ठिकठिकाणी हिंडू लागला. सर्व हिन्दूंना एकसंघ करण्याचे कार्य किती प्रचंड आहे याची त्याला कल्पना येऊ लागली. संघकार्याला राजकीय क्षेत्रातील उत्थानाची जोड आवश्यक असल्याचे त्याला कळू लागले. त्याची दृष्टी व्यापक झाली. सांगली हे ठिकाण त्याच्या कार्यक्षेत्राला त्याला आता अपुरे वाटू लागले.

सांगली सोडून देऊन नथुराम पुण्याला गेला. व्यवसाय शिवणकामाचाच होता पण संघ आणि हिन्दुसभा यांच्या कामातच त्याचा पुष्कळ वेळ जात असे.

स्वतःच्या प्रभेने सावरकर हिन्दुस्थानला नव्याने परिचित होत होते. अनुनयाने नव्हे तर स्वाभिमानाने स्वराज्य मिळविण्याची त्यांची सूत्रे त्या वेळपर्यंतच्या राजकारणाला अपरिचित

होती. आपण भोळे राहिलो तर काय घडेल हे त्यांनी सांगावे, आपण भ्रांतपणात वावरत रहावे, आणि परिणाम सावरकरांनी भाकित केल्याप्रमाणे व्हावा याचा प्रत्यय सारखा येऊ लागला होता.

पुण्याच्या एका सभेत आचार्य अत्रे यांनी सावरकरांना 'स्वातंत्र्यवीर' ही सार्थ उपाधी दिली. आज सावरकरांच्या पश्चातही लोक ती उपाधी त्यांना लावतात. १९०८ चे सावरकर आम्हाला पटतात हे लोकांनी १९३८ मध्ये म्हणताच, १९३८ चे सावरकर पटण्यास आपणास १९६८ ची वाट बघावी लागेल असे सावरकरांनी म्हणावे इतका आत्मविश्वास त्यांना स्वतःच्या मार्गदर्शनाचा आणि वादाचा वाटत असे. आसेतु हिमाचल असंख्य तरुण त्यांच्या विचारसरणीने प्रभावित झाले. नथुराम आधीच प्रभावित झालेला होता.

हैद्राबाद संस्थानातील हिन्दुंवरील अन्याय नाहीसा व्हावा, त्यांना त्यांचे न्याय्य अधिकार मिळावेत, यासाठी हिन्दुमहासभेने १९३८ मध्ये आंदोलन करण्याचे ठरविले. निःशस्त्र प्रतिकार ही त्या आंदोलनाला संज्ञा होती. सत्याग्रह आणि निःशस्त्र प्रतिकार यांच्या परिणामात साम्य होते. पण तत्त्वतः अंतर होते ते हे की, सत्याग्रह या प्रणालित, शस्त्र घेण्याचेच नाही असा अकारणभाव होता, तर निःशस्त्र प्रतिकार प्रणालीत, शस्त्र घेण्याची शक्यता नाही म्हणून निःशस्त्रता असा आपद्धर्मभाव होता.

नथुरामने पहिल्या तुकडीचे नेतृत्त्व केले होते. तो आणि त्याचे सहकारी यांना एक वर्षाची शिक्षा झाली होती. ती हैद्राबाद बंदिगृहात भोगली. पुढे हैद्राबादचा निजाम आणि हिन्दुसभेच्या नेत्यांमध्ये वाटाघाटी झाल्या. काही प्रमाणात अधिकार पदरात पडले. सत्याग्रह संपला.

हिन्दुसंघटनांचे सर्वांगीण काम करताना अधिक अडचण भासली असेल तर ती प्रचार यंत्र हाती नसल्याची, हिन्दुसभेच्या ध्येय-धोरणाचा पुरस्कार आणि प्रचार करणारे एखादे वृत्तपत्र आपण काढावे असे नथुरामने आपल्या मित्रवर्गाच्या परामर्शाने ठरविले. मार्च १९४४ मध्ये 'अग्रणी' या पूर्वी एकेकाळी चालू असलेल्या वृत्तपत्राचे दैनिकात रूपांतर करून पुनरुज्जीवन केले. त्यावेळी महायुद्ध चालू होते. म्हणून नवीन वृत्तपत्र काढण्याची बंदी असे. काही वर्षांनी त्या वृत्तपत्राचे 'हिन्दुराष्ट्र' म्हणून नामांतर झाले.

या वृत्तपत्राकडून एकापाठोपाठ एक प्रतिभूती (Securities) मागितल्या गेल्या. ३१ जानेवारी १९४८ चा शेवटचा अंक निघून हे वृत्तपत्र बंद पडले. नथुराम संपादक होता. नाना आपटे संचालक होते.

१९४८ पूर्वीच्या सहा-सात वर्षांचा नथुरामच्या आयुष्याचा काळ लेख, दौरे, व्याख्याने, आणि वृत्तपत्र चालविण्यासाठी कराव्या लागणाऱ्या खटपटी यांनी भरलेला होता. त्यांचा आढावा घेण्यास स्वतंत्र लेख लिहावा लागेल. हिन्दु राष्ट्रसंघटन या कार्याला त्याने

वाहून घेतले होते एवढे सार प्रस्तुत लेखाच्या संदर्भासाठी पुरे होईल.

वृत्तीने नथुराम शांत होता. मनाने उदार होता. राजकीय व्यासपीठावर मात्र तो पुष्कळदा आपले मन ओतत असे. त्यातून त्याच्या टोकाला पोहोचू पाहणाऱ्या परंतु संयमाने अडवून ठेवलेल्या भावनांचा संकेत कधी कधी मिळत असे. संभाषणात तो कोणाला दुखवीत नसे, आणि व्यक्तिगत पातळीवरील टीका कधी करीत नसे. परस्परविरोधी राजकीय विचारधारेच्या मंडळीतही त्याचे अनेक मित्र होते. पुण्याच्या एका बोलपटाच्या उद्घाटनाच्या दिवशी एका चालकाने काका गाडगीळ आणि नथुराम या दोघांना सन्माननीय पाहुणे म्हणून बोलावले. ते आपापसात बोलत असताना इतर लोकांनी पाहिले आणि हे परस्परविरोधी लोक इतक्या खेळीमेळीने कसे वागतात याचे त्यांना आश्चर्य वाटले.

मनोरंजनासाठी जमलेल्या एका मेळाव्यात नथुराम गेला होता. हास्यविनोदात वेळ जात होता. नथुराम मध्येच बोलू लागला तेव्हा बरोबरीच्या मंडळींनी त्याला सांगितले, 'पंडित आजचा तुझा दिवस नाही. तुझे व्याख्यान ऐकायला आम्ही शनिवारवाड्यापुढे जमू.' करमणूकच ती ! सर्वजण हसले.

तेवढ्यात कोणीतरी भावगीत म्हणू लागले. त्या घरात बाजाची पेटी होती. नथुरामने थांब म्हणून खूण केली, घरात गेला. पेटी आणली आणि पेटी वाजवण्याच्या थाटात पेटीपाशी बसून त्याने पवित्रा घेतला ! आणखी एक विनोद झाला ! 'तू म्हण रे, त्याच्याकडे लक्ष देऊ नको.' म्हणून त्या भावगीत म्हणणाऱ्याला लोकांनी आग्रह केला.

नथुरामने सूर लावून घेतला होता. भावगीत चालू झाले. नथुरामने पेटीची साथ दिली. प्रथम प्रथम विनोदी वाटणारी गोष्ट खरोखरीचे पेटीवादन ठरलेले बघून लोकांना आश्चर्य वाटले. त्याला पेटी वाजवता येते हे त्यापैकी कोणालाच ठाऊक नव्हते. कधी तसा प्रसंगच आला नव्हता. नंतर एक-दोन गाणी त्याने पेटीवर वाजवून दाखविली. 'दे हाता या शरणागता' हे त्याचे आवडते पद होते. शास्त्रीय संगीताची त्याला आवड होती. ते त्याला समजत असे.

कॉफी हे त्याचे आवडते पेय. समजत्या वयापासून चहा त्याने घेतला नाही, पण कॉफीचा नाद फार असे. त्याला व्यसन म्हणायचे नाही याचे कारण इतकेच की, कॉफीवाचून काम अडले असे झाले नाही.

तो फाशी कोठडीत असताना एका संध्याकाळी मी आणि करकरे त्याच्याकडे गेलो होतो. बंदिगृहाचे अधीक्षकही सहज तिकडे आले होते. करकरे यांना नथुरामने थोडी कॉफी धाडण्यास सांगितले. अधीक्षक म्हणाले, 'का बरे, संध्याकाळच्या कॉफीला इतका उशीर का झाला ?'

नथुरामने सांगितले, 'संध्याकाळची कॉफी झाली आहे. मला आणखी घ्यावीशी वाटते म्हणून मागविली. आपणही थोडी घ्या.' पुढे हसत म्हणाला, 'फाशीचे ठीक आहे;

पण मला आधी घोटभर कॉफी द्यायला सांगा बरं का !'

(I do not mind the gallows, but I must have a cup of coffee before the execution !)

कॉफी आणली गेली, आणि कॉफीपान झाले.

असे आहे नथुरामचे त्रोटक पूर्ववृत्त. क्रांतिकारकांचा अध्यात्मवाद असतो, असे वेगवेगळ्या क्रांतिकारकांची चरित्रे वाचून माझे मत झाले आहे. त्या अध्यात्मवादामुळे ते मृत्यूसमोर ताठ राहू शकतात असे माझे प्रमेय आहे. याची चर्चा पुन्हा केव्हा तरी करू.

श्री. रामदास गांधी यांना लिहिलेल्या उत्तरात स्वतःच्या पूर्ववृत्ताविषयी नथुरामने इतकेच लिहिले आहे की, अटकेपूर्वीपर्यंतची माझी सर्वसाधारण वागणूक आणि चारित्र्य कसे होते याची परस्पर चौकशी करावी. श्री. रामदास गांधी यांचे प्रारंभी उल्लेखिलेले पत्र आणि नथुरामचे त्या पत्राला उत्तर यांचा अनुवाद देऊन हा अध्याय संपवू.

खलासी लाईन्स, नागपूर
दिनांक १३ जून १९४९.

प्रिय श्री. नथुराम गोडसे,

आपले दि. ३ जून १९४९ चे पत्र मिळाले.

आपण नेहमी विचारग्रहणास मोकळे आहात हे वाचून मला आनंद वाटतो. तसेच, आपण अनुसरलेले मार्ग आणि साधने आपल्या मातृभूमीचे एकत्व (Integrity) टिकविण्यास, किंवा प्रचलित कोणत्याही धर्माप्रमाणे जो कोणत्याही प्रकारच्या भेदभावापासून अलिप्त आहे त्या आपल्या शतकानुशतकांच्या पुरातन हिन्दुधर्माचे एकत्त्व टिकविण्यास उपयुक्त ठरले आहे काय, किंवा भविष्यकाळी कधी उपयुक्त ठरण्याची शक्यता आहे काय, या प्रश्नावर माझ्याशी आणि माझ्या वडिलांच्या घनिष्ट सहकाऱ्यांशी मनमोकळे बोलणे करण्याची आपण व्यक्त केलेली इच्छा उत्साहदायी आहे.

त्याप्रमाणे, हिन्दुस्थान शासनाच्या वतीने, तसेच मी किंवा माझ्यासह जे येतील त्यांच्या वतीने, आपल्याशी बोलणे करण्यासंबंधीचे कोणतेही वचन न देता मी पंडित जवाहरलाल नेहरू यांना आज श्री. विनोबा भावे, श्री. किशोरीलाल मश्रूवाला आणि मी यांना आपल्याशी वरील विषयावर बोलणे करण्याची अनुज्ञा मिळावी अशी विनंती करीत आहे, कारण, आपली तशी अंतःकरणपूर्वक इच्छा आहे.

ही संकल्पित बोलणी होण्याची जर नियतीची योजना असेल तर ती बोलणी होणे २५ जून १९४९ नंतरच शक्य होईल, कारण नागपूरहून दिल्लीला येण्यास आणि तेथून पुढे आपणास ठेवले आहे त्या ठिकाणी येण्यास २५ जूनपूर्वी मला जमणार नाही, हे कृपया ध्यानात ठेवावे.

मला वाटते, आपण 'आपण सत्याला धरूनच बोलले पाहिजे' अशी अट अभिसंविदित (Stipulate) करण्यास नको होती. कारण; मला वाटते, ती माझ्या संबंधातच अनावश्यक होती असे नव्हे तर माझ्या वडिलांच्या कोणाही निकट सहकाऱ्यांच्या संबंधातही अनावश्यक होती.

मध्यंतरीच्या वेळात, आपल्याजवळ असलेला तो सर्व उपलब्ध वेळ आपण आत्मसंशोधनात व्यतीत करावा आणि तो जगन्नियंत्यावर पूर्ण श्रद्धा ठेवून, असे मला आपणास सुचविण्याचे आहे; तसेच 'तो'च आपल्यावर त्याची प्रसादपूर्ण कृपादृष्टी करील अशी प्रार्थना करावी; कारण अशी कृपाच केवळ आपणास आपला प्रमाद लक्षात आणून देण्यास सहाय्य करील असे मला वाटते. आणि आपली मातृभूमी आणि विशेषतः हिन्दुधर्म यांचे अवहेलनेपासून किंवा आक्रमकापासून (from insult or injury) रक्षण कसे करावे हे गांधीजी शेवटी उत्तम प्रकारे जाणून होते याचाही आपणास साक्षात्कार होईल. आपण जर हे केलेत तर आपण आणि आम्ही यांच्यातील संकल्पित भेटीच्या अंती, आपण सौंदर्याने आणि अर्थाने परिपूर्ण काव्यखंड जी भगवद्गीता तिच्यातील १८ व्या अध्यायातील हा श्लोक आमच्यासह म्हणू शकाल असा मला विश्वास वाटतो.

नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा त्वप्रसादान्मयाच्युत ।
स्थितोऽस्मि गतसंदेहः करिष्ये वचनं तव ।

आपला सद्भावी
आर. एम. गांधी

नथुरामने धाडलेले उत्तर :

मध्यवर्ती बंदिगृह, अंबाला
२४-६-१९४९

प्रिय श्री. रामदास गांधी,

आपले चालू महिन्याच्या १३ चे पत्र २३ जूनला मिळाले आणि आशय समजला.

आपण माझ्या विनंतीला प्रतिसाद दिलात याने मला संतोष वाटतो. आपल्याला सोयीचे असेल अशा कोणत्याही वेळी आपण यावे. माझ्या फाशीच्या एक दिवस आधीही आपण भेटू शकता. या भेटीसंबंधी मी उतावीळ नाही. माझी भेट घेण्याचा आपला मानस आहे यानेही मला एक प्रकारचे समाधान मिळाले आहे. आपण आणखी काही अडचणीमुळे मला मुळीच भेटलाही नाहीत तरीही त्याचे मला काही वाटणार नाही; कारण मनाने आपण माझ्या भेटीची सिद्धता दाखविलीत यातूनच आपल्या हेतूची कळकळ व्यक्त होत आहे, ते मला पुरे होईल.

आपण ही भेट घेण्याचा प्रयत्न करावा ही मात्र माझी आपणास विनंती आहे.

'सत्य तेच बोलले जावे' असे अभिसंवेदन मी करावयास नको होते या आपल्या म्हणण्याशी मी सहमत आहे. ते लिहिताना आपणास दुखविण्याचा माझा हेतू नव्हता यावर आपण विश्वास ठेवा; पण त्या लिहिण्यामागे माझ्या मनात मुख्यतः दोन कारणे होती. 'सत्य' या ब्रीदाचे अनेक तथाकथित उपासक मला भेटले आहेत. त्यांना त्यांच्या प्रत्यक्ष व्यवहारात मात्र त्या ब्रीदाचे सोयरसुतकही नसते. शपथेवर विकृत सत्य बोलताना तर मी काही जण साक्षीदारांच्या पिंजऱ्यात बघितले.

आणि दुसरे कारण, आपल्या संभाषणात मला कदाचित काही कटू सत्य बोलावे लागेल, निदान माझ्या धारणेप्रमाणे ते सत्य असेल आणि कटू असेल.

काही असो. मी निर्भीडपणे बोलण्याची भीती बाळगू नये एवढे आश्वासन मला आपल्या पत्राने मिळाले आहे.

'नष्टो मोहःस्मृतिर्लब्धा' या भगवद्गीतेतील श्लोकाची मला आठवण करून दिलीत यासाठी आभार. मला म्हणाल तर, गीतेतील हाच श्लोक नव्हे तर सर्वच गीता अर्थाने आणि सौंदर्याने ओतप्रोत अशी अमूल्य कविता आहे.

'करिष्ये वचनं तव' असे अर्जुनाने म्हटल्यानंतर श्रीकृष्णाचे 'मामनुस्मर युद्धय च' हे शब्द त्याने प्रत्यक्ष कृतीत उतरविले होते.

श्री. विनोबा भावे जन्मतःच महाराष्ट्रीय आहेत. त्यांच्याकरवी किंवा आणखी कोणाकरवी आपण माझ्या अटकेपूर्वीपर्यंतच्या सर्वसाधारण चारित्र्याची आणि वर्तनाची आपणास शक्य झाले तर विचारपूस करावी. ज्या व्यक्तीने एक क्रूर अवैध कृत्य केले आहे, त्याची पार्श्वभूमी कळून येणे आपणास कदाचित उपयुक्त ठरेल. सध्या अधिक काही नाही.

आपला सद्भावी
नथुराम वि. गोडसे

卐 卐

सहा

उत्सर्ग

दिल्लीच्या लाल किल्ल्यातील विशेष न्यायालयाचे न्यायमूर्ती स्वर्गीय श्री. आत्मचरण यांनी दि. १०-२-१९४९ या दिवशी गांधीहत्या अभियोगाचा निर्णय दिला. नथुराम गोडसे आणि नाना आपटे यांना फाशी; विष्णू करकरे, मदनलाल पाहवा, गोपाळ गोडसे, शंकर किस्तैया आणि डॉक्टर परचुरे यांना जन्मठेप. या व्यतिरिक्त आणखी शिक्षा होत्या; पण त्या मुख्य आणि मोठ्या शिक्षेच्या पोटात भोगण्याच्या होत्या. दिगंबर बडगे याला संपूर्ण क्षमा. वीर सावरकर यांची निष्कलंक मुक्तता.

देशगौरव सुभाषचंद्र बोस यांच्या स्वतंत्र भारत सेनेच्या अभियुक्तांसाठी लाल किल्ल्यातील एक भाग बंदिगृह म्हणून वापरला गेला होता. तोच भाग नीटनेटका करून गांधी हत्या अभियोगातील आरोपींसाठी वापरला गेला.

तटाच्या जाड भिंतींच्या पोटात ज्या ओऱ्या काढतात त्या ओऱ्यांची ती ओळ होती. सात ओऱ्या आरोपी ठेवण्यासाठी होत्या. ओऱ्यांसमोर पडवी होती. ती काटेरी तारेने बंदिस्त केली होती. दोन खोल्यांसमोरील पडवी एका भिंतीने इतर खोल्यांसमोरील पडवीपासून विभक्त केली होती.

बडगे क्षमेचा साक्षीदार म्हणून आणि शंकर किस्तैय्या बडगेच्या साक्षीला पूरक विधान करण्याची शक्यता वाटत होती म्हणून या दोघांना त्या वेगळ्या भागात ठेवले होते. उरलेल्या पाच खोल्यांतील एकात मदनलाल, एकात नथुराम गोडसे आणि गोपाळ गोडसे, एकात डॉक्टर परचुरे, एकात नाना आपटे आणि विष्णु करकरे आणि एकात वीर सावरकर असत.

निर्णय लागताच दंडितांना पाच बंदिगृहात आणले. नथुराम आणि नाना गोडसे यांना फाशी सांगितली म्हणून त्यांना त्या वेगळ्या भागात ठेवले. उरलेल्या पाच दंडितांना दुसऱ्या भागातील एकेका खोलीत ठेवले.

प्रत्येक दिवशी खोली बदलली जात असे. या पद्धतीला 'उडदी' म्हणत. एकाच खोलीत वास्तव्य राहिल्यास बंधाला भिंतीला भोक पाडण्याची, गज कापण्याची किंवा अन्य उपायाने पळून जाण्याची व्यवस्था करण्याची शक्यता निर्माण होते. म्हणून पूर्वदक्षतेसाठी तसा नियम केला आहे.

दीर्घावधीच्या बंधांना तीन शेरी दंडाबेडी घालण्याचा नियम होता. सायंकाळी आम्हा पाच बंधांच्या पायात दंडाबेडी घातली गेली.

जन्मठेप ही निष्कासनाची म्हणजे Transportation ची शिक्षा असे. दंडिताला सीमापार करेपर्यंत त्याला बंदिगृहात ठेवणे अनिवार्य असे. दंडित बंदिगृहात असेपर्यंत जन्मठेप ही सश्रम शिक्षा असते. दुसऱ्या दिवशी आम्हाला पाकिटे करण्याचे काम दिले गेले. ते सकाळपासून संध्याकाळपर्यंत चाले. जेवणाच्या वेळी सुट्टी असे.

खटल्याच्या निर्णयापर्यंत आम्हा सर्वांना 'ब' वर्ग होता. निर्णयपत्रात वर्गाचा उल्लेख नव्हता. म्हणून शिक्षा लागताच आमचा 'क' वर्ग झाला.

वर्ग मिळावा म्हणून आम्ही आवेदने केली. मदनलालने तीन-चार दिवसांनी उपोषण चालू केले. सहा एक दिवसांनी त्याने उपोषण सोडले.

सदतीस दिवसांनी आम्हास सात जणांपैकी सहांना 'ब' वर्ग मिळाला. नथुराम, नाना आपटे, करकरे, मदनलाल, गोपाळ गोडसे आणि डॉ. परचुरे. शंकर किस्तैया याला वर्ग मिळाला नाही.

फाशी सांगितलेल्यांनाही वर्ग मिळाला. याचे प्रमुख कारण स्वर्गीय सरदार वल्लभभाई पटेल यांचा विशाल दृष्टिकोण.

शिक्षेविरुद्ध पुनर्न्याय मागण्याला पंधरा दिवसांचा अवधी दिला होता. दिल्लीत उच्च न्यायालय पंजाबचे असते; ते त्यावेळी सिमला येथे बसत असे.

ठराविक अवधीत दंडितांनी आपापली आवेदने दिली. नथुरामने दंडविधान म्हणजे Penal Code धारा ३०२ प्रमाणे सिद्ध झालेला आरोप आणि त्यासाठी झालेली शिक्षा याविरुद्ध पुनर्न्याय मागितला नाही. इतर आरोप त्याच्याविरुद्ध सिद्ध मानले होते त्याविरुद्ध त्याचे आवेदन होते.

स्वतःचे आवेदन स्वतःच चालविण्याची अनुज्ञा मिळावी अशी त्याने विनंती केली होती. त्याची विनंती मान्य झाली.

विशेष बंदिगृहातच फाशीची व्यवस्था करण्यापेक्षा फाशीची व्यवस्था असलेल्या आणि सिमला येथे नथुरामला नेणे सोयीचे पडावे अशा बंदिगृहात आम्हाला हलविण्याचे ठरले. त्याप्रमाणे दि. ९-४-१९४९ ला सकाळी आम्हाला मोटारने पानिपतमार्गे अंबाला बंदिगृहात नेण्यात आले.

आम्ही सर्व दंडित एकाच मोटारीत होतो. फाशीवाले बंदी बऱ्याच दिवसांनी मोकळेपणाने भेटले होते, त्यामुळे सर्वांची मने प्रसन्न होती. गप्पागोष्टी, हास्यविनोद यांना बहर आला होता.

आम्ही कोणत्या मार्गाने जात आहोत याची आम्हाला कल्पना नव्हती. तो प्रदेशही पायाखालचा किंवा दृष्टिखालचा नव्हता. आरक्षी दल आणि त्याचे नायक चांगले होते. आमच्या बोलण्यातही ते अधूनमधून सहभागी होत. वाहन कोणत्या ठिकाणाहून जात आहे ते मोकळेपणाने सांगत.

पानिपत जात आहे असे अधिकाऱ्याने सांगताच आमच्या मनात विचार आला, क्षणभर या भूमीवर उतरावे. प्रश्न भावनांचाच केवळ असतो. महाराष्ट्राचे पानिपतशी फार जवळचे नाते आहे. जवळजवळ दोनशे वर्षांनंतरही ते बंध मनात उभे राहतात.

पाय मोकळे करण्यासाठी थोडा वेळ गाडी थांबवा असे अधिकाऱ्यांना सांगताच त्यांनी ती विनंती मान्य केली. आम्ही खाली उतरलो. रस्त्याच्या बाजूला झाडे होती, त्या सावलीत क्षणभर विसावलो. पुन्हा गाडीत चढलो. गाडी चालू झाली. अंबाला बंदिगृहात ती थांबली.

त्या बंदिगृहात चांगल्या बांधलेल्या चार फाशी कोठ्या होत्या. नथुराम आणि नाना यांस तेथे नेण्यात आले. आम्हा पाच जणांसाठी बंदिगृहाच्या प्रवेशद्वाराजवळ असलेला एक भाग मोकळा होता. त्यात दोन मोठ्या खोल्या होत्या. एक स्वयंपाकघर होते. शौचकूप वेगळा होता. समोर अंगण होते. ते भिंतीने बंदिस्त होते.

आम्हाला खुर्च्यांना वेत विणण्याचे आणि चिकाचे पडदे विणण्याचे काम दिले गेले.

फाशी कोठडीत जाऊन आम्हाला नथुराम आणि नाना आपटे यांना वारंवार भेटता येत असे. त्यांचे अन्नही आमच्या स्वयंपाकघरातून शिजवून धाडण्यात येत असे.

लाल किल्ल्यातील बंदिस्त कक्षेपेक्षा येथील बंदिस्त कक्षा पुष्कळच विस्तृत होती. त्यामुळे हिंडणे, फिरणे, खेळणे शक्य होई.

पण अंबाल्यात आमचा सर्वांत मोठा संतोष असेल तर तो अधिकाऱ्यांची सहानुभूतिपूर्ण वागणूक.

या सहानुभूतिपूर्ण वागणुकीला दोन कारणे होती. अधिकाऱ्यांनी काही दिवस आम्हा सर्वांचे बारकाईने निरीक्षण केले. निर्बंधाप्रमाणे आम्ही 'क्रिमिनल' या व्याख्येत मोडत असलो तरी 'क्रिमिनल' चा कोणताच धर्म त्यांना आमच्यात आढळला नाही. दुसरे, पाकिस्तान झाल्याने कुटुंबा-कुटंबाचीही जी चिरफाड झाली त्यातून त्या अधिकाऱ्यांपैकी किंवा तेथील कर्मचाऱ्यांपैकी कोणीच कोरडा राहिला नव्हता. घरेदारे तर सर्वांचीच नाहीशी झाली होती. कोणाचे नातेवाईक मारले गेले होते, कोणाची बायामाणसे अपहृत झाली होती, तर कोणी

स्वतःच व्रणित स्थितीत भारतात पोचले होते.

गांधीजींची हत्या का झाली हे त्यांना बोलता येत नसले तरी त्याची त्यांना जाणीव होती. स्वतःच्या अधिकारातील जे म्हणून अधिकात अधिक देणे शक्य असेल ते त्यांनी आम्हांला दिले होते. त्या व्यतिरिक्त त्यांनी त्यांचे मनुष्यस्वभावानुरूप एकमेकांच्या वागणुकीतून उत्पन्न होणारे प्रेम आमच्यावर ओतले होते.

उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री. भंडारी, श्री. अच्छरूराम आणि श्री. खोसला यांचे न्यायासन ही आवेदने चालविण्यास नियुक्त केले गेले.

सिमला उच्च न्यायालयाचा आवेदन ऐकण्याचा दिवस ठरला. अभिलेख (record) मुद्रित केले गेले होते. त्या अभिलेखांची एकेक प्रत आवेदकांना दिली गेली. ज्यांनी त्यांनी ती आपापल्या विधिज्ञांना दिली. नथुरामला स्वतःच आवेदन चालविण्याची अनुज्ञा मिळाल्याने त्याने कागदपत्रांचा अभ्यास केला.

नथुरामला सिमला येथे नेण्यात आले. त्याचे तेथील वास्तव्य आणि उच्च न्यायालयातील वक्तव्य हा स्वतंत्र प्रकरणाचा विषय आहे. त्याच्या तेथील वास्तव्यासंबंधी जाता जाता थोडेसे सांगायचे म्हणजे, तो स्वतः अभियोग चालविणार आहे हा एक कुतुहलाचा विषय होता. त्यातून फाशीविरुद्ध त्याचे गाऱ्हाणे नव्हते यामुळे, ही टांगती तलवार डोक्यावर बागवून मनुष्य स्थिरपणे संबंधित विषयाचे सुसंगत विवेचन न्यायालयासारख्या ठिकाणी कसे करू शकतो हे जाणण्याची उत्कंठा तेथील लोकांना होती.

न्यायालयात जाण्यासाठी प्रवेशिका दिल्या जात, तेथील लोक प्रवेशिका मिळवीत आणि अभियोग ऐकण्यासाठी म्हणून जात. नथुरामचे वक्तव्य चालू झाल्या दिवसापासून न्यायालय तुडुंब भरलेले असे.

आरक्षी अधिकाऱ्यांच्या आणि न्यायालयाच्या अधिकाऱ्यांच्या ओळखीने अनेक लोक नथुरामला त्याच्या बंदिस्त स्थानी भेटत असत. काहींना त्याच्याशी थोडीफार चर्चा करायची संधी मिळत असे.

प्रेक्षकवर्ग प्रामुख्याने उच्चभ्रू असे. सिमल्याला वास्तव्य बहुधा अशा लोकांचे असे. स्वर्गीय मौलाना आझाद यांनी India Wins Freedom हे पुस्तक लिहिले आहे त्यात त्यांनी म्हटले आहे : थोरा-मोठ्यांच्या मुली नथुरामला सिमल्याला त्याचा अभियोग चालू असताना स्वेटरसारख्या वस्तू भेट देत असत. (Some women from respectalbe families sent him [Nathuram] a sweater they had knitted for him. IndiaWins Freedom. Page 225) नथुरामला वीरपुरुष मानण्याची वृत्ती थोरा-मोठ्यातही होती हे त्यांना निदर्शनास आणावयाचे आहे.

मौलानांचा उल्लेख खरा आहे. 'हा स्वेटर घालून उद्या न्यायालयात या. आम्ही

अमक्यांनी मिळून ही भेट दिली आहे.' अशासारख्या विनंत्या योग्य अधिकाऱ्यांकरवी नथुरामपर्यंत येत. तशासारख्या विनंत्या मान्य करण्याने त्याच्या वक्तव्यातही काही खंड येणार नव्हता. किंवा अन्य प्रकारेही काही बिघडणार नव्हते. सिमल्याला थंडी असे. तो स्वेटर घालीत असे; हा काय अन् तो काय, स्वेटर असला म्हणजे झाले ! तो त्या भेट देणाऱ्यांचे समाधान करीत असे.

नथुरामच्या वक्तव्याने लोक किती भारावले होते याचे वर्णन त्यावेळचे न्यायमूर्ती श्री. खोसला यांनी आपल्या नुकत्याच लिहिलेल्या एका पुस्तकात केले आहे. ते म्हणतात - 'नथुरामचे वक्तव्य हीच प्रेक्षकवर्गाला एक आकर्षक गोष्ट होती. पुरे भरलेले न्यायालय इतके भावनावश झालेले होते की, त्यांचे उसासे अन् हुंदके ऐकू येत आणि त्यांचे डबडबलेले डोळे आणि ओघळणारे अश्रू दिसत असत. सर्व न्यायालयातील या प्रेक्षकांना न्यायदानाचे काम करण्यास सांगितले असते तर नथुराम निर्दोषी आहे असाच निर्णय त्यांनी प्रचंड बहुमताने दिला असता यात तिळमात्र संशय नाही.'

('The highlight of the appeal before us was the discourse delivered by Nathuram Godse in his defence. He spoke for several hours discussing, in the first instance, the facts of the case and then the motive which had prompted him to take Mahatma Gandhi's life) (The Murder of the Mahatma : Page 238)

"The audience was visibly and audibly moved. There was a deep silence when he ceased speaking. Many women were in tears and men were coughing and searching for their handkerchiefs. The silence was accentuated and made deeper by the sound of an occasional subdued sniff or a muffled cough.

'I have however no doubt that had the audience of that day been constituted into a jury and entrusted with the task of deciding Godse's appeal, they would have brought in a verdict of 'not guilty' by an overwhelming majority. [The Murder of the Mahatma, Page 234].

वास्तविक मला निर्दोष ठरवून फाशीतून मुक्त करा अशी नथुरामची न्यायासनालाही याचना नव्हती. उच्च न्यायालयाच्या न्यायपत्रात न्यायमूर्तींनी म्हटले आहे, नथुरामने, सिद्ध झालेला हत्येचा आरोप आणि भारतीय दंडविधान धारा ३०२ याप्रमाणे सुनावलेली फाशी याविरुद्ध पुनर्न्याय मागितलेला नाही. त्याने स्वतःचे आवेदन स्वतः चालविले आणि तो त्या वेळातही आपल्या आवेदनाच्या मर्यादित राहिला.

Of all the appellents Nathuram V. Godse has not challanged his conviction under Sec. 302 of the Inidan Penal code - nor has

he appealed from the sentence of death passed on him in respect of the offence. He has confined his appeal and also his arguments at the Bar only to the other charges which have been found proved against him. [High Court Judgement].

मी मनुष्यहत्या केली आहे, मला जगण्याचा अधिकार नाही, मी समाधानाने फाशी जाईन. फाशी दिली नाही तर तो न्यायदानावर अन्याय होईल, ही त्याची ठाम भूमिका शेवटपर्यंत होती. माझ्या भावना हत्या करण्याइतक्या पराकोटीला जाण्याला जी पार्श्वभूमी कारण झाली ती सत्य असेल तर तिचा विचार व्हावा, कारण तो इतिहास म्हणून राहणार आहे हा त्याच्या अभिव्यक्तव्यातील समारोपाचा आशय होता.

हत्या समर्थनीय आहे किंवा नाही हे ठरविण्यासाठी न्यायासनाने बघावयाच्या पार्श्वभूमीला एक विशिष्ट मर्यादा असते. नथुरामची पार्श्वभूमी व्यापक होती. ती न्यायासनाच्या विचारकक्षेत येणारी नव्हती. नथुराम हे जाणत होता. अन्यथा प्रेक्षकवर्ग कशाला, न्यायासनानेच नथुरामला निर्दोष ठरविले असते. न्यायमूर्ती श्री. खोसला यांच्या अभिप्रायातील निष्कर्ष एवढाच की, त्या व्यापक पार्श्वभूमीची सत्यासत्यता हा निकष धरला आणि प्रेक्षकवर्ग हे न्यायाधीश धरले तर त्यांनी नथुरामचे कृत्य समर्थनीय मानले असते आणि त्याला निर्दोष ठरविले असते.

असो. वर म्हटल्याप्रमाणे नथुरामचे सिमला येथील वास्तव्य आणि वक्तव्य याची आणखी कोण्या प्रकरणात चर्चा केली जाईल.

उच्च न्यायालयाचा निर्णय दि. २२-९-१९४९ या दिवशी लागला. शंकर किस्तैय्या आणि डॉ. परचुरे बंधमुक्त झाले. उरलेल्या पाचही दंडितांच्या शिक्षा त्याच राहिल्या. गोपाळ गोडसेच्या प्रकरणी शासनाने आपल्या अधिकारातील दयार्द्रता (clemancy) वापरावी अशी भलावणी न्यायमूर्तींनी आपल्या निर्णयपत्रात केली. नथुराम अंबाल्याला परत आला होता. आमच्या गाठीभेटी चालू होत्या.

फाशीच्या निश्चित दिवसाची प्रतीक्षा करता करता दि. १५-११-१९४९ हा दिवस ठरल्याचे कळले. फाशीचे दंडित नथुराम आणि नाना आपटे आणि जन्मठेप भोगीत असलेले तिघे - विष्णु करकरे, मदनलाल पाहवा आणि गोपाळ गोडसे हे सर्व अंबाला बंदिगृहात होते. अधिकाऱ्यांच्या सौजन्याने फाशीवाले आणि जन्मठेपेचे वरील बंदी यांच्या गाठीभेटी वारंवार होत असत.

दिनांक ठरल्यावर, संबंधितांना फाशीपूर्वी भेटता यावे म्हणून अधिकाऱ्यांनी त्यांच्या त्यांच्या घरी पत्रे धाडली होती.

आई-वडील वृद्ध आहेत, ते पुण्याला असतात; त्यांना भेटावयाचे आहे; त्यांना प्रवास झेपणार नाही, करिता मला येरवड्याला फाशी देण्यासाठी न्यावे म्हणजे बंदिगृहात

आईवडिलांना येणे शक्य होईल अशी नथुरामने विनंती केली होती. ती विनंती अस्वीकृत झाली होती.

दि. १३-११-१९४९ ला काही संबंधित बंदिगृहावर येऊन गेले होते. पण सर्वांचीच भेट दुसऱ्या दिवशी म्हणजे १४-११-१९४९ ला नियोजित केली गेली.

भेटीस तीस-पस्तीस जण आले होते. त्यांना सात-आठच्या गटांनी भेट देण्याचे काम दि. १४-११-१९४९ ला सकाळी दहा वाजल्यापासून चालू झाले. नथुराम आणि आपटे हे भेटणाराशी सहज बोलत असत. त्यांच्या मनावर उद्याच्या मृत्यूचे दडपण आहे अशी कल्पना येणेही कोणाला शक्य नव्हते. भेटणारी मंडळी भावनांनी भारावलेली असणे स्वाभाविक होते, परंतु बोलून चालूनच हा मृत्यू असहाय्य परिस्थितीत ओढवलेला नाही याची जाणीव त्यांना होती. सर्व मंडळी तितक्याच समतोलपणे बोलत होती.

नाना आपटे आणि त्यांची पत्नी चंपूताई यांची भेट हृदयस्पर्शी होती. नानांनी सांगितले, 'हे बघ, उद्यापासून तुला रडायचंच आहे. दुःख करू नये असे कितीही सांगितले तरी दुःख झाल्याबाचून राहात नाही. आपल्या वाटचाला हे काही क्षण एकत्र बोलण्यासाठी मिळाले आहेत. हे क्षण आपण समाधानाने घालवू !'

पतीची शेवटची इच्छा होती ! स्वतःच्या हृदयावर दगड ठेवून पत्नीने ती पुरी करायची होती. मनाच्या भावनांना कष्टाने बांध घालण्यात चंपूताईंना यश आले ! नाना घरच्या मंडळींची चौकशी चंपूताईंकडून करीत होते. चंपूताई शांत चित्ताने बोलत होत्या. अर्ध्या तासाची ती दोराखालची भेट अतिशय गंभीर पण तितक्याच संयमी मनःस्थितीत पार पडली.

भेटणाऱ्या मंडळींनी पुष्कळ खाद्यपदार्थ आणले होते. अधिकाऱ्यांनी ते नियमाप्रमाणे तपासले आणि आमच्या स्वाधीन केले. भेटीचा सोहळा संध्याकाळी पाच पर्यंत चालला होता.

फाशी जाणाऱ्यांचे आणि त्यांना भेटणाऱ्यांचे धीरोदत्त वर्तन अधिकाऱ्यांनी पाहिले. फारच क्वचित त्यांना असा प्रत्यय येत असे. सर्वसाधारणपणे दुःखावेगाचे कढ अशा भेटीतून दिसत असल्याचे त्यांच्या नेहमी पाहण्यात असे. पण या फाशीची एक राजकीय बैठक होती. अधिकारी वर्गाला कर्तव्यकठोर व्हावे लागत असे तरी अधिकारी मनुष्यच असतो. तो निर्दय नसतो. भेटीच्या सोहळ्यात अधिकारी पुष्कळदा गहिवरत असत.

नथुराम आणि नाना यांचे जेवण आमच्याकडून जात असे. आम्ही त्यांना संध्याकाळी जी ताटे वाढली त्यात भेटीत आलेले पदार्थच वाढले. उद्या दिसत असणाऱ्या मृत्युमुळे भूक उडाली आहे, किंवा उद्या मरायचे आहे, आज खाऊन घ्या हवे तेवढे, अशी वृत्ती दोघांचीही नव्हती. पदार्थ आप्तेष्टांनी धाडले आहेत हे त्यांना माहीत होते. त्या प्रत्येक वस्तूशी भावना निगडीत होत्या. वस्तू खाल्ल्या हे सांगता यावे म्हणून त्यांनी प्रत्येक वस्तू समाधानाने घेतली.

त्या त्या व्यक्तींना, पदार्थ चांगले झाले होते असा अभिप्राय द्या, त्यांना समाधान वाटेल, असे आम्हाला त्यांनी सांगितले.

रात्री आठला करकरे, मदनलाल आणि मी; नथुराम आणि आपटे यांच्या पुन्हा भेटीला गेलो. गीतेतील काही अध्याय आम्ही म्हटले. दुसरा, अकरावा आणि अठरावा अध्याय हे नथुरामच्या विशेष आवडीचे असत. नाना आपटे पातंजल योगसूत्र अभ्यासत असत. अधूनमधून आमची त्या त्या विषयावर थोडीफार चर्चा होत असे. प्रस्तुत भेटीत गीतापाठानंतर आमचे पुष्कळ बोलणे झाले. भेटीला आलेल्या लोकांचे बोलणे, त्यातील गंमती, काही आठवणी, असे विखुरलेले विषय आमच्या बोलण्यात आले. एक दोन तासांनंतर आम्ही आमच्या कोठीत आलो.

पंजाब हा प्रत्यक्ष होरपळलेला एक प्रांत होता. जनमताची या घटनेसंबंधीची प्रतिक्रिया आम्हाला नेहमी कळत असे. भेटीला आलेल्या लोकांनीही आपले अनुभव सांगितले. दिल्लीहून अंबाल्याला जाताना गाडीत गर्दी होती. भेटीला येत असलेल्या पुष्कळांना उभे राहावे लागले. पण हे लोक परप्रांतीय दिसत होते. इतर उतारूंशी बोलणे होता होता त्यांना हे लोक नथुराम आणि आपटे यांच्या शेवटच्या भेटीसाठी जात आहेत हे कळले. अनेकांनी लागलीच आपापल्या जागा मोकळ्या करून या प्रवाशांना दिल्या.

अंबाल्यात उतरणारे काही प्रवासी त्यात होते. स्थानकावर उतरताच त्यांनी या आलेल्या पाहुण्यांची राहण्याची, उतरण्याची व्यवस्था कोठे आहे याची चौकशी केली. उतरण्याची आणि राहण्याची सोय अमुक ठिकाणी आहे असे कळताच त्यांनी या पाहुण्यांना टांगे करून दिले. माणसे अमुक कारणासाठी आली आहेत असे त्यांनी टांगेवाल्यांना सांगितले. उतरण्याच्या ठिकाणी पोहोचल्यावर टांगेवाल्यांनी पैसे घेतले नाहीत. त्यांचा आग्रह हा की, आमच्या प्रांतासाठी म्हणून तुम्ही जिवावर आपत्ती ओढवून घेतली; आमचा एवढासा लहानसा वाटा सहानुभूतीचे निदर्शक म्हणून आम्हाला उचलू दे !

खानावळीत अथवा उपहारगृहात गेल्यावर सहज थोडी फार चौकशी केली जाई. खाद्यान्नाचे पैसे न घेणे हे प्रकारही अनुभवायला येत.

फाशीच्या दुसऱ्या दिवशी हे लोक परतले तेव्हा फार मोठ्या संख्येने स्थानकावर स्थानिक लोक उपस्थित होते. सहानुभूती व्यक्त करण्याचे एक साधन म्हणून त्यांनी जयजयकाराने स्थानक निनादून सोडले.

नथुराम आणि आपटे यांच्या भेटीची उत्कंठा असणाऱ्या दोन तरुणांची ही कथा आहे. फाशीचा आदला दिवस होता, भेटीसाठी संबंधितांची नावे लिहून दिली गेली होती. भेटणारी मंडळी बंदिगृहाबाहेर थांबली होती. दोन तरुण त्यांच्याकडे आले आणि आम्हाला संबंधितात समाविष्ट करा. आम्हाला नथुराम आणि आपटे यांचे दर्शन घ्यायचे आहे असे

विनवू लागले. न जाणो, गुप्तचर विभागानेच यांना धाडले असेल या शंकेने भेटणाऱ्या मंडळींनी सांगितले, तुमचा आमचा कोणताच परिचय नाही, आम्हाला संबंधितांच्या विशेष नात्याचे किंवा मित्रतेचे स्पष्टीकरण आणि विवरण द्यावे लागते, तेव्हा तुम्हाला असे समाविष्ट करता येणार नाही. अधिकाऱ्यांना भेटून तुम्हाला परस्पर भेट मिळत असेल तर पाहा. निरुपाय झाल्याने ते तरुण निघून गेले.

आम्हाला अंबाला बंदिगृहात ठेवल्यापासूनच आमच्यावर विशेष पहारेकरी ठेवले होते. त्याचा व्यय दिल्ली शासनाकडून घेतला जाई. तटावर जागता पहारा नेहमीच असे. कोणत्याही फाशीच्या आदल्या दिवशी विशेष दक्षता घेतली जाई. या फाशीची कार्यवाही उद्या होती. हा अभियोग महत्त्वाचा होता. स्वाभाविकपणेच आज पहारा विशेष जागरूक होता.

रात्री साडेअकराच्या बेताला तटावरील एका पहारेकऱ्याला दोन आगंतुक व्यक्ती तटावर उभ्या असलेल्या दिसताच त्याचा प्रथम थरकाप झाला. कोणी बंदी पळून जाण्याच्याच प्रयत्नात आहेत अशी त्याची कल्पना झाली. तो पहारेकरी सशस्त्र होता. त्याने त्यांना हटकले. आगंतुक निश्चल राहिले आणि बोलू लागले. 'आम्हाला नथुराम आणि आपटे यांना दाखवा आम्ही परत जातो.' पहारेकऱ्याने त्यांना आपल्याबरोबर घेतले. त्यांच्याजवळ काही शस्त्र नाही याची निश्चिती केली आणि त्यांना आपल्या नायकाच्या स्वाधीन केले.

अधिकाऱ्यांची धावपळ चालू झाली. एकदा शंकांनी मन पछाडले की, त्या शंकांना काही सीमा राहत नाही. फाशीवाल्यांना पळवून नेण्याचा तर कोणाचा डाव नाही ना, या दोघांच्या मागे आणखी कोणी साथीदार आहेत काय, या शंकांच्या छाननीला लगेच प्रारंभ झाला. आरक्षी दलाच्या संपर्काने तटाबाहेरील पहारा लगेच वाढविला गेला.

अधिकाऱ्यांनी चौकशी करताच त्या दोघा आगंतुकांनी झालेला प्रकार सरळ सरळ सांगितला, 'दुपारी बंदिगृहाच्या अधिकाऱ्यांना भेटून नथुराम आणि आपटे यांची भेट घेण्याची विनंती केली होती ती मान्य झाली नाही; त्यांच्या संबंधितांच्या मेळाव्यात भेट मिळावी म्हणून खटपट केली; तीही विफल झाली. आम्ही बनारसहून केवळ या शेवटच्या भेटीसाठी आलो आहोत आणि म्हणून अशी भेट घेण्याचा आम्ही प्रयत्न केला, कारण नंतर कधीच त्यांची भेट कोणाला होणार नाही.'

तटाबाहेर बंदिगृह वाढविण्याचे बांधकाम चालू होते. दगड, विटा, फळ्या, बाळू इत्यादी साहित्य बाहेर पडले होते. त्यात त्यांना दोन शिड्या दिसल्या. त्यांनी त्या उचलल्या आणि तटाला पोहोचविल्या. तेथवर तर जाऊ, आत उतरण्याचे पाहता येईल अशा विचाराने त्यांनी ते साहस केले होते !

त्यांना भेट मिळाली नाही. आत उतरले असते तरीही मिळाली नसती, हे सांगणे

नलगे. काही दिवसांनी त्यांना मुक्त केले असे समजले.

पहाटे पुन्हा आम्ही फाशी बंधांना भेटलो. पहाऱ्यावर बंदिपाल आळीपाळीने रात्रभर बसले होते. बंदिपालांचे संबंध वाढल्याने आत्मीयताही वाढली होती. या दोघांशी बोलून घ्यावे, पुन्हा हे बोलणे नाही, ऐकणे नाही. या भावनेने रात्रभर त्यांच्या गप्पा चालू होत्या.

आम्ही पुन्हा गीतेचे एक-दोन अध्याय म्हटले, दोघांनी प्रातर्विधी आटोपून स्नान संध्या केली. दोघेही प्रसन्नचित्त होते.

मी नथुरामला अण्णा म्हणत असे. 'अण्णा, दाढी करणार आहेस काय ?' मी विचारले.

'कशाला रे ? चार लोकांत का जायचे आहे ?' तो म्हणाला.

'नाही; स्नान केलेस म्हणून विचारले.'

'स्वतःची प्रसन्नता म्हणून असतेच की नाही ? अथाप अडीच एक तास तरी मला जगायचे आहे ना ? मनाच्या प्रसन्नतेला शारीरिक स्वच्छताही सहाय्यभूत होतच असते ! दाढी कालच केली आहे. तसा त्रास नाही ! आणि दाढी केली तरी काही वेळातच हे सगळे शरीर राखेत परावर्तित होणार आहे ! तेवढाच वेळ मला बोलण्यात घालवता येईल. हे बघ, हे बंदिपाल आत्ताच आले आहेत. यांना माझ्याशी बोलायचे आहे.'

दोघा तरुणांची कथा आम्हाला रात्री आमच्या पहारेकऱ्यांकडून कळली होती. मी नव्याने म्हणून नथुरामला ते वृत्त सांगितले ! 'मला आधीच ठाऊक आहे. मला जे सांगायचे ते मी अधिकाऱ्यांशी बोललो आहे.' असे तो म्हणाला.

फाशी देत असताना मला उपस्थित राहण्यास मिळावे म्हणून मी अधीक्षकांना विनंती केली होती. परंतु त्या घटकेला सर्वाधिकारी मी नाही असे त्यांनी मला सांगितले. मात्र फाशीपूर्वी अर्धा तासपर्यंत माझा अधिकार आहे, तोपर्यंत तुम्ही मोकळेपणाने भेटा अशी अनुज्ञा दिली होती.

नथुराम कॉफी घेत असे. चहा तो घेत नसे. आम्ही कॉफी आणि चहा आणवला. सर्वांनी आपापले पेय घेतले. लांबच्या प्रवासाला कोणी निघाले म्हणजे ज्या प्रकारे निरोप देतात तसा निरोप आम्ही त्यांना वंदन करून दिला. त्यांनी तो घेतला.

दोघांनीही आपापल्या आई-वडिलांच्या प्रतिमेची पूजा केली. नीट राहा असा आम्हाला उपदेश केला.

त्या वेळी आमच्या कोणच्याच भावना शोकाकूल नव्हत्या. ते प्रसन्न होते तर आम्ही स्थिर होतो. उदासवाणे निश्चित नव्हतो.

पुढचे विधी व्हायचे होते. काळे कपडे घेतलेले आरक्षी फाशीवाल्यांना ते कपडे देण्यासाठी उभे होते. आम्ही शेवटचा निरोप घेतला आणि तेथून निघालो.

हातात अखंड भारताचे मानचित्र, भगवा ध्वज आणि भगवद्गीता दोघांनी घेतली होती. आठ वाजायला आले होते. सूर्याचे किरण अद्याप फार कोवळे होते.

फाशीची तुळई फाशीकोठीच्या मागच्या अंगास आहे. कोठीतून बाहेर येताच सूर्यकिरण त्यांना दिसले. ते त्यांच्या अंगावर पडले. नथुराम सिमल्याला जाण्यासाठी म्हणून एकदा तरी त्या कोठीतून बाहेर आला होता. आपटे आज प्रथमच बाहेर येत होता. सूर्यप्रकाश पाहून त्याला फार आल्हाद वाटला. म्हणाला, 'पंडित, काय कोवळे ऊन पडले आहे !'

'अरे सिमल्याला तर जवळजवळ नेहमीच असे आल्हाददायक असते !' नथुरामने उत्तर दिले.

'अखंड भारत अमर रहे !' आणि 'वंदे मातरम्' हा घोष दोघांनी फाशीच्या पडवीत केला.

नमस्ते सदा वत्सले मातृभूमे
त्वया हिन्दुभूमे सुखं वर्धितोऽहम्
महन्मंगले पुण्यभूमे त्वदर्थे
पतत्वेष कायो नमस्ते नमस्ते !

हे स्वर वातावरणात विरून जाताच फासकाने फळ्याचा दांडा ओढला. दोन प्राण पंचत्वात विलीन झाले.

卐 卐

सात

माझी रक्षा सिंधूत टाका

'तरी मी तुला सांगत होतो पंडित, की पैशाचे गणन टिपून-ठेवण्याच्या भानगडीत पडू नको म्हणून ! बघितलेस, आता तुझ्या या टिपणांतून अभियोजक जो अर्थ सांगतील त्याला अधिक महत्त्व येणार !' नाना आपटे स्पष्टपणे गतगोष्टींचा आढावा घेत होते. न्यायाधीन असताना आम्हाला विषय म्हणजे बहुधा त्या त्या दिवशी झालेल्या साक्षींचा असे.

नथुराम आरक्षींच्या स्वाधीन झाला होता. त्याच्याजवळ असलेल्या वस्तूंचा पंचनामा झाला होता. त्या वस्तूत एक टिपण-वही होती. तीत आठवणींसाठी म्हणून टिपलेली काही नावे, काही ठिकाणे, ठरविलेल्या भेटींच्या वेळा, प्रवास, व्यय, स्मरणासाठी म्हणून तात्पुरते लिहिलेल्या पैशांचे गणन अशा नोंदी होत्या. त्या पंचनाम्यासंबंधी एक साक्ष आज न्यायालयात झाली होती. न्यायालयाचे लक्ष पैशाच्या त्या नोंदीकडे विशेषत्वाने जावे या उद्देशाने अभियोजक साक्षीदाराकडून एकेक विधान काढून घेत होते.

'बंडोपंत' यास पैसे दिल्याची एक नोंद होती. बंडोपंत म्हणजे बडगे अशी साक्ष बडगेने दिली होती. नाना आपटे यास अमुक पैसे दिले, अमुक गोपाळला दिले, अमुक स्वत:जवळ ठेवले अशा नोंदी होत्या. कट सिद्ध करण्यासाठी हा लेखी पुराव्याचा दुवा पुष्कळ उपयोगी पडेल अशी अभियोजकांची धारणा असणे स्वाभाविक होते.

वही त्या वेळी जवळ ठेवणे ही एक हानिकारक गोष्ट होती. कारण ज्यांचा खरोखरीच कोणत्याही प्रकारचा संबंध नसेल अशांची नावे त्या वहीत आल्याने त्यांना त्रास होण्याचा संभव होता. त्याव्यतिरिक्त कटात खरोखरीच संबंध असणाऱ्यांना एका दोराने अधिक बळकटपणे बांधण्यास त्या वहीतील नोंदींचा उपयोग होणार होता.

या गोष्टीची नथुरामला कल्पना नसेल काय ? कल्पना असलीच पाहिजे आणि कल्पना होतीही. पण एक नियम असा असतो की, कोणत्याही अवैध घटनेचा पूर्वप्रयोग

म्हणजे rehersal किंवा रंगीत तालीम होणे शक्य नसते. प्रत्यक्ष घटना तोच पूर्वप्रयोग आणि अंतिम प्रयोग. पूर्वप्रयोगात काही दोष आढळले तर प्रत्यक्ष प्रयोगाच्या वेळी त्यात सुधारणा करता येते. अशा घटना पूर्वप्रयोग ही पायरी नसल्याने ज्या चुका किंवा जे दोष राहतील ते प्रत्यक्ष रंगमंचावर उघडे पडणार ! अवैध घटनांचे धागेदोरे जुळविणे विधिरक्षकांना शक्य होते कारण त्या त्या घटकांचे दृष्टोत्पत्तीस आलेले दोष.

वही जवळ असणे ह्या त्यातलाच एक दोष होता. त्याला समर्थन नव्हते. पण पैशांचे गणन टिपून ठेवण्यासंबंधी नथुरामचे म्हणणे असे : 'आपण लोकांकडून 'हिन्दुराष्ट्र मर्यादित' या संस्थेसाठी पैसे आणतो. आपणासाठी आपण ठराविक व्यय करतो. त्या व्यतिरिक्त होणाऱ्या आडमाप व्ययाचे आपल्या माहितीसाठीच जर गणन नसेल आणि एकाएकी कोणी आयव्यय बघण्यास मागितला तर आपल्याला स्पष्टीकरणही देता येणार नाही.'

नाना म्हणत, 'काय म्हणतील लोक ? या दोघांनी पैसे खाल्ले ! म्हणू दे त्यांना तसे. आपण कोणत्या स्तराबर उभे आहोत हे आपल्याला ठाऊक आहे.'

नथुराम म्हणे, 'आपण काही केले नाही आणि नुसताच हा व्यय होत राहिला तर लोकांना काय सांगायचे ?'

नाना त्याला सांगत, 'आमच्या मनात अमुक योजना होती, ती फसली, पण त्यासाठी हा व्यय झाला असे का तू ज्याला त्याला सांगणार आहेस ? आणि लोकांनी तुझ्यावर विश्वास ठेवावा काय ? आपल्या हातून काही होणार असेल तर होईल. नाहीतर नाही. पण तू शहाणपणा कर आणि टिपण ठेवू नको.'

पण नथुरामने ते बोलणे मनावर घेतले नव्हते. 'हिन्दुराष्ट्र मर्यादित' या संस्थेचा तो पदाधिकारी होता. आपण लोकांचे ऋण घेतले आहे, त्यांना आपण उत्तरदायी आहोत. लोकांनी ज्या विश्वासाने आपल्या संस्थेला सहाय्य केले त्या विश्वासाला आपण पात्र ठरले पाहिजे ही त्याची आंतरिक तळमळ इतकी तीव्र होती की त्या भरात, विस्तवाशेजारी बसून दारुगोळ्याची मोजणी करावी तसे त्याने ज्वालामुखीवर बसून पैशाच्या व्यवहाराच्या अंगावर येण्याजोग्या नोंदी करून ठेवल्या होत्या आणि शेवटी, सावधगिरी घ्यावी असे मनात असूनसुद्धा अनबधानाने ती टिपणवही त्याने स्वत:जबळच ठेवली होती. (अभिलेख ग्रंथ ४, पृष्ठ २५, २४२ प्रमाण क्रमांक पी. ६४, पी. २२३).

आरोपींना दोषी ठरविण्यासाठी काही प्रमाणात अभियोजकांना त्या नोंदीचाही उपयोग झाला होता.

चुका अनेकांकडून झाल्या होत्या. पण जी चूक पुढे येई तिच्यावर त्या त्या दिवशी खल होई आणि जणू नव्यानेच ती चूक झाली आहे अशा धारणेने संबंधित आरोपी इतरांचे लक्ष्य होई. आज नथुरामची पाळी होती.

नाना आपटे आणि नथुराम एकमेकांशी बरोबरीच्या नात्याने बोलत असत. त्यांना

पुढे न्यायालयानेही बरोबरीने बागविले. कारण नाना आपटे यांनाही फाशीची शिक्षा सुनावली गेली.

नथुरामने गोळ्या झाडल्या आणि त्या गोळ्यांमुळे गांधीजींना मृत्यू आला हा नथुरामवर आरोप होता. त्याने तो मान्य केला होता. त्याला फाशीची शिक्षा त्या अपराधासाठी दिली होती. ती शिक्षाही त्याने मान्य केली. पण नाना आपटे यांनीही गोळ्या झाडल्या आणि त्यामुळे गांधीजी मरण पावले असा नानांवर काही आरोप नव्हता. कटामधील एका घटकाला जी शिक्षा ती सर्व घटकांनाही होऊ शकते हा विधी गृहीत धरला तरीही सर्व आरोपींना काही फाशी सुनावली गेली नव्हती. नथुरामचा दोष असेल तेवढा इतरांचा दोष नव्हता हे उघड आहे. नानांची कृती नथुरामच्या कृतीएवढी नव्हती. त्यांना फाशी मात्र झाली होती. म्हणजेच त्या मानाने नथुरामला दिल्या गेलेल्या शिक्षेपेक्षा काही अंशाने अधिक शिक्षा नानांच्या वाटबाला आली. नानांवर न्यायालयाचा रोष होता म्हणावे तर उच्च न्यायालयानेसुद्धा त्यांची शिक्षा निश्चल ठेवली होती. नानांचा एवढा म्हणजे प्रमाणाने नथुरामपेक्षाही अधिक दोष होता काय ? नाना कटाचे सूत्रधार होते (Brain behind the conspiracy) असा न्यायालयाचा निष्कर्ष होता. आलेल्या पुराव्याची छाननी करून न्यायालयाने तो निष्कर्ष काढला होता. उच्च न्यायालयानेही तो अबाधित ठेवला होता.

विशिष्ट ठिकाणी असलेल्या श्रद्धेच्या भावनांना आवाहन करून गणपती उत्सवासारख्या प्रसंगी चार लोक एकत्र आणणे सोपे असते. संघटनेचा गुण त्यालाही लागतो. पण श्रद्धा आधीच बावरत असल्याने लोक सहज एकत्र येतात. काही राजकीय भावनांचा समान घटक बघून निदर्शनासाठी चार लोक गोळा करणे हेही शक्य होते. पण जिवाचे मोल देण्यासाठी चार लोकांना एकत्र आणणे यात या संघटकांचा गुणच अधिक प्रभावी असतो. तीव्र भावना अनेकांच्या असतात. पण त्यात बर्ग असतात. कोणी बोलघेवडी असतात. कोणाला वाटते की अमुक व्हावे पण ते दुसऱ्यांनी करावे. कोणी तात्कालिक उत्साह दाखवतात. पण प्रसंग येताच पाठ फिरवतात.

मला एक प्रसंग आठवतो. मी तेव्हा शाळेत होतो. संत पाचलेगावकर तेव्हा लोकांना सापासंबंधी सप्रयोग माहिती देत असत. विषारी कोणते, विषारी नसलेले कोणते, माणसे सहसा धक्क्यानेच कशी मरतात यावर एक व्याख्यान त्यांनी दिले. ते सर्पदंशावर उपचारही करीत. साप चावून दाखविणे हा त्यांचा एक कार्यक्रम असे. त्यांचे व्याख्यान झाल्यावर त्यांनी आवाहन केले. 'आता बोला, साप चावून घेण्यास कोण पुढे येतो ?'

उत्साहाने लोक भारले होते. व्याख्यानाने प्रभावित झाले होते. चांगले पंचवीस-तीस हात वर झाले.

'वा ! फार आनंदाची गोष्ट आहे ! आता हात तसेच वर ठेवा.' असे महाराजांनी लोकांना सांगितले, आणि जवळच्या त्यांच्या शिष्याला सांगितले, 'जा रे, आतली करंडी

घेऊन ये.'

करंडी आली. ती उघडली तो चांगला पाच फुटी नाग सर्वांच्या सर्व बाहेर येऊन महाराजांजवळ थांबला.

महाराजांनी शिष्याला सांगितले, 'अरे, किती लोकांचे हात वर आहेत मोज बरे !' पाहिले तो पाच-सात वर राहिले होते !'

'करंडी आण' असे महाराजांनी सांगितले तेव्हापासूनच काहींना आपला हात अवघडल्यासारखे वाटू लागले होते, त्यांनी तो हळूहळू खाली आणला. काहींची समजूत अशी झाली की बहुतेक प्रसाद वाटण्यासाठी म्हणून यांनी आंब्याची करंडी आणावयास सांगितली आहे. करंडीचा वेगळा आकार दिसताच 'तसे नव्हे' याची त्यांना जाणीव झाली आणि त्यांनी आपले हात खाली घेतले. काहींनी तो नाग बघितला, आणि त्यांचे हात त्यांच्या नकळत गळून पडले !

इकडे मुले बसली होती त्यांच्यात काही गडबड झाली. पाऊस तर नव्हता आणि ही ओल कुठून आली म्हणून कोणी तरी चटकन उभा राहिला. भोवतालची सर्व मुले 'मी नाही, मी नाही' म्हणून गोंगाट करीत होती.

शेवटी तिघेजण निर्धाराने उभे राहिले. महाराजांनी त्यातल्या त्यात एकाला निवडले आणि त्याच्यावर सर्पदंशाचा आणि विष उतरण्याचा प्रयोग तेथल्या तेथे केला.

मी कुठे होतो ही मूठ झाकलेलीच राहिलेली बरी !

तेव्हा लोकांच्या भावनांना आवाहन केले आणि लोकांनी प्रतिसाद दिला तरी कोण कोणत्या मर्यादितपर्यंत उभा राहू शकेल हे ठरविणे अवघड असते. न्यायालयाचे म्हणणे असे होते की, जिवाचे मोल देण्याची सिद्धता ठेवलेल्या त्या लोकांचे संघटन करण्यात नाना आपटे यांचा प्रमुख सहभाग होता.

नानांचा चांगला परिचय असणारे आजही अनेकजण आहेत. या जगात कधी कधी अशा काही गोष्टी घडतात की, त्यांवर विश्वास ठेवणे कठीण व्हावे. पण प्रत्यक्षात त्या गोष्टी होऊन गेलेल्या असतात. माझा आणि नानांचा आधी अगदीच थोडा परिचय होता. त्यामुळे ते वाढले कसे, त्यांचा परिसर कसा होता इत्यादी गोष्टी मला प्रत्यक्षपणे ठाऊक नाहीत.

पण त्यांचे परिचित सांगतात की नाना आणि हा कट ही घटना अविश्वसनीय वाटावी इतकी विचित्र होती. नानांना या कटाचा अध्वर्यू मानणे हा तर विरोधाभासाचा उच्च बिंदू होता.

महाराष्ट्रातील इतिहास-संशोधन क्षेत्रात आज जे साठी उलटलेले विद्वान आहेत त्या सर्वांत नानांचे वडील कै. दत्तोपंत आपटे परिचित होते. त्यातील काहींना ते गुरुस्थानी होते. कै. महादेव चिमाजी आपटे यांच्या विश्वस्त निधीतून पुण्यातील आनंदाश्रम ही संस्था चालते. कै. दत्तोपंत त्या संस्थेचे व्यवस्थापक होते. ते स्वतः इतिहासतज्ज्ञ होतेच. त्याव्यतिरिक्त

इतिहाससंशोधनातल्या आवश्यक त्या भाषा आणि लिप्या यांचा त्यांनी अभ्यास केलेला होता. संस्कृत, गणित, भूगोल, खगोलशास्त्र या विषयांचेही ते विद्वान होते. लोकमान्यांचा क्रांतिकारकांशी संबंध आला होता. अशा एका संबंधातील म्हणजे परदेशातून शस्त्रास्त्रांची ने-आण करण्याच्या व्यवहारातील दत्तोपंत एक दुवा होते. पण नंतर ते विद्याव्यासंगात गढून गेले.

इ. स. १९११ मध्ये नानांचा जन्म झाला. त्यांची मोठी बहीण तपस्वी कै. बाबा परांजपे यांची सून. आणखी दोन बहिणी श्री. मनोहर आणि श्री. दीक्षित यांच्या घरी दिल्या. नानांना चार भाऊ : बळवंत, विष्णु, माधव व मनोहर. ते सर्व आपापल्या व्यवसायात असतात. मनोहर उच्च शिक्षणासाठी परदेशाला जाऊन आले.

नाना बी. एस्सी झाले आणि त्यांनी अहमदनगर येथे शिक्षकाची सेवावृत्ती धरली. त्यांचे लग्न त्याच दिवसात फडतरे यांच्या कन्येशी झाले. त्यांना एक मुलगा झाला. पण पुढे तो निवर्तला.

नगर येथे नानांची अध्यापन क्षेत्रातील चमक दिसून आली. ते शिक्षणवर्ग घेत. 'आत जागा नसली तर आम्ही बाहेर ओटीवर किंवा गॅलरीतून बसू पण आम्हाला आपल्या वर्गात प्रवेश द्या.' अशी गळ मुले घालीत. लोकप्रियतेचे हे गमक नानांनी अनुभवले आणि त्यांना स्वतःच्या शिक्षणनैपुण्याचा प्रत्यय आला. त्यांनी बीटीची परीक्षा दिली.

वर्णाने गोरे, दिसण्यात रेखीव, शरीराने काहीसे कोमल, सदा हसतमुख नाना नगरमध्ये मित्रपरिवारात वावरत तेव्हा ते 'खीपात्र' म्हणून संबोधले जात. नीटनेटके राहण्याची त्यांना भारी आवड असे. लहानपणी त्यांनी दारिद्र्यात दिवस काढले होते. आज त्यांच्या मागे पैसा लागला होता. आपल्या लहानपणाच्या जीवनावर जणू प्रतिशोध उगवायचा त्या भावनेने कपड्यापासून खाण्यापर्यंत चांगले तेच वापरायचे असा त्यांचा क्रम होता.

महाराष्ट्रात तरी संस्कारित घरांतून हिन्दुत्वनिष्ठा उपजतच असते असे आपणास दिसते. घरचे संस्कार तसे असल्याने नानांच्या मनावरही तो प्रभाव होता. बुद्धी विकसित झाल्यावर त्यांच्यातील पोथीनिष्ठा नाहीशी झाली आणि ती जागा विज्ञानाच्या निकषावर गोष्टी घासून घेण्याच्या प्रवृत्तीने येतली. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या १९३७ मधील सुटकेनंतर अनेक तरुणांप्रमाणे नानाही सावरकरांनी मांडलेल्या हिन्दुत्ववादाकडे आकर्षिक झाले. नाना एका ख्रिश्चन शाळेत शिक्षक होते. तेथे हिन्दू विद्यार्थीही जात. त्यांच्याकडून ख्रिश्चन धर्माची प्रार्थना हट्टाने म्हणून घेतली जाई. नानांनी त्याला पायबंद घातला. ज्याला प्रत्यक्ष काम म्हणता येईल असे त्यांचे ते पहिले कार्य.

सैनिकीकरणाची पूर्वसिद्धता म्हणून नानांनी हिन्दुसभेच्या धोरणाला अनुसरून ठिकठिकाणी 'रायफल क्लब' काढले. काँग्रेसचे मंत्रिमंडळ असूनही त्या त्या पदाधिकाऱ्यांकडून त्यांच्या उपक्रमाला मान्यता मिळविली.

नानांचा संघटनेचा गुण विकास पावत होता. हिन्दुसभेच्या अधिवेशनातून नाना आणि नथुराम यांचा संबंध येऊ लागला. काही अधिक सहचर्य आल्यावर याच्यात काही तरी विशेष गुण आहेत असे एकमेकांना परस्पराविषयी वाटू लागले. १९४४ च्या आरंभी 'अग्रणी' दैनिक काढण्याची योजना या दोघांनी ठरविली आणि नानांनी संचालकत्व पत्करले. नथुरामने संपादकत्व. यांचे संचालक-संपादक हे नाते शेवटपर्यंत इतके अविचल राहिले की न्यायालयानेही कटाच्या संपादनाची श्रेणी नथुरामला दिली आणि संचालनाची नाना आपटे यांना !

वेळोवेळी योग्य माणसे अग्रणी किंवा हिन्दुराष्ट्र या संस्थेत आणून त्यांना वृत्तपत्राचे महत्त्व पटविणे, स्वत:संबंधीचा विश्वास पटविणे या गोष्टी नाना कुशलपणे करीत. कोठेही जाऊन भेटायचे असेल तर ते मध्यस्थांची वाट बघत नसत. त्यांचा योग असा असे किंवा त्यांचे व्यक्तिमत्त्व असे होते की, कोणत्याही श्रेष्ठ अधिकाऱ्यांना भेटून ते आपली कामे त्यांच्याकडून करून घेत.

त्या वेळी हिंदुत्ववृत्ती जोपासली जाण्याच्या धोरणाची शासनाला चीड असे, कारण शासन काँग्रेसचे असे आणि मुसलमानांच्या अनुनयाला हिन्दुत्वावादी कडाडून विरोध करीत. आपली वाटचाल पाकिस्ताननिर्मितीच्या दिशेने होत आहे याची श्रेष्ठींना जाणीव होती आणि पाकिस्तानच्या निर्मितीत हिन्दुत्ववादी एखादा वेळी अडसर घालतील अशी शासनाची धारणा होती. त्यासाठी त्यावेळच्या काँग्रेस शासनाने हिन्दुत्ववादी वृत्तपत्रांना दडपण्यासाठी आपल्या सत्तेचा उपयोग केला. 'अग्रणी'कडून एकामागोमाग एक प्रतिभूती (Security) मागितल्या. हा त्या वेळच्या शासनाच्या वर्तनाचा इतिहास गांधीहत्या अभियोगातील अभिलेखात ग्रंथित झालेला आहे. नाना आणि नथुराम यांची त्रेधातिरपीट होऊन जाई. आतील बादळ दाबून ठेवून ते हसतमुखाने या प्रसंगाला तोंड देत पण पुढे घडलेल्या घटनांवरून आपणास असे म्हणता येते की, नानांचा गांधींविरुद्ध संताप होण्याचे हेही एक मुख्य कारण झाले.

मुस्लिम अनुनय काँग्रेससकट सर्वांच्या गळी कसा उतरवायचा ही गांधीजींपुढे त्या वेळी समस्या असे हे आपणास समकालीन लेखकांच्या पुस्तकातून दिसून येते. गांधीजी पुढे पाचगणीस येऊन राहिले होते, तेथे पंचवीस तरुणांच्या गटाने गांधीजींचा निषेध केला होता. नाना त्या तरुणांचे प्रमुख होते. तो दिवस २२-७-१९४४ हा होता. श्री. देऊळकर म्हणून एक आरक्षी अधिकारी त्या दिवसांत गांधीजींच्या संरक्षणासाठी पाचगणीला असत. पुढे ते या अभियोगात साक्षीदार म्हणून आले होते. नानांच्या या निदर्शनाचा त्यांनी आपल्या साक्षीत उल्लेख केला होता.

दिल्लीच्या भंगी वस्तीत गांधीजी राहू लागले तेव्हाही नानांनी एक निदर्शन आयोजित केले होते. त्या निदर्शनाचा हेतू होता : 'हिन्दूंचे हिसकावून घेऊन तुम्ही मुसलमानांना दान देऊ नका. या दानाने ते प्रसन्न होणार नाहीत. देशाची फाळणी करू नका. नौखालीच्या

हिन्दू हत्याकांडातून बोध घ्या. मुसलमानांच्या धमकावणीला भिऊ नका. तरुणांना आवाहन करा. ते प्रतिकारासाठी प्राणपणाने उभे राहतील.' हे गांधीजींना सांगावे.

गांधीजींच्या पूर्वीच्या प्रतिज्ञा फोल ठरल्या होत्या. फाळणी झाली होती. रक्तपात चालूच होता. काश्मीरवर आक्रमण झाले होते. आपले सैनिक लढत होते. पंचावन्न कोटी रुपये अडविण्याचा आपल्या शासनाचा निर्णय फिरविला गेला होता. गांधी-हत्या झाली होती.

न्यायालयापुढे आपटे यांचे प्रतिपादन असे होते की, गांधीजींचा मुस्लिम अनुनय मला मुळीच मान्य नव्हता. मी त्याविरुद्ध वेळोवेळी निदर्शने केली होती. दि. २०-१-१९४८ ला असेच एक निदर्शन करण्याची माझी योजना होती. दि. ३०-१-१९४८ ची हत्या या घटनेशी माझा संबंध नाही. नथुराम आणि मी यांच्यात मतभेद झाला होता. तो काय करणार होता हे मला ठाऊक नव्हते. आम्ही वेगळ्या दिशेने गेलो होतो.

परंतु नानांचा संबंध अनेक लोकांशी आल्याचे न्यायालयाच्या निदर्शनाला आले होते. शस्त्रे आणि पैसा जमविण्यासाठी नाना कसे वणवण भटकत होते याचे चित्र देणारे काही साक्षीदारही न्यायालयापुढे आणले गेले होते. वेगवेगळ्या स्तरांतील लोक कटात गुंफले गेले होते. कोणी तरी प्रभावी सूत्रचालक असल्याखेरीज अशी फळी निर्माण होणे केवळ असंभवनीय आहे, अशा तर्काने न्यायालयाने नानांवर अधिकात अधिक भार टाकला आणि त्यांना फाशी सुनावली.

आम्ही न्यायाधीन असतानाच आपल्या शासनाने हैद्राबादच्या चौखूर उधळणाऱ्या आणि हिन्दुंना छळणाऱ्या सत्तेवर नियंत्रण घातले. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या या सत्कार्यानि नाना आणि नथुराम यांना इतका आनंद वाटला की, त्यांनी सरदार पटेल यांना अभिनंदनाचा संदेश पाठविला. तो दिनांक १९ किंवा २०-९-१९४८ होता. मी पुढे औरंगाबाद बंदिगृहात आपला बंदिवास भोगत होतो. तेथले बंदी त्या वेळच्या दंडनीतीचे (Police Action चे) वर्णन सांगत असत. गांधीजी जीवमान असते तर आमच्या राज्यावर हा दुर्धर प्रसंग ओढवला नसता असे उद्‌गार तेथील मुसलमान काढीत असेही ते सांगत. गांधीजींवरील भक्ती त्या उद्‌गारातून व्यक्त होत नव्हती, तर आपला हेतू साधण्यासाठी गांधीजींचा उपयोग करून घेण्याची प्रवृत्तीच त्यातून दिसत होती.

फाशी निश्चित झाल्यावर नथुराम आणि नाना यांनी आपली एक अंतिम इच्छा व्यक्त केली होती. आमच्या अस्थींचे विसर्जन सिंधू नदीच्या पात्रात करा आणि ती नदी जेव्हा हिन्दुस्थानच्या ध्वजाखाली हिन्दुस्थानचा एक भाग म्हणून येईल त्यावेळी करा असे त्यांनी मृत्युपत्र केले होते. त्यासाठी कितीही वर्षे लागली, कितीही पिढ्या उलटल्या तरी चालेल असे त्यांचे म्हणणे होते.

तुम्हाला सिंधू नदी का आठवली, असे मी त्यांना विचारले होते. नथुरामशी माझे या विषयावर बोलणे झाले होते. पण नानांशी स्वतंत्रपणे बोलावे म्हणूनच मी म्हटले, 'नाना, आपण बहुधा गंगेमध्ये अस्थिविसर्जन करतो.'

नाना म्हणाले, 'गोपाळ, मनुष्य मेल्यावर त्या कलेवराची किंवा कलेवराच्या अवशेषांची विल्हेवाट कशी लावायची याला मृताच्या दृष्टीने मूल्य नाही. मनुष्य मृतांच्या भावनांची जपणूक करण्याचा प्रयत्न करतो. आमच्या पोथीनिष्ठ धार्मिक श्रद्धा नाहीत. सर्वसामान्यपणे आपण गंगेत अस्थिविसर्जन करतो. पण गंगा, सिंधू, सरस्वती इत्यादी नद्या आपण पवित्र मानतो. आमचा मृत्यू राजकीय स्वरूपाचा किंबहुना राष्ट्रीय स्वरूपाचा आहे; अर्थातच आम्ही एकनिष्ठ भावना मनात बागविणे स्वाभाविकच आहे. पण तू प्रश्न विचारलेला आहेस त्याचे उत्तर मला तुला सांगावे लागले. आमच्या मनात दोन शल्ये आहेत. ती शल्ये तुम्हा लोकांना कळावीत म्हणून अस्थिविसर्जन सिंधू नदीत करण्याची इच्छा आम्ही मरण्यापूर्वी लिहिली आहे.'

'कोणती शल्ये ?' मी विचारले

नाना अतिशय चिरडीने बोलले, 'हिन्दुस्थानच्या भूमीवर हिन्दुराष्ट्राचे शोषण करून वाढलेले हे बांडगूळ राष्ट्र पाकिस्तान ! त्याला स्वातंत्र्याचे आणि विभक्त जीवनाचे वारे आणि खतपाणी मिळताच उर्वरित हिन्दुस्थानला अवमानित करण्याचा उद्योग त्याने चालविलेला आहे. आमच्याशी संबंध असलेल्या गोष्टींपुरताच विचार आम्ही केला, कारण तेवढीच आमची मर्यादा आहे. गांधीजींच्या मृत्यूनंतर त्यांचा अपमान कोणी केला असेल तर तो पाकिस्तानने ! जिनांचा शोकसंदेश आठवतो तुला ?'

'होय.'

'काय होता ?'

'हिन्दुंचा एक पुढारी गेला.'

'तोच तो अपमान !' नाना म्हणाले, 'हिन्दू-मुस्लिम एकतेसाठी ज्यांनी हिन्दुंना दाबून ठेवून मुस्लिमांच्या स्वतंत्र आणि विभक्त वृत्तीचा जन्मभर परिपोष होऊ दिला, त्या गांधीजींना त्यांच्या मृत्यूनंतर तरी कृतज्ञता दाखविणे हे त्यांचे कर्तव्य होते. गांधीजींना फाळणी-पूर्व हिन्दुस्थानचे पुढारी असे म्हटले असते तरी त्यात त्यांचा अपमान नव्हता कारण पाकिस्तान शेवटी याच भूमीवर जन्माला आले होते आणि कृतज्ञताभावाने मुस्लिम राष्ट्रानेही गांधीजींना आपला राष्ट्रपिता मानणे उचित होते. म्हणून ज्या राष्ट्रात गांधीजी केवळ हिन्दू म्हणून त्यांचा अपमान झाला आहे ते हिन्दुद्वेषावर उभारलेले राष्ट्रच मोडून काढून पूर्ण सिंधू नदी आपल्या ध्वजाखाली आल्यावर तेथे अस्थी विसर्जन व्हाव्यात ही इच्छा आहे.'

मी म्हटले, गांधीजी मरताना 'हे राम' म्हणाले असा प्रचार गांधीजींच्या शिष्यांनी

नाही का केला ? जिना त्यांना हिन्दुंचा पुढारी म्हणाले, त्यात काय बिघडले ?'

नाना म्हणाले, 'शिष्यांनी गुरुंचा पराभव केल्याचे हे पहिलेच उदाहरण नाही ! त्यांना गांधीजी कळले नाहीत किंवा ते ढोंगी तरी आहेत. अरे साध्या तर्कनि विचार कर. राम-रहीम, कृष्ण-करीम, ईश्वर-अल्ला असा जोडीने नामोच्चार करण्यात ज्या व्यक्तीने जन्म वेचला तिने मरताना तेवढे रहीम वगळून नुसते राम म्हणावे, करीम वगळून नुसते कृष्ण म्हणावे किंवा अल्ला वगळून नुसते ईश्वर म्हणावे आणि मरताना तरी राम एवढेच नाव खरे आहे असे जणू लोकांना सांगावे हा शिष्यांचा प्रचार म्हणजे गांधीजींवर कठोर अन्याय नाही काय ? गांधीजींना विचार करण्याइतपत अवसर असता तर ते रामच का म्हणते, रहीम का न म्हणते ? राम आणि रहीम असं का न म्हणते ? तेव्हा, इकडे हिन्दूंच्या भावनांना हेलावण्यासाठी त्यांच्या भक्तांनी गांधीजींच्या मुखात बळाने 'राम' कोंबले, तर गांधी काही झाले तरी शेवटी हिन्दूच होते हे मुस्लिम जगताच्या निदर्शनाला आणण्यासाठी मुस्लिम राष्ट्राच्या धुरीणाने गांधींना हिन्दुंचा पुढारी म्हणून त्यांचा अपमान केला ! हे शल्य आमच्या मनात आहे. म्हणूनच आमच्या शरीरात आहे. म्हणूनच आमच्या अस्थीतही त्याचे अस्तित्व राहणार आहे. स्वतंत्र सिंधुनदीच्या जलानेच ते निघून जाईल.'

'दुसरे कुठले शल्य ?' विचारले

नाना म्हणाले, 'गांधीजींच्या रक्षेचे काय झाले आठवते तुला ?'

'होय. ती जगातील नद्यांतून प्रवाहित केली गेली.'

'बरोबर आहे. त्यांची रक्षा जगातील मोठ्या नद्यांत विसर्जित करण्याची योजना आपल्या शासनाने आखली होती. परकीयांच्या धर्मविषयक भावनांचा हिन्दुस्थानने आदर केलेला ठाऊक असल्याने कोणत्याही देशाच्या कोणत्याही नदीत त्या अस्थी किंवा ती रक्षा विसर्जित होण्यास अडचण आली नाही. त्या रक्षेने त्या नदीचे जल अपवित्र होईल असली दुष्ट भावना कोणीही व्यक्त केली नाही.'

'आणि पाकिस्तान !' नाना पुढे बोलत होते, 'श्री. श्रीप्रकाश तेव्हा भारताचे पाकिस्तानातील राजदूत होते. ते रडत सांगू लागले, 'गांधीजींची रक्षा सिंधू नदीत विसर्जन करण्यास पाकिस्तान शासन अनुज्ञा देत नाही !' जणू त्या अस्थी किंवा ती रक्षा म्हणजे एखादी रणतरी होती की जिच्या जाण्यावर आक्षेप घेतला जावा ! पण पाकिस्तानने रणतरी एक बेळ जाऊ दिली असती. त्यात पुष्कळदा भावनेचा नव्हे व्यवहाराचा किंवा राजनीतीचा प्रश्न असतो. पण या ठिकाणी भावनांचा प्रश्न होता, तोही हिन्दू भावनेचा ! हिन्दू भूमीवर त्यांच्या दृष्टीने एक पवित्र स्थान त्यांनी निर्माण केले होते. त्यावर ते मांड ठोकून बसले होते ! त्या पवित्र स्थानातील तो पवित्र जलप्रवाह एका हिन्दुंच्या रक्षेने अपवित्र होणार होता ! नापाक होणार होता ! तेव्हा आमच्या पवित्र मुस्लिम राज्यात तुमचे ते नापाक प्रकार नकोत

असे आम्हाला सांगण्याइतका उन्मत्तपणा त्या राष्ट्राला आला होता !'

नाना बोलत होते, 'असे वाटले होते की, आपले शासन गांधीजींच्या अस्थींचा एक कुंभ सिंधू नदीत विसर्जित करण्यासाठी राखून ठेवील, आणि जेव्हा ते शक्य होईल तेव्हा तो विसर्जित करील. पण पाकिस्तानचा नकार आम्ही अपमान समजलो नाही ! वास्तविक याची सर्वांना चीड यायला हवी होती. ज्या काँग्रेसजनांनी पाकिस्तान निर्मितीला हात वर केले त्यांना ! गांधीजींचे शिष्य म्हणविणाऱ्यांना ! कारण त्यांनी सद्भावनेने पाकिस्तान दिले होते. पण अनेक वर्षे आमच्यातील अस्मितेचे खचीकरण झाले. त्याला फळ असे आले की, पाकिस्तानने केलेला अपमान आम्हाला अपमान वाटेनासा झाला, मग जे आडात नाही ते पोहऱ्यात येणार कोठून ? स्वत्व टिकविणे म्हणजे संकुचित वृत्ती हीच शिकवण कानी आदळल्याने मान आणि अपमान यातले अंतर कळेनासे झाले. अहिंसा हे उच्च तत्व म्हणता म्हणता कायरता किंवा भीतीयुक्त व्यवहार हे उच्च तत्त्वाचे द्योतक असे आम्ही मानू लागलो ! गांधीजींच्या अस्थींचा झालेला तो अपमानही सिंधू नदीच्या पवित्र जलानेच धुतला जाईल, मग कोण्याकाळी काही वेळ तो पाण्याचा ओघ रक्ताचा ओघ होऊन का राहिना ! त्यानंतर हे अस्थिविसर्जन होऊ दे अशी इच्छा आहे.'

मी विचारले, 'नाना, अपमानाची चीड आपणास केव्हा येणार नाही काय ?'

नाना म्हणाले, 'तसे नाही. अपमानाची चीड हीसुद्धा एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. मनुष्याचा स्वभाव आहे. असे बघ, चीड मेली असती तर महाराष्ट्रात गांधीहत्येनंतर जोळपोळ झाली असती का ? माणसे मारली गेली असती का ? हेतू न चिकटवता आपण असे मानू की, गांधीजींना ज्यांनी दैवत मानले त्यांचे ते दैवत एका ब्राह्मणाकडून भंगले आणि म्हणून ब्राह्मण जातीवर प्रतिशोध घेतला गेला. कल्पना कर, आपला देश हेच दैवत अशी शिकवण दिली गेली असती तर हीच अस्मिता ते दैवत भंगतेवेळी चेतली असती आणि पाकिस्तान रक्षाविसर्जन करू देत नाही हा आपला अपमान आहे याची जाणीव या जनतेला दिली गेली असती तर त्यांच्या अस्मितेने उग्ररूप धारण करून पाकिस्तानला धडा शिकविण्यासाठी आपल्या सहस्रावधी भुजांत शस्त्रास्त्रे निर्माण केली असती. महाराष्ट्रात तरी निदान हा अनुभव नवीन नाही. संभाजीच्या मृत्यूनंतर औरंगजेबाच्या दक्षिणेकडील सत्तेला याच लोकांच्या पूर्वजांनी हातात खड्ग घेऊन त्राही-भगवान करून सोडले होते. तेव्हा चीड हा स्वभाव असतोच; त्याला वळण योग्य मागनि लावणारा तो कुशल नेता. तो मिळाला की हीच अस्मिता साऱ्या भारतवर्षाचे रक्षण करण्याइतकी समर्थ आहे !'

'नाना, तुम्ही नथुरामशी बोलला होतात या विषयावर ?' मी विचारले.

'या विषयावर असे नाही. पण आम्ही बोलतो नेहमी. का बरे ?'

'नाही, तुम्ही संघाला नावे ठेवता, पण तुम्ही स्वयंसेवकाच्या वरताण केलीत म्हणून

म्हटले !'

'म्हणजे काय ? मी नाही समजलो !'

'नथुरामशी मी परवाच या गोष्टी बोललो. तुम्ही जसे सुसूत्रपणे माझ्याशी बोललात तसेच तोही बोलला. वाक्यरचनेत काही अंतर असले तरी एक विचार, एक आचार आणि एक उच्चार ही संघीय प्रणाली तुमच्यात उतरली आहे ! गंमत वाटली मला !'

नाना म्हणाले, 'विचारासंबंधी म्हणशील तर पुष्कळदा आमचे विचार एक येतात असा गेल्या चार-साडेचार वर्षांतला आमचा अनुभव आहे. नथुरामने कोठून तरी अग्रलेख लिहून पाठवावा. मी त्याच धर्तीचा अग्रलेख लिहून मुद्रितही केलेला असावा असे अनेकदा झाले आहे. आणि संघासंबंधी म्हणशील तर 'पतत्वेष कायो नमस्ते नमस्ते' ही प्रतिज्ञा साभिनय म्हणणारे आम्ही दोघेच स्वयंसेवक आहोत !'

मी हसलो !

'गोपाळ, तुला एक विचारायचे आहे आणि विचारायचा मला अधिकार आहे.' नाना सूर चढवून मला म्हणाले.

मी म्हणालो, 'नाना, तुमचा अधिकार नसला तरीही विचारा.'

ते म्हणाले, 'गाढवा, माझा वेळ का घेतलास एवढा ? मला आधी नाही सांगायचेस की नथुरामचे अन् तुझे बोलणे झाले होते म्हणून !'

मी म्हटले, 'नाना, तुम्हाला कुठे गाडीला जायचे आहे की जी चुकावी ! फाशी तर जायचे आहे ! ती वेळ ते टळू देत नाहीत ! उगीच अस्वस्थ नका होऊ !'

'गोप्या, फार बोलायला लागलास ! कोठी मोकळी आहे बरं का शेजारची ! जमादाराला सांगितले तर आत्ता तुला बंद करतील.'

मी म्हणालो, 'नाना, कल्पनाच करायची आहे तर आपण असे करू. तुमचीच खोली मोकळी करा, मी ती भरतो. तुम्ही लोकांचे नेतृत्व करू शकाल. तुमच्या स्वप्नातले हिन्दुराष्ट्र पाच-पन्नास वर्षांत तुम्ही उभे करू शकाल. निदान त्यासाठी आखणी तरी करू शकाल.'

फाशीच्या छायेत अशा प्रकारे चाललेल्या संवादांना गांभीर्यासह अवखळपणाची झालरही अधूनमधून येत असे हे खरे वाटणे थोडेसे अवघड आहे. त्या भूमिकेत वावरून मनुष्य रुळून जातो आणि रणांगणावर सैनिकांत जशी एक निश्चिंततेची वृत्ती आढळते तशी येथेही आढळत असे. असे मी आमच्याच संबंधात नव्हे तर आणखीही काही जणांच्या संबंधात पाहिले आहे.

सौभाग्यवती चंपूताईंना नानांनी सांगितले होते, 'मनुष्याच्या अमरत्वावर तुझी श्रद्धा असेल तर तू सौभाग्यवतीच आहेस ! तुझ्या बाह्य सौभाग्यचिन्हांसह समाजात वावरत जा.

त्यातूनच तुला माझे अस्तित्व जाणवेल.'

सौभाग्यवती चंपूताई राणी लक्ष्मीबाई स्मारक मंडळातील बालकांच्या शाळेत अध्यापिका म्हणून काम करतात.

मैत्री किती दृढ असावी ? 'राजद्वारे स्मशानेच' स्थिर राहणारी ती खरी मैत्री असे एक वचन आहे. मला नानासंबंधी सर्वांत अधिक ओढ असेल तर ती नथुराम आणि नाना यांच्यात टिकलेल्या अभंग मैत्रीमुळे. तो योगही असेल. पण 'कठिण समय येता कोण कामास येतो.' याचे या ठिकाणी नानांची उत्तरे दिले होते ते आपल्या मैत्रीने. 'तू पुढे चल मी मागून आलोच.' असे म्हणून मागच्या मागे निसटणारे लोक अगदी गांधीजींच्या सत्याग्रहातही अनेक असत.

दिनांक ३१-१-१९४८ ला नानांनी एक तार मुंबईहून दिल्लीला धाडली होती. नथुरामच्या बचावाची (defence ची) सिद्धता करण्याविषयी त्यात आशय होता. ती तार त्यांना काटपुरावा (म्हणजे alibi) म्हणून उपयोगी पडला असता. पण त्यांनी नथुरामच्या बरोबर पाऊल टाकण्याची सिद्धताही ठेवली होती. ती तार नानांनी आधीच लिहून श्रीमती मनोरमा साळवी यांच्या हस्ते धाडण्याची व्यवस्था केली होती असा पुरावा मांडला गेला होता. श्रीमती मनोरमा यांची साक्ष झाली नव्हती कारण त्या फितलेल्या साक्षीदार (hostile witness) होत्या असे अभियोजकांचे म्हणणे होते.

माझ्या शिक्षेच्या विषयावर १९६१ मध्ये मी प्रबंधाच्या स्वरूपाचे आवेदन सर्वोच्च न्यायालयाला मुद्रित करून धाडले होते. त्याला एक ग्रंथाचे स्वरूप असल्याने मी त्याला अर्पण-पत्रिका जोडली होती. (Petition No. 16 of 1962) उच्च न्यायालयाने नथुरामसंबंधी ज्यासाठी गौरवोद्गार काढले होते त्या नथुरामच्या गुणांचे स्मरण म्हणून नथुरामला आणि दृढमित्रता या नानांच्या गुणासाठी त्यांना मी अर्पण-पत्रिका लिहिली होती. अवैध कृत्याचे समर्थन करण्याचे मला कारण नव्हते. कारण अवैध कृत्याला न्यायोचित दंड झालाच पाहिजे असे माझेही मत आहे. मी म्हटले आहे :

आदरणीय बंधु नथुरामला... आणि नथुरामचा मित्र नारायण दत्तात्रय आपटे -

की ज्याने जसे सुखाच्या तसेच दुःखाच्या दिवसांतही आपली मित्रता ढळू दिली नाही, जो शेवटी नथुरामसह हातात हात घेऊन, खांद्याला खांदा भिडवून, कोणालाही जगात सर्वांत मौल्यवान असणाऱ्या वस्तुचा, प्रत्यक्ष प्राणाचा त्याग करण्यास ज्ञात आणि अज्ञात विश्वाला विभागणाऱ्या सेतूवर उभा राहिला आणि ज्याने नथुरामसह बंकिमचंद्रांच्या मंत्रमुग्ध करणाऱ्या 'वंदेमातरम्' या शब्दांनी ज्ञात विश्वाचा निरोप घेतला,

त्यास आदरपूर्वक अर्पण.

Dedicated to the memory of revered brother
NATHURAM... and
Nathuram's friend
NARAYAN DATTATRAYA APTE

Who stuck to the friendship in the days of sorrow and days of pleasure alike, ultimately stood side by side, hand in hand along with Nathuram, on the bridge separating the known and the unknown world, to part with most precious, the only dearest thing to oneself on Earth, one's life, and bade goodbye along with Nathuram to the known world in Bankim's enchanting words :

'वंदे मातरम्'

卐 卐

आठ

आरोपी क्रमांक आठ : विनायक दामोदर

गांधीहत्या अभियोगात लाल किल्ल्यातील विशेष न्यायालयापुढे नऊ आरोपी प्रत्यक्षात आणले गेले. त्यातील आठवे आरोपी होते विनायक दामोदर सावरकर.

एखादे अवैध कृत्य पार पाडण्यासाठी दोन किंवा अधिक व्यक्तींनी संगनमत केले असेल तर असे संगनमत षड्यंत्र मानले जाते किंवा कट मानला जातो. त्या दोन किंवा अधिक व्यक्ती त्या कटाचे घटक मानले जातात. कटातील एका घटकाला जी शिक्षा असेल त्याच शिक्षेला कटातील कोणताही घटक पात्र ठरतो.

अशा अवैध कृत्यासाठी कोणते ना कोणते सहाय्य कोणा व्यक्तीकडून झाले असेल तर तेवढ्यानेही ती व्यक्ती कटात सहभागी धरली जाते. ते सहाय्य त्या अवैध घटनेच्या स्थळावरील उपस्थितीचे असो, किंवा पैशाचे असो, शस्त्रास्त्रांचे असो वा वाहनाचे असो. त्या व्यक्तीचा त्या कटात हात होता असे मानले जाते. कोणा व्यक्तीने केवळ त्या अवैध कृत्याच्या भावी कर्त्यांना आशीर्वाद दिला असेल तरीही तो आशीर्वाद देणारी व्यक्ती कटाचा घटक मानली जाते.

कोणाला कटाचा घटक ठरविताना न्यायालय मूलतः दोन गोष्टी बघते. एकाने केलेल्या अवैध कृत्याचे दुसऱ्याला त्या घटनेपूर्वीच ज्ञान होते काय; आणि असे ज्ञान असेल तर ते ज्ञान अवैध कृत्य पार पाडण्यासाठी पूरक म्हणून होते काय ? नुसते ज्ञान असेल पण ते त्या घटनेला पूरक म्हणून नसेल तर अशी व्यक्ती कटाचा घटक ठरत नाही. याच अभियोगातील याचे उदाहरण म्हणजे प्राध्यापक जगदीशचंद्र जैन. त्यांनी मदनलाल आपल्याला कटासंबंधीचे वृत्त आधी बोलला होता असे आपल्या साक्षीत सांगितले होते. दि. २०-१-१९४८ या

दिवशी मदनलालने गांधीजींच्या प्रार्थनासभेत स्फोटकाचा स्फोट केला असे त्यांनी दि. २१-१-१९४८ ला वृत्तपत्रात वाचले आणि मग त्यांनी गृहमंत्री श्री. मोरारजी यांची गाठ घेतली आणि मदनलाल जे बोलला ते त्यांना सांगितले असे त्यांनी आपल्या साक्षीत सांगितले होते. त्यामुळे हे पूर्वज्ञान श्री. जैन यांना कटाचा घटक ठरविण्यास अपुरे होते.

अशी कल्पना करू की श्री. जैन यांनी, त्यांच्या म्हणण्याप्रमाणे, मदनलाल त्यांच्याशी जे बोलला त्याची वाच्यता केली नाही. पण मदनलालकडून आरक्षींना त्या संभाषणाचा वृत्तान्त कळला आणि मग श्री. जैन यांनी, अशी वस्तुस्थिती असल्याचे आरक्षींना सांगितले अशा स्थितीतही श्री. जैन यांचे पूर्वज्ञान त्यांना कटात गोवू शकले नसते. कारण त्यांचे पूर्वज्ञान आणि त्यांची मुग्धता त्या अवैध घटनेच्या पूर्तीसाठी होती असे मानण्यास काही प्रमाण नव्हते.

न्यायालय आणखी एक गोष्ट बघते ती अशी : कोणा एकाने किंवा काही जणांनी एक अवैध कृत्य केले हे सिद्ध झाले; इतरांनी त्या कोणा एकाला किंवा त्या काहीजणांना सहाय्य केले. ते सहाय्य द्रव्याचे असेल, साहित्याचे असेल किंवा नुसत्या सदिच्छांचे असेल. इतरांनी असे सहाय्य केल्याचेही सिद्ध झाले. परंतु असे सहाय्य त्या विशिष्ट अवैध कृत्याच्या पूर्तीसाठी होते काय याची छाननी करून, ते तसे होते असे सिद्ध झाले तरच ते इतर त्या कटाचे घटक ठरतात, अन्यथा नाही. या प्रकरणातील याही संबंधीचे एक उदाहरण असे -

या अभियोगात आणलेले साक्षीदार श्री. दीक्षितजी महाराज आणि कृष्णजी जीवनजी महाराज यांनी आपल्या साक्षीत, त्यांनी नाना आपटे यांना शस्त्रासाठी पैसे, काही आक्रमक हेतूसाठी वाहन, काही शस्त्रास्त्रे इत्यादि सहाय्य केल्याचे सांगितले. असे सहाय्य ही घटनाही स्वतंत्रपणे अवैध होती. परंतु या विशिष्ट कृत्यासाठी हे सहाय्य होते, किंवा या सहाय्यातील काही भाग होता अशी त्यांची साक्ष नसल्याने ते कटाचे घटक ठरणे असंभवनीय होते. श्री. जैन, श्री. दीक्षितजी महाराज आणि श्री. कृष्णजी जीवनजी महाराज यांच्या साक्षींचा उल्लेख पूर्वीच्या लेखात आलेला आहे म्हणून संदर्भ ग्रंथाची पाने येथे दिलेली नाहीत.

दि. २७-५-१९४८ या दिवशी न्यायालयात आरोपी प्रथमतः आणले गेले तो दिवस आणि नंतर एक-दोन दिवस प्राथमिक व्यवस्थेसाठी न्यायालय भरले होते. दि. २२-६-१९४८ या दिवशी आरोप ठेवले गेले. आदल्याच दिवशी दिगंबर रामचंद्र बडगे, आरोपी क्रमांक ४ याला न्यायालयात नेले होते. त्याला क्षमेचा साक्षीदार केले गेले. त्यामुळे तो 'आरोपी' स्थानावरून अलग झाला. पुढील आरोपींचे क्रमांक वर सरले. सावरकर आता आरोपी क्र. ७ होते. प्रमुख अभियोजक श्री. दप्तरी यांनी अभियोगाची रूपरेषा न्यायालयाला निवेदन केली. (ग्रंथ ६, पृ. ४६)

सावरकरांवरील अन्याय

अभियोजकांचे सावरकरांविरुद्ध जे म्हणणे होते ते मुद्रित अभिलेखाच्या वेगवेगळ्या ग्रंथांतून विलगपणे आले आहे. त्याचे तात्पर्य असे काढता येते :

'नथुराम आणि नाना आपटे यांचा सावरकरांशी दाट परिचय होता. 'हिन्दुराष्ट्र' हे दैनिक नथुराम आणि आपटे चालवीत असत; त्या दैनिकावर सावरकरांचे चित्र असे. सावरकरांनी नथुराम आणि आपटे यांना आर्थिक सहाय्य केले होते. नथुराम आणि सावरकर, तसेच आपटे आणि सावरकर यांच्यात पत्रव्यवहार होता. सावरकरांना गांधीहत्या या घटनेचे ती घटना घडण्यापूर्वीच ज्ञान होते. त्या कृत्याच्या पूर्तीसाठी त्यांनी हातभार लावला होता. त्यांनी प्रत्यक्ष हे कृत्य करणाऱ्यांना आशीर्वाद दिला होता. दिल्लीतूनही दि. १९-१-१९४८ या दिवशी सावरकरांशी दूरध्वनीने संपर्क साधण्याचा प्रयत्न झाला होता.

अभियोजकांच्या प्रतिपादनात आणखी एक धार होती. त्यांचे म्हणणे असे होते की, नथुराम आणि आपटे यांच्याकरवी गांधीहत्या हे कृत्य ज्या व्यक्तीने करविले ती व्यक्ती म्हणजे आरोपी क्र. ८, विनायक दामोदर सावरकर. सावरकरांना हे दोघेजण गुरुस्थानी मानीत आणि मार्गदर्शक म्हणून त्यांना आदर दाखवीत. मात्र सावरकर सर्व वेळ पडद्याआड राहिले.

आपण केलेले आरोप पुराव्यानिशी सिद्ध करण्याचे अभिवचनही अभियोजकांनी न्यायालयाला दिले होते.

आरोप सिद्ध झाल्यास अभियोजकांच्या म्हणण्याप्रमाणे, या घटनेचे सर्वांत अधिक उत्तरदायित्व सावरकरांकडे येणार असल्याने, फाशीवाचून दुसरी शिक्षा त्यांच्यासाठी नव्हती हे ओघाने आलेच.

अभियोगाचे काम चालू झाले. सावरकरांविरुद्ध एकेक पुरावा मांडला जाऊ लागला. त्या पुराव्याला मग कालक्रमाप्रमाणे संगती लावली गेली.

इतर आरोपींशी पत्रव्यवहार

सावरकरांच्या घराची दि. ३१-१-१९४८ या दिवशी श्री. नगरवाला आणि श्री. प्रधान या आरक्षी अधिकाऱ्यांनी झडती घेतली. त्यांनी पत्रव्यवहाराचे गठ्ठे आणि इतर काही कागद स्वाधीन करून घेतले. प्रमाण क्रमांक पी. २४४ हा तो पंचनामा आहे (अभिलेख ग्रंथ ४, पृष्ठे १८२-१८४).

पत्रव्यवहाराच्या २४३ नस्त्या किंवा फायली होत्या. दहा सहस्रावर कागद होते. १९३८ पासूनची ती पत्रे होती. त्यांचे परीक्षण करण्यास तीन महिने लागले.

नथुरामने आणि आपटेने वेगवेगळी आणि एकत्र लिहिलेली पत्रे त्यात मिळाली.

बडगेचीही दोन-तीन पत्रे त्यात होती. बीस-पंचवीस पत्रे पुरावा म्हणून पुढे आणली गेली. ती प्रमाण क्रमांक २७७ ते २९९ अशी नोंदवली आहेत. सावरकरांनी लिहिलेल्या पत्रांचीही नोंद त्या प्रमाणात झाली आहे.

नथुरामने लिहिलेली पत्रे किती मिळाली असे साक्षीदारास विचारले. ती १०१ होती असे उत्तर मिळाले परंतु ती पत्रे पुराव्यात आणली नसल्याने न्यायमूर्तींनी तो प्रश्न आणि ते उत्तर नोंदवून घेण्यास नकार दिला.

पत्रव्यवहारात आक्षेपार्ह असे काहीही नव्हते. परंतु पत्रांच्या पुराव्याने अभियोजकांना तीन गोष्टी सिद्ध करावयाच्या होत्या.

(१) नथुराम आणि सावरकर, तसेच आपटे आणि सावरकर यांचा चांगला परिचय होता. त्याचप्रमाणे बडगे आणि सावरकर यांचाही परिचय होता.

(२) सावरकरांबरोबर नथुराम आणि आपटे दौऱ्यावर जात असत.

(३) नथुराम आणि आपटे यांच्या केवळ वचनपत्रावर - प्रॉमिसरी नोटवर - सावरकरांनी पंधरा सहस्र रुपये त्यांना दिले होते.

सावरकरांनी यातील कोणतीच गोष्ट नाकारली नाही. त्यांनी एकेका गोष्टीचे स्पष्टीकरण दिले. बडगे यांची पत्रे प्रमाण क्रमांक पी. ८७, ८८ आणि ८९ अशी नोंदली गेली होती. बडगे हिन्दुसभेचे काम करत असे; कधी वेतन घेऊन, तर कधी वेतन न घेता. तो शस्त्रभांडार चालवीत असे. त्या पुराव्यात बडगेची दोन पत्रे १९४३ मधील होती. त्याने आपल्या शस्त्रभांडाराच्या कार्याचा आढावा सावरकरांना लिहिला होता आणि आर्थिक सहाय्य मागितले होते. सावरकरांनी न्यायालयाला दि. १०-११-१९४८ ला आपले वक्तव्य दिले. वरील संबंधात ते म्हणाले -

शस्त्रबंदीचा निर्बंध काढून टाका असा मी प्रचार करी. शस्त्रे बाळगण्यास आणि विकण्यास मुक्त हस्ताने बावीत, तरुणांना सैनिकी शिक्षण दिले जावे, असा माझा आग्रह असे. शस्त्रवितरणाच्या कार्याची प्रतिवृत्ते दिलेली आणि आर्थिक सहाय्य मागितलेली पुष्कळ पत्रे मजकडे मी हिन्दुसभेचा अध्यक्ष या नात्याने येत असत. (ग्रंथ दोन पृष्ठ १९१)

बडगेचे तिसरे पत्र दि. २६-३-१९४७ चे होते. हिन्दुसभेच्या मुंबईच्या कार्यालयाकडून वेगवेगळ्या वाचनालयांसाठी पुस्तकांच्या देणग्या दिल्या जात. बडगेने शस्त्रभांडाराच्या जोडीला एक वाचनालयही चालविले होते. त्याला सहाय्य म्हणून ३६ रुपयांची पुस्तके, त्याव्यतिरिक्त तुकाराम गाथेच्या दोन प्रती आणि आणखी काही पुस्तके धाडली गेली होती. बडगेचे ते पत्र म्हणजे त्या पुस्तकांची सामर पोहोच होती. सावरकरांनी सांगितले, 'अभियोजकांच्या हाती, माझ्या पत्रांच्या नस्त्या आहेत. त्यात अशा कित्येक पावत्या आढळतील. हे कार्यालय प्रतिवर्षी शेकडो रुपयांची पुस्तके भेटीच्या स्वरूपात धाडीत असे, हे त्या पावत्यांवरून दिसून येईल.

प्रस्तुत अभियोगात पुढे आणलेल्या या पुराव्याचा किंचितही संबंध नाही. पत्रव्यवहारात आक्षेपार्ह असे काही नाही असे माझे म्हणणे आहे' (ग्रंथ २, पृष्ठ १९१)

सैनिकीकरण हा हिन्दुमहासभेचा एक प्रमुख कार्यक्रम असे. नाना आपटे तेव्हा नगरला होते. तेथे त्यांनी सैनिकीकरण आणि शस्त्रविद्येचे शिक्षण याचे कार्य चालविले होते. ते हिन्दुसभेचे कार्यकर्ते होते. नगरला नगरपालिकेत हिन्दुसभेचे बहुसंख्य सभासद निवडून आले होते. त्याचे प्रतिवृत्त आपटे यांनी सावरकरांना धाडले होते. आपटे यांनी त्या वेळच्या गृहमंत्र्यांच्या (श्री. कन्हैयालाल मुन्शी) अनुज्ञेने 'रायफल क्लब' काढला होता. आपटे यांची ऑनररी टेक्निकल रिक्रूटिंग ऑफिसर म्हणून नेमणूक झाली होती. पुढे त्यांना विमानदलात किंग्ज कमिशन मिळाले होते. आपटे यांच्या पत्रात बहुतांशाने सैनिकीकरणाच्या कार्याचे प्रतिवृत्त आणि हिन्दुसभेच्या कार्याची चर्चा होती.

नाना आपटे यांचे पुराव्यात आणलेले पहिले पत्र दि. १३-२-१९३८ चे होते. (अभिलेख ग्रंथ ५, पृष्ठ ९ : प्रमाण डी २२) मुंबईचे मुख्यमंत्री श्री. खेर आणि गृहमंत्री श्री. मुन्शी यांना नगरच्या जिल्हाधिकाऱ्यांकरवी 'रायफल क्लब'साठी अनुज्ञापत्र मिळावे अशी विनंती केल्याचा त्यात उल्लेख आहे. पुढील पत्रातून आपटे यांनी जिल्ह्यातून दौरे काढून 'रायफल क्लब' काढण्याची अनुज्ञा मागितल्याचा उल्लेख आहे. पुण्याचा रायफल क्लब श्री. न. बि. गाढगीळ यांच्या हस्ते उघडल्याचाही दि. १-५-१९३९ च्या पत्रात निर्देश आहे (ग्रंथ ५, पृष्ठ १२). पुढे सावरकरांचे या संबंधात मार्गदर्शन मागितले आहे. 'हिन्दुराष्ट्र', 'अग्रणी' या वृत्तपत्रांचा विचार चालू असतानाची आणि वृत्तपत्र निघाल्यानंतरची काही पत्रे आहेत.

नथुरामचे पहिले पत्र दि. २-३-१९३८ चे आहे. (ग्रंथ ५, पृष्ठ १७) या पत्रात त्याने देशगौरव सुभाषचंद्र बोस यांच्या काँग्रेसच्या ५१ व्या अधिवेशनात झालेल्या अध्यक्षीय भाषणाची चिकित्सा केली आहे. जातीय समस्या, राष्ट्रभाषा, राष्ट्रलिपी, हिन्दुस्थानचा दृष्टिकोण समजवण्यास परदेशात प्रचार, आर्थिक आणि औद्योगिक विकास, सामाजिक समतेच्या तत्त्वांचा अंगीकार, ब्रिटिशांशी लढा देण्याची उघड भाषा करण्याची आवश्यकता, राष्ट्रीय स्वयंसेवक दल स्थापन करण्याचे महत्त्व इत्यादी प्रश्नांवर स्वतःची मते मांडून हिन्दुसभेचे अध्यक्ष या नात्याने सावरकरांनी काय केले पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली आहे, अशा प्रकारच्या सुचनाही त्याने दिल्या आहेत.

नंतरच्या पत्रांतूनही, हिन्दुसभेचे कार्यक्रम, प्रतिवृत्त, दौऱ्यावर येण्यासंबंधी विनंती असे विषय आहेत. (अग्रणी) 'हिन्दुराष्ट्र' चालू करण्याच्या उद्देशाची काही पत्रे तसेच हिन्दुराष्ट्र-दल या संघटनेच्या कार्याची पत्रे नथुराम आणि नाना आपटे या दोघांची मिळून आहेत.

विशेषतः हिन्दुसभेच्या कार्यकर्त्यांना सावरकरांविषयी आदर वाटे. 'ये यथा मां प्रपद्यन्ते

तान्स्तथैव भजाम्यहम्' या नीतीने सावरकरांनाही निष्ठावान कार्यकर्त्यांविषयी प्रेम वाटे. 'हिन्दुराष्ट्र' किंवा 'अग्रणी' या वृत्तपत्रांसाठी त्यांनी नथुराम आणि आपटे यांना त्यांच्या वचनपत्रावर १५००० रुपये दिले होते. त्या दैनिकांचे धोरण नथुराम आणि आपटे यांच्याच हाती राहिले पाहिजे असा लेख इतर संबंधित व्यक्तींकडून करून घेण्याचीही त्यांनी एका पत्राने त्यांना सूचना केली होती. (पत्रांचा दि. ४-४-१९४५ प्रमाण पी. ३०२, अभिलेख ग्रंथ ४, पृष्ठ २२४) यातील कोणतीही गोष्ट अमान्य करण्याचे सावरकरांना काही कारण वाटले नाही आणि ती मान्य करण्यात भीतीही वाटली नाही. त्यांनी स्पष्टीकरण दिले :

'हिन्दुसभेचे अनेक कार्यकर्ते होते. त्यातच नथुराम आणि आपटे होते. त्या दृष्टीने त्यांचा आणि माझा चांगला परिचय होता. मी त्यांच्या वृत्तपत्राला आर्थिक सहाय्य दिले. तसेच विक्रम, फ्री हिन्दुस्थान, इत्यादी वृत्तपत्रांनी दिले होते, हे नथुरामच्या पत्रावरून दिसून येईल. दौऱ्यावर माझ्यासह पुष्कळजण येत त्यात हे दोघे असत. वृत्तपत्राचे धोरण ठरविणे त्यांच्याच मनावर होते. नथुराम आणि आपटे यांच्याशी माझा असलेला संबंध अवैध होता असे आपणास कोणत्याही पुराव्यात आढळणार नाही.'

दैनिकावरील छायाचित्र

'अग्रणी' किंवा 'हिन्दुराष्ट्र' या दैनिकाच्या शिरोभागी सावरकरांचे चित्र असे. अभियोजकांनी त्याचा विशेष निर्देश केला होता. 'अग्रणी' च्या धोरणाशी सावरकरांचा संबंध असल्याचे त्या चित्रावरून दिसते असा संकेत त्यांनी केला होता. सावरकर म्हणाले, 'वृत्तपत्रांवर अशी चित्रे छापण्याची या देशात सर्वसामान्य प्रथा आहे. गांधीजींचे चित्रही पुष्कळ वृत्तपत्रांवर असे. गांधीजींच्या वाचण्यात किंवा बघण्यातही ती वृत्तपत्रे नसतील. पुण्याच्या सुप्रसिद्ध 'केसरी' वर लोकमान्य टिळकांचे चित्र असते. परंतु त्या आधाराने, 'केसरी'च्या आजच्या धोरणाला लोकमान्यांचा आत्मा उत्तरदायी आहे असे कोण्या न्यायमंदिरात कोणी अध्यात्मवादीही म्हणणार नाही, आणि न्यायतः आणि वस्तुतः त्यांची छायाचित्रे छापणारा संपादक ती छापण्यास उत्तरदायी असतो, ज्यांची चित्रे छापली ते नेते संपादकाच्या धोरणाला उत्तरदायी नसतात, हे कोणीही मान्य करील.'

नथुराम आणि आपटे सावरकरांना गुरुस्थानी मानीत आणि म्हणून गांधीहत्या करण्यापूर्वी त्यांनी सावरकरांशी विचारविनिमय केला असलाच पाहिजे या अभियोजकांच्या म्हणण्याला सावरकरांनी उत्तर दिले :

''अनेक दंडित कोण्या ना कोण्या धर्मोपदेशकाचे अनुयायी म्हणवतात. याचा अर्थ, त्यांच्या अपराधापूर्वी त्यांनी त्यांच्या गुरुचा परामर्श घेतला असा लावणे योग्य होईल काय ? गांधीजींवर निष्ठा असणाऱ्या त्यांच्या अनुयायांनी १९४२ मध्ये भूमिगत शस्त्राचार केले.

परकीय राजवटीविरुद्ध असले शस्त्राचार योग्य वा अयोग्य हा आत्ताचा प्रश्न नाही. गांधीजींनी या भूमिगत शस्त्राचाराचा निषेध केला एवढे सांगितले की पुरे. परंतु लोकांनी त्या अनुयायांच्या मार्गदर्शनाखाली घातपाती प्रकार आणि रक्तपात केले; ते 'महात्मा गांधी की जय' असा घोष सारखा करीत असत. परंतु ब्रिटिश शासनानेसुद्धा लोक गांधीजींना आदर दाखवितात म्हणून आणि घातपाती कृत्ये करताना 'गांधीजी की जय' म्हणतात म्हणून, गांधीजींचा परामर्श त्या लोकांनी घेतला असला पाहिजे अशा अनुमानाने गांधीजींना आरोपी केले नाही... अभियोजकांचा पुरावा 'असे झाले असले पाहिजे' किंवा 'होणे शक्य नव्हते' अशा निष्कर्षांवर आधारित आहे. त्यावरून एवढेच दिसते की भरीव आणि प्रत्यक्ष पुरावा जसजसा मिळेनासा झाला तसतसे अभियोजक हताशपणे आणि असंबद्धपणे असंगत तर्कांचा आधार घेऊ लागले. त्यांची प्रतिष्ठा धोक्यात होती असा त्यांचा चुकीचा किंवा बरोबर समज होता, ती वाचविण्याचा त्यांचा हा प्रयत्न आहे.''

मदनलालची प्रशंसा

प्रा. जगदीशचंद्र जैन, श्री. मोरारजी देसाई आणि अंगदसिंग यांच्या साक्षीतील एक भाग सावरकरांविरुद्ध पार्श्वभूमी म्हणून उपयोग करण्याचा अभियोजकांचा हेतू होता. डॉ. जैन यांच्या साक्षीप्रमाणे, मदनलाल त्यांना तो दिल्लीला निघण्यापूर्वी एक दोन दिवसाआड भेटत असे. एका अशा भेटीच्या वेळी अंगदसिंग थोडा वेळ तेथे होता. मदनलाल जे बोलला त्याचा सारांश श्री. जैन यांनी दिला. मदनलालने अहमदनगरला निर्वासितांच्या पुनर्वसनासाठी एक संघ उभा केला होता, करकरे त्याला आर्थिक सहाय्य देत. या संघाने पुष्कळ शस्त्रास्त्रे आणि स्फोटके गोळा केली होती. ती एका अरण्यात दडवून ठेवली होती. हिन्दुमहासभेचे वीर सावरकर यांनी मदनलालच्या हालचाली ऐकल्या. त्यांनी त्याला बोलावणे धाडले, त्याच्याशी दोन-एक तास चर्चा केली, त्याची पाठ थोपटली, त्याला 'चालू दे' असे ते म्हणाले, मग, आम्ही एका नेत्यास मारायचे ठरविले आहे असे मदनलाल म्हणाला...

अंगदसिंग मध्येच निघून गेले होते. अहमदनगरच्या 'आम्ही संघ उभा केला आहे...' इत्यादी वर्णनाच्या पूर्वीच तो निघून गेला होता असे श्री. जैन यांनी सांगितले. अंगदसिंग याच्या म्हणण्याप्रमाणे ते श्री. जैन यांना पुन्हा भेटले तेव्हा श्री. जैन यांनी मदनलालचे बोलणे त्यांना सांगितले.

श्री. जैन यांनी दि. २६-२-१९४८ ला मुंबईचे चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट श्री. ऑस्कर ब्राऊन यांच्यापुढे वक्तव्य दिले होते. उलट तपासणीत श्री. जैन यांनी सांगितले, 'मदनलालच्या लोकांनी शस्त्रास्त्रे गोळा करून अरण्यात ठेवली. वीर सावरकरांनी त्याला बोलाबले, त्याची पाठ थोपटली हे मदनलाल बोलल्याचे मी त्या वक्तव्यात सांगितले नाही.'

अंगदसिंगचा उल्लेखही त्या वक्तव्यात त्यांनी केला नसल्याचे ते बोलले. (ग्रंथ १, पृष्ठ १३३)

मदनलालचे बोलणे श्री. जैन यांनी दि. २१-१-१९४८ ला श्री. मोरारजींच्या कानावर घातले असल्याचे त्यांनी आपल्या साक्षीत सांगितले होते. श्री. मोरारजी देसाईंनी आपल्या साक्षीत श्री. जैन त्यांना तसे बोलले असल्याचा निर्वाळा दिला. या दोघांच्याही साक्षीत सावरकरांचा संबंध असेल तर मदनलालच्या नगर येथील हालचालींसाठी पाठ थोपट्यापुरता मर्यादित होता, परंतु श्री. अंगदसिंग यांना आपल्या साक्षीत सुधारणा (?) करावीशी वाटली. सावरकर या कटामागे आहेत असे मदनलाल श्री. जैन यांना म्हणाल्याचे जैन यांनी सांगितले असे अंगदसिंग यांनी सांगितले. (ग्रंथ १, पृष्ठ १४८)

या साक्षी पोकळ असल्याचे आणि विश्वासार्ह नसल्याचे सावरकरांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणले. त्यांच्या म्हणण्यातील सारांश :

'मुळात आधी, या तिन्ही साक्षीदारांपैकी एकानेही आपापल्या कथनाचे किंवा एकाने दुसऱ्याला सांगितलेल्या गोष्टींचे टिपण ठेवले नाही.' 'मी टिपण कधीच केले नाही.' असे मोरारजींनीही मान्य केले. कर्णोपकर्णी गोष्टी कशा विकृत होतात हे अंगदसिंग यांच्या साक्षीवरून दिसते. शक्यता अशी आहे की, जैन आणि मदनलाल यांचा देण्याघेण्याचा संबंध असल्याने, आपल्या अंगावर काही शेकू नये म्हणून दिनांक २१-१-१९४८ ला श्री. जैन तुरुतुरू गृहमंत्र्यांकडे गेले. हा एखादा कट असावा असा संकेत त्या दिवशीच्या वृत्तपत्रांनी केला होता. त्याचा उपयोग जैन यांनी केला आणि 'कथा' रचली. कटवाल्यांची नावे मदनलालकडून विचारून घेण्याची त्यांना आवश्यकता वाटली नाही ! त्यांना ती सांगता आली नाहीत. पुन्हा मदनलाल कटाचे वृत्त सांगतो तेव्हाच नेमके अंगदसिंग अनुपस्थित असतात !

'मॅजिस्ट्रेटपुढील वक्तव्यात श्री. जैन, मदनलाल आणि मी यांच्या भेटीचा उल्लेख करीत नाहीत. कारण विचारता ते म्हणतात, मी मंत्र्यांना आणि आरक्षींना बोललो होतो ! आणि इतर किरकोळ गोष्टी मॅजिस्ट्रेटपुढे श्री. जैन बोलले होते.

'समजा, मदनलाल जैन यांच्याशी काही बोलला असेल तर माझा संबंध अहमदनगरच्या मदनलालच्या हालचालीपुरताच त्यांनी जोडला आहे; परंतु त्या पुराव्यालाही दुजोरा नाही. असे काही बोलणे कधी झाले नसल्याचे मदनलालने सांगितले आहे. म्हणून प्राध्यापकांपासून मंत्र्यांपर्यंतच्या या साक्षी असंपुष्टित ऐकीव माहितीच्या (Uncorroborated hearsay) म्हणून फेकून दिल्या पाहिजेत.'

नथुराम, आपटे यांची सावरकर सदनाला भेट : दि १४-१-१९४८

कालानुक्रमाने, सावरकरांच्या घराला चाटून जाणारा एक पुरावा त्यानंतर मांडला

गेला. दि. १४-१-१९४८ ला नथुराम आणि आपटे दुपारच्या गाडीने पुण्याहून मुंबईला गेले होते. श्रीमती शांता मोडक त्या गाडीत होत्या. त्यांची साक्ष दि. २-८-१९४८ ला झाली. त्या म्हणाल्या :

'माझे दुसऱ्या वर्गाचे तिकीट होते. डब्यात शिरून मी खिडकीजवळची जागा बघू लागले. कुणीसे मला विचारले, 'काय शोधीत आहात ?' 'खिडकीपाशी जागा' मी सांगितले. ते गृहस्थ म्हणाले, ''हात्तिच्या ! ही माझीच घ्या ! चालेल ?' आणि ते उठले मी त्या जागेवर बसले. समोरासमोर दोन जागा होत्या. ते गृहस्थ माझ्या समोरच्या बाकावर बसले, गाडी चालू होणार होती तेवढ्यात आणखी एक गृहस्थ आले, ते त्या पहिल्या गृहस्थाशेजारी बसले. मला वाटले, त्या दोघांचा परिचय होता. (आपटे हे पहिले गृहस्थ, नथुराम हे दुसरे, श्रीमती शांता मोडक यांनी न्यायमूर्तींना दाखवले.)

'ज्यांनी जागा दिली त्यांनी मला विचारले, 'आपण बिंबा तर नव्हे ?' 'बिंबा' माझे पडद्यावरले नाव. मी 'होय' म्हटले ! मग आमचे संभाषण झाले. मला दादरला उतरायचे आहे असे मी बोलले. दादर जवळ येत होते तसे त्यांनी मला पत्ता विचारला. मी 'शिवाजी पार्क' सांगितले. ते म्हणाले, आपण एकट्याच जाणार असाल तर आम्ही आपणास तेथे सोडू.' ते सावरकर सदनात जाणार असल्याचा त्यांच्या बोलण्यावरून मला बोध झाला होता. 'माझा भाऊ स्थानकावर येणार आहे. तो आला नाही तर मी तुमच्या बरोबर येईन.' असे म्हटले होते.

'आम्ही दादरला उतरलो. माझा भाऊ आला होता. त्याने 'जीप' आणली होती. मीच आपणास शिवाजी पार्कवर सोडीन, असे मी त्या दोघांना म्हटले. त्यांनी मान्य केले. माझे घर आणि सावरकर सदन एकाच रस्त्यावर एकाच कडेला आहेत. आमचे घर आधी, सावरकर सदन नंतर. आम्ही सावरकर सदनापाशी गाडी थांबवली. ते दोघे उतरले. आम्ही गाडी वळविली.'

उलट तपासणीत 'सावरकर सदनात शिरताना मी त्यांना पाहिले नाही.' असे श्रीमती शांता मोडक म्हणाल्या. (ग्रंथ १, पृष्ठ १२२-१२४)

सावरकर सदनात तळमजल्यावर श्री. अ. स. भिडे रहात असत. श्री. गजानन दामले सावरकरांचे कार्यवाह - आणि श्री. आप्पा कासार हेही तळमजल्यावर रहात; तळमजल्यावरचा मध्य भाग हिन्दुसभेच्या कार्यकर्त्यांना कार्यालयासारखा ठेवला होता. सावरकर पहिल्या मजल्यावर रहात. सावरकर सदनात किंवा त्या कार्यालयात येणारे लोक सावरकरांकडे जात असा काही नियम नसे. या सर्व गोष्टी पुराव्यात आल्या होत्या.

नथुराम आणि आपटे सावरकरांकडे जाणार होते असे त्यांच्या बोलण्यात आल्याचे साक्षीदाराने सांगितले नव्हते, ते सावरकर सदनात जाताना आपण पाहिले नसल्याचे

साक्षीदाराने सांगितले. पण तसे पाहिले तरीही, सावरकरांकडे जाणार होते किंवा गेले होते असे काही ठरू शकले नसते. ते सावरकरांकडे गेले असे म्हटल्यानेही सावरकर यांना त्या धाग्याने कटात गुंफणे अप्रस्तुत होते. पण तेथवर या साक्षीदारांकरवी तरी प्रश्न आला नव्हता. सावरकर सदनाची आणि तळमजल्याची स्थिती काय होती याचा सावरकरांनी निर्देश केला आणि या साक्षीचा कोणताच संबंध प्रस्तुत प्रकरणात येत नाही, असे न्यायालयाला सांगितले. (ग्रंथ २, पृष्ठ १९१).

बडगे याची साक्ष

क्षमेचा साक्षीदार बडगे याच्या साक्षीतील काही भागाचा नेम सावरकरांवर होता. अशा प्रकरणात 'बोलविता धनी वेगळाची' असेच बहुधा घडते. बडगे आणि सावरकर यांचा परिचय होता हे त्याच्या साक्षीतून सिद्ध व्हावे म्हणून प्रथम बडगेने पार्श्वभूमीच्या स्वरूपाचे दोन-तीन प्रसंग सांगितले.

'१९४४-४५ मध्ये गवालीया टॅन्कवर सावरकरांचे भाषण झाले त्यानंतर मग, तीस-चाळीस लोक सावरकरांना भेटण्यास त्यांच्या घरी गेले. मी (बडगे) त्यात होतो. तेथे एक अनौपचारिक सभा झाली. सावरकरांनी भाषण केले होते. मग, मी शस्त्रभांडाराचा धनी आहे अशी माझी त्यांच्याशी ओळख करून दिली गेली. त्यांनी समाधान व्यक्त केले. मी (बडगे) चांगले कार्य करीत आहे असे ते मला म्हणाले आणि तेच चालू ठेव असेही म्हणाले.'

'हिन्दुसभा शस्त्रनिर्बंध उठविण्याची खटपट करी; बडगे निर्बंधातील शस्त्रे विकीत असे. बडगेशी तशी ओळख करून दिली गेली त्यासंबंधी प्रशस्तीपर उद्‌गार काढले असे मानले तरी त्यात आक्षेपार्ह काही नाही' असे सावरकरांनी उत्तर दिले.

१९४६ च्या शेवटी किंवा १९४७ च्या प्रारंभी भरलेल्या एका अशाच अनौपचारिक बैठकीचा बडगेने उल्लेख केला. त्याच्या साक्षीप्रमाणे सावरकर त्या बैठकीत म्हणाले, 'काँग्रेसचे धोरण हिन्दुंना हानिकारक आहे; मुसलमानांवर आर्थिक बहिष्कार टाकला पाहिजे आणि त्यांनी आपल्यावर आक्रमण केल्यास हिन्दुंनी शस्त्रविद्या शिकली पाहिजे.'

अशी सभा आपल्या घरी कधी झाली नसल्याचे सावरकरांनी सांगितले आणि झाली असली तरीही त्यात बावगे शब्द ठरतील असे कोणतेच वाक्य बडगेच्या साक्षीत नाही. प्रस्तुत कटाशी या सभेचा संबंधही पोहचत नाही हे सावरकरांनी न्यायालयापुढे मांडले.

आणखी एका प्रसंगी, श्री. परमेकर, श्री. बखले, मुंजे, सावरकर इत्यादींचे एक समूहचित्र घेतले होते त्यात बडगे होता असे त्याचे म्हणणे होते. हाही पुरावा निरुपद्रवी आणि असंबद्ध म्हणून टाकून द्यावा असे सावरकरांनी सांगितले.

पुन्हा सावरकर-सदन (बडगेची साक्ष)

या पार्श्वभूमीनंतरची बडगेची विधाने क्रमाक्रमाने सावरकरांना भिडत होती. 'दिनांक १४-१-१९४८ या दिवशी रात्री नऊ वाजण्याच्या आसपास नथुराम, आपटे आणि मी (बडगे) सावरकर सदनाकडे निघालो. तेथे पोहोचल्यावर आपटेने मजजवळून पिशवी (शस्त्रास्त्रांची) घेतली. मला बाहेर थांबण्यास सांगितले. आपटे आणि गोडसे आत गेले. पाच-दहा मिनिटांनी ते परत आले. बाहेर येताना आपटेच्या हातात ती पिशवी होती.'

सावरकर म्हणाले, 'सावरकरसदनात जाणे म्हणजे सावरकरांकडे जाणे नव्हे, तसेच ती पिशवी सावरकरसदनात ठेवल्याचे बडगे सांगत नाही, ती पिशवी दीक्षितजी महाराजांकडे ठेवल्याचे बडगेने सांगितले आहे. पुन्हा, नथुराम आणि आपटे या भेटीची कथा नाकारतात. या कथेला संपुष्टी नाही. बडगे आणि पिशवी या कहाणीला पुराव्याच्या दृष्टीने शून्य मूल्य आहे.'

बडगेचे पुढचे विधान असे होते : 'आपटे, गोडसे आणि मी (बडगे) दीक्षितजी महाराजांच्या घरातून बाहेर पडलो आणि अंगणात उभे राहिलो. (दि. १५-१-१९४८) तू आमच्याबरोबर दिल्लीला ये असे आपटे मला म्हणाले. मी का म्हणून विचारले. आपटे म्हणाले, गांधीजी, नेहरू आणि सुऱ्हावर्दी यांना नाहीसे करण्याचे सावरकरांनी ठरविले आहे आणि ते काम आमच्यावर (आपटे-गोडसे) सोपविले आहे.'

सावरकरांनी उत्तर दिले, 'मी असे बोलताना ऐकल्याचे बडगे सांगत नाही. त्याचे विधान 'ऐकीव' स्वरूपाचे आहे. समजा आपटे तसे बोलले; ते खरे बोलले असे कसे मानता येईल ? पण आपटे आणि गोडसे या प्रसंगाचा इन्कार करतात. आरक्षीच्या दबावाने बडगे तशी साक्ष देत असला पाहिजे. या प्रसंगाला संपुष्टी नाही.'

'यशस्वी होऊन या'

त्यापुढील एक प्रसंग बडगेने सांगितला. 'गोडसे, आपटे, मी (बडगे) आणि शंकर किस्तैय्या टॅक्सीने फिरत होतो. नथुराम म्हणाला, 'आपण सावरकरांचे शेवटचे दर्शन घेऊ या.' आम्ही सावरकर सदनात गेलो. शंकरला प्रांगणाच्या बाहेर थांबण्यास सांगितले. आम्ही तिघे सावरकर सदनात गेलो. आपटेने मला तळमजल्यावर थांबण्यास सांगितले. गोडसे-आपटे वर गेले. पाच-दहा मिनिटांत ते खाली आले; त्यांच्या पाठोपाठ लगेच तात्याराव (सावरकर) आले. ते म्हणाले, 'यशस्वी होऊ या.' हे शब्द ते आपटे आणि गोडसे यांना उद्देशून म्हणाले. आम्ही बाहेर पडलो. चौघेजण टॅक्सीत बसलो. रुईया कॉलेजकडे निघालो. टॅक्सीत आपटे मला म्हणाले, 'तात्याराव म्हणाले की, गांधीजींची शंभर वर्षे भरली आहेत, आपटे पुढे म्हणाले, आपले काम यशस्वीपणे पार पडेल यात शंका नाही. मग अफजुलपुरकरांच्या

घराकडे आम्ही निघालो.' (दिनांक १७-१-१९४८)

सावरकरांनी या प्रसंगाचा इन्कार केला. ते म्हणाले, 'आपटे-गोडसे' मला भेटले नाहीत. 'यशस्वी होऊन या' असे मी म्हटले नाही, 'गांधीजींचे आयुष्य संपले' असे भविष्य मी केले नाही. बडगेच्या म्हणण्याप्रमाणे, आपटे, गोडसे, आणि बडगे माझ्याकडे आले असे गृहीत धरले तरीही आपटे, गोडसे घर आले असे तो म्हणतो. ते माझ्याकडे आले की; घरातील आणखी कोणाकडे आले हे त्याला कळणे शक्य नव्हते. ते माझ्याकडे आले असेही गृहीत धरू. तरी आमचे काय बोलणे झाले हे त्याला समजण्याची शक्यता नव्हती. ते माझ्याशी कटासंबंधी बोलले हे गृहीत धरणे न्यायोचित होणार नाही. आपटे गोडसे त्या दिवशी पुष्कळ ठिकाणी हिंडले आणि हैद्राबाद राज्यातील आंदोलनासंबंधी आणि हिन्दुराष्ट्र प्रकाशनासंबंधी पुष्कळांशी बोलल्याचा, पैसे गोळा केल्याचा पुरावा, अभियोजकांनी आणला आहे. माझ्याशी मात्र ते कटासंबंधी बोलले असा आरोप कसा योग्य होईल ? समजा, मी 'यशस्वी होऊन या' असे म्हटले. ते दुसऱ्या काही विषयासंबंधी नसेल कशावरून ?' 'शंभर वर्षे भरली' इत्यादी गोष्टी मी बोलल्याचे बडगेने ऐकल्याचे तो म्हणत नाही. आपटेने त्याला काय सांगितले याला मी उत्तरदायी कसा ठरेन ? पुन्हा आपटे आणि गोडसे हा प्रसंग नाकारीत आहेत.'

टॅक्सी ड्रायव्हरची साक्ष

ऐतप्पा कोटियन हा मुंबईचा एक टॅक्सी ड्रायव्हर. त्याची साक्ष सावरकर सदनाभोवती थोडा वेळ घुटमळली होती. बडगे, शंकर, नथुराम आणि आपटे त्याच्या टॅक्सीतून सावरकर सदनाला गेल्याचे अभियोजकांचे म्हणणे होते. साक्षीदाराच्या म्हणण्याप्रमाणे त्याची गाडी शिवाजी उद्यानाच्या एका कोपऱ्यावर उभी केली गेली. चार उतारू खाली उतरले. ते कोपऱ्याच्या उजव्या अंगाला वळून दुसऱ्या घरापर्यंत गेल्याचे ऐतप्पाला बघता आले म्हणजे दिसू शकले.

सावरकर-सदन हे घराचे नाव किंवा त्या घराचे नेमके ठिकाण साक्षीदारास माहीत नसल्याचे त्याच्या साक्षीतून दिसत होते. ते उतारू कोठे गेले याचे त्याला ज्ञान नव्हते. त्या दुसऱ्या घरात ते उतारू गेल्याचेही तो सांगत नाही. ते पाच मिनिटांत परत आल्याचे त्याने सांगितले. पण वेळेचे गणन करता, टॅक्सी ते घर पाच मिनिटे, परत जाण्यास पाच मिनिटे बडगेच्या म्हणण्यातील नथुराम आणि आपटे घर जाऊन परत आले ती पाच - दहा मिनिटे, अशी वीस-पंचवीस मिनिटे तेथे होतात ही विसंगती सावरकरांनी लक्षात आणून दिली. आपटे आणि गोडसे यांनी हा प्रसंग कल्पित असल्याचे सांगितले होतेच. शंकर किस्तैय्याला न्यायमूर्तींनी विचारता त्याने सांगितले होतेच, शिवाजीपार्कवर तो टॅक्सीतून इतरांच्या बरोबर होता. आपटे, गोडसे, बडगे उतरून कोठेतरी गेले. तो टॅक्सीतच बसला. सावरकर सदनाचे

नावही त्याने एकेले नव्हते हीही वस्तुस्थितीच्या संदर्भात विसंगती होती.

सावरकरांच्या त्या भविष्यवाणीला तरी शंकरचा दुजोरा हवा होता. कारण बडगेच्या म्हणण्याप्रमाणे ते बोलणे टॅक्सीत झाले होते. त्याला न्यायमूर्तींनी विचारता तो म्हणाला, 'मी ड्रायव्हरच्या शेजारी बसलो होतो. ते मागे बसले होते (आपटे, गोडसे, बडगे) ते मराठीत आणि इंग्रजीत बोलत होते. मला त्यांचे बोलणे ऐकूही येत नव्हते. आणि समजतही नव्हते.'

बडगेच्या विधानाला दुजोरा कोणाकडून नव्हता. ते विधान परस्परच काटले जात होते. हे सावरकरांनी न्यायमूर्तींच्या लक्षात आणून दिले.

'सावरकरांची आज्ञा म्हणून मी कटात गेलो' - बडगे

आपण सावरकरांचे एकनिष्ठ अनुयायी आहोत आणि म्हणून सावरकरांसंबंधीची विधाने ग्राह्य धरली जावीत हे न्यायालयाला पटविण्यासाठी बडगेने आणखी एक विधान केले. आपण कटात संमीलित का झालो याचे स्पष्टीकरण देताना त्याने सांगितले की, गोडसे आणि आपटे यांनी त्याला अनेकदा आर्थिक सहाय्य केले होते. ते सांगत त्याप्रमाणे तो नेहमीच करीत असे. म्हणून गांधीजी आणि इतर यांना मारण्यासाठी नथुराम आणि आपटे यांच्या शब्दावर तो दिल्लीला गेला. त्यातून हे काम करण्याची सावरकरांची आज्ञा होती असा आपटे यांनी त्याचा ग्रह करून दिला होता, म्हणून त्यांची (सावरकरांची) आज्ञा पार पाडणे आपले कर्तव्य आहे, असे बडगेला वाटले.

सावरकरांचा संबंध कटाशी जोडला जाण्यासाठी जी विधाने बडगेने केली त्यातील वरील विधान उच्च स्थानी होते. सावरकरांची 'आज्ञा' आहे असे सांगितले गेले नसते तर तो काही या कटात आला नसता. इतकेच नव्हे तर नथुराम आणि आपटे यांनीही हे काम अंगावर घेतले नसते एवढे ध्वनित करण्याची शक्ती वरील विधानात होती.

हा पुराबाही 'ऐकीव' स्वरुपाचा असल्याने सावरकरांना याचे उत्तर देण्यास वेगळे श्रम घ्यावे लागले नाहीत. या विधानाला स्वतंत्र दुजोरा नव्हता. सावरकर म्हणाले, 'बडगेसारखा धाडसी आणि साहसी मनुष्य, माझ्याशी चांगला परिचित असलेला मनुष्य मनुष्याच्या सहजस्वभावाप्रमाणे मलाच समक्ष त्या 'आज्ञे' संबंधी विचारता, 'यशस्वी होऊन या' असे मी म्हटल्याचे त्याने पाहिले आणि ऐकले असे त्याचे म्हणणे. आपटे-गोडसे जवळच होते. पुढे होऊन त्याने मला विचारले असते, 'ही आज्ञा आपली ना ?' पण बडगेने ते केले नाही. बडगे जर एवढा जिवाच्या मोलाचा आज्ञाधारक असे म्हणतो तर तो २० जानेवारीला गांधीजींवर समोरून हल्ला करण्याचे सोडून स्वतःचा जीव वाचविण्यासाठी पळून का गेला ? बडगे दिल्लीला गेला असेल तर एकच गोष्ट संभवते. निर्वासितांना शस्त्रास्त्रे विकून पुष्कळ पैसा मिळविण्याची त्याची इच्छा होती !'

बडगेची उंची

बडगेचे चारित्र्य आणि चरित्र सावरकरांनी त्याने दिलेल्या पुराव्यातील काही उदाहरणांनी न्यायालयाला समजावले. 'मी बॉम्ब, पिस्तूले अनुज्ञापत्रावाचून चोरून विकीत असे; मी खरात पांच्या घरी शस्त्रास्त्रांची पिशवी ठेवली होती; (दिल्लीला) टॅक्सी ड्रायव्हरच्या नकळत मी दोन्ही पिस्तूले टॅक्सीमध्ये ठेवली, कारण ती पदाकदाचित सापडली असती तर टॅक्सीवाला गोत्यात आला असता, पकडला गेला असता आणि मी वाचलो असतो; मी तिकिटावाचून प्रवास करी आणि कर्मचाऱ्यांना लाच देई; मला पैसे हवे होते. मजजवळून पिस्तूल घेऊन दीक्षित महाराजांनी निदान ४५० रुपये मला द्यावे अशी माझी इच्छा होती, म्हणून ते पिस्तूल मला अदलाबदलीत मिळाले असले तरी मी ते विकत घेतले आहे, असे मी त्यांना खोटेच सांगितले.' असे बडगेचे वर्तन होते.

दूरचा दूरध्वनी

दार न उघडताच सावरकरांचे घर भेदून सावरकरांचा वेध घेण्याची शक्यता असणारा पुरावा आणला गेला तो दिल्ली-मुंबई दूरध्वनीचा. हिन्दुसभा भवन, दिल्ली यांचा दूरध्वनी क्रमांक ८०२४ होता. सावरकर सदन, दादर येथील दूरध्वनी ६०२१० क्रमांकाचा होता.

दि. ११-१-१९४८ ला सकाळी ९.२० वाजता ८०२४ दिल्लीवरून ६०२१० मुंबईवर एक दूरध्वनी पुस्तांकित (Book) केल्याची नोंद अभियोजकांनी पुढे आणली. दूरध्वनी व्यक्तिगत - पर्सनल - होता, असे अभियोजकांनी आणलेल्या कागदपत्रावरून दिसत होते. नथुराम, आपटे, करकरे, मदनलाल, बडगे, शंकर हे दिल्लीत असल्याचा आणि ते हिन्दुसभा भवनात गेले असल्याचा पुरावा वेगळा होता.

तो व्यक्तिगत दूरध्वनी कासार किंवा दामले यांच्या नावाने होता, असे अभियोजकांचे म्हणणे होते. कासार सावरकरांचे शरीररक्षक तर दामले कार्यवाह होते. आपटे आणि नथुराम त्या दोघांशी परिचित होते, तेव्हा त्यांनीच तो दूरध्वनी केला असला पाहिजे. आणि तो सावरकरांसाठीच असला पाहिजे, असा तर्क अभियोजकांनी मांडला होता.

दूरध्वनी अनुत्तरित किंवा ineffective राहिला होता. कारण दुसऱ्या टोकाला 'बोलावलेल्या व्यक्ती नाहीत' असे कळले होते. दिल्ली टोकाकडून दूरध्वनी रहित केल्याची सूचना मिळाली होती. त्याप्रमाणे 'रहित' असा शब्द पुस्तांकनाच्या चिठ्ठीवर लिहिला गेला होता.

उलट तपासणीत कै. भोपटकरांनी या पुराव्याची चिरफाड केली आणि सावरकरांनी आपल्या वक्तव्यात समर्पक स्पष्टीकरण दिले. तो दूरध्वनी कासार आणि दामले यांना नव्हता असे साक्षीदाराकडून वकिलांनी वदवून घेतले. चिठीवर एक नाव होते कसैय्या (Kassia)

तर दुसरे 'दलाल' पुढे 'दलाल' खोडून 'डी' मेलो (D'Melo) असे नाव लिहिले होते. या नावाचे कासार आणि दामले या नावाशी साद्दश्य असले तरीही दुसऱ्या टोकाला त्या व्यक्ती मिळाल्या नसल्याने कोणताही निष्कर्ष या पुराव्यात काढणे न्यायाच्या विरुद्ध झाले असते.

दूरध्वनीचे देपक म्हणजे बिल दोन रुपये बारा आणे १९-१-१९४८ या दिवशी भरले गेले होते. हिन्दुसभेच्या काही कामासाठी हा दूरध्वनी एका कार्यालयाने दुसऱ्या कार्यालयातील व्यक्तींना केला असेल हा तर्क सयुक्तिक होता. दिल्ली टोकाहून कोणी केला याला काहीच पुरावा नव्हता.

हा दूरध्वनी जन्मापूर्वीच आटेपला होता, म्हणून 'अगा जे झालेचि नाही, त्याची वार्ता पुससी काई' या धर्तीवर सावरकरांनी आपल्या वक्तव्यात या पुराव्याची बिल्हेवाट लावली.

विधायक अंग

स्वत:विरुद्ध असलेल्या पुराव्याला यथायोग्य उत्तरे दिल्यानंतर सावरकरांनी आपल्या वक्तव्यात न्यायालयापुढे विधायक अंग मांडले होते. विधायक कार्याची प्रमाणे म्हणून त्यांनी वेळोवेळी काढलेली पत्रके न्यायालयाला प्रस्तुत केली, त्यात पंडित नेहरूंना शिक्षा होताच दि. ६-११-१९४० या दिवशी सावरकरांनी काढलेले सहानुभूतीचे, नेहरूंच्या देशभक्तीचे गुणगौरव केलेले पत्रक; ऑगस्टमध्ये काँग्रिसच्या नेत्यांना बिनाचौकशी डांबून ठेवले त्यावेळचे पत्रक, गांधीजींनी उपवास सोडावा म्हणून दि. २२-२-१९४२ ला काढलेले पत्रक, कस्तुरबांच्या मृत्यूनंतर गांधीजींना दि. २३-२-१९४४ ला धाडलेला शोकसंदेश, गांधीजींना बंदिवासातून मुक्त केल्यावर दि. ७-५-१९४४ ला काढलेले पत्रक इत्यादींचा समावेश होता.

सावरकरांवर धार का ?

आज सावरकरांच्या कविता नभोवाणीवरून पुष्कळदा ऐकविल्या जातात. सावरकरांच्या मृत्यूनंतर शासनाधिष्ठित व्यक्तींनीही त्यांना मुक्त मनाने श्रद्धांजली वाहिली होती. माननीय बाळासाहेब देसाई यांनी सावरकरांसारखा ज्वलंत देशभक्त झाला नाही, असे म्हटल्याचेही आपण ऐकले किंवा वाचले आहे. नभोवाणीवरही सावरकरांचे चरित्र आणि गुणवर्णन ऐकविले गेले होते.

काश्मीरवर आक्रमण करण्याच्या हेतूने १९६५ मध्ये पाकिस्तानने पवित्रे टाकले. त्याला तोडगा म्हणून आपल्या सेनांनी पाकिस्तानच्या सीमेतच रणकंदन करून लाहोरपर्यंत धडक मारली होती. या स्वाभिमानपूर्ण कृतींचा सावरकरांना अतिशय आनंद होईल हे जाणून त्यांना युद्धवार्ता त्वरित कळविण्याची व्यवस्था शासनाकडून झाली होती, असेही आपण

ऐकले किंवा वाचले आहे. माननीय गृहमंत्री नंदा यांनी सावरकरांना मानधन घाडल्याचे तसेच शासनानेही त्यांच्यासाठी अल्पस्वल्प मानधन त्यांच्या शेवटच्या दिवसात संमोदित (Sanction) केल्याचे आपण वाचले आहे. सावरकरांना अमुक मान दिला नाही, अमुक पद दिले गेले नाही, अमुक पदवी दिली नाही, असे आपल्या मनात घोळते खरे; परंतु त्यांना जे दिले गेले होते त्यावरून एकंदर शासनाची दृष्टी सावरकरांविषयी निवळू लागली होती, आकस विरू लागला होता, असा निष्कर्ष निःसंकोचपणे काढता येतो. चिरकालीन रोगाला एकदम उतार पडत नाही म्हणून झालेल्या सुधारणेचे यथायोग्य मूल्यमापन आपणास केले पाहिजे. आपण कोठे होतो आणि कोठवर पोहोचलो आहोत, हे बघितले म्हणजे चिरकालीन रोग आणि त्यातून होत असलेली निवृत्ती आपल्याला समजेल. तसेच सावरकरांवर धार का होती, हेही आपल्याला कळून येईल.

उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला जाण्यापूर्वीपासून सावरकरांनी देशमुक्तीसाठी प्रयत्न चालविले होते. स्वातंत्र्याचे स्तोत्र, चाफेकरबंधूंचा पोवाडा अशा काव्यातून आणि मित्रमेळा किंवा अभिनव भारत या संस्थांच्या स्थापनेतून आणि परदेशी कपडयांची होळी अशा कृतीतून त्यांची स्वयंभू स्वातंत्र्यप्रेरणा स्पष्ट झाली होती. राष्ट्रस्वतंत्रता या ध्येयासाठी यथासाध्य साधन वापरणे समर्थनीयच नव्हे तर आवश्यक असते हे त्यांचे तत्त्व होते. तत्त्वाला अनुसरून त्यांचा व्यवहार प्रसंगी शस्त्राचारी होता.

लंडनमधील भारत भवनात किंवा India House मध्ये जे तरुण एकत्र येत त्यांना राष्ट्रप्रेमाची दीक्षा दिली जात असे. स्वतंत्र प्रज्ञेच्या सावरकरांनी भारत भवन तेव्हा भारावून टाकले होते. गांधीजी आणि सावरकर यांची पहिली भेट इंग्लंडमध्ये झाली. त्यांच्यातील मतभेद आणि व्यवहाराभेद तेव्हापासूनच होता.

आपण गांधीजींचे चरित्र निर्मळ मनाने आणि विपर्यास न करता किंवा हेतू न चिकटविता पाहिले तरीही गांधीजी ज्या तत्त्वांसाठी प्रसिद्ध आहेत त्या तत्त्वांशी त्यांचा व्यवहार सुसंगत होता काय असा आपणास प्रश्न पडतो. त्यांनी अहिंसा हे जीवनतत्त्व मुख्य मानले की स्वातंत्र्य हे जीवनतत्त्व मुख्य मानले की राजनिष्ठा हे जीवनतत्त्व मुख्य मानले असा आपणास संभ्रम उत्पन्न होतो.

गांधीजींना सावरकर गटाचा शस्त्रधारी मार्ग आवडत नसे. क्रांतिकारी गटाचा निषेध 'मारो-काटोका पंथ' या पुस्तिकेने त्यांनी केल्याचा उल्लेख आपणास श्री. शि. ल. करंदीकर यांनी लिहिलेल्या सावरकर चरित्राच्या १५५ व्या पृष्ठावर सापडतो. त्या 'कळपात' ओढल्या जाणाऱ्या तरुणांना ते सोडवू पाहत. श्री. इंदुलाल याज्ञिक यांनी लाला हरदयाळ यांचे चरित्र लिहिले आहे. गांधीजींनी दिनांक २-१२-१९०६ या दिवशी त्यांच्या डॉ. पी. जे. मेहता या मित्राला लिहिलेल्या पत्राचा त्यात उल्लेख आहे. गांधीजी लिहितात, 'शामजींचा मार्ग

सत्यापासून दूर आहे; त्यांची कार्यपद्धती अधर्म्य आहे, परमेश्वराचे किंवा मरणोत्तर जीवनाचे अस्तित्व न मानणारी आहे. भारत भवनाभोवती केवळ विषण्णात वातावरण आहे. आपण शामजींची शिकवण आचरीत आहात असे कळते. माझे त्यांचे बोलणे झाले आहे. परिणामी मी भयचकित होऊन मागे सरलो.'

वास्तविक शस्त्राचार हे क्रांतिकारी मंडळींचे ध्येय कधीच नव्हते किंवा नसते. तसेच माणसे मारणे हेही उद्दिष्ट नसते ही भूमिका गांधीजींनी लक्षात घेतली नव्हती. सरदार भगतसिंग यांनी लोकसभागृहात जी पत्रके उधळली होती, त्यात क्रांतिकारकांची मनुष्याच्या जीविताविषयीची भूमिका स्पष्टपणे मांडली आहे. त्या पत्रकात म्हटले आहे, 'आम्ही मनुष्याच्या जीवनाला अत्यंत पवित्र समजतो. आम्ही अशा उज्वल भविष्यांवर विश्वास ठेवतो, की जेथे प्रत्येक व्यक्तीला पूर्ण शांतीचा अनुभव आणि स्वातंत्र्याचा अवसर मिळेल. आम्हाला अनिवार्य म्हणून मानवी रक्त सांडावे लागले याचा खेद वाटतो. पण क्रांतीच्या द्वारे सर्वांना समान स्वतंत्रता प्राप्त करून देणे आणि मनुष्याच्या होणाऱ्या शोषणाचा अंत करणे हे आमचे उद्दिष्ट आहे; अशा क्रांतीत काही ना काही रक्तपात होणे अटळ आहे.' क्रांतीच्या प्रारंभापासूनची क्रांतिकारकांची हीच भूमिका होती. सुखासुखी स्वातंत्र्य मिळणार असते तर शस्त्राचार करून स्वतःचे जीव ओवाळून टाकण्याइतके अतिरेकी ते कधीच झाले नसते.

अहिंसा या तत्त्वाची कास धरल्याने गांधीजींना शस्त्राचारी मंडळींचे मार्ग अधर्म्य वाटले असे म्हणावे, तर कोणाही शस्त्राचारी समूहाचे मार्ग त्यांना अधर्म्य वाटावयास पाहिजे होते. परंतु ब्रिटिश साम्राज्याने केलेले शस्त्राचार त्यांना अधर्म्य वाटले नाहीत असा उल्लेख त्यांच्याच चरित्रात आपणास सापडतो. ब्रिटिशांनी झुलूंविरुद्ध युद्ध प्रारंभिले त्याविषयी गांधीजी लिहितात : 'झुलू लोकांनी हिन्दुस्थानी लोकांची काही एक हानी केली नव्हती. त्या लोकांवर बंड करण्याचा आरोपही कसाबसाच लादला होता. त्या लोकांची फार क्रूरपणे कत्तल चालविली होती. पण तरीही त्या लोकांविरुद्ध इंग्रजांनी युद्ध पुकारून त्या स्वारीसाठी स्वयंसेवक मागविलेले ऐकताच मला स्वयंसेवक होणे आणि इंग्लिशांच्या सेनेत लढाईत काहीतरी भाग घेणे अवश्य वाटले. कारण मी इंग्रजी साम्राज्यास जगतावर उपकार करणारे साम्राज्य म्हणून समजत होतो.त्या साम्राज्याचा नाश होऊ नये ही माझी मनःपूर्वक इच्छा होती.'

गांधीजींच्या अहिंसा या तत्त्वाला अनुसरून त्यांनी म्हणावयास हवे होते, 'झुलू लोकांवरील ब्रिटिशांचे अत्याचार निषेधार्ह आहेत, हिंसक आहेत म्हणून अधर्म्य आहेत. जगावर उपकार करण्याच्या नावाने केलेली हिंसा वैध आणि छळ करण्याच्या नावाने केलेली हिंसा निंद्य अशी अहिंसेची घसरडी व्याख्या होऊ शकत नाही. कोणाही भारतीयाने ब्रिटिशांच्या या हिंसालिप्त युद्धासाठी काहीही सहाय्य करू नये.' गांधीजींचे तत्त्व योग्य होते की अयोग्य या प्रश्नापेक्षा, ते त्या तत्त्वाशी सुसंगत राहिले असे आपणास आज त्यांनी वरीलप्रमाणे विचार

व्यक्त केले असते तर म्हणता आले असते.

अप्रत्यक्ष प्रतिकार किंवा Passive resistance या पद्धतीचा अवलंब हिन्दुस्थानात गांधीजींनी केलेला आपणास ठाऊक आहे. केवळ तेवढा उपाय पुरा पडू शकणार नाही असे सावरकरांचे मत होते. या विषयांवर सावरकरांनी वृत्तपत्रासाठी एक वार्तापत्र लिहिलेले आपणास आढळते. दक्षिण फ्रान्समधील मळेवाल्यांच्या तेथील शासनाशी झालेल्या कलहाचा आणि अवलंबिलेल्या उपायांचा त्यांनी संदर्भ घेतला आहे. दि. १९-७-१९०७ या दिवशी लिहिलेल्या पत्रात सावरकरांनी लिहिलेल्या विषयांचा सारांश असा देता येईल :

'दक्षिण फ्रान्समध्ये संघटितपणे अप्रत्यक्ष प्रतिकाराच्या कृतीचा अवलंब केला गेला होता. शासकीय सेवावृत्ती न करणे, शासनाच्या आधिपत्याखालील शाळा, न्यायालये यांवर बहिष्कार घालणे, शासनाच्या गंगाजळीत पैसे न गुंतविणे, शासनाला ऋण न देणे, शासनाला कर न देणे, असे ते तंत्र होते. राजद्रोहाची जोखीम अंगावर न घेता, शस्त्र हाती न घेता आणि रक्ताचा एकही थेंब न सांडता अप्रत्यक्ष प्रतिकारातून राज्यक्रांती ही एक नवीन पद्धती सापडल्याचा भास होऊ लागला. परंतु ही चळवळ यशस्वी होत आहे असे चळवळीच्या आयोजकांना वाटू लागले तोच सैन्यबळाने आणि शस्त्रबळाने ती चळवळ मोडून काढण्याचे शासनाने ठरविले. त्यावेळी मात्र चळवळीतील लोकांनी अप्रत्यक्ष प्रतिकाराचे नाव बाजूला ठेवून शस्त्र हाती घेतले. अप्रत्यक्ष प्रतिकारामागे शस्त्रशक्ती उभी केली असेल तरच तो प्रतिकार यशस्वी होऊ शकतो हे सिद्ध झाले.

'अप्रत्यक्ष प्रतिकार या तत्त्वप्रणालीत आपण दोन गोष्टी गृहीत धरतो. पहिली एकूण एक मनुष्य उदात्त होईल आणि संपूर्ण असहकार करील असे आपण मानतो. सर्वजण शासकीय सेवा सोडून देतील असे मानण्यात दारिद्र्याने निष्कांचन झालेल्या लोकांची इच्छा असली तरीही इतकी उच्च त्यागवृत्ती तोलून धरण्याची शक्ती नसते ही वस्तुस्थिती दृष्टिआड होते. दुसरी गोष्ट, विरुद्ध पक्षही अत्यंत उदात्त आहे. ठरविलेले निर्बंध तो मोडणार नाही, दंडुक्याचा वापर करणार नाही, गळचेपी करणारे नवीन निर्बंध लादणार नाही असे आपण मानतो. जो लोकमताच्या विरुद्ध जाण्याइतका नीच असतो तो वेळी नवीन निर्बंध करून किंवा जुने उकरून काढून प्रत्यक्ष प्रतिकार बळाने दाबून टाकण्याइतका क्रूरही असतो हे आपण लक्षात ठेवले पाहिजे.

'विश्वामित्राने वसिष्ठाची कामधेनू मागितली. त्याने ती नाकारताच विश्वामित्राने ती बळाने नेण्याचा संकल्प केला. विश्वामित्र उदात्त आहे, सांगून ऐकेल, निदान आपण त्याच्या गाय घेऊन जाण्याच्या प्रयत्नाला प्रतिकार करीत नाही हे पाहून तो तेथेच थांबेल, अशी वसिष्ठांची भावना होती. पण विश्वामित्राजवळ तसली उदात्तता आढळली नाही. कामधेनूमध्ये सुप्त असलेल्या शस्त्रधारी क्षत्रियांना वसिष्ठाने आवाहन केले. विश्वामित्राच्या सैनिकी सामर्थ्याला

वरचढ सामर्थ्याने प्रत्युत्तर दिले आणि कामधेनू वाचविली अशी पुराणात कथा आहे.'

स्वराज्यप्राप्तीच्या इतिहासाच्या धावत्या दृष्टिक्षेपानेही आपणास वरील विवेचनाची यथार्थता दिसून येते. असहकाराची चळवळ दडपून टाकण्यास इंग्रजांनी बळ वापरले. गळचेपी करण्याला नवीन नवीन निर्बंध उत्पन्न केले. रौलट निर्बंधाविरुद्ध सूर काढण्यास लोकांनी धजू नये म्हणून जालियनवाला बागेतील हत्याकांड केले. बेचाळीसच्या चळवळीत लोकांनी निःशस्त्रता सोडून दिली. 'सैन्यात जाऊन शस्त्रविद्या हस्तगत करा.' या सावरकरांच्या आदेशाचा देशगौरव सुभाषबाबूंनी दि. २५-६-१९४४ या दिवशी प्रगटपणे गौरव केला. सैन्यात गेलेल्या भारतीयांचा उपयोग करून त्यांनी इंग्रजांच्या शस्त्रसिद्ध सेनेशी दोन हात केले. युद्धात इंग्रजांचा जय होऊनही त्यांना आपले हिन्दुस्थानवरील वर्चस्व यापुढे टिकवून धरण्याची शाश्वती वाटेनाशी झाली. भारतविमोचन निर्बंध संमत करून घेताना इंग्लंडचे पंतप्रधान ॲटली यांनी पूर्वीचे पंतप्रधान चर्चिल यांना सांगितले, (१) भारतीय सैन्य आता ब्रिटिशांशी एकनिष्ठ नाही आणि (२) हिन्दुस्थान आपल्या ताब्यात ठेवण्यास मोठे ब्रिटिश सैन्य तेथे ठेवणे ब्रिटनला परवडणार नाही, यामुळे ब्रिटन सत्तांतर करीत आहे.

[Britain is transferring power due to the fact (1) The Inidan Mercenary Army is no longer loyal to Britain and (2) Britain cannot afford to have a large British Army to hold down India]

ॲटलींना वरील प्रत्यंतर नुकतेच आलेले होते. जानेवारी १९४६ च्या आरंभापासून ब्रिटिश अधिकारी आणि भारतीय सैनिक यांच्यातील तेढीने वेगळे स्वरूप घेण्यास आरंभ केला होता. कराची, लाहोर, मुंबई, दिल्ली येथील विमानदलाच्या लोकांनी सैन्याला कधी न खपणारी गोष्ट केली ती म्हणजे हरताळ. मुंबईला १९ आणि २१ फेब्रुवारी १९४६ या दिवशी नाविक दलाने उठाव केला. मुक्त हस्ताने उभयपक्षी गोळीबार झाला होता. सैन्य आता ब्रिटिशांच्या आज्ञेने वागेल असे इंग्रज सत्ताधिकाऱ्यांना वाटत नव्हते, शस्त्रबळाचे सामर्थ्य स्वराज्याचा चळवळीत सहाय्यभूत होते याचा हा इतिहास आहे.

लोकमान्यांच्या मृत्यूनंतर म्हणजे १९२० पासून हिन्दुस्थानच्या राजकारणाचे धुरीणत्व गांधीजींकडे गेले होते. सावरकर तेव्हा बंदीतच होते. १९२४ पासून ते रत्नागिरीला स्थानबद्ध म्हणून ठेवले गेले. ते आता बंदिगृहात नव्हते. तरीही राजकारणावर भाषण किंवा लेखन करण्यास त्यांना प्रतिबंध होता. परंतु मिळेल त्या मार्गाने ते राजकारणावर आपले मत लोकांना कळवीत असत.

गांधीजींकडून सशस्त्र क्रांतीच्या पुरस्काराची अपेक्षा नाही; परंतु त्यांनी अशा क्रांतिकारकांचा तिटकारा करू नये, तरुणातील चेतना मारू नये, त्यांचा तेजोभंग करू नये असे सावरकरांना वाटे. आधीच शस्त्रपराङ्मुख असलेल्या समाजाला अहिंसेचे पाणी पाजून सर्व राष्ट्राचीच हानी होत आहे असे सावरकरांचे मत होते. ते अतिशय प्रखरपणे क्रांतिकारकांतील

देशभक्तीच्या भावनेचा गौरव करीत आणि गांधीजींवर टीका करीत. गांधीजींच्या वक्तव्यातील परस्पर विरोधी विधाने आणि फोलपणा ते उघडा पाडीत. खरा सत्याग्रही शस्त्राला शिवण्याचा विचारदेखील मनाला शिवू देणार नाही, लाठीदेखील हाती घेणे सत्याग्रहाच्या विरुद्ध आहे असे गांधीजी आपल्या लोकांना सांगत. मात्र पहिल्या महायुद्धात इंग्रजांना बिनाअट सहाय्य देऊन सैन्यात भरती व्हा असा प्रचार गांधीजींनी आजारी पडेतो ब्रिटिश साम्राज्याच्या प्रेमामुळे केल्याचा त्यांचा आचार होता, हे सावरकर लोकांना सांगत. इंग्रज म्हणजे कोणी सज्जन नव्हते, त्यांचे राज्य म्हणजे काही न्यायनिष्ठ सूत्राने लिहून दिलेला ताम्रपट नव्हे, त्यांना तेथून हुसकावून देणे अन्याय्य नाही, त्यासाठी अवलंबिलेल्या कोणत्याही मार्गात पाप नाही असे सावरकर प्रतिपादन करीत. ते गांधीजींच्या संभ्रममूलक प्रचाराने विषण्ण होत. ते लिहितात, 'या गोंधळाने राष्ट्रकार्याचा इतका चुराडा करून टाकला आहे आणि राष्ट्राचा तेजोभंग करून त्यास इतके अकर्मण्य करून ठेवले आहे की त्यामुळे त्या तिटकाऱ्यासरशी मनात विनोद भावना उत्पन्न न होता गंभीर दुःखावेगाने आणि क्रोधाने मनात तिरस्कार उत्पन्न होतो. (११-८-१९२७)

क्रांतिकारकांचा अनुल्लेखाने किंवा विपर्यस्त लेखाने अवमान केल्याचे सावरकरांना खपत नसे. क्रांतिकारक गोपीनाथ साहा यांचा उल्लेख करताना गांधीजींनी 'यंग इंडिया'त त्यांना गुन्हेगार म्हटले होते. 'त्यांच्या हेतूचीदेखील वाखाणणी करणे पाप आहे;' असे म्हटले होते. कारण क्रांतिकारक हिंसक होते. सर्व देशाने गांधीजींच्या या उद्‌गारावर टीका केली. पुढे यतींद्रनाथांच्या मृत्यूनंतर गांधीजींनी 'हुतात्मा' हे विशेषण त्यांना लावले नाही. केवळ यतींद्रनाथ 'गुन्हेगार' नव्हते, असे म्हणून आपली पूर्वीची चूक काही प्रमाणात सुधारण्याचा प्रयत्न केला होता, परंतु प्रारंभी मात्र गांधीजींनी यतींद्रनाथांच्या बलिदानाचे वृत्त आपल्या पत्रात छापण्याचे टाळले होते.

मीरतच्या क्रांतिकारकांच्या बचावासाठी न्यायसहाय्य निधी उभारला गेला त्याला गांधीजींनी सहाय्य दिले नाही. इतकेच नव्हे तर असा निधी उभा करू नये असे त्यांनी मत दिले. निधी उभा राहिला. आपण लोकप्रियतेतून उतरू लागलो आहोत अशा भावनेने असेल कदाचित, गांधीजींनी मीरतच्या क्रांतिकारकांची भेट घेतली. निधीला विरोध का केला हा प्रश्न त्यांना विचारला जाताच त्यांनी सांगितले, 'कोणी तरी थोर वकील आपण होऊन पुढे यावा म्हणून.'

यतींद्रनाथांच्या अनुल्लेखाविषयी आणि मीरत अभियोग निधीसंबंधीच्या गांधीजींच्या उत्तरातील संदिग्धपणाविषयी सावरकरांनी टीका केली. ते लिहितात :

'हुतात्मा यतींद्रनाथ सशस्त्र क्रांतिकारक होता. अशा आगखाऊ भगत, दत्त, साहा, यतींद्रादिकांना सर्व राष्ट्राने हुतात्मा, देशभक्त, देशवीर म्हणून गौरविले म्हणून माझ्या त्या

बापड्या, पडखाऊ, अर्थशून्य, अहिंसा पंथावरील लोकांचा विश्वास उडत चालला आणि त्या मानाने माझ्या वैयक्तिक नसले (कारण वैयक्तिक प्रश्न स्वतंत्र आहे.) तरी पांथिक माहात्म्याचे प्रस्थ कमी होते म्हणून मी यतींद्रास हुतात्मा म्हणत नाही असे स्वच्छपणे गांधीजी सांगून टाकतील, तर ते पाहून कितीतरी प्रामाणिकपणाचे होईल. तसेच ते मीरतचे लोकही सशस्त्र क्रांतीच्या आरोपात सापडलेले, त्यांच्यासाठी राष्ट्राने निधी उभारला तर राष्ट्रात गौरव होत आहे असे होणार, कारण एक वकील फुकट मिळाला तरी त्यास राष्ट्रीय स्वरूप येणे नाही; वास्तव राष्ट्रीय निधी उभारला तरच खटल्याचे राष्ट्रीय महत्त्व अत्यंत स्पष्ट होते म्हणूनच हे मीरत-निधी जाणूनबुजून सार्वजनिकपणे उभारले. पण मला राष्ट्रात या क्रांतिकारकांचे असे स्तोम माजलेले पाहिले की चीड येते (आणि गांधीजींस बोलता बोलता चीड कशी झटकन येते हे त्यांच्याशी विरोध करून गेलेल्या अनेक गृहस्थांस अनुभूती आहेच) अशा हुतात्म्यांचा पांथिक जयजयकार म्हणजे माझ्यासारख्या महात्म्यांचा पांथिक धिक्कार. अशा क्रांतिकारकांच्या पाठपुराव्यास निघणारा राष्ट्रीय निधी म्हणजे अहिंसावादकांची पाठ पुरवणारी राष्ट्रीय निंदा होय. हे मी पक्केपणी समजून असल्याने मला या क्रांतिकारकांचा कोणीही गौरव केलेला खपत नाही. आणि म्हणून मी मीरतच्या खटल्याचे निधीस विरोध केला असे महात्माजींनी स्पष्ट सांगून टाकले तर त्यांस खोटीनाटी निमित्ते सांगण्याची गरज पडणार नाही. आता यापुढे तरी त्यांनी असे अप्रामाणिक आणि त्यांच्याबाचून इतर कोणालाही न फसवणारे कोटिक्रम करणे सोडून द्यावे. म्हणजे त्यांची मते कितीही विरुद्ध असली तरी त्याचा कोणास इतका विषाद वाटणार नाही.' (दि. १६-११-१९२९)

हिन्दू-मुस्लिम एकतेच्या प्रयोगतही गांधीजींचे अहिंसा हे गमक लागू पडत नव्हते. इस्लामी धर्म शांततेचा आहे अशी प्रशस्ती त्यांनी यंग इंडियात केली.

'इस्लामची तलवारीशी अधिक सलगी असते हे खरे; परंतु ते परिस्थितीदोषाचे फल होय' असे विधान त्यांनी त्याच लेखात केले आहे. तलवार हे एकदा हिंसाचाराचे साधन म्हणून पाप असे मानल्यावर परिस्थितीप्रमाणे त्याच्या केलेल्या वापराचे समर्थन करणे तत्त्वाच्या विरुद्ध आहे. इस्लामचा तलवारीचा वापर त्यांची शांतताप्रियता दाखवितो की आक्रमक प्रवृत्ती दाखवतो हा प्रश्न वेगळाच आहे. परंतु गांधीजींनी प्रतिपक्षीयांच्या अन्याय्य हिंसाचाराचाही शस्त्राने विरोध करण्याचा मार्ग अवलंबिला नाही, उलट हिन्दुंना अहिंसा शिकविण्यासाठी आपले बळ वेचले, अशा घटना त्यांच्या चरित्रातूनच आपणास वारंवार दिसतात.

सावरकर गांधीजींच्या असल्या प्रयोगावर आणि एकपक्षीय किंवा पक्षपाती अहिंसेच्या धोरणावर टीका करीत. मुसलमानांच्या आक्रमक वृत्तीला त्याने प्रोत्साहन मिळण्याचा त्यांना धोका वाटे. दि. १७-१-१९२७ या दिवशी लिहिलेल्या लेखात ते म्हणतात, 'खरी गोष्ट

अशी आहे की, बहुसंख्य मुसलमानांना हा हिन्दुस्थान देश आपला वाटत नाही व त्यांच्यामध्ये हिन्दुंचा निवास त्यांना काट्याप्रमाणे बोचतो. अशी त्यांची भावना या सर्व झगड्याच्या मुळाशी आहे. काही समंजस मुसलमान सोडून इतरांना हा हिन्दुस्थान तुर्कस्थानाप्रमाणे, इराण-अफगाणिस्तानांप्रमाणे एकमेवाद्वितीय इस्लामी व्हावा अशी आस लागलेली दिसते व देश तसा झाला तर ते या देशावर स्वदेशाप्रमाणे प्रेम करतील.

'गांधीजी महात्मा आहेत व म्हणून पक्षपातातीत आहेत हे आम्हाला कळते. परंतु स्वजातीकडे झुकणे याला जसे पक्षपात हे नाव आहे, तसे परजातीकडे झुकणे यालाही पक्षपात हेच नाव शब्दकोशामध्ये आहे.'

'उपाय केला तर सर्व काही सुयंत्रित होणार आहे. इस्लामचे जे शांततेचे, सहिष्णुपणाचे, भूतदयेचे उपदेश महात्माजींना अवगत आहेत ते वास्तविक महात्माजींनी मुसलमानांना यंग इंडियामधून शिकविले पाहिजेत व त्यांचे पट्टशिष्य अल्लीबंधू यांच्याकरवी खिलाफतीवर जशी व्याख्याने झाली तशी इस्लाममधल्या शांतीच्या मंचावर व्याख्याने करविली पाहिजेत. मुसलमानांना राष्ट्रीय वृत्ती शिकविण्याकरता प्रसंगी कटू परंतु अती गुणकारी असे बोध केले पाहिजेत.'

मुसलमानांच्या आक्रमक प्रवृत्तीचा परिपोष होण्याला वाव मिळाला याचे प्रमाण पाकिस्तानच्या रूपाने आज आपण बघत आहोत.

१९३७ मध्ये सावरकर रत्नागिरीच्या स्थानबद्धतेतून मोकळे झाले. सावरकर आणि गांधीवाद यांचा तेव्हापासून सरळ सरळ सामना होऊ लागला. स्वराज्य मिळविण्याच्या उद्दिष्टाबरोबरच सावरकरांना आणखी एक कार्यक्रम हाती घ्यावा लागला. तो म्हणजे एकपक्षीय अहिंसाप्रणालीच्या शिकवणुकीचे खंडन. त्याचे विधायक स्वरूप म्हणजे हिन्दुसंघटन.

गांधीजींचा राजकारणात उदय होण्याच्या पूर्वीच, म्हणजे १९०६ मध्येच, सावरकरांनी स्वतंत्रतादेवतेचे स्तोत्र आज जे नभोवाणीवरून म्हटले जाते ते म्हटले होते. 'तुजसाठि मरण ते जनन, तुजवीण जनन ते मरण' असे त्यांनी स्वातंत्र्यदेवतेस आळविले होते. त्यांनी स्वतः स्वातंत्र्यप्राप्तीसाठी काय यातना सहन केल्या होत्या हे सांगण्याचे कारण नाही. स्वराज्यासाठी बलिदान केलेल्यांचा ते सतत गौरव करीत. १९३७ नंतरही त्या वीरांना ते प्रकट सभांतून अभिवादन करीत. हिन्दुसंघटन या कार्यक्रमाच्या कक्षेत हिन्दुंना अधिक अधिकार मिळावेत ही त्यांची भूमिका नव्हती. मात्र सहिष्णुतेच्या नावाखाली हिन्दुंचे अधिकार हिसकावून घेऊन दुसऱ्यांना देण्यास त्यांचा विरोध होता. अन्याय हिन्दुंवर लादला जावा, पक्षपात हिन्दुंनी सहन करावा हे त्यांना पटत नव्हते. हिन्दुसभा आणि काँग्रेस यांच्यात संघर्ष होऊ लागला तो या विषयावर.

हिन्दुसभा राजकारणात नव्यानेच पदार्पण करीत होती. काँग्रेसच्या प्रचारतंत्राचा

जम चांगला बसला होता. सावरकरांच्या नेतृत्वाखालील हिन्दुसभेचे हिन्दुसंघटनेचे अधिष्ठान म्हणजे गांधीजींच्या नेतृत्वाखालील काँग्रेसच्या हिन्दू-मुस्लिम एकतेच्या धोरणाला विरोध या जाणिवेने हिन्दुसभा स्वराज्यविरोधी आहे, ती प्रतिगामी आहे, ती जातीय आहे हा अपप्रचार केला जाई आणि तो सहज विकला जाई. शस्त्रविद्या शिकण्यासाठी सैन्यात जा, शस्त्रसिद्ध होण्यासाठी चालून आलेली संधी या क्षणी वाया घालवू नका, शस्त्राचा वापर योग्य वेळी कसा करायचा हे तुम्हाला कळेल, या सावरकरांच्या प्रचाराचा विपर्यास केला जाई. परिणाम असा झाला की, हिन्दुहिताला विरोध म्हणजे राष्ट्रभक्ती, हिन्दुसभेच्या कार्यकर्त्यांवर आक्रमण म्हणजे स्वराज्यप्राप्तीची वाटचाल, अशी अलिखित व्याख्या होऊन बसली.

अशा अपप्रचाराला उत्तर देण्यासाठी काही स्वतंत्र प्रज्ञेची वृत्तपत्रे आपण होऊन पुढे झाली. अगदी किरकोळ अशी चार-सहा वृत्तपत्रे हिन्दुसभेच्या प्रचाराची म्हणून काढली गेली. दारूबंदी यशस्वी झाली असे आज कोणी लिहिले तर आपण विनोदाने हसतो. तेव्हा हिन्दु-मुस्लिम एकता यशस्वी झाली असे कोणी म्हटले तर उपहासाने हसता येत नसे. त्याविरुद्ध काही वस्तुस्थितिनिदर्शक लेख लिहिले तर वृत्तपत्रांना दंड केला जाई.

शासकीय पातळीवरील प्रचारतंत्राचा वापर युद्धाकाळात परपक्षाची दिशाभूल करण्यासाठी केला जातो. त्यावेळी स्वकीय कोण आणि परकीय कोण याची परीक्षा काँग्रेसने केली नव्हती. प्रचारतंत्राचा उपयोग केला गेला तो आत्मवंचनेसाठी. मुस्लिम धर्माधिष्ठित राष्ट्र निर्माण झाले ते हिन्दुस्थानच्या बाहेर नव्हे तर हिन्दुस्थानच्या भूमीवर. पूर्ण हिन्दुस्थान हीच देशभक्तांची कर्मभूमी होती. ज्या लाहोरला संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव २६-१-१९२९ या दिवशी पंडित नेहरू यांच्या मुखाने झाला ते लाहोर आम्हाला विभाजनामुळे परके झाले. प्रचारतंत्रामुळे मात्र, आम्ही द्विराष्ट्रवाद मानला नाही असे आपण निःसंकोचपणे म्हणावयास शिकलो. स्वराज्यप्राप्तीलगतच्या काळात झालेल्या बेचाळीसच्या आंदोलनात शासनाने हिन्दुस्थानभर पंधरा सहस्रांवर लोक मारले असे काँग्रेस महासमितीचेच प्रतिवृत्त आहे. सुभाष सेनेचे लोक तर रणांगणावरच लढले. नौदलाच्या उठावात अनेकांचे बळी पडले, स्वराज्यप्राप्तीसाठी हिन्दु-मुस्लिम एकतेचे जे मार्ग अनुसरले गेले त्यांची परिणती स्वराज्यप्राप्तीच्या काळात प्रांतच्या प्रांत रक्तबंबाळ होण्यात झाली. प्रचारतंत्राच्या एखाद्या कुंचल्याने आपण हे रक्तरंजित अध्याय पुसून टाकतो आणि थोडेही न चाचरता म्हणतो, 'रक्ताचा एक थेंबही न सांडता आम्ही स्वराज्य मिळविले.' आमच्या प्रचारतंत्रात आपल्या हितशत्रूंना फसवण्याची शक्ती नव्हती. परंतु स्वतःची फसवणूक करून घेण्यात आपणास राष्ट्राची उंची वाढल्यासारखे वाटू लागले.

गांधीजींचे योग्य स्थान कोणीही नाकारणार नाही, कोणीही नाकारू नये. परंतु त्यांच्या अपयशाला अपयश म्हटल्याने त्यांची प्रतिष्ठा घटेल अशी शासनाने धारणा करून

घेतली. म्हणून गांधीजींचे व्यक्तिमत्त्व आणि त्यांची खोटी प्रतिष्ठा टिकविण्यासाठी किंवा उंच करण्यासाठी सत्याशी प्रतारणा करणारा प्रचार चालू ठेवला जात असे.

वस्तुस्थिती सांगणारे लोक किंवा पक्ष थोडे होते. सावरकर अशा अल्पसंख्याकांचे अध्वर्यू होते.

आपल्याला आजही नेहमीची डोकेदुखी देणारे मुस्लिम राष्ट्र निर्माण झाले. त्याच्यासह उर्वरित हिन्दुस्थानला स्वराज्य मिळाले.

उरलेल्या हिन्दुस्थानात यापुढे हिन्दुहिताचा होम करू नका, कारण त्यायोगे स्वातंत्र्याला खिंडारे पडतील, शस्त्रशक्ती वाढवा, एकपक्षीय अहिंसा प्रचारू नका आणि लादू नका, हा सावरकरांचा आग्रह होता. सावरकरवाद आणि गांधीवाद यांतील मूलभूत अंतराची इतकी खोलवर पार्श्वभूमी होती.

मंत्रिमंडळातील एका गटात आता गांधीजींच्या धोरणाविषयी अप्रियता वाढू लागली होती. नेहरू आणि आझाद यांचा गट गांधीजींची पडती प्रतिष्ठा राखण्यामागे होता तर पटेलप्रभृतींचा कल राजकारण व्यवहारीपणाने खेळण्याकडे होता असे आपणास आझादांच्या 'स्वातंत्र्याच्या जन्मकाळी' या पुस्तकावरूनही दिसते. ही ओढाताण चालू असताच पंचावन्न कोटी रुपये अडवून धरल्याची शासनाची पत्रके, गांधीजींचा उपवास, शासनाची माघार, दिल्लीच्या परिसरातील हिन्दुंवर लादल्या गेलेल्या अटी, गांधीजींच्या प्रार्थनासभेच्या ठिकाणी स्फोटकाचा स्फोट आणि दहा दिवसांनी गांधीजींची हत्या या घटना फार त्वरेने घडून आल्या.

हिन्दुहिताची हट्टाने उपेक्षा केली गेल्याने गांधीजींची हत्या झाल्याचे शासनाला कळण्यास वेळ लागला नाही. हिन्दुहिताच्या उपेक्षेला विरोध करणारे प्रभावी नेते सावरकर होते. म्हणून त्यांच्यावर शासनाचा सरळ सरळ रोष होता. सावरकरांपर्यंत दूरान्वयाने पोहोचवणाऱ्या कच्च्या आधारावर त्यांनी सावरकरांना गांधीहत्येच्या कटात गोवण्याचे ठरविले. मंत्रिमंडळात वेगळा गट असला तरी त्या गटाने मंत्रिमंडळात एकवाक्यता आहे हे प्रकट करण्याच्या हेतूने आणि गांधीजींवर अश्रद्धेची चर्चा होण्यास वाव मिळू नये म्हणूनही असा अभियोग सावरकरांवर भरण्यास सहमती दिली असा तर्क करता येतो. शासनाची बाजू अभियोजकांना उचलून धरण्याची असल्याने सावरकरांच्या प्रेरणेने आणि आदेशाने गांधीहत्या केली गेली असली पाहिजे असा तर्क न्यायालयापुढे मांडणे अभियोजकांना भाग होते.

शासकीय पातळीवरून हिन्दुंना हानिकारक गोष्टी करण्याच्या असतील तर सावरकरवादी गटाला आवरून मग त्या गोष्टी केल्याचे उदाहरण त्यानंतरही आपणास इतिहासात सापडते. नेहरू-लियाकत वाटाघाटी होण्याचे ठरताच सावरकर आणि इतर अनेक कार्यकर्ते यांना स्थानबद्ध केलेले होते. हिन्दुंचे अहित साधणे म्हणजेच हिन्दुस्थान-पाकिस्तान संबंध टिकविणे असे समीकरणच जणू तेव्हा बळावलेले होते. धर्मनिरपेक्षता हिन्दुहिताचा

बळी देऊन साधण्याइतका हिन्दुद्वेष त्यावेळी राज्यकर्त्यांत बावरत असे. सावरकरांना गांधीहत्येच्या कटात गोवण्यामागे शासनाची अशी धार होती. सावरकरद्वेषाची आणि हिन्दुद्वेषाची धार मंदावण्यास पुष्कळ वर्षे लागल्याचे आपणास दिसते.

अभियुक्त असताना सावरकरांचे वर्तन

कटात गोवले गेल्यावर सावरकरांनी इतर अभियुक्तांशी कधी 'तुम्ही माझ्याशी संबंध दाखवू नका, त्यातून तर्क काढले जातील.' अशी भूमिका ठेवली नाही. गांधीहत्या प्रकरणाचा तपास चालू असताना बहुतेक आरोपींना मुंबईच्या गुप्तचर विभागाच्या (C.I.D. Branch च्या) कार्यालयात ठेवले होते. सावरकरांना आर्थर रोड बंदिशाळेत ठेवले होते. अबधी मागण्यासाठी एकदा सावरकरांना 'चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट' यांच्या न्यायालयात आणले होते. त्याच दिवशी इतर आरोपींसाठी अबधी मागण्याचा होता म्हणून त्यांनाही तेथे नेले होते. सावरकरांना समोर पाहताच पहिला प्रश्न मनात उभा राहिला तो हा की, ते बोलण्याच्या मनःस्थितीत आहेत का ?

गाडीची वाट पाहात आम्ही थोडा वेळ पडवीत थांबलो होतो. सहज काहीतरी बोलावे म्हणून नाना आपटे सावरकरांना म्हणाले, 'हे पोलीस अधिकारी बोलताना तोंडात खडीसाखर ठेवून बोलतात.' सावरकरांनी मोकळेपणाने उत्तर दिले, 'त्यासाठी तुम्ही त्यांचे आभारी असले पाहिजे; कारण तसे करण्यास ते बांधलेले नाहीत.'

सावरकर मनाने उदास झालेले, खचलेले, किंवा निवृत्त झालेले नाहीत हे त्या उत्तरावरून दिसून आले. आपणास न्यायालयीन दिव्यातून जावे लागणार आहे याचा आडाखा बांधून त्यांनी आपल्या मनाला तसे घडवून ठेवलेले दिसत होते. संकटात ताठपणे उभे राहणारे ते सावरकर असे त्यांचे तो वेळेपर्यंतचे चरित्र होते. या वेळीही तोच प्रत्यय आला.

दिल्लीच्या लाल किल्ल्यातील विशेष बंदिगृहात शंकर किस्तैया आणि बडगे सोडून इतर अभियुक्त एकत्र होते. सर्वांची पहिली मोकळी भेट दि. २७-५-१९४८ या दिवशी झाली. आपटे आणि नथुराम यांच्याशी सावरकरांचा घनिष्ठ संबंध होता. तो तसा संबंध न्यायालयात किंवा बंदिगृहात दाखवायचा नाही, असे त्यांनी केले नाही. न्यायालयात मधल्या सुट्टीत ते मोकळेपणाने बोलत असत. बंदिगृहात तर बोलत असतच.

पहिल्या भेटीत त्यांनी प्रत्येकाकडून काय वदवून घेतले आहे किंवा कोणी काय काय सांगितले आहे याची चौकशी केली. त्यावरून प्रत्येकाविरुद्ध काय पुरावा येण्याची शक्यता आहे आणि त्यांच्याविरुद्ध काय पुरावा आणला जाईल याची कल्पना केली. तपास आता राहिला नव्हता. त्यामुळे आणखी काही पुरावा उपस्थित केला जाण्याची शक्यता नव्हती.

नथुरामला पंडित म्हणून गौरविल्याने आपणाविरुद्ध मन कलुषित होईल, अशी भीती

त्यांना वाटली नाही. त्यांच्या लेखी वक्तव्यात त्यांनी नथुरामचा पंडित म्हणून उल्लेख केलेला आहे. काही वर्षांनंतरच्या त्यांच्या एका ध्वनिमुद्रित भाषणातही त्यांनी तसा उल्लेख केल्याचे आढळून येते.

नथुराम आणि नाना आपटे या दोघांसकट सर्वच अभियुक्तांविषयी त्यांना आपुलकी वाटे. प्रसंगोपात ती ते व्यक्त करीत असत. एकदा नाना आपटे यांच्याविरुद्ध एक साक्ष झाली. सावरकर नानांना म्हणाले, 'ही साक्ष तुमच्याविरुद्ध येण्याचे कारण काय ?' नाना म्हणाले, 'पोलिसांशी बोलण्याच्या ओघात मी अमुक अमुक गोष्ट बोललो होतो, त्यांनी माझे म्हणणे पडताळण्यासाठी तपास केला आणि अवचितपणे त्यांना हा साक्षीदार मिळाला.'

सावरकर म्हणाले, 'कारण नसताना, तुम्हाला विचारले नसताना, तुम्ही होऊन तुमच्या भोवती वातावरण निर्माण करून ठेवले आहेत. तुम्हाला ते नडेल असे मला वाटते. सर्वांनीच माना अडकवून घेणे शहाणपणाचे आहे काय ?' गोष्ट होऊन गेली होती खरी !' नाना काय बोलणार !

सावरकरांचा अभियुक्त क्रमांक आठ असला तरी आरोपींच्या पिंजऱ्यात त्यांच्यासाठी बसण्याची व्यवस्था सर्वांत प्रथम म्हणजे न्यायमूर्तींच्या जवळ पडेल अशी केली होती. त्यांच्या शेजारी नथुराम बसत असे. काही प्रसंगी साक्षीदारांचे उत्तर सावरकरांना इतरांच्या बचावाच्या दृष्टीने महत्त्वाचे वाटे. किंवा कोणा साक्षीदाराच्या एखाद्या विधानावरून, त्याला अमुक प्रश्न विचारला जावा असे त्यांच्या मनात येई, अशा वेळी ते नथुरामला खुणावीत आणि तो भाग टिपून ठेवण्यास किंवा लक्षात ठेवण्यास सांगत; मग मधल्या सुट्टीत किंवा बंदिगृहात त्यावर ते चर्चा करीत.

डॉ. परचुरे यांच्याविरुद्ध आणलेल्या एका साक्षीदाराला न्यायमूर्तींनी डॉक्टर परचुरे यांना ओळखण्यास सांगितले. तो मोठ्या विश्वासाने आरोपींच्या पिंजऱ्याजवळ आला आणि त्याने खुणेने दाखविले, परंतु त्याने केलेले बोट संदिग्ध होते. न्यायमूर्तींनी साक्षीदारास आणखी जवळ जाण्यास सांगितले आणि डॉक्टरांना हाताने शीव अशी आज्ञा केली.

साक्षीदार पुढे आला आणि त्याने हातावर हात ठेवला तो डॉक्टरांच्या नव्हे तर सावरकर यांच्या !

न्यायालयात हास्यस्फोट झाला. आपले काही तरी चुकले अशी साक्षीदाराला जाणीव झाली. क्षणभर त्याने इकडेतिकडे बघितले. मग त्याने डॉक्टर परचुरे यांच्या हातावर हात ठेवला.

हे नंतरचे दाखविणे ग्राह्य धरू नये असे बचाव पक्षाने न्यायमूर्तींना सांगितले. या उलट प्रकाशाने कदाचित डोळे दिपल्याने आमच्या साक्षीदाराने प्रथम चुकीची व्यक्ती दाखविली अशी वकिली अभियोजकांनी चालू केली.

सावरकर उभे राहिले आणि न्यायमूर्तींना म्हणाले, 'साक्षीदार मला प्रत्यक्ष शिवला आहे.'

'मी त्याची नोंद घेतली आहे.' असे न्यायमूर्ती म्हणाले आणि तो वाद संपला. (साक्षीदार क्रमांक पी. डब्यू. ५३, जगन्नाथसिंग, दि. १५-७-१९४८, अभिलेख ग्रंथ १, पृष्ठे ७४-७५) साक्षीदार 'बनवून' आणले हे न्यायमूर्तींनी लक्षात घेतले तर त्याचा न्याय्य लाभ डॉक्टर परचुरे यांना मिळावा असे सावरकरांना वाटत होते.

त्यावेळचे गृहमंत्री श्री. मोरारजी देसाई यांची साक्ष चालू होती. उलट तपासणीतून नथुराम आपल्या वकिलाकरवी, गांधीहत्येची पार्श्वभूमी आणि 'अग्रणी' किंवा 'हिन्दुराष्ट्र' या दैनिकाला मोरारजींनी कसे छळले ही वस्तुस्थिती न्यायालयापुढे आणीत होता. मोरारजी आडवळणाने उत्तरे देत. थोडा वेळ ते नथुरामने पाहिले. एका उत्तराने तो अस्वस्थ झाला. ताडकन उभा राहून न्यायमूर्तींना उद्देशून म्हणाला, 'मंत्रिमहाशय नीट उत्तरे देत नाहीत. ३० जानेवारीला मी केलेल्या कृत्याला या गृहमंत्र्यांनी माझा केलेला अनन्वित छळ हे एक कारण आहे आणि म्हणून हे गृहमंत्री त्या कृत्याला तितकेच उत्तरदायी आहेत !'

न्यायालयात क्षणभर शांतता पसरली. अभियोजक दक्ष होते. नथुरामचे 'मी केलेल्या कृत्याला' हे शब्द त्यांना महत्त्वाचे वाटले. कारण ती स्वीकारोक्ती (confession) होती. नथुरामचे म्हणणे टिपून घ्यावे असे त्यांनी न्यायमूर्तींना सुचविले. 'योग्य वेळी माझे म्हणणे मी आपणास देणार आहे; पण आत्ताच ते लिहून घेण्यास माझी ना नाही !' असे नथुरामने सांगितले. परंतु नथुरामचे वकील श्री. ओक यांनी अभियुक्तांच्या बक्तव्याची ही वेळ नव्हे, असे न्यायमूर्तींच्या लक्षात आणून दिले. न्यायमूर्तींनीही ते मानले. अभियोजकांनी आग्रह धरला नाही आणि नथुरामचे ते उद्‌गार लिहिले गेले नाहीत; पण तेवढ्या प्रसंगाने, नथुराम अर्धसत्य आणि आडवळणाच्या विधानांनी अस्वस्थ कसा होतो याचे दर्शन सर्व उपस्थितांना झाले.

न्यायालयातून परत येताना सावरकर नथुरामला म्हणाले, 'नथुराम, आज मोरारजीला सह्याद्री दाखविलास !'

नथुरामने स्वीकारोक्ती द्यावी अशा प्रकारच्या सूचना वकिलांकरवी कधी कधी सावरकरांपर्यंत येत. सावरकर म्हणत, 'त्यांना सांगा, हलवायाच्या घरावर तुळशीपत्र ठेवणे सोपे असते. स्वतः त्या भूमिकेत आहोत, अशी क्षणभर कल्पना करून बघा आणि मग परामर्श घा.'

हिन्दुंमध्ये स्वाभिमान जागृत करण्याची सावरकरांची प्रणाली होती. त्यांचे तत्त्वज्ञान दुसऱ्यांवर अन्याय करण्याचे नव्हते. मात्र स्वत्व न सोडण्यासाठी कोणताही त्याग करण्यास सिद्ध असावे ही त्यांची विचारपद्धती होती. स्वतःसाठी तर त्यांनी 'हे आपले कुलही त्यामधि

ईश्वरांश, निर्वंश होऊनि ठरेल अखंड वंश !' किंवा 'अशीच सर्व फुले खुडावी श्रीरामचरणी अर्पण व्हावी, काही सार्थकता घडावी, या नश्वर देहाची !' 'अमर होय ती वंशलता, निर्वंश जिचा देशाकरिता' अशी सिद्धता ठेवली होती. स्वत्व राखण्याच्या तत्त्वज्ञानातून गांधीहत्या उद्भवली होती हे उघड दिसत असूनही आणि या तत्त्वज्ञानाचे जनक सावरकर स्वतःच मृत्यूच्या छायेत वावरत असूनही सावरकरांनी स्वतःच्या तत्त्वज्ञानावर कधी अविश्वास दाखविला नाही. नथुराम किंवा आपटे हे त्या तत्त्वज्ञानाचे नव्हते किंवा हिन्दुमहासभेचे नव्हते असा बचाव दिला नाही. नथुराम किंवा आपटे यांनी आपापल्या वक्तव्यात हिन्दुसभेचा किंवा सावरकरांच्या तत्त्वज्ञानाशी आलेल्या त्यांच्या संबंधाचा उल्लेख टाळावा असा उपदेश त्यांनी केला नाही.

नथुराम आपले वक्तव्य स्वतःच नेहमी मराठीत लिहीत असे. त्याचे भाषांतर केले जाई. सावरकरांनी काही भाग लिहावा असे नथुरामला वाटे. सावरकर म्हणत, 'तुला मी लिहून देण्याची आवश्यकता नाही, लिहिलेले मला दाखवित जा, काही फेरफार आवश्यक वाटल्यास मी सुचवीन.'

नथुरामने आपल्या वक्तव्याची काही पाने घाईघाईने लिहिली होती. कारण वेळ थोडा उरला होता, विषयाची मांडणी आणखी व्यवस्थित करावी असे त्याला वाटत होते; परंतु जवळ असलेल्या वेळात ते शक्य नव्हते. सावरकरांनी त्याचे समाधान केले. ते म्हणाले, 'जे झाले आहे ते वाईट नाही. आता त्यात उलटापालट केल्याने जी सुसूत्रता आली आहे त्यात बिघाड येईल. हे काही व्यासपीठावर रंगविण्याचे व्याख्यान नव्हे. स्वतःचे प्राण तुच्छ वाटण्याइतक्या पराकोटीला मन कसे गेले हे दाखविणारे हे मनाचे बुडबुडे किंवा तरंग किंवा आवेग आहेत. दुःखानंतर हुंदके जरी मुक्त छंदात किंवा अनिर्बंध वाटले तरी त्यातून त्या आवेगामागील भाव निश्चितपणे आणि अकृत्रिमपणे समजतात. तुझे वक्तव्य त्या दृष्टीने परिपूर्ण आहे.

स्वतःचे अभिवक्तव्य किंवा आर्ग्युमेंट स्वतःच मांडण्याचे नथुरामने ठरविले खरे; पण त्याला एक न्यूनगंड होता. अभिवक्तव्य इंग्रजीतून करण्याचे होते. आपल्याला विश्वविद्यालयीन पदवी नाही, आपण साधी शालांत परीक्षाही उत्तीर्ण होऊ शकलो नाही; तेव्हा इंग्रजीतून आपले विचार कितपत नीटपणे व्यक्त होतील, अशी त्याला भीती होती.

दि. १६-१२-१९४८ या दिवशी नथुरामने आपले म्हणणे मांडण्यास प्रारंभ केला. दुसऱ्या दिवशी त्याने आपले भाषण संपविले. भाषण चालू झाल्यावर थोड्याच वेळात त्याच्या नकळत त्याने न्यायमूर्ती, अभियोजक, बचावपक्षाचे वकील, इतर श्रोते यांची मने आपल्या वक्तव्याने खेचून घेतली. कोठेही न अडखळता, योग्य शब्दांसाठी शोधाशोध करण्याची वेळ न येता, विषयाला धरून वेळोवेळी संदर्भ देऊन, तो तासामागून तास बोलत राहिला होता.

आपले म्हणणे मांडताना, स्वतःच्या मानेभोवतीचा दोर नथुराम विसरला असेलही. पण कोणताही श्रोता तो दोर त्याच्या मानेभोवती मनाने स्पष्टपणे बघत होता. एरवी, नथुरामचे भाषण कसे झाले याला महत्त्व नव्हते. फासात मान ठेवून तो कसे बोलला त्याला श्रोत्यांच्या दृष्टीने महत्त्व होते.

नथुराम सांगत होता, 'ज्याला सुखी म्हणता येईल असे जीवन मी उपभोगीत होतो. परंतु कदाचित मनुष्याची तृप्ती तेवढ्यावर नसते. सहजीवनाच्या कल्पनेतून राष्ट्र या कल्पनेचा उदय झालेला आहे. विश्वकुटुंब या कल्पनेला राष्ट्र ही धारणा आवश्यक असते. विस्कळित समाज राष्ट्र म्हणवून घेऊ शकणार नाही, किंवा राष्ट्र म्हणून टिकणार नाही. कारण त्यातील घटकांचे हितसंबंध समान किंवा साधारण नसणार आणि समाजाचे घटक सहजीवन या कल्पनेशी एकरूप होणार नाहीत. सुसंघटित राष्ट्रांचे सहजीवन ते विश्वकुटुंब. सुसंघटित राष्ट्र विश्वकुटुंबाच्या योजना मांडू शकते. व्यक्तीची कक्षा राष्ट्र या भावनेपर्यंत सीमित असते.

'राष्ट्र या कल्पनेतून समवेदना आणि सहानुभूती या भावांचा परिपोष होतो. जनसमाजातील कोणाही घटकाचे राष्ट्रीय पातळीवरील दुःख, ते माझे दुःख, राष्ट्राचे हित ते माझे हित, राष्ट्राचे स्वातंत्र्यसंरक्षण ते माझे स्वातंत्र्यसंरक्षण ही भावना अंतःकरणात रुजते. वैष्णव जन तो तेने कहिये पीड परायी जोन रे, या अर्थाची वेगवेगळ्या संतांची शिकवण मनात वावरत राहते.

'माझ्या व्यक्तिगत सुखी जीवनात मला समाधान वाटेना. फाळणीची झळ न लागलेल्या, रक्तपात न झालेल्या प्रांतात, महाराष्ट्रात मी राहात होतो. फाळणीने ग्रस्त झालेल्या प्रांतातील लोक माझे कोणीच नव्हते. पण तेथील रक्तपाताचे मला सोयरसुतक असण्याचे कारण काय, अशी भावना माझ्या मनात ठरूच शकली नाही.

'फाळणीची प्रत्यक्ष झळ या प्रांताला लागली नाही तरी निर्वासितांचे लोंढ्या लोंढे येथे प्रत्यही येत होते. चुकलेल्या धोरणाची जिवंत स्मारकेच जणू, निर्वासितांची शिबिरे ठिकठिकाणी उभी राहिली होती. त्यांच्या नकळत त्यांच्या भूमीवर मुस्लिम धर्माधिष्ठित राष्ट्र निर्माण केले गेले होते. त्यांच्या प्राणांच्या आणि वित्ताच्या सुरक्षिततेचे त्यांना आश्वासन दिले गेले होते, परंतु प्रत्यक्षात त्या राष्ट्रात त्यांचे भवितव्य एक मरण किंवा दुसरे तेथून निष्कासन किंवा तिसरे भ्रष्टीकरण एवढेच ते अनुभवीत होते. ते त्या नवराष्ट्राचे घटक नव्हते, कारण ते त्या धर्माचे नव्हते हा त्यांचा अपराध ठरला.

'या राष्ट्राने त्यांना सामावून घेतले. कारण ते या राष्ट्राचेच घटक होते. आश्रय शोधावा असे दुसरे राष्ट्र त्यांच्यासाठी या भूतलावर नव्हते.

'त्या असंख्य हत्या करण्यास आणि उरलेल्यांचे निष्कासन करण्यास कारणीभूत झाले त्यांना आम्ही पाचारण केले, 'तुम्ही परत या. आमचे राष्ट्रच निधर्मी आहे; तुम्ही

कसेही वागत असा, आम्ही तुमच्याशी चांगले वागू; तुम्ही धाडलेल्या निर्वासितांना वेळी उघड्यावर ठेवून आम्ही तुमची घरे तुम्हांला परत देतो, तुमची घरे कोणी मोकळी करत नसेल किंवा तुमच्यावर कोणी हात उगारला तर आमचे सैन्य त्यांच्या निःपातासाठी आम्ही सज्ज ठेवले आहे. आमच्या बंदुकी तुमच्यावर उगारल्या जाणार नाहीत कारण ती हिंसा ठरेल. जगात आमची नाचक्की होईल,

'निर्वासितांना पुन्हा निर्वासित होण्याची पाळी आली.'

सहिष्णुतेच्या नावाखाली अन्यायाची पायरी कोणत्या थरापर्यंत गेली होती याची मीमांसा आधारासहित आणि संदर्भासहित करीत नथुराम त्याच्या वक्तव्यातील उच्चतम बिंदूकडे जात होता.

'आपले राष्ट्र सभ्यतेचे किंवा शिष्टाचाराचे अनभ्यस्त कधीच नाही; वादविवादाने सुटणाऱ्या प्रश्नावर वादविवाद किंवा वाटाघाटी करण्यात काहीच कमीपणा नाही. बुद्धिबळाने प्रतिपक्षाला आपला दृष्टिकोण पटविण्याची आपली क्षमता पाहिजेच, मात्र त्याच्यासह शस्त्रबळाची कोणाकडून धमकी असेल तर शस्त्राने प्रत्युत्तर देण्याची क्षमता आपण ठेवली पाहिजे, हे सूत्रात स्पष्ट करण्यासाठी त्याने एक वचन उधृत केले होते,

'अग्रतश्चतुरो वेदाः पृष्ठतः सशरं धनुः।
इदम् ब्राह्ममिदम् क्षात्रं शापादापि शरादपि ।'

'ब्रिटिशांच्या राजवटीत क्रांतिकारकांच्या वाट्याला लोकप्रियता तरी येत असे. या अभियोगात राजसत्ताही विरुद्ध आणि लोकात अप्रियता अशा दुहेरी रोषात मी उभा आहे. परंतु फाळणीपासून पंचावन्न कोटीच्या दानापर्यंतच्या संकटाचे मूळ गांधीजींचे धोरण होते ही माझी धारणा आहे. त्यांना आरोपी करणारे न्यायालय अस्तित्वात असणे शक्य नव्हते. म्हणून मला स्वतःला वास्तविक अप्रिय वाटणारी ही गोष्ट करावी लागली. त्यांच्या परिणामाची मला चिंता नाही.

'चारुदत्त असाच त्यावेळच्या कोण्या ३०२ दंडविधानाप्रमाणे अभियुक्त म्हणून न्यायालयापुढे उभा होता. तो दोषी नव्हता आणि दोषारोप त्याच्या माथी मारला जात होता. ते त्याला दुःख होते. मरणाचे त्याला भय नव्हते. तो म्हणाला होता, 'न भीतो मरणादस्मि केवलं दूषितं यशः...'

'मरणाची मलाही भीती वाटत नाही. लोकात माझ्यासंबंधी अप्रियता, कटुता किंवा तिरस्कार निर्माण होईल किंवा केला जाईल याचेही मला भय नाही. माझ्या कृत्यामागील हेतूचा विपर्यास केला जाऊ नये एवढीच इच्छा आहे.'

न्यायालय पूर्णपणे भरलेले होते. सर्व श्रोते एकचित्ताने ऐकत होते. अंतःकरणापासून निघत असलेल्या त्या उद्गारात कोठेही दीनवाणेपणा नव्हता. विचार स्पष्ट होते. ऐकलेल्या

भाषणानेच लोकांचे कंठ दाटून आले होते. आसवे डोळ्यांपर्यंत पोहोचली होती.

नथुराम बोलत होता, 'मराठी क्षेत्रात नामवंत गणले जातील अशा वक्त्यात माझी गणना आहे. विषयाशी एकरूप होऊन बोलण्याने कदाचित मला ते प्राप्त झाले असेल. विनय सोडून बोलायचे तर अनेक सभा मी गाजवल्या आहेत. सभासभांतून फुलांचे हार स्वीकारले आहेत. ते फुलांचे हार जर माझ्या भाषणांचे पारितोषिक म्हणून असतील आणि ते मी सहर्ष स्वीकारले असतील, तर मी केलेल्या अवैध कृत्याचे पारितोषिक म्हणून दोरीचा फासही तितक्याच सहजपणे गळ्याभोवती बागविलेला आपणास दिसेल, कारण मी प्रस्तुत विषयाशीही तितकाच एकरूप आहे.'

श्रोत्यांची डोळ्यापर्यंत आलेली आसवे टपटप गळू लागली होती, दाटलेल्या कंठांना हुंदके फुटत होते. शांतता पसरली होती. कोणी बोलण्याचा प्रयत्न केला तर आवाज घोगरा आणि जड येत होता. नाव सांगणे इष्ट नाही, कारण मी संबंधित व्यक्तीची अनुमती घेतलेली नाही; अभियोजकांपैकी कोणाची तरी सुविद्य पत्नी भाषणात इतकी तन्मय झाली होती की हुंदके आवरण्याचे भानही तिला राहिले नाही. स्त्रियांचे अंतःकरण आधीच भावनाप्रधान असते. अनेक पुरुषांची जिथे तशी अवस्था झाली होती तिथे स्त्रियांची तशी अवस्था होणे आश्चर्याचे नव्हते.

नथुरामच्या वरील ओघवत्या वाणीचे सावरकरांना कौतुक वाटले. त्याच्या वक्तृत्वाची त्यांना रत्नागिरीपासून ओळख होती. त्याच्यासंबंधी त्यांना आत्मीयता वाटे, विश्वास वाटे, तो इतका की अनौपचारिक बैठकीतील चर्चेत ते पुष्कळदा सांगत, 'या प्रश्नाचे उत्तर आमचा नथुराम देईल.'

नथुरामच्या वक्तव्याचा पहिला दिवस संपला आणि आम्ही बंदिगृहात आलो. सावरकर सहसा दुसऱ्यांच्या खोलीत जात नसत. पण त्या दिवशी ते, मी आणि नथुराम राहत असलेल्या खोलीत आले आणि नथुरामला म्हणाले, 'भाषेची भीती तू कशाला बाळगतोस ? प्रत्यक्ष सरस्वती तुझा पाठपुरावा करीत होती. The language followed you. 'वाचमर्थोऽनुधावति' याचे प्रत्यंतर दिलेस !'

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी परत आल्यावर सावरकर भारावल्यासारखे झाले होते. गहिवरून ते नथुरामला म्हणाले, 'धिंग्राला एकदाच मला जवळून बघता आले. इतर काहीजण रत्नागिरीला येत, भेटून जात, पण ते अभियोगात अडकल्यावर त्यांची भेट होत नसे. काय योग आहे ठाऊक नाही, तुला मी येथे प्रत्येक दिवशी बघतो आहे.'

स्वतःच्या वक्तव्याची पाने सावरकर जसजशी लिहीत तसतशी ते ती माझ्याकडे देत. मी पानावरून चांगली प्रत करीत असे.

उच्च न्यायालयात जाण्याची वेळ आलीच तर सावरकरांनी एक पुनरावेदनाचे प्रारूप

करून ठेवले होते. 'तात्या, तुमच्याविरूद्ध जो पुरावा आणला गेला आहे यावरून तुम्ही दोषी धरले जाल असे वाटत नाही.' असे त्यांना म्हणताच ते उत्तरे देत, 'अरे मला सोडले तर मी जाणार का नाही ? का सोडले तरीही पुनरावेदन करणार आहे ? पुरावा काय योग्यतेचा आहे याची जाणीव शासनाला होती तरीही त्यांनी अभियोग करण्याचे ठरविले ना ? न्यायमूर्तींनी ओढून ताणून निष्कर्ष काढण्याचे ठरविले तर ? म्हणून कोणत्याही प्रसंगाला आपली तोंड देण्याची सिद्धता असावी.'

सावरकरांवर अभियोग भरणे योग्य होते काय ?

सावरकरांविरुद्ध पुरावा संकेतात्मक होता ! प्रत्यक्ष नव्हता. एवढा संकेतात्मक पुरावा असा अभियोग भरण्यास पुरतो असे जर प्रमाण धरले तर अभियोगात काही साक्षीदार व्यक्तींवर अभियोग भरला जाणे त्रैराशिकाने योग्य झाले असते. त्या व्यतिरिक्त साक्षीदार म्हणून आणले गेले नव्हते अशाही काही व्यक्तींवर कटाचा आरोप ठेवणे गणिताने उचित ठरले असते. कारण त्यांच्या विरुद्ध त्यांच्या वर्तनातूनच संकेतात्मक पुरावा मिळाला असता.

सावरकरांवर आरोप काय तर त्यांनी गांधीहत्येचा आदेश दिला असेल, किंवा या कृत्यासाठी आशीर्वाद दिला असेल. सावरकरांचे चरित्र ज्यांनी सूक्ष्मतेने अभ्यासिले असेल त्यांना हे ठाऊक आहे की सावरकरांनी कोणाला 'तू अमूक कर' असे कधीही सांगितले नाही. ते स्वतःच्या जीवाशी खेळले. दुसऱ्याच्या जीवाशी खेळले नाहीत. त्यांच्या तत्त्वज्ञानात जी शक्ती होती, व्यक्तिमत्त्वात जी प्रेरणा होती, त्यायोगे स्वतः होऊन स्वतःच्या जीवाशी खेळणारे लोक त्यांच्याभोवती गोळा झाले. परंतु अमुक एक कृत्य करावे असे मला वाटते, त्यासाठी तू अमूक ठिकाणी उडी घे असे त्यांनी कोणाला सांगितले नाही. मग ते मदनलाल धिंग्रा असोत, की वासुदेव बळवंत गोगटे असोत.

नथुराम आणि आपटे ही अशी उथळ माणसे नव्हती की, सावरकरांनी असला आदेश द्यावा आणि त्यांनी तो निमूटपणे ऐकावा. त्यांची प्रज्ञा स्वतंत्र होती, आचार स्वतंत्र होते. त्यांनी सावरकरांना लिहिलेल्या पत्रातूनही, 'हिन्दूसभेचे अध्यक्ष या नात्याने आपणाकडून अमुक अमुक विचारप्रदर्शन झाले पाहिजे.' अशा स्वतंत्र सूचना आढळतात. त्यामुळे आदेशाचा प्रश्न, नथुराम आणि आपटे यांच्या संबंधात अप्रस्तुत आणि असंभाव्य होता. बडगेच्या कथेची रचना अतिशय थिल्लर होती. सावरकरांच्या नथुराम आणि आपटे यांच्याशी काही तरी गुप्त गोष्टी होतात. त्या गुप्त गोष्टींची परिसमाप्ती खोलीत न करता,ते त्या गोष्टीचे सूत्र मुखात ठेवून जिना उतरून खाली येतात आणि समोर एक साक्षीदार आहे हे बघूनसुद्धा म्हणतात, 'यशस्वी होऊन या,' या उथळपणे मांडलेल्या कथेचा अर्थ गांधीहत्येला आशीर्वाद असा करावा असे अभियोजक सांगतात.

खोलीपर्यंत गुप्तता राखायची आणि खोलीबाहेर त्या गुप्ततेची वाच्यता करायची असा उथळपणा सावरकरांच्या वर्तनात नव्हता. बडगेची कथा आपण सोडून देऊ, आपण असे गृहीत धरू की अमुक गोष्ट होणार आहे किंवा आम्ही करणार आहोत, असे नथुराम आणि आपटे सावरकरांना बोलले होते, म्हणजेच असे समजू की त्यांना ही गोष्ट ठाऊक होती. तेवढ्यावरून ते कटाचे घटक होते असा निष्कर्ष काढणे योग्य होईल काय ? तसा आरोप त्यांच्यावर करणे न्याय होईल का ?

अधिकात अधिक असे म्हणता येईल की,एक नागरिक या नात्याने त्यांनी योग्य अधिकाऱ्यांना वेळीच कळविण्याची व्यवस्था केली नाही. त्या मर्यादेपुरता त्यांच्यावर आरोप लादला तर आणि त्यांना बचावाची संधी दिली तर ती अन्याय्य म्हणता येणार नाही. पण त्यांना आधी ठाऊक होते, असे अनुमान होते, म्हणून ते कटाच्या आरोपास पात्र, हे परिमाण लावले गेले होते.

या परिमाणाने प्राध्यापक जैन कटाचे घटक होते असा आरोप त्यांच्यावर केला जाणे योग्य ठरले असते. श्री. जैन यांनी मोरारजींना माहिती दिली ती मदनलालने स्फोटकाचा स्फोट केला आहे हे वाचल्यानंतर आणि गांधीजींना दुखापत झाली नाही हे कळल्यानंतर. तोवर त्यांनी ती माहिती कोणा योग्य अधिकारी व्यक्तीला तरी दिली नाही, स्वतःजवळ ठेवली. कल्पना करू की २० जानेवारीला गांधीहत्या झाली असती तर श्री. जैन मोरारजींशी बोलावयास गेले असते काय ?

श्री. मोरारजी म्हणतात, 'माझे नाव प्रकट करू नका; ज्या व्यक्ती यात अडकलेल्या आहेत आणि ज्या लोकवस्तीत मी राहतो आहे त्याचे ध्यान ठेवावे; नाही तर माझ्या जीविताला धोका आहे, असे जैन यांनी सांगितले (म्हणून) नगरवाला मला भेटले तेव्हा या कटाची माहिती मला कोणाकडून कळली ते मी त्यांना बोललो नाही.' (अभिलेख ग्रंथ १, पृष्ठ १६७)

हेतू चिकटविण्याचा झाला तर असे म्हणता येईल की, 'अद्याप काम व्हायचे आहे आणि काम फिस्कटले आणि ते माझ्या या मंत्र्याच्या भेटीमुळे फिसकटले असे कटवाल्यांना कळले तर ते माझाच काटा काढतील.' असे मनात आल्याने जैन यांनी स्वतःचे नाव प्रकट करू नका असे मंत्र्यांना सांगितले. अर्थात कटाशी संबंध असलेल्या व्यक्तीला अशी भीती असू शकते. श्री. ग. वि. केतकर यांना ते श्री. बाळूकाका कानिटकर यांच्याशी बोलले तेव्हा ही भीती वाटली नाही. कानिटकरांनाही कै. बाळासाहेब खेर यांना पत्र लिहिताना अशी भीती वाटली नाही.

'आधी का बोलला नाहीत.' असे मंत्र्यांनी प्रा. जैन यांना विचारता त्यांनी उत्तर दिले, 'असे जळफळाटाने बोलण्याची निर्वासितांना सवयच होती; आणि मदनलालला आपण

त्या विचारापासून परावृत्त केले आहे असा मला विश्वास वाटला.' (पृष्ठ १७७) पण मग प्राध्यापक जैन यांच्या साक्षीप्रमाणेच, ते या कटासंबंधी श्री. जयप्रकाश नारायण आणि त्यांच्या महाविद्यालयातील एक बी. ए. याज्ञिक यांच्याजवळ बोलले होते. (पृष्ठ १३२, १३४) 'पोलिस अधिकाऱ्यांना का बोलला नाही ?' असे त्यांना विचारता ते म्हणाले, 'मला व्यक्तिशः कोणीच पोलीस अधिकारी ठाऊक नव्हता आणि पोलिसांवर विश्वास ठेवण्यात सुरक्षितता नाही असे मला वाटते.' हेतू याही उत्तराला चिकटवता येईल. जैन याच्या वर्तनामुळे पोलिस जैन यांना कटाचा घटक म्हणूनच मानतील अशी त्यांना भीती वाटली म्हणून ते पोलिस अधिकाऱ्यांजवळ बोलले नाहीत.

श्री. जैन यांनी सांगितले, 'या कटाचा शोध लावण्यात मी सहाय्य करण्यास सिद्ध आहे. कारण मला कटाची माहिती आहे असे मी मंत्र्यांना सांगितले. एक नागरिक या नात्याने हा कट उघड करण्यासाठी त्यांना सहाय्य देण्याची माझी इच्छा होती. (पृ. १३४)

मोरारजींच्या म्हणण्याप्रमाणे, 'माझे नाव प्रकट करू नका, नाही तर माझ्या जीविताला धोका आहे.' असे श्री. जैन म्हणाले. कोणी तरी एकजण खोटे बोलत आहे हे उघड आहे. प्रस्तुत विषयाशी संबंध एवढाच आहे की, श्री. जैन यांना असलेली माहिती त्यांनी स्फोट होईपर्यंत योग्य अधिकाऱ्यांना कळविली नाही. माहिती होती अशा संदिग्ध संशयाने सावरकर कटाचे आरोपी म्हणून धरले गेले. जैन यांनाही त्याच परिमाणाने आरोपी करता आले असते. कारण त्यांना तर माहिती होती यात संशयही नव्हता.

आणि मोरारजी देसाई आरोपी म्हणून का नकोत ? हेतू चिकटवण्याचा झाला तर त्यांचा निष्काळजीपणा हेतुपूर्वक होता असे म्हणता येईल. श्री. जैन यांचे म्हणणे नुसतेच आपल्या अंगावर न ठेवता त्यांनी आरक्षी आणि जैन यांची सांगड घालून दिली असती तर योग्य झाले असते. श्री. जैन यांना संरक्षण देण्याची शक्ती शासनात नव्हती काय ? श्री. जैन म्हणाले, 'माझे नाव पुढे आणू नका' आणि मोरारजींनी ते ऐकले. याचा अर्थच असा की, गांधीजींच्या संबंधात जे काय होणार असेल ते होऊ द्यावे मग बघता येईल; अशी उदासीन वृत्ती त्यांनी ठेवली. यापुढे सयुक्तिकपणे हेतू चिटकण्याचा झाला तर असा : आतून कटवाल्यांना संकेत करण्याच्या हेतूने मंत्र्यांनी निष्क्रियता स्वीकारली.

निष्क्रियता अवैध कृत्याला पूरक असेल तर तशी निष्क्रियता दाखविणाऱ्या व्यक्ती त्या अवैध कृत्याच्या कर्त्यांना सहाय्यभूत म्हणूनच धरल्या जातात. पहारेकऱ्याने थोडे दूर जायचे आणि चोराला मोकळीक द्यायची, यात पहारेकरी निर्दोषी राहू शकत नाही.

काँग्रेसच्याही अनेक पुढाऱ्यांना गांधीजींच्या राजकारणाचा उबग झाला होता ही त्या वेळची वस्तुस्थिती होती. ते गांधीजींना आणि त्यांच्या राजकारणाला कंटाळले होते. वैतागले होते. गांधीजींच्या शेवटच्या उपवासाने तर वल्लभभाईंच्या मनात गांधीजींविषयी

तिटकाराच निर्माण झाला होता. कारण वल्लभभाईंचे हात बांधण्यासाठी तो उपवास होता आणि नंतर तसे दिसलेही. ते दिल्ली सोडून निघून गेले होते. गांधीजी परस्पर गेले तर बरे, त्यायोगे पुढची दुर्दशा तरी थांबेल, असे कोणास वाटले असणे असंभव नव्हते.

गांधीजींच्या मृत्यूनंतर त्यांच्यावर ज्यांचे प्रामाणिकपणे प्रेम होते त्यांचे दुःखही प्रामाणिक होते. गांधीजींच्या मृत्यूच्या क्षणापर्यंत गांधीजी नकोत असे ज्यांना वाटत होते, त्यांनी गांधीजींच्या मृत्यूनंतर जो दुःखाचा उमाळा दाखविला तो प्रामाणिक नव्हता. गांधीजीच जिथे आपल्या मरणाला आमंत्रण देत आहेत तिथे आपण मधे पडा कशाला असे ज्यांचे वर्तन होते त्यांनी गांधीहत्येनंतर व्यक्त केलेले दुःख केवळ स्वतःच्या वर्तनावर पांघरूण घालण्यासाठी होते.

सावरकर उघड उघडच गांधीवादाच्या विरुद्ध होते. गांधीवादाने काय हानी केली आहे, हे ते सारखे दाखवीत होते. त्यांना गांधीहत्येचे वृत्त आधी ठाऊक असेल या संशयाने त्यांना आरोपी केले गेले; कारण ते सोपे होते, आणि तोही एक स्वतःच्या वर्तनावर पांघरूण घालण्याचा आणि लोकांचे लक्ष दुसरीकडे वेधण्याचा उपाय होता. दुःखाचा ज्यांनी खोटा उमाळा आणला त्यांचे वास्तविक स्थान आरोपींच्या पिंजऱ्यात होते. कारण काय होणार आहे याची त्यांना जाणीव होती. आणि नियतीच्या खालोखाल ही दुर्घटना घडणार नाही अशी दक्षता घेण्याची त्यांच्याजवळ साधने होती. खऱ्या-खोट्याचा निर्णय न्यायालयाने केला असता.

अन्यथा केवळ संशयावरून सावरकरांना आरोपी करणे सर्वथैव अन्याय्य होते. राज्यसूत्रे स्वाधीन घ्यायची आणि ती सावरकरांच्या हाती द्यायची असला हा कट नव्हता. जनहित हेच ध्येय, जनस्तुती नव्हे, हे सावरकरांचे ब्रीद होते. कोणत्याही मानाला आणि सत्तास्थानाला ते हपापलेले नव्हते. आपण व्यवहारी राजकारण सांगत आहोत, पण ते गांधीवादाने आकृष्ट झालेल्या प्रवाहाच्या विरुद्ध उभे राहून, तेव्हा आपल्या वाट्याला उपेक्षा आणि अवहेलना येणार आहे, हे ते ओळखून होते. आणि त्यांच्या वाट्याला उपेक्षा आणि अवहेलना आली होती. त्यामुळे गांधीहत्येमुळे आपणास मानाचे स्थान मिळेल, अशी कल्पनाही त्यांच्या मनाला शिवणे शक्य नव्हते आणि सुदैवाने शासनाने तसला आरोप त्यांच्याविरुद्ध लादला नाही. तरीही केवळ संशयावरून त्यांच्यावर हत्येचा आरोप ठेवणे आणि त्यांना आपली निर्दोषता सिद्ध करावयास लावणे अन्यायकारक होते.

वरील विवेचनात जे नामनिर्देश आले आहेत, त्यांचा या कटाशी संबंध होता असे मला सूचित करावयाचे नाही. सरदार वल्लभभाई यांच्याविषयी तर 'त्यांचा या कटाशी संबंध होता, असे मानणे त्यांच्यावर अन्याय करणारे होईल.' असे मी पूर्वी एका लेखात म्हटले आहे. पुढे होणारी घटना कदाचित ठाऊक असणे, त्यासंबंधी मुग्धता पाळणे किंवा निष्क्रियता

दाखविणे हे एका ठिकाणी कटाचा आरोप लादण्याइतके दोषार्ह ठरले नाही, दुसऱ्या ठिकाणी ठरले, ही तुलना मला लक्षात आणून द्यावयाची आहे. ती मुग्धता हेतुपुरस्सर होती, आपद्धर्म म्हणून होती, राष्ट्रहित म्हणून होती, धोरण म्हणून होती की गलथानपणा म्हणून होती हे कळण्यास कोणाच्या संबंधात आधार नव्हता; आरोप मात्र एकाच व्यक्तीवर लादला गेला होता.

सावरकरांनी नथुराम आणि आपटे यांना पुढे केले या आरोपाला उत्तर म्हणून ज्यांनी ज्यांनी नंतर खोटे दु:ख-प्रदर्शन केले त्यांनीच सावरकरांच्या तत्त्वज्ञानाला पुढे केले आणि स्वार्थ साधला असे म्हणता येणार नाही काय ? पुरावा दोन्ही ठिकाणी नव्हता. आणि आरोप तर एकाच ठिकाणी केला गेला होता. सावरकर, त्यांचे तत्त्वज्ञान, त्यांचे अनुयायी यांनी आपण पुढे केले गेलो होतो असे मानले नाही हा भाग वेगळा. उलट्या आधारावर उभे राहणारे ते तत्त्वज्ञान नव्हते, त्या व्यक्ती नव्हत्या. या तत्त्वज्ञानातील कोणीही व्यक्ती आत्मप्रत्ययाने आणि आत्मानुभूतीने आत्मार्पणाला उभी राहिलेली दिसेल. सावरकरांच्या शब्दात, हुतात्मा मनाने कणखर आणि परिपक्व असेल तर... तर हौतात्म्याची वेळ येऊन ठेपली आहे, हेही प्राय: त्यात अनुस्यूत असते. (If a martyr is determined and ready, that fact by itself generally implies that the time for martyrdom must have come.)

निर्णय

क्रांतिकारकांचा गौरव करण्यास सावरकरांनी लोकांना शिकविले होते. चाफेकर बंधूंचा पोवाडा त्यांनी इंग्लंडला जाण्यापूर्वीच केलेला होता. रत्नागिरीला स्थानबद्धतेत असूनही वासुदेव बळवंत गोगटे यांचा उल्लेख त्यांनी एका पौराणिक कथेच्या रूपाने केला होता. जालियनवाला हत्याकांडाचा कर्ता मायकेल ओडवायर याला उधमसिंगाने मारले होते. तो काळ युद्धाच्या धामधुमीचा होता. शनवारवाड्यापुढील १९४० मधील भाषणात सावरकरांनी उधमसिंगाचा निर्देश केला होता.

सावरकरांना १९१० मध्ये पकडून हिन्दुस्थानात आणले होते. त्यांचे भवितव्य हिन्दुस्थानातील न्यायालय ठरविणार होते. शासन विरुद्ध होते, आणि भीतीचे वातावरण निर्माण केले गेल्याने या क्रांतिकारकाचा गौरव करण्यास लोक धजत नव्हते. उपेक्षा त्यांच्या वाट्याला आली होती.

आपण अडकलो तर क्रांतिकार्याचे कसे होईल, लोकांना उत्साह कोण देईल, त्याचे नेतृत्व कोण करील, असा विचार त्यांच्या मनाला चाटून जातो न जातो तोच त्यांच्या मनाने त्यांना समजावले, किती अहंकारी तू ? तुझ्याबाचून काही अडणार आहे का ? तूच कर्ता

आहेस असे का समजतोस ? आणि उद्‌गार निघाले होते...

पडले शत शत मत्सम, तरि का अगतिक असेल भारत हा ।
श्रीकृष्ण सारथी यद्रथ हाकाया सदा उभा रत हा ।

लोक आपल्यामागे येतील की नाही, हे क्रांतिकार्य चालवतील की नाही, ते आपली स्तुती करतील की निंदा या विचारांच्या ते पलीकडे होते.

दि. २४-१२-१९१० या दिवशी त्यांचे भवितव्य न्यायालयाने ठरवून दिले - 'जन्मठेप!'

दिनांक ३१-१-१९११ या दिवशी त्यांना दुसरी जन्मठेप सुनावली गेली होती.

जवळ जवळ चाळीस वर्षांनंतर तसाच प्रसंग पुन्हा आला होता. शासन विरुद्ध होते. आणि लोकही विरुद्ध होते. अवहेलनेच्या वेदीवर त्यांना उभे केले गेले होते.

दिनांक १०-२-१९४९ हा दिवस सर्व अभियुक्तांचे भवितव्य सांगणार होता. सावरकरांचे विधिलिखितही त्या दिवसाच्या पोटात होते.

पूर्वी म्हटल्याप्रमाणे, त्या वेळचा शासनाचा दृष्टिकोण सावरकरांविरुद्ध रोषपूर्ण होता. जणू काही मुस्लिम राष्ट्र आणि हिन्दुराष्ट्र यांच्यात युद्ध पेटले आहे, मुस्लिम राष्ट्राचा सेनानी मारला गेला आहे, तुम्ही आमचा सेनानी घेतलात आम्ही तुमचा घेऊ अशा प्रतिशोधाने पेटलेल्या मुस्लिम राष्ट्राने हिन्दुराष्ट्राच्या सेनानीला घेरण्याची प्रतिज्ञा केली आहे, अशा अन्वर्थ अभिनिवेशात आपल्याच शासनाने ज्वलंत राष्ट्रभक्त सावरकरांना घेरण्याचे ठरविले. आपल्याच पायावर कुऱ्हाड मारून घेण्याचा तो प्रकार होता. लोकसत्ताक पद्धतीची काही तंत्रे पाळणे आवश्यक होते, म्हणून त्यांच्याभोवती असा घेरा घालण्यासाठी न्यायमंदिराच्या मेघडंबरीतून जाणे शासनाला क्रमप्राप्त होते.

अनेक असंबद्ध तंतू एकत्र आणून त्यांचा त्यांनी दोर केला होता. हा दोर घ्या, हा सावरकरांच्या मानेभोवती चपखल बसेल, असे त्यांनी न्यायदेवतेला आळविले होते.

कारागारातही काथ्याकूट करण्यास सरावलेल्या सावरकरांनी त्या दोराचा तंतू अन् तंतू अलग करून न्यायदेवतेपुढे धरला होता आणि सांगितले होते, 'ज्या तंतूत शक्ती नाही त्याला पीळ काय येणार, ज्याला पीळ नाही त्याचा दोर काय होणार, आणि जो दोर नाही तो मला काय घेरणार ?'

न्यायदेवता आंधळी खरी; पण ती देवता होती. तिला अंतःचक्षू होते, स्पर्शज्ञान होते; तिला संवेदना होत्या. अभियोजकांनी पुढे टाकलेला दोर न्यायदेवतेने चाचपला. सावरकरांच्या सहाय्याने त्या दोराच्या विणीतील बिलगता अनुभवली आणि सहज उकलणाऱ्या त्या दोराचे तटातट तुकडे करून ते अभियोजकांच्या अंगावर भिरकावले. अभियोजकांना न्यायदेवतेने बजावले, 'शासनाला सांगा, कोणत्याही दोराने कोणालाही फास देण्यासाठी

माझी स्थापना नाही.'

सावरकरांना उद्देशून न्यायदेवता म्हणाली 'सावरकर, तुम्ही निरपराध आहात, तुम्ही निष्कलंक आहात, तुमच्या राष्ट्राप्रमाणेच तुम्ही स्वतंत्र आहात !'

लाल किल्ल्याबाहेर प्रचंड जनसमुदाय जमला होता. बंधमुक्त सावरकर लाल किल्ल्यातून बाहेर पडत होते. जनसमुदाय हेलावला. अवकाश दुमदुमून सोडणाऱ्या स्वराने त्या लोकसागराने सावरकरांना आलिंगन दिले -

स्वातंत्र्य लक्ष्मी की जय,
अखंड भारत अमर रहै,
स्वातंत्र्यवीर सावरकर की जय !

卐 卐

नऊ

दूरत्वाचे दिवस

रात्रीचे आठ वाजत आले होते. लोखंडी कैच्या जोडण्याचे काम चालू होते. तापविलेले लबंगकील - म्हणजे रिव्हेट - घणाघाताने गोलाकार घेत होते.

भट्टीच्या पंख्याला विजेची शक्ती नव्हती. दोन मुली आळीपाळीने पंखा फिरवीत होत्या. आणखी तासभर भट्टी रसरसती ठेवण्याची होती.

मुलींची आई कैच्या जोडण्याच्या कामात गर्क होती. तिला थोडीशी मोकळीक आहेसे पाहून एका मुलीने तिला म्हटले, 'आई ग, उद्या आपण तांदूळ आणि पीठ येथेच आणू म्हणजे भट्टीवरच भात-पिठले करता येईल !'

मुलींना भूक लागली आहे, त्या दमल्या आहेत, घरी जाऊन स्वयंपाक होईपर्यंत त्यांना झोप आवरणार नाही हे मुलींच्या आईच्या लक्षात आले, 'बरंय हं, उद्या तसंच करू.' असे म्हणून तिने मुलींचे समाधान केले.

भट्टीत टाकलेले खिळे लवकर लाल झाले. ते ठोकून टाकले. नऊ वाजण्याची वाट न बघताच आईने काम थांबवले. मायलेकी घरची वाट चालू लागल्या.

माझ्या पत्नीचे नाव सिंधू. आम्हाला दोन मुली आहेत. एक विद्युल्लता, दुसरी असिलता, मला फेब्रुवारी १९४८ मध्ये अटक झाली तेव्हा एक मुलगी दोन वर्षांची होती. दुसरी तीन चार महिन्यांची. मातेचे आणि पित्याचे उत्तरदायित्व सिंधूच सांभाळीत होती आणि मुलींचे संगोपन करीत होती.

माझे वडील बंधू दत्तात्रय (नथुरामपेक्षा धाकटे) उद्यम इंजिनियरिंग हे उद्योगालय चालवीत असत. सिंधू तेथेच रहात असे, आणि 'उद्यम' मध्ये काम करीत असे.

संबंधात कटुता निर्माण होऊ नये आणि दूरत्व येऊ नये म्हणून सिंधूने पाचसहा वर्षांनी वेगळे बिऱ्हाड केले. मुलींना घेऊन ती तेथे राहू लागली. प्रताप इंजिनिअरिंग या

नावाने एक लहानसे उद्योगालय तिने स्वतंत्रपणे चालू केले.

लहान लहान कामातून स्थिरता येत येत आता पाच-सहा श्रमिक ठेवण्याइतपत 'प्रताप'ने प्रगती केली होती. सिंधू स्वत:ही काम करी. कैऱ्या करण्याचे एक त्यातल्या त्यात मोठे काम स्वीकारले होते. परिस्थिती अशी होती की त्याला अवधीचे बंधन होते. काम त्या वेळात पुरे झाले नाही तर प्रत्येक दिवसाच्या विलंबासाठी काही एक दंड होता. कामाने चांगली गती घेतली होती.

आणि आपत्या बेळी, काही घरगुती अडचण निघाल्यामुळे दोन कामकरी त्या दिवशी कामावर आले नव्हते. कामही महत्त्वाचे होते. कैऱ्या दुसऱ्या दिवशी दुपारपर्यंत देण्याच्या होत्या. समस्या उभी राहिली होती.

मुलींच्या शाळेला पाच-सहा दिवस सुट्टी होती. त्यांना बरोबर घेऊनच सिंधू उद्योगालयात जाई. राहण्याची जागा तपकीर गल्लीत होती तर उद्योगालय जंगली महाराज मंदिरासमोर.

साडेतीन किंवा चारला उठायचे, आह्निक आटोपायचे, स्वयंपाक करायचा, मुलींना उठवायचे, त्यांचे आंघोळपाणी करायचे, शक्यता असेल त्याप्रमाणे चहा, दूध, भाकरी किंवा पोळी त्यांना द्यायची, जेवणाचा पुरेसा डबा घ्यायचा आणि आठच्या आत उद्योगालयात जायचे असा सिंधूचा कार्यक्रम. परत गेल्यावर भात-आमटी करून ती आणि मुली जेवण करीत. तत्पूर्वी मुलींचे अभ्यास बघणे आणि त्यांच्याकडून काही पाठांतर करून घेणे हे ती नियमाने करीत असे.

जाण्या-येण्यासाठी वाहन वापरणे तेव्हा शक्यतेच्या बाहेरची गोष्ट होती. मध्यंतरात चालत जाण्याइतका वेळ नसे. त्यामुळे दुपारचे जेवण उद्योगालयात करणे सोयीचे पडे.

कामाचेच दोन लोक त्या दिवशी आलेले नाहीत असे पाहून सिंधूने दुसऱ्या कामकऱ्यांना हाताशी धरले. 'आम्हाला हे काम कसे येणार' असे त्यांनी म्हणताच 'मी दाखविते, तुम्ही नुसते मी सांगते त्याप्रमाणे करा.' असे तिने सांगितले. भट्टी पेटविली गेली. मुलींना तिने पंखा फिरवायास लावले. ती स्वत: कधी घण मारी, कधी खिळे योग्य ठिकाणी बसवून त्यावर साचा धरी.

रात्रीपर्यंत काम आटोक्यात आले होते. दुसऱ्या दिवशी दोन-तीन तास काम केले की कैऱ्या हातावेगळ्या होणार होत्या.

मुलींना उद्योगातील कामात गोडी वाटे. व्यवहारील म्हणजे ड्रील मशीनवरील लोखंडी पट्टीवर पाणी घालणे, पट्टी तोडली जात असताना दुसरे टोक धरणे, कोळसे निवडणे, भट्टीवर लक्ष देणे, अशी कामे त्या हौसेने करीत. परिस्थितिवश त्यांच्या खेळण्या-बागडण्याच्या वयात हाच खेळ त्यांच्या वाट्याला आला होता.

आजचे काम मात्र त्यांच्यासाठी खेळासारखे नव्हते. लहान वयात कामाच्या वैचित्र्यात हौस वाटते. एकच काम कंटाळवाणे वाटते. पण आज हे काम करणे आवश्यक आहे एवढी समज त्यांना आली होती. हातापेक्षाही मन थकून गेले तरी थकावट दाखवायची नाही, 'दमले' हा शब्द उच्चारायचा नाही, असा त्यांचा मनोमन निश्चय होता. आपल्या मुलींना त्यांच्या शक्तीबाहेरील कष्ट पडत आहेत हे त्यांच्या आईला दिसत होते. पण एखाद्या दिवसाचाच प्रश्न होता आणि मुलींचा श्रमपरिहार तीच करणार होती. कामाचे महत्त्व होते म्हणून मुलींसाठी कणव आणण्यास तिला दिवसभर वेळ नव्हता. कामाच्या विलंबामुळे आपल्याला दंड झाला तरी त्या विलंबाने काम देणारांची हानी भरून येणार नाही ही तिच्या मनाला टोचणी होती, कारण ते काम आपल्याच राष्ट्राच्या संरक्षण विभागाचे होते ! देशाच्या तटबंदीला रचनात्मक पद्धतीने बळकटी आणण्याच्या योजनेला सिंधू हातभार लावीत होती !

ठरविल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी काम पूर्ण झाले होते. ते योग्य ठिकाणी पोहचविले गेले होते.

क्रांतिकारकांच्या वाट्याला बंदिवास आला की त्यांच्या नातेवाईकांच्या आणि अवलंबितांच्या वाट्याला यातना येतात ही इतिहासाची परंपरा आहे. जवळच्या व्यक्ती संबंध ठेवीत नाहीत. असलेले संबंध तोडतात. क्रांतिकारकांच्या आप्तांशी आपण बोललो तर, न जाणो, आपणास पकडून नेतील अशी भीती त्यांच्या मनात वावरत असल्याने रस्त्यातून जाताना कधी समोरासमोर येऊनही ते ओळख दाखवीत नाहीत.

अशी भीती वाटण्यात त्या व्यक्तीचा दोष असतो असे नाही. भीतियुक्त वातावरण निर्माण केले जाते त्याचा तो परिणाम असतो. वाळीत टाकणे ही प्रथा आजच्या लिखित विधीला संमत नाही. तरीही, क्रांतिकारकांच्या अवलंबितांची कोंडी निर्माण व्हावी अशा पद्धतीने विधीच्या संरक्षकांचा व्यवहार होतो.

गांधीहत्येच्या निमित्ताने दहा सहस्र हिन्दुंना पकडले होते. आपला संबंध या हत्येशी कशा प्रकारे जोडला जातो याचा प्रत्येकजण भीतियुक्त मनाने विचार करू लागला. हे लोक पकडले जाण्याची निमित्तेही अनेक होती. काही तर अगदीच क्षुल्लक होती. कोणाच्या घरी संपूर्ण हिन्दुस्थानचे मानचित्र मिळाले. कोणाच्या घरात संघाची टोपी होती. कोणाजवळ सावरकरांचे एखादे पुस्तक मिळाले. कोणी आपल्या घरात काही देशभक्तांची चित्रे लावली होती. त्यात गांधीजींचे चित्र नव्हते. कोणी, केव्हातरी कोणालातरी लिहिलेल्या पत्रात 'गोडसे' हे क्रियाविशेषण वापरले होते. कोणा बारक्याच्या घरात काठीला लावलेली भगवी पताका दिसली, कोणाच्या घरी धुणी वाळत घालण्याची काठी सोडून आणखी दोन काठ्या होत्या. या काठ्या संघाच्या होत्या, असे शेजाऱ्यांनी सांगितले होते. असली क्षुल्लक कारणे जरी सोडली तरी सर्वसाधारणपणे, ज्या ज्या घरात हिन्दुंचे स्वत्व टिकविले जात आहे असा संशय

होता त्या त्या घरातील लोक शासनाने आपल्या आधीन घेतले होते.

पकडलेल्यापैकी प्रत्येकाचा काही ना काही संबंध गांधीहत्येशी जोडला जाऊन निर्णय करण्याचे काम न्यायालयावर सोपविले गेले असते तर मला वाटते, हा अभियोग पाचुढेही आठ-दहा वर्षे चालू राहिला असता. पकडलेल्यापैकी अनेकांचा राज्यकर्त्यांशी काही ना काही संबंध असल्याने 'सोन्याचा सूळ सम्राटासाठी' या बिरबलाच्या विनोदी कथेप्रमाणे काही रेशमाचे दोरही वळून ठेवावे लागले असते.

पण पकडलेल्यापैकी सर्वांना न्यायालयापुढे आणले गेले नाही. भय, आतंक निर्माण करणे हा हेतू होता. तो साध्य झाला होता. 'नथुरामचा किंवा कटात असणाऱ्या लोकांचा आणि आमचा संबंध नाही.' असे अनेकांनी ओरडून आणि काहींनी न ओरडता सांगितले होते. काहींनी अनाहूतपणेच, 'तो मी नव्हेच' या चालीवर नथुरामशी त्यांचा असलेला पूर्वापार संबंध एखाद-दुसऱ्या पत्रकाने झटकून टाकला होता. नथुरामशी संबंध म्हणजे षडयंत्रात सहभाग असे समीकरण नसते असा विवेक असण्याइतकी त्यांची मनःस्थिती शांत राहिली नव्हती.

क्रांतिकारकांपुरते बोलायचे झाले तर एक पूर्वापार नियम आपणास असा आढळतो की, बिस्तवात हात घालायचा आहे हे ठरविलेल्या क्षणापासूनच आपले जीवन आपल्या आधीन नाही याची तो आपल्या मनाशी खूणगाठ बांधतो. त्याच्या हाती असते ते एवढेच की, आयुष्य उपभोगायला मिळाले तर ते उपभोगायचे. आशा मनात बागवावी हवी तर, पण मोह बागवू नये ही त्यांची विचारप्रणाली असते. मातापित्याची माया, पत्नीचे प्रेम, अपत्यांचे वात्सल्य हे सर्व पाश तो तोडून टाकतो. कोणी युद्धावर गेला तर तो तसा जाताना घरी कल्पना असते. अशा कामात घरी कोणास सांगून जाण्याचीही सोय असतेच असे नाही. निघताना तो घराला तिलांजली देऊनच बाहेर पडतो. आपल्या पश्चात आपल्या घराचे काय होईल याची क्षिती तो बाळगत नाही. 'संन्यास घ्यायचा आहे, पण म्हैस व्यायला झाली म्हणून थांबलोय' या वृत्तीने जो बागतो त्याचा पाय घरातून निघत नाही. जो बाहेर पडतो तो आपला जीव म्हशीत आणि खरवसात अडकवून ठेवीत नाही.

क्रांतिकारकांचा इतिहास काही प्रमाणात या ना त्या मागनि, आज ना उद्या लोकांपुढे येतो. त्यांच्या कृत्यामागील भावनेचा गौरवही होतो. एकवेळचे 'माथेफिरू' कालांतराने 'राष्ट्रभक्त' म्हणून त्याच समाजाच्या पुढच्या पिढीतून गौरविले जातात. ज्यांनी 'माथेफिरू' म्हटले त्या आपल्या पूर्वीच्या पिढ्यांना ते दोष देत नाहीत. कारण भीतीपोटी, दहशतीचा परिणाम म्हणून त्यांना तसे म्हणावे लागले हे ते जाणतात.

ज्या घराशी क्रांतिकारक निगडित असतात त्या घराचे त्यांच्यामागे काय होते, त्यांच्या अवलंबितांची अवस्था काय असते, इकडे समाजाचे सहसा लक्ष जात नाही. वस्तुस्थिती

अशी असते की, क्रांतिकारक स्वतः काय यातना भोगील इतक्या यातना, इतकी अवहेलना, इतके कष्ट त्यांच्या अवलंबितांच्या आणि आप्तांच्या वाट्याला येतात. भोवती दहशतीचा वणवा पेटलेला, कोणी घरात टिकू देत नाही, कोणी दाराशी उभे करीत नाही, कोणी ओळख दाखवीत नाही, कोणी आपल्याकडे कदाचित ही मंडळी येतील या कल्पनेने दुरूनच 'इकडे येऊ नका' म्हणून सूचना धाडतात, असा अलिखित बहिष्कार संबंधितांवर लादला जातो.

रखरखीत वाळवंटातही अधूनमधून पाणथळ भाग आढळतो. भोवती हिरवळ वाढलेली असते, अशी पृथ्वीची चमत्कारमय रचना आहे. क्रांतिकारकांच्या आप्तांना जवळ करणारे लोक वणव्याचे भय न बाळगता अधूनमधून उभे राहिलेले आढळतात हीही, पृथ्वीच्या त्या रचनेला अनुसरून, इतिहासाची चमत्कारमय परंपरा आहे. अपेक्षा नसतानाही कोणीतरी जवळ येतो. सांगतो, 'असे उभे राहू नका, घरी चला; तुमचे जे भवितव्य असेल ते माझे असेल. तुम्ही स्वतःला निराश्रित समजू नका, आश्रयार्थी समजू नका. तुम्ही तसे वाटून घेतले तर मला दुःख होईल', अनिच्छेने पण असहायतेने आमंत्रकामागोमाग पाय चालू लागतात.

चांगल्या अन्नाचाही पहिलाच घास तोंडात फिरतो. तुलना मनात उभी राहते, जेथे आश्रयार्थी म्हणून नव्हे तर अधिकाराने जाऊन राह्यचे ते लोक दूर सरले; आणि जिथे कदाचित ओझरत्या ओळखीचाच संबंध असला तर असेल, त्यांनी स्वतःच्याच घासातील घास विभागून पुढे ठेवला ! उपकाराचे ओझे डोक्यावर असते आणि ते तर बोलता येत नाही !

आप्तांपैकी काहींना आणि गांधीहत्येचे निमित्त करून महाराष्ट्रात निर्वासित निर्माण करण्याच्या उपक्रमाचे बळी झालेल्या पुष्कळांना वरीलप्रमाणे अनुभव आला होता.

थोरले बंधू श्री. दत्तात्रय यांची उद्यम इंजिनिअरिंग ही उद्योगशाळा गांधीहत्येपूर्वी काही दिवस 'मर्यादित' केली होती. काही योजना डोळ्यांसमोर होत्या. त्या दृष्टीने वाटचाल समाधानकारक रीतीने होऊ लागली होती. गांधीहत्येच्या निमित्ताने श्री. दत्तात्रय यांना अटक केली गेली. आठ एक महिने ते अटकेत राहिले. तेवढ्या अवधीत उद्योगशाळेची वाताहत झाली होती. पुन्हा नव्याने प्रयत्न केला. नवीन प्रयत्न फलदायी होत आहे असे वाटू लागले. काही कामे हानी सोसून पुरी करावी लागली. त्यामुळे झालेली प्रगती खुंटलीच आणि पाय मागे आला. पुन्हा सावरता सावरता पानशेतच्या पुराने आणखी एक तडाखा दिला. या सर्व संकटांचा संकलित परिणाम म्हणून या 'मर्यादित' संस्थेचे स्वैच्छित अवसायन् म्हणजे Voluntary Liquidation करण्याचा मानहानिकारक प्रसंग आला. स्वतः लावलेले झाड इतरांकडून खत-पाणी मागून वाढवावे पण फळाची वाट बघण्याचे त्राण न राहिल्याने स्वतःच्या हाताने ते झाड तोडून त्या शुष्क लाकडाचे मूल्यहीन तुकडे वाटून टाकण्याची पाळी यावी यात जे दुःख असते ते ज्याचे त्यालाच कळते. दुसऱ्याच्या वित्ताचा वापर नीट करता आला नाही हा आरोप येतो आणि त्या आरोपाला उत्तर नसते. अपयशाची टोचणी मनात

घर करून राहते. व्यवसायवर्धनाच्या दृष्टीने सार्वजनिकरित्याही अशा घटनांचा परिणाम अनिष्ट होतो. नवीन उद्योग करणाराबर विश्वास ठेवला जात नाही.

गांधीहत्येनंतर राहते घर सोडणे भाग पडल्याने माझी पत्नी मुलींना घेऊन काही दिवस तिच्या माहेरी राहिली. माहेरच्या माणसांनी तिला आणि मुलींना निर्भयपणे ठेवून घेतले. माझ्या आईवडिलांनाही काही दिवस तिथे रहावे लागले. सौ. शांताबाई गोखले यांनी काही महिन्यांनी माझ्या आई-वडिलांना आपल्या वाड्यात राहण्यास जागा दिली. त्यावेळी तर त्यांचे ते धाडसच होते.

गांधीहत्या प्रकरणाच्या तपासासाठी आम्हा आरोपींना मुंबईच्या 'गुप्तचर' विभागाच्या कार्यालयात ठेवले होते. घरच्या माणसांना गाठीभेटी घेण्यास मोकळीक असे. पहिल्या एक-दोन भेटीत घराकडील वृत्त समजले होते, अथाप सर्वांच्या घरची मंडळी भेटून गेली नव्हती. त्यामुळे सर्वांच्या घरची स्थिती समजली नव्हती.

श्री. दत्तात्रय यांना अटक झाल्याने घरचे व्यवहार त्यांची पत्नी सरोजिनी कर्तेपणाने बघत असे. श्री. गोविंद हा आम्हा भावंडात सर्वांत लहान. तोही 'उद्यम' मध्ये काम करीत असे. आपल्यापरीने तोही काही उद्योग करीत असे.

सिंधूजवळ असलेले पैसे एकदोन भेटीच संपले होते. न्यायसहाय्याची व्यवस्था आणि जुळवाजुळव करण्याच्या दृष्टीने आणखी भेटी आवश्यक होत्या. त्यासाठी पैसे लागणार होते. घरून म्हणजे माहेरकडून पैसे मागणे तिला प्रशस्त वाटले नाही. इतर काही उद्योग करणे त्या वेळी शक्य नसल्याने तिने धुणी-भांडी करण्याची दोन-तीन कामे स्वीकारली.

एक वयस्कर स्त्री रुग्णशय्येवर होती. तिची धुणी धुण्याचे काम सिंधूला मिळाले होते. त्या स्त्रीचे पति सेवानिवृत्त होते. त्यांना अण्णा म्हणत. सिंधूने काम पत्करल्याला पंधरा-बीस दिवस होऊन गेले होते.

आपल्याच नादात 'The Miller of the Dee' या कवितेच्या ओळी म्हणत सिंधू धुणी धुवीत होती. त्या दिवशी झाले असे की, त्या स्त्रीच्या यजमानांनी काही ओळी ऐकल्या. ते घरात आले. आपल्या पत्नीला त्यांनी सांगितले, 'त्या मुलीने धुणी आणली म्हणजे तिला इकडे धाडून दे.'

त्या स्त्रीने - तिला आत्याबाई म्हणत - आपल्या पतीचा निरोप सांगितला. आणखी काही धुणे असेल या कल्पनेने सिंधू पलीकडच्या खोलीत गेली.

धुणे नव्हते. अण्णांना काही बोलायचे होते. सिंधूला त्यांनी विचारले, 'काय म्हणत होतीस ?'

'केव्हा ? मी तर काहीच म्हटले नाही !'

'मघाशी धुणे धुताना तू कोणती कविता म्हणत होतीस ?'

'हं हं ! ते म्हणता होय ? काही तरी गुणगुणत असले की कामाचा शीणही वाटत नाही आणि कामही झटकन् होते; निदान तसे वाटते तरी !'

'कोणती कविता होती ?'

'The Miller of the Dee' (दि मिलर ऑफ दि डी)

'तुला सगळी येते ?'

'होय !'

'म्हण बरं !'

सिंधूने सर्व कविता म्हटली. स्पष्ट उच्चार आणि उत्तम पाठांतर बघून अण्णांना आश्चर्य वाटले. ते म्हणाले, 'केव्हा शिकलीस ?'

'आम्हाला ही इंग्रजी चौथीत होती.'

'मग पुढे का नाही शिकलीस ?'

'शिकले !'

'पुढे शिकली आहेस तू ? मॅट्रिक झालीस ?'

'होय.'

'मग कॉलेजात नाही जाता आले तुला ?'

'गेले होते मी कॉलेजात.'

'मग ?'

'मी बी. ए. आहे. !'

अण्णांचे आश्चर्य क्षणाक्षणाला वाढत होते ! पदवीधर मुलगी धुण्यापाण्याचे काम करीत आहे हा काय प्रकार आहे हेच त्यांच्या ध्यानात येईना ! मोलाचे काम करतात तसे कसेतरी केलेले तिचे काम नसे, असे आत्याबाई आपल्या यजमानांना सांगत. प्रकृतीची विचारपूस, तात्कालिक सेवाशुश्रूषा, ती घरच्या माणसाप्रमाणे तेवढचा वेळात करीत असे, हेही त्यांच्या कानावर होते. या सुशील, सुविद्य मुलीवर काही तरी प्रसंग आला असला पाहिजे असा त्या गृहस्थांनी तर्क केला. नाव-गाव विचारले नव्हते. विचारण्याचे सहसा कारण पडत नाही, पण आज त्यांना राहवले नाही. त्यांनी विचारले,

'कुठे राहतेस तू ?'

'सोहनी वाड्यात.'

लग्न झालेले दिसत होते. माहिती मिळविण्याच्या हेतूने अण्णांनी अर्धवट सूचक प्रश्न केला.

'तुझे यजमान...!'

'अटकेत आहेत ते.'

'अटकेत ? आणि ते का ?'

'गांधीहत्येनंतर लोक पकडले ना, त्यात ते आहेत !'

'सबंध नाव काय तुझे ?'

'सिंधू गोपाळ गोडसे.'

'म्हणजे... म्हणजे गोपाळ गोडसेची पत्नी तू ? नथुरामची भावजय ?'

'होय !'

'काय अरिष्ट !' असे अण्णा स्वतःशीच बोलले आणि लगेच त्यांचे डोळे पाझरू लागले ! पाठोपाठ त्यांना हुंदके आले. रडू अनावर झाले.

सिंधूला तेथे उभे राहणे अवघड वाटू लागले. दोन-तीन मिनिटे थांबून ती म्हणाली, 'येऊ मी ?'

'थांब,' म्हणून त्यांनी हातानेच खूण केली. मिनिटभरात त्यांनी आपला दुःखावेग आवरला. डोळे पुसले. घोगऱ्या आवाजात ते म्हणाले, 'तू हे काम का करतेस ?'

'अहो, प्रपंच आहे; मुली आहेत मला दोन. मुंबईला यांना म्हणजे गोपाळला भेटायलाही जावे लागते.'

खुंटीवरच्या कोटातून अण्णांनी वीस रुपये काढले. म्हणाले, 'तू काम करू नकोस. मी तुला प्रत्येक महिन्याला पैसे देत जाईन.'

'मला तसे पैसे नकोत. निदान आज तरी ! मी सुशिक्षित आहे, त्यापेक्षाही सुसंस्कृत आहे. प्रसंगी शारीरिक कष्टांनी, प्रसंगी बुद्धीच्या श्रमांनी स्वतःच्या पायावर उभे राहण्याची माझी क्षमता आहे, पडेल त्या प्रसंगात उभे राहता आले नाही तर माझ्या शिक्षणाचा उपयोग काय ? शारीरिक श्रमाचे काम म्हणजे हीनपणा आणि बुद्धीच्या श्रमाचे काम म्हणजे श्रेष्ठपणा अशी माझी धारणा नाही.'

अण्णांनी स्वतःला सांभाळून घेतले. ते म्हणाले, 'मी तुला तसे पैसे देत नाही; माझ्या काही न्यायप्रविष्ट कागदांच्या प्रती करायच्या आहेत. त्या तू करून दे. नाहीतरी मी कोणाला तरी ते काम देणारच !'

'मी आनंदाने काम करीन, आणि चांगले करीन !' सिंधूने सांगितले.

'मला तो विश्वास आहे.' ते गृहस्थ म्हणाले, 'पण तू उद्यापासून हे धुण्याचे काम करू नको.'

'का बरे ? आपल्याच शब्दात, आपल्याकडे नाही तर कोठे तरी मी ते काम करणारच ना ? आत्याबाईंना आता बरे वाटू लागले आहे. त्यांना माझ्या थोडक्याशा सहवासानेच उल्हास वाटतो असे त्या म्हणतात. आणखी पंधरा दिवस मी येईन. तेवढ्यात त्यांना बरे वाटेल आणि मग मी येणार नाही.'

आता मोलकरीण म्हणून नव्हे तर घरच्यापैकी एक म्हणून सिंधू त्या घरात मानली जाऊ लागली.

नोकरीसाठी सिंधू काही संस्थांकडे गेली होती. काही ठिकाणी तिची चाचणीपरीक्षा आधी घेतली जाई. तिला नेहमी उत्तम यश येई. निर्णय घेणारे अधिकारी वेगळे असत. नाव गोडसे, त्यात गोपाळची पत्नी, म्हणून तिला नकार दिला जाई.

एका संस्थेचे वरिष्ठ अधिकारी सहानुभूत होते. चाचणीनंतर त्यांनी सिंधूला भेटीला बोलावले. भेटीत पहिलेच वाक्य ते बोलले. 'आपण माहेरचे नाव लावा आणि लगेच कामाला लागा.'

सिंधूने सांगितले, 'आपल्या सूचनेतील सहानुभूतीसाठी मी आपली आभारी आहे. मी गोडसे म्हणून उभी राहण्यासाठी लग्न केले आहे. गोडसे म्हणूनच मी उभी राहणार आहे. मी पडले तरीही गोडसे म्हणूनच पडेन. माझ्या नावाने आपल्या संस्थेवर काही आक्षेप येईल असे आपणास वाटत आहे असे दिसते. संस्था अबाधित राहू दे. आपल्या सदिच्छांसाठी पुन्हा आभार ! येते मी. नमस्कार.'

एका दिवाळीत सिंधूच्या नावाने एक पत्र आले. उघडून पाहिले तो त्यात पंचवीस रुपये आणि एक पत्र होते. ते पत्र त्या वरिष्ठ अधिकाऱ्याचे होते. त्यांनी वरील प्रसंगाची आठवण दिली होती. सिंधूला सहाय्य करू शकले नाहीत यासाठी त्यांनी खेद व्यक्त केला होता. 'आपण गोडसे म्हणून भाऊबीजेनिमित्त पंचवीस रुपये मी वैयक्तिकरित्या आपणास धाडीत आहे. त्याचा स्वीकार व्हावा.' असा त्यांनी समारोप केला होता.

गांधी हत्येच्या कटाचा आरोप ज्यांच्यावर ठेवला जाणार होता त्यांना न्यायसहाय्य मिळावे म्हणून एक समिती उभी राहिली. निधी गोळा करून विधितज्ज्ञांची योजना करावी असा समितीचा संकल्प होता, कै. ल. ब. भोपटकर, कै. जमनादास मेहता, कै. रामभाऊ मंडलिक, कै. ज. स. करंदीकर, श्री. ग. वि. केतकर, श्री. ज. श्री. टिळक आदि मंडळींनी या निधीचा पुरस्कार केला होता.

बचावपक्षाच्या वकिलांची व्यवस्था या निधीतून झाली. जवळजवळ एक लाख रुपयांची उलाढाल झाली. श्री. ग. वि. केतकर यांनी एकदा या निधीचा उल्लेख करताना सांगितले होते की, हाच एक निधी असा होता की लोकांनी दिलेल्या द्रव्याची पावतीही अपेक्षिली नाही.

काही वेळ आगंतुकपणे मोठेपणा घेण्याचा काही लोकांकडून प्रयत्न होतो. अशा प्रयत्नात अवलंबिताना त्रासच होतो. सिंधूच्या संबंधात अशा प्रकारच्या काही घटना घडत होत्या. एक घटना अशी झाली होती :

निधी न्यायसहाय्यासाठी म्हणून उभा केला जात होता. आरोपी किती केले जाणार

आहेत याची त्यावेळी नेमकी कल्पना नव्हती. न्यायसहाय्याचे वृत्त कळावे म्हणून सिंधू एकदा केसरी कार्यालयात गेली. तात्या म्हणजे ज. स. करंदीकर बाहेर पडत होते. सिंधूला बघून ते थांबले. त्यांनी विचारले, 'सिंधू पातळं फाटली आहेत का ! घ्यायची आहेत का ?'

प्रश्न अगदीच अनपेक्षित होता. तिचे पातळ बापरातले असले तरी फाटलेले नव्हते. ते तिला ठाऊक होते. तिने विचारले, 'कुणी सांगितले ?'

'आत्ताच निधीच्या संबंधित मंडळींची बैठक झाली. कोणी तरी ठराव आणला होता की तुला आणि तुझ्या सासूबाईंना पातळं घेण्यासाठी निधीतून चाळीस रुपये द्यावेत.'

सिंधूला आश्चर्य वाटले, 'निर्णय काय घेतला गेला ?'

'निर्णय घेतलेला नाही; पुढच्या बैठकीत ठरेल.'

सिंधू म्हणाली, 'असे पहा, अद्याप तीन महिनेही झाले नाहीत. इतक्यात पातळं फाटून पातळासाठीच याचना करण्याची वेळ आलेली नाही. आपल्यासारख्यांच्या घरात मोजकीच दोन पातळं नसतात आणि आमची पुरुषमंडळी काही आमची पातळं घेऊन दिल्लीला गेली नाहीत !'

तात्या मनमोकळे हसले ! मग म्हणाले, 'हे बघ तुझी नड असेल तर संकोच करू नकोस.'

सिंधूने सांगितले, 'तात्या, मला तुमच्याकडे किंवा निधीच्या कोणत्याही संबंधित व्यक्तीकडे जायला मध्यस्थ का लागेल ? परस्पर कोणी असला ठराव आणला तर मात्र आपण निर्णय घेण्यापूर्वी मला निरोप पाठवून विचारीत जा; नाहीतर व्हायचं असं की, न्यायसहाय्याच्या नावानं उभा होणारा निधी आरोपींना न्यायसहाय्य मिळण्याआधीच पातळ होऊन जायचा ! कारण जे आरोपी असतील त्यांच्याशी संबंधित आम्ही दोनच स्त्रिया नाही !'

सामाजिक निधी त्या निधीच्या हेतूशी एकनिष्ठ असला पाहिजे हे तत्त्वच सिंधूने आपल्या बोलण्यातून सूचित केले होते. तात्यांना या गोष्टीचे फार कौतुक वाटले. एका गंभीर प्रसंगात ही मुलगी उभी आहे आणि इतके असूनही जाता जाता श्लेष आणि श्लेषातून विनोद निर्माण करण्याइतकी तल्लख आणि अल्लड आहे याचे तर त्यांना विशेष आश्चर्य वाटले. निधी आणि न्यायसहाय्य यासंबंधी त्या दोघांचे आणखी काही बोलणे झाले आणि ती भेट संपली.

स्वतंत्र उद्योग उभा करण्याचे सिंधूने ठरविले. उद्योगशाळेसाठी आणि राहण्यासाठी जागा पाहिली. उद्योग चालू केला. असला अवघड व्यवसाय कोण्या स्त्रीने स्वतंत्रपणे केल्याचे उदाहरण नव्हते. त्यामुळे पुष्कळदा तिचा तेजोभंग होत असे. पण हा उद्योग काही पुरुषवर्गाचे एकस्व किंवा Monopoly नव्हे हे तिने थोड्याच दिवसांत दाखवून दिले. 'प्रताप उद्योगालय'चे काम निकृष्ट प्रतीचे नसते याचा त्या क्षेत्रातील लोकांनी अनुभव घेतला.

स्वार्थी सहानुभूती दाखविण्याची काही लोकांची पद्धत असे. 'आपल्याकडे बघून हे

काम आपणास देत आहे म्हणून ते अमूक भावात करून द्या.' असा आग्रह केला जाई. स्वत:च्या कर्तृत्वावर आणि कामाच्या प्रतीवर सिंधूचा विश्वास होता. तिला सांगावे लागे, 'माझ्याकडे बघण्याचे कारण नाही; कामाच्या प्रतीचा आपणास विश्वास वाटत असेल आणि भावही इतरांपेक्षा अधिक नसतील तर तर हा व्यवहार करा, कामात दोष राहील तर तो सुधारून देण्यास किंवा वेळी सर्व हानी सोसण्यास मी बांधलेली आहे.'

कधी कधी कोण्या संस्थेसाठी 'प्रताप'ने विनालाभ कामे केली. काही संस्थांसाठी विनामूल्य कामेही करून दिली.

जवळपासच्या एका गांधीस्मारक संस्थेने आठशे रुपयांचे एक काम देऊ केले. ही सार्वजनिक संस्था असल्याने आपण विनामूल्य काम करून द्यावे, म्हणजेच भेट म्हणून ते काम द्यावे, अमुक संस्थेसाठी आपण अशी भेट दिली आहे, अशी त्या चालकांनी विनंती केली.

सिंधूने सांगितले, 'आपण उल्लेखिलेली ती संस्था कशीतरी उभी आहे. तिच्याजवळ पैशाचे तसे पाठबळ नाही. आपल्या संस्थेची तशी स्थिती नाही आणि त्यातून आपला आग्रह असेल तर एका अटीवर मी विनामूल्य काम करून देईन.'

'कोणती अट ?

'हुतात्मा पंडित नथुराम गोडसे आणि नाना आपटे यांच्या स्मरणार्थ भेट' अशी अक्षरे मी त्यावर लावीन सिंधूने सांगितले.

चालक म्हणाले, 'असे कसे शक्य आहे ? आपण त्यांच्या कृत्याची प्रशंसा करीत आहात.'

सिंधू म्हणाली, 'कृत्यामागील भावनेची प्रशंसा असते. त्यांनी अवैध कृत्य केले म्हणून त्यांना न्यायोचित मृत्यूदंड मिळाला, पण त्यांनी काही अराष्ट्रीय केले असा त्यांच्यावर आरोप नव्हता. अराष्ट्रीय कृत्यामागील भावनेचा गौरव दोषार्ह आहे. जितकी आपली संस्था सार्वजनिक आहे तितकाच त्यांचा मृत्यूही सार्वजनिक होता हे आपण जाणताच आणि आपल्या माहितीसाठी सांगते, नथुरामने स्वत: फाशीपूर्वी एका राष्ट्रीय, सार्वजनिक उत्सवासाठी दिलेली १०१ रुपयांची भेट शासनाधिष्ठित व्यक्तींनी स्वीकारली आहे. आपण विनामूल्य काम मागत आहात, आपल्याजवळ पैसे असूनही मागत आहात, माझ्या या उपकरणातून अवाप स्वत:चा चरितार्थ धड चालविण्याइतकीही प्राप्ती होत नाही हे आपण बघत आहात, म्हणून हा अटीचा प्रश्न आला.'

'म्हणजे काम टाळण्यासाठी म्हणा ना !'

'चुकता आपण ! पैसे द्या आणि अटीचा प्रश्न नाही. कामे स्वीकाण्यासाठीच मी उद्योग उघडला आहे.'

'अट मान्य केली तर काम केव्हा थाल ?'

'चार दिवसांनंतर आपण सांगाल त्या दिवशी.'

'आपली अट आम्ही मंडळापुढे ठेवतो आणि कळवितो.' असे म्हणून ते निघून गेले.

दोन दिवसांनी ते परत आले. 'आपणाकडेच आम्हाला काम द्यायचे आहे असे मंडळाने सांगितले आहे, पण पैसे चुकते करून,' ते म्हणाले, त्यांचे काम 'प्रताप'ने ठरलेल्या दिवशी पूर्ण करून दिले.

आसपासच्या आणखी एक दोन गांधीस्मारक संस्थांचेही काम 'प्रताप'ने केले आहे. त्या त्या चालकांनी संकुचित दृष्टी ठेवली नव्हती. शासकीय संस्थांनीही भेदभाव न करता 'प्रताप' ला कामे दिली.

व्यवसायाच्या यशाला त्या व्यक्तीचे कर्तृत्व कारणीभूत होते. पण तो एक घटक असतो. तेवढा पुरा पडत नाही. त्या कर्तृत्वाला वाव मिळणे इतर गोष्टींवर अवलंबते. समाजातील व्यक्ती एकमेकांच्या सहानुभूतीनेच उभ्या असतात. सिंधूचा उद्योग उभा राहू शकला याचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे तिच्या उद्योगाला मिळालेले प्रामाणिक प्रोत्साहन. अशा प्रामाणिक सहानुभूत व्यक्तींमुळेच तिच्या कर्तृत्वाला वाव मिळाला यात तिळमात्र अतिशयोक्ती नाही.

तफकीर गल्लीत राहण्याच्या जागेचा परिसर चांगला नव्हता. दुसरीकडे जागा मिळत नव्हती, म्हणजे जागा कोठे कोठे होत्या पण त्यासाठी लागणारे द्रव्य नव्हते. श्री. भाऊराव अभ्यंकर (न. गो. अभ्यंकर) यांचे जंगली महाराज रस्त्यावर घर होते. त्या घरावर एक मजला बांधला जात होता. सिंधूने शब्द टाकला आणि भाऊरावांनी आपल्या घरात सिंधूला राहण्यास बोलावले.

श्री. भाऊरावांच्या पत्नीची-वहिनींची आणि सिंधूची मैत्री होती. सान्निध्याने ती मित्रता घनिष्ट झाली. उद्योगालय आणि घर सांभाळण्याचा दुहेरी भार सिंधूवर होता. तिच्यावरील प्रसंगाची जाणीव ठेवून भाऊरावांनी सिंधूला सहाय्य दिले. अभ्यंकर पती-पत्नी सिंधूला आपली मुलगी मानतात.

माझ्या सुटकेसाठी सिंधू शासनाधिष्ठित व्यक्तींच्या गाठीभेटी घेत असे. माननीय यशवंतराव चव्हाण तेव्हा मुंबई राज्याचे मुख्यमंत्री होते. बंधाची वर्तणूक सर्व प्रकारे चांगली आहे असे मोकळेपणे सांगितले जाई, सुटेकच्या प्रश्नाची मात्र टाळाटाळ केली जाई. सिंधूने एका भेटीत यशवंतरावांना सांगितले. 'आपण उमाबाईसारखी माझी अवस्था करणार आहात असे दिसते. उद्या आपल्या सीमेवर आक्रमण झाले तर लढाईला द्यायला मजजवळ मुलगा नाही...'

थोरल्या बाजीरावांचे सरदार खंडेराव दाभाडे लढाईत मारले गेले होते. एका स्वारीवर

जाताना खंडेरावांची पत्नी उमाबाई हिच्याकडे वाटेत बाजीराव थांबले होते. निरोप घेताना बाईंच्या डोळ्यांत अश्रू आले. बाजीरावांनी सांत्वन केले. 'उमाबाई, झाल्या गोष्टीला उपाय नाही ! मन कठोर केले पाहिजे.'

उमाबाई म्हणाली होती, 'श्रीमंत ! आपण समक्ष माझ्या सांत्वनाला आला आहात ! पतिनिधनाचे दुःख मी काय करीत बसू ? आज आपण स्वारीला निघाला आहात. आपल्याबरोबर द्यायला मला मुलगा नाही ! दुःख त्याचे वाटते, श्रीमंत !'

इतिहासातील ही कथा ठाऊक असलेले यशवंतराव सिंधूच्या उद्‌गारांनी हेलावले होते. पण यशवंतराव व्यक्तिशः हेलावले होते; त्यांच्यातील मुख्यमंत्री नव्हे !

गोव्याचा मुक्तिसंग्राम चालू होता. अनेक तरुणांनी त्यात भाग घेतला होता. सात जणांच्या एका तुकडीत नारायण दत्तात्रय कुलकर्णी हा एक होता.

सिंधू राहत असे त्याच्या शेजारच्या बिऱ्हाडात नारायणाचे-नानाचे-येणे जाणे आणि पुष्कळदा राहणे असे. उद्योगासाठी तो वर्ध्याहून पुण्याला येऊन राहिला होता. कष्टाळू, मनमिळाऊ आणि अघळपघळ बऱ्हाडी स्वभावाच्या या मुलाला एक रुखरुख होती. त्याचे संगोपन होताना आईचे वात्सल्य त्याला मिळाले नव्हते. संवेदनाक्षम मनाला असली जाणीव काही प्रसंगी, विशेषतः अती सुखाच्या किंवा अती दुःखाच्या प्रसंगी तीव्रतेने जाणवते. 'स्वामी तिन्ही जगांचा आईविना भिकारी' होऊन जातो; सामान्यांची काय कथा !

सिंधूने वात्सल्याची पूर्ती केली. नाना आमच्या घरात आज अदत्तक मुलगा म्हणून आहे.

वर्ष १९६१ च्या आरंभी माझी बदली नाशिक बंदिगृहातून औरंगाबाद बंदिगृहात केली गेली. सर्वोच्च न्यायालयात माझे एक आवेदन होते. त्याच्या संबंधात मला काही परामर्श हवा होता. काही पुस्तकेही मागवायची होती. त्यासाठी सिंधूच्या दोनतीन भेटी आवश्यक होत्या.

अनुज्ञा मिळविण्यासाठी सिंधू कारागृह विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना (Inspector General of Prisons) भेटली: 'गोडसे आमचे नियम पाळीत नाहीत. ते नियमाच्या विरुद्ध वर्तन करतात, आमच्याशी भांडतात. म्हणून आम्ही त्यांना औरंगाबादला धाडले आहे; त्यांचे असेच वर्तन राहिले तर आम्हाला याहूनही कडक उपाय योजावे लागतील; त्यांना कोणीतरी समजावण्यास पाहिजे. अधिक भेटी आम्हाला देता येणार नाहीत.' असा विनंतीला प्रतिसाद मिळाला.

अधिकाऱ्याचे बोलणे ऐकून घेतल्यावर सिंधू बोलली. आम्ही एकाच घरचे घटक असल्याने माझ्यावर झालेला अन्याय तिच्यावरही परिणाम करणारा होता. तिला त्याची जाणीव होती. ती म्हणाली, 'अत्यंत आदर्श वागणुकीची व्यक्ती (exemplary

character) म्हणून मंत्र्यापासून खालच्या अधिकाऱ्यापर्यंत जिचा उल्लेख करीत होते ती व्यक्ती एकाएकी अशी का वागू लागली याचा मानसशास्त्रदृष्ट्या विचार केला का ? काहीतरी फसवणुकीची जाणीव झाल्यावाचून कोणी व्यक्तीआपल्या वर्तनात असे परिवर्तन करणार नाही. आपण छळणूक केल्यावर ती व्यक्ती ताळ्यावर येईल, या आपल्या कल्पनेने ती व्यक्ती बिघडलेली आहे असे आपण गृहीत धरता. छळ केल्याने अन्यायाचे निराकरण होत नाही; न बिघडलेली व्यक्ती छलबलाने सुधारत नाही. भूषण म्हणा किंवा दूषण म्हणा, काही घटनांनी बेडे होऊन १९४८ मध्ये ज्यांनी आपले शिर तळहातावर घेतले, त्यांना ते शिर तळहातावर राहिले काय किंवा खाली पडले काय याची भीती नसते हे आपण ध्यानात ठेवावे. छळातून मुक्तता मिळविण्यासाठी स्वत:चे जीवन कसे संपवायचे हे बंद्याला चांगले कळते हे आपण जाणताच. छळासाठी बंदी आपल्या स्वाधीन आणि बंद्याला उपदेश मी करायचा हा व्यवहार नव्हे. आपली अशी अपेक्षा असेल तर मला भेटी नकोत.'

अधिकाऱ्यांचा स्वर खाली आला होता. त्या भेटीचा वृत्तान्त सिंधूने मला तिच्या दि. १-४-१९६२ च्या पत्रातून कळविला होता.

खरोखरीच माझी फसवणूक झालेली होती. बंदिगृहाच्या अधीक्षकांच्या आज्ञेने आणि दिग्दर्शनाने बंदी वागत असतो. त्या प्रमाणात बंद्याला शिक्षेतून सूट मिळत असते. त्याच्या पदरात पडलेली सूट त्याच्या वर्तनाचे निदर्शक असते. अमुक काम तातडीने पुरे करायचे आहे, वरकाम (over time) करून ते पुरे करा. त्यासाठी वेगळी सूट देईन, असे अधीक्षक शासनाच्या वतीने आश्वासन देतात. बंद्याने तसे काम केले तर अधीक्षक ते तोंडी आश्वासन लेखी करून ठेवतात आणि प्रत्येक तीन किंवा सहा महिन्यांनी शासनाचे संमोदन (sanction) घेतात. ती नोंद संमोदित झाली की, त्याचा अर्थ असा होतो की, बंद्याच्या सुटकेचा दिवस त्या मिळालेल्या दिवसांच्या प्रमाणात अलीकडे आला. वरकाम करणारा बंदी आणि वरकाम न करणारा बंदी यात अंतर पडत जाते ते असे.

तीच गोष्ट रक्तदानाच्या सुट्टीची. बंदिगृहातून मी सात वेळा रक्तदान केले होते. प्रत्येक रक्तदानासाठी दहा दिवस सूट किंवा पाच रुपये दिले जात. दोन वेळा मी प्रतिदान म्हणून सूट मागितली. रक्त दिल्यावर अधिकाऱ्यांनी ते आश्वासन लेखी केले. योग्य वेळी शासनाकडून ते संमोदित करून घेतले.रक्त न देणारापेक्षा माझी सुटका बीस दिवस अलीकडे आली. इतर पाच वेळचे रक्तदान मी 'दान' या स्वरूपात केले होते म्हणजेच यासाठी सूट किंवा पैसे काहीच नको असे मी लिहून दिले होते.

पण अधीक्षकांनी आपले बीस दिवसांचे लेखी आश्वासनही खरे केले नाही. ते शासनाकडे बोट दाखवीत. 'माझ्याकरवी बंद्याची फसवणूक का करता ?' असे त्यांनी शासनाला कधी विचारले नाही. 'बंद्याला मी शासनाच्या वतीने लेखी आश्वासन दिले आहे आणि

शासनाने ते संमोदित केले आहे.' हे कधी त्यांनी शासनाच्या निदर्शनाला आणले नाही. रक्तदानाचा बंदिगृहाच्या कोणत्याही नियमाशी संबंध नाही अशी शासनाला कधी त्यांनी जाणीव करून दिली नाही. जन्मठेप शिक्षेतील 'जन्म' या शब्दावर आणि म्हणून बंद्याच्या जन्मावर लोंबकळत राहण्याचा आपला अधिकार आहे असे ते मानू लागले. न्यायतः जीवित संपविण्यासाठी म्हणून ज्या बंद्याला अधीक्षकांच्या स्वाधीन दिले गेले असेल त्या बंद्याकडून काम, बरकाम किंवा रक्त घेत नाहीत, त्यास सुट्टीचे खोटे आमिष दाखवीत नाहीत, ही तुलना अधिकाऱ्यांनी लक्षात घेतली नाही. माझे जीवित संपविण्याचे होते, तर मला तसे आधी सांगायचे होते. रक्तदानापुरते म्हणायचे तर प्रसंग पडताच ज्याने पाच वेळा विनाप्रतिदान रक्त दिले, त्याने आणखी दोन वेळाही ते विना-प्रतिदान दिले असते, पण झाले असे की 'तुला दहा दिवस लवकर सोडतो, एकदा रक्त दे. आणखी दहा दिवस लवकर सोडतो. पुन्हा एकदा रक्त दे.' या अधिकृत आश्वासनावर विश्वास ठेवून मी रक्त दिले. रक्त घेतले गेले हे खरे; पदरात सूट टाकली गेली ती खोटी.

गांधीहत्या अभियोगातील एका दंडिताला आम्ही अधिकाराचा बापर करून कसे हातोहात बनवले, त्याची कशी गंमत केली, तो विवश आहे हे बघून त्याच्यावर कसा प्रतिशोध उगवला, दंडाचा बापर न करता त्याच्याशी कसा क्रूरपणा केला असे शासनाला भूषण बाटो हवे तर; प्रामाणिकपणा या संज्ञेची यथार्थ व्याख्या करणारे लोक या वर्तणुकीला शासनाच्या शुभ्र वस्त्रावरील एका असत्याचा रक्तकलंक असे नाव देतील. सूट परत द्या अशी सूचना मला केली गेली होती. मी ती मानली नाही. मिळालेली सूट कधीच विकण्याची वस्तू नसते. मला तितके दिवस लवकर सुटका हवी होती. मला माझ्या प्रेतावर ठेवण्यास पैसे नको होते. शासनाने अशी सूचना करणेच मूळात लज्जास्पद होते. जनतेने कराच्या रूपाने दिलेले पैसे आमच्याजवळ आहेत, पण प्रामाणिकपणा आणि माणुसकी यांचा आमच्याजवळ खडखडाट झाला आहे हेच शासनाने त्या सूचनेतून सांगितले होते.

विश्वास ठेवण्यास अपात्र ठरलेल्या अधीक्षकांसंबंधी ममत्व बाटणे शक्य नव्हते, वर्षानुवर्षे मनःपूर्वक रात्रंदिवस काम करून मी थकलो होतो. अनुभवली तेवढी फसवणूक पुरे झाली या स्थितीत मी गेलो होतो.

मी उपस्थित केलेले सर्व बाद लेखी असत. त्या त्या कार्यालयात ते अभिलेख सापडतील. माझ्या विधानातील सत्यासत्यता पडताळून बघता येईल. अधिकाऱ्यांजवळ समर्पक उत्तरेच नसत. समर्पक उत्तर देता आले नाही की शक्तीचा बापर अशी मला बागणूक मिळे; माझ्यावरील अन्याय सर्वोच्च न्यायालयाला पटविण्याचा माझा प्रयत्न अविरतपणे चालू होता. कारणे काहीही असोत, त्यात मला यश मिळत नव्हते. मनाची उभारी क्षीण होऊ लागली होती. शरीराबरही त्याचा परिणाम होणे अटळ होते. शेवटच्या वर्षात मी मृत्यूच्या फार जवळ

होतो. दोन प्रसंग असे होते की मी मृत्यूला खेटून उभा होतो. मृत्यूने मला किंवा मी मृत्यूला मिठी मारली नाही हे स्पष्टच आहे. तोही विधिलिखिताचाच भाग असतो !

औरंगाबादला गेल्यावर सात-आठ महिन्यांनी मी आजारी पडलो, मला उचलून बंदिगृहातील रुग्णालयात नेले होते. उपचारांसाठी मला तेथेच ठेवले.

'प्रकृती चिंताजनक आहे; भेटीला या.' अशी सूचना नियमाप्रमाणे अधिकाऱ्यांनी घरी धाडली. घरच्या मंडळींनी निघण्याची सिद्धता केली. निघण्यापूर्वी प्रकृतीचे वृत्त कळावे म्हणून औरंगाबादला बंदिगृहाला दूरध्वनी केला होता. 'मुलांना घेऊन आणि आणखी कोणी येणार असतील तर त्यांना घेऊन भेटीला या; लगेच भेट मिळेल, प्रकृतीची तशी चिंता करू नका,' असे उत्तर दूरध्वनीवरून मिळाले होते.

मी सुटल्यावर सिंधू एक दिवस सांगत होती, 'दूरध्वनीचे श्रावित्र-रिसीव्हर-खाली ठेवलं आणि मी मटकन खाली बसले. माझ्या हातापायातील शक्तीच नाहीशी झाली. 'प्रकृतीची चिंता करू नका' या वाक्यातील पोकळपणा मला बोलणाऱ्याच्या शब्दांतूनच कळून आला. इतक्या दूर लवकरात लवकर कसे पोहचता येईल याची चिंता वाटली. ज्याच्यासाठी म्हणून मी इतक्या यातना सहन केल्या, कोणत्याही प्रसंगी दैन्य दिसू दिले नाही तो तू मला मिळतोस की नाही या कल्पनेने मन कावरेबावरे झाले. दैव अधिक क्रूर की शासन अधिक क्रूर या तुलनेत मी शासनाला अग्रक्रम दिला.'

सिंधू सांगत होती 'अधूनमधून मी मुलांना घेऊन बोलपटाला जात असे. एका बोलपटातील 'तू असता तर कधि नयनांनी अश्रु ढाळले नसते झरझर' या करुणेने ओथंबलेल्या गीताशी मी एकरूप होऊन गेले होते. मी ते गीत गुणगुणत राही. तू जिवंत असूनही मला दूर होतास. तुझी माझी भेट होणे नियतीपेक्षाही शासनावर अवलंबून होते असे मला वाटले.

'मी भाविक आहे हे तुला ठाऊक आहे. हसू नकोस ! मी देवाला नवस बोलले होते ! माझा गोपाळ मला मिळू दे !'

'पाच एक मिनिटे तरी मी तशी बसून राहिले अम्मेन. मेंदूत मावणार नाहीत इतक्या विचारांची दाटी झाल्यामुळेच कदाचित मेंदूचे दार बंद झाले होते. मनाला शून्यता आली होती.'

'त्या शून्यतेतूनच एक विचार तीव्रतेने मेंदूपर्यंत पोहोचला, 'आपल्याला निघायचे आहे !' पाठोपाठ वाटले, असे स्वस्थ बसून चालायचे नाही. त्यावेळी जवळ पैसे नव्हते. दहा-बीस रुपयेच होते, हे ध्यानात आले. मला वाटते, मेंदूलाही पंक्ती पद्धत-क्यू-आवडते. एका पाठोपाठ एक विचार त्याला पचतो.'

'आपल्याला निघायचे आहे या विचारासरशीच मला शक्ती आली. मी उभी राहिले. दोन तास हिंडले, चारशे रुपये गोळा केले. कामकऱ्यांना उचल देण्यासाठी अडीचशे रुपये

ठेवून दिले. दीडशे बरोबर घेतले. एक वाहन मिळविले. नगरमार्गे पाच तासात आम्ही बंदिगृहाच्या दाराशी पोहोचलो.

रुग्णालयात आमची भेट झाली. मी जिवंत आहे, बोलतो आहे, माणसे ओळखू शकतो एवढ्याच दर्शनाने सिंधूच्या मनावरील पुष्कळ ताण उणावला होता.

भेटीची वेळ संपली, घरची माणसे परत गेली.

वीस-पंचवीस दिवसांनी माझ्या आजाराला उतार पडू लागला. दि. २-११-१९६२ या दिवशी मी सिंधूला प्रकृतीसंबंधी लिहिले होते.

'प्रकृती आता सुधारत आहे, अद्याप पंधरा-वीस दिवस येथे रुग्णालयात राहावे लागेल असे वाटते. मला स्वतःलाच बरे वाटू लागले की, मलाच येथे राहावेसे वाटणार नाही, रोग बरा झाला आहे. राहिली आहे अशक्तता.'

'ही अशक्तता स्थिर आहे. ती मनावर झालेल्या आघातांचा परिणाम आहे. जुलै १९५७ पासून आतापर्यंत तेरा पराजय मी घेतले. सध्याच्या आवेदनातही यश येईल असे समजण्याचे कारण नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या १९६१ मधील विधिस्वरूप निर्णयानंतर मी बिघडलो आहे अशी कल्पना करून घेऊन मी सुधारावे म्हणून जे उपचार झाले त्यांचाही परिणाम मनावर झाला. अशा मनावर झालेल्या आणि केलेल्या आघातांचा परिणाम म्हणून आलेली अशक्तता मला साखरेत घोळले तरीही जाणार नाही आणि फटके मारले तरीही जाणार नाही. अन्याय करणे किंवा टिकून धरणे यासाठी सर्वच दक्ष. न्याय करणे किंवा मिळवून देणे मात्र कोणाचेच कर्तव्य नाही, अशी कर्तव्यदक्षतेची व्याख्या माझ्या वाटचाला आली असल्याने मनाच्या द्वारे शरीरावरील परिणाम स्थिर आहे. न्यायाला मी वंचित झालो आहे, त्यामुळे मनाला उत्साह नाही. अशक्तता जावी म्हणून शरीरावर केलेले उपचार वरवरचे ठरतात. त्यामुळेच तुला मागच्या पत्रात लिहिल्याप्रमाणे, दुबळ्या शरीरावर कुठल्याही रोगजंतूंनी-बॅक्टिरियाने आक्रमण करावे आणि भुई भुसभुशीत आहेसे पाहाताच तीत घर करावे हा निसर्गनियमच आहे. जीवो जीवस्य जीवनम् ! आपण दुसऱ्या जीवावर जगतो तर तिसरे जीव आपल्यावर जगतात असे आहे निसर्गाचे चक्र !

तोच अशक्ततेचा धागा पुढे ओढून मी त्या पत्रात लिहिले होते, 'आणि राष्ट्राचे तरी काय चालते ? शस्त्रांनी आपण दुबळे होतो हे पाहूनच ना चीन पुढे सरसावला ? नुकतेच धर्मयुद्ध झाले क्युबामध्ये ! एकही गोळी उडाली नाही की एकही हत्या झाली नाही. क्यूबात असलेली उत्क्षेपण पटले (मिसाईल बेस) काढता की नाही अशी अंतिमोक्ती (ultimatum) अमेरिकेने उच्चारली ती शस्त्रबळामुळेच. विश्वशांतीच्या उच्च तत्त्वांचे मूल्य रशियाने ओळखले म्हणून नव्हे तर अमेरिकेचा शब्द शस्त्राच्या धारेवरून उच्चारला गेला आहे आणि न जाणो आपण त्याच्याकडे दुर्लक्ष केले तर आपण अमेरिकेचा संहार करण्याचे व्यूह रचण्याच्या आधी

आपलाच संहार व्हायचा या जाणिवेमुळेच रशियाने आपली उत्क्षेपण पटले संयुक्त राष्ट्रसंघाच्या मार्गदर्शनाखाली काढून घेण्याचे मान्य केले ! आपली म्हणजे भारताची शस्त्रशक्ती निदान तुल्यबळ आहे याची जाणीव चीनला असती तर तो पुढे येता ना ! पण आपली शस्त्रशक्ती तुल्यबळ नव्हतीच तिथे चीनला जाणीव कशी होईल !

'यू-टू या चरयानाचे उदाहरण लक्षात घेण्यासारखे आहे. रशियाच्या भूमीवरून अमेरिका विमानातून हेरगिरी करीत नव्हती काय ? त्यासाठी निषेधलेख रशिया धाडीत नव्हता काय ? पण आपले बळ थोडे लंगडे पडते याची रशियाला जाणीव होती. भौतिक शास्त्रात रशियाने प्रगती केली. एकामागून एक अवकाशयाने अंतराळात भिरकावून त्याने अंतराळाचा ठाव घेतला. उपलब्ध अस्त्रांच्या टप्प्यापलीकडून जाणाऱ्या यानांचा भेद करता यावा, छेद करता यावा या दृष्टीने आपल्या विज्ञानाची दिशा वळविली.

'त्यात रशियाला यश आले. तेरा मैल उंचीवरून जाणारे अमेरिकेचे चरयान रशियाने खाली आणले. पॉवर्सला वस्तुस्थिती बोलायला लावली. आपला दोष निदर्शनाला आला आहे हे पाहताच अमेरिकेला तो मान्य करणे भागच होते. शंभर निषेधलेखांनी जे झाले नसते ते एका आविष्काराने-संशोधनाने-साध्य झाले. याचे नाव धर्मनीती ! एका गालावर तोंडात बसल्यावर दुसरा गाल पुढे करणे हा शांतीचा अर्धा अर्थ. आपली शक्तीच इतकी वाढवा की, गालावर तोंडात मारण्याची प्रथमतः कोणाची छातीच होऊन नये ही झाली शांतीची पूर्ण संगती. अशी पाहिजेत आंतरराष्ट्रीय धोरणे-असो; दुबळ्या प्रकृतीवरून ओघ असा वळला !'

चीनने हिन्दुस्थानच्या सीमेवर धडक मारली होती. राष्ट्रीयत्वाची भावना जागृत असलेल्या प्रत्येकाला हा व्यक्तिशः आपल्यावर आघात आहे असे वाटले. रक्षणासाठी सहाय्य करण्याची लोकांची स्पर्धा लागली होती. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री माननीय यशवंतराव चव्हाण यांना सिंधूने एक पत्र दि. ८-१२-१९६२ या दिवशी लिहिले होते. शासनाने माझ्यावर कठोर अन्याय केला असला तरी या वेळी देशरक्षण महत्त्वाचे होते याची सिंधूला जाणीव होती. व्यक्तिगत दुःख विसरून एकोप्याची आवश्यकता होती हे सांगण्यास सिंधूला तिच्यावर झालेले संस्कारच पुरे होते. तिचे पत्र असे आहे-

'सादर प्रणाम वि.

चीनने भारताशी युद्ध सुरू केले आणि एक मोठा धक्का दिला. त्या दिवसापासून मन बेचैन आहे. काय करावे हे निश्चित ठरत नाही.

मध्यंतरी नभोवाणीवर पंतप्रधान नेहरू यांनी सर्व भारतीयांना आवाहन करून सध्याच्या आणीबाणीच्या परिस्थितीत सहाय्य करण्यासंबंधी सूचना केली.

याप्रसंगी प्रत्येक भारतीयाचे आपापल्या शक्यतेप्रमाणे काही कर्तव्य निश्चित आहे. अनेक मार्ग आहेत. त्यापैकी द्रव्यदान, श्रमदान, रक्तदान, प्राणदान हे मार्ग सुस्पष्ट दिसत

आहेत.

आमच्या कुटुंबात आम्ही पाच माणसे. पैकी माझे पती श्री. गोपाळ गोडसे हे गांधीवध अभियोगातील बंदी असून सध्या औरंगाबाद कारागृहात जन्मठेप भोगीत आहेत. त्यांनीही आपणाकडे आघाडीवर जाण्याची सिद्धता असल्याचे आवेदन केले आहे. १९४० ते १९४४ ते युद्धसेवेत होतेच. त्यांना तशी संधी देणे न देणे हे आपल्या इच्छेवर अवलंबून आहे. युद्ध थांबल्यावर पुन्हा कारागृहात ठेवण्यास प्रत्यवाय नाही. परंतु जो या भारतभूमीचा पुत्र आहे त्याला मातेच्या सेवेपासून परावृत्त करण्याचे व सेवेस वंचित करण्याचे काहीच कारण नाही.

माझा मानलेला मुलगा नाना ! त्याचीही वेळ पडल्यास नि संधी प्राप्त झाल्यास आघाडीवर जाण्यापासून तो कोणत्याही प्रकारचे श्रमदान करण्यापर्यंत तयारी आहे. रक्तदान नि द्रव्यदान हे आमच्या कक्षेतील आहे ते आम्ही करीत आहोतच. माझेसंबंधी-

मला पुणे सोडून सध्यातरी कुठे जाता येईल असे वाटत नाही. कारखाना चालविण्याची जबाबदारी असल्याने वर लिहिल्याप्रमाणे पती व पुत्र देशासाठी देऊ शकते. मला माझ्या कक्षेतील उत्पादनाचा भाग उचलता येईल Steel structures आम्ही कोणत्याही प्रकारची करतो. आजपर्यंत एन.डी.ए., इ.एम.ई., एच. ई. फॅक्टरी, पेनिसिलीन फॅक्टरी इत्यादी ठिकाणची कामे आम्ही केली आहेत. युद्धासाठी आवश्यक असलेले लोखंडी उत्पादन एक पैसाही नफा न अपेक्षिता मी करू इच्छिते. उत्पादनकार्यावर जे कोणी आपले प्रतिनिधी असतील त्यांनी तशी संधी दिल्यास मी आपल्या ठराविक सूचनेप्रमाणे ठराविक मुदतीत तो कामाचा भाग उचलू शकेन, नि माझ्या मातृभूमीची सेवा करू शकेन.

माझे पती कारागृहात आधासिलेल्या मुदतीपेक्षा अधिक दोन वर्षे ठेवले गेले आहेत. तो आपला अंतर्गत वाद आहे.

परस्पर निरोधे तु वयं पंच च ते शतम्
अन्येभ्यश्च विरोधे तु वयं पंचाधिकं शतम् ।

हाच शब्द मी आपणाला देते. तेव्हा कोणत्याही प्रकारे आपण मला, माझे पती श्री. गोपाळ व मुलगा नाना यांस संधी द्यावी ही विनंती. कळावे.

आपली

सौ. सिंधू गोडसे

माझे एक आवेदन सर्वोच्च न्यायालयापुढे विचारासाठी होते. त्यासाठी मला दिल्ली बंदिगृहात ठेवले होते. कारण माझे निवेदन मलाच मांडण्याचे होते. त्या अवधीत दिनांक १३-१०-१९६४ या दिवशी सुटका झाली. दिनांक २४-११-१९६४ या दिवशी मला भारत संरक्षण विधीखाली अटक केली गेली. एक वर्ष सहा दिवस बंदिवास भोगून मी दिनांक ३०-११-१९६५ या दिवशी सुटले. त्या वेळीही माझे एक आवेदन मुंबईच्या उच्च न्यायालयात विचारासाठी होते.

जवळ जवळ सतरा वर्षांनंतर मला चाळीस दिवस मुक्तता मिळाली होती. मुक्त जगाशी मला समरस होता येईना. पाय जुळवून येता येईना. स्वतःचे निरीक्षण करण्यास मला नंतरच्या बंदिवासात उसंत मिळाली. दिनांक २१-१२-१९६४ या दिवशी सिंधूला लिहिलेल्या पत्रात मी लिहिले होते -

'कौटुंबिक दायित्व हा केन्द्रबिंदू धरून त्याभोवती माझ्या उद्योगांची योजना मला आखायची होती. सतरा वर्षांनी मी बाहेरचे जग बघत होतो. नवनवीन क्षेत्रे आणि त्यातील उद्योग यांचा माझा परिचय असेल तर तो थोड्या फार वाचनानेच. प्रत्यक्ष जग जेव्हा मी बघितले तेव्हा, लहान मुलाला मोठमोठ्या खेळण्याच्या दुकानात नेऊन ठेवावे आणि निवड खेळणी म्हणून सांगावे, याने ते मूल जसे भांबावेल तसा मी भांबावलो होतो. वाचनाने गोष्टींचा परिचय असल्याने बुजलो नाही एवढेच. या वेगवान जगात मी पाय टाकीत आहे. १७ वर्षांचा अभ्यास भरून काढायचा आहे, यात मी कुठे उभा राहू शकेन, कुटुंबाचे दायित्व सांभाळून कसा उभा राहू शकेन याही विचारांनी मला काहीशी अगतिकता आणली होती आणि वृत्तीवर संथपणा आला होता.'

मी शिक्षा भोगीत असताना सिंधूने किती धीराने दिवस काढले यासंबंधी मी ऐकत असे. तिच्या कर्तृत्वाचे फळ मी त्या चाळीस दिवसांत बघितले होते. ते बघून मला काय वाटले याचे विवरण करण्यास मला नंतरचा बंदिवास उपयोगी पडला. त्याच पत्रात मी तिला लिहिलेले होते.

'सतरा वर्षांपूर्वी मी तुला सोडून आलो तेव्हा मला वाटते, वेतनाचे उरलेले पाच-पन्नास रुपये तुझ्याजवळ असतील तेवढेच. मुंबईच्या तीन-चार चकरांमध्ये त्या पैशांची परिसमाप्ती झालेली असणार, त्यानंतर तुझ्या उदरभरणासाठी, मुलींच्या व्यवस्थेसाठी तुझी सोय काय आहे मी तुला विचारावे असा प्रसंगही तू माझ्यावर आणू दिला नाहीस. अनेक खडतर प्रसंगातून तू निभावलीस. शून्यातून विश्व उभे करावे तसे, तुटपुंज्या अनुभवाच्या बळावर, श्रम ओतून, रात्रंदिवस घाम गाळून, तू एक व्यवसाय उभा केलास. माझी सुटका व्हावी, मला एक स्वतःचा म्हणून उद्योग असावा हे ध्येय मनात बाळगून तू काबाडकष्ट केलेस. वास्तविक जे माझे दायित्व ते तू पार पाडलेस. तू केलेला लोकसंग्रह मी पाहिला. मुसलमान काय, पारशी काय, महार काय, ब्राह्मण काय, सर्वांमधे स्वतःभोवती एक आदराचे बलय तू निर्माण केलेस. या परिचक्रात सापडल्यावर माझा काय अन् तुझा काय, निवाराच उद्ध्वस्त झाला होता. मी सुटून आलो. जवळ जवळ सतरा वर्षांनी आलो, आणि खरोखरीच, जेथे सत्तेने राहावे असा निवारा तुझ्या कर्तृत्वाचे मूर्त रूप म्हणून मी डोळ्यांनी पाहिला आणि अनुभविला. ज्याला मी माझा म्हणावे अशा व्यवसायाचे माझ्या हातांनी औपचारिक उद्घाटन केले. त्याचे अधिकृत नामकरण केले. यंत्राच्या भागाभागात तुझे श्रम साकार झालेले मी पाहिले. रांगणेकरांच्या 'तुझेच सारे वैभव येथे, मी नावाच धनी' या ओळीचा लक्षणेने नव्हे

तर प्रत्यक्षातच मला प्रत्यय आला. मात्र त्यात मला न्यूनता न वाटता तुझ्या कर्तृत्वाचा विलक्षण अभिमान वाटला. परिस्थितीवश, माझा म्हणून जो भार, तो मला उचलण्याची संधी मिळाली नाही आणि तू तो व्यवस्थित उचललास.'

मनुष्य परतंत्र असला तरी तो जिणं जगत आहे म्हटल्यावर त्याच्या भावभावना जागृत असतात. बंधनामुळे भावनांच्या आविष्काराला वाव मिळत नाही; त्यामुळे तर भावना अधिक तीव्र होतात. बंदिवासातील खडतरपणा, तेथे कराव्या लागणाऱ्या श्रमात, तेथील शिस्तीत किंवा तेथील बंद होण्यात जितका जाणवत असेल, त्यापेक्षा कितीतरी अधिक प्रमाणात तो भावनांचा कोंडमारा होण्यात म्हणजेच त्यांच्या पूर्तीची शक्यता नसण्यात जाणवतो.

बंदिवास हा काही एक सार्वजनीक किंवा राजकीय विचारधारेच्या प्रेरणेचा परिपाक असला तरी तशी प्रेरणा त्या व्यक्तींच्या भावनेतील एक भाग असतो. इतर भावना काही काळ झाकाळल्या असल्या तरी त्यांचे अस्तित्व असतेच. तारुण्य ही जशी काही विचारधारेचे वेड शमविण्याची अवस्था असते तशीच ती सुखाचे मनोराज्य करण्याचीही असते. आपले घर अमुक पद्धतीचे असावे अशी चित्रे जशी एखादी विवाहोत्सुक किंवा नवपरिणीत युवती रंगवीत असेल तसेच त्या अवस्थेतील तरुणही आपल्या ऐहिक सुखाची स्वप्ने मनात रंगवतो.

राजकीय पार्श्वभूमीवरही मनुष्यहत्या या स्वरूपाचे कोणाचे ध्येय असू शकत नाही. अशा घटना राष्ट्राच्या जीवनात, तसेच त्या व्यक्तींच्या जीवनातही आकस्मिकपणे उद्भवतात. गांधीहत्येशी माझा संबंधही माझ्या जीवनातील एक आपघात होता.

तीन वर्षांच्या वैवाहिक जीवनानंतर मी आकस्मिकपणे आणि अपरिहार्यतेने कुटुंबापासून दूर फेकला गेलो होतो. तोवर दोन मुली झालेल्या होत्या. अपत्यांचे संगोपन आणि शिक्षण अमुक प्रकारे आपण करूया अशी मनोराज्ये मी करीत असे. कोणत्याही अपेक्षेने नव्हे तर वात्सल्याच्या भावनेने मनुष्य अशा इच्छा बागवीत असतो. त्या इच्छांच्या पूर्तीतून मिळणारे सुख हेच त्याचे प्रतिदान असते. माझ्या बंदिवासामुळे ज्या भावना दाबल्या गेल्या त्यात ही वात्सल्याची भावनाही होती.

बिरंगुळा म्हणून माझ्या पत्रातून मी माझ्या भावनांना वाट देत असे. शक्य होई त्या वेळी सिंधू मुलींना भेटीला आणीत असे. आपल्याला वडील आहेत, पण ते आपल्याजवळ नाहीत, आपल्याला त्यांच्याजवळ हट्ट करता येत नाही, हट्ट पुरवून घेण्याची आपल्याला शक्यता नाही, काही यशाचे कौतुक आपल्याला वडिलांकडून प्रत्यक्षपणे मिळत नाही अशी रुखरुख मुलींच्या मनाला असे. पण त्याचबरोबर, काही निःस्वार्थ हेतूसाठी ते बंदीत आहेत याचीही त्या लहान वयात त्यांना जाणीव असे.

लिहू-वाचू लागल्यापासून मुलींना पत्रलेखनाची सवय झाली. त्यांना झेपण्याजोगे

असे नवीन विषय मी त्यांना लिहित असे. काही ओळी कवितेत रचण्याचा मला छंद होता. वाढदिवसाच्या किंवा सणाच्या प्रसंगाने किंवा कधी परीक्षेत यश मिळविले या निमित्ताने मी त्यांना चार ओळी धाडीत असे. विद्युल्लता एका परीक्षेत उत्तीर्ण झाल्याबद्दल मी तिला एकदा लिहिले होते,

साध्य गाठता एक, आपले साध्य वाढवावे,
जाता तेथे नये थांबता, पुन्हा पुढे जावे
एकामागुनि एक फेकुनी उंच उंच याने
गगनाला गवसणी घातली आज मानवाने । (मे १९६१)

असिलतेचे एकदा पत्र आले होते. तिच्या वाढदिवसाला मी घरी नाही याचा खेद तिने पत्रातून कळविला होता. वाढदिवसानिमित्त मी तिला खालील चार ओळी धाडल्या होत्या.

विधियोगाने तुला राहिली अपुरी जी साऊली
ती नेमे कष्टते करावा पूर्ण तुझी माऊली ।
दिसो न लोकां दैन्य, वा दिसो नये न्यूनता जनी
अध्ययनी हो पुढे यास्तवे, तू सुगुणाची खनी । (मार्च १९६०)

मुलींचे शिक्षण चाललेले मला कळत होते. पण मला बघता येत नव्हते. मी सुटून आलो. एक मुलगी परिचारिकेचे शिक्षण घेत असलेली तर दुसरी वास्तुविद्येच्या (architecture च्या) दुसऱ्या वर्षाला असलेली मी पाहिली. त्यांच्या आईने त्यांची येथवर प्रगती केली होती. तिच्या कर्तृत्वाने मला स्वाभाविकपणे कौतुक वाटले.

कुटुंबात नव्याने समाविष्ट झालेला नाना नियमित पत्रे पाठवी, कधी कधी भेटी घेई आणि न्यायालयीन कामात त्याच्या परीने मला सहाय्य देई. सुटकेसाठीच ते प्रयत्न चालले असल्याने त्या श्रमाचे मोल मला फार वाटत असे.

कोंडलेल्या भावनांतील आणखी एक भावना पतिपत्नीतील संबंधाची होती. प्रावकाश किंवा 'फर्लो' नावाने ओळखली जाणारी सुट्टी या राज्यात १९४९ पासून बंद्यांना दिली जाई. प्रत्येक दोन वर्षांनी पंधरा दिवस सुट्टी असते, शांतताभंग होण्याचा संभव आहे या कारणाने माझी सुट्टी एकदा नाकारली गेली. पुन्हा आवेदन केल्यावर नकार देण्यास काही कारण सापडले नाही, म्हणून गांधीहत्या अभियोगातील बंदी म्हणून सुट्टी नाही, हे कारण दिले गेले. ते कारणच असे होते की त्याचे निराकरण कधीच शक्य नव्हते. त्यामुळे शासनाने माझी विनंती करण्याचा अधिकारही हिरावून घेतला. शासनाने असा हेतुपुरस्सर आकस धरल्याने मला केव्हाही सुट्टी दिली गेली नाही.

एकीकडे सुटकेसाठी प्रयत्न करीत राहणे आणि दुसरीकडे पत्रातून एकमेकांना धीर

देणे, आशा देणे, हे आम्ही करीत असू. पत्राचा उपयोग दबलेल्या भावनांच्या प्रकटीकरणासाठीही मी करीत असे. एका दिवाळीत मी सिंधूला लिहिले होते :

संदेशांनी परस्परांच्या सजवू दीपावली ।
परिस्थितीशी जुळते घेऊ, सहू उन सावली ।
विधिबंधाने चिरप्रीति जी हृदयी सामावली ।
तेवत राहो तीच आपली दीपांची आवली । (१९६३)

पण हा केवळ विरंगुळा होता. अतृप्त भावनांना तृप्तीची जाणीव कधीच होत नसे. सततच्या कोंडमाऱ्याने मनावर एक भार येत असे. लिखाणाला धार येई. तशी धार आली की, हा सुधारला नाही, याचा आणखी कोंडमारा करायला पाहिजे अशी अधिकारीवर्ग सोयीस्कर समजूत करून घेई. व्यक्तिशः अधिकारी चांगले असत. पण शासनाने गांधीजींच्या नावाने जे प्रतिशोधात्मक धोरण ठेवले आहे त्या धोरणाला अनुसरून वागणे आपले कर्तव्य आहे, duty आहे अशी त्यांची धारणा असे. अशा प्रकारचा सतत छळवाद अमानुष आहे हे सांगण्याचे धाडस कोणी करीत नसे. न जाणो, तसे स्पष्ट आणि खरे बोलले तर आपण गांधीहत्येत सहभागी होतो असा आपल्यावर आरोप यायचा, अशी भीती त्यांना वाटत असेल.

यदृच्छेने लादलेले हे दूरत्वाचे दिवस यदृच्छेने संपणार होते. ते संपले आणि म्हणून इतिहास या स्वरूपात ही ओझरत्या व्यक्तिचित्राची एक छटा रेखाटता आली.

卐 卐

दहा

अटक ते लाल किल्ला

'तू अटकेत आहेस' असे शब्द आरक्षी अधिकाऱ्यांनी उच्चारले मात्र आणि माझ्या मनावरील दडपण नाहीसे झाले. विरोधाभास दिसतो खरा. वास्तविक अटक केल्याने मनावर दडपण येते. पण वस्तुस्थिती अशी होती की अटक होईपर्यंतच्या काळातच मी मनावर एवढा ताण बागवीत होतो की, अटक झाल्याने मनावर येणारा ताण मला तेव्हा त्या पहिल्या दडपणातून सुटकेसारखा वाटला.

गांधीहत्येनंतर सहा दिवसांनी मला पकडले होते. आपला त्या घटनेशी असलेला काही ना काही संबंध विधिरक्षकांच्या लक्षात आला नसला तरी गांधीहत्येनंतर तो उघडा पडण्यास वेळ लागणार नाही, अटक केव्हाही होऊ शकेल, हा माझा सरळ सरळ आडाखा होता. आपणच स्वतः आरक्षीविभागाकडे जाऊन माझा अमुक अमुक संबंध आहे असे सांगावे अशी मात्र मला इच्छा होत नव्हती. समजा आरक्षींना काही समजले नसेल तर आपण होऊन आपला जीव आतापासूनच संकटात कशाला घाला, हाच विचार प्रबळ होता. प्रत्यक्ष अटक होईपर्यंत दोनदा आरक्षी आणि मी समोरासमोर आलो होतो. तेवढ्या काळात, माझा गांधीहत्या या घटनेशी काही संबंध आहे काय हे बघण्यासाठी ते मला चाचपत होते, तर त्यांना काही समजले आहे काय, समजले असल्यास कितपत याचा मी अदमास घेत होतो. आरक्षींना काही समजले नव्हते आणि मी मोकळा होतो.

कोठेतरी दूर निघून जावे, भूमिगत रहावे, अशा योजना माझ्या मनात नव्हत्या. आपण आरक्षींच्या हाती सापडू नये किंवा त्यांच्याशी दोन हात करावेत असलाही विचार माझ्या मनात नव्हता. एकीकडे मी नित्य व्यवहार करीत होतो तर दुसरीकडे आरक्षी आत्ता येऊन खांद्यावर हात ठेवतील की थोड्या वेळाने, या चिंतेत मन चूर होते. मनावरचे ते दडपण विलक्षण होते.

३० जानेवारी १९४८ चा दिवस इतर दिवसांप्रमाणेच उजाडला होता. पण तो तितक्याच सहजपणे मावळला मात्र नव्हता. मावळता मावळता त्या दिवसाने एक प्रचंड हालचाल मागे सोडली होती. गांधीजींची हत्या केली गेल्याचे वृत्त नभोवाणीने संध्याकाळी साडेपाच किंवा सहाच्या आसपास प्रसृत केले होते. त्या वृत्तात गंभीरता होती. वाढत्या अंधाराबरोबर त्या वृत्तातील गंभीरता दाट होऊ लागली होती.

माझे बिऱ्हाड या दिवसांत खडकीला होते. तीन-चार दिवसांपूर्वीच माझी पत्नी मुलींना घेऊन माहेरी गेलेली होती. तिच्या चुलत बहिणीचे तेथे लग्न होते. माझे आईवडील शुक्रवार पेठेतील श्री. साठे यांच्या वाड्यात राहत असत. थोरले बंधू दत्तात्रय एरंडवण्याच्या 'उषम इंजिनिअरिंग' उद्योगशाळेच्या नवीन वास्तूत राहण्यास गेले होते. संध्याकाळी मी पुण्यास येत असे आणि सकाळी कामावर जात असे.

त्या दिवशी संध्याकाळी पुण्याला निघता निघताच मी गांधीहत्येचे वृत्त नभोवाणीवर ऐकले. वरकरणी मी त्या वार्तेविषयी विशेष कुतूहल दाखविले नाही. पण माझ्या मनात मात्र खळबळ झाली होती.

प्रांजलपणे, गांधीजींविषयी प्रीती हे माझ्या मनातील खळबळीचे कारण नव्हते. गांधीहत्या कोणी केली हे अद्याप प्रकट केले नव्हते. नथुराम गांधीहत्या करण्यास प्रवृत्त झाला आहे याची कल्पना होती. मन स्वार्थी असते. किंवा स्वतःला अनुकूल तेवढा विचार करण्याची मनाला सवय असते. नथुरामचे नाव गांधीहत्येच्या संबंधात आले नाही तर बरे असे माझ्या मनाला वाटे. जणू आणखी कोणाचे तरी प्राण नथुरामच्या प्राणापेक्षा अल्प मोलाचे होते ! पण माझे स्वतःला अनुकूल असणारे वाटणे फार काळ टिकत नसे. यामुळे मनाला अस्वस्थता आली होती.

गांधीजींच्या हत्येशी माझा कोणत्याही प्रकारे संबंध असणे माझ्यासारख्याच्या दैनंदिन परिपाठाच्या बाहेरची गोष्ट होती. पण परिसराचे परिणाम कळत नकळत मनावर होत असतात. माझ्यापुरते तरी, गांधीजींविषयी माझ्या मनात कटुता निर्माण होण्यास परिसर मुख्यतः कारण झाला.

स्वतंत्र विचार करून राजकीय मते बनवावीत अशी माझ्या बुद्धीची वाढ तेव्हा झालेली नव्हती. लहानपणापासून राष्ट्रीयत्व, स्वराज्य लढा, आंदोलन, क्रांती, संघटन इत्यादी संज्ञांचे

संस्कार मनावर झाले होते. चरितार्थाचे साधन म्हणून काहीतरी करायचे, कोठेतरी सेवावृत्ती पत्करायची मग सैनिकी क्षेत्र का नको, या विचाराने मी सेना-विभागात कर्मचारी म्हणून लागलो. दुसरे महायुद्ध तेव्हा नुकतेच चालू झालेले होते. युद्धकाळात तीन वर्षे परदेशात-इराण-आघाडीवर जाण्याचा योग आला. परदेशात जाण्यापूर्वी माझी सावरकरांशी भेट झाली होती. रासबिहारींचे नाव मी यावेळी प्रथमच त्यांच्या तोंडून ऐकले होते आणि ते जपानमध्ये कार्य करीत असतात असे सावरकर म्हणाले होते. अतिपूर्वेकडे चालू असलेल्या रासबिहारी बोस आणि देशगौरव सुभाषबाबूंच्या हालचालींचे वृत्त ब्रिटिशांच्या अभेद्य पहाऱ्यातूनही अधूनमधून आमच्यापर्यंत झिरपत येई. मध्यपूर्वेमध्ये तशा काही हालचाली आहेत काय इकडे आम्हा सैनिकांचे लक्ष असे. याचे कारण, सैनिकांची ब्रिटिशांशी पूर्वीची एकनिष्ठा राहिलेली नव्हती. सुभाषबाबूंच्या प्रयत्नांना पूरक प्रयत्न याही आघाडीवर व्हावेत असे आम्हाला वाटे. पण तेवढा भार अंगावर घेण्याइतका स्वतंत्र प्रज्ञेचा नेता या भागात नव्हता. एप्रिल १९४४ मध्ये मी हिन्दुस्थानात परत आलो. दोन महिन्यांनी खडकी येथे नेमणूक झाली. अतिपूर्वेकडील युद्ध अद्याप थांबले नव्हते. मला अतिपूर्वेकडील आघाडीवर धाडावे अशी मी अधिकाऱ्यांना विनंती केली. पण या विनंतीचा विचार होईपर्यंत महायुद्धाचा शेवटचा अंकही जवळ जवळ संपला होता. पुढचा काळ मी खडकीतच काम करीत असे.

मी ज्या विभागात काम करी त्या ठिकाणी पंजाब-प्रांतीय मोठ्या संख्येने असत. १९४३-४७ या वर्षांत फाळणीच्या दिशेने नेत्यांची पावले पडत होती. बंगाल, पंजाब, वायव्य सरसीमा प्रांत इत्यादी ठिकाणी दंग्यांचा धुमाकूळ होता. आपल्या प्रांताचे काय होणार, आपल्या घरादारांचे काय होणार याची विवंचना पंजाबवासीयांना लागून राहिली होती. आपल्या पुढाऱ्यांवर विश्वास ठेवून काहींनी आपल्या घरच्या मंडळींना लिहिले होते, 'तुम्ही तेथेच राहा, हे वादळ थोड्याच दिवसांत शांत होईल. आपले नेते पुढची दृष्टी असल्याबाचून तसा उपदेश लोकांना करणार नाहीत.'

पण कसचे काय अन् कसचे काय ? घरच्या माणसांचा संहार झाल्याचे किंवा त्यांना छळबळाने हुसकून लावल्याचे वृत्त ऐकण्याची त्या कुटुंबांवर पाळी येई. त्या त्या घरातून पुरुषांच्या शिव्याशापांचा आणि स्त्रियांच्या तळतळाटांचा वर्षाव पुढाऱ्यांवर होऊ लागे. हे पुढारीच त्या खाईत सामान्य लोकांप्रमाणे का राहून दाखवीत नाहीत, आमच्या कुटुंबियांवर हे एकात्मतेचे प्रयोग का चालू आहेत असा त्यांच्या तळतळाटाचा विषय असे.

कोणाच्या घरी काही दुःखद घटनांनी भरलेले पत्र यावे, किंवा कधी संहाराच्या तडाख्यातून बाचलेला कोणी जीव तेथपर्यंत येऊन पोहोचावा. त्या पत्राने किंवा त्या माणसाने पंजाबात घडलेल्या आणि घडत असलेल्या गोष्टी कानावर घालताच गोबऱ्यांच्या धुराने घर भरून जावे तसे त्या घराचे वातावरण आक्रंदनाने आणि आक्रोशाने भरून जाई. मध्येच

चमकणाऱ्या एखाद्या ज्वालेप्रमाणे संतापाचेही दर्शन अधून मधून होत असे. चाळीस-पन्नास कुटुंबांच्या त्या वस्तीतील पाच-सात घरातून मी असो प्रकार त्या दिवसात पाहिले. पुढे असा आक्रोश चालू असलेला घरातून जाताना, घरातील व्यक्तीची ओळख असूनही आत जाऊन विचारपूस करण्यास मी धजावत नसे. ठिगळ पासोडीला लावणे शक्य असते, आभाळाला नव्हे !

स्वराज्य मिळाल्याचा आनंद या कुटुंबांना उपभोगता आला नाही. अपघाताने पाय तुटलेल्या माणसाला 'अरे तुझा पाय तुटला आहे असे समजूच नकोस म्हणजे तुला दुःख होणार नाही,' असा उपदेश करणे अवास्तव असते. तसे सांगण्याने त्याचा पाय तुटला आहे ही वस्तुस्थिती काही झाकत नाही. धर्माधर्मातील भेदभाव सांधला गेला आहे असे समजा किंवा अहिंसेने स्वराज्य मिळाले असे माना, या अट्टाहासाने प्रचारलेल्या विधानाशी फाळणीने विद्ध झालेले ते लोक सहमत होऊ शकले नाहीत. जे जिवंतपणी हिन्दुस्थानात आले होते, त्यांनी आपल्या बांधवांचे रक्तमांस तुडवीत वाटचाल केली होती. अहिंसा, धर्माधर्मातील एकता, अशा शब्दसमुच्चयांचा त्यांना ज्ञात असलेला अर्थ आणि ते अनुभवीत असलेली परिस्थिती यात फार मोठे अंतर होते.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही भोवतालच्या घरांतून अधून मधून रडारड चालू राही. सभोवार चालणाऱ्या त्या आक्रंदनाने माझ्या मनावर फार तीव्र परिणाम केला. सहस्रावधी निरपराध लोक मारले जात आहेत, आपण मात्र थंडपणे जगत आहोत, हा विचार मनाला स्वस्थ बसू देत नसे. महिन्याच्या पहिल्या दिवशी वेतन उचलणे, पोटापाण्याची व्यवस्था करणे आणि अपत्यांची वाढ मोजीत राहणे एवढीच का आपल्या जीवनाची इतिकर्तव्यता ? हा प्रश्न मनाचा ठाव घेई. संसाराव्यतिरिक्त आणखीही काही उत्तरदायित्वाची जाणीव असणे ही मनुष्यत्वाची खूण या व्याख्येशी आपली शिवाशिवही असू नये काय ? दुसऱ्यांचा प्रांत फाडला गेला आहे; आपला सुरक्षित आहे. दुसऱ्यांच्या घरात आक्रंदन माजले आहे. आपल्या घरी तर नाही ना ? या थंड विचारसरणीत आपली राष्ट्रीय एकात्मता, परस्पर बंधुभाव या भावना मेल्या आहेत असे मला वाटे आणि मन खिन्नतेने भरून जाई. राष्ट्राची आणखी हानी होऊ द्यायची नाही, अहिंसेच्या नावाने राष्ट्राच्या अंगात भीरुता मुरू द्यायची नाही, कारण सामान्यजन भीरुतेलाच अहिंसा हे नाव देऊन आत्मवंचना करत अशी माझी धारणा झाली. आपल्या विनाशाला गांधीजी प्रामुख्याने उत्तरदायी आहेत असा त्या वेळच्या परिस्थितीच्या अलोकनाने आणि भोवतालच्या प्रत्यक्ष दिसणाऱ्या घटनांवरून मी निष्कर्ष काढला. पुढे गांधीजींच्या हत्येशी माझा संबंध जोडला गेला, ते वस्तुस्थितीशी विसंवादी नव्हते.

परदुःखाचा एवढा विचार करूनही, नथुरामचा संबंध त्या घटनेशी नसावा असे वाटण्याचे कारण नथुरामवर ओढवणाऱ्या आपत्तीची कल्पना ! मला वाटते, मनुष्याचा स्वभावच

तसा असतो. आणखी एका उदाहरणाने मला त्याचे प्रत्यंतर आले.

नथुरामचे नाव प्रकट झाले नव्हते तोवर लोक तर्क करीत होते. हा आपल्यापैकी कोणी नसेल ना या तर्काने निर्वासित चिंतातुर झाले होते. नंतर नथुरामचे नाव प्रकट झाले. तो पंजाबी नाही, बंगाली नाही, सिंधी नाही, निर्वासित नाही हेही कळले. त्या लोकांनी सुटकेचा निःश्वास सोडला. आपल्या तळतळाटाला कोठून का होईना, मूर्तरूप आले असे पाहून आणि आपल्यावर आणखी संकट येण्याची भीती नाही हे पाहून त्यांनी आनंद व्यक्त केला.

अमृतसर, अंबाला, कलकत्ता, कानपूर इत्यादी शहरांतून आनंद व्यक्त केला गेला. त्यासाठी पंडित नेहरूंनी गांधीहत्येनंतर आठ-दहा दिवसांनी विषाद प्रकट केला आणि ही अतिशय लज्जास्पद गोष्ट आहे अशी त्या आनंदाच्या अभिव्यक्तीवर टीका केली. पंडितजींना वाटणारा विषाद स्वाभाविक होता. त्यांची गांधीजींवर भक्ती होती. वास्तविक हिन्दू मन असे क्रूर नसते. पण इतिहासाबरून आपणास काही सुसंगत तात्पर्य काढावयाचे झाले तर फाळणीमुळे घराघरांची झालेली चिरफाड आणि गांधीजींचा त्यानंतरही चालू असलेला दुराग्रह यायोगे पीडित लोक गांधीजींविषयी अतिशय कटू भावना बाळगीत, असे आपणास म्हणावे लागेल.

सेनाविभागात शोकप्रदर्शन झाले ते बरबरचे होते असे मला दिसले. जे चार-पाच दिवस मी मोकळा होतो तेवढ्या अवधीत सैनिक शिबिरातील लोक मला भेटत असत. दिवसा ते लोक दंडाला शोकचिन्ह बांधीत. ब्रिटिशांच्या राजवटीतील खिस्ती पद्धतीची ती प्रथा होती. रात्री ते लोक आपापली शोकचिन्हे खिशात कोंबीत आणि दिवसा अनिच्छेने दाबून ठेवलेल्या आपल्या भावनांना वाट देत. काश्मीरमध्ये लढणाऱ्या आपल्या सैन्याचा आता अवसानघात होणार नाही असे त्यांच्या बोलण्यात येत असे.

जे घडले ते सांगताना गांधीजींविषयी अनादर व्यक्त करण्याचा माझा हेतू नाही हे वाचकांनी कृपया ध्यानात ठेवावे. आज आपण शस्त्रशक्तीला शस्त्रशक्तीने उत्तर देतो. कोणी आक्रमणाचा व्यूह रचला तर प्रसंगी त्या आक्रमकांच्या भूमीवर जाऊन रण माजवतो. बिनाशस्त्र नव्हे तर शस्त्र धारण करून. त्या शस्त्राने आक्रमकांचा निःपात करणाऱ्यांची गौरव-गाथा आपण गातो. आक्रमकाला युद्धभूमीवर खंदे चारण्यास प्रवृत्त करणाऱ्या वीर लालबहादूर शास्त्रींचे चित्र आपण घरोघरी लावतो. या आपल्या कृतीतून आपण गांधीजींचा अनादर करतो असे कोणी मानले तर ते अवास्तव ठरेल. तसेच त्या वेळी घडलेल्या घटना यथातथ्य बघताना त्यायोगे गांधीजींचा अनादर होतो असे म्हणणेही अवास्तव ठरेल. त्या पराभवाची ऐतिहासिक मीमांसा वाचताना आपण इतिहासकाराला दोषी धरत नाही.

तासाभरात मी आईवडिलांच्या घरी येऊन पोहोचलो होतो. कोणी येत-जात होते.

कधी मी बाहेर जात होतो. रात्री दहा-साडेदहापर्यंत घरीही चर्चा चालू होती. मग निजानीज होऊ लागली होती.

मी बाहेरच्या खोलीत होतो. मनात वाटणाऱ्या अस्वस्थतेने मी उठलो आणि बाहेर पडलो. कोठे कोठे कानोसा घेतला. नथुराम हे नाव प्रकट झाल्याचे बोलले जात होते. आता तर्क करण्यास अवसर राहिला नव्हता.

माझ्या मनाला मी समजावले. स्वतःचे स्वतःच्या जीवावर सर्वांत अधिक प्रेम असते. तरीही स्वतःच्या प्राणापलीकडे काही निष्ठा मनुष्य मनात बागवीत असतो. स्वतः होऊन सती जाण्याची सिद्धता ठेवलेली स्त्री अंग भाजेल या भयाने बावरत नाही. तिच्या निष्ठेवरील तिची एकाग्रता तिला शारीरिक वेदनांच्या पलीकडे नेते. विचार करून काही दुःसाहस करणारा मनुष्य परिणामांची सिद्धता आधी करतो. दैवाचे फासे कसे पडतात हे सांगता येत नाही. नथुरामच्या जागी मी असतो तर ?

माझा विचार मी त्या काल्पनिक प्रश्नावरच सोडून दिला. कल्पनेच्या शिड्या कितीही उंच न्याव्यात, त्याला अंत नसतो. माझ्या मनाची अस्वस्थता मात्र मावळू लागली होती. वस्तुस्थितीचे ज्ञान मला झाले होते हे त्याचे कारण असेल. तर्काला अवसर होता तोवर अस्वस्थता होती. तर्क करण्यास वाव राहिला नाही म्हटल्यावर अस्वस्थतेचे मूळच नाहीसे झाले.

मी घरी परतलो. आई-वडील झोपलेले होते. त्यांना मी उठवले नाही. वस्तुस्थितीचे ज्ञान अद्याप न झाल्याने तीच त्यांची शेवटची शांत झोप होती. उद्यापासून त्यांना दिवस आणि रात्र सारख्याच अवस्थेत काढावयाचे होते !

रात्रीचे मधलेच दोन-तीन तास झोप मला लागली होती, पण पुष्कळ लवकर जागा झालो होतो. आरक्षी झडतीसाठी येतील, कदाचित पकडण्यासाठी येतील अशी माझी भावना होती. त्या विचारात मी असतानाच कोणीतरी दारापर्यंत आल्याची चाहूल लागली. पहाटेचे साडेचार वाजले असतील.

मी उठलो. दार उघडले. आरक्षी नव्हते. दोन परिचित आले होते. ते आत आले. 'नथुरामचे नाव आहे, रात्री दहाच्या बेताला ते नभोवाणीवर सांगितले गेले' असे ते म्हणाले. आई-वडील जागे झाले होते. त्यांच्या कानावर ती गोष्ट गेली.

नथुरामच्या भीषण भवितव्याच्या कल्पनेने घरावर शोकछाया पसरली. ते परिचित थोडा वेळ थांबले, काही सांत्वनपर गोष्टी बोलले आणि निघून गेले. आता आई-वडिलांना सांत्वन देण्याचा, त्यांना समजावण्याचा भार माझ्याकडे आला. पण मला ती संधी मिळू शकली नाही.

दहा-पंधरा मिनिटांतच आरक्षी दल आले. त्यातील काहींनी घराला वेढा दिला.

काहीजण आत आले. त्यांनी घराची झडती घेण्यास प्रारंभ केला.

आपले कर्तव्य ते करीत होते. ते करताना त्यांनी घर उलटेपालटे केले. पण इतके असूनही दांडगाई, धिंगामस्ती, अरेरावी, उद्धटपणा, अपशब्द असला कोणताही प्रकार त्यांनी केला नाही, हे येथे सांगणे आवश्यक वाटते. का कोणास ठाऊक, त्यांना या घरासंबंधी अनुकंपा वाटत होती. या शोकमग्न घराची झडती घेण्याचा आपल्यावर प्रसंग आहे असे त्यांना वाटत होते. शासन हे यंत्र खरे, पण ते मानवी यंत्र असते. त्या त्या स्थानावरील मनुष्याच्या मनोधारणेवर परस्पर व्यवहार अवलंबतात. माझ्या वर्षोवर्षीच्या बंदिवासात मी शासकीय व्यक्तींचे वेगवेगळे स्वभाव पाहिले. ओतप्रोत माणुसकी असलेले लोकही अधूनमधून माझ्या वाट्याला येत. या झडतीच्या प्रसंगाने अधिकाऱ्यांतील माणुसकीच्या स्वभावाचा मला पहिला प्रत्यय आला.

झडती दोन-अडीच तास चालली होती. आरक्षींना कोणतेही आक्षेपार्ह साहित्य मिळाले नाही. काहीतरी न्यायला पाहिजे म्हणून कुठे विळी किंवा सुरी किंवा बत्ता किंवा पहार असल्या वस्तू कदाचित आक्षेपार्ह या व्याख्येत मोडतील असे ठरवून त्या अपहृत म्हणजे जप्त करून नेण्याचा अतिपणाही त्यांनी केला नाही.

झडती संपल्यावर आरक्षींनी मला आणि माझा धाकटा भाऊ गोविंद याला आपल्याबरोबर फरासखान्यात आरक्षींच्या मुख्य चौकीत नेले.

आम्ही जवळ जवळ तीन तास तेथे होतो. वेगवेगळेपणे आम्हाला बोलावले गेले काही प्रश्नोत्तरे झाली. प्रश्न अगदी वरवरचे होते. तुम्ही काम कुठे करता ? काम काय असते ? वेतन काय ? लग्न झाले आहे काय ? मुले आहेत काय ? तुम्ही भाऊ किती ? बहिणी किती ? आणखी कोणते राहण्याचे ठिकाण आहे काय ? नथुराम घरी केव्हा आला होता ? तो जाताना काही सांगून गेला काय ? तो दिल्लीला गेल्याचे तुम्हाला ठाऊक आहे काय ? तो कोठे जातो म्हणून सांगून गेला ? तो कपडे कोणते घेऊन गेला ? अशा स्वरूपाचे ते प्रश्न होते. गोविंदजवळ लपविण्याजोगे काहीच नव्हते आणि वरील स्वरूपाच्या प्रश्नांच्या अनुषंगाने तरी माझ्याजवळही लपवून ठेवण्याजोगे काहीच नव्हते. प्रश्नांवरून मला दिसत होते ते एक : पुण्याचे आरक्षी तरी श्रीगणेशापासून चौकशीला स्वतंत्रपणे आरंभ करीत होते. त्यांना आणखी काही माहिती किंवा विशिष्ट आदेश त्यावेळपर्यंत मिळालेला दिसत नव्हता. म्हणून चौकशीची दिशा अशी त्यांच्याजवळ नव्हती. चौकशी झाल्यावर आम्हाला बराच वेळ बसून राहावे लागले. मग आम्हाला फरासखान्यातून बाहेर सोडून दिले. तोवेळपर्यंत काही लोक फरासखान्यात आणले जात होते.

बाहेर पडल्यावर खडकीच्या घरी जाण्याची मला ओढ लागली. आरक्षी अधिकाऱ्यांना मी माझे खडकीचे राहण्याचे ठिकाण सांगितले होते त्यामुळे तेथे झडती घेण्याचा संभव होता.

अशा वेळी मी तेथे असावे असे मला वाटले. गोविंदला घरी जाण्यास सांगून मी खडकीला निघालो.

पण माझा उद्देश एवढा सरळ नव्हता. घरी काही कागदपत्रे होती. त्यात आक्षेपार्ह असे काहीच नव्हते. पण कोणत्या पत्राचा संबंध कसा जोडला जाईल याचा नेम नव्हता. संधी मिळाली तर पत्रे नाहीशी करावीत म्हणून मी घरी निघालो होतो.

घराकडे सर्व सामसूम होते. आसपासच्या बिऱ्हाडांचे नेहमीचे व्यवहार चालले होते. पण अतिशय हळू नेहमीची गडबड नाही, आरडाओरडा नाही. गोंगाट नाही, माझ्याकडे बघण्याची त्यांची दृष्टी वेगळी होती, असा मला भास होत होता. नथुराम माझा भाऊ आहे हे त्यांना तोवेळपर्यंत ठाऊक झाले होते. त्याचे माझ्याकडे येणेजाणे असे हेही त्यांना माहीत होते.

मी कोणाकडे लक्ष दिले नाही, दार उघडून सरळ घरात गेलो. आतून दार लावून घेतले. पत्रांची तार काढली, आणि आतल्या खोलीत गेलो. तारेतून पत्रे नीटपणे बाहेर काढण्यास वेळ मिळेल की नाही शंकेने जी पत्रे वरवर बघून झाली ती तारेतून मी फाडून काढली. ज्या पत्रातील कोणत्याही शब्दाचा विपर्यास करणे किंवा अर्थाला हेतू चिटकविणे शक्य होणार नाही अशी पत्रे तेवढी तारेवरच ठेवली. काढलेली पत्रे आणखी फाडण्याचे काही कारण नव्हते.

न्हाणीघरात बंब होता. पाणी भरलेले होते. उन पाण्याचे स्नान करण्याच्या निमित्ताने बंब पेटवावा आणि पत्रे जाळावीत अशी माझी योजना होती.

गोवऱ्याच्या दोन खांडांवर मी तेल ओतले, ती खांडे आणि चार काटक्या बंबात टाकल्या फाडलेले कागद बंबाजवळ नेले. एकदम सर्व कागद टाकल्याने अधिक धूर होईल म्हणून कागद थोडे थोडे टाकण्याचे ठरविले.

सर्व सिद्धता झाली आणि आयत्या वेळी काड्याची पेटी सापडेना ! त्या तीन-चार दिवसात माझे जेवण पुण्यातच होत असे. चूल पेटवण्याचा प्रसंग आला नव्हता. नेहमीच्या जागी काड्याची पेटी नव्हती. कचऱ्याच्या डब्यात पाहिले तो एक पेटी अर्धवट आ वासून पडली होती ! घरात पेटी नव्हती तर ! बाहेर जाऊन किंवा शेजारून काड्याची पेटी आणण्याचे धाडस नव्हते.

पण मला विश्वास होता. माझी पत्नी आवश्यक वस्तूंचा पुरवठा घरात ठेवीत असे. घरात पेटी असलीच पाहिजे. ती कोठे सापडेल एवढाच प्रश्न होता. मी 'संशोधन' आरंभिले. मोकळ्या जागा झाल्यावर मी डब्यामागून डबे उघडले. हळदमोहरीच्या डब्यातील बरच्या बाजूलाच मला तीन काड्याच्या पेट्या आढळल्या ! दोन बंद आणि एक फोडलेली.

पेटी हुडकण्यात मला पाच मिनिटांपेक्षा अधिक वेळ लागला नसेल. पण पत्रे नाहीशी

करण्याचे काम लवकर उरकण्याचे असल्याने त्या पाच मिनिटांच्या विलंबानेही माझ्या मनावर ताण आला होता.

मी बंबाजवळ आलो. काडी ओढणार एवढ्यात दारावर थाप आली. मी चरकलो. भ्यालो ! मन द्विधा झाले. काडी लावू की नको ? अडचण दोन्ही स्थितीत होती. अर्धवट जळालेली पत्रे सापडली की मी काहीतरी लपवण्याचा प्रयत्न केला आहे अशा संशयाला जागा राहणार ! पत्रे तशीच ठेवली तरीही ती पत्रे मी नाहीशी करण्याच्या प्रयत्नात होतो हे लक्षात येऊन पत्रांना नसते महत्त्व चिकटणार !

पण पत्रात आक्षेपार्ह काही नव्हते हा माझा विश्वास होता. पत्रे का जाळीत आहे याचे स्पष्टीकरण मला देता येईल, असे मनाशी ठरवून मी मधल्या दारापाशी आलो.

बाहेरच्या खोलीला लाकडी पट्ट्याची जाळी होती. जाळीतून बाहेरचे दिसत असे. आरक्षींचा लवाजमा दिसत नव्हता. मला धीर आला. तेवढ्यात दारावर पुन्हा एक थाप आली आणि पाठोपाठ माझे नाव हलक्या सुरात उच्चारलेले मी ऐकले. आवाज ओळखीचा वाटला.

मी दार उघडले. माझा एक पंजाबी मित्र रामनाथ उभा होता. मी त्याला आत घेतले. दार लावून घेतले.

रामनाथने औपचारिक प्रस्तावना केली नाही. त्याने योजलेले एकदम बोलण्यास आरंभ केला.

'गोपलजी तुझा भाऊ ना तो ?'

'होय.'

पाठोपाठ काही आश्चर्याचे आणि प्रशंसेचे उद्‌गार त्याने काढले. मी प्रशंसाही ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हतो. माझ्या मनावर दडपण होते. रामनाथ जितक्या लवकर बाहेर जाईल तितके मला हवे होते. मी त्याला म्हटले, 'रामनाथ, मी पुण्याला जायच्या गडबडीत आहे.'

रामनाथ समजला. म्हणाला, 'मलाही फार थांबायचे नाही. गोपालजी, पण एका कामासाठी आलो आहे.'

'वेळ थोडी चत्मारिक आहे, नाही ? यावेळी काय काम काढलेस ?' मी विचारले.

'काम असे बघ, तुझा या घटनेशी काही संबंध आहे काय ?'

'माझा काही संबंध नाही. का बरे ?' मी शक्य तितक्या निर्विकारपणे म्हटले.

'नाही, थोड्या दिवसांपूर्वी तू गावाला गेला होतास. ते काहीही असो. मी सांगतो ते नीट ऐक. मधे बोलू नकोस. मलाही वेळ नाही.' तो म्हणाला.

तो जे काय बोलणार आहे त्याला काही माझ्या दृष्टीने विशेष महत्त्व नाही अशा

कृत्रिम अविर्भावाने मी त्याला म्हटले, 'बोल.'

'तुझा संबंध असेल तर तू येथून नाहीसे व्हावेस असे मला वाटते. दिल्लीला जाणार असशील तर मी एका गृहस्थाच्या नावाची चिठ्ठी देतो. तुझ्या जेवणाची सोय तो कशीही करील; पण दिल्लीला तू राहायचे नाहीस. आसपास असंख्य निर्वासित आहेत. त्यांच्यात मिसळून राहायचे. तोंडाने मराठी शब्द उच्चारायचा नाहीस. तुला पंजाबी चांगले येते पण तेही कमीत कमी बोलायचे. कोणाला भेटीला बोलविण्यासाठी निरोप धाडायचे नाहीत, तुला निदान सहा महिने तरी असे राहिले पाहिजे. तुला निघायला अडचण पडू नये म्हणून मी दीडशे रुपये आणले आहेत. जवळ ठेव. वेळ महत्त्वाची आहे. आणखी चार-सहा तासांत तू येथून पन्नास मैल तरी दूर गेलेला असला पाहिजेस. कोणत्याही मार्गाने जा. शक्यतो नेहमीचा मार्ग टाळता आला तर चांगले. पण तो पुन्हा आपापल्या दैवाचा प्रश्न आहे.'

मी मनातून काढून टाकलेल्या विचाराला रामनाथ चालना देत होता. परंतु भूमिगतांच्या संबंधिताची छळणूक चालू होती याची मला कल्पना होती. दूर जायचे नाही असे मी ठरविले होते. या वेळीही माझे मत मी बदलले नाही.

रामनाथ माझ्याकडे एक-दृष्टीने बघत होता. अंतरंगात खोल असलेल्या सत्याचे तरंग बहुधा माझ्या चेहऱ्यावर उमटले होते.

माझा काही संबंध नाही असे स्वच्छ शब्दात सांगणे मला जमेलसे वाटेना. मी रामनाथला सांगितले, 'माझा संबंध जोडला जाणार आहे की नाही हे मला ठाऊक नाही. पण कोणत्याही परिस्थितीत मी तशा प्रकारे भूमिगत व्हायचे नाही असे ठरविले आहे.'

'इच्छा तुझी.' म्हणून रामनाथने बोलणे आटोपते घेतले. तो जाण्यासाठी उठला.

जाताना त्याने एक सूचना केली. 'तू मोकळा राहिलास तरी तीन-चार महिनेपर्यंत मला प्रत्यक्ष भेटू नकोस. मीही तुला भेटणार नाही. काल रात्री मी एकदा येऊन गेलो. घराला टाळे होते, आत्ता सहज संधी मिळेल या कल्पनेने प्रयत्न केला. भेट झाली. चांगले झाले. येतो मी.'

रामनाथ निघून गेला. मी दार लावले. बंब पेटवला. वेळोवेळी कानोसा घेत राहिलो. थोडी थोडी करून सर्व पत्रे जाळून टाकली.

दुपारपर्यंत कोणी आले नव्हते. तीननंतर मी पुण्यास जाण्यासाठी निघलो.

पाच-सहा दिवसांनी माझ्या घराची झडती झाली तेव्हा आरक्षींनी एक पत्र स्वाधीन घेतले होते. अगदी निरुपद्रवी म्हणून मी ते पत्र तारेला राहू दिले होते, त्यावेळी आरक्षींना त्या पत्रात संशयास्पद आशय आढळला तो हा की, पत्रलेखकाने शेवटी तुझा 'बंधुवर्य' (Your brotherly) असे म्हटले होते. ते अँटोनी नावाच्या माझ्या एका खिश्चन मित्राचे पत्र होते ! त्या मित्राला उगीचच चौकशीच्या सोपस्कारातून जावे लागले.

पुण्याच्या घरी पोहोचलो. गांधीहत्येमुळे लोकांचा मनःक्षोभ झाला होता. मनःक्षोभाचे काही अवशेष घरात आढळले. गांधीजींच्या नावाने घरातील वस्तू उचलून नेण्याची राजरोस संधी पुष्कळांना मिळाली, त्यांनी आपल्या कृतीचे ठसे मागे ठेवले होते. जो मनःक्षोभ झाला त्याचा अर्थ काय, त्यामागील हेतू काय, या गोष्टी महाराष्ट्रातील जाणते लोक जाणतात, पण तेव्हा गांधीजींच्या नावाने सर्व काही खपून गेले.

माझ्या आईने काहीसे उग्र रूप घेतले होते. जमावाचे अपप्रकार थोपवून धरण्यास तिच्या प्रयत्नांना यश आले होते. गोविंद जमावात सापडला होता. त्याला मारहाण झाली.

श्री. स. गो. बर्वे तेव्हा जिल्हाधिकारी होते. आईवडिलांना त्यांनी संरक्षणासाठी फरासखान्यात नेले. दोन दिवस आई-वडील तेथे राहिले होते.

थोरले बंधू दत्तात्रय यांना अटक झाली होती. आणखीही पुष्कळांना पकडले होते. दत्तात्रय आणि आणखी दहाबारा लोक यांची दंडविधान ३०२ खाली अटक' अशी नोंद करण्यात आली होती. काही दिवसांनी त्यांच्यावरील ३०२ चा आरोप काढला गेला. आणि प्रतिबंधक स्थानबद्धतेच्या विधीखाली त्यांना डांबून ठेवले.

दि. ३१-१-१९४८ च्या रात्रीपासून संचारबंदी चालू झाली होती, त्यापूर्वी मी शनिवार पेठेत पत्नी राहात होती त्या घरी पोहोचलो होतो. गोविंद 'उद्यम' मध्ये होता असे समजले होते.

रविवार १-२-१९४८ हा दिवस संचारबंदीचा होता. सोमवार सकाळी काही वेळ संचारबंदी उठवली होती.

सकाळी पत्नीचा निरोप घेऊन मी घराबाहेर पडलो. मला अटक केव्हाही होण्याची शक्यता आहे याची कल्पना दिली. मी खडकीला कामावर निघालो. अद्याप अर्धा तास अवकाश होता. खडकीच्या घराकडे जाऊन यावे म्हणून प्रथम तिकडे वळलो.

घरासमोर पोचताच दारावर दोनतीन आरक्षी पाहिले. त्यांनी मला पकडले. खडकीच्या चौकीवर नेले. तेथे माझी चौकशी झाली. मला अटक करण्याचा आदेश त्या चौकीला मिळाला नव्हता. मला अटकही नव्हती आणि मोकळीकही नव्हती. तीन-चार दिवस मी जवळजवळ बंदिस्त होतो. कामावर जात असे. खडकीतच कोठेतरी जेवत असे. आरक्षी माझ्या समवेत असत. रात्री चौकीवर झोपत असे.

मला आपण अटक केली आहे काय, असे मी अधिकाऱ्यांना विचारले. त्यांनी नाही म्हणून सांगितले. मग 'मला माझ्या मार्गाने जाऊ दे.' म्हणून मी विनंती केली. दोन-तीन दिवस त्यांच्याशी माझा वाद चालला होता. शेवटी, मी विनंती केली. कामशेत स्थानकाजवळील उकसाण या गावी जात आहे, मला मोकळीक द्या, असे त्यांना मी सांगितले. त्यांनी संमती दर्शवितांच माझ्या वरिष्ठांना सुटीचे आवेदन दिले, ते संमोदित करून घेतले आणि दि. ५-

२-१९४८ या दिवशी दुपारी खडकी स्थानकावरून कामशेतला निघालो. स्थानकापर्यंत आरक्षी आले होते.

मुंबई गुप्तचर विभागाने गांधीहत्या प्रकरणाच्या तपासाचे काम आपल्या हाती घेतले होते. त्यांची चक्रे वेगाने फिरू लागली होती. त्यांचे एक पथक माझ्या शोधासाठी पुण्याला येऊन पोचले होते. मला खडकीच्या आरक्षी अधिकाऱ्यांनी अनधिकृत अटकाव करून ठेवला असल्याचे त्यांना कळले. ते खडकीच्या आरक्षी चौकीवर येऊन पोहोचले. पण तासाभरापूर्वीच त्या अधिकाऱ्यांनी मला सोडून दिले होते हे त्यांना समजले.

मी कोठे जात आहे, कोणत्या गाडीने गेलो आहे, कोठे उतरणार आहे याची माहिती खडकीच्या अधिकाऱ्यांना होती. मुंबईच्या पथकाने आपली दिशा त्या रोखाने बळविली.

मी कामशेतला उतरून उकसाण गावाकडे निघालो होतो. ते दहा मैलांचे अंतर होते. अर्धा अधिक चालून गेल्यावर पाठीमागून आरक्षीची गाडी येत असल्याचे मी पाहिले. मला आरक्षींनी आपल्या गाडीत घेतले. काही चौकशी करायची आहे असे ते म्हणाले.

आणखी चौकशी हे चिन्ह चांगले नाही या कल्पनेने माझ्या मनात पुन्हा भीती उभी राहिली. हे आरक्षी मुंबईच्या गुप्तचर विभागाचे होते याची मला तेव्हा कल्पना नव्हती मला कामशेत गावात आणले गेले. एका घरी आम्ही उतरलो, पडवीतील बाकावर मला बसवले. चहा-कॉफी काही घेणार का, असे त्यांनी मला विचारले. मी चहा सांगितला.

चहा पिऊन होईपर्यंत कोणी काही बोलले नाही. ती शांतता वादळापूर्वीची नसेल ना असा विचार मी करीत होतो. तेव्हा दुपारचे चार वाजले असतील.

चहा आला. आरक्षी अधिकाऱ्यांपैकी एकाने मला सांगितले, 'तू अटकेत आहेस !' जे होईल असे सारखे वाटत होते ते झाले होते. माझी विवंचना थांबली होती. मनावरील ओझे उतरल्याचा भाव माझ्या मुद्रेवर सहजपणेच आला होता. अधिकारी पुढे म्हणाले. 'ही अटक गांधीहत्येच्या प्रकरणात आहे. आम्ही मुंबई गुप्तचर विभागाचे अधिकारी आहोत.' माझा बंदिवास या क्षणापासून चालू झाला होता.

आणखी कोण कोण या संबंधात पकडले आहेत याचे कुतूहल माझ्या मनात उभे राहिले. पण तसे विचारणे म्हणजे आपण होऊन काहीतरी सांगणे होईल, म्हणून मी गप्प बसलो. पुन्हा थोड्या वेळातच आपणास नेमकी परिस्थिती कळेल, असेही वाटले.

आरक्षींच्या कोठडीत आरोपीची दुर्दशा केली जाते असे आपण ऐकतो, कधीकधी वाचतो. काही बोलपटांतून तशा स्वरूपाचे दृश्य दाखविलेले आपण पाहतोही.

आरोपीला मारझोड करू नये असा विधी आहे. प्रत्यक्षात मात्र मारहाणीतून सुटलेला क्वचितच कोणी आरोपी असेल. असे का होते हे पाहणे उद्‌बोधक ठरेल.

आरक्षी आणि आरोपी यांचे हितसंबंध परस्परविरोधी असतात. एकाला अवैध घटनेचे

धागेदोरे हुडकण्याचे असतात. दुसरा स्वतःची मान वाचविण्याचा प्रयत्न करीत असतो. अवैध कृत्य करीपर्यंत आरोपी यशस्वी ठरला असेल, आरक्षीच्या हाती पडल्यावर मात्र त्याचे बळ कःपदार्थ असते. नुसती अटक केल्याने आरक्षीविभागाचे काम संपत नाही. अटक केलेली व्यक्ती घटनेशी संबंधित आहे की नाही हे पाहणे त्यांचे काम असते. ती व्यक्ती संबंधी असेल तर तो संबंध न्यायालयात सिद्ध करणे हे आरक्षीचे काम असते. न्यायालय म्हटले की, पुराव्याचा प्रश्न आला. हा पुरावा उपलब्ध होण्याचे जबळचे साधन म्हणजे पकडलेला मनुष्य.

हा मनुष्य मूक राहत असेल तर त्याला बोलके करावयास लागते. त्याने अमुक गोष्ट लपविली आहे हे ध्यानात येताच ती लपवलेली गोष्ट त्याच्याकडून काढून घ्यावी लागते. आज ना उद्या तो पकडलेला मनुष्य आपण होऊन ती लपविलेली गोष्ट बोलेल, त्याचे मतपरिवर्तन होईल, त्याचा छळ कशाला करा, असली भाबडी श्रद्धा आरक्षी अधिकारी ठेवू लागले तर शंभर घटनांपैकी एखादीही घटना न्यायालयात सिद्ध करणे त्यांना अवघड होईल. मारझोड करणे अवैध आणि दण्डच आहे, या विधीचा व्यवहारात अर्थ एवढाच की, माराच्या पद्धतीचे आरक्षी विभागालाही भय असावे आणि त्यांनी आपला दंड विधीची मर्यादा सांभाळून वापरावा.

काही प्रसंगी काही घटनांचे धागेदोरे आरक्षींच्या हाती विनासायास येतात किंवा आरोपी आपण होऊन ते स्वाधीन करतो. अशा वेळी माराचे कारण पडत नाही. नुसती हौस म्हणून दे चार तडाखे, असा प्रकार सहसा होत नाही.

पुष्कळदा मात्र असे होते की, प्रत्यक्ष संबंधित व्यक्ती कोणीतरी असते आणि मारझोड खाणारी व्यक्ती पूर्णपणे संबंधातीत असते. साताऱ्याचे जलमंदिर चोरीच्या प्रकरणी असा प्रकार झाल्याचे मी वाचले होते. प्रत्यक्ष आरोपी आणखी कोणीतरी होते. ते नंतर स्वतंत्रपणे पकडले होते. गांधीहत्येच्या निमित्ताने ठिकठिकाणी पुष्कळ लोक पकडले गेले होते. त्यातील कित्येकांना निष्कारण मारझोड झाली होती.

गांधीहत्येशी प्रत्यक्ष संबंध असलेल्या व्यक्ती म्हणून ज्यांच्यावर पुढे आरोप ठेवले गेले त्यांना सरसकटपणे मारझोड झाली नाही. आरक्षीविभागाला काही दुवे आवश्यक होते. ते जेथे मिळाले तेथे माराचा प्रश्न नव्हता. ते दुवे देण्यासाठी खळखळ झाली तर अर्थातच आरक्षी आपले बळ योजीत असत.

नथुरामला दिल्लीच्या आरक्षींनी पकडले होते. रात्री त्याची तपासणी चालू झाली. तपासाच्या पद्धतीचे काही प्रथमोपचार झाले. लाला हृषीकेश दिल्लीच्या आरक्षीविभागात एक प्रमुख अधिकारी होते. त्यांनी मध्यरात्री केव्हातरी नथुरामच्या तपासणीला हात घातला. पाऊण ते एक तास त्यांची नथुरामशी प्रश्नोत्तरे झाली. त्या प्रश्नोत्तरात प्रत्यक्ष घटना आणि त्याची कारणपरंपरा हाच भाग अधिक होता. 'दुव्याचा बारकावा मला विचारलात तर या वेळी सर्व सुसंगत आठवून सांगण्याची माझी स्थिती नाही. मला झोप पाहिजे आहे, आणि

त्यातून नुसत्या मारझोडीतून आपणास काही मिळण्यासारखे आहे असे वाटत असेल तर आपला मार्ग आपल्याला मोकळा आहे.' असे नथुरामने लाला हृषिकेश यांना सांगितले.

या माणसाला शारीरिक क्लेश देऊन काही काढून घ्यावे असे अधिकाऱ्यांना वाटेना. खरोखरीच अतिशय मोठ्या मनाने लाला हृषिकेश यांनी आपल्या खालच्या अधिकाऱ्यांना आज्ञा दिली की, नथुरामला कोणताही शारीरिक त्रास दिला जाता कामा नये. ती आज्ञा कार्यवाहीत येत आहे की, तिचे उल्लंघन होत आहे इकडे त्यांनी लक्ष पुरविले. प्रस्तावनात्मक शारीरिक त्रासानंतर नथुरामला कोणताही त्रास दिला गेला नाही. पुढे मुंबईच्या आरक्षींनीही नथुरामला त्रास दिला नाही किंवा त्याच्याशी झोप येऊ न देणे, उभे करून ठेवणे, हात वर अडकवून ठेवणे असलाही व्यवहार केला नाही. उलट त्याच्याशी अधिकाऱ्यांची वागणूक अतिशय सौजन्याची असे. त्याच्याकडून काढून घेण्याचे असे त्यांना फारसे कारणच उरले नव्हते.

दिगंबर रामचंद्र बडगे याला पुणे येथील आरक्षी विभागाने दि. ३१-१-१९४८ ला अटक केली होती. नंतर मुंबई आरक्षी विभागाने त्याला आपल्याकडे घेतले होते. बडगेकडून गोष्टी वदवून घेण्यास आरक्षींना अतिशय त्रास पडला आणि गोष्टी बोलण्यापूर्वी बडगेलाही फार त्रास झाला. 'मूकं करोति वाचालम्' अशी आरक्षींची शक्ती होती. बडगे बोलू लागल्यावर दारूगोळ्याचे साठे बाहेर येऊ लागले होते. पुढे बडगे क्षमेचा साक्षीदार झाला.

गांधीहत्येपूर्वी दहा दिवस मदनलाल पाहावा याला अटक झाली होती. तपासणीच्या प्राथमिक उपायात त्याच्याकडून जी माहिती मिळाली त्या माहितीत त्याला नंतर भर टाकता आली नाही. कारण त्याला माहिती थोडी होती आणि लपविण्याजोगे त्याच्याजवळ काही राहिले नव्हते.

मला पकडले तोवेळेपर्यंत पुष्कळ दुवे आरक्षी अधिकाऱ्यांना मिळाले होते. त्यामुळे त्या दुव्यांना माझ्याकडून संपुष्टी घेणे एवढेच त्यांचे काम उरले होते.

पण दि. २० जानेवारीला मी दिल्लीला असल्याचा पुरावा त्यांना मिळाला होता तसेच त्यावेळी माझ्याजवळ एक रिव्हॉल्व्हर होते अशीही त्यांची माहिती होती. दि. ५-२-१९४८ ला पकडल्यानंतर माझ्या खडकीच्या घराची झडती झाली होती. रिव्हॉल्व्हर मिळाले नव्हते. रिव्हॉल्व्हर बाहेर यावे म्हणून आरक्षींनी मला धारेवर धरले. मी ते फेकून दिले. कोठे ते मला ठाऊक नाही असा मी आग्रह धरला होता. पण मी टिकाव धरू शकलो नाही.

गांधीहत्येपूर्वी आठ-दहा दिवस मी एक पिशवी माझ्या एका मित्राकडे दिली होती. गांधीहत्या झाली. नथुरामचे नाव प्रकट झाले. आपल्याजवळ ती पिशवी ठेवणे योग्य होणार नाही या भावनेने माझ्या मित्राने ती पिशवी आणखी एका मित्राकडे दिली आणि ती नाहीशी करण्यास सांगितले. त्या तिसऱ्या मित्राने त्याप्रमाणे ती पिशवी दूर रस्त्याच्या कडेला फेकून

दिली होती. मित्रांचे हे व्यवहार माझ्या अनुपस्थितीत झाले होते. सांगता येण्याजोगे होते, ते एवढेच की मी एक पिशवी माझ्या पहिल्या मित्राजवळ दिली.

तसे मी सांगितल्यावर पहिल्या आणि दुसऱ्या मित्राच्या तपासाची माळ मी गळ्यात घेऊन बसलो. माझ्या असहाय्य अवस्थेचे मला फार दुःख झाले. दोघांपैकी विशेषतः दुसऱ्याला फार यातना झाल्या. कारण पिशवी मिळू शकली नव्हती. बलप्रयोगाने लपविलेली वस्तू वर येऊ शकते. पण जी वस्तुस्थितीच आहे, म्हणजे ज्यात लपविलेले काही नाही त्यातून आणखी काही खरे ते बाहेर काय येणार ? शेवटी दि. १२-३-१९४८ ला म्हणजे सव्वादोन महिन्यांनी त्या दोघा मित्रांची मॅजिस्ट्रेटसमोर शपथेवर विधाने झाली. पुढे त्यांच्या साक्षी झाल्या. त्याचा इत्यर्थ एवढाच की, मी पहिल्या मित्राला गांधीहत्येपूर्वी एक पिशवी दिली. त्यात रिव्हॉल्व्हर होते आणि चार-पाच गोळ्या होत्या. त्या मित्राने गोळ्या कचऱ्याच्या डब्यात टाकून दिल्या आणि रिव्हॉल्व्हर दूर रस्त्याच्या कडेला टाकून दिले.

आणखी एक गोष्ट माझ्यावर लादली गेली. त्या गोष्टीचा मला अकारण त्रास झाला. मी सावरकरांकडे जाऊन आलो होतो आणि त्याचा त्यांच्याजवळ पुरावा होता असे अधिकाऱ्यांचे म्हणणे होते. तसे काही असण्याचा संभव नव्हता, हा माझा विश्वास होता. पण मार वाचविण्यासाठी कोणी माझा संबंध सावरकरांशी जोडून दिला असला तर मला सांगता येत नव्हते.

माझ्यावर प्रयोग झाले. पुरावा पुढे आणा, समोरासमोर करा म्हणजे तुमच्या शंकेचे निराकरण होईल असे मी सांगितले. पण वादविवाद करण्यास किंवा पुराव्याची तशी सत्यासत्यता पडताळून पाहण्यास ते काही न्यायालय नव्हते. त्यांच्या बोलण्यातून जो संकेत मिळाला तो असा की दि. १९-१-१९४८ पा दिवशी दिल्लीहून सावरकर सदनात आलेला दूरध्वनी माझ्यासाठी होता.

मी सावरकरांकडे गेलो नव्हतो, मला सावरकर-सदन ठाऊक नव्हते, माझी तेथल्या कोणा मंडळींशी ओळख नव्हती हे अधिकाऱ्यांना हळूहळू पटू लागले होते. पण तेवढ्यात कोणीतरी अतीपणा केला. माझ्या घरातील झडतीच्या वेळी, सावरकरांचे हाताने काढलेले एक चित्र भिंतीवर असलेले आरक्षी अधिकाऱ्यांनी पाहिले होते, त्या चित्रावर सावरकरांची स्वाक्षरी होती. त्यांनी त्या गोष्टीचा निर्देश केला !

काय घट्ट पुरावा पण ! सावरकर आणि मी यांचा घनिष्ट संबंध असलेला तो जणू अकाट्य दुवाच होता ! मी अतिशय असहाय्य अवस्थेत होतो. पण त्या पुढे केलेल्या पुराव्याने मला त्याही स्थितीत उपहासाचे हसू आले !

झाले ! मी हसलो आहे तेव्हा काही तरी लपविते आहे असा अधिकाऱ्यांनी तर्क केला. पुन्हा पहिल्यापासून प्रयोगाला आरंभ झाला.

'माझं थोडं ऐकता का ?' मी अतिशय काकुळतीने म्हणालो.

'अरे, तेवढ्यासाठी तर आमचा प्रयत्न चालला आहे ! तुला त्रास द्यायची आम्हाला हौस का आहे ?'

'मी हसलो म्हणून तुम्हाला नवे अवसान आले आहे. त्यासाठीच मला काही सांगायचे आहे, बादरायण संबंध ठाऊक आहे का तुम्हाला ?'

अधिकाऱ्यांनी कुतूहल दाखविताच मी, 'अस्माकं बदरीचक्रं' हा श्लोक सांगितला. 'म्हणजे काय ते सांग.' असे अधिकाऱ्यांनी गुरकावताच त्यांना पाहुण्याच्या बैलगाडीचे चाक बोरीचे आणि यजमानांच्या घरात बोरीचे झाड म्हणून पाहुणा आणि यजमान याचे जवळचे नाते कसे सिद्ध झाले ती कथा सांगितली.

ताणलेले वातावरण निवळले नाही, पण थोडे खाली आले. मला तेवढाच विसावा मिळाला. अधिकाऱ्यांना पटले असे मला वाटले. माझ्या शब्दावरील विश्वासापेक्षा त्यांना अन्यत्र काही पुरावा मिळाला नव्हता हेच त्याचे कारण असले पाहिजे. एके दिवशी सकाळी मला त्या प्रश्नांसाठी खाली प्रयोगशाळेत नेले गेले नाही, तेव्हा आपली आता या प्रश्नातून मोकळीक झाल्याचे मला वाटू लागले. तो वेळपर्यंत मात्र शरीराचा न दुखणारा अवयव शोधूनही सापडत नव्हता.

महिनाभर उलटला असेल आणि त्या प्रश्नाचीअधिकाऱ्यांना पुन्हा उबळ आली ! माझ्या कल्पनेप्रमाणे, सावरकरांविरुद्ध आरोप सिद्ध करण्याजोगा काही पुरावा हाती न आल्याने आणि सावरकरांना कसेही करून गोवले पाहिजे असा बहुधा वरून अधिकाऱ्यांना आदेश आला असल्याने अधिकारी प्रयत्नशील झाले होते.

तो प्रश्न पुन्हा उभा राहताच माझी मात्र पाचावर धारण बसली. आत्ताच कोठे माझ्या अवयवांना नीटपणा येऊ लागला होता. आता पुन्हा नव्याने या प्रश्नाला अंग द्यायचे म्हणजे फार कठीण अवस्था होणार होती. मार चुकविण्यासाठी, 'मी सावरकरांकडे गेलो होतो, असे म्हटल्याने भागत नव्हते. बोलणे काय झाले, आणखी कोण होते, वाहन कोणते वापरलेस, वेळ कोणती होती हे सर्व अंगभूत प्रश्न माझ्याकडून काढून घेतले जाणार होते ! ती माळ गुंफणे मला शक्य नव्हते.

तपासासाठी मला 'प्रयोगाशाळेत' नेले गेले. माझे दैव बलवत्तर होते, असेच म्हणावे लागेल. जे अधिकारी त्या तपासासाठी नियुक्त केले गेले होते, त्यांना वरिष्ठांनी तातडीने बोलावणे पाठविले होते, 'आज दुपारी तपासाला घेऊन या.' असे सांगून ते अधिकारी निघून गेले. ती दुपार शेवटपर्यंत उजाडली नाही. कदाचित असेही असेल की, 'गोपाळला त्या प्रभावर छेडू नका.' असा आदेश वरिष्ठांनी त्या अधिकाऱ्यांना दिला असेल. पण माझ्या डोक्यावर मात्र ती तपासाची तलवार तशीच लटकत राहिली होती ! या सर्व जाचातून शेवटी

मला समाधान वाटले ते एवढेच की, सावरकरांना गोवण्याचे दूषण माझ्या माथी तरी आले नाही. त्यांची आणि माझी भेट झाली होती किंवा नाही ही गोष्ट आज काळाच्या उदरात लुप्त झाली आहे.

या संबंधात श्री. आप्पा कासार, गजानन दामले आणि आणखी काही सावरकरांचे निकटवर्ती लोक त्रासातून सुटले नाहीत. पण सावरकरांकडे कोणी येऊन गेला असल्याचा पुरावा त्यांच्याकडूनही उपलब्ध झाला नाही.

शंकर किस्तैय्या हा बडगेचा नोकर. बडगे कोठे असेल याचा तो शोध घेत होता. अलीकडे बडगे आरक्षी गुप्तचर विभागाच्या कार्यालयात राहतो असे त्याला कोणीतरी सांगितले ! बडगेकडून वेतनाचे पैसे त्याला घेण्याचे होते.

तपास करीत तो दि. ६-२-१९४८ या दिवशी सरळ गुप्तचर विभागाच्या कार्यालयातच आला. माझ्या धन्याकडून माझे पैसे घेऊन द्या, असे त्याने सांगितले. शंकर किस्तैयाच्या शोधात आरक्षी होतेच ! त्यांनी त्याचे नाव, गाव विचारले आणि तुझीच बडगेशी गाठ घालून देतो म्हणून त्याला सांगून त्याच्या जेवणाखाण्याची आणि राहण्याची सोयही तेथेच केली ! आपल्याला असे का डांबून ठेवले आहे याचा विचार करीत शंकर नुसती चुळबुळ करीत राहिला ! पण बडगेच्या खोलीतच त्याची व्यवस्था केल्याने त्याला थोडा विरंगुळा मिळाला होता.

शंकर किस्तैय्याने त्याला ठाऊक असलेले वृत्त सरळपणे दिले होते. त्याला तपासासाठी दिल्लीला नेले तेव्हा लपविलेले काही साहित्यही त्याने काढून दिले.

सर्वांत शेवटी पकडले गेले नाना आपटे आणि करकरे. दि. १३-१४ फेब्रुवारी १९४८ ला त्यांना मुंबईत अटक झाली, त्यांच्याकडून त्यांच्या अंगाभोवतीचे धागेदोरे तेवढे मिळण्याचे होते. इतर तपास बहुतेक पुरा झाला असल्याने त्या दोघांना इतर दुव्यांसाठी विचारण्याजोगे काही उरले नव्हते.

सावरकर यांना आरोपी म्हणून बंदिस्त ठेवले असले तरी त्यांना ऑर्थर रोड बंदिगृहात ठेवले होते. त्यांचेही वक्तव्य आरक्षींनी घेतले होते. ते वक्तव्य अतिशय त्रोटक होते. पण त्यांच्याकडून आणखी विस्तृत वक्तव्य काढणे शक्य नव्हते.

ग्वाल्हेरचे डॉक्टर परचुरे यांना ग्वाल्हेरलाच अटक करून ठेवले होते. तेथील किल्ल्यात त्यांची चमत्कारिक कोंडी केली होती. त्यामुळे त्यांना मॅजिस्ट्रेटपुढे स्वीकारोक्ती देणे भाग पडले. डॉ. परचुरे यांना ज्या स्थितीत ठेवले होते, त्या स्थितीचा विचार करून पंजाबच्या उच्च न्यायालयाने डॉ. परचुरे यांची स्वीकारोक्ती ग्राह्य मानली नाही आणि त्यांना बंधमुक्त केले.

ग्वाल्हेरचे आणखी तीन आरोपी श्री. सूर्यदेव शर्मा, श्री. गंगाधर दंडवते आणि श्री. गंगाधर जाधव हे पकडले जाऊ शकले नाहीत. डॉ. परचुरे यांच्या मुक्ततेनंतर ते स्थानिक

न्यायाधीशांच्या स्वाधीन झाले. त्यांच्यावरील अभियोग काढून टाकण्यात आला.

गुप्तचर विभागाच्या कार्यालयात ठेवलेल्या आम्हा आरोपींना म्हणजे नथुराम, आपटे, करकरे, बडगे, शंकर, मदनलाल आणि मी यांना एरवी बागणूक चांगली मिळाली. आम्हाला कोठडीत न ठेवता कार्यालयाच्या खोल्यांतून ठेवले होते. दिवसा तेथे कार्यालयाचे काम चाले. बाहेरच्या कोणाशी मात्र आमचा संबंध येऊ दिला जात नसे. याला अपवाद म्हणजे आरक्षी अधिकारीच कधीकधी कोण्या प्रतिष्ठितांना घेऊन येत असत. त्या वेळी अधिकाऱ्यांच्या इच्छेप्रमाणे आम्ही काही शब्द बोलतही असू. श्री. स. का. पाटील आणि अच्युतराव पटवर्धन हे असे भेटून गेले होते.

आमच्यासाठी माधवाश्रमातून जेवण मागविले जाई. जेवण चांगले असे. चहा, धूम्रपान करणाऱ्यांना ती व्यवस्था, अशी सोय केली गेली होती. घरची मंडळी भेटत असत. भेटीत खाद्यपदार्थही असत.

नथुरामसाठी एक विजेची किटली आणवली होती. खोलीत कॉफी, साखर आणि दूध ठेवण्याची सोय करून दिली होती. तो कॉफी करी आणि अधूनमधून आमच्यापैकी कोणाकडे तरी पाठवी.

आरक्षी अधिकाऱ्यांपैकी काहींमध्ये पिण्याचे प्रमाण फार दिसले. काहींनी तर पाणी वर्ज्य केले होते. त्यांच्या खिशात चांदीची चपटी बाटली नेहमी असे. गांधीहत्येच्या शोधासाठी अमाप आणि प्रमाणाबाहेर पैसा कामाला लावला गेला होता. काही व्ययाला बंधन नसते, गणन नसते. या प्रकरणाच्या शोधासाठी म्हणून मद्य असा अलिखित संदर्भ कोणाच्या मनात आला तर त्यात मला तरी वावगे वाटणार नाही.

आम्हा आरोपींना एकमेकांना भेटण्यास आणि आपापसात बोलण्यास बंदी होती. जवळ आणलेच जात नसे. त्यामुळे तू काय बोललास आणि मी काय बोललो असे विषय पडताळण्याची आम्हाला संधी नसे. काही प्रसंगी आम्हाला समोरासमोर आणले जाई. पण 'अमूक हे म्हणत आहे, तुझ्या म्हणण्यातील संगती लागत नाही, तेव्हा खरे काय आहे' अशी छाननी करण्यासाठी.

तपास पूर्ण होत आला तसतसे आमच्यावरील बंधन तेवढे तीव्र राहिले नाही, तरीही आरक्षी सदैव कानाशीच असल्याने तपासातील गोष्टी बोलण्याचे आमचे धाडस होत नसे.

नथुरामची भेट मला दिली जाई. आम्ही बोलतही असू. कधी घरची भेट आली तर आम्ही दोघे एकत्र येत असू.

तपास चालू असताना आमच्याभोवती गुंफलेल्या काही विलक्षण कथा आम्हाला ऐकण्यास मिळत. नथुराम अमूक दिनांकाला अमक्या गावी अमूक गृहस्थाकडे उतरला होता असे कोणाचे तरी पत्र आरक्षी विभागाला यायचे. त्या पत्रातील आशय सर्वस्वी खोटा

असल्याची अधिकाऱ्यांची निश्चिती असे. कारण आरोपींची दिनांकवार दैनंदिनी अधिकाऱ्यांनी जुळविली होती आणि ती तपासून पाहिली जाई. पण नवीन म्हणून आलेल्या वृत्ताची विल्हेवाट लावणे हे एक काम असल्याने पुन्हा माहितीची छाननी होत असे आणि मग ते नवीन वृत्त खोटे असल्याचे अभिमत संबंधित कार्यालयाकडे धाडले जाई.

नथुराम एकाच दिवशी आणि साधारणपणे एकाच वेळी अनेक गावांतून असल्याचे वृत्त गुप्तचर विभागात संकलित होत असे. त्या वृत्तासंबंधी अधूनमधून आम्हा संबंधित आरोपींना विचारले जाई. आमच्याकडून चौकशी केली गेल्याचे मला आठवते. नथुराम अमूक दिवशी नाशिकला होता, त्याच दिवशी तो अहमदाबादला होता, मिरजेला होता आणि नागपूरला होता. त्याच दिवशी भोपाळला त्याचे व्याख्यान झाले. त्याच दिवशी त्याला इटारसीच्या मित्रमंडळींनी फलाहार दिला. त्याच दिवशी इंदूरच्या मित्रांनी त्याला स्थानकाबर निरोप दिला. त्याच दिवशी तो इटारसी मार्गे मुंबई-दिल्ली गाडीने दिल्लीच्या प्रवासात होता. त्या प्रवासात त्याच्याजवळ दोन लोखंडी पेट्या होत्या आणि त्यावर ए. व्ही गोडसे असे नाव होते असे झाशीजवळ कोणीतरी पाहिले होते. त्या प्रवासात त्याच्याजवळ एक-दोन स्त्रिया होत्या.

वरील प्रकारचे असंभाव्य वृत्त छाननीसाठी आले की, आम्हाला लोकांच्या मनोवृत्तीचे आश्चर्य वाटे. पण सर्वांत म्हणजे तपास करणाऱ्या अधिकाऱ्यांची फार करमणूक होत असे. एक अधिकारी नथुरामला गमतीने म्हणालेसुद्धा, 'नथुराम, तुला ज्या लोकांनी पाहिलेही नसेल त्यांनासुद्धा तू सर्वत्र दिसत आहेस ! नथुराम एकाच वेळी एकाच ठिकाणी असू शकतो हे लोकांना पटविण्याचे काम आमच्यावर येऊन पडले आहे !'

त्या विशिष्ट दिवसासंबंधी अधिकाऱ्यांजवळ प्रमाण असे आणि ते निश्चित स्वरूपाचे असे. त्या उल्लेखित दिवशी नथुराम विमानाने मुंबईहून दिल्लीला गेल्याचे त्यांच्याजवळ साक्षीसहित अभिलेख असत ! नथुरामच्या सांगण्यातून जे वृत्त मिळे ते वेगळेच.

कधी कधी दूरदूरचे अधिकारी आपणांस काही नवीन माहिती मिळाली आहे आणि ती मुंबई आरक्षी दलाला त्वरीत पोहोचली पाहिजे या धारणेने मुंबईची खेप करीत. पुष्कळ वेळी त्यांची खेप फुसकी ठरे.

बहुधा प्रत्येक चौदा दिवसांनी तपासासाठी पुढचा अवधी घेण्यासाठी आम्हा आरोपींना मुंबईच्या चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट यांच्या न्यायालयात नेले जाई. बहुतेक वेळी श्री. ऑस्कर ब्राऊन हे न्यायमूर्ती अवधी देत.

साक्षीदारांनी आरोपींना परस्पर ओळखावे म्हणूनही आम्हाला त्या न्यायालयात अधून मधून नेले जाई. आम्ही सर्वस्वी आरक्षी अधिकाऱ्यांच्या स्वाधीन होतो. आम्हाला कोठडीत किंवा बंदिगृहात ठेवले गेले नव्हते. साक्षीदार आम्हाला आमच्या नकळत कधी बघून गेले असतील आणि मग त्यांनी आम्हांला न्यायाधीशापुढे ओळखले असले तर आम्हाला

ते कळण्यास मार्ग नव्हता. अन्यथा, दोन किंवा जवळ जवळ अडीच महिन्यांनी कोणी संयान कर्मचारी (Railway Employee), कोणी बूट पॉलिश करणारा मनुष्य किंवा कोणी टांगेवाला नेमक्या आरोपीवर बोट कसा ठेवू शकेल याचा तर्क करता येत नाही. चुकून नेमके उत्तर मिळण्याचा कधी कधी संभव असतो, नाही असे नाही; पण हा कधी कधी असणारा संभव नेहमीचा नियम नसतो.

तपासाचे काम आटोपत आले होते. तोवर मे महिना उजाडला होता. त्याचे वैशिष्ट्य म्हणजे विशेष न्यायालय प्रस्थापित करणे, एक न्यायमूर्ती नेमणे, एरवीची परिपाठी सोडून त्याच न्यायमूर्तींनी आरोपपत्रांची आणि आरोपांची नोंद घेणे, हत्येचा प्रयत्न यासाठीही फाशी किंवा जन्मठेप या शिक्षांना आरोपीला पात्र ठरविणे, अभियोगाचे काम सतत आणि त्वरित चालू ठेवणे, पुनरावेदनाचा अवधी साठ दिवसांच्या ठिकाणी पंधरा दिवस ठेवणे. असा त्या विधीत उपबंध (Provision) होता. Bombay Public Security Measures Act [IV of 1947] म्हणून ओळखला जाणारा तो विधी मे १९४८ मधे दिल्ली या प्रांताला या अभियोगापुरता लागू केला. पाच-सहा वर्षांनी सर्वोच्च न्यायालयाने या विधीला अनुसरून नेमली जाणारी अशी न्यायालये संविधानबाह्य ठरविली. परंतु त्याचा पूर्वीपासून परिणाम देण्यास नकार दिला आणि पूर्वीपासून परिणाम देणे शक्यही नव्हते.

दि. ४-५-१९४८ ला श्री. आत्मचरण I.C.S. यांची गांधीहत्या अभियोग चालविण्यासाठी विशेष न्यायमूर्ती म्हणून नेमणूक केली गेली.

दि. १५-५-१९४८ या दिवशी लाल किल्ल्यातील एका भागाला 'बंदी-गृह' अशी संज्ञा दिली गेली.

लाल किल्ल्यातच न्यायालयाचे काम चालण्याची योजना केली गेली. लाल किल्ल्यात अभियोग चालण्याची ही तिसरी वेळ होती. १८५७ च्या क्रांतियुद्धातील बहादूर शहा यांचा अभियोग चालला ती पहिली वेळ, सुभाषबाबूंच्या स्वातंत्र्ययुद्धातील आरोपींचा १९४६ मध्ये अभियोग चालला ती दुसरी वेळ आणि गांधीहत्या प्रकरणातील आरोपींचा अभियोग ही तिसरी वेळ होती.

आम्हाला लवकरच दिल्लीला नेले जाणार आहे असे आमच्या कानावर आले; पण तसे स्पष्ट कोणी सांगितले नाही. कोंडून ठेवलेल्या आम्हा आरोपींना काहीशी मोकळीक मिळेल या विचाराने मनाला उल्हास वाटू लागला होता.

दि. २५-५-१९४८ या दिवशी मुंबईच्या गुप्तचर विभागात ठेवलेल्या आम्हा आरोपींना दोन तुकड्यात विमानाने दिल्लीला नेण्यात आले. सावरकरांची प्रकृती त्या दिवशी बरी नसल्याने त्यांना दुसऱ्या दिवशी म्हणजे दि. २६-५-१९४८ या दिवशी आर्थर रोड बंदिगृहातून दिल्लीला आणले.

दीड दिवस आम्ही वेगवेगळ्या आरक्षी कोठड्यांतून ठेवले गेलो. दि. २७-५-१९४८ या दिवशी सकाळी आम्हाला लाल किल्ल्यातील बंदिगृहाच्या तोंडाशी आणले. सावरकर, डॉक्टर परचुरे, यांच्यासहित सर्वांनी एकमेकांना पाहिले ते त्या ठिकाणी !

बंदिगृहात चहा आणवला गेला. चहा घेऊन लगेच आम्हाला न्यायालयात निघण्याची सूचना मिळाली. लगबगीने आम्ही न्यायालयात निघण्याची सिद्धता केली. न्यायालय प्रथमच उघडणार होते. बंदिगृह ते न्यायालय हे फारसे अंतर नव्हते. बंदिस्तपणा असावा म्हणून आमच्यासाठी मोटारीची व्यवस्था केली होती. सकाळी दहा वाजण्याच्या आसपास आम्ही न्यायालयात पोहोचलो.

卐 卐

अकरा

प्रकाशातून अंधाराकडे

एकटेपणाच्या कुबट वातावरणातून आम्ही न्यायालयाच्या मोकळ्या वातावरणात प्रवेश केला होता. दि. २७-५-१९४८ हा तो दिवस होता. वेळ सकाळी साडेनऊची होती. दीड एक तासापूर्वी आम्हा आरोपींना लाल किल्ल्यातील विशेष बंदिगृहात एकत्र आणले गेले होते. प्रथम भेटीत आम्ही एकमेकांशी वरवरचे तेवढे बोलू शकलो, तरीही त्या आमच्या बोलण्यात आता कोणाची अडकाठी नव्हती हे आम्ही अनुभवलेले मोकळेपणाचे पहिले सुख.

न्यायालयातील वातावरण आणखी मोकळे होते. आम्ही प्रथमच लोकांच्यासमोर प्रकटपणे आणले जात होतो. तपासाच्या दिवसात आम्हाला कधी दिल्ली, कधी ग्वाल्हेर, कधी पुणे अशा ठिकाणी नेले गेले, तरी बंदिस्त स्थितीत. अगदी विमानातून नेले गेले तरीही भोवताली आरक्षींचे कोंडाळे असे. मोकळीक अशी कधी मिळत नसे आणि म्हणूनच मनावर सारखे दडपण असे. लोकांना आम्हाला बघण्याचे जेवढे कुतूहल असेल, तेवढेच कुतूहल आम्हाला मोकळा समाज बघण्याचे होते.

न्यायालय म्हणजे साधारणपणे शंभर फूट लांब नि बावीस फूट रुंद असे लांबट प्रकोष्ठ (hall) होते. ते पहिल्या मजल्यावर होते. पंधरा-एक फूट अंतरावर उंच न्यायासन केले होते. तेथे न्यायमूर्तींचे आसन आणि टंकलेखकासाठी आणि दुसऱ्या कर्मचाऱ्यासाठी बसण्याची सोय केली होती. न्यायासनालगत न्यायमूर्तींच्या उजव्या अंगाला साक्षीदारासाठी कठडा होता. डाव्या अंगाला आरोपींचा पिंजरा होता. आरोपी पुष्कळ असल्याने त्यांना नीटपणे बसता येईल आणि पहारेकऱ्यांचीही सोय होईल एवढा तो विस्तृत होता.

न्यायासनाच्या समोर न्यायमूर्तींच्या उजव्या अंगाला शासकीय वकील आणि त्यांचे सहाय्यक यांची बसण्याची जागा होती. आरोपींना आपापल्या वकिलांशी बोलता यावे

या दृष्टीने न्यायमूर्तींच्या डाव्या अंगाला आरोपींच्या वकिलांसाठी बसण्याची सोय केली होती.

दोन्ही पक्षांच्या वकिलांच्या खुर्च्यांमागे प्रेक्षकांसाठी खुर्च्या आणि बाके होती. त्यात सर्वांत पुढे पत्र-प्रतिनिधी बसत असत.

मुख्य न्यायालयालगत दोन्ही बाजूच्या खोल्या इतर कामांसाठी वापरल्या जात. न्यायासनालगतच्या खोलीत न्यायमूर्तींचे चेंबर (Chamber) होते. शेजारच्या खोलीत साक्षीदार आणून ठेवीत. त्या शेजारी शासकीय वकिलांची बसण्या-उठण्याची खोली केली होती. आरोपींच्या वकिलांसाठी वेगळी खोली होती. आरोपींना एरवी बसण्यासाठी एका पडवीची खोली होती.

आम्हाला दि. २५-५-१९४८ ला दिल्लीला आणून टाकले होते ते वेगवेगळ्या आरक्षी कोठड्यात. आरक्षी अधिकारी न्यायालयाच्या व्यवस्थेत एवढे गढून गेले होते की, आमची जेवण्याव्यतिरिक्त आणखी सोय करणे त्यांना शक्य झाले नाही. आम्हाला ज्या कोठड्यात ठेवले होते त्या अतिशय अस्वच्छ आणि कोंदट होत्या. आंघोळ नाही, तोंड पुसणे नाही ही आमची स्थिती आम्हाला कळकट वाटत होती. एखाद्या दिवसाचाच प्रश्न असल्याने त्यात गाऱ्हाणे करण्यासारखे काही नव्हते आणि अधिक दिवस तसेच राहण्याचे असते तर अधिकाऱ्यांनीही दुर्लक्ष केले नसते. आम्ही तसेच बंदिगृहात आलो होतो. लगेच न्यायालयात निघण्याची घाई केली गेल्याने आम्हाला हातपाय धुऊन नीटनेटके होण्यासाठी सवड मिळाली नव्हती. आम्ही न्यायालयात आणले गेलो होतो.

शरीराची बाह्य अवस्था कशीही असो, आमच्या मनाला एक नवा रंग आला होता. मला वाटते, आरक्षीच्या जाचातून आता सुटका झाली ही अंतर्मनातील जाणीव बाह्य मनावर उमटली असली पाहिजे. म्हणून आमच्या मुद्रेवरसुद्धा त्या मुक्ततेचा तरंग तरळत असला पाहिजे. चौकशीचा अंक संपला होता. न्यायालयाचा अंक चालू होत होता. उद्याची चिंता करण्याची मनःस्थिती नव्हती. उद्याचे उद्या बघता येईल ! आज तर हा सोहळा आपणास बघण्यास मिळत आहे, ही कल्पना मनाला आल्हाद देत होती.

प्रेक्षक पुष्कळ बसलेले बघितले. दृष्टिक्षेप टाकला तो काही लोक ओळखीचे दिसले. काहींनी स्मिताने, काहींनी आविर्भावाने, काहींनी नमस्काराने ओळख दाखविली. पुण्यामुंबईकडील मंडळीही अधूनमधून दिसली.

गांधीहत्या या घटनेला जितकी गंभीरता होती तितकीच भव्यता गांधीहत्येच्या अभियोगाला आली होती. त्याचे एक कारण, ज्याने आपल्या जीवनात स्वातंत्र्यसंपादनासाठी हिन्दुस्थानात आणि हिन्दुस्थानाबाहेर संघटना उभारल्या, ज्याने स्वराज्यासाठी अतुलनीय कष्ट सहन केले, ज्याने हिन्दुराष्ट्राचे तत्त्वज्ञान प्रसृत करून हिन्दुंमध्ये स्वाभिनाची जागृती

केली, त्या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या कर्मवीराला - स्वातंत्र्यवीर सावरकरांना - सत्ताधिष्ठित व्यक्तींनी या कटात एक आरोपी म्हणून गोवले होते. दुसरी कारणे त्या मानाने गौण होती. कारण इतर आरोपींची उंची म्हणजे त्यांचे चारित्र्य, त्यांची योग्यता, क्षमता इत्यादी घटक अद्याप लोकांपुढे आलेले नव्हते.

आमचा खटला अप्रकटपणे म्हणजे in camera चालविला गेला असता तर आम्हाला ते नको होते. शिक्षा वाट्याला येतील त्या भोगावयाच्या आणि गांधीहत्येचे कृत्य त्या आरोपींनी देशाच्या कोणत्या परिस्थितीत केले आणि त्यांच्या कोणत्या मनःस्थितीत केले हे मात्र कोणाला कळायचे नाही कोणाचे काही अपसमज असतील तर त्यांचे निराकरण व्हायचे नाही. यात आम्हा आरोपींवर अन्याय झाला असता. पण त्यावेळी शासनाची इच्छा श्रेष्ठ होती. आमचा अभियोग अप्रकाश्य चालविला असता तर आमच्याजवळ काही उपाय नव्हता. म्हणून, अभियोग प्रकटपणे चालणार हे कळल्यामुळे आम्हाल बरे वाटले. आमच्याविरुद्ध पुरावा पुढे आणून आमच्यावर आरोपी सिद्ध करणे आणि आम्हाला त्यासाठी शिक्षा देवविणे हे सर्व शासनच करणार होते, असे असूनही अभियोग प्रकटपणे चालविण्याच्या शासनाच्या निर्णयाने आमच्या मनात शासनाविषयी आभारभावना उभी राहिली.

आम्हा आरोपींना आपापल्या क्रमांकाप्रमाणे आरोपीच्या पिंजऱ्यात तीन ओळीत बसविले गेले. पहिल्या ओळीत नथुराम, नाना आपटे आणि करकरे, दुसऱ्या ओळीत मदनलाल, दिगंबर बडगे आणि शंकर किस्तैया आणि तिसऱ्या ओळीत गोपाळ गोडसे, सावरकर आणि डॉक्टर परचुरे. हा क्रम नंतर बदलला होता. सावरकरांना पहिल्या ओळीत बसण्याची व्यवस्था केली गेली होती.

बोललेले सर्वदूर ऐकू जावे म्हणून ध्वनिक्षेपकांची तोंडे ठिकठिकाणी बसविली होती. आरोपींच्या प्रत्येक ओळीला एकेक तोंड होते. दोन्ही पक्षांच्या वकीलवर्गासाठी साक्षीदाराच्या कठड्यात आणि न्यायमूर्तींच्या पटलावर (म्हणजे टेबलावर) ध्वनिक्षेपकाची व्यवस्था होती.

बचावपक्षाचे वकील थोडेच होते. सर्वश्री अण्णाराव भोपटकर, जमनादास मेहता, लाला गणपतराय (दिल्ली), कुंजविहारी, भोपटकर, इनामदार (ग्वाल्हेर). हे सर्व आपल्या ठिकाणी बसले.

श्री. दप्तरी शासकीय वकील होते. त्यांच्या साहाय्याला श्री. पेटीगारा, श्री. शहा आणि श्री. ज्वालाप्रसाद (दिल्ली) होते. ते आपापल्या जागी बसले.

वार्ताहितरकांना त्या दिवशी छायाचित्रे घेण्याची अनुज्ञा होती. स्थिरचित्रे आणि चलचित्रे घेण्याची यंत्रे आमच्यावर रोखली गेली होती. न्यायमूर्तींच्या आगमनाचीच खोटी होती.

दहापूर्वी अर्धे मिनिट पंजीकाराने (रजिस्ट्रारने) न्यायमूर्ती येत असल्याची सूचना

दिली. गडबड शांत झाली. सर्वजण सावध होऊन बसले.

दहाला न्यायमूर्ती श्री. आत्मचरण न्यायालयात आले. त्यांच्या अभिवादनासाठी सर्वजण उभे राहिले. न्यायमूर्ती आसनाजवळ आले, त्यांनी नम्र होऊन अभिवादनाचा स्वीकार केला आणि प्रत्याभिवादन दिले. सर्वांना बसा असे खुणावून ते स्थानापन्न झाले.

चलत चित्रकारांनी आपापली यंत्रे सरसावली. डोळे दिपवणारे स्फुर प्रकाश (फ्लॅशलाईट) एकापाठोपाठ एक चमकले आणि विझले. चलतचित्रकारांच्या प्रकाशात न्यायालय न्हाऊन निघाले. चार-पाच मिनिटे चित्रीकरण चालू होते.

वार्ताविवरण संस्थेने म्हणजे प्रेस न्यज एजन्सीने चलत्चित्रांची दोन मिनिटे चालणारी एक चित्रावली बोलपटगृहातून दाखविण्यासाठी बाटली होती. ती अनेक बोलपटगृहांतून 'वार्ता' या स्वरूपात दाखविली जाऊ लागली. ती चित्रावली येताच ठिकठिकाणी बोलपटगृहांतील लोकांकडून आरोपींचे जयजयकार होऊ लागले. शासनाने हस्तक्षेप केला आणि ती चित्रपट्टी (फिल्म) दाखविणे बंद केले.

निःपक्षपणे बोलायचे तर शासनाची तेव्हाची कृती मला दोषार्ह वाटत नाही. एखाद्या प्रकरणाची छाननी करण्याचे काम एखाद्या न्यायालयावर सोपविले गेल्यावर न्यायालय कोणत्याही पक्षी पूर्वग्रहलिप्त होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक असते. एखाद्यावर काहीही आरोप आला तर त्याची न्यायालयीन चौकशी चालू असताना त्याच्या निषेधाची सभा घेणे न्यायदानाच्या दृष्टीने हानिकारक असते म्हणून विधीच्या दृष्टीने आक्षेपार्ह असते. तसेच अभिनंदनाच्या सभाही त्या दिवसात तितक्याच हानिकारक म्हणून आक्षेपार्ह असणार असे मानणेच सयुक्तिक होईल. न्यायालय आरोपींची चौकशी करीत होते. न्यायाचे काम चालू असताना शासनाने त्या चलत्चित्रावर बंदी घातली हे मला अयोग्य वाटत नाही, उलट शासनाने समतोल न्यायदानाला सहाय्य केले असे माझे मत आहे.

याच्या उलट एक उदाहरण म्हणजे खटला चालू असताना सरदार वल्लभभाई पटेल एकदा ग्वाल्हेरला गेले होते. तेथील एका सभेत ते म्हणाले, 'गांधीजींची हत्या ज्या शस्त्राने झाली ते शस्त्र ग्वाल्हेरातून गेले ही गोष्ट ग्वाल्हेरला उणेपणा आणणारी आहे.' सरदार पटेलांच्या या विधानावर बचावपक्षाच्या वकिलांनी आक्षेप घेतला होता.

ते शस्त्र ग्वाल्हेरातून गेले होते काय, त्याच शस्त्राने गांधीजींची हत्या झाली काय अशा प्रश्नांची अद्याप छाननीच चालू होती. न्यायालयाने आपले मत अद्याप दिले नव्हते. अशा स्थितीत पटेलांच्या विधानांनी न्यायालयाच्या कक्षेचा अधिक्षेप होतो असे बचावपक्षाच्या वकिलांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणले. त्याचा परिणाम असा झाला की, न्यायालयावर प्रभाव पडेल किंवा न्यायालय कलुषित होईल असे विधान कोणा मंत्र्याने नंतर केले नाही.

चित्रीकरणाची गडबड संपली. सर्वजण आपापल्या जागी बसले. शांत, गंभीर

वातावरणात श्री. दफ्तरी उभे राहिले. त्यांनी न्यायमूर्तींना अभिवादन केले. आरोपींविरुद्ध लिहिलेले आरोपपत्र म्हणजे Charge Sheet त्यांनी वाचले व न्यायमूर्तींना प्रस्तुत केले.

नंतर बचावाची पाळी होती. पण आरोपींच्या वकिलांची व्यवस्था झाली नव्हती. सावरकर आणि डॉक्टर परचुरे यांचे तेवढे वकील होते. ज्या आरोपींना न्यायसहाय्य-समितीच्या वतीने वकील पाहिजे असतील, त्यांच्यासाठी वकिलांची योजना करण्याकरता श्री. भोपटकर यांनी न्यायालयाकडून अवधी मागून घेतला.

न्यायमूर्तींनी आरोपींना वकिलांचे संबंधात विचारले. दिगंबर बडगे याने वकील नको असे सांगितले. तो क्षमेचा साक्षीदार होणार असल्याचे आधीच कळले होते. शंकर किस्तैय्याने न्यायपरार्शमक म्हणजे Amicus Curie मागितला. आरोपीला आपले म्हणणे मांडण्याची, आपल्या कृत्याचे समर्थन करण्याची किंवा आरोप निराधार आहे असे सिद्ध करण्याची संधी मिळावी म्हणून न्यायालय त्याला वकील देऊ करते. न्यायालयाने असा वकील नेमला तरी तोही त्या आरोपीचे हित बघत असतो.

श्री. भोपटकरांनी आरोपींच्या भेटीच्या सोयीसाठी न्यायालयाला विचारले. त्यावर बंदिगृहाच्या अधिकाऱ्यांकडून किंवा जिल्हाधिकाऱ्यांकडून भेटीची सोय व्हावी असा न्यायालयाने आदेश दिला.

साक्षीदारांच्या निवेदनाचा सारांश दि. २-६-१९४८ पर्यंत बचावपक्षाला दिला जावा असा आदेश न्यायालयाने दिला. दि. ६-६-१९४८ ला न्यायालय पुन्हा भरेल आणि १४-६-१९४८ ला अभियोगाला प्रारंभ होईल असे ठरून त्या दिवसाचे काम संपले.

आम्ही बंदिगृहात आलो. आम्हाला नेण्या-आणण्याची व्यवस्था मुंबई आरक्षी दल करीत असे. दिल्लीचे बंदिगृह पंजाब कारागिभागाच्या अंतर्गत होते. या विशेष बंदिगृहाची व्यवस्थाही पंजाब कारागिभागाच्या कर्मचाऱ्यांकरवी झाली होती. बंदिगृहाला अधीक्षक मात्र मुंबई विभागातून आणले गेलेले श्री. मास्कोविच नावाचे एक रशियन गृहस्थ होते. बंदिपाल श्री. भगतराम म्हणून होते.

मुंबई आरक्षी दल आणि दिल्ली आरक्षी दल यांच्यात काहीसे बितुष्ट होते. त्याचे स्वरूप पुष्कळदा आमच्याही निदर्शनाला येत असे.

बंदिगृहाला खोल्यांसमोरच स्वयंपाकघर होते. एक स्वयंपाकी होता आणि त्याला एक सहाय्यक दिला होता. त्या आवारातील एका भागात पहारेकऱ्यांची राहण्याची जागा होती.

जेवणाची आम्हाला एक थाळी, एक भांडे आणि एक वाटी दिली गेली होती. खोल्यातून वाखाने विणलेल्या चारपाया होत्या. प्रत्येकाला एक पटल आणि एक तिपाई दिली गेली होती.

उन्हाळा वाढू लागला होता. खोल्यांना दुसऱ्या अंगांनी खिडक्या नव्हत्या. मागची भिंत त्या किल्ल्याची शेवटची भिंत होती. प्रत्येक खोलीच्या दाराजवळच एकेक विजेचा पंखा दिला गेला होता.

न्यायालयातून परत आल्यावर आम्ही आपापले सामान खोल्यातून लावले. मग निवांतपणे बोलत बसलो. पहिल्या पहिल्याने तरी, कोणाचे संबंधात काय पुरावा गोळा केला आहे, या विषयावाचून आम्हाला दुसरा विषय नव्हता.

आठवडाभर सुट्टी होती. न्यायालय नसले म्हणजे आम्हाला दुपारी बारा ते तीनपर्यंत खोल्यातून बंद करून ठेवीत. रात्रीच्या बंदीची वेळ संध्याकाळी सहाची असे. सकाळी साडेसहा वाजता आम्हाला उघडत असत.

शेजारच्या खोल्यांतील लोकांशी आम्ही बंद झाल्यावर ओरडून बोलत असू. दिवसा पत्ते किंवा बुद्धिबळे खेळून वेळ घालवीत असू. प्रत्येकाच्या मनात अभियोगातील निष्पत्तीची भीषणता खोल कोठेतरी वावरत असली तर असेल, पण सर्वांचजण एकाच नावेत असल्याने कोणीही तशी प्रकारचे दडपण वर वर तरी दाखविले नाही. समवयस्क मंडळीत, एकमेकांशी बागण्यात त्या त्या वयाला शोभेल असा अवखळपणा किंवा खेळीमेळीची वृत्ती होती.

आम्हा आरोपींचे तर अद्याप शिक्षेशी लग्नही झालेले नव्हते ! मी सुटून जाईन असे मनचे मांडे खाण्यात दुःखाची छटाही मनाजवळ फिरकत नाही. बंदिगृहाच्या वातावरणात आम्ही हळूहळू वातानुकूल बनत होतो आणि खेळण्या-बागडण्यातील आनंद उपभोगीत होतो.

कोणा अधिकाऱ्याच्या मनात कोणत्या नियमांचा काटेकोरपणा केव्हा उभा राहील ते सांगता येत नाही. सावरकरांना आर्थर रोड बंदिगृहातून दिल्लीला नेले होते. मुंबईला बंदिगृहात त्यांना स्नानासाठी एक लंगोटी दिली होती. ते दिल्लीला आले तेव्हाही ती त्यांच्याजवळ होती.

झडतीचा विधी झाला होता. बहुधा प्रत्यही होत असे. विशेष बंदिगृहात आल्याला आम्हाला चारपाच दिवस झाले असतील. बंदिपाल एकदा सहज सकाळीच आमच्या कोठड्यात आला.

काही अवांतर बोलणे झाले. एकाएकी बंदिपालाचे लक्ष तारेवर वाळत असलेल्या लंगोटीकडे गेले. नाडी शिवलेली होती. ती त्यांना खटकली. त्यांच्या मनात नियमांचे शब्द उभे राहिले. 'स्वतःच्या जिवाला अपाय करता येण्याजोगे कोणतेही साधन बंद्याजवळ असता कामा नये.'

अतिशय नम्रतेने त्यांनी सावरकरांजवळ ती लंगोटी मागितली.

सावरकर म्हणाले, 'मला ती स्नानाच्या सोयीसाठी दिली गेली आहे.'

'पण आमच्या नियमात ती बसत नाही. आमच्या म्हणजे पंजाब कारासंहितेच्या.' बंदिपाल म्हणाले.

'तुम्हाला दुसरी काही सोय करता येत असेल तर बघा आणि घेऊन जा लंगोटी -!' सावरकरांनी सांगितले.

बंदिपाल म्हणाले,'अपसमज करून घेऊ नका कृपा करून ! लंगोटीला आमचा आक्षेप नाही ! नाडी काढून घेतो आणि लंगोटी परत धाडतो !'

न कळत संभाषणाला विनोदाचे रूप येऊ लागले. सावरकर म्हणाले, 'लंगोटी कमरेला धरून रहावी म्हणून मला डिंक देणार का ?'

आता सावरकरांना तर दुखवायचे नाही आणि नियमाचे पालन करायचे या जाणीवेने बंदिपाल काहीसे खेदाने म्हणाले, 'ते आमच्या नियमात नाही हो !' पण लगेच त्यांनी पुरवणी जोडले, 'दुसरी काय सोय करता येईल ते आम्ही नियमात बघतो किंवा वरिष्ठांना विचारतो.'

बंदिपाल निघून गेले. पहारेकऱ्याने लंगोटी नेली. बंद तोडून ती पुन्हा आणून बाळत टाकली.

संध्याकाळी बंदिपाल काही कामासाठी कोठडीत आले. सकाळचा विषय एव्हाना मनातून निघून गेला होता. सावरकरांच्या खोलीपाशी बंदिपाल बोलत उभे होते. काही बोलणे झाल्यावर सावरकरांनी बंदिपालांना खोलीत येण्यास सांगितले.

सावरकरांनी चारपाईवरील चादर दुमडली, बंदिपालांना ते म्हणाले, 'बघा !'

'का बरे ? ढेकूण आहेत का ? चारपाया तर नव्या आहेत ?' बंदिपाल म्हणाले.

'नाही, ढेकूण नाही झाले अपाय. पण ही दोरी ?'

चारपायी म्हणजे बाज. बाजेला पायगती चांगली पंचवीस तीस फूट दोरी होती. सावरकर पुढे म्हणाले, 'तुम्हाला गम्मत म्हणून सांगतो. एखाद्याला दहा जीव असतील तर ते सर्व जीव शून्य करण्याइतकी लांबी या दोरीला आहे.'

बंदिपाल पेचात पडले. कुठे तरी चुकले आहे असे त्यांना वाटले. लंगोटीची दीड फूट नाडी त्यांच्या मनात खटकू लागली. पण त्यांचे नियमांचे ज्ञान चांगले होते. म्हणाले. 'चारपायी नियमाप्रमाणे बनवली आहे. ही दोरीही नियमातलीच आहे. ती कशी कोण काढून घेईल ?'

खरे म्हणजे आम्हाला सर्वांनाच त्या गंमतीत भाग घ्यावासा वाटला. आमच्यापैकी कोणीतरी म्हणाले 'म्हणजे नियमाच्या बाहेरच्या साधनाने अपाय करून घेण्यास प्रतिबंध आहे, असेच ना ?'

बंदिपाल म्हणाले, 'नियमाप्रमाणे तरी असेच दिसते.' मग सावरकरांकडे वळून

म्हणाले, 'मी आपली लंगोटी नाडी लावून धाडतो.'

सावरकर म्हणाले, 'तुम्ही नियमाचे पालन काटेकोरपणे केलेत तरी त्यात काही बिघडत नाही, पण आंधळे दळते आणि कुत्रे पीठ खाते असे नियमांचे कार्यवहन असू नये अशी अपेक्षा असते. नियम तुमच्या आणि आमच्या सोयीसाठी आहेत. नियमांचा वापर करताना तो हेतू असावा.'

बंदिपाल म्हणाले, 'आपली म्हणजे आपल्या कोणाची अडचण करण्याचा हेतू नाही. काही नियम चमत्कारिक असतात खरे.'

खेळीमेळीच्या त्या संभाषणाचा सावरकरांनी समारोप केला, 'मग कधी नियम आणि डोके यांची सांगड घातली जावी.'

बंदिपाल अभिनयकुशल होते अशी माझी धारणा आहे. आपल्या बोलण्याला सुसंगती येईल अशा आविर्भावाने त्यांनी गंभीरपणे उत्तर दिले, 'पण तसा नियम नाही ना.'

आमच्या हास्यस्फोटात मात्र मुक्तमुखाने सहभागी झाले.

वरील विनोदी प्रसंग सोडला तरी काही वेळा नियमांची रचना सदोष असते असे त्या त्या प्रसंगी लक्षात येते. कधी एखाद्या नियमातून एकापेक्षा अधिक अर्थ निघतात. कोणता अर्थ लावायचा हे त्या अधिकाऱ्यावर अवलंबते. कधी दुराग्रहाने विशिष्ट अर्थ लावला जातो. त्यामुळे जी सोय चटकन व्हायची तिच्यासाठी पत्रव्यवहार करावा लागतो आणि सहा सहा महिने वाट बघावी लागते. मला नोव्हेंबर १९६४ मध्ये स्थानबद्ध केले त्या वेळी असा एक प्रसंग घडला.

किती दिवस बंदिवास आहे ते निश्चित नव्हते. स्थानबद्धता भारत संक्षणविधीखाली केली होती. मी घरचे कपडे वापरीत होतो. कपडे फाटत आले होते. शासनानेच कपडे पुरविण्याचा उपबंध (provision) नियमात आहे. पण त्याला परंतुके म्हणजे proviso आहेत. ती परंतुके सदोष आहेत हे माझ्या लक्षात आले.

मला कपडे दिले जावेत म्हणून मी विनंती केली. काही महिन्यांनी उत्तर आले, 'शासन कपडे पुरवणार नाही; घरच्या मंडळींनी किंवा मित्रांनी कपडे पुरवावेत.'

घरची स्थिती मला ठाऊक होती. सत्यानारायण प्रकरणातील स्थानबद्धांच्या गाठीभेटी घेण्यात आणि न्यायालयात त्यांची आवेदने प्रविष्ट करण्याची व्यवस्था करण्यात पत्नीची किती ओढाताण होत होती ते मी बघत होतो. माझ्यासाठी कपडे करून आणण्याचा आणखी भार तिच्यावर टाकावा हे मला प्रशस्त वाटेना.

शब्द टाकला असता तर कोणीही हितचिंतकाने कपडे पुरविले असते. पण दुधाने तोंड भाजल्यावर ताकही फुंकून प्यावे लागते. सतरा वर्षांनी मी सुटून आलो होतो. मला समाजात सामावून घेण्यासाठी मित्रांनी सहाय्याचा हात पुढे केला होता. त्यांचा हात त्यांत

भाजला होता. त्यांच्या वाट्याला बंदिवास आला होता.

कोणा मित्रांनी कपडे पुरविले असते तर न जाणो कोणाला तरी त्या वस्त्रदानात 'गोडसे - प्रवृत्ती' दिसली असती. आपण शासनाला भडकावले तर शासन आपले ऐकते असा त्यांचा अनुभव असल्याने, या कपडे देणाऱ्या लोकांनाही बंदीत टाका असा त्यांनी टाहो फोडला असता. शासनाला आपल्या त्या तथाकथित भीतिग्रस्त अर्भकाची दया आली असती आणि मग आधीच निष्कारण अटकेत पकडलेल्या लोकांच्या संख्येत भर पडली असती.

दुसऱ्या दृष्टिकोनातून विचार करूनही, मला त्या कपड्यासंबंधीच्या नियामत दोष दिसत होता. अन्न, वस्त्र आणि निवारा या मूलभूत आवश्यकता आहेत. एखाद्याला आपल्या स्वाधीन केले म्हणजे त्यांना नड असेल तर शासनाने या आवश्यकता पुरविल्या पाहिजेत असे माझे मत होते. इतर स्थानबद्धांना कपडे दिले गेले होते. दिले जात होते. हे मी बघत होतो. मला मिळालेले उत्तर दुराग्रही होते असे मला वाटत होते.

मी मुंबईच्या उच्च न्यायालयात आवेदन केले. (Criminal Application No. 1504 of 1965, 1-10-1965) मला कपडे पुरविण्यासाठी शासनाने माझ्या पत्नीला विचारले यावर मी आक्षेप घेतला. ज्या नियमाने शासनाने असे केले तो नियमच विधीशी विसंगत आहे असे माझे म्हणणे मांडले. मूलभूत आवश्यकता शासनानेच पुरविल्या पाहिजेत असा आग्रह धरला. पर्यायी, कपडे पत्नीने पुरवावेत अशी अपेक्षा असेल तर कपडेच का, अन्न आणि निवारासुद्धा ती पुरवील, मात्र शासनाने मला तिच्या स्वाधीन करावे, म्हणजे तिलाच माझ्यावर बंदिपाल म्हणून नेमून तिच्याकडून माझ्या स्थानबद्धतेचे कार्यवहन करून घ्यावे असे सुचविले.

प्रथमदर्शनी माझा युक्तिवाद पटल्याने न्यायालयाने माझे आवेदन प्रविष्ट करून घेतले, सुनावणीचा दिवस नेमला.

सुनावणी होण्यापूर्वीच दि. ३०-११-१९६५ ला माझी सुटका झाली. आवेदन ठरलेल्या दिवशी न्यायालयापुढे आले. न्यायालयाने आवेदनाच्या व्यय एकशे दोन रुपये मला शासनाकडून देवविला. या गोष्टीसाठी स्थानबद्धाला आमच्याकडे यावे लागण्याचा प्रसंगच का आणलात असे न्यायालयाने शासनाला विचारले होते. असो.

दि. २७-५-१९४८ या दिवशी न्यायालयाने दिलेल्या आदेशाप्रमाणे ३-६-१९४८ ला आम्हाला न्यायालयात नेले. चौकशी चालू होती. त्या दिवसात आम्हाला 'क' श्रेणीचे बंदी म्हणून वागविले जात असे. आम्हाला वरचा वर्ग मिळावा म्हणून न्यायालयाला विनंती केली.

अभियोजकांचा काही आक्षेप नव्हता, सर्वांना ब वर्ग दिला जावा असे त्यांनी आपले

अभिमत दिले. न्यायालयाच्या आदेशाने आम्हाला ब वर्ग दिला गेला.

ठरल्याप्रमाणे अभियोजकांनी साक्षीदारांच्या निवेदनाची एक प्रत श्री. भोपटकर यांना दिली. या दिवशी आपटे, करकरे, गोपाळ गोडसे यांच्यासाठी श्री. के. जे. तुआ या वकिलांची तात्पुरती व्यवस्था करण्यात आली. परंतु सर्वांची सोय अद्याप झालेली नव्हती. म्हणून आणखी काही दिवसांचा अवधी श्री. भोपटकर यांनी मागितला. न्यायालय पुन्हा दि. १४-६-१९४८ या दिवशी भरले आणि त्यानंतर आठ-एक दिवसांनी म्हणजे दिनांक २२-६-१९४८ पासून अभियोगाच्या कामाला अविरतपणे आरंभ होईल असा आदेश न्यायमूर्तींनी दिला.

दि. १४-६-१९४८ ला विशेष काम झाले नाही. नथुरामसाठी श्री. व्ही. व्ही. ओक वकील आणि गोपाळ गोडसेसाठी श्री. एम्. व्ही. मणियार वकील यांची नियुक्ती श्री. भोपटकरांनी केली होती. हे वकील न्यायालयात आले होते.

दि. २२-६-१९४८ ला न्यायालय भरले. मध्यंतरी दि. १४-६-१९४८ ला भारत शासनाने एक राजपत्र काढले. त्या अन्वये क्षमेच्या साक्षीदाराला क्षमा करण्याचा अधिकार विशेष न्यायमूर्तींना देण्यात आला. बडगे सर्व वृत्तान्त सांगण्यास सिद्ध आहे, त्याला त्या अटीवर क्षमा केली जावी असे आवेदन अभियोजकांनी न्यायालयात दि. १७ जूनला दिले. बडगेने आपले वक्तव्य दि. २१ जूनला न्यायमूर्तींपुढे दिले. त्याला तो सर्व खरे खरे सांगेल तर क्षमा केली जाईल, असे न्यायमूर्तींनी आश्वासन दिले.

श्री. एच्. आर. मेहता म्हणून शंकर किस्तैयासाठी दि. १७ जूनला वकील नेमले गेले. श्री. नवलकर आणि कुमारी कमलम्मा यांना अनुक्रमे मराठी आणि तेलगू भाषांचे दुभाषे म्हणून दि. १९-६-१९४८ ला नेमले गेले.

मध्यंतरी पडणाऱ्या लांब लांब सुट्ट्यांचा आम्हाला कंटाळा येई. पुढे अभियोग चालू झाल्यावर काही वकील कोणतातरी वाद उपस्थित करीत; निर्णय विरुद्ध गेला तर त्या वादाचा निर्णय उच्च न्यायालयातून लागलीच करून घेण्यासाठी एखाद्या महिन्याचा अवधी मागून घेत. आम्हाला वाटे, या अभियोगाचा निर्णय लवकर लागावा ही आमची उत्कंठा या वकीलांना कळत नाही काय ? ती कळत असली तर हे असा अवधी का मागतात ? कधी आम्ही वकीलांना विचारीत असू. त्यांचे म्हणणे असे की, काही मूलभूत प्रश्न लगेच सोडवून घेतले तर त्यांचा सर्व अभियोगावर चांगला परिणाम होण्याची शक्यता असते. दुसरे, अभियोग लांबला तर कालावधी अधिक जात असल्याने त्या घटनेतील कठोरता मंदावते. आम्हाला ते पटत नसे. आम्ही सर्वजण अवधी मागण्याला विरोध करीत असू.

वेळ घालविण्याला आमच्याजवळ काही पुस्तके, काही खेळण्याची साधने जमू लागली होती. नाना आपटे यांच्याकडून बुद्धिबळाचे धडे मी नुकतेच घेतले होते. मदनलालही खेळत असे. त्या खेळात मन असे एकाग्र होई की, श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांच्या विनोदी वर्णनाची

आठवण व्हावी.

नाना आणि मी एकदा खेळत होतो. ती चहाची वेळ होती, खेळता खेळताच आम्ही आपापल्या भांड्यातून चहाचे घोट घेत होतो. नथुराम मध्येच खेळाकडे बघे, मध्येच इकडे तिकडे फेऱ्या मारून कोणाशी तरी बोले. त्याने आपले भांडे आमच्या टेबलावर ठेवले होते. मध्येच येऊन तो घोट घेई.

'तुझा चहा संपला म्हणजे सांग हं!' नथुराम मध्येच म्हणाला. मी चमकून वर पाहिले. नथुराम टेबलावरील भांड्याकडे बघत होता. मी तिकडे पाहिले. नथुरामसाठी आलेली कॉफी मीच संपवत आणली होती. माझे चहाचे भांडे तसेच होते ! खेळाच्या नादात चहा आणि कॉफी यातले अंतरही माझ्या लक्षात आले नाही !

डाव पडत चाललेला पाहताच, जणू काही आपले राज्य नष्ट होत आहे असा अभिनिवेश त्या खेळात कधी कधी येतो. मदनलालपेक्षा मी बरा खेळू लागलो होतो. एकदा आम्ही खेळत होतो. त्याचा प्रधान माझ्या तडाख्यात येत होता. मी त्याला तशी सूचना दिली. एकदा नव्हे दोनदा ! त्याने दुसरी चाल टाकली. तिसऱ्या वेळी प्रधान पुन्हा माझ्या तडाख्यात आला. मी सरळ माझे मोहरे त्या घरात ठेवले आणि प्रधान उचलू लागलो. मदनलालने माझ्या हातातून प्रधान काढून घेतला, म्हणाला, 'नाही, प्रधान नाही घेता येणार ! मी अजून प्रधानावरून हात नव्हता उचलला !'

मी त्याला नियम सांगितला, 'मोहऱ्याला हात लावला की तेच उचलले पाहिजे.' पटावरची स्थिती दाखवून मी म्हटले, 'प्रधान कोठेही ठेव, तो माझ्या तावडीत येत आहे. मी तो मारणार !'

'मी देणार नाही ! कसा मारतोस बघू.' असे म्हणून मदनलाल उठला आणि पळत दुसऱ्या टोकाला न्हाणीघर होते तेथे गेला !

साबरकर न्हाणीघरातून बाहेर पडत होते. ते म्हणाले, 'काय रे, धावपळ काय आहे ?' मदनलाल थोडा बरमला. म्हणाला, 'काही नाही, माझा प्रधान मारतो आहे तो !'

'कोण ?'

'गोपाळ.'

'अन् मग तू पळून आल्याबर त्याला रान मोकळे झाले.'

मदनलालने हात उघडून दाखविला. म्हणाला, 'आता कसा मारील ? मी प्रधानच इकडे घेऊन आलो आहे !'

साबरकरांची हसता हसता पुरेवाट झाली. आम्ही तर हसतच राहिलो होतो. मदनलालला बुद्धिबळे 'चढली' होती. ती उतरायला आणखी दोन-चार मिनिटे लागली ! आपण बालिशपणा केला याची जाणीव होताच तो सरळ आपल्या खोलीत जाऊन बसला !

गोपाळशी पुन्हा कधी बुद्धिबळ खेळायचे नाही, अशी आपली प्रतिज्ञा त्याने बोलून दाखवली. दुसऱ्या दिवशी संध्याकाळपर्यंत !

पत्त्यात सहसा नाना आणि विष्णुपंत करकरे भागीदार असत. नेहमीच भागीदार झाले की आपल्याला काही खुणा किंवा तंत्रे ठरविली जातात. एकदा मी आणि नाना भागीदार झालो. करकरे आणि मदन विरुद्ध होते, टेबलाखाली मला कुणाचातरी पाय लागला, मी पाय आवरून बसलो. थोड्या वेळाने करकरे एकाएकी म्हणाले, 'नाना, पाय माझा दाबलात तुम्ही !'

खेळाची साधने असूनही पुष्कळदा खेळ कंटाळवाणा वाटे. त्याचे मुख्य कारण फार मर्यादित जागेत आम्हाला वावरावे लागे. आमची जागा मुंबईत आम्हाला ठेवले होते त्या कोठ्यापेक्षा मोकळी होती. त्या मोकळेपणाचा आनंद प्रथम आम्हाला झाला होता. पण न्यायालय नाही म्हणजे त्यापेक्षा अधिक मिळणारा मोकळेपणा नाही, त्यामुळे पायांना हालचाल नाही, मनाला आनंद नाही, अशी तुलना मनात येई. नुसते बंदिगृहातील ठराविक जागेत वावरणे जाचक वाटत असे.

त्या जाचांचे विश्लेषण आज मला करता येते. स्वतंत्रता हा मनुष्याचा सहजस्वभाव. परतंत्रता आली म्हणजे स्वातंत्र्याचे मूल्य कळते. स्वतंत्र मनुष्य वेळोवेळी तासन्‌तास एका खोलीत स्वत:ला कोंडून घेईल; पण ते आपल्या मनाने. तशी बंदी त्याच्यावर लादली गेली की, त्याला परवशतेच्या वेदना होऊ लागतात. कोणाला बंदिवासात टाकले आणि तेथे त्याच्या सुखासाठी कितीही साधने उपलब्ध करून दिली, तरी त्यातून त्या बंदिवासामुळे त्याची जी मनाची स्थिती होते त्याची भरपाई होत नाही.

दि. २६ जून १९४८ ला न्यायालय भरले. त्या वेळी मदनलालचे वकील श्री. बॅनर्जी सोडून इतर सर्व उपस्थित होते. बचावासाठी वकील नेमले गेले ते असे : श्री, ओक - नथुराम, श्री. मेंगळे - आपटे, श्री. ढांगे - करकरे, श्री. बॅनर्जी - मदनलाल, श्री. मेहता - शंकर किस्तैया, श्री. मणियार - गोपाळ, श्री. भोपटकर - सावरकर, श्री. इनामदार - डॉ. परचुरे - काही दिवसांनी श्री. मणियार आजारी पडले. गोपाळचा (माझा) बचाव श्री. इनामदार पाहू लागले. श्री. भोपटकर सावरकरांसाठी म्हणून असले, तरी सर्वसामान्यपणे बचावाच्या दिशेचे ते मार्गदर्शन करीत, श्री. गणपतराव - राय, श्री. जमनादास मेहता इत्यादी वकील सावरकरांच्या बचावाव्यतिरिक्त सर्व अभियुक्तांना सहाय्य देत.

या अभियोगातील अभियुक्तांना न्याय मिळावा म्हणून आपलेही सहाय्य आहे याचे निदर्शक म्हणून अनेक प्रांतातील वकील वेळोवेळी न्यायालयात येत, वकीलपत्रे प्रस्तुत करीत. बचावपक्षाच्या वकीलवर्गाशी विचारविनिमय करीत आणि तेथे राहण्याची आवश्यकता नाही हे बघून जात. बंगालमधून श्री. मित्र आणि मद्रासहून श्री. गणपती हेही असेच आपली

उपस्थिती लावण्यासाठी आले होते. श्री. पी. आर. दास यांनी तर सावरकरांसाठी उपपादन म्हणजे argument ही केले होते. योगायोग असा की, श्री. दास यांच्या बंधूंनी श्री. अरविंद घोष यांना न्यायसहाय्य दिले होते आणि त्यांची निर्दोष म्हणून मुक्तता करवून घेतली होती.

दि. २२ जूनला आमच्यावर न्यायालयाने आरोप ठेवले. करकरे आणि शंकर किस्तैया यांना त्यांच्या दुभाष्यांनी आरोप समजावून सांगितले. प्रत्येक आरोपीला त्या आरोपासंबंधी न्यायमूर्तींनी विचारले. आरोपींनी आरोप नाकारले. आरोप नाकारताना मदनलालने एक लेखी वक्तव्य दिले. तो म्हणाला, 'गांधींना काही दुखापत करावी या हेतूने कट झालाच नव्हता, गांधीजींच्या मुस्लिम अनुनयाच्या धोरणामुळे हिन्दुस्थानभर जो असंतोष पसरला त्याचे प्रतीकात्मक निदर्शन म्हणून मी दिनांक २०-१-१९४८ ची घटना (स्फोटकाचा स्फोट) केली होती.' डॉक्टर परचुरे यांनी आरोप नाकारताना सांगितले, 'मी ग्वाल्हेरचा रहिवासी आहे.' बचावाचे एक विधेय मांडण्यासाठी त्यांनी ती वस्तुस्थिती सांगितली होती. गांधी-हत्या झाली तेव्हा म्हणजे दि. ३०-१-१९४८ ला ग्वाल्हेर उर्वरित हिन्दुस्थानात विलीन झालेले नव्हते. परचुरे यांना भारत शासनाने आपल्या स्वाधीन घेताना प्रत्यर्पण अधिपत्र किंवा Extradition warrant घेतले नव्हते. त्यांना या न्यायालयापुढे उभे करणे मुळातच अवैध असल्याचा त्यांचा आग्रह होता.

आरोपींनी आरोप नाकारल्यावर श्री. दप्तरी यांनी खटल्याची भूमिका सांगण्यास आरंभ केला. दिवसाच्या शेवटी त्यांनी घटनास्थळ बघण्याची न्यायालयाला विनंती केली.

खऱ्या-खोट्याची छाननी करताना पुष्कळ प्रकरणात घटनास्थळ बघणे आवश्यक असते. अशी सूचना कधी अभियोजकांकडून येते तर कधी बचावपक्षाकडून. कधी कधी न्यायालय आपल्या अधिकारात घटनास्थळ बघते.

दि. २०-१-१९४८ ला स्फोट झाला ते स्थळ आणि गांधीजी बसत ते स्थळ यातील अंतर न्यायालयाच्या निदर्शनाला आणावे आणि दि. २० च्या घटनेचा दिनांक ३० च्या घटनेशी काही संबंध नाही असा युक्तिवाद मांडणे शक्य व्हावे, म्हणून न्यायमूर्तींनी घटनास्थळ बघावे अशी बचावपक्षाचीही इच्छा होती.

आरोपींची इच्छा असेल तर त्यांनाही तेथे जाता यावे म्हणून न्यायमूर्तींनी आरोपींना विचारले. नथुरामने सांगितले, 'मला स्वारस्य नाही (It am not particular.).' आपटे यांना न्यायमूर्तींनी विचारले. particualr हा शब्द उच्चलून आपटे म्हणाले, 'मला बघितले पाहिजे (I am vary particular).' करकरे, मदनलाल आणि गोपाळ यांनी होय म्हणून सांगितले.

दि. १४-६-१९४८ ला सकाळी दहा वाजता घटनास्थळ बघण्याचे ठरले. आम्हाला

तेथे नेण्याची व्यवस्था करावी असा न्यायमूर्तींनी आदेश दिला.

न्यायमूर्ती, शासकीय वकील आणि बचावापक्षाचे वकील घटनास्थळावर पोहोचले होते. आम्ही चौघे आरोपी पोलीस गाडीतून नेले गेलो होतो. घटनास्थळाचे सर्व दृष्टिकोनातून निरीक्षण चालू झाले होते.

आमच्याविरुद्ध मांडले गेलेले आरोप सिद्ध करण्याच्या दृष्टीने अभियोजक जी विधाने मांडतील त्यांना प्रत्युत्तर कसे देता येईल या विचाराने आम्ही ते घटनास्थळ बघत होतो. पण तो अगदी लहान भाग होता. तो विचार करण्याचे काम आमच्या विधिज्ञांवर सोपविले होते. एरवी त्रयस्थाने जसे त्या स्थळाचे निरीक्षण करावे, तसेच आम्ही करीत होतो काय ? मला तसे वाटत नाही. ते स्थळ ज्या घटनेमुळे प्रसिद्धी पावले त्या घटनेच्या पार्श्वभूमीशी आम्ही निगडीत होतो आणि ते स्थळ बघताना तो विचार मनात घोळत राहिला होता.

हिन्दुस्थानच्या इतिहासातील एका अध्यायाची जेथे इतिश्री झाली होती, ते ते स्थळ होते. अलिकडील राजकीय जीवनावर अनेक दशके ज्याने प्रभाव पाडला होता त्या व्यक्तीचे जीवन जेथे संपले, ते ते स्थळ होते. एरव्ही शांतताप्रिय असणाऱ्या काही व्यक्तींनी आत्मसमर्पण करावयास प्रवृत्त करणारे ते स्थळ होते.

हिन्दु-मुस्लिम एकतेच्या चुकीच्या व्यवहारामुळे रक्ताने लथपथ झालेला समाज आपली करुण कहाणी गांधीजींना कळावी म्हणून ज्या ठिकाणी जाई, ते ते स्थळ होते. आपले घाव ज्या ठिकाणी बोलके होतील असे त्यांना वाटे, ते ते स्थळ होते. पाउलट, त्या अपहृत व्यक्तींचे व्रण जेथे झाकाळले जात होते, ते ते स्थळ होते. आपल्या अहिंसेचा विजय झाला. रक्ताच्या थेंबाबाचून क्रांती झाली, असे गांधीजींना भासविणारे स्वार्थी स्तुतिपाठक गांधीजींभोवती जेथे जमत, ते ते स्थळ होते. हिन्दुस्थानकडे धाव घेतलेल्या निर्वासितांना पुन्हा निर्वासित करून, निघून गेलेल्या मुसलमानांना परत आणून त्यांची घरेदारे त्यांना दिली गेली पाहिजेत, असे मौलाना आझादांनी गांधीजींकडून जेथे बदवून घेतले, ते ते स्थळ होते. पंचावन्न कोटी रुपये अडविण्याचा निर्णय शासनाला फिरविण्यास लावणारा उपवास जेथे घडला, ते ते स्थळ होते.

आम्ही ते स्थळ बघत होतो आणि हा नुकताच घडलेला इतिहास आमच्या डोळ्यांपुढे उलगडत होता. तो लगतचा भूतकाळ आम्हाला निर्मळ दिसत नव्हता, निःशोणित दिसत नव्हता, जणू तेथले वातावरण आम्हाला रक्ताच्या कणांनी भरलेले वाटत होते. स्वराज्य मिळविण्यासाठी सांडलेल्या रक्ताचे कण त्यात होते. देशविच्छेदनामुळे झालेल्या रक्तापाताचे तुषार त्यात होते. परिणामस्वरूप, गांधीजींचे रक्तही त्याच वातावरणात कणरूपाने वावरत असलेले आम्ही बघत होतो आणि कदाचित त्याची सांगता म्हणून त्या कणांना आणखीही रक्त जाऊन मिळणार होते, आमच्यापैकी कुणाचे तरी.

हे सर्व रक्त स्वातंत्र्या प्रीत्यर्थ आपण मोजले आहे असा विचार मनात आला. नुसत्या ध्वजांतराने सत्तांतराची किंवा स्वराज्याची प्रक्रिया पूर्ण झालेली नव्हती. स्वराज्यापोटी फाळणी होती, फाळणीपोटी रक्तपात होता. रक्तापातापोटी गांधीजींचे प्राण होते आणि त्यांच्या प्राणापोटी आरोपीपैकी काही व्यक्तींचे संभाव्य प्राणार्पण होते. रक्तावाचून स्वराज्य असे शब्द उच्चारताना आपण गांधीजींसकट सर्वांच्या सांडलेल्या रक्ताचा अवमान करतो हे आपल्या लक्षात येत नाही. कारण आपण आत्मवंचना करीत असतो, कोणता तरी स्वार्थ आपल्या विधानामागे दडलेला असतो.

आज जे घटनास्थळ बघण्यास अनेकजण जातात. एक ऐतिहासिक स्थळ म्हणून त्या स्थळाची गणना आहे. मनात येते, गांधीजींच्या आयुष्यातील शेवटच्या दिवसांत त्यांना अतिरेकी निर्णय घेण्यास प्रवृत्त करणाऱ्या व्यक्तींची नावे आणि त्यासाठी पुरावा तेथे ठेवला जावा. त्यायोगे गांधीजींसारख्या एका प्रभावी व्यक्तीची हत्या होण्यास भूमिका कशी बनत गेली याचे प्रेक्षकांना ज्ञान होईल आणि त्या स्थळाशी संबद्ध इतिहासही एकाच दृष्टिक्षेपात कळून येईल.

ते स्थळ बघता बघता आम्ही आरोपी अधूनमधून आमच्या वकिलांशी बोलत होतो, काही प्रश्न विचारीत होतो, काही माहिती घेत होतो. हे बोलणे सर्वांसमोर चालत होते. 'तुम्ही तुमच्या शंका अवश्य विचारा. पण तुम्ही विधान असे कोणते करू नका; अभियोजकांना त्यांचा आरोप सिद्ध करू दे.' अशी सूचना न्यायमूर्तींनी आम्हाला दिली होती. पाहणी संपली. आम्ही आमच्या बंदिगृहात परत आलो. दुपारी दोन वाजता न्यायालय भरणार होते, तेव्हा सर्वच आरोपी न्यायालयात गेलो. न्यायालयाचे काम चालू होते.

दैनंदिन काम काय काय चालले याचे वृत्त न्यायालयीन टिपणात (मिनिटस्‌मध्ये) लिहिलेले आहे. कोण साक्षीदार काय बोलला, किती वेळ बोलला, खरे बोलला, की खोटे, उलटतपासणी कोणी घेतली अशा सर्व गोष्टींना केवळ तात्कालिक महत्त्व असते. सर्व अभियोगाच्या कामकाजाचे सार साकल्याने कळले, की तेवढे प्रस्तुत विषयाला पुरे होईल.

टिपणे घेण्याचे काम दि. २४-६-१९४८ ते ६-११-१९४८ पर्यंत चालले. अभियोजकांनी १४९ साक्षीदार आणले. त्यात मंत्र्यांपासून अभिनेत्यांपर्यंत व भाष्यकारांपासून चर्मकारापर्यंत सर्व थरातील लोक होते. त्यांच्या निवेदनांची पाने ६२० झाली. शासकीय वकिलांनी प्रमाण म्हणून ४०४ कागदपत्रे आणि ८० वस्तू न्यायालयापुढे आणल्या.

बचावपक्षाने ११९ कागदपत्रे पुढे केली. दि. ८-११-१९४८ ते २२-११-१९४८ पर्यंत आरोपींनी आपापली वक्तव्ये दिली. त्यांची पाने २६० झाली.

दि. १-१२-१९४८ पासून ३०-१२-१९४८ पर्यंत उपपादने म्हणजे Arguments चालली. श्री. पी. आर. दास यांनी सावरकरांच्या वतीने उपपादन दिले. नथुरामने स्वतःच

आपले अभिवक्तव्य केले.

अभियोगाच्या मध्यापर्यंतचा म्हणजे सप्टेंबरच्या प्रारंभीपर्यंतचाच व्यय बघितला तर शासनाचे चार लाख रुपये व्यय होऊन गेले होते. श्री. दफ्तरी यांना प्रत्येक दिवशी १५०० रु., श्री. पेटीगारा आणि श्री. शहा यांना प्रत्येक दिवशी प्रत्येकी ६०० रु., श्री. ज्वालाप्रसाद यांना प्रत्येक दिवशी २५० रु. त्याव्यतिरिक्त मुंबईत केलेल्या कामासाठी प्रत्येक तासाला अनुक्रमे ७५ रु, ३० रु. व ३० रु. त्यांना मिळत असत. न्यायालय आणि बंदिगृह यांच्या घडणीसाठी ४७०० रु. लागले. साक्षीदारांच्या खाण्यापिण्यावर ६००० रु. आणि न्यायालयाचे कर्मचारी, इतर लोक इत्यादींवर दि. २७-५-१९४८ ते ८-९-१९४८ या सव्वातीन महिन्यांच्या अवधीत १९,००० रु. व्यय झाले होते. हे काही ढोबळ आकडे आहेत. त्यावरून या अभियोगाच्या स्वरूपाची स्थूल कल्पना येईल.

दि. ३० डिसेंबरला उपपादने (आर्ग्युमेंटस) संपली आणि न्यायालयाचे कामही त्या टप्प्यापुरते संपले होते. तो दिवस लक्षात राहण्यासारखा होता. महाविद्यालयाचा अभ्यासक्रम संपताना विद्यार्थी आणि प्राध्यापक एकमेकांचा निरोप घेतात. पुन्हा आपल्या गाठीभेटी अशा होणार नाहीत ही त्यांना जाणीव होते आणि गतकाळात साहचर्याने निर्माण झालेले प्रेम, त्यातला जिव्हाळा, मनाच्या पृष्ठभागावर येतात. कटुता कधी झाली असेल तर ती विसरली जाते. भावनोत्कट वातावरणात एकमेकांशी बोलून, एकमेकांपासून दूर होण्याचा तो सोहळा असतो.

सात एक महिने आम्ही म्हणजे अभियुक्त, दोन्ही पक्षांचा वकीलवर्ग, न्यायमूर्ती, दुभाष्ये, आरक्षी दल, दुसरे कर्मचारी, एकमेकांना भेटत होतो. प्रत्येकाच्या भूमिका वेगळ्या होत्या. तरीही मनुष्याजवळ मनुष्य आल्यानंतर सहजच निर्माण होणाऱ्या भावना प्रत्येकाच्या मनात निश्चितपणे वावरत होत्या. न्यायालयाचे काम चालू असताना पक्षविपक्षात वाद होते. ते यावेळी विरले होते. आता आपण भेटणार या निर्णयाच्या दिवशी, आता हा मेळावा अशा स्वरूपात पुन्हा भरणार नाही, हेच लोक पुन्हा भेटतील असे नाही या विचाराने त्या दिवसाच्या शेवटी न्यायालयात एक प्रकारे निरोप देण्या-घेण्याचे सोहळ्याचे स्वरूप आले होते.

खटला चालू असताना न्यायमूर्तींचा शांतपणा लक्षात भरण्याजोगा होता. कोणत्या तरी विधेयावर काही वकिलांचे वाद होत, त्या वादाला धार येत असे. वकिलात कटुता राहू नये म्हणून न्यायमूर्ती त्यांना आपल्या वेश्मांत (चेंबरमध्ये) बोलवीत. वकीलही त्या वादापुरतेच उत्तेजित होत असत.

दोन वकिलांचा वाद एकदा तीव्रतेला गेला. न्यायमूर्ती म्हणाले, 'सज्जनहो, हे न्यायालय आहे. तुम्ही बाहेर जाऊन भांडा. इथे केवढा ओरडा हा !' एक वकील चटकन

म्हणाले, 'बाहेर आम्हाला एकत्र चहा प्यायचा असतो. त्या चहामध्ये ही खरखर कशाला !'

सर्व न्यायालयभर हसू पसरले. सर्वांच्याच मनावरील दडपण उतरले. चढलेला पारा खाली आला.

अभियोग मांडताना अभियोजकांनी एक विशिष्ट पातळी सांभाळली होती. शाब्दिक संघर्ष मात्र अनेकदा होत. त्यातला एक प्रसंग असा होता की, बोलण्याच्या ओघात श्री. दफ्तरी यांनी या घटनेचा 'अनैतिक (immoral) अपराध असा निर्देश केला. नथुरामने आपल्या अभिवक्तव्यात त्याचे खंडन केले होते. तो जे म्हणाला त्याचा स्मरणाने सारांश असा देता येईल.

नथुरामने सांगितले, 'नैतिकता किंवा अनैतिकता या प्रश्नाची चिकित्सा करण्याचा या प्रकरणापुरता तरी अभियोजकांना अधिकार नाही, आणि त्या प्रश्नांचा निर्णय करण्याची या न्यायालयाची कक्षा नाही. नीतिच्या कल्पना समाजासमाजांतून, देशादेशांतून आणि शतकाशतकांतून वेगवेगळ्या दिसून येतील. एखाद्या समाजात स्त्रियांनी पडदा न वापरणे अनैतिक समजले जाईल. एखाद्या देशात मद्यपान अनैतिक समजले जाणार नाही. एखाद्या शतकात अब्राह्मणांना वेदविद्या शिकविणे नीतिबाह्य समजले गेले असेल. अशा कल्पना पालटत जात असतात. त्यामुळे नीती-अनीतिचा त्रिकालाबाधित दंडक कोणालाच ठरविता येणार नाही.

'हत्या ही घटना सरसकटपणे अनैतिक असते असेच जर अभियोजकांचे परिमाण असेल तर आज राज्यकर्तेच अनैतिक व्यवहार करतात असे मानावे लागेल; कारण त्यांना प्रसंगोपात गोळीबारही करावा लागतो. हत्या अनैतिक असेच जर धर्माचे तत्त्व असेल, तर आपल्या देवदेवतांना अनैतिक बिरुदावली आहे असे म्हणावे लागेल. त्रिपुरारी, महिषासुरमर्दिनी, मुरारी, अशा विशेषणांनी आपण गौरवाने त्या त्या देवदेवतांना ओळखतो, ते अनैतिक आहे असे म्हणावे लागेल. श्रीकृष्णाने अर्जुनाला युद्धास प्रवृत्त केले, म्हणजेच हत्येला प्रवृत्त केले म्हणून अर्जुनाला अनीती शिकविली असा निष्कर्ष काढावा लागेल. नीती-अनीतिच्या प्रश्नापुरते बोलायचे तर त्या त्या घटनेमागील हेतुतून योग्य तो निष्कर्ष काढायचा असतो असे माझे प्रमेय आहे.

'पुढे नीती-अनीतिचा प्रश्न पुढे आणण्याचा अभियोजकांना वैध तर नाहीच पण नैतिकही अधिकार नाही असे माझे म्हणणे आहे. अमुक वकील अमुक पक्षाच्या बतीने काम करतो म्हणून तो सत्यपक्षाचा आहे असे मानण्याने फसगत होईल. शासकीय पक्षातील वकिलांना जे द्रव्य मिळत असेल, त्यापेक्षा थोडे अधिक देऊ केले तर ते वकील बचावपक्षाचेही काम करतील. मग तशा परिस्थितीत त्यांनी नीतिचा पक्ष सोडला किंवा नीती सोडली असे म्हणावे लागेल. त्यामुळे नीती-अनीतिचा ऊहापोह करण्यास वकिलांना या न्यायालयात

अधिकार नाही.

'घटना विधीच्या (कायद्याच्या) दृष्टीने निषिद्ध आहे काय किंवा दंड्य आहे काय एवढेच न्यायालयापुढे वकिलांना मांडता येईल. एखादे शंकराचार्यांचे पीठ किंवा धर्मपीठ नीती-अनीतिची चिकित्सा फार तर करू शकेल. लिखित विधीला मर्यादा आहेत. त्या मर्यादेच्या कक्षेतील हे न्यायपीठ आहे. म्हणून घटनेची वैधता किंवा अवैधता तेवढी न्यायालयाला बघता येईल. हे धर्मपीठ नव्हे म्हणून घटना धर्म्य किंवा अधर्म्य, नैतिक अथवा अनैतिक हे या न्यायालयाला ठरविता येणार नाही.'

श्री. दफ्तरी यांनी नथुरामच्या त्यांच्यावरील टीकात्मक विवेचनाला आक्षेप घेतला होता. नथुराम न्यायमूर्तींना म्हणाला होता, त्यांच्या 'अनैतिक' शब्दामुळे मला त्यांच्यावर घसरावे लागले. एरवी हा वादच निघत नव्हता. 'अवैध' या शब्दावर माझे काहीच म्हणणे नाही. कारण विधिविहित दंड मी मान्यच करीत आहे.' आणि लगेच नथुराम अभिव्यक्तव्यातील दुसऱ्या विधेयकाकडे वळला होता.

पण अशी त्या त्या वेळी निर्माण झालेली कटुता शेवटच्या दिवशी राहिली नव्हती. अभियोजक, आरक्षी प्रमुख आदी सर्वांनी आपल्या मनाची उदारता दाखवून त्या दिवशी निरोप दिला होता. पुन्हा आम्ही एकत्र येणार होतो पण ते निर्णयाच्या दिवशी. ते वातावरण वेगळे असणार. त्या निरोपाच्या सोहळ्याची रुची चाखत चाखत आम्ही आरोपी बंदिगृहात परतलो होतो.

महिन्याभराने निर्णय प्रकट केला जाईल अशी कल्पना दिली गेली होती. निश्चित दिनांक दिला नव्हता. आम्ही नेहमीप्रमाणे खेळ, वाचन यात वेळ घालवीत होतो. ज्या ज्या वकिलांनी आम्हाला न्यायसाहाय्य दिले त्या सर्वांना आभारप्रदर्शक पत्रे आम्ही बंदिपालाच्या अनुज्ञेने धाडली होती. न्यायालयात झालेल्या काही घटनांची आठवण होऊन त्यावर आम्ही कधी कधी चर्चा करीत असू. काही दिवसांनी, दि. १०-२-१९४९ या दिवशी निर्णय लागणार आहे असे आम्हाला समजले.

निर्णयाचा दिवस जवळ येत होता, तसतसा मनावर ताण येत होता. पण तो सह्य होता. त्याला दोन कारणे होती. आम्ही अनेकजण त्याच नावेत एकत्र होतो. दुसरे, आम्ही आमचा बचाव करण्यासाठी काहीही सांगितले असले तरी एका अवैध घटनेच्या परिघात आम्ही कोठे उभे आहोत याची अंतर्यामी आम्हाला जाणीव होती. त्यामुळे शिक्षा झाल्या तर काहीतरी अनपेक्षित होणार आहे, किंवा अन्याय्य होणार आहे असे आम्हाला मनोमन वाटत नव्हते. शिक्षा झाल्या तर त्या अन्याय्य आहेत असे आम्ही पुन्हा ओरडणार होतो हा भाग वेगळा. स्वतःच्या मनाला फसविण्याचे आम्हाला काहीच कारण नव्हते. त्यामुळे प्रतिकूल तेच बहुधा घडेल अशी आमच्या मनाला आम्ही बैठक देत होतो. ओघानेच, मनावर ताण येत

असला तरी त्याच्या वेदना होत नव्हत्या.

दि. १०-२-१९४९ उजाडला. आम्ही आमचे आह्निक आटोपले आणि न्यायालयात जाण्याची वाट बघत राहिलो. पोलिसांची संक्षणव्यवस्था आज विशेष होती.

न्यायालय भरून गेले होते. वकीलवर्ग बसलेला होता. न्यायालयात नेहमी आल्याने अनेक व्यक्तींशी दृष्टिपरिचय झाला होता. त्यातील पुष्कळजण येऊन बसलेले होते. स्मितांची देवाणघेवाण झाली. वकिलांचे कुशल विचारणे, त्यांनी आमचे विचारणे हाही शिष्टाचार झाला.

न्यायमूर्ती आले आणि सर्वत्र शांतता झाली. त्या शांततेत गांभीर्य होते. विधी कोणाच्या जीविताशी कसा खेळणार आहे हे ऐकण्यासाठी सर्वांनी जणू श्वास रोखून धरला होता.

एकेका आरोपीचा निर्णय न्यायमूर्ती सांगू लागले. तसे त्या त्या आरोपींचे निलंबन (suspense) नाहीसे झाले. त्याच्या मानसिक स्थितीला निश्चितपणा आला, निर्णयाचे सार असे होते :

नथुराम	:	फाशी; दुसऱ्या शिक्षा एकूण १९ वर्षे
नाना आपटे	:	फाशी; दुसऱ्या शिक्षा एकूण १९ वर्षे
करकरे	:	जन्मठेप; दुसऱ्या शिक्षा एकूण १७ वर्षे
मदनलाल	:	जन्मठेप; दुसऱ्या शिक्षा एकूण २५ वर्षे
शंकर किस्तैया	:	जन्मठेप; दुसऱ्या शिक्षा एकूण २२ वर्षे
गोपाळ गोडसे	:	जन्मठेप; दुसऱ्या शिक्षा एकूण १५ वर्षे
सावरकर	:	निर्दोष; अतएव बंधमुक्त
डॉक्टर परचुरे	:	जन्मठेप.
बडगे	:	क्षमेचा साक्षीदार : अटींची पूर्ती केली म्हणून बंधमुक्त.

दंडितांच्या शिक्षा एकाच वेळी म्हणजे मोठीच्या पोटात लहान (concurrent) भोगण्याच्या होत्या.

जे आरोप ठेवले गेले होते, त्यातील काही आरोप सिद्ध झाले नव्हते. नथुराम आणि नाना आपटे यांना न्यायमूर्तींनी सांगितले की, दुसऱ्या आरोपांतून तुमची मुक्तता करण्यात आली आहे. इतर आरोपींनाही त्या सिद्ध न झालेल्या आरोपांतून मुक्तता दिली गेली.

शंकर किस्तैया याची शिक्षा सात वर्षे करावी असा अभिप्राय न्यायमूर्तींनी आपल्या निर्णयपत्रात दिला.

निर्णयपत्र टंकित २०४ पानांचे होते. त्यांची मुद्रित ११० पाने झाली आहेत.

आम्ही आमच्या शिक्षा सहज अंगावर घेतल्या होत्या. पण तेवढ्याने आमचे समाधान

नव्हते. त्या सहजपणाचे प्रदर्शन करण्याची आम्हाला फार इच्छा होती प्रकटपणे अभियोग चालविल्यामुळे आम्हाला ते शक्य होते.

निर्णय सांगितला जात होता. आम्ही दंडितांनी एकमुखाने जयजयकार केला, 'स्वातंत्र्य लक्ष्मी की जय ! हिन्दुराष्ट्र की जय ! अखंड भारत अमर रहे ! वंदे मातरम् !'

सत्यसृष्टीतील नाटकाचा पडदा पडला. आम्ही रंगभूमीवरून अंधारात लुप्त झालो. किती काळ तो अंधार असणार ते एक नियतीलाच ठाऊक होते !

卐 卐

बारा

अंधारातील वाटचाल

दिनांक १०-२-१९४९ या दिवशीच्या गांधी हत्या अभियोगाचा निर्णय ऐकून आमच्यापैकी कोणी व्याकुळ झाले असेल तर तो एक दिगंबर बडगे. तो आमच्यात नव्हता, पण तो आमच्यासमोर होता. तो रडत होता.

बडगेच्या भावनांचे विश्लेषण करता येते. तो क्षमेचा साक्षीदार झाला नसता तर आरोपींच्या मालिकेत तो उभा राहिला असता. अशीच एखादी शिक्षा त्याच्या वाटयाला आली असती. त्याच्यावर जी अट होती, त्या अटीची त्याने समाधानकारक पूर्ती केली होती. त्याला क्षमा मिळाली होती. त्याला एक दिवसही बंदिवास भोगावा लागणार नव्हता. संभाव्य संकटातून आपण वाचलो या जाणिवेने कोणालाही हायसे वाटेल, आनंद वाटेल, आनंदाची आसवे त्याच्या डोळ्यांतून गळू लागतील.

पण बडगेचे अश्रू तसे निर्भेळ नव्हते. जो कट किंवा षड्यंत्र सिद्ध करणे एरवी अभियोजकांना अवघड झाले असते, ते बडगेच्या साक्षीने सोपे झाले होते. ज्यांचा तो आपल्या मनाने सहकारी झाला होता, त्या सहकाऱ्यांना अंधारात लोटण्यास त्याने सहकार्य केले होते. त्याचे प्रतिदान म्हणून त्याने मुक्ती मिळविली होती. ती मुक्ती कलंकित होती, याची बडगेला जाणीव होती. मुक्तीतून मिळणारा आनंद निर्भेळ नव्हता, तो त्याच्या मनाला सुख देत नव्हता. आनंदातील किल्मिष त्याला बोचत होते. ती बोच त्याच्या डोळ्यांतून वहात होती.

बडगेसंबंधी आम्हा दंडितांच्या भावना कटू झाल्या असतील असे वाटण्याचा संभव आहे. वस्तुस्थिती तशी नव्हती.

शिक्षा झाल्यावर आम्हाला कोठे ठेवायचे हे बहुधा निश्चित झाले होते. शिक्षा झाल्यावर तासाभरात आम्हा दंडितांना लाल किल्ल्यातील त्याच बंदिगृहात नेले गेले.

नियोजित कोठ्यांकडे आम्ही जाऊन पोहोचलो तोच दंडिताला मिळणारे दुपारच्या वेळचे फुटाणे आम्हाला दिले गेले. शिक्षेच्या कार्यवहनाचा आरंभ तर बाईट नव्हता ! नंतरचे बघता येईल !

संध्याकाळपर्यंत दंडिताचे कपडे, भांडी, अंथरूणे या वस्तू आल्या. वर्गाचा उल्लेख नसल्याने आम्हाला 'क' वर्गात ठेवले. म्हणजे चारपाई, पटल (टेबल) काढून घेतले. अन्नही 'क' वर्गाचे दिले.

आम्ही तेव्हा न्यायाधीन म्हणजे अंडर ट्रायल होतो. एक मांजराचे पोर कोठून तरी आले आणि आमच्या बंदिगृहाच्या कोटेरी कुंपणाभोवती घुटमळू लागले. करमणूक म्हणून त्याला आम्ही जवळ बोलावले. थोडासा विश्वास येताच ते कुंपणातून आत आले. आम्ही त्याला दूध दिले. बहुधा स्थलसंशोधनात असलेल्या त्या मांजराला ते स्थळ आवडले. ते आमच्या येथेच राहू लागले; पण आरोपी म्हणून नव्हे ! त्याच्या मनाला वाटेल तेव्हा ते अंग चोरून कोटेरी कुंपणाच्या बाहेर जात असे आणि बंदिगृहात राहूनही मी स्वतंत्र आहे अशी आम्हाला जाणीव करून देत असे.

नथुराम आणि मी तेव्हा एका कोठडीत होतो. त्या मांजराने आपली उठण्याबसण्याची तीच खोली केली.

आजही रात्री मांजर नेहमीप्रमाणे खोलीत आले. पण त्याला काहीतरी वेगळे दिसू लागले होते, हे त्याच्या बघण्यावरून दिसून येत होते. खोलीत मी एकटाच होतो. नेहमीची चारपाई नव्हती. आपला वर्गच जणू काढून घेतल्यासारखे मांजराला वाटले असेल !

त्याला मी बोलावले; गोंजारले. पांघरूणात त्याचे स्थान होतेच. ते आले आणि झोपले.

थोड्या वेळाने सहजच मी वळालो. भुताची भावना व्हावी तसे ते मांजर दचकून उठले आणि कोणीतरी मागे लागले आहे अशा कल्पनेने पांघरुणाला भगदाड पाडून सू पळून गेले. मलाही अद्याप ज्यांचा नीट परिचय झाला नव्हता, त्या पायबेड्यांचा एकमेकांवर आपटून आवाज झाला होता आणि मांजर त्या विचित्र आवाजाने भ्याले होते ! झोपण्यापूर्वीच आमच्या खोल्या उघडल्या गेल्या होत्या आणि आमच्या पायात दंडाबेड्या ठोकून मग आम्हाला बंद केले होते.

रात्री अकरा वाजेपर्यंत इकडे तिकडे हिंडून मांजराला नथुरामची खोली सापडली. बहुतेक त्याने सुरक्षिततेचा शोध घेतला. ती खोली त्याला सुरक्षित वाटली आणि मग ते नथुरामजवळ गेले. म्याऊ शब्दांनी त्याला जागे केले आणि त्याच्या अंथरुणात पडून राहिले !

शिक्षा लागलेला दिवस त्या दिवसाच्या नवीनपणामुळे आणि एकामागोमाग होणाऱ्या

स्थित्यंतरामुळे आम्हाला चटकन गेल्यासारखा वाटला. दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही उठलो, तेव्हा आम्ही एका वेगळ्या विश्वात गेल्याची आम्हाला नव्याने जाणीव होत होती. सर्व परिसर भकास वाटत होता. तोंडावर कशी कळा होती हे बघण्यास आमच्याजवळ साधन नव्हते कारण आरसे आदल्याच दिवशी काढून घेतले गेले होते. पण मनावर मात्र अवकळा होती याची मनोमन साक्ष पटत होती. एरवी झोप स्वस्थ आली असती. पण पायबेड्यांमुळे झोपेत सारखा व्यत्यय येत होता. जरा कुठे वळावे तो बेडीने कुरकुरावे. 'मी आहे; सांभाळून !' अशी पायांना तिने जाणीव द्यावी, पायांनी तो निरोप मेंदूला पोचवावा; आणि मेंदूने तात्काळ, 'अरे, स्वस्थ झोपतोस काय शुंभासारखा ? तुला नवीन अवयव फुटला आहे त्याची आठवण ठेव' म्हणून सर्व देहालाच गदगदून हलवावे असा प्रकार सारखा चालला होता. कोण्या झोपाळू बाळंतिणीला तिचे मूल रडते आहेसे पाहून सासूने किंवा आईने जागे करावे, मुलाला घ्यायला सांगावे, तसे सासूचे किंवा आईचे काम मेंदू करीत होता.

स्वस्थ झोपले होते नथुराम आणि आपटे. त्यांना बेड्या नव्हत्या. आम्हाला त्यांचा हेवा वाटला ! तुकारामाचा अभंग उलटा झाला होता. लहानपण आम्हाला आले होते पण अंकुशाचा मारही आमच्या वाट्याला आला होता. उलट मोठेपणही त्यांच्याकडे गेले होते आणि साखरझोपेचे कणही तेच खात होते ! भाग्यवान खरे !

आमची स्थिती कशीही असली तरी आम्हाला एक सुख होते ! आपली करुण स्थिती कोणी बघू नये. विशेषतः जवळच्यांनी बघू नये, असे आपणास वाटते. माणूस कधीकधी रस्त्यावर पडतो. त्याला लागते. त्या लागण्याच्या वेदनेपेक्षाही, चार लोक आपणास बघत आहेत यानेच तो अधिक अस्वस्थ होतो. लागलेले विसरून तो झटकन आपला मार्ग चालू लागतो.

त्या चार दिवसांत आम्हांपैकी कोणी भेटण्यास येऊ नये असे वाटे. न जाणो मनातील वेदना मुद्रेवर उमटल्या तर ? त्यापेक्षा मन स्थिर झाले आहे असा स्वतःला विश्वास येऊ दे आणि मग गाठीभेटी होऊ देत असे वाटे; पण आमची ही भीती निष्कारण होती असा अनुभव आला.

पुनरावेदनासाठी म्हणजे Appeals साठी आमच्या विधिज्ञांची धावपळ चालली होती. दोन-तीन दिवसांतच त्यांनी आमच्या गाठीभेटी घेतल्या. आमच्या मनातील दुःखाचे कोणाकडूनही प्रकटीकरण झाले नाही. वकीलवर्गाला धीर आला. आम्हाला धीर देण्याचे काही कारण नव्हते हे त्यांनी पाहिले. थोड्या वेळात त्यांनी पुनरावेदनाची प्रारूपे (drafts) केली. दि. १४-२-१९४९ या दिवशी आम्ही स्वाक्षऱ्या केल्या. दि. २३-२-१९४९ या दिवशी आमची आवेदने पंजाबच्या उच्च न्यायालयात प्रस्तुत केली गेली.

आमचे अधिकारी तेच होते. आम्हीही तेच होतो. स्थान तेच होते. रूपांतर झाले

होते नियमात. कालचे आरोपी आज दंडित म्हणून वावरत होते. कालचे संशयित आता संशयित राहिलेले नव्हते. न्यायालयाच्या मताप्रमाणे हे संशयित दोषी ठरले होते. नियमाने बांधलेले अधिकारी काटेकोर झाले होते. आम्ही आता शिक्षा म्हणून बंदिवास भोगत होतो.

दोनचार दिवसांतच आमचा दैनंदिन कार्यक्रम स्थिर झाला. आम्हाला पाकिटे करण्याचे काम दिले होते. त्या विशेष बंदिगृहात आणखी काही काम देणे शक्य नव्हते.

प्रातर्विधी आटोपल्यावर सकाळी सात ते दहा काम, तासभर जेवण आणि विश्रांती. मग अकरा ते चार पुन्हा काम, त्यानंतर पडवीतच पाय मोकळे करीत असू. पाचला संध्याकाळचे जेवण येई. जेवण झाले की खोली बंद होई. खोली प्रत्येक दिवशी बदलत असे.

रात्रीच्या वेळी लघवी, शौच यांसाठी मातीच्या कुंड्या ठेवीत. यावेळी आम्ही एकटेच होतो. खोलीत दोघे असताना लघवी करणेसुद्धा अवघड वाटे. गत्यंतरच नसल्याने मग ती सवय होऊन गेली. मन निगरगट्ट होण्याचे पाठ त्यातून मिळत !

आम्हाला वर्ग मिळावा म्हणून आम्ही आवेदने दिली. काही दिवस वाट पाहून मदनलालने उपवास केला. पाच-सहा दिवसांनी उपवास सोडला. वर्ग मिळावा अशा अर्थाची काही पत्रे वृत्तपत्रातून प्रसिद्ध झाली. महिन्याभराने शंकर किस्तैय्या वगळून इतरांना 'ब' वर्ग दिला गेला. पूर्वी एका लेखात म्हटल्याप्रमाणे स्वर्गीय सरदार वल्लभभाई पटेल यांचे गांधीहत्या या कृत्यामागील भावनेचे योग्य मूल्यमापन हे आम्हाला वर्ग मिळण्याचे मुख्य कारण होते. पक्षभेद विसरून आजही त्यांच्या उदार मनाचा गौरवाने उल्लेख करावासा वाटतो.

शिक्षा लागल्यानंतर दोन महिने आम्ही त्याच म्हणजे लाल किल्ल्यातील बंदिगृहात होतो. स्वतःचे आवेदन स्वतः चालविण्यासाठी अनुज्ञा नथुरामला मिळाली होती.

एप्रिलच्या मध्यात आम्हाला मोटारीने पानिपतमार्गे अंबाला बंदिगृहात हलविण्यात आले. नियमाप्रमाणे, नथुराम आणि आपटे यांना प्रवासापुरत्या पायबेड्या ठोकल्या होत्या. अंबाल्याला पोहोचल्यावर त्या काढण्यात आल्या.

मोटारीतून आम्ही खाली उतरलो आणि मोकळे पटांगण पाहिले. त्या अंगणात आम्हाला मुक्त फिरता येत नसले तरी एवढे मोठे आवार बघण्याची संधी तर मिळत होती ! त्या दर्शनाने मन सुखावले. नथुराम आणि आपटे यांना फाशी कोठीत नेले. आम्हाला आमच्यासाठी योजलेल्या विशेष कोठ्यात नेऊन कोंडले.

त्या आवाराला अंगण होते. तेथे आम्हाला फिरण्याची मोकळीक होती. समोर लाकडी दार होते. त्या दाराला दोन इंच व्यासाचे छिद्र होते. त्यातून बाहेरचे बघता येई.

सकाळच्या वेळी समोरील अंगणात कार्यालय भरत असे, नवीन असलेल्या बंद्याचे अधिपत्र म्हणजे वॉरंट तपासणे, त्यांच्या वस्तू नोंदवून घेणे, त्यांचे वजन, उंची,

अंगावरील खुणा टिपणे, त्यांचे काम लिहिणे, हे व्यवहार तेथे चालत. लगेच बंद्याला वस्त्रालयात धाडले जाई. दंडिताचे कपडे त्याला दिले जात. त्याची नोंद त्याच्या इतिहासपत्रिकेवर केली जाई.

चार-सहा दिवसांत अंबाला बंदिगृहात आमचा कार्यक्रम स्थिर झाला. खुर्च्या विणण्याचे आणि चिकाचे पडदे करण्याचे काम आम्हाला दिले गेले. ते काम आम्ही फार लवकर शिकलो. हातांना गतीसुद्धा चांगली आली. प्रतिदानस्वरूप आम्हाला अधिकाऱ्यांनी विशेष सूट दिली. विशेष म्हणजे एरवी दिली जाई त्यापेक्षा चार दिवस अधिक. दिवसाचा अधिक वेळ कामात जात असे. उरलेला वेळ घालवण्याला विशेष कष्ट पडत नसत. त्या वेळासाठी काही साधने आम्हाला दिली होती.

बाहेरच्या जगात आपण कोणाला काय शोभते याचे काही संकेत ठरवितो. पहिल्या वर्गाचा प्रवासी परीटघडीचे व्यवस्थित कपडे केलेलाच असला पाहिजे अशी आपली धारणा असते. गबाळा दिसणारा कुणी प्रवासी आपण पहिल्या वर्गात पाहिला की, आपल्याला विसंगत वाटते, विरोधाभास वाटतो. तो मनुष्य चुकून तेथे बसला असेल असेही आपणास वाटते.

कोण्या घरात बॅडमिंटनची रॅकेट पाहिली की आपण त्याला अनुरूप तर्क करतो. ती मूठ धरणारा हात सुकुमार असावा, तो कोण्या युवतीचा असावा. ती युवती देखणी असावी, नीटनेटकी असावी, प्रसाधनांनी आच्छादित असावी, आधुनिक वेशभूषा आणि केशभूषा केलेली असावी असे आपले तर्क वाहतात आणि आपले तर्क पुष्कळ अंशांनी खरे ठरतात. काही वेळा मात्र वस्तुस्थिती वेगळीच दिसते. आणि तर्क कोलमडतात.

सर्वसाधारणपणे जो मुलींचा खेळ म्हणून मानला गेला आहे तो बॅडमिंटनचा खेळ आम्हाला दिला गेला होता. अंगावर दंडिताचे ओबडधोबड कपडे, पायात दंडाबेडी, आणि हातात बॅडमिंटन रॅकेट हे ध्यान कोणी पाहिले तर विरोधाभास होईलच, पण त्यापुढे विचित्र वेषाच्या स्पर्धेत त्या व्यक्तीला पहिले पारितोषिक मिळेल ! पण आम्ही पडलो खोल भिंतीआड ! बाहेरच्या जगातील प्रेक्षक तिथे कुठले यायला ! प्रत्येक दिवशी पारितोषिक मिळविण्याची आमची संधी हिरावली जात होती.

पण आपले पारितोषिक जात आहे याचे दुःख न करताच आम्ही तो खेळ संध्याकाळी आनंदाने खेळत असू. बेड्यांच्या तालावरच खेळण्याची पुढेपुढे सवय झाली. कधी अवेळी पाऊस पडला की अंगण निसरडे होई. त्या निसरड्यावर तोल सांभाळून खेळण्यात आणखी रस येई. स्वतःला सावरण्याच्या प्रयत्नात कोणी आपटले तर जे कोणी चार - दोन प्रेक्षक असत त्यांना फार आनंद वाटे. हाच खेळ पुन्हा एकदा होऊ द्या म्हणून त्यांचा आग्रहही होई.

पुनरावेदनाच्या श्रवणाची व्यवस्था सिमला येथे झपाट्याने चालली होती. अभिलेखाचे ग्रंथ मुद्रित झाले होते. आम्हाला एक प्रत दिली गेली होती. नथुराम स्वतः त्याचे काम चालविणार असल्याने त्याला एक प्रत अधिक दिली गेली होती. एरवी अशा पुनरावेदनासाठी दोन न्यायमूर्ती न्यायासनावर बसतात. या अभियोगाच्या अभिलेखांची व्यापकता आणि अभियोगाचे महत्त्व लक्षात घेऊन या प्रकरणात न्यायासनावर तीन न्यायमूर्तींची योजना झाली होती.

दि. १४ एप्रिल १९४९ या दिवशी हे ग्रंथ हाती आले होते. सुनावणीचा दिवस पंधरा एक दिवसांनी होता. नथुरामने अभ्यास करण्यास आणि टिपणे काढण्यास आरंभ केला होता. मे महिन्याच्या दोन दिनांकाला सिमला उच्च न्यायालयात सुनावणी चालू झाली.

वृत्तपत्रांत येणाऱ्या प्रतिवृत्तांवरून आम्हाला सिमला येथे चालणाऱ्या कामकाजाची कल्पना येत होती. जूनच्या नऊ किंवा दहा दिनांकाला अभिवक्तव्ये पूर्ण झाली होती. निर्णयाचा दिवस दि. २१-६-१९४९ असल्याचे काही दिवसांनी प्रसिद्ध झाले होते.

सिमल्यात प्रकट होणारा निर्णय आम्हाला अंबाला बंदिगृहात त्याच दिवशी कळणे शक्य होते. संध्याकाळपर्यंत आम्ही निर्णयाच्या वार्तेची वाट बघत होतो. अगदी संध्याकाळी आम्हाला समजले की, निर्णय दुसऱ्या दिवशी म्हणजे दि. २२-६-१९४९ ला प्रकट केला जाणार. आमचा अपेक्षाभंग झाला.

इकते दिवस आम्ही थांबलोच होतो; एक दिवसाचा प्रश्न काय ! आणि अपेक्षाभंग व्हायला आम्हाला सुटकेची का अपेक्षा होती !

या ठिकाणी एक मनुष्यस्वभाव आपणास लक्षात घेतला पाहिजे. प्रतिकूल तेच बहुधा घडेल अशी मनाची धारणा करून घेऊन त्या प्रतिकूल परिस्थितीत उभे राहण्याची सिद्धता करतानासुद्धा मन आशाळभूत असते हे विसरता येत नाही. स्वतःला अनुकूल असे काही तरी घडेल अशी आशा मनात मूळ धरून असते. बहुधा त्यातच जीवनाची प्रेरणा असते. प्रतिकूल ते घडल्यावर मनुष्य सहसा जीव देण्याच्या सिद्धतेला लागत नाही. त्या प्रतिकूलतेतूनही काही अनुकूल अंश मिळेल, आज ना उद्या परिस्थिती निवळेल या आशेवर तो वाट बघत दिवस काढतो.

त्या एका दिवसाच्या विलंबाने मन अतिशय व्यग्र झाले होते. काळ आपल्या गतीने जात असतो. घड्याळाचे काटे पुढे-मागे सरकवता येतात. काळाच्या चक्रात कशी ढवळाढवळ करता येईल ?

धीमेपणाने दिवस उलटला. संध्याकाळपर्यंत निलंबन (Suspense) शिगेला पोहोचणार होते आणि नंतर आपापले भवितव्य कळून पुन्हा आमची मने त्या त्या परिस्थितीत स्थिर होणार होती.

निर्णय लागला. नथुराम, आपटे, करकरे, मदनलाल आणि गोपाळ गोडसे यांची आवेदने फेटाळली गेली. सुटले डॉक्टर परचुरे आणि शंकर किस्तैय्या.

डॉक्टर परचुरे यांनी तर ग्वाल्हेरच्या न्यायमूर्तींपुढे स्वीकारोक्ती दिली होती. लाल किल्ल्यातील विशेष न्यायमूर्तींनी परचुरे यांना दोषी धरले होते. त्यांना जन्मठेप दिली होती. उच्च न्यायालयाच्या तीनही न्यायमूर्तींना ती स्वीकारोक्ती अग्राह्य वाटली, विशेष न्यायमूर्तींचा निर्णय अयोग्य वाटला आणि त्यांनी डॉक्टरांना सोडून दिले.

जन्मठेपेसारखी शिक्षा आणि निर्दोषी म्हणून सुटका यातील अंतर कालगणनेनेही मोजता येणार नाही. कष्टप्रद, बंदिस्त, एकाकी जीवन जगता जगता कधी शरीर थकले म्हणून, कधी मनाने धसका खाल्ला म्हणून मृत्यूचा घास व्हायचे अशी जन्मठेपेची परिणती होऊ शकते. याउलट स्वतंत्र जीवन जगण्याचा अधिकार प्राप्त होणे हा निर्दोष सुटकेचा परिणाम असतो. शिक्षा म्हणून चार-साडेचार महिन्यांचा बंदिवास डॉक्टरांना भोगायला लागला.

आणि शंकर कुठल्यातरी कळपात सापडलेला, पण मग आपले पाऊल त्या कळपाबरोबर टाकणारा पद्मसाळी पोरगा. चणीने मध्यम, रंगाने काळसर, शरीराने राकट ! सोलापूरच्या पलीकडे तेलगू भाषा चालणाऱ्या भागात कोठेतरी त्याचे घर होते. त्याचे आईबाप त्याला आठवत, पण त्याचे आजचे स्थानच असे चमत्कारिक होते की, केवळ आठवण करण्यापलीकडे त्याला काही करता येत नसे. शिक्षा लागेपर्यंत त्याला दूर ठेवले होते. आमच्यात मिसळू दिले नव्हते. त्यामुळे त्याची वास्तपुस्त करणे शक्य नव्हते. बडगेकडे नोकरी केली ती काय आणि या विलक्षण अभियोगात हात अडकला तो काय ! सुकाणू नसलेल्या होडीप्रमाणे नियतीच्या लाटांबरोबर तो हेलकावत होता. आपल्याला कुठे जायचे आहे, दिशा कोणती घ्यायची आहे, वाहन काय आहे, कर्णधार कोण आहे; काही काही त्याला कळत नव्हते. शिक्षा काय झाली याचे भाषांतर त्याला त्याच्या दुभाष्याने (श्रीमती कमलम्माने) तेलगूत सांगितले होते. पण भाषांतर म्हणजे अर्थ नव्हे ! साध्या किरकोळ शिक्षेने ब्रह्मांड आठवण्याची वेळ येते. कदाचित ब्रह्मांडापलिकडे पोहोचविणाऱ्या या शिक्षेचा अर्थ समजणे सोपी गोष्ट नव्हती ! आपली सुटका नाही. आपण बंदीतच राहणार आहोत, एवढा अर्थ त्याला घटकाभरात समजला होता. कारण आरक्षीगण त्यालाही आमच्या समवेत बंदिगृहाकडे घेऊन चालले होते !

मला शिक्षा कशासाठी ? काय केले मी ? तो सारखा स्वतःच्या मनाला आणि दुसऱ्यांना विचारी. त्याने स्वतः बडगेची तपासणी घेतली होती. न्यायमूर्तींनी त्याला तशी अनुज्ञा दिली होती. शंकरने एकेक प्रश्न फार सुसंगतपणे विचारला होता. आपल्याला बडगे फशी पाडत आहे आणि स्वतः निसटून जाणार आहे, अशी त्याची धारणा होती. त्याचा उद्वेग त्याला दाखविता येत नव्हता आणि तो कष्टी मात्र झाला होता.

आपल्याला शिक्षा लागली आणि बडगे मोकळा झाला हे त्याने पाहिले. इतके दिवस दूर असणाऱ्या शंकरला आता आमच्यात आधार शोधणे भागच होते. पुनरावेदन हा एक मार्ग असतो. उच्च न्यायालयाला तुझी निर्दोषता दिसली तरी तुझी सुटकाही होईल असा त्याला धीर दिला. थोड्याच दिवसात त्याने आपले भवितव्य सहदंडितांच्या भवितव्याच्या प्रवाहात मिसळून दिले.

उच्च न्यायालयाने आपली मुक्तता केल्याचे शंकरला समजले. त्याची मुद्रा उमलली. बाहेर गेल्यावर काय काय करायचे याची मनोराज्ये तो करी आणि बोलूनही दाखवी !

डॉक्टर परचुरे यांची सुटका झाली, तरीही त्यांना एक दुःख होते. त्यांना या घटनेचा अन्वयार्थ ठाऊक होता. हिन्दू संघटनेच्या कार्यात त्यांनी आपले आयुष्य वेचले होते. फाळणीच्या दिवसात उर्वरित हिन्दुस्थानातही अनेक ठिकाणी हिन्दुंवर अतिक्रमण झालेले होते. ग्वाल्हेर भागात तसे आक्रमण थोपवून धरण्याचे कार्य झाले, त्यात डॉ. परचुरे यांचे प्रमुख श्रेय होते. नथुरामची फाशीची शिक्षा सौम्य शिक्षेत परिवर्तित होण्याचा प्रश्नच नव्हता. कारण त्याने त्या शिक्षेविरुद्ध पुनरावेदन केलेले नव्हते. नाना आपटे यांची शिक्षा मात्र सौम्य शिक्षेत परिवर्तित व्हावी अशी त्यांची मनःपूर्वक इच्छा होती. पण तसे झाले नाही आणि डॉक्टरांच्या मनाला ती एक वेदना राहून गेली.

शासनाने विशेष दयादानाचा (Clemency) अधिकार गोपाळ गोडसेच्या संबंधात वापरावा, असा अभिप्राय उच्च न्यायालयाने आपल्या निर्णयपत्रात व्यक्त केला होता. (चक्री - टंकित पृष्ठ १९८, ५५८, ५५९) न्यायमूर्तींच्या या अभिप्रायाचा शासनाला राग आला असावा असे माझे अनुमान आहे. न्यायमूर्तींवर काही आक्षेप घेता येत नाही तेव्हा त्यांच्या अभिप्रायाचाच अवमान करावा या हेतूनेच बहुतेक आपला सर्वसामान्य दयादानाचा अधिकारही शासनाने उलटा वापरला आणि माझ्यावर प्रतिशोध घेतला. जितके दिवस अधिक जात तितकी एके काळी घडलेल्या अवैध घटनेची तीव्रता मंदावण्यास हवी होती. परंतु व्यवहार असा झाला की, क्रूरपणाची मात्रा माझ्या वास्तविक सुटकेच्या दिवसातच वाढू लागली होती. कोणी सांगावे, न्यायमूर्तींनी माझ्या संबंधात अनुकूल अभिप्राय व्यक्तविला नसता तर कदाचित शासनाने माझा छळ केलाही नसता !

न्यायालयीन पद्धतीप्रमाणे उच्च न्यायालयाचा निर्णय आम्हाला ज्या न्यायालयाने शिक्षा दिली त्या न्यायालयाकडे गेला आणि तेथून अंबाला येथे आला. त्यासाठी तीन-चार दिवस लागले. डॉक्टर परचुरे आणि शंकर किस्तैय्या हे बंदिगृहातून मुक्त झाले. या अभियोगातून निर्दोष म्हणून बाहेर गेले. आम्ही पाचजण उरलो. नथुराम आणि आपटे फाशी कोठीत आणि करकरे, मदनलाल आणि मी जन्मठेपेत.

इंग्लंडमधील प्रिव्ही कौन्सिल हे तेव्हा उर्वरित हिन्दुस्थानचे सर्वोच्च न्यायालय होते.

उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध पुनरावेदन तेथेच करावयाचे असे. स्वत:पुरते तरी आवेदन करावयाचे नाही असे नथुरामचे मत होते. आपण पुनरावेदन केले नाही की आपणास फाशी देण्याचा शासनाला मार्ग मोकळा राहील, अशी त्याची धारणा होती, पण ती चुकीची होती. कारण इतरांच्या आवेदनांचा निर्णय होईपर्यंत प्रत्येक दंडितांची फाशीची शिक्षा तात्पुरती स्थगित होते. इतर शिक्षा असेल तर ती भोगली जातच असते.

लाला गणपतराय दिल्लीचे एक कळकळीचे विधिज्ञ आमच्या अभियोगात सावरकरांचे वकील म्हणून काम बघत असत. पण ते सर्वच व्यवस्था करण्यात पुढे असत. आमच्या नातेवाईकांच्या गाठीभेटी घडवून आणण्यापासून काही आवश्यकता असल्यास भागविण्यापर्यंत ते स्वत: लक्ष घालीत. सध्या ते सर्वोच्च न्यायालयाचे एक विधिज्ञ आहेत.

सिमला उच्च न्यायालयाने आपला निर्णय दिल्यानंतर लाला गणपतराय यांनी आमची अंबाला बंदिगृहात दिनांक २९-७-१९४९ या दिवशी भेट घेतली. सर्वांनीच पुनरावेदन करणे योग्य ठरेल असे त्यांनी नथुरामला पटविले. नथुरामने ते मान्य केले आणि पूर्वीप्रमाणेच दंडविधान ३०२ प्रमाणे सिद्ध झालेला हत्येचा आरोप आणि त्यासाठी सुनावली गेलेली फाशीची शिक्षा यांविषयी कोणतेही गाऱ्हाणे न मांडता इतर आरोप आणि त्यासाठी असलेली शिक्षा याविरुद्ध त्याने पुनरावेदन केले. इतर सर्वांनी आवेदने केली. W. W. Box and Co. या मंडळीने विनामूल्य काम चालविण्याचा पत्कर घेतला. लंडनमधील दुसरी एक विधिज्ञ संस्था बेनरी (Benri) ही आवेदने चालविण्यासाठी पुढे आली होती. 'केसरी' चे लंडनमधील वार्ताहर श्री. द. वि. ताम्हणकर यांनी गणपतराय यांना तसे ऑगस्टच्या प्रारंभी कळविले. पण एक संस्था आधीच काम पाहू लागली होती. म्हणून तिच्याकडून काम काढून घेऊन दुसरीला देणे योग्य नव्हते. आमच्या लंडनमधील वकिलांनी दि. १५-९-१९४९ पर्यंत आवेदने प्रस्तुत केली होती. दि. १२-१०-१९४९ हा दिवस पूर्वश्रवणासाठी नेमला होता. विधिज्ञ संस्थेच्यावतीने श्री. मेगॉ काम बघत होते, श्री. दप्तरी शासनाच्या वतीने काम बघत होते.

दि. १२-१०-१९४९ ला प्रिव्ही कौन्सिलने पूर्वश्रवणातच पुनरावेदने फेटाळून लावली. आमच्या शिक्षा स्थिर राहिल्या.

मध्यंतरीच्या काळात आणि प्रिव्ही कौन्सिलच्या निर्णयानंतर, काही वृत्तपत्रांनी नथुराम आणि आपटे यांना फाशी द्यावे की नाही, या विषयावर लोकमत घेण्याचा उपक्रम चालू केला होता. दिल्लीची काही वृत्तपत्रे वाचण्यात आली. या दंडितांना फाशी देऊ नये असेच मत प्रामुख्याने व्यक्त झालेले दिसले. अनेकविध कारणे त्यासाठी पुढे केली गेली. एकाएकी हा वाचकांचा पत्रव्यवहार त्या त्या वृत्तपत्रांनी बंद केला. फाशी देण्याचा निर्णय शासनाला घेण्याचा असेल तर लोकमतावर उभे असलेले शासन लोकमताविरुद्ध वागत आहे असे निदर्शनास येऊ नये, या हेतूनेही हा पत्रव्यवहार बंद केला गेला असावा.

त्या वेळचे 'हरिजन'चे संपादक स्वर्गीय किशोरीलाल मश्रूवाला यांनीही या संबंधात लेख लिहिले. नथुरामला फाशी द्यावे आणि आपटे यांची शिक्षा दुसऱ्या शिक्षेत परावर्तित करावी, असा त्यांच्या लेखाचा निष्कर्ष होता. त्यांनी त्या निष्कर्षासाठी जी संगती दिली ती समर्पक नव्हती, असे मला वाटते. गांधीवादाच्या प्रचारासाठी 'हरिजन' होते. त्या वादाच्या भूमिकेतून 'फाशी द्यावी' असा निष्कर्ष निघणे विसंगत आहे. गांधीजी जीवमान असताना असे एक उदाहरण घडले होते. अब्दुल रशीद याने श्रद्धानंदांची हत्या केली होती. अब्दुल रशीदला फाशी देऊ नये असे मत गांधीजींनी व्यक्त केले होते. I plead for Bhai Abdul Rashid असे गांधीजींचे डाका काँग्रेसमधे शब्द होते. त्यांनी त्यासाठी दिलेली कारणे हे जर एक तत्त्व म्हणून मानले, तर ते गांधीवादाचे तत्त्व याच कक्षेत येईल, स्वर्गीय किशोरीलाल यांना त्या तत्त्वाला अनुसरून नथुरामला फाशी देऊ नये असा निष्कर्ष काढता आला असता.

गांधीजी जीवित असतानाच, गांधीवाद कोणता, तर जो केवळ गांधीजींनाच समजू शकेल तो, अशी त्याच्यावर टीका होत असे. गांधीजींच्या पश्चात त्यांच्या शिष्यवरांनी फाशी-प्रकरणाची जी संगती लावली ती संगती कोणत्याही तत्त्वाला धरून नव्हती असेच म्हणावे लागेल आणि ती जर गांधीवादप्रणीत होती असे म्हणायचे झाले तर गांधीवाद गांधीजींच्यासमोर जितका विसंगत होता तितकाच तो त्यांच्या मागेही विसंगत राहिला असे तरी म्हणावे लागेल.

हृदयपरिवर्तन ही गांधीवादाच्या कक्षेतील एक परिपाटी असेल तर या ठिकाणी फाशीचे कार्यवहन न करण्यानेच ते प्रयोग करणे शक्य होते. नथुरामला तर शिक्षेतून अवभार किंवा relief मिळण्याचे आमिषही नको होते. चर्चा करून त्याचे मतपरिवर्तन करणे आणि त्याला त्याचे पूर्वग्रह बदलावयास लावणे, निदान तसा प्रयत्न करणे ही गोष्ट सहजसाध्य होती. गांधीजयंतीला 'गांधीजींच्या तत्त्वाने वागा' असा उपदेश लोकांना करण्याचा अधिकार त्या त्या व्यक्तींना प्राप्त झाला असता, पण तो अधिकार त्यांना राहिला नाही. स्वतःजवळ संधी असताना ती त्यांनी गमावली. राहिला कोरडा उपेदश. या उपदेशाच्या पोटातच एक व्यंग असते हे ते उपदेशक विसरतात. नीतीने वागा, आम्ही कसेही वागू, आम्ही कसेही वागलो तरी तुम्ही आम्हाला विचारू नका, अशा दर्पयुक्त मनाची त्या उपेदशावर मुद्रा उमटलेली असते.

वरील तुलनेने पाहता श्री. रामदास गांधी-गांधीजींचे पुत्र - यांचे प्रयत्न खरोखरीच कळकळीचे वाटतात. नथुरामला - आणि आपटे यांनाही - फाशी दिली जाऊ नये असे त्यांना मनापासून वाटत होते. त्यांचा सारखा पत्रव्यवहार चालू होता. नथुरामशी गांधजींच्या तत्त्वाच्या विद्वान मंडळींनी चर्चा करावी ही त्यांची तळमळ होती. पण शासनाने त्यांचा हेतू

सिद्धीस जाऊ दिला नाही. गांधीवाद ही एक बोलण्याची वस्तू आहे. आचरण्याची नव्हे, असे शासनाला वाटले असेल, किंवा फाशी देण्यानेच आपण गांधीजींचे खरे अनुयायी ठरू, अशी त्यांची धारणा असेल. दोन्ही भूमिकात विसंवादित्व आहे हे आजही दिसते.

नथुराम किंवा नाना हे मश्रुवालांच्या अभिमतावर किंवा रामदास गांधींच्या प्रयत्नावर विसंबून नव्हते. दुसऱ्यांच्या जीवावर त्यांनी आपले जीव संकटात टाकले नव्हते. कोणी तरी आपणास वाचवील अशा मनोधारणेत मनाचा दुबळेपणाही दिसतो आणि तो कोणीतरी पुढे आला नाही की जिवंतपणीच गलितगात्र, किंबहुना मृतगात्र होण्याची वेळ येते. त्यांची एक निष्ठा होती. त्या निष्ठेपोटी स्वतःचे प्राणही तुच्छ वाटावेत इतके ते त्या निष्ठेशी एकरूप झाले होते. ती निष्ठा चुकीची असेल, किंवा बरोबर असेल. ती कशी होती हे ठरविण्याचे हे स्थलही नव्हे आणि मी त्यावर भाष्य करणे योग्यही नव्हे. मी गांधीहत्या कांडातील एक दंडित असल्याने कितीही प्रयत्न केले तरी माझे विवेचन त्या विषयावर निःपक्षपाती राहू शकणार नाही. त्या वेळच्या घटनांवरून नथुराम किंवा आपटे यांची भूमिका आपणास जशी दिसते तशी इतिहास म्हणून केवळ आपण बघत आहोत.

दया हा माझा मृत्यू ठरेल असे नथुरामचे उद्‌गार होते. दि. ११-११-१९४९ या दिवशी त्याला आईवडिलांनी एक तार धाडली होती. 'उदंड आशीर्वाद' हे त्या तारेत शब्द होते. आईवडिलांना एक सांत्वनात्मक पत्र लिहावे अशी नथुरामची इच्छा होती.

पत्रे हिन्दीतून किंवा इंग्रजीतून लिहिली तर ती लगेच तपासली जाऊन - म्हणजे Censor होऊन - धाडली जात. मराठीतून लिहली तर ती प्रथम मुंबई शासन विभागाकडून तपासून आणली जात आणि धाडली जात. त्या जाण्यायेण्यात दोन ते तीन आठवडे जात. पत्र लवकर निघावे म्हणून नथुरामने ते हिन्दीत लिहिले होते. त्याचा हेतू हा होता की पुत्र - मरणाने आई-वडिलांनी शोकाकुल होऊन खचून जाऊ नये. नथुरामचे हृदयपरिवर्तन केले गेले नव्हते. तसा प्रयोगही कोणी केला नव्हता. त्याच्या भूमिकेतून तो अढळ होता. आपले कृत्य अवैध आहे म्हणून त्याला फाशी हा दंड आहे हे जितके खरे, तितकेच या कृत्याला वैचारिक बैठक आहे आणि ती समर्थनीय आहे ही त्याची धारणा त्याने पत्रातून व्यक्त केली आहे. अधिकारीवर्गाचा काही आक्षेप नव्हता; त्यांनी ते पत्र लगेच तपासले, आणि धाडून दिले. पत्राचा आशय मराठीत असा आहे,

अंबाला, दि. १२-११-१९४९

परम वंदनीय माताजी आणि पिताजी,

अत्यंत विनम्रतापूर्वक अंतिम प्रणाम,

आपली आशीर्वादात्मक तार मिळाली. आपली सध्याची प्रकृती आणि वृद्धावस्था यामुळे आपण येथे येऊ नये, ही माझी विनंती आपण मानली त्याने मला फार संतोष वाटला.

आपली छायाचित्रे माझ्यापाशी आहेत. त्यांचे पूजन करूनच मी ब्रह्मात विलीन होईन.

व्यवहार आणि लौकिक संबंध यामुळे आपणास या घटनेचे परम दुःख होईल ह्यात मुळीच शंका नाही. मी हे पत्र दुःखावेगासाठी किंवा दुःखाची चर्चा करण्याच्या हेतूने लिहित नाही.

आपण गीतेचे पाठक आहात. आपण पुराणांचे अध्ययनही केले आहे.

भगवान श्रीकृष्णाने गीतेचा उपदेश केला आहे आणि त्याच भगवंताने राजसूय यज्ञभूमीवर - युद्धभूमीवर नव्हे - शिशुपालासारख्या एका आर्य राजाचा वध आपल्या सुदर्शनचक्राने केला आहे. श्रीकृष्णाने पाप केले किंवा कसे हे कोण सांगू शकेल ? श्रीकृष्णाने युद्धात आणि दुसऱ्या मार्गानेही अनेक अहंमन्य आणि प्रतिष्ठित लोकांची हत्या विश्वाच्या कल्याणासाठी केली आहे; आणि गीतेच्या उपदेशात अर्जुनाला आपल्या बांधवांची हत्या करण्यास पुन्हा पुन्हा सांगून शेवटी त्याला प्रवृत्त केले आहे.

पाप आणि पुण्य मनुष्याच्या कृतीत नव्हे तर मनुष्याच्या मनात असते. दुष्टांना दान देणे पुण्य समजले जात नाही. तो अधर्म आहे. एका सीतादेवीसाठी रामायण उभे राहिले, एका द्रौपदीसाठी महाभारताचा इतिहास निर्माण झाला.

सहस्रावधी स्त्रियांचे शील लुटले जात होते आणि असे करणाऱ्या राक्षसांना सर्व प्रकारे सहाय्य करण्याचे प्रयत्न चालले होते. अशा अवस्थेत स्वतःच्या प्राणांच्या भयाने किंवा जननिंदेच्या भयाने काही करापचे नाही, हे माझ्या हातून झाले नाही. सहस्रावधी रमणींचे आशीर्वाद माझ्या पाठीशी आहेत.

माझे बलिदान माझ्या प्रिय मातृभूमीच्या चरणावर आहे. आपले एक कुटुंब किंवा काही कुटुंबे यांच्या दृष्टीने हानी अवश्य झाली आहे. परंतु माझ्या दृष्टीसमोर छिन्नविच्छिन्न मंदिरे, छाटलेल्या शिरांचे ढीग, बालकांची क्रूर हत्या, स्त्रियांची विटंबना या गोष्टी प्रत्येक घटकेला बघण्यात येत होत्या. आततायी आणि अनाचारी लोकांना मिळणारे सहाय्य तोडणे हे मला माझे कर्तव्य वाटले.

माझे मन शुद्ध आहे. माझी भावना अत्यंत शुद्ध होती; सांगणारे लाख प्रकारांनी सांगतील, तरीही माझे मन एक क्षणभरसुद्धा अस्वस्थ झाले नाही. स्वर्ग असला तर माझे स्थान त्यात निश्चित राहील, त्यासाठी मला काही विशेष प्रार्थना करण्याची आवश्यकता नाही.

मोक्ष असेल तर मी मोक्षाची मनीषा बाळगतो.

दयायाचना करून आपल्या जीवनाची भीक घेणे मला किंचितही मान्य नव्हते. आणि आजच्या शासनाला माझे धन्यवाद आहेत, कारण दयेच्या रूपाने त्यांनी माझा वध केला नाही. दयेच्या भिकेने जीवित राहणे हाच मी माझा खरा मृत्यू समजत होतो. मृत्यूदंड

देणाऱ्यांना मला मारण्याची शक्ती नाही. माझे बलिदान माझी मातृभूमी अशिय प्रेमाने स्वीकारील.

मृत्यू माझ्यासमोर आला नाही, मी मृत्यूच्या समोर गेलेलो आहे. मी त्याच्याकडे सुहास्यवदन बघत आहे आणि तोही मला एक मित्र समजून माझ्याशी हस्तांदोलन करीत आहे.

आपुले मरण पाहिले म्या डोळा
तो झाला सोहळा अनुपम ।
जातस्यहि ध्रुवो मृत्युध्रुवं जन्म मृतस्य च
तस्मादपरिहार्यार्थे न त्वं शोचितुमर्हसि ।

भगवद्गीतेत तर जीवन आणि मृत्यू यांच्या समस्येचे विवेचन श्लोकाश्लोकात भलेले आहे. मृत्यूजवळ ज्ञानी मनुष्याला शोकविव्हल करण्याची शक्ती नाही.

माझ्या शरीराचा नाश होईल. परंतु मी आपणांमध्येच राहीन. आसिंधु-सिंधु भारतवर्ष पूर्ण रूपाने स्वतंत्र करण्याचे माझे ध्येयस्वप्न माझ्या शरीराच्या मरणाने मरणे अशक्य आहे.

शासनाने आपणास मला भेटण्याची शेवटची संधी दिली नाही. शासनाकडून कोणत्या प्रकारची काही अपेक्षा मला ठेवण्याची नाही; तरीही शासन मानवतेच्या तत्त्वाचा अशा प्रकारे अंगीकार करीत आहे एवढे म्हणावेच लागेल. (आई-वडील वृद्ध आहेत, ते पुण्याला असतात, त्यांना एवढा प्रवास झेपणार नाही, करिता मला येरवड्यात न्यावे, तेथे ते भेट घेऊ शकतील आणि येरवड्याला मला फाशी द्यावी अशी नथुरामने विनंती केली होती. ती विनंती मानली गेली नाही, त्याला उद्देशून वरील छेदक आहे.)

आणखी लिहिण्याची काही विशेष आवश्यकता नाही. माझा मित्रवर्ग आणि चि. दत्ता, गोर्विंद, गोपाळ आपणास कधी अंतर देणार नाहीत.

श्री. आप्पाशी (दत्तात्रय) आणखी बोलणे होईल. तो आपणास सर्व वृत्तान्त सांगेल.

या देशात लक्षावधी लोक असे आहेत की, ज्यांच्या डोळ्यांतून या बलिदानाने अश्रू वाहतील, ते लोक आपल्या दुःखात सहभागी आहेत. आपण स्वतःला ईश्वराच्या निष्ठेच्या बळाने अवश्य सांभाळाल यात संशय नाही.

अखंड भारत अमर रहे ।
वन्दे मातरम् ।
आपल्या चरणांशी सहस्रशः प्रणाम

आपला विनम्र
नथुराम

नाना आपटे यांच्या जीवनाला जर ही कलाटणी मिळाली नसती तर ते अतिशय

कुशल प्रशासक किंवा administrator झाले असते. अर्थात कोणती तरी एखादी व्यापारी संस्था हे त्यांच्यासाठी अगदी अपुरे कार्यक्षेत्र होते. त्यांच्या आकांक्षा देशाचे प्रशासन करण्यास सहाय्य करण्याच्या होत्या. शासनाजवळ त्यांचा एक प्रबंध आहे. तो कोणत्याही स्वरूपात आक्षेपार्ह या व्याख्येत येऊ शकणार नाही. त्याचे महत्त्व दुहेरी आहे. एक म्हणजे फाशीच्या छायेत असताना त्यांनी तो लिहिला आहे. दुसरे, त्यात काही मूलभूत तत्त्वे त्यांनी मांडली आहेत. शासन तो ग्रंथ मुक्त करील तेव्हा करो. माझे त्या दृष्टीने प्रयत्न चालू आहेत, पण ते अगदीच एकाकी आहेत. गुणांचे पूजक असे कोणीही राज्यकर्ते त्या प्रबंधाचे स्वरूप लक्षात घेतील तर ते तो लोकांसमोर आणतील आणि कदाचित त्या ग्रंथाचा सन्मानही करतील यात शंका वाटत नाही. त्यांचे लक्ष मात्र त्या ग्रंथाकडे वेधविले गेले पाहिजे.

नाना आपटे यांनी त्यांच्या शेवटच्या दिवसात काही पत्रेही लिहिली आहेत. श्री. करकरे यांना त्यांनी लिहिलेले पत्र तर फार हृदयस्पर्शी आहे. सर्व पत्रांतून नानांची स्थिरता दिसून येते. ती पत्रे बाहेर येतील तेव्हा ती वाचकांनाही उपलब्ध होतील.

दोघांनीही काही पुस्तकांवर काही ना काही पत्रे किंवा संदेश लिहिले आहेत. ती सर्व पुस्तके तपासली जाऊन त्यांच्या त्यांच्या नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आली. गुरुगोविंदसिंह यांच्या चरित्राच्या पुस्तकावर नथुरामने मला एक लहानसे पत्र लिहिले आहे. माझ्या हाताशी सध्या असलेल्या त्या पत्रात त्याने म्हटले आहे :

चि. गोपाळ यास -

कुरुक्षेत्र आणि पानिपतच्या पावन भूमीवरून वाहत येणाऱ्या वाऱ्यात मी अखेरचा श्वास घेत आहे. गुरुगोविंदाची कार्यभूमी आहे हा पंजाब. भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या आहुती येथेच पडल्या; लाला हरदयाळ आणि भाई परमानंद या त्यागमूर्ती याच प्रांताने निर्माण केल्या.

त्याच पंजाबच्या 'पवित्र भूमीवर' मी माझा देह ठेवीत आहे. मला या गोष्टीचा संतोष वाटतो. आजचा अर्धवट पंजाब, अर्धवट भारताचा अखंड भारत होईल, त्याबरोबरच पंजाबही पूर्ववत पूर्ण होईल. हे लवकर घडो हीच अंतिम इच्छा.

आपला

१४-११-१९४९

नथुराम वि. गोडसे

गुरुगोविंदसिंहाच्या चरित्राच्या पुस्तकात एक अर्पण-पत्रिकेचे पान आहे. त्या पानाच्या कोऱ्या जागेत नथुरामने वरील पत्र लिहिले आहे. मध्यावर असलेल्या या अर्पणपत्रिकेचे शब्द आहेत.

'ज्याअगणित पुण्यवान सतींनी आणि अज्ञाप बालकांनी धर्माच्या निष्ठेसाठी प्राणार्पण केले आणि ज्या सहस्रो वीरांनी गोविंदसिंहांचा घोष करीत मानव्याच्या रक्षणासाठी पंजाबच्या भूमीवर देह ठेविले त्यांच्या पवित्र आत्म्यांना-'

दुसऱ्या दिवशी म्हणजे दि. १५-११-४९ ला सकाळी आठ वाजता नथुराम आणि आपटे यांना विधिपूर्वक फाशी देण्यात आले. आतच दहन केले. क्रियाकर्म एका पंडित म्हणजे ब्राह्मण बंदिपालाने केले. फाशी गेले त्यांच्या या संबंधातील काही भावना असोत वा नसोत; अंगभूत व्यक्तीच्या - त्यात बंदिगृहाचे अधिकारीही आले. - काही एक भावना होत्या. शासनाने जेवढी मोकळीक ठेवली होती, त्या मोकळीकीतच आपणांकडून त्या भावना सांभाळल्या जाव्यात असे त्यांचे मत होते. म्हणून काहींनी स्वतः पुढाकार घेऊन क्रियाकर्म करण्याचे अंगावर घेतले. प्रेतांचे दहन बंदिगृहातील एका मोकळ्या जागेत झाले. दहन झाल्यावर ती भूमी नांगरली. त्यात मग गवताचे बी टाकून दिले. बंदिगृहाचे काही पाईक मला दिल्ली बंदिगृहात भेटले, तेव्हा त्या ठिकाणी दोन झाडे लावल्याचे, बोलले होते. मला ते वृत्त पडताळून बघता आले नाही.

दुपारी एक किंवा दीडला बंदिगृह खऱ्या अर्थाने उघडले. सकाळचे जेवण कोणी घेतले नाही. जेवण शिजविले गेले होते आणि वाटलेही गेले होते. हरताळ अशी नोंद नव्हती. जेवण दिले गेले अशीच नोंद झाली. पण बंदिगृहाला एका कुटुंबाचे स्वरूप येते. बंदी सुखदुःखाचे वाटेकरी होतात. अशा प्रसंगी सर्व बंदिगृहावर एक दुःखाची छाया पसरते. फाशी देण्याचे काम बंदिपालवर्गाला वरचेवर पडत असल्याने त्यांचे मन बोथट झालेले असेल, अशी कोणाची धारणा असेल तर ते वस्तुस्थितीशी विसंगत आहे. फाशी देण्याच्या दिवशी कोणा कोणा बंदिपालाच्या घरी चूलही पेटत नसल्याची उदाहरणे मला ठाऊक आहेत.

नथुराम आणि आपटे यांचे अधिकारीवर्गाशी फार जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले होते. बंद्यांशी विशेषतः फाशीबाल्यांशी, अधिकाऱ्यांनी प्रेमाचा संपर्क ठेवायचा किंवा वाढवायचा नाही असा एक दंडक आहे. त्यात हे तर राजकीय प्रकरण होते. यातील दंडितांशी जितक्यास तितके एवढाच संबंध नियमाच्या मर्यादित अनुज्ञित होता. पण होते असे, बंद्यांचे वर्तन, त्याचे थोडेसे बोलणे, याचा अधिकाऱ्यावर परिणाम होत असतो. जितक्यास तितके असा मर्यादित संबंध ठेवण्याच्या दंडकामागील हेतू असा असतो की, दंडित चिडू नये, छेडला जाऊ नये आणि अधिकारीगणही आपल्या तोलात राहावा. पण दोन्ही पक्षी तसे उल्लंघन होण्याची शक्यता आहे किंवा नाही हे बंद्याच्या वर्तनावरून अधिकारी वर्गाला कळू शकते. मनुष्यस्वभावाच्या अनेक प्रकारांचे निरीक्षण अधिकारी वर्ग करीत आलेला असतो. तो अभ्यस्त असल्याने थोड्याशा परिचयाने तो मनातल्या मनात त्या त्या बंद्याचे वर्गीकरण करतो.

स्वभाव चांगला आहे, वृत्ती चिडखोर नाही असे जेथे त्यांचे निरीक्षण असेल तेथे

चार-दोन शब्द ते अधिक बोलतात. तशा बोलण्यातून हळूहळू परिचय वाढत जातो; एकमेकांची मने समजतात. निदान बंद्याचे मन तरी अधिकाऱ्यांना समजते; अर्थात बंदीही मनुष्यच असतो. निरीक्षणाची जितकी संधी अधिकाऱ्याला असेल तितकीच त्या बंद्यालाही असते. तोही अधिकाऱ्यातील वर्गवारी आपल्या मनात ठरवितो आणि त्या अनुरोधाने तो अधिकाऱ्याशी बोलतो. त्याचेही मन समजावून घेतो. असा परिचय वाढत गेला की, स्वाभाविकपणेच एकमेकांविषयी प्रेम उत्पन्न होते, जिव्हाळा वाटतो. अंबाल्यातील नऊ-दहा महिन्यांच्या येथेच असणाऱ्या सहवासाने अधिकाऱ्यांच्या भावना त्या दोघांविषयी कोमल झाल्या असतील तर त्यात मनुष्यस्वभावाविरुद्ध काहीही नव्हते.

शासकीय कर्मचारीगण राजाकरणातून अलिप्त असावा असा दंडक आहे खरा, बंदिगृहाचे कर्मचारीही त्या दंडकाला अपवाद नाहीत. त्यांनीही नथुराम किंवा आपटे यांच्याशी राजकारण बोलू नये ही नियमाची अपेक्षा.

पण तो कर्मचारीगण राजकारणापासून अलिप्त राहिला होता काय ? देशाच्या चिरफाडीचे घाव त्यांच्या घरावर उमटले होते. राजकारणातून चिरफाड झाली होती, ती कोठे कोरियात किंवा व्हिएटनाममध्ये नव्हे, तर हे कर्मचारी जेथे सुखात नांदत होते त्या भूमीवरच ! त्यांचा दृष्टिकोन कसाही असो, वैचारिक बैठक कोणतीही असो, त्यांना राजकीय विचारधारा असो अथवा नसो, राजकरण त्यांच्यापर्यंत येऊन थडकले होते. ते त्यांच्या घरांवर आणि अंगावर शेकले होते. कारण ते शासकीय सेवावृत्ती करीत असले तरीही हिन्दू होते ! त्यांच्या भूमीवर त्यांचे अस्तित्व त्यापुढे टिकणे शक्य नव्हते. सापडेल त्या मार्गाने आणि असेल त्या उपायाने त्यांनी हिन्दू पंजाबात, भारतात आश्रय शोधला होता.

असे हे अनिच्छेने आणि अनिवार्यपणे रक्तरंजित राजकारणात न्हालेले अधिकारी आपल्या अंगावरील घावाविषयी बोलणार नाहीत तर काय करतील ? मार्ग चुकीचा असेल किंवा बरोबर असेल, त्या फाशीतील दोघा बंद्यांनी आपले अश्रू पुसण्याचा प्रयत्न केला आहे ही त्यांची धारणा होणार नाही काय ? पंजाबात नेमके काय घडले हे कितीही पत्रे, पुस्तके आणि ग्रंथ वाचून कळणार नाही, एवढे चार-दोन अधिकारी वाचून कळत असे. आपल्या वेदना ते बोलत असत; मुक्त मनाने बोलत असत.

फाळणीच्या धक्क्याने आणि त्या दिवसांतील रक्तपाताने उद्विग्न झालेल्या त्या दोघांचेही अधिकारीवर्गाकडून प्रत्यक्ष घडलेला वृत्तान्त ऐकण्यात लक्ष लागत असे. सिमला येथील उच्च न्यायालयातील श्रोतृवर्गालाही नथुरामने आपल्या त्या मनःस्थितीत सहभागी केले होते. त्या श्रोतृवर्गालाही जर न्यायदानाचे काम दिले असते तर त्याने प्रचंड बहुसंख्येने नथुरामला निर्दोष ठरविले असते. हे माझे विधान नव्हे. न्यायासनावर असलेले श्री. खोसला यांनीच हा अभिप्राय लिहिलेला आहे आणि तो मागील एका लेखात पृष्ठांकासहित दिला

आहे. तो सिद्ध संदर्भासाठी वाचकांनी पाहावा. येथे तात्पर्य एवढेच आहे की, प्रत्यक्ष परिस्थितीचे चित्र नथुराम आणि आपटे यांना कळत असे आणि त्याचे माध्यम होते अधिकारी वर्ग. जिव्हाळा निर्माण झाला तो असा.

आपल्या हातून नथुराम आणि आपटे फाशी जात आहेत, याचे त्या अधिकारीवर्गाला काय दुःख झाले असेल याची वाचकांना कल्पना येऊ शकेल.

दोन-एक तासांनंतर प्रमुख अधिकारी श्री. अर्जुनदास आणि त्यांचे उपाधिकारी आमच्या कोठ्यांत म्हणजे करकरे, मदनलाल आणि मी ज्या कोठ्यात होतो त्या कोठ्यात आले. आम्हाला सांत्वन देण्याचा हेतू होता. त्यांच्या कर्तव्य तालिकेवर किंवा ड्यूटी लिस्टवर काही ही गोष्ट नव्हती. पण पुन्हा तेच. अधिकाऱ्यांतही मनुष्यता हा एक भाग असतोच. त्यातून पुन्हा जसे त्यांचे संबंध नथुराम आणि आपटे यांच्याशी जिव्हाळ्याचे होते तसे आमच्याशीही होते.

श्री. अर्जुनदास थोडा वेळ आमच्यासमोर उभे राहिले. बहुतेक ते शब्द शोधीत असावेत. त्यांनी बोलण्यासाठी ओठ हलवले पण बोलले नाहीत. एक आवंढा गिळल्याचे त्यांच्या गळ्यावरील हालचालीवरून दिसले. पुन्हा त्यांनी प्रयत्न केला पण त्यांना यश आले नाही. तिसऱ्या वेळी मात्र त्यांच्या कंठातून स्वर निघाला तो हुंदक्याचा होता !

कोणास ठाऊक कसे ते, पण आमच्या तिघांपैकी कोणालाही अश्रू फुटले नाहीत; 'नियतीने ठरवलेल्या गोष्टीत आपण काय परिवर्तन करणार !' एवढे मी बोललो. अर्जुनदास जवळ आले, आमच्या पाठीवरून हात फिरवला. एक शब्दही न बोलता ते परत फिरले. माझ्या शब्दाने त्यांनाच सांत्वन मिळाले असा माझा ग्रह झाला. आपण आज उगीच आलो, एक-दोन दिवसांनी यायला हवे होते, असे ते जाता जाता दुसऱ्या अधिकाऱ्याजवळ बोलल्याचे मला समजले. सांत्वनाने दुःखभार हलका होण्याची जी मानसिक क्रिया होते त्यासाठी त्यांनी आम्हाला सहाय्य केले हे निश्चित.

तो दिवस आम्हाला उदासवाणा गेला होता. फाशी दिली जाईपर्यंत आमच्या वृत्ती स्थिर होत्या. अतिशय उत्तुंग वातावरणात पहाटे आणि सकाळी आमची नथुराम, आपटे यांच्याशी भेट झाली होती. चहा-कॉफी एकत्र झाले होते. थोडा फार हास्यविनोदही झाला होता. मनावर भार असा नव्हताच; तेही विसरले होते आणि त्यांनी आम्हालाही विसरायला लावले होते.

निसर्गनियमाने आमचे दुःख हळूहळू मंदावणार होते.

करकरे आणि मी पहाटे उठून काही वाचन-पठण करीत असू. गीतेचे पुष्कळ अध्याय आम्ही मुखोद्‌गत केले होते.

विचार व्यक्त करण्यास जवळ पुष्कळ शब्द असावेत या अभिलाषेने आम्ही लघु

अमरकोशही पाठ केला होता. काही सूत्रे, काही स्तोत्रे आम्ही वाचीत असू, त्याचा अर्थ समजावून घेण्याचा प्रयत्न करीत असू. करकरे हे तसे अशिक्षित म्हटले तरी चालेल. मराठी किंवा गुजराथी चार-पाच यत्ता म्हणजे काही शिक्षण नव्हे. पण शिक्षण आणि व्यवहार यांचा परस्पर संबंध नेहमी असतोच असे नाही, हे त्यांच्या ठिकाणी तरी दिसून येई. त्यांची विवेचनपद्धती सुरेख असे. कदाचित वयामुळे असेल - ते तेव्हा बेचाळीस वर्षांचे होते - त्यांना व्यवहारज्ञान चांगले होते. आपल्याला इंग्रजी किंवा बरचे शिक्षण नाही ही गोष्ट त्यांना खटकत असे. त्यांना इच्छा होती आणि आम्हा दोघांना सवड होती. ए बी सी पासून त्यांनी शिक्षणाला आरंभ केला. दोन वर्षांत ते टाइम्स किंवा फ्री प्रेस यांचे अग्रलेख वाचू लागले, समजू लागले आणि समजावूही लागले.

आमचे नित्यक्रम चालू राहणार होते, आम्हाला चालू ठेवण्याचे होते. आमच्या शिक्षा आमच्या पुढे होत्या त्या पार करून आम्हाला जायचे होते. एक दिवस आमची सुटका होणार आहे हा मनोमन विश्वास होता. पुढे तो विश्वास डळमळीत होऊ लागला होता. पण शिक्षेच्या प्रारंभी तरी आम्हाला ती व्यथा नव्हती.

नित्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी आम्ही पहाटे उठलो. प्रातर्विधी, स्नान आटोपले. मनावरील खिन्नता मनाचा शोध न घेताही जाणवत होती. आम्ही गीतापठनास बसलो होतो. खिन्नतेतून उमटलेल्या शब्दांनाही उदासीनता आली होती.

चित्तवृत्ती केंद्रित करण्याचा मी प्रयत्न करीत होतो. श्लोकामागून श्लोक म्हणत होतो. दुसऱ्या अध्यायाच्या बिसाव्या श्लोकावर आम्ही आलो.

देही नित्यमवध्योऽयं देहे सर्वस्य भारत
तस्मात सर्वाणि भूतानि न त्वं शोचितुमर्हसि ।

माझ्या चित्तवृत्ती केंद्रित झाल्या त्या श्लोकाच्या भावार्थावर नव्हे तर नथुराम आणि आपटे यांच्या मृत्यूच्या घटनेशी ! न त्वम् शोचितुमर्हसि ! कसे काय शक्य आहे ? स्थितप्रज्ञता काय एवढी सोपी आहे का ? माझे डोळे डबडबले, पठन थांबले, अर्धा ते पाऊण तास मी मनमोकळेपणाने रडलो.

दुपारी घरची मंडळी भेटण्यास आली होती. पुन्हा माझा बांध फुटणार असे सारखे वाटत होते. भेट झाली. पुष्कळ वेळ झाली. साठलेल्या गोष्टी बोललो. उदासवाणेपणा थोडा वेळ असला तरी दुःखावेग आला नाही.

आम्हाला नथुराम आणि नाना यांची दहनभूमी दाखवा, आम्हाला तेथील माती घ्यायची आहे, अशी अधिकाऱ्यांना आमच्या घरच्या मंडळींनी विनंती केली. अधिकाऱ्यांना ती विनंती पूर्ण करता आली नाही. त्यासाठी त्यांनी खेद व्यक्त केला.

जे अधिकाऱ्यांच्या अधिकाराबाहेरचे आहे, ते त्यांना करण्यास सांगण्यात अर्थ नाही,

असा विचार घरच्या मंडळींनी केला. जे आपल्या हातात आहे आणि ज्याला अधिकारी अडथळा आणू शकणार नाहीत ते आपण करावे असे त्यांनी ठरविले.

नथुराम आणि नाना यांच्या वस्तू नातेबाईकांच्या स्वाधीन करण्यात आल्या. पुस्तके आणि कागदपत्रे आधीच तपासून ठेवली गेली होती. तीही त्यांना परत दिली गेली.

घरची मंडळी बंदिगृहाबाहेर पडली. माझी पत्नी सिंधू, बंधू दत्तात्रय आणि गोविंद यांनी बंदिगृहाला साष्टांग नमस्कार घातला. सिंधूने ओंजळभर धूळ आपल्या पदरात बांधून घेतली. भावनांची ती चरमसीमा बघून तेथे असलेल्या शिपायांचे आणि बंदिपालाचे डोळे पाणावले.

जेथे नातेबाईक उरतले होते तेथे शेकडो लोक गोळा झालेले होते. पंजाबच्या त्या वेळच्या भावना हा एक इतिहास आहे. जमलेल्या मंडळींनी ती धूळ आपल्या मस्तकाला लावली. नातेबाईकांना निरोप देण्यासाठी ते लोक अंबाला स्थानकावर सहस्रांच्या संख्येने गोळा झाले होते.

आमचे प्रत्यहीचे कार्यक्रम चालले होते. पण आम्हाला आता अंबाला बंदिगृहात राम वाटेना. मला आणि करकरे यांना बंदिगृह बदलून मागण्याची शक्यता होती. आम्हाला मुंबई प्रांतात - आजच्या महाराष्ट्रात - धाडले जावे, अशी आम्ही विनंती केली.

नथुरामची भेट होऊ शकली नाही याचा आई-वडिलांना विषाद वाटला. आता जगायचे असे किती दिवस आहेत, निदान गोपाळची तरी भेट घेऊया या तळमळीने त्यांनी त्यांच्या वृद्धावस्थेतही अंबाल्याचा प्रवास करण्याचा निश्चय केला. प्रवासाची दगदग न मानवल्याने प्रकृती खालावली आणि मृत्यू आला तरी बरे, आणि गोपाळची नियोजित भेट झाली तरी बरे, असे त्यांनी मनाशी धरले होते. माझा धाकटा भाऊ गोविंद याला त्यांनी बरोबर घेतले आणि त्यांनी माझी भेट अंबाला बंदिगृहात तीन-चार महिन्यांनी घेतली.

अधिकारीवर्गाने एक धोरण ठरले होते. त्यांचे म्हणणे असे की, तुम्ही महाराष्ट्रातले. आज ना उद्या तुम्ही तुमच्या प्रांतात जाल. आम्ही तुम्हाला कसे वागवितो याचा ठसा तुम्ही आपल्याबरोबर न्याल. तुम्ही सर्व प्रकारे नियमांत वागत आहात, तुम्हाला यत्किंचितही त्रास झाला तर ते आम्हाला भूषणावह ठरणार नाही. आम्ही तुम्हाला चांगले वागविले की वाईट, याची तुलना तुम्हाला तेथे करता येईल. आमची अपेक्षा एवढीच आहे की, आम्ही तुम्हाला चांगले वागविले नाही असा ग्रह तुमच्या मनात आणि तुमच्या नातेबाईकांच्या मनात आमच्यासंबंधी होऊ नये.

एक शंका म्हणून आम्ही एकदा अधिकाऱ्यांना विचारले, 'तुम्ही आमच्याशी सौजन्याने वागता. आमचे प्रकरण हे असे. तुमच्यावर काही आक्षेप येत नाही काय ?'

अधिकारी म्हणाले, 'आक्षेप आला असता तर त्याच क्षणी आम्ही आमचा रोख

बदलला असता, पण आम्हाला वेगळ्या प्रकारच्या सूचना आहेत. आणि ते आम्हाला संरक्षण आहे.'

'कोणत्या सूचना ?' आम्ही विचारले.

'बंदी नियमपालन करीत असतील तर नियमात म्हणून जे काही असेल ते सर्व त्यांच्या पदरात टाका आणि त्यांच्याशी कोणत्याही प्रकारे आकस धरू नका.' अशा सूचना आल्याचे अधिकारी म्हणाले. ते पुढे म्हणाले, 'आम्हाला काही लवचिक अधिकार असतात, त्यांचा बापर आम्हाला निर्भयपणे करता येतो. सूचनांमुळे संरक्षण मिळते ते असे.'

मला पुरावा देता येणार नाही, पण या सर्वांच्या मुळाशी सरदार पटेल होते असे माझे अनुमान आहे. खरोखर, ते जर जिवंत असते तर पुढे आमचा जो छळ झाला तो झाला नसता आणि आमची सुटका पाच-सहा वर्षे आधी झाली असती.

अधिकाऱ्यांच्या सौजन्याने माझी आईवडिलांशी जी भेट झाली ती फार निवांतपणे झाली. सुखदुःखाच्या गोष्टी त्यांना बोलता आल्या. सांत्वनाचे काही शब्द मला बोलता आले. मध्यंतरी कॉफीची वेळ झाली होती, त्यांना मी कॉफी करून दिली. त्यांना अतिशय समाधान वाटले.

काही दिवसांनी मी गीतेच्या अकराव्या आणि अठराव्या अध्यायांचे मराठी समश्लोकी रूपांतर करून आई-वडिलांना भेट म्हणून धाडले होते.

तुम्ही पंजाब सोडून येऊ नका, निदान स्वतः होऊन येऊ नका, अशी पत्रे माझी पत्नी धाडीत असे. स्वर्गीय श्री. रामभाऊ मंडलिक एकदा भेटण्यास आले असताना त्यांनीही आम्हाला तेच सांगितले होते.

परंतु आम्हाला दिल्ली शासनाने 'ब' वर्ग दिला होता. महाराष्ट्रात आल्याने बागणुकीत अंतर पडणार नाही अशी आमची कल्पना होती. घरच्या मंडळींना गाठीभेटी घेण्यास महाराष्ट्रातील कोणतेही कारागृह सोयीचे पडेल असेही वाटत होते. परंतु त्यापेक्षाही आणखी एका आकर्षणाला मी भाळलो होतो. दोन वर्षांनी मिळणारा प्रावकाश म्हणजे फर्लो म्हणून ओळखली जाणारी चौदा दिवसांची घरी जाण्याची मोकळीक आम्हाला मिळेल अशी आशा वाटत होती. म्हणून आम्ही आवेदने केली होती ती मागे घेण्याचे आम्ही टाळले.

अंबाला बंदिगृहात आम्हाला ट्रिब्यून, हिन्दुस्थान टाईम्स, स्टेटसमन ही इंग्रजी वृत्तपत्रे मिळत असत. प्रताप, मिलाप आणि आणखी एक दोन हिंदी किंवा प्रांतीय भाषांतील दैनिके मिळत. अमुक बंद्यांना एक वर्तमानपत्र असे प्रमाण असते. मात्र आलटूनपालटून सर्व वर्तमानपत्र मिळू शकत.

आम्हा चौघा भावात वाचनाचा नाद नव्हता तो मलाच. माझे वाचन अतिशय सावकाश असे. इंग्रजी वाचताना तर दोन-चार शब्द झाले की मी अडत असे. माझी शालांत

परीक्षा उत्तीर्ण झाली होती. मी महाविद्यालयात गेलो नव्हतो. संधी मिळाली आहे तेव्हा वाचन वाढवावे असे मला वाटू लागले. पण आळशाची सवय एकाएकी मोडणे कठीण होते. हळूहळू मी वाचनाची सवय केली.

एक दिवस आमच्या बदलीच्या आवेदनाला होकार आला. मदनलाल पंजाबचाच असल्याने त्याच्या बदलीचा प्रश्न नव्हता. तो तेथेच राहणार होता.

अंबाला बंदिगृहात आम्ही जे काम केले ते मनापासून केलेले होते. त्यात आमचा स्वार्थ होता हे निर्विवाद आहे. आमचा वेळ त्यात चांगला जात असे. आणि जे काम करावयाचे त्यात व्यवस्थितपणा असावा अशी आवड असल्याने केलेले काम चांगले होई.

आम्ही काही दिवसांनी आमच्या प्रांतात जाणार आहोत याची मनाला एक प्रसन्नता आली. अनपेक्षितपणेच अधिकाऱ्यांनीच एक दिवस आमच्या प्रसन्नतेत भर टाकली. सकाळचा दौरा चालू होता. अधिकारी आमच्याकडे आले. आमच्या इतिहासपत्रिका आमच्याजवळ होत्या, मुख्य अधिकाऱ्यांनी त्या हातात घेतल्या, त्या विभागाच्या बंदिपालाकडे निर्देश केला आणि त्यांना ते म्हणाले, 'शर्माजी, तुमचे लक्ष दिसत नाही. इतके चांगले काम केले आहे. त्यासाठी त्यांना विशेष सूट द्यायला नको का ? तुम्ही माझ्याकडे पांची पुस्तके ठेवा.'

वर्षाला तीस दिवसापर्यंत विशेष सूट देण्याचा अधिकार अधीक्षकांना होता. चार-पाच दिवस विशेष सूट आमच्या पदरात टाकली गेली होती. अधीक्षकांनी बीस दिवसांची सूट आमच्या इतिहासपत्रिकेवर नोंदवली. आम्हाला आनंद झाला. सुट्टीच्या अपेक्षेने काम केले असेल किंवा नसेल. पण आमच्या कामाचे यथायोग्य मूल्यमापन केले होते, मनःपूर्वक आणि उत्तम प्रतीचे काम म्हणजे विशेष सुट्टीला पात्र असे समीकरण ठरल्याने आम्हाला तसे काम करण्याची पुढे चटक लागली. सुट्टीसाठी चांगले काम करावे हा हेतू असल्याने आमचे काम निरपेक्ष नव्हते.

तो वेळपर्यंत दोन वेळा आम्हाला मोठी सूट दिली गेली होती. स्वतंत्र भारत २६-१-१९५० या दिवशी सार्वभौम झाला होता. त्या गणतंत्राच्या सोहळ्यानिमित्त आम्हाला चाळीस महिन्यांची सूट दिली गेली. मार्च १९५० मध्ये पंजाबचे कारागृह विभाग - प्रमुख अंबाला बंदिगृहात आले होते. वर्षाला साठ दिवसांची विशेष सूट देण्याचा त्यांचा अधिकार होता. वर्तणूक चांगली असेल त्याबद्दल महिन्याला पाच दिवस या प्रमाणात सूट देण्याची त्यांनी आज्ञा दिली. आम्हाला पंचावन्न दिवस मिळाले. आम्हाला शिक्षा म्हणजे दोन्ही टोकांनी जळणारी मेणबत्ती वाटली. एक टोक दिवसादिवसाने आम्ही जाळीत होतो, तर दुसरे टोक कधी नियमाप्रमाणे, कधी वैकल्पिक अधिकार म्हणून तर कधी राज्याचा विशेष आनंदोत्सव म्हणून आमच्या पदरात सूट टाकून अधिकारी जाळीत होते. मध्यावरच ही शिक्षेची मेणबत्ती

जळून जाणार, आम्ही मुक्त होणार असे सुसंगत अनुमान करण्यातही आम्हाला जवळजवळ सुटकेइतका आनंद होत असे.

आता आपण वेगवेगळे होणार म्हणून मदनलालने एक लहानसा समारंभ केला होता. अधिकाऱ्यांनीही आम्हाला छोटासा निरोप दिला होता. पण त्यांनी आमच्या पदरात टाकलेली सूट आम्हाला पुढे उपयोगी पडणारी वस्तू होती. त्याचे मूल्य आम्हाला फार होते.

अमृतसरहून एक पिंजऱ्याच्या ठेवणीचा स्वतंत्र डबा मागविला गेला. आता तसे डबे अस्तित्वात नाहीत. पूर्वी त्यांना प्रिझनर्स बोगी म्हणत. दि. १३-५-१९५० ला आमचे प्रस्थान ठरले. दुपारी आम्ही निघालो. पॅसेंजर गाडीला तो डबा जोडला गेला असल्याने दि. १९-५-१९५० ला सायंकाळी आम्ही नाशिक बंदिगृहात पोहोचलो.

卐 卐

तेरा

अंधार ! अंधार !!

शुक्रवार दि. २०-१०-१९५० या दिवशी दसरा होता. नाशिक बंदिगृहातील तो आमचा पहिलाच दसरा. आम्हाला ज्या विभागात ठेवले गेले तेथून कक्षावलीत (Cellular yard) सहाव्या विभागात आम्हास त्या दिवशी जाण्यास सांगितले.

जवळ सामान मोजकेच असते. ते आवरणे आणि दुसरीकडे घेऊन जाणे काही मिनिटांत करता येते. मी आणि करकरे यांनी सामान आवरले आणि अधिकाऱ्यांनी सांगितलेल्या खोल्यात राहण्यास गेलो. आमच्या आजवरच्या मर्यादा संकुचित होत्या. दसऱ्याचे सीमोल्लंघन अनायास झाले होते.

नाशिक बंदिगृह १९३० च्या आसपास बांधले आहे. ते अद्ययावत बंदिगृह. आजही इतर बंदिगृहांपेक्षा ते बंदिगृह चांगले वाटते. त्याची रचना सुरेख आहे. सुरक्षितता आणि सुंदरता या दोन्ही गोष्टींकडे लक्ष पुरविले आहे.

मुख्य दाराच्या दोन्ही अंगांना कार्यालये आहेत. आतील दारातून बंदिगृहात गेले की, डाव्या हाताला रुग्णालयाचे आवार आणि उजव्या हाताला निरोधाविभाग म्हणजे कारंटाइन वॉर्ड आणि धान्यागार आहे. मुख्य रस्त्यावर आणि साधारणपणे बंदिगृहाच्या मध्यभागी एक गोलाकार तीन मजली वास्तू आहे. तिला स्तूप किंवा टॉवर म्हणतात. डाव्या हाताला अर्धवर्तुळाकार आवारात एकलकोंड्याचे सहा विभाग आहेत. प्रत्येक विभागात तेहतीस आणि बावीस खोल्यांच्या दोन दोन ओळी आहेत. उजव्या हाताला तशाच अर्धवर्तुळाकार परिघात असेच सहा विभाग आहेत. त्यात प्रशाल म्हणजे हॉल किंवा बॅरक आहेत. त्यातील चार विभाग आता दोन मजली केलेले आहेत.

स्तूप ओलांडून पुढे गेले की तटाच्या मागच्या भिंतीला समांतर उद्योगशाला आहेत.

नवीन बंदी आले की त्यांना प्रथम दहा दिवस निरोधा विभागात म्हणजे कारंटाईन

बॉर्डमध्ये ठेवण्याची प्रथा आहे. कोणी काही साथ घेऊन आलेला असेल तर ते त्या दहा दिवसात समजते आणि साथ आत पसरत नाही. निरोधा विभागात दहा खोल्यांच्या तीन ओळी आहेत.

प्रत्येक विभागात पाणी साठविण्यासाठी सिमेंट हौद आहेत, कपडे धुण्यासाठी दगडी उतरण आहे. शौचकूप उद्धावन पद्धतीचे म्हणजे फ्लशचे आहेत. पाणीपुरवठा अपुरा असल्याने उद्धावन वापरात नसते.

बंदिगृहाची काही दुभती गुरे आहेत. काही बैलजोड्या आहेत. बंदिगृहाबाहेर मळा आहे. तेथे भाज्या काढतात. कधी ज्वारीही काढतात. आतील मोकळ्या जागातही गुरांसाठी गवत राखले जाते.

दीड सहस्र लोक राहतील एवढी व्यवस्था नाशिक बंदिगृहात आहे. दुमजली-प्रशाला झाल्यापासून आणखी बंदी राहू शकतात. काही वर्षे बंदिगृहात साधारणपणे दोन सहस्र ते बावीससशेपर्यंत लोक राहत.

शिधापद्धतीचा परिणाम बंदिगृहातील अन्नावरसुद्धा होई. काही वर्षे लाल ज्वारीच्या भाकरी सतत असत. त्याच ज्वारीच्या पिठाची कांजी म्हणजे थोडे मीठ टाकून पातळसर शिजवलेला पदार्थ सकाळी दिला जाई. भाकरीबरोबर एकदा डाळ आणि एकदा भाजी असे. अन्नपूर्तीसाठी कडधान्याची उसळ एकदा दिली जाई.

आठवड्यातील जेवणे चौदा. त्यातील एक जेवण भाताचे आणि एक पोळीचे असे. रविवारी दोन औंस गूळ आणि तेल (वनस्पती) दिले जाई.

सकाळचे जेवण दहाला आणि संध्याकाळचे चारला असे. खोलीत किंवा बॅरकमध्ये अन्न घेऊन जाण्यास बंदी असे.

पुन्हा पुन्हा येणाऱ्या बंधांसाठी नाशिक बंदिगृह निवडले गेल्याने तेथे याच वर्गाचे लोक असत. मुंबई हे लक्ष्मीचे घर, म्हणून पुन्हा पुन्हा चोऱ्या करणाऱ्यांचेही ते माहेरघर आहे. तेथून दंडितांची पाठवणी नाशिकला करीत.

दि. १९-५-१९५० या दिवशी आम्हाला नाशिक बंदिगृहात आणले होते. निरोधाविभाग म्हणजे क्वारंटाइन वॉर्ड आमच्यासाठी मोकळा केला होता. अधीक्षक, मुख्य बंदिपाल, आणि त्या विभागाचे बंदिपाल यांच्या व्यतिरिक्त आमच्याकडे कोणी जायचे नाही असा दंडक होता. एक कुंडेवाला म्हणजे भंगीकाम करणारा बंदी आमच्याबरोबर त्या विभागात ठेवला गेला होता. विभागाच्या दारावर आळीपाळीने शिपाई असत. सकाळी डॉक्टर येऊन जात. आमचा पत्रव्यवहार नेण्याआणण्याचे काम त्या विभागाचे बंदिपाल करीत. आठवड्यातून दोनदा अधीक्षकांची चक्कर होई.

अंबाला बंदिगृहात आम्ही काही महिने काढले होते. त्यानंतर आमच्या पायातील

दंडाबेड्या उतरविल्या होत्या. अंबाला ते नाशिक या प्रवासात सुरक्षिततेसाठी आम्हाला दंडाबेड्या घातल्या होत्या. नाशिकला पोहोचल्यावर दुसऱ्या दिवशी म्हणजे दि. २०-५-१९५० ला दंडाबेड्या काढल्या.

आमच्यात 'क्रिमिनल'चे अस्तित्व नाही हे नाशिक बंदिगृहाच्या अधिकाऱ्यांच्याही थोड्याच दिवसांच्या निरीक्षणाने लक्षात आले. आम्हाला अनुभव येई तो असा, की आमच्यासंबंधी पुष्कळजण काही काल्पनिक अवास्तव पूर्वग्रह मनात बागवीत असत. आमच्याशी प्रत्यक्ष बोलणे झाले, थोडाफार परिचय झाला म्हणजे त्यातील एका एका पूर्वग्रहाचा लोप होई आणि दुरून केलेल्या कल्पना आणि वस्तुस्थिती यातील अंतर लक्षात येई.

निरोधा विभागातच आम्हाला काम देण्याचे होते. प्रथम हाताने कपडे शिवण्याचे काम दिले गेले. नंतर नवार विणण्याचे काम आम्ही केले. वेतनपद्धती चालू झाली होती. कामाच्या प्रमाणात वेतन मिळे. या वेतनाचे प्रमाण बाहेर काम केले तर मिळणाऱ्या वेतनाच्या एक पंचमांश असे, पण हे कोष्टक जेव्हा ठरले त्या वेळची स्थिती पुढे सारखी बदलत राहिली. बंदिगृहातील प्रमाण तेच स्थिर राहिले. आम्हाला कधी दोन आणे, कधी चार आणे दिवसाकाठी वेतन मिळे.

पडेल ते काम करण्याची आणि त्यात कौशल्य दाखविण्याची आमची धडपड असे. अधिकारी आम्हाला तशी संधी देत. त्या दिवसात श्री. लॅटूस नावाचे एक परदेशी (अभारतीय) गृहस्थ अधीक्षक होते. त्यांनी मला लाकडी कातकाम - फ्रेट वर्क - करता येईल का ते विचारले. प्रयत्न करीन म्हणून मी सांगितले. त्यांनी त्या कामाची उपरकणे आणि साहित्य दिले. हे सर्व निरोधा-विभागात चालू होते.

आम्हाला पाच महिने तेथे झाले होते. काही काळ गेल्यावर आमच्यावरील बंधने थोडी थोडी शिथिल होत होती. अधून मधून कोणी बंदीही आम्हास कपडे शिवणे किंवा नवार विणणे शिकविण्यास येत असत. ते अर्थातच अधिकाऱ्यांच्या सांगण्यावरून येत असत.

सणाचा दिवस म्हणजे बंद्याला एक प्रकारे मानसिक यातनांचा दिवस. घरच्या मंडळींना हा सण आपल्या अनुपस्थितीत गोड वाटेल का ? आपण काही गोडधोड करून खाल्ले तर घरच्या मंडळींची आठवण आपल्याला आल्यावाचून राहील का ? पुढचा सण आपणास घरच्या मंडळींत बसून घालविता येईल का ? एक ना दोन ! अनेक विचारांनी त्याचे मन व्यग्र होते. पण हे प्रथमप्रथम होते आणि शिक्षेला मर्यादा आहे तोवर विवेकाने बंद्याला त्या भावना दाबून ठेवता येतात. भावनावश बंदी मात्र सणावारी कष्टी दिसतात, अश्रुपात करतानाही आढळतात. पण अशा बंद्यांनाही असेल त्या परिस्थितीत आनंद मिळविण्याची सवय होते.

बंद्यांना मिळणारे गूळ, तूप, डाळीचे पीठ, तांदूळ, इत्यादी पदार्थ साठवून ठेवायचे आणि सणाच्या दिवशी त्याचे काही मिष्टान्न करायचे अशी बहुतेक बंदिगृहात पद्धत आहे. प्रत्यहीचे अन्न बंद्याला पुरेसे असे. पण तेच तेच खाणे कंटाळवाणे होऊन जाते. पुन्हा, दोन सहस्र लोकांचा स्वयंपाक रात्रंदिवस करण्याचा असल्याने त्या शिजविलेल्या अन्नाला रुची राहत नाही. सकाळी दहा वाजता वाटण्याच्या भाकरी सकाळी सहा वाजेपर्यंत पुच्चा केल्या तरच इतर पदार्थ शिजवण्याला वाव मिळतो, म्हणून कधी कधी त्यात कच्चेपणा, कधी चव नसणे हे प्रकार होतातच. म्हणून एखाद्या दिवशीच्या पालटाने काहीतरी वेगळे वाटते. तेवढा आनंदही पुरवून खाता येतो.

बंदिगृहात विक्रीकेन्द्र उघडण्याची योजना कार्यवाहीत आली होती. त्या विक्रीकेंद्रात किंवा कँटीनमध्ये खाद्यपदार्थ ठेवले जात. मिळणाऱ्या वेतानाचा दोन तृतियांश भाग बंद्याला त्यासाठी वापरता येतो. सणाच्या दिवशी जिलबी, बुंदी, चिवडा असे पदार्थ त्या विक्री केंद्रात केले जात. पण विक्रीकेंद्राचा मुख्य उपयोग बंद्यांना विडी-काडी मिळावी हा असे. सणाच्या दिवशी मात्र बंदी खाद्यपदार्थ पूरक अन्न म्हणून घेत आणि सण साजरा करीत.

बंद्याला एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी हलविण्याला काही कारण द्यावे लागते असे नाही. अंतर्गत प्रबंधनासाठी म्हणजे internal administration साठी अशी बदलाबदली अवचितपणे करावी लागते. आमचे हे स्थलांतर असेच अंतर्गत प्रबंधासाठी होते. आम्ही न विचारताच त्याचे कारण आमच्या कानावर आले होते. कारण त्या कारणाचा बभ्रा झाला होता.

हा दसरा आपण आणखी वेगळ्या पद्धतीने साजरा करू असे काही बंद्यांच्या मनात आले. त्यांनी योजना केली, सामग्री जमविली, त्या त्या उद्योगशाळेतून उपकरणे बनवून आणली. निरोधा-विभाग आणि तट यांच्यामध्ये गवत वाढविलेले होते. पलीकडे धोबी घाट होता. कामानिमित्त त्या परिसरात बंद्यांची ये-जा असे. वरील अत्युत्साही बंद्यांनी त्या गवतात एक सोयीची जागा पाहिली आणि सरळ दारूची हातभट्टी लावली !

दसरा त्यांनी साजरा केलाही असता. पण त्यांचे दुर्दैव आडवे आले. एका बंद्याला त्याच्या श्रमासाठी म्हणून एक बाटली मिळण्यास हवी होती. त्याला पाव बाटली देऊन त्याची बोळवणी केली गेली. प्रकरण हमरीतुमरीवर आले. भांडे फुटू नये म्हणून त्याला आणखी थोडीशी दिली.

दसरा दुसऱ्या दिवशी होता. हातात वस्तू असेल त्या दिवशी सण या धोरणाने त्या बंद्याने त्याला मिळालेली दारू रिचवली. मग आपल्यावर अन्याय झाला आहे हे त्याला आठवले. हमरीतुमरी करण्यात अर्थ नाही, आपण वैध मार्गानेच न्याय मिळविला पाहिजे असा विवेक करून तो सरळ जमादाराकडे गेला आणि आपला खरा एका बाटलीचा अधिकार

आहे हे जमादाराला त्याने पटविले.

जमादाराने दारू स्वाधीन मागितली. पण ती संपली असल्याचे त्याने सांगितले. त्याच्या श्वासोच्छ्वासावरूनही ते कळत होते. जमादाराने आपल्या वरिष्ठांना तेथे आणले. शास्त्रोक्तपद्धतीच्या त्या हातभट्टीचा अंतर्गत व्यवस्थेत पंचनामा झाला. ताब्यात मिळालेल्या बंद्यांना कोंडून ठेवले. इतरांना हे समजण्यास वेळ लागला नाही. त्यांनी पुरावा पोटात गडप केला.

या आठ-दहा हौशी मंडळींना बंद करण्यासाठी निरोधा-विभाग मोकळा हवा होता. त्यासाठी आमची पाठवणी त्या दिवशी कक्षावलीत सहाव्या विभागात केली होती.

दारूची भट्टी मिळणे त्या दोन सहस्र वस्तीच्या, सुरक्षित बंदिस्त, नियमबद्ध टापूत एक चांगलीच खळबळजनक वार्ता होती. आम्हाला भीती वाटली ती आणखी वेगळीच होती.

मद्यबंदी निर्बंधाचा बापर तीव्रपणे होऊ लागला होता. दारूचा व्यापार, बापर आणि व्यवहार चोरून करणाऱ्यांना दहशत बसावी म्हणून पुष्कळांवर खटले भरले जात होते. त्यासाठी आरक्षीगण वाढविला गेला होता. अनेक संशयितांना शिक्षा लागत होत्या. आणि ते चार भिंतींच्या परिघात येत होते. या दहशतीने तरी निदान लोकांचे नैतिक मूल्य वाढावे, त्यांना दारूच्या व्यवहाराची भीती वाटावी अशी निर्बंधाची किंवा निर्बंधकारांची अपेक्षा होती. वास चावताचावताच एकदम ठसका लागावा तसे चार भिंतींच्या आतच दारूचे पेव फुटले होते.

मोरारजी मंत्री ! आता या दंडित संशयितांचे काय होईल ? अधिकाऱ्यांचे काय होईल ? आणि सर्वांत म्हणजे आचार्य अत्रे यांना जर या गृहमंत्रालयाच्या गाभाऱ्यातील हातभट्टीचा नुसता वास आला तर मोरारजींचे काय होईल या कल्पनेनेच आमच्या पोटात गोळा आला ! तरी आमचा त्या प्रकराणाशी संबंध नव्हता !

बंदिगृहातील खळबळजनक घटनांची बहुधा जशी बिल्हेबाट लागते तशीच वरील हातभट्टीकांडाची लागली. बंद्यांना अंतर्गत शिक्षा झाल्या आणि खळबळीतील मद उतरला.

कक्षावलीतील सहाव्या विभागात आणखी काही बंदी ठेवले होते. ते आबार मोठे होते. आम्हाला आवारात हिंडता येत असे. त्या बंद्यांशी बोलता येत असे.

थोड्या दिवसांनी आम्हाला शिक्षणवर्ग चालविण्याचे काम दिले गेले. वाचनालयाची व्यवस्था बघण्याचे कामही आमच्याकडे आले. सर्व काम आम्ही नवीन नवीन कल्पनांचा उपयोग करूनही करीत होतो. अधिकाऱ्यांनीही वेळोवेळी आम्हाला उत्साह दिला. आमचा वेळ कामात चांगला जात असे. उत्सवप्रसंगी काही सांस्कृतिक कार्यक्रम आम्ही घडवून आणीत असू.

शैक्षणिक वर्गांसाठी पैसे किंवा सूट म्हणजे रेमिशन मिळत असे. आम्ही सूट घेत

राहिलो.

नाशिक बंदिगृहात येऊन आम्हाला दोन वर्षे झाली होती. दि. १०-५-१९५० या दिवशी आमचा 'ब' वर्ग काढून घेतला आणि आम्हाला 'क' वर्गात ठेवले. आम्हाला 'ब' वर्ग दिल्ली शासनाने दिला होता. वर्गीकरणाच्या लढ्याला भगतसिंग आणि त्याच्या सहकाऱ्यांनी तोंड फोडले होते. जतींद्रनाथांनी आमरण उपोषण केले होते, त्यात त्यांचा अंत झाला. त्या वेळच्या शासनाने राजकीय आंदोलनातील बंद्यांच्या वर्गीकरणाचा विचार केला. राजबंद्यांना पुढे त्या सुविधा मिळत गेल्या. त्याचा आरंभ एका बलिदानाने झाला होता असे आपणाला इतिहासातील घटनांवरून दिसते.

आम्हाला वर्ग दिला त्यावेळी त्या अभियोगाचे राजकीय स्वरूप हा प्रधान घटक त्या वेळच्या शासनाधिष्ठित व्यक्तींनी ध्यानात घेतला होता. चार वर्षांनंतर तो घटक बदललेला नव्हता. बदलली होती मुंबई राज्याच्या प्रमुखांची दृष्टी.

आम्हाला 'ब' वर्ग दिल्याची नोंद आमच्या अधिपत्रावर म्हणजे वॉरंटवर केली गेली होती. त्यात कोणाच्या अधिकारात आणि कोणत्या पत्राच्या आधारे हा वर्ग दिला गेला तेही लिहिले होते. मुंबई राज्याने आमच्या वर्गीकरणात ढवळाढवळ करावी असे कोणतेच कारण नव्हते. आमचे सर्व लक्ष आम्ही दिलेल्या कामावर केंद्रित केले होते. अधिकाऱ्यांनी आमच्यावर टाकलेल्या विश्वासाचे प्रतिपादन आम्ही त्याप्रकारे देत होतो.

मदनलाल पंजाबचा असल्याने त्याला अंबाला, फिरोजपूर, जालंदर इत्यादी बंदिगृहात ठेवले होते. त्यालाही 'ब' वर्ग मिळाला तो आमच्याबरोबर. मदनलालचा 'ब' वर्ग काढून घेण्याचा खटाटोप मुंबई राज्याने केला होता असे आम्हाला नंतर समजले. सर्वांना समान न्यायाचा अधिकार संविधानाने दिला आहे. मुंबई राज्याने त्याचा अर्थ समान अन्याय झाला पाहिजे असा बहुधा केला आणि मदनलालचा वर्ग तोडण्याच्या खटपटीत अव्यापारेषु व्यापार त्यांनी केला.

पंजाब राज्याची दृष्टी दूषित, कलुषित आणि प्रतिशोधग्रस्त झाली नव्हती. त्यांनी मदनलालचा वर्ग तोडला नाही. आपल्या तावडीत असलेल्या बंद्यांना तरी आपण छळून घेऊ अशा विचाराने मुंबई राज्याने हा अन्याय आमच्यावर लादला.

या संबंधात आम्ही केंद्र शासनाला पुनरावेदन केले होते. पण मुंबई राज्याने घेतलेला आणि लादलेला निर्णय फिरला नाही. सरदार वल्लभभाई पटेल यांची आठवण होणे अपरिहार्य होते. त्यांचा अंत झाला होता. मुंबई राज्यातील प्रतिशोधाने चेतलेल्या व्यक्तींना रान मोकळे होते. गांधीजींच्या संरक्षणात कुचराई केली अशा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष आरोपांचे अशा प्रकारे परिमार्जन होईल अशी भावना या प्रतिशोधात्मक कृतीमागे शासकीय वरिष्ठांची असणे शक्य आहे.

आम्ही नाशिकला आलो तेव्हा पाच-सहा दिवसांतच माझ्या पत्नीकडून मला एका-दोन पत्रे आली. त्यातले एक अंबाल्याहून नाशिकला पुनःप्रेषण म्हणजे redirect झालेले होते. पंजाब सोडून येऊ नका, येथे तुम्हाला चांगली बागणूक देणार नाहीत, वरचे लोक लहान मनाचे आहेत, असा सारांश त्या पत्रात होता. नाशिकच्या ठिकाणावर धाडलेल्या पत्रातही, तेथील शासकीय लोक तुमचा छळ करतील अशी भीती पत्नीने व्यक्त केली होती.

पत्र देताना मला बंदिपाल म्हणाले, 'तुम्हाला प्रतिशोधात्मक बागणूक मिळेल, असे घरच्या मंडळींना का वाटावे ? पंजाबात तुम्हाला काय अधिक मिळत होते आणि येथे काय उणे मिळेल ?'

मी एवढेच बोललो, 'येथे येऊन थोडे दिवस झाले आहेत. माझ्या पत्नीची भीती खोटी ठरली तर चांगलेच.'

वर्ग तोडणे हा प्रतिशोधाचा पहिला फटका आम्हाला दिला गेला.

जेव्हा अन्यायाचे निराकारण होणे शक्य नसते तेव्हा अन्याय गिळून प्राप्त परिस्थितीशी मिळते घ्यावे लागते. आमच्या नवीन वर्गीकरणाच्या चौकटीत आम्ही चालू लागलो.

मुंबई राज्यात समान श्रेणीच्या बंद्यांना उपलब्ध असलेल्या सुविधा आम्हाला मिळू शकतील अशी आशा होती. दीर्घ शिक्षा असलेल्या बंद्यांची दोन वर्षे भोगून झाली म्हणजे त्याला दोन आठवडे घरी जाण्याची मोकळीक मिळते. ही सुविधा ज्यांना मिळू शकेल, अशा बंद्यांच्या वर्गात आम्ही मोडत होतो. मी त्याचप्रमाणे आवेदन केले होते.

उत्तर आले, शांततेला धोका येण्याचा संभव आहे, म्हणून सुट्टी देता येत नाही. शांततेला धोका असण्याचा संभव हे जितके संदिग्ध तितकेच अतिव्याप्त कारण आहे. तरी त्या त्या अधिकाऱ्याचे तसे मत किंवा त्याचे Subjective satisfaction हेच प्रमाण मानले जाते आणि त्यावर निराकरणाची संधी नसते.

ठराविक अवधी उलटल्यावर मी पुन्हा आवेदन केले. एप्रिल १९५४ मध्ये उत्तर आले - गांधीहत्या अभियोगातील बंदी म्हणून सुट्टी नाकारली आहे. त्या त्या अधिकाऱ्यांनी स्थानिक परिस्थितीसंबंधी जे वाटते आणि जे कारण म्हणून पुढे केले जाते त्यापलीकडील हे कारण होते. 'गांधीहत्या अभियोगातील दंडित' हा नवीन वर्ग शासनाधिष्ठित व्यक्तींनी निर्माण केला. त्या वैध आधार नाही, विधिमंडळाचे संमोदन नाही. पण अन्याय करण्याचा अधिकार आपणास मिळाला आहे, तो बजावून घेऊ, या भावनेतून आम्हाला अशी बागणूक मिळाली. जसजसे दिवस अधिक जातील तसतशी शासनाची दृष्टी न्यायविन्मुख होत जाईल अशी तेव्हापासूनच भीती वाटू लागली होती.

वाचनालय, शिक्षणवर्ग, सांस्कृतिक कार्यक्रम हे एक प्रकारचे बाह्यमवीन काम होते. बंद्यांशी सारखा संबंध येत असे. समाजातील वेगवेगळ्या थरातून आलेल्या बंद्यांचे स्वभावविशेष

बघता आले. अपराधवृत्ती हा सर्वांत समान घटक आहे का याचा अभ्यास करता आला. अपराध का होतात या संबंधीही काही ठोकताळे लक्षात आले.

स्वतःचे कौतुक व्हावे ही मनुष्याची उपजत इच्छा असते. पण कौतुक गुणांचे होत असते हेही तो जाणतो. बंद्यांत असलेल्या विशेष गुणांना वाव दिला आणि चालना दिली तर बंदीही कौतुकास्पद कामे करताना दिसतात. एक चित्रकार हत्या प्रकरणी शिक्षा भोगीत होता. बंदिगृहात त्याच्या त्या गुणांना वाव दिला गेला. त्याने उत्तम गालिचे निर्माण केले. त्यातील एक लंडन येथील प्रदर्शनात ठेवला गेला होता.

हस्तलिखित नियतकालिक काढणे हा सहावी - सातवी फार तर दहावी - अकरावीमधील विद्यार्थ्यांना शोभणारा छंद. पण बंद्यांची श्रेणीच वेगळी. नाशिकच्या बंदिगृहात बंद्यांचे एक हस्तलिखित काढण्याचा उपक्रम झाला. कोणाचे हस्ताक्षर, कोणाची चित्रकला, कोणाची लेखन करण्याची हौस, कोणाचा कविता करण्याचा नाद, या गुणांना कोठेतरी एका ठिकाणी वाव मिळावा म्हणून या हस्तलिखिताची कल्पना होती. अधिकाऱ्यांचा दृष्टिकोन अनुकूल होता. काही अंक निघाले, त्याचे वरपर्यंत कौतुक झाले.

माझ्या सान्निध्यात एक चित्रकार बंदी होता. त्याच्या सहाय्याने आपण चित्रकला शिकावी असे माझ्या मनात आले. साधने मागविली. मी रेषा काढू लागलो. मला वाटले माझी खूप प्रगती झाली आहे.

एका हस्तलिखितात मी महर्षी कर्वे यांचे चित्र काढून दिले. नाव घातले नाही. कारण त्या दिवसात महर्षींची चित्रे पुष्कळ वृत्तपत्रांतून बघण्यात येत.

स्वतःचे कौतुक करून घ्यावे म्हणून मी ते चित्र एका जाणत्याला दाखविले. तो ते चित्र क्षणभर बघत राहिला. 'चित्र फारच सुंदर आहे. पहिलाच प्रयत्न असून एखाद्या कसलेल्या चित्रकाराची कला यात उतरली आहे. तू उत्तम चित्रकार आहेस.' अशासारखे त्याचे उद्‌गार केव्हा बाहेर पडतात यासाठी मी आतूर झालो.

त्या जाणत्याने तोंड उघडले, 'मला वाटते, टागोरांची दाढी थोडी लांब दाखवायला पाहिजे !' मी हं म्हटलं. चित्र त्याच्याजवळून लगबगीने काढून घेतले. पुन्हा चित्रकलेच्या फंदात पडलो नाही.

बंद्यांच्या गुणांचे सक्रिय कौतुक करण्याचे साधन अधिकाऱ्यांच्या हाती असते. शैक्षणिक किंवा सांस्कृतिक क्षेत्रातील या नियतकालिकानिमित्त बंद्यांना पाच दिवसांची सुट्टी दोनदा देण्यात आली. मी मात्र त्या सुट्टीतून वगळला गेलो. एकदा नव्हे दोनदा. माझ्या इतिहासपत्रिकेवर सूट देण्यासंबंधी नोंद झाली होती आणि ती खोडली गेली होती. करकरे यांचे नाव नियतकालिकाशी संबंधित नव्हते. प्रश्न माझ्यापुरताच होता. अधिकाऱ्यांनी खोट्या भीतीपोटी माझ्यावर हा अन्याय केला होता. तो माझ्या मनात राहिला होता. आपण दिलेल्या

सक्रिय प्रोत्साहनाला प्रतिसाद मिळत नाही किंवा त्याचे चीज होत नाही असे दिसले तर दात्याला जसे ते जाणवेल आणि पुन्हा असे प्रोत्साहन देताना त्या व्यक्तीच्या संबंधात तो विचार करील, त्याचप्रमाणे श्रमाचे योग्य मूल्यमापन केले जात नाही असे आढळले तर श्रम करणाऱ्याच्या मनालाही ती गोष्ट जाणवेल, ही जाणीव अधिकारीवर्गाने ठेवली नाही. अशा अन्यायातून मनाला उदासता येत असे, पण पुन्हा एवढ्याने काय झाले आहे असा विवेक करून आणि पुढच्या आशेने मन नव्या उत्साहाने कामाला प्रवृत्त होई.

शैक्षणिक संवाद किंवा बोधप्रिय नाटके बसवून घेण्यात करकरे यांची अनेक दिवस त्या परिसरात अद्वितीयता होती. प्रसंगोपात मी काही पथे करीत असे. शैक्षणिक वर्गात पुष्कळदा उत्तम गाता येत असणारे आणि गोड गळा असणारे दंडित आढळत. त्यांचा उपयोग करून करकरे ती पथे बसवून घेत. दोनदोन तास चालणारे मनोरंजनाचे कार्यक्रम केले जात. आम्ही चालवीत असलेले शिक्षणवर्गही आदर्श असत. आम्ही घेत असलेले हे वर्ग किंवा आयोजिलेले गाण्याचे आणि इतर कार्यक्रम अधिकाऱ्यांना बंदिगृहातील दर्शनीय वस्तू वाटत असत. बाहेरून बंदिगृहाला भेट देण्यास येणारे अधिकारी किंवा शासकीय वरिष्ठ अधिकारी आमच्या अशा कार्यक्रमाची योजना करण्यास सांगत असत.

अशा उपक्रमासाठी बंधांना जेव्हा सूट दिली जाई त्या सुट्टीतून मात्र आम्ही वगळले गेलो नाही. ती सूट कधी नऊ दिवसांपर्यंतही आम्हाला मिळाली आणि शासनाने ती संमोदित केली.

विनोदबुद्धीला भितीचे बंधन नसते. ज्याच्या त्याच्या स्वभावाप्रमाणे मनुष्य कोणत्याही परिस्थितीत विनोद निर्माण करतो. निरुपद्रवी विनोद अर्थातच रोचक वाटतात, कारण त्यात व्यंगाचे लक्ष्य कोणाला केलेले नसते.

अधीक्षकांची चक्कर चालू होती. विनंती करणारे बंदी ओळीत उभे होते. कोणाला सुट्टीसाठी आवेदन करण्याचे होते, कोणाला आपल्या घरी तार पाठवून भेट बोलवण्याची होती. कोणाला पुनरावेदन करण्याचे होते. कोणाला नवे कपडे हवे होते. योग्य ते आदेश देऊन अधीक्षक पुढील बंधांपुढे सरकत होते.

'फार जुलूम होतो, साहेब'. म्हणून एका बंधाने अधीक्षकांना गंभीरपणे सांगितले.

याला काही त्रास दिला गेला आहे किंवा कदाचित मारझोड झाली आहे अशा कल्पनेने अधीक्षकांनी विचारले, 'कसला जुलूम ?'

काही म्हणी, काही संतवचने, काही उपदेशपर श्लोक यांचे फलक करून बंदिगृहात ठिकठिकाणी लावले होते. हा बंदी उभा होता, त्यामागे एक झाड होते. झाडावर एक फलक होता. त्यावर 'हमेशा सच बोलो' हे शब्द होते. त्या पाटीकडे बोट दाखवून बंदी म्हणाला, 'इथून जाताना हा फलक वाचावा लागतो आणि फार त्रास होतो.'

बंदी आपणास कुणीकडे तरी ओढत नेत आहे हे अधिकाऱ्यांच्या लक्षात आले. पण ते रागावले नाहीत. बंद्यांचा हेतू समजावून घेऊ या विचाराने ते त्याला म्हणाले, 'मग काढून टाकायची का ती पाटी ?'

'नाही साहेब, शब्द थोडे बदला.'

'कोणते शब्द आणि का बदलायचे ?'

'असे पाहा साहेब, बंदिगृहातही घटकोघटकी इकडून तिकडून खिशात नाही तर टोपीत नाही तर अंग पुसण्यात आम्ही सारखे चोरून आणतो. भाजीचे मुळे असोत, फोडणीसाठी मिरची असो, नाहीतर स्वयंपाकघरातली डाळ असो, चोरून आणलेल्या काटक्यांनी ते कोठ्यात शिजवतो. अन्न कसे मिळते ते आपण बघताच. ज्वारी लाल. त्यात पुन्हा वास येत असलेली. क्रूड ऑईलसारखी दिसणारी भाजी, कळकट्ट डाळ. आमचे दिवस हंडीवाचून कसे निघणार ? (हंडी म्हणजे चोरून लावलेली चूल आणि शिजवलेले अन्न) अन् चोरीवाचून हंडी कशी लावणार ? कुणी धरले तर हे माझे नव्हे म्हणून आम्ही पुष्कळदा वेळ मारून नेतो आणि खटला वाचवतो. आता प्रत्येक वेळी खरे बोलायचे म्हटले तर आमच्या शिक्षाही कटायच्या नाहीत आणि आपल्याला केवळ खटले चालविण्याचे काम करावे लागेल.'

त्याला फलकासंबंधी नेमके काय म्हणायचे आहे ते जाणण्यासाठी अधीक्षक म्हणाले, 'मग या पाटीत काय बदल करावा ?'

बंदी म्हणाला, 'सध्यापुरते, 'कभी कभी सच बोलो' एवढाच भार आमच्यावर राहू दे. तेवढा पचनी पडू लागला म्हणजे मग ही पाटी लावावी !'

लटक्या गंभीरपणाने अधीक्षकांनी आज्ञा दिली. 'जमादार, याला खोलीबंद करा आणि याच्या खोलीत 'कभी कभी सच बोलो' एवढी पाटी लावा. तेवढे याच्या पचनी पडले म्हणजे मग त्याला या पाटीखालून हिंडू दे !'

एके वर्षी थंडी नेहमीपेक्षा अधिक पडली होती. थंडीच्या दिवसात दोन कांबळी अधिक देत, पण थंडी तेवढ्यानेही भागेना. एकेक कांबळे अधिक द्यावे म्हणून डॉक्टरांनी अभिप्राय लिहिला. बक्कागारात कांबळी होती पण ती वरिष्ठांच्या अनुज्ञेवाचून देता येत नव्हती. अधिकाऱ्यांनी वरिष्ठांना लिहिले होते.

चार-पाच दिवस झाले तरी कांबळी मिळेनात. थंडी कडक होती. डॉक्टरांनी अभिप्राय दिल्याचे बंद्यांना समजले होते. एक दिवस संध्याकाळी काही बंदी विशेष विनंतीसाठी कार्यालयापाशी गेले.

'आम्ही मुख्य कार्यालयाच्या आदेशाची वाट बघत आहोत. दोन-चार दिवसात उत्तर येईल. हे बघा, तुमच्यापैकी कुणाला कळते का ? हे पत्र लिहिले आहे ते पहा.' असे म्हणून अधिकाऱ्यांनी पत्रांची नस्ती त्या बंद्यांच्या पुढ्यात करण्याचा अविर्भाव केला.

पत्र लिहिले होते हे खोटे नव्हते. कोणा बंद्याने पत्र बघण्याची उत्सुकता दाखवली नाही. पण नकार घेऊन परत जायचे म्हणजे पुन्हा थंडीने कुडकुडावे लागणार या भीतीने एका बंद्याने म्हटले, 'साहेब, आपण पत्र लिहिले आहे यावर आमचा विश्वास आहे. पत्राचे उत्तर येईपर्यंत एकेक प्रत आम्हाला द्या म्हणचे तीच आमच्या कांबळ्याला जोडून थंडी भागते का पाहातो !'

मयदिबाहेरच्या बोलण्याने अधिकाऱ्यांना राग आला. त्या बंद्याला खोलीबंद केले. मात्र त्याला तीन नव्हे चार कांबळी दिली ! सकाळपर्यंत अधिकाऱ्यांचा राग शांत झाला. बंद्याच्या बोलण्यातली धार त्याला थंडी सहन न झाल्याने आली होती हे त्यांनी जाणले. दौऱ्यावर येताच त्यांनी त्या बंद्याला खोलीतून मोकळे केले. संध्याकाळी सर्व बंद्यांना एकेक कांबळे अधिक दिले गेले. मग ते वरच्या आदेशाने असेल किंवा अधिकाऱ्यांनी तसा निर्णय घेतल्याने असेल.

नाशिक बंदिगृहातील बैलापैकी एकाची खोड चमत्कारिक होती. खाकी कपड्याचे त्याला वावडे होते. बंद्याच्या हाती तो बैल निमूटपणे वागत असे. पण खाकी कपडे घातलेला शिपाई किंवा आणखी कोण जवळ आला की त्याला तो बैल हुंदाडत असे.

बंद्यांनी त्यावर एक गोष्ट रचली होती. हा बैल पूर्वजन्मी बंदी असला पाहिजे. त्याला शिपायांनी छळले असले पाहिजे. तो त्यात मेला असला पाहिजे. म्हणून या जन्मी तो शिपायांना जवळ येऊ देत नाही.

पण यापेक्षा दिल्लीच्या बंद्यांनी एक व्यंग रचले होते ते मोठे खोचक होते. सर्वोच्च न्यायालयासाठी मी दिल्ली बंदिगृहात जात असे. जेवणाच्या वेळी आवारातील भिंतीवर पुष्कळ कावळे जमत. बंद्यांचे जेवण झाले की बंदी भाकरीचे तुकडे भिरकवत, 'आओ अफसरों, यह तुम्हारा हिस्सा' असे म्हणत. कावळे ते टाकलेले तुकडे हवेतल्या हवेतच चोचीत धरून घेऊन जात.

त्या शब्दांबद्दल कुतूहल मी दाखविताच दोन-चार बंद्यांनी माझी जिज्ञासा पुरी केली. ते म्हणाले, 'हे कावळे पूर्वजन्मी बंदिगृहाचे कर्मचारी. त्यांची क्षुधा-शांती न होताच मेले बिचारे ! अपुरी इच्छा पुरी करून घेण्यासाठी त्यांनी देवाजवळ कावळ्याचा जन्म मागितला. कारण माणसाचा जन्म मागितल्याने पुन्हा बंदिगृहावर अधिकारी म्हणून राहण्यास मिळेल की नाही कोण जाणे ! देवाने त्यांचे ऐकले. ते या जन्मी कावळेच असल्याने आमच्या जेवणाच्या आधीच भूक भागवून घ्यावी अशी त्यांना इच्छा होत नाही. आमचे जेवण झाल्यावर आमच्या उरलेल्यातून भोजन करण्याने त्यांची तृप्ती होते !'

असले तीव्र व्यंग बंदिही रचू शकतात हे कळले म्हणजे वाचकांनाही आश्चर्य वाटेल. पण मनुष्य कोंडला गेला तरी त्याची प्रतिभा मुक्त असते, प्रसंगोपात तिचे दर्शन होते, हे

कळले म्हणजे तसे आश्चर्य वाटण्याचे कारण राहणार नाही.

नाशिक येथे साबणाची निर्माणी म्हणजे factory काढली तर आसपासच्या जिल्ह्यांना साबण पुरविणे सोयीचे होईल या धोरणाने नाशिक बंदिगृहात १९-८-१९५५ या दिवशी या निर्माणीची स्थापना झाली. त्या विषयाचे ज्ञान असलेल्या अधिकाऱ्यांनी काही प्रयोग केले. काही प्रयोगांनंतर घटकांचे प्रमाण निश्चित झाले आणि कृतीला समयबद्धता आणली गेली.

प्रयोग चालू असताना मी त्याचे टिपण स्वतःच्या ज्ञानासाठी करून ठेवीत असे. हाती घेतलेल्या कामाचे अधिक ज्ञान मिळावे म्हणून काही पुस्तके मागविण्याची अनुज्ञा घेतली. चालू असलेली कृती आणि प्रमाण पुस्तकातील सूत्रांशी पडताळून पाहिली. अधिकाऱ्यांच्या संमतीने आवश्यक तेथे फेरफार केले.

सर्व काम मनुष्यबळावर म्हणजे hand labour वर अवलंबून असे. पुष्कळसे काम अवघड आणि श्रमाचे असे. मालाचा पुरवठा वेळेवर व्हावा म्हणून रात्रीही काम चालू ठेवावे लागे. कक्षावली विभाग एक मध्ये ही निर्माणी होती. या निर्माणीत काम करणाऱ्या बंद्यांचे वास्तव्य सोयीसाठी म्हणून त्याच कक्षावलीत होते. बंदिगृहांना लागणारे कीटांतक म्हणजे फिनेलसुद्धा त्या निर्माणीत बनविले जाऊ लागले. काही बंद्यांनी प्रयोग करून करूनच त्याच्या घटकांचे प्रमाण ठरविले होते.

ठाणे बंदिगृहात शाईची पूड करण्याचा उद्योग होता. ठाण्याला आर्द्रता अधिक असल्याने शाईची निर्माणी नाशिकला हलविण्याचे ठरले आणि त्याप्रमाणे दीड वर्षाने उत्पादन नाशिक येथे चालू झाले. रासायनिक उद्योगशाळा एका ठिकाणी ठेवण्याच्या हेतूने ती निर्माणीही कक्षावली विभाग एक मध्ये उभी केली गेली. दि. १९-२-१९५७ ला एक मुहूर्तमेढीचा श्लोक बंद्यांनी म्हटला होता.

कच्च्या द्रव्यापासून शाई निर्माण करण्याची असे. हिरडे कुटणे, मायफळाची पूड करणे, हिरड्याची टरफले दळणे हे सर्व जात्यावर सर्व जात्यावर केले जाई. सर्व कृतीतून अनेक दिवस स्वतः जाऊन कामाची घडी बसविली. बंद्यांना मिळणारे पारिश्रमिक चार आण्यापासून बेळी रुपयापर्यंत वेतन आम्हालाही मिळत असे.

कच्च्या साहित्याचे गणन, प्रमाण आणि शाईच्या वेगवेगळ्या अवस्थांतील कृती पूर्ण होता होता रात्र होई, अधिकाऱ्यांच्या सांगण्यावरून अंगावर घेतलेल्या दायित्वाला आपण पुरे पडले पाहिजे ही ईर्षा मनात सतत असे.

वरील उद्योगात भर म्हणून भर्जनीचा म्हणजे बेकरीचा उद्योग चालू केला गेला होता. करकरे प्रथम त्या उत्पादनाकडे बघत. मी गणन बघत असे. नंतर त्या विषयातील तज्ज्ञांची नेमणूक करण्यात आली. उत्तरदायित्व मात्र आमच्याकडे असे. ते अर्थातच अधिकाऱ्याच्या वतीने असे.

दीर्घ शिक्षेच्या बंद्याची प्रत्यक्षात पाच वर्षे पूर्ण होताच त्याचे प्रकरण परामर्शदात्री समितीपुढे म्हणजे Advisory board पुढे त्याच्या सुटकेच्या विचारासाठी ठेवण्यात येते. ज्या ठिकाणी बंदी राहात असेल तेथल्या आरक्षीप्रमुखांचा अभिप्राय, जिल्हाधिकाऱ्यांचे प्रतिवृत्त, न्यायालयाचे निर्णयपत्र आणि बंद्यांची सर्वसामान्य वागणूक हे घटक विचारासाठी असत. पाच वर्षे प्रत्यक्ष असल्याने सुट्टीचा विचार करणे समितीच्या कक्षेत नसे. समिती बंद्यांच्या सुटकेसाठी शासनाला आपला अभिप्राय कळविते किंवा एक किंवा दोन तीन वर्षांनी प्रकरण पुन्हा पुढे ठेवावे असा आदेश देते. मध्यंतरी १४ वर्षांच्या प्रतिवृत्ताची वेळ झाली तर मात्र समितीने दिलेल्या अवधीपर्यंत थांबण्याचे नसते.

१९५४ मध्ये आमचे प्रकरण परामर्शदात्री समितीपुढे ठेवले गेले. दोन वर्षांनी प्रकरण पुन्हा ठेवावे असा आदेश समितीने दिला. १९५६ मध्ये समितीने पुन्हा आणखी एक वर्षांचा अवधी दिला. मध्यंतरी आमच्या १४ वर्षांच्या प्रतिवृत्ताची वेळ आली होती.

सूट धरून १४ वर्षे पूर्ण होण्यापूर्वी सहा महिने हे प्रतिवृत्त शासनाकडे धाडण्याचे असते. यावेळी सुट्टीला सर्वांत अधिक महत्त्व असते. कारण ती १४ वर्षांच्या गणनात धरली जाते. स्थानिक अधिकाऱ्यांचे मत, न्यायालयाचे निर्णयपत्र हे घटक असतातच. पण वेळी दुसरी मते नसली, तरीही बंद्याच्या स्वतःच्या गुणावरही शासन बंद्यांची मुक्तता करते.

यावेळी आणखी एका घटकाचा विचार केला जातो. न्यायालयात न आलेल्या घटना दंडिताने मोकळ्या मनाने सांगाव्यात अशी अपेक्षा असते. दंडितांविरूद्ध त्याचा उपयोग होणार नसतो. अशा वक्तव्याने समाजाच्या हिताच्या दृष्टीने सत्यसंशोधन करण्यास, तसेच प्रत्यक्षात झालेल्या घटना आणि न्यायालयासमोर आलेल्या घटना यातील अंतरही मोजण्यास सहाय्य होते. शासन तसा उपयोग करते किंवा नाही हे मला ठाऊक नाही, पण अपराधशास्त्राच्या म्हणजे criminology च्या अभ्यासकांना बंद्यांची अशी मनमोकळी वक्तव्ये निश्चित उपयोगी पडतील.

आमच्या प्रतिवृत्ताच्या वेळी आम्हाला या घटकांसंबंधी विचारले जाईल अशी आमची अपेक्षा होती. गांधीहत्या प्रकरणाला ऐतिहासिक महत्त्व होते. न्यायालयात पुष्कळ गोष्टी आल्या नव्हत्या, काही विकृत स्वरूपात आल्या होत्या, तर काही असत्य स्वरूपात आल्या होत्या. आमचा गांधीहत्येशी काही संबंध नाही हा आमचा न्यायालयात बचाव होता, त्यामुळे आम्ही विकृत किंवा असत्य गोष्टींचे निराकरण करण्याचा प्रयत्न आमच्या बचावाशी सुसंगत ठरला नसता. या प्रतिवृत्ताच्या वेळी घडलेल्या गोष्टी शासनाला मोकळेपणे सांगता आल्या असत्या, त्या पडताळून बघण्याची साधने शासनाजवळ होती. त्यातील सत्यासत्यता पडताळल्यावर शासनाला त्याची इतिहास म्हणून नोंद करता आली असती, जिज्ञासूंना

त्याचा लाभ देता आला असता.

पण शासनाला खऱ्या घटनांची जिज्ञासा नव्हती असे दिसते. आमचे १४ वर्षांचे प्रतिवृत्त त्यातील घटक बघून आमच्या सुटकेच्या विचारासाठी मागावयाचे हा हेतू नव्हता, तर त्या नियमाचा उपयोग करून आमच्यावर अधिक अन्याय लादता यावा हा होता, हे नंतर दिसून आले. बंदिगृहाच्या अधिकाऱ्यांना तशा सूचना असल्या पाहिजेत. म्हणून वरील घटकासंबधी परस्पर काहीतरी थातुरमातुन लिहून कळविले गेले असले पाहिजे.

योगायोगाने पहिल्या गणतंत्राच्या दिवशी दया स्वरूपात आमच्या पदरात चाळीस महिने सूट टाकली गेली होती. अशी दयास्वरूप मिळालेली सूट कापता येत नाही कारण त्यायोगे दात्याचाच अपमान होतो. बंधांच्या नियमोल्लंघनासाठी इतर सूट कापली गेली, तरी ही सूट गृहीत धरून त्याची सुटका होते, आमचे प्रतिवृत्त या सुट्टीमुळे चाळीस महिने अलीकडे आले होते.

श्री. मोरारजी देसाई यांनी १९५२ मध्ये मुंबई विधानसभेत आमच्या सुटकेचा संभाव्य दिवस १०-२-१९६० असा सांगितला होता. समजा, आमच्या नियमाविरुद्ध बागण्याने आमची सूट कापली गेली तरी वरील दयास्वरूप सूट अबाधित राहील हे गृहीत धरून त्यांनी तो संभाव्य दिवस सांगितला होता. नियमोल्लंघनासाठी आमची आठ दिवस सूट कापली गेली होती. त्याव्यतिरिक्त केव्हाही नव्हती. त्यामुळे आमची सुटका प्रकट केलेल्या संभाव्य तिथीच्या पुष्कळ अलीकडे असली पाहिजे हा आमचा विश्वास होता.

चांगली वर्तणूक ठेवल्याने प्रत्येक वर्षाची सद्वर्तन सूट आम्हाला मिळत गेली. नियत कामाव्यतिरिक्त काम केल्याने विशेष सूट आमच्या पदरात टाकली गेली. जेथे पैसे किंवा सूट अशी निवड करण्याची संधी असे तेथे आम्ही सुट्टीची निवड केल्याने तेही दिवस आम्ही मिळविले होते. सर्व सूट शासनाने वेळोवेळी संमोदित केली होती. एकाही दिवसाला आक्षेप येतला नव्हता.

सहजीवनाचे आणि समाजधारणेचे जे संकेत आहेत त्यात कोणाही व्यक्तीने नियमात बागावे हा एक मूलभूत संकेत आहे. नियम समाजाच्या हिताच्या दृष्टीने समाजच करीत असतो. स्वतःवर अशी बंधने लादून घेण्यात, आपला उपसर्ग इतरांना किंवा इतरांच्या व्यवहारांना पोहोचू नये हा हेतू असतो. तसेच इतरांचाही उपसर्ग आपणास पोहोचू नये असाही हेतू त्या नियमात अनुस्यूत असतो. नियमात बागणे हा धर्म, नियमोल्लंघन करणे समाजाच्या स्वास्थ्याला बाधक म्हणून दंड्य, असा विधीचा व्यवहार असतो.

वर म्हटल्याप्रमाणे, स्वतःच्या नियमपालनाचा आपणास इतरांच्या नियमापालनाने लाभ मिळतो. त्यामुळे नियमात बागण्याचे पारितोषिक का द्यायचे ? तो तर धर्म ! पण दंडिताच्या संबंधात हा संकेत वेगळ्या प्रकारे वापरला जातो.

विधीचे उल्लंघन केल्याचे सिद्ध झाल्याने कोणा नागरिकाला शिक्षा होते आणि तो दंडित बनतो. अशा दंडितांवर ओघानेच आणखी बंधने येतात. त्या बंधनांचे उल्लंघन करण्याचीच ज्याची वृत्ती राहील, त्याला नियमात आणण्यासाठी सतत शक्तीचा वापर करावा लागेल. त्यामुळे त्याच्यात कोडगेपणा येईल, अशा मानसशास्त्राच्या पायावर बंधाने नियमपालन केले तर त्याला पारितोषिक देण्याचा उपबंध (provision) आहे. ते पारितोषिक म्हणजे त्याला त्यासाठी दिली जाणारी नियत सामान्य सूट.

अनुभवाने सिद्ध झालेली आणखी एक गोष्ट अशी की, बंदी सर्वांत अधिक कशाला भीत असेल तर त्याच्या सुटकेचा दिवस लांबणीवर पडण्याला. नियमात बागले तर सुटकेचा दिवस जवळ येईल हे प्रलोभन आणि नियमोल्लंघन केले तर सूट कापली जाऊन सुटका दूर जाईल, ही भीती बंद्याला नियमात ठेवण्यास सहाय्य करते. सहसावधी दंडित आपले दिवस बंदिगृहात सर्वसामान्यपणे शांतपणे काढतात त्याचे मुख्य कारण हे आहे. प्रत्यक्ष दंडशाचा वापर करण्याची वेळ क्वचितच येते.

आम्ही नियमात वागत आहोत म्हणजे काही विशेष करीत आहोत अशी आमची धारणा नव्हती. पण प्रलोभनापासून आम्ही मुक्त नव्हतो. आम्ही दंडित या वर्गात मोडत होतो. नियमात वागण्यामुळे मिळणाऱ्या सुट्टीचा आमचा अधिकार होता. आम्हाला शासनाने त्या सुट्टीतून बगळले नव्हते त्यामुळे आमच्या पदरात ती सूट पडत होती आणि शासन वेळोवेळी संमोदन देत होते.

शिक्षेतील सूट म्हणजे remission याचा अर्थ लागलीच स्वातंत्र्य उपभोगण्याचे दिवस असा नसतो तर, त्या बंद्याच्या शिक्षेचे त्या प्रमाणात फलतः अंतिम लघुकरण म्हणजे consequent shortening of the sentence असा असतो.

दयास्वरूप दिलेली सूट आणि आम्ही कणाकणाने मिळवून जतन करून ठेवलेली सूट मिळून आम्ही प्रत्यक्षात आठ वर्षे पुरी करताच आमचे १४ वर्षांचे प्रतिवृत्त धाडले गेले. सूट शिक्षेच्या एक तृतीयांशापेक्षा अधिक होता कामा नये. तशी होत असेल तर शासनाकडून विशेष संमोदन (Special Sanction) मागविले पाहिजे असा नियम आहे. दयास्वरूप सूट त्या सुट्टीला अपवाद असल्याने आमच्या प्रतिवृत्ताला आक्षेप येणार नव्हता. आम्ही गोळा केलेली सूट ही आमच्या वर्तुणुकीची मापनपट्टी होती. ती मापनपट्टी शासनानेच निर्माण केलेली असल्याने खरी की खोटी हाही प्रश्न उद्‌भवणार नव्हता.

पंजाबाच्या उच्च न्यायालयाने माझ्या प्रकरणात दयेच्या अधिकाराचा म्हणजे Power of clemency चा वापर करण्याचा शासनाला अभिप्राय दिलेला होता. यावेळी तोही घटक शासनापुढे येणार असल्याने माझी यावेळी सुटका झाली पाहिजे अशी आशा मी बाळगून असलो तर ते अवधीपूर्ण म्हणजे Premature किंवा अवास्तव नव्हते. निर्णयाची वाट

आम्ही बघत होतो.

मध्यंतरी १९-१२-१९५६ या दिवशी करकरे यांची वैद्यकीय परीक्षा केली गेली. गेले सात-आठ दिवस त्यांना क्षयासारखी लक्षणे दिसत होती. परीक्षेत त्यांना फुफ्फुसफोड म्हणजे Lung abscess असल्याचे आढळले. त्याला शस्त्रक्रिया करणे अशक्य होते, उपचारासाठी त्यांना रुग्णालयात ठेवले. ५-१-१९५७ ला त्यांना बाहेरील रुग्णालयात ठेवण्यात आले.

करकरे यांच्या पत्नी सौ. सरस्वतीबाई यांची अवस्था अतिशय करुण झाली होती. आम्ही बंदिगृहात करीत असलेले काबाडकष्ट त्यांना वारंवार कळत असत. कधी कधी भेट आली असतानाच आमच्या हातात त्वर्य काम असे. भेटीला आलेल्या मंडळींना चार-चार तास खोळंबून ठेवून आम्ही प्रथम काम पुरे करीत होतो आणि मग भेट घेत होतो. या ओतलेल्या आत्मीयतेचे फळ हातातोंडाशी आले आहे असे वाटत होते तोच निपतीच निष्ठुरपणे ते फळ हातातून हिसकावून घेत आहे, असे वाटण्याइतकी करकरे यांची क्षीण स्थिती झाली होती.

करकरे यांना विशेष सुट्टीवर (पॅरोलवर) सोडावे अशी सरस्वतीबाईंनी विनंती केली होती. वर्षभराने करकरे पुन्हा आजारी पडले होते. त्या वेळी त्यांना मधुमेहाचा विकार जडला असल्याचे आढळले होते आणि त्यातच त्यांना गुदद्वारापाशी गळू झाले होते. शस्त्रक्रिया करून त्यांच्यावर उपचार झाले होते. त्यापुढे ते पथ्यावर असत आणि सारखे आजारी असत. त्यावेळीही सरस्वतीबाई ह्या करकरे यांच्या तात्पुरत्या सुटकेची विनंती करीत होत्या. पण आम्ही अंधारात कोंडले गेलो होतो आणि अंधारातच आमचा अंत व्हावा अशाच जणू प्रतिशोधाच्या भावनेने शासनाचे मनही झाकाळून गेलेले होते. कोणत्याही विनंतीस शासनाने कधी अनुकूलता दाखविली नाही.

नाशिक बंदिगृहात त्या वेळी डॉक्टर श्री. चव्हाण होते. जानपद चिकित्सक म्हणजे सिव्हिल सर्जन श्री. थत्ते होते. या दोघांनी करकरे यांच्यावर प्रारंभापासून केलेले उपचार त्यांना बरे करण्यास मुख्यतः कारणीभूत झाले.

तीन आठवड्यांनी करकरे यांना मुंबई-बंदिगृहात धाडले. त्यांना जे. जे. रुग्णालयात आणखी उपचारासाठी ठेवण्याचे होते. तेथे महिनाभर राहून करकरे नाशिकला परत आले. परतल्यावर ते नाशिक बंदिगृहात रुग्णालयातच काही महिने होते.

काही वर्षे मी हिंदीचा अभ्यास केला. महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभेच्या पहिल्या परीक्षेपासून प्रारंभ करून फेब्रुवारी १९५६ मध्ये पंडित परीक्षा दिली. शेवटच्या अभ्यासाच्या दिवसांत कामाचा ताण अतिशय पडत असे. पहाटेपासून निर्माणीचे काम चालू होई. आर्थिक वर्ष तीन-चार महिन्यांनी संपणार होते. कच्च्या मालाचा पुरवठा येऊन पडला होता. ठराविक अवधीत मागणी पुरी करण्याची होती. रात्री नऊनंतर बंदिपालाबरोबर बसून सर्व निर्माण्यांचे

गणन पुरे करावे लागे. कधी अकरा तर कधी बारा वाजत, कधी पहाट होई. काम करण्याला उत्साह वाटत असे. कारण स्वतःला गुंतवून घेतल्याने शिक्षेचा ताण मनावर राहात नसे.

पण स्वतःसाठी म्हणून काही कमवावे असेही वाटत असे. अभ्यासासाठी मला मुख्य कार्यालयाने दिव्याची आणि एका बैठ्या पटलाची म्हणजे डेस्कची सुविधा दिली होती. आपणाला काही उपाधी असावी, ती मिळविण्याला काही अभ्यास व्हावा अशी इच्छा होती. अभ्यासाला मिळणारा वेळ अपुरा असे.

परीक्षेला आठ दिवस राहिले होते. मी एक दिवस अधीक्षकांना विनंती केली, 'माझ्या बंदिपालांना आठ दिवसांची रजा द्या किंवा त्यांना आठ दिवस या विभागात येण्याची बंदी करा !'

माझी कुचंबणा अधीक्षकांनी लक्षात घेतली. ते बंदिपालांना म्हणाले, 'तुम्ही अभ्यासाला वेळ देत नाही ? बंद करा रात्रपाळी ! अभ्यासाला सबड दिलीच पाहिजे. याने ही परीक्षा उत्तीर्ण होणे आपल्यालाही भूषणावह ठरेल !'

आठ दिवस खरोखरीच बंदिपाल तिकडे आले नाहीत ! स्वयं कामाची तेवढी विल्हेवाट लावून मी अभ्यास करीत असे. निवांतपणासाठी कधी कधी स्तूपाच्या पहिल्या मजल्यावर बसत असे. परीक्षेला बाहेरच्या केन्द्रावर जाण्याची मोकळीक मिळाली नव्हती. वेळी दंडाबेडी घालून धाडले असते तरीही माझी सिद्धता होती. राष्ट्रभाषासभेने माझ्यापुरते एक केन्द्र बंदिगृहात उघडले, ते नाशिक केन्द्राला जोडले आणि मी परीक्षा दिली. जी कामे थोडीफार साठून राहिली होती ती परीक्षेनंतर संपवून टाकली. कारण आता अभ्यासाचा अंकुश मनावर नव्हता. मी परीक्षेत उत्तीर्ण झालो. एका अधिकाऱ्याला माझ्या यशाचे एवढे कौतुक वाटले की, नियम घटकाभर गुंडाळून ठेवून त्यांनी दोन पेढे माझ्या हातावर ठेवले.

हिंदी परीक्षेला बसणाऱ्या कर्मचाऱ्यांनाही मी अधिकाऱ्यांच्या सांगण्यावरून काही सहाय्य देत असे.

दिनांक ११ ८-१९५७ ला आमच्या १४ वर्षांच्या प्रतिवृत्ताचा निर्णय आला. 'पंधरा वर्षे प्रत्यक्ष भोगून झाल्यानंतर सुटकेचा प्रश्न हाताळला जाईल.' (The question of release will be taken up after completing fifteen years actual Imprisonnment.)

धक्का देणारा तो निर्णय होता. त्यात खोटेपणा होता, प्रतिशोधभावना होती, क्रूरपणा होता, अमानुषता होती. निदान सभागृहाच्या प्रतिष्ठेसाठी तरी शासनाने पहिल्याने प्रकट केलेल्या दिवसाच्या आसपासचा दिवस सुटकेचा म्हणून सांगावयास पाहिजे होता.

१९६४ मध्ये १४ वर्षांचा विचार होणार ! म्हणजे आणखी सात वर्षांनी ! सध्या झालेली सूट अधिक शासन प्रसंगोपात देईल ती सूट असे मिळून जवळ जवळ पंचवीस वर्षांनी

सुटकेचा विचार केला जाणार ! कारासंहितेच्या कोणत्याही प्रचलित प्रणालीला हे धरून नव्हते. अर्थ एकच होता, तो बेळेपर्यंत आम्ही मेलो तर ठीकच, नाहीतर आणखी अवधी पुढे वाढवीत वाढवीत आमच्या शिक्षेचा अंत करण्याआधीच आमचा अंत घडायचा असे शासनकर्त्यांच्या मनात होते. न्यायालयाने गांधीहत्येनिमित्त दोन बळी मागितले ते यथाविधी दिले गेले होते. आपल्या दयेच्या अधिकाराचा उलटा वापर करून मागच्या दाराने आणखी बळी घेऊ शकलो तर आपण गांधीजींचे खरे उपासक ठरू अशा कदाचित अंधश्रद्ध व्यक्तिपूजेच्या पण तितक्याच क्रूर भावनेने आमच्यावर हा अत्याचार केला गेला होता. 'सत्याने वागा' अशा उपदेशाच्या प्रकारची शासकीय नेत्यांची भाषणे जेव्हा मी वर्तमानपत्रातून त्यानंतर वाचीत असे, तेव्हा माझ्या मनात येई, शासनाने भिंतीआड लादलेल्या या असत्याच्या अंधाराचे प्रदर्शन लोकांपुढे मला मांडता येईल काय ? तसे मांडण्यास मी जिवंत राहीन काय !

वृद्धत्वाने जीर्ण झालेल्या आणि चिंतेने ग्रासलेल्या माझ्या आईवडिलांना या निर्णयाने कळले ते एकच. आता गोपाळ आपल्या जिवंतपणी आपणास स्वतंत्रपणे भेटू शकत नाही. न्यायालयाने दिलेल्या अभिमताचा विचार १४ वर्षांच्या प्रतिवृत्ताच्या वेळी होईल असे त्यांना मिळालेले आश्वासन या निर्णयात जळून गेले होते. फेब्रुवारी १९६० मध्ये सुटका होईल या विधानसभेत दिल्या गेलेल्या आश्वासनावर विश्वास ठेवण्यासही या निर्णयामुळे जागा राहिली नव्हती. ते काही पाकिस्तानला दिलेले आश्वासन नव्हते, की जे पाळलेच पाहिजे असे शासनाला वाटावे !

मी वर केलेली तुलना संतापाने आणि काल्पनिकपणे केली आहे असे कोणा वाचकाने कृपा करून समजू नये. काँग्रेसजनही माझे लेख वाचतात. लेखात समतोलपणा असतो असे मतही ते अधूनमधून मला भेटून सांगतात. त्यांच्याकडून तसा अभिप्राय मिळविणे मला भूषणास्पद वाटते. मला ते भूषण टिकविण्याची इच्छा आहे. म्हणून एककल्लीपणाने काही आरोप करणे माझ्या हातून होणार नाही. मी येथे देत असलेल्या उदाहरणावरून कोणाही वाचकाने शासनाचे वर्तन तपासावे. शासनाला विचारून त्यातील खरेखोटेपणा पडताळून बघावा आणि ते खरे आहे असे आढळले तर त्यांनी आपल्या शासनाने आपल्याच नागरिकाची आणि विधानसभेची खोट्या मार्गाने अवहेलना केली, त्यांची प्रतारणा केली, हे लक्षात घ्यावे.

मीरदाद जरदाद हा एक जन्मठेपेचा बंदी. फाळीपूर्वीच तो हिन्दुस्थानात आल्याने उर्वरित हिन्दुस्थानचा नागरिक झालेला. हिन्दुस्थानात घडलेला त्याचा अपराध. हिन्दुस्थानच्या विधीतूनच त्याचा न्यायनिवाडा झालेला. त्याच्या १४ वर्षांच्या प्रतिवृत्तात त्याच्यावर अन्याय झाला असे गाऱ्हाणे त्याने कोणापुढे मांडावे ? शासनापुढे ? आपल्या कोण्याही न्यायालयापुढे ? ते सर्वथैव योग्यच होते. पण पाकिस्तानच्या हिन्दुस्थानातील उच्च आयुक्तापुढे म्हणजे

हायकमिशनपुढे त्याने आपले गाऱ्हाणे मांडले. हिन्दुस्थानातील मुसलमानांचे हित हिन्दुस्थानाचेच शासन बघते. पाकिस्तानच्या कोणा नागरिकावर हिन्दुस्थानात अन्याय झालेला आढळला तर त्या आयुक्ताने हिन्दुस्थानच्या शासनाकडून त्यावर उपचार करून घेणे ही कार्यालयाच्या कामाची कक्षा.

पण उर्वरित हिन्दुस्थनातही मुसलमान समाज हे एक वेगळे राष्ट्र आहे आणि त्या राष्ट्राच्या घटकांचे हित बघणे आपले काम आहे अशी सतत धारणा असणाऱ्या पाकिस्तानाच्या त्या आयुक्ताने आपल्या शासनाकडे मीरदादवर झालेल्या अन्यायासंबंधी विचारणा केली. 'मीरदाद आमचा नागरिक आहे, आमच्या अंतर्गत प्रशासनात आणि अनुशासनात आपणास ढवळाढवळ करण्याचे कारण नाही. मीरदादला गाऱ्हाणे मांडण्यास येथील न्यायालये मोकळी आहेत.' असे सयुक्तिक आणि तोडून टाकणारे उत्तर देण्याऐवजी आपल्या शासनाने लिहिले, 'यापुढे दयास्वरूप सूट दिली गेली तर मीरदादच्या शिक्षेचे त्या प्रमाणात लघुकरण होईल आणि तो तितका लवकर सुटेल.'

पुढे एका उत्सवप्रसंगी सहा महिने दयास्वरूप सूट दिली गेली. पण त्या आदेशाच्या परिपत्रकात लिहिले होते की, पूर्वी ज्यांच्या संबंधात निर्णय दिला गेलेला आहे त्यांच्या संबंधात या सुट्टीचे कार्यवहन करू नये.

परिपत्रकातील या परंतुकामुळे म्हणजे proviso मुळे मीरदाद अडकला. पण त्याने शासनाला आठवण दिली, 'पाकिस्तानी उच्च आयुक्ताला आपण आश्वासन दिले होते. ते विसरलात का ?'

शासनाने विचार केला, खरे आहे ! आपण हिन्दू नागरिकांना दिलेली आश्वासने खोटी पाडू शकू, कारण हिन्दू हे काही राष्ट्र नव्हे, म्हणून त्यांचा कोणी आयुक्त नसतो, आपण विधिमंडळाला दिलेला शब्द गुंडाळून ठेवू शकू, कारण विधिमंडळ म्हणजे कोणी परकीय सत्ता नव्हे, आपण आपल्या एखाद्या न्यायालयाचा अभिप्राय धुडकावून लावू शकू, कारण न्यायालयापेक्षा आपण श्रेष्ठ आहोत; पण एका मुसलमान नागरिकाच्या संबंधात पाकिस्तानच्या प्रतिनिधीला दिलेले आश्वासन जर आपण फिरवले तर आपली बागणूक खोटी असते असा मुस्लिम जगात बभ्रा होईल, जगात आपली नाचकी होईल.

शासनाने आपल्या परिपत्रकाला मीरदादचा अपवाद केला. त्याला कानात सांगितले, 'हे बघ, हा लाभ केवळ तुझ्यासाठीच आहे !' सहा महिन्यांची दयास्वरूप सूट त्याच्या पदरात टाकली आणि पूर्वी निश्चित केलेल्या अवधीपेक्षा त्याला सहा महिने आधी सोडून दिले !

मीरदाद पाकिस्तानचा नागिरक होता असे घटकाभर धरले तरीही जी दयास्वरूप

सूट त्याच्या संबंधात खरी होऊ शकली ती इतरांच्या संबंधात का होऊ शकली नाही ? इतर बंधांनी कोणा परकीय प्रतिनिधीकडे धाव घेतली नाही म्हणून त्यांच्यावर अन्याय ठेवला गेला काय ? आज तो इतिहास आहे. पण पुढील चुका टाळण्यासाठी आपण इतिहास सांगतो आणि वाचतो.

गोपाळची एकदा शेवटची भेट घ्यावी या तळमळीने माझे आई-वडील २९-४-१९५७ ला नाशिक बंदिगृहात भेटण्यास आले. धाकटा भाऊ गोविंद आणि आणखी काही नातेवाईक मंडळी त्यांच्याबरोबर होती.

भेटीत अश्रू नव्हते पण करुणा होती. ती दबलेली होती. माझा भार मी सहज वागवीत आहे हे मी दाखवीत होतो, तर आपल्या अंतरीच्या वेदनांनी मला दुःख होऊ नये याची ते दक्षता घेत होते.

आईने द्राक्षे आणली होती. नियम आडवा आला होता. 'आम्हाला द्राक्षे येथेसुद्धा मागविली तर मिळतात. तू व्यथित होऊ नकोस.' असे मी आईला समजाविले. बाहेरून आणलेली पाटीभर द्राक्षे आणि आईने दिलेली चार द्राक्षे यातील अंतर मी जाणत होतो. पण अधिकाऱ्यांना गळ घालायची, त्यांनी नियमाच्या आवरणातून खेदाने नाही म्हणायचे, हे मला नको होते. पंजाबात असतो तर चार द्राक्षेच काय जेवणाचे पदार्थही घेऊ शकलो असतो.

भावना मुडपून ठेवून आम्ही भेट संपविली. निरोप घेतानाही कोणत्याही प्रकारचे दुःखप्रदर्शन झाले नाही. खुरडत आई बाहेर गेली. ती खचली, अंथरुणाला खिळली. मुंबईत गोविंदाकडेच राहिली. ६-५-१९५७ या दिवशी तिचे निधन झाल्याचे पत्र मला दुसऱ्या दिवशी मिळाले.

दिनांक ९-५-१९५७ ला माझे वडील बंधू दत्तात्रय आईच्या अस्थी घेऊन आले. आणखी काही मंडळीही होती. मला तात्पुरती विशेष सुट्टी म्हणजे पॅरोल मिळणे हे त्या वेळच्या शासकांना हृदय फुटण्याइतकेच अशक्य होते. मला दर्शन घेता यावे म्हणून अस्थी बंदिगृहात आणल्या होत्या. अस्थिदर्शन करताना माझी आसवे त्या अस्थींवर गळली होती.

दहा दिवसांपूर्वी आई भेटण्यास आली तेव्हा गोदास्नान करून परतावे अशी तिची इच्छा होती. तिला उठणेही अशक्य झाले होते. म्हणून ते स्नान तसेच राहिले होते. यावेळी तिच्या पार्थिव देहाच्या अवशेषांना गोदेच्या पात्रात चिरस्नान दिले गेले.

आईच्या निधनापाठोपाठ माझी पत्नी आजारी पडली. एकावर एक आलेल्या आपत्तींच्या आघातांनी तिला होत असलेले मानसिक क्लेश तिला असह्य झाले. उपचारासाठी तिला रुग्णालयात ठेवले. मध्येच बेशुद्धावस्थेत ती बोलत असे. तिला एकच बेड लागले होते, शासनाने अन्याय केला ! दोन महिन्यांनी ती अजारपणातून उठली.

काही महिन्यांनी माझ्या वडिलांचे देहावसन झाले.

शासनाच्या निर्णयाने मनाला विलक्षण वेदना होण्याचे कारण, सश्रम कारावास समजला जातो किंवा सक्तमजुरी समजली जाते, त्यापलीकडे आम्ही रात्रंदिवस काम केले होते. आम्ही ते काम साधुवृत्तीने नव्हे तर आशेने केले होते, त्यात कठीण श्रमाचे काम होते आणि कोणाही न्यायप्रिय व्यक्तीला कौतुक वाटावे असे बुद्धिचेही काम होते. आम्ही काम कसे केले याचे वर्णन मी पत्नीला १९५९ मध्ये लिहिलेल्या एका पत्रात केले होते. त्याला एक पूर्वपिठिका होती.

झाले असे होते की, निर्णयानंतरही आमचा कामाचा व्याप कमी झाला नव्हता आणि आम्हीही अंग काढून घेतलेले नव्हते. अधिकारी बदलून बदलून येत होते. आम्ही मात्र खुंटासारखे तेथेच स्थिर होतो. दोन वर्षांनी जे अधिकारी आले त्यांच्यात आणि आमच्यात उत्पादनाच्या कामातील काही व्यवस्थेसंबंधी तीव्र वाद निर्माण झाला.

काही झाले तरी उत्तरदायित्व आमचे नव्हते, ते अधिकाऱ्यांचे होते. आमच्यावर अन्याय झाला होता. अंतर्गत शक्तीच्या बापराने तो अन्याय दाबला जात होता. आम्ही काम सोडून दिले. आम्हाला वेगळ्या विभागात बंद केले. आम्ही तेथे राहूनच त्या अंतर्गत क्षेत्रातील न्यायासाठी अधिकाऱ्यांशी हिरीरीने भांडू लागलो. तेवढ्यात एक अधीक्षक जाऊन दुसरे आले होते. त्यांच्यासमोर एक प्रकरण उभे राहिले की, ज्यामुळे त्यांचे मत आमच्याविषयी प्रथमदर्शनी कलुषित व्हावे.

तो १९५९ चा जुलै महिना होता. माझी पत्नी दिनांक ८ ला मला भेटण्यास आली होती. भेट झाल्यावर तिची अधीक्षकांशी गाठ पडली, त्यांनी तिला कार्यालयात बोलविले. त्यांचे काही बोलणे झाले.

मला तीन-चार दिवसांनी पत्नीचे पत्र आले. नियम पालन करावे, अधिकारी चांगले आहेत असे तिने मला लिहिले. अधीक्षकांच्या भेटीचाही तिने उल्लेख केला होता.

एक बाजू तिला समजली होती. आता माझी बाजू काय हे कळणेही तितकेच आवश्यक आहे, असे मला वाटले. अधिकाऱ्यांच्या करवीच ते कळणे इष्ट होते. दिनांक १४-७-१९५९ ला मी तिला पत्र लिहिले आणि अधिकाऱ्याजवळ दिले. तिला ते पत्र मिळाले. आमच्या त्या वेळच्या वादाविषयीचा आणि कामासंबंधीचा भाग असा आहे.

कारा, दि. १४-७-१९५९

प्रिय सिंधू,

तुझ्या पर्यवेक्षकांशी झालेल्या चर्चेने तुला पुष्कळ गोष्टींची कल्पना आली याने मला फार बरे वाटले. आज चार-एक महिने मी होऊन तुला या गोष्टी बोललो नव्हतो. त्याचे कारण तुझ्या चिंतेत मला आणखी भर टाकायची नव्हती. मानसिक ताणांचा संदर्भ ओझरता माझ्या

पत्रातून आढळत असेल एवढाच.

दोन व्यक्तीत किंवा पक्षात तणातणी झाल्यानंतर पूर्ववत वातावरण निर्माण होण्यास अनेक घटक आवश्यक असतात. त्यात काल हा महत्त्वाचा आहे. एकमेकांशी सामंजस्याने बोलणी करून, प्रमाद असल्यास ते समतोलपणे पाहणे आणि अपसमज असल्यास ते दूर करणे हा आणखी एक घटक आहे. दोन्ही पक्ष जेव्हा हेतुपुरस्सर किंवा मनाच्या झालेल्या ठाम समजुतीमुळे आपले तेच खरे अशी भूमिका घेतात तेव्हा दोघांनाही मान्य असणाऱ्या तिसऱ्या व्यक्तीची आवश्यकता असते.

गढूळ वातावरण निवळावे या हेतूने कोणाकडून प्रयत्न होत असतात. त्या प्रयत्नात काही तांत्रिक विघ्ने आली तर आणि त्या तांत्रिक अडचणीच मुख्य केल्या गेल्या तर वातावरण निवळावे अशी इच्छाच नाही असा ग्रह होतो आणि मूळ गढूळ वातावरणात भर पडते.

असे झटके अहेतुकपणे किंवा हेतुपुरस्सर सारखे बसू लागले तर कोणाही व्यक्तीचे मनःस्वास्थ्य टिकेल काय ? वेडी व्यक्ती असेल तर तिला या झटक्याने सुखदुःख राहणार नाही. आणि व्यक्ती वेडी नसेल तर ? तर प्रतिक्रिया होत राहातील आणि अशा झटक्यांचा अतिरेक झाला तर ती व्यक्ती वेडी होईल.

या चार महिन्यांत माझ्या मनावर वेड लागण्याइतका अतिरेकी परिणाम झाला नाही याचे श्रेय मनःस्थिती जाणणाऱ्या आणि दूरवर विचार करणाऱ्या समंजस अधिकाऱ्यांना आहे. सिंधू, सहनशीलता संपली म्हणजे मनुष्य जो मार्ग शोधतो, ज्या उपायांचा अवलंब करतो त्यामुळे नेमके त्याचा तोल सुटला आहे एवढेच ठरेल का ? ते ठरविण्याआधी सहनशीलता संपली ती अवधीपूर्व, योग्य वेळी की योग्य वेळ उलटून गेल्यानंतर हे मापावे लागेल. अवधीपूर्व नसेल आणि उपायांचा अवलंबही अयोग्य नसेल तर त्यांच्या मार्गास समर्थनच मिळेल. कृष्णशिष्टाई झाल्यानंतरच ना महाभारत उभे राहिले ? उदाहरण मोठे असेल तरी प्रमाणाने लावायचे आहे. कृष्ण आणि पांडव विजयी झाले म्हणून त्यांचे चरित्र राहू शकले. त्यांचा पक्ष न्याय्य होता अशी इतिहासाची साक्ष मिळते. गीता युद्धापूर्वी सांगितली गेली असे आपण मानतो. गीतेतील तत्त्वांचा अवलंब करून, त्यावर निष्ठा ठेवून युद्ध केले आणि विजय मिळाला म्हणून कृष्णाला आपण द्रष्टा म्हणतो. परिस्थिती उलट असती तर ? कौरवांचा विजय झाला असता तर ? द्रौपदीवर केला गेलेला अन्याय इतिहासात नोंदला गेला नसता, धृतराष्ट्राला आपण मुत्सद्दाचे स्थान दिले असते, आणि द्रष्टेपणाचे स्थान कौरवांच्या कोणा सेनापतीकडे गेले असते आणि कदाचित, बलाबलाचा विचार न करता, समतोलपणा न राखल्याने पांडवांनी आततायीपणाचा अवलंब करून आपला नाश करून घेतला असाही निष्कर्ष तत्कालीन इतिहासकारांनी काढला असता ! त्या त्या राजकर्त्यांना अनुकूल असेच ना बहुधा इतिहासकथन

केले जाते ?

अधिकाऱ्यांच्या सुस्वभावाचा लाभ घेऊन मी योग्य त्यापेक्षा अधिक लाभ घेत असेन अशी तुला कदाचित शंका आहे. सिंधू आम्हा बंधाचे काही अधिकार (rights) असतात, आणि सुविधा (Privileges, concessions) असतात. त्यातील काही सुविधा विकल्पाने (discretion) दिल्या जाव्यात असा अधिकाऱ्यांच्या हाती आधिकार आहे. यातील ज्या सुविधा विकल्पाच्या अधिकारात मला दिल्या गेल्या तो माझा मूलभूत अधिकार होता असे मी कधीच मानले नाही. त्यासाठी मी प्रत्येक वेळी त्या अधिकाऱ्यांचा आभारी राहिलो आहे. तशा त्या दिल्या गेल्या नाहीत तर मी त्यासंबंधी कधी मनात अढी धरली नाही.

असा विकल्प अनुकूलतेने वापरावा याला निकष असतो. आमच्या कामाच्या क्षमतेची कदाचित मी तुला ओझरती कल्पना दिली असेन. सर्व भारताचे मला काही ठाऊक नाही. पण मुंबई राज्यातील बंदी घेतले तर इतक्या दायित्वाची कामे कुशतेने पार पाडणारे आठ-दहा बंदी असले तर त्यात आमची गणना होईल. आज एक नव्हे दोन नव्हे, साडेतीन वर्षे प्रतिवर्षी लाखालाखाचा व्यवहार-उत्पादनाचा व्यवहार संपूर्ण दायित्वाने, अधिकाऱ्यांना दोष दाखविता येणार नाही इतक्या दक्षतेने हातून झालेला आहे. अक्षरशः रात्रंदिवस झटल्यावाचून हे होणे शक्य आहे काय ? हा व्यवसाय माझा व्यक्तिगत नव्हता किंवा भांडवलही माझे नव्हते. पण ज्या धडाडीने कोणा अधिकाऱ्याने हे दायित्व सांभाळण्याचे पत्करले, नव्हे अंगावर घेतले आणि कार्यपूर्तीसाठी त्यांनी ज्यांच्यावर विश्वास टाकला ते त्या विश्वासाला उतरले आणि अधिकाऱ्यांची धडाडी अयोग्य ठरली नाही, यात आमच्या श्रेयाचा प्रामाणिक म्हणजे प्रमाणतः वाटा आमच्या पदरात न्यायप्रिय माणूस केव्हाही टाकील. कामात आत्मीयता ओतणे हा स्वभाव झाला होता. वेतन तितके काम असा तौलनिक दृष्टिकोन ठेवला गेला नव्हता.

आई गेल्याचे पत्र मला सकाळी ११ च्या बेताला मिळाले होते. करकरे रुग्णालयात होते. मी पत्र वाचले अन् खिशात ठेवून दिले. मला दोन अश्रू ढाळायचे होते. मला जवळपास कोणी नको होते. एकटेपणा हवा होता.

बाहेर असल्यावर माणूस काही तासांच्या अवधीत रजा घेतो, नाही ? सिंधू, मला रजा नव्हती. बैलगाड्या छातीवर उभ्या होत्या. सावण धाडायचा होता. वेगवेगळ्या ठिकाणी. आज ठराविक कामापुरती ठराविक माणसे शिकलेली आहेत. त्यावेळी सर्वच दायित्व साकल्याने एकट्यावरच पडले होते म्हणा, किंवा टाकले होते म्हणा, परिस्थिती अशी होती. बैलगाड्या भरल्या. भट्ट्या चालू होत्या. त्या बिघडू नयेत इकडे लक्ष देणे क्रमप्राप्त होते. माझ्या व्यक्तिगत आपत्तीसाठी तीस-चाळीस माणसांचा व्यवहार

थांबविणे योग्यही नव्हते, शक्यही नव्हते.

दुपारी चारनंतर काही लेखनकाम असते. अधिकाऱ्यांना सहाय्य देण्याचे असते ते व्हायलाच पाहिजे. माझ्या अडचणीसाठी मी त्यांची खोटी करू का ? त्यानंतर मी अश्रू ढाळणार आहे.

आणि भर्जनीचे म्हणजे बेकरीचे पदार्थ बांधून ठेवले नाहीत तर उद्या सकाळी विक्रीला पदार्थच देता येणार नाहीत ! भर्जनी माझी नव्हे की, एक दिवस बंद ठेवावी. अनेक ग्राहके बांधलेली असतात. ती त्या विश्वासावर असतात. त्यांची मी खोटी करू ?

आणि सर्व झाकपाक झाल्यावर रात्री नऊनंतर मला एकांत मिळणार आहे.

आणि मला एकांत मिळाला. पत्र पुन्हा वाचायला काढले. वाचायचे कारणच नव्हते. मनाला जाणीव झालेलीच होती. डोळे डबडबले होते. एका मागोमाग एक आठवणींचे काहूर अंत:करणात उठले होते, त्याच मन:स्थितीत मी तुला एक पत्र लिहायला घेतले होते. पुरे केले ते आणि सकाळी धाडून दिले. कारण सकाळी पुन्हा मी घाण्याला जुंपला जाणार होतो. मला सुट्टी नव्हती. मला सांत्वन नव्हते.

आदळआपटीचे काम कितीही जपून केले तरी कोठे ना कोठे केव्हातरी दुखापत होणे अटळ असते. दह-द्रव्यांच्या म्हणजे कॉस्टिक मटिरिपल्सच्या व्यवहारातही तोच अनुभव मला आहे. या उद्योगालयाच्या प्रयोगावस्थेपासून त्याची पूर्ण घडी बसेपर्यंतच्या अवस्थेपर्यंत स्वत: कामे करून त्यात अनुभव घेतला आहे मी. निदान तिनदा माझ्या डोळ्यांत कॉस्टिकचे पाणी गेले होते. एकदा डोळ्यांतील पांढऱ्या भागात तीव्र व्रण झाला होता आणि डोळा जातो की काय याची भीती वाटली होती. एकदा खालच्या ओठावर आत आणि बाहेर कॉस्टिकचे तापलेले पाणी उडाले होते, आणि तीन दिवसांपर्यंत मला काही खाता येत नव्हते. सर्व ओठ सोलला गेला होता आणि हिरड्यांवर परिणाम झाला होता.

माझ्या शारीरिक हानीसाठी मी कोणाकडून भरपाईची अपेक्षा करणार होतो काय ? ती त्यांना देता येत नाही. (बंदिगृहातील उद्योग फॅक्टरी ॲक्टखाली येत नाहीत. म्हणून कॉंपेन्सेशनचे नियम त्यांना लागू नाहीत, हे मला ठाऊक आहे.) पण अडचणीचे काम असेल ते मी स्वत: करण्याचा अभ्यास केला, त्यात प्रगती केली. त्याच वेळी दुसऱ्या नवशिक्यांना धोके टाळून काम करावयास शिकविणे सोपे गेले आणि परिणामत: साडेतीन वर्षांच्या अवधीत कोणालाही तीव्र स्वरूपाचा अपघात झाल्याचे एकही उदाहरण नाही.

कामात आपलेपणाने लक्ष घातल्यावाचून का हे साध्य होते ? करकरे यांना झालेले फुप्फुस विकार (lung abscess) सतत कॉस्टिक आणि कॅरबॉलिकच्या वाफांशी संबंध आल्याने झाला असा एक वैद्यकीय तर्क अनिश्चित स्वरूपाचा आहे.

या आत्मीयता ओतण्याच्या स्वाभावामुळे, न्यूनतम वाया जावे या धडपडीमुळे किंवा

उद्योगालयाच्या अद्ययावततेसाठी लहान किंवा मोठ्या केलेल्या काही संशोधनामुळे, जर अधिकाऱ्यांच्या विश्वासाला मी पात्र ठरलो असेन आणि परतफेड म्हणून त्यांनी विकल्पाने देण्याच्या सुविधांचा विचार मला अनुकूल केला असेल तर मी त्यांचे आभारी राहावे हे जसे माझे कर्तव्य, तसेच माझ्या शिरावर उपकारांचा अनाठायी बोजा ठेवला आहे, असेही त्यांनी मानू नये, हेही त्यांच्यासाठी योग्य नव्हे काय ?

सध्याच्या स्थितीची तुला कल्पना दिली गेलेली आहे. त्याचे विवरण मी करीत नाही. कारण तो काहीसा वादाचा विषय आहे.

तुझ्या एका शंकेसंबंधी मात्र मी लिहीत आहे. नियमपालन माझ्याकडून नीट होत आहे ना हे तू विचारले आहेस. 'होय' हे त्याचे निश्चित उत्तर आहे, तू नेमके का विचारलेस मला ठाऊक नाही. पण माझी कल्पना बरोबर असेल तर तुला वेगळ्या शब्दात लिहीत आहे.

उदाहरण असे पाहा, झाडाची मुळे शिजवून कोणी कैदी खाताना आढळला, तर त्याचा खटला होईल. कारण तसे करणे नियमबाह्य आहे. पण चौकशीत असे आढळले की त्या बंद्याला चार दिवस जेवणच दिले गेले नव्हते. त्याने आपले गाऱ्हाणे मांडण्याचा प्रयत्न केला होता. पण कदाचित तांत्रिक कारणासाठी किंवा दुसऱ्या कारणासाठी त्याच्या गाऱ्हाण्याची दाद लागली नव्हती. तर काय होईल ! सध्याच्या अधिकाऱ्यांची तर गोष्टच सोडा. दया हा त्यांचा स्थायीभाव आहे पण कठोरतम अधिकारी जरी असले आणि ते न्यायप्रिय असले तर त्याला चार दिवस जेवण का दिले नाही ही चौकशी आधी करणार नाहीत काय ? आणि मग त्याने खाल्लेली मुळे अगतिकतेमुळेच खाल्ली होती, त्यात त्याचा स्वत:ला किंवा दुसऱ्याला अपाय करण्याचा हेतू नव्हता हा निष्कर्ष काढूनच न्यायविचार होणार नाही काय ?

सिंधू, माणूस भाकरीच्या तुकड्यावरच जगतो का ? पशू जगतात. माणसांना जगण्यासाठी कर्तृत्वाची हाव, प्रेम, सहानुभूती, त्यांच्या कृतीचे मूल्यमापन - ॲडमिरेशन असेही घटक आवश्यक असतात. मिळेल त्या मार्गाने मनुष्य हे घटक मिळविण्याची धडपड करतो. मी असे वाचले आहे की, काही थोडे प्राणी सोडून सर्व प्राण्यात आपले कळप करून राहण्याची प्रवृत्ती आढळते. मनुष्यप्राणीही सहवासप्रिय आहे. तोही कळप करून राहतो. प्रथमच्या मानवांनी जेव्हा कळप केले असतील तेव्हा मला वाटते प्रेम, सहानुभूती, कर्तृत्व आणि स्तुती यांची देवाणघेवाण करण्यासाठी. एकमेकात लढण्यासाठी ते निश्चित जवळ आले नसतील. एखाद्याचे हे घटक मिळविण्याचे मार्ग अन्यायाने बंद केले गेले आहेत असे आढळले तर कोण समंजस अधिकारी असा असेल की, हा अन्याय टिकवून धरण्यासाठी खटपट करीत राहील ? त्याचे निवारण का नाही करणार तो ?

मला स्वतःला काही अपराधीपणा वाटतो का ? त्याची दोन अंगे आहेत. एक वैध आणि दुसरे नैतिक. वैध म्हणशील तर तिळमात्र नाही. नैतिक ? होय. समज 'अ' माझे एक अधिकारी आहेत. 'ब' त्यांचे वरिष्ठ आहेत. माझे 'अ' विरुद्ध काही गाऱ्हाणे आहे. माझ्या आजपर्यंतच्या पद्धतीत मी 'अ' ना तसे सांगतो. त्यांच्या समक्ष ते 'ब' समोर मांडतो. माझे गाऱ्हाणे 'अ' ना न कळताच 'ब' कडे गेले तर ? मला चमत्कारीक वाटेल. आणखी एक गोष्ट. तुझी प्रणयपत्रे अमुक अधिकारी वाचतात, हे तुला समजले आणि समज त्यांच्यासमक्ष तुला अन् मला बोलायचे असेल तर तुला संकोच वाटेल, नाही का ? तसेच, काही गोष्टी वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत कळण्याचे कारण नव्हते. चोरून म्हणूनच नव्हे तर क्षुल्लक म्हणून. दोन मित्र आपापसात जे शब्द बोलतील ते शब्द अन् शब्द काही काव्ये नसतात. म्हणून तर मलाही चोरीसारखे वाटेल, मन अस्वस्थ होईल.

पण सिंधू, मनमोकळ्या अधिकाऱ्यासमोर मोकळ्या मनाने वागण्याची मला कधी भीती वाटली नाही. संकोचही वाटला नाही. ते माझे लहानसे अधिकारी असोत नाहीतर सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती असोत. मला जे वाटले ते मी तत्संबंधी अधिकाऱ्यांजवळ केव्हाच बोलून टाकले आहे अणि स्वतःच्या मनावरील ताण उतरवला आहे.

अधिकाऱ्यांच्या सौजन्याचा मी अधिक लाभ घेत आहे असे कोणाचे मत असल्यास माझा निरुपाय आहे. एक गोष्ट सांगतो तुला. अधिक काही सहवासाने असेही होईल, की काही विशेष सुविधांसाठी कोणाला निवडण्याचे असल्यास मी त्यात निश्चितपणे येऊ शकेन असेही वाटेल अधिकाऱ्यांना !

आणि समारोपासाठी तुला एवढा विश्वास मी देतो की, तू तिळमात्र व्यथित होऊ नकोस. अधिकाऱ्यांना ज्या योगे काही वैध विचार करावा लागेल, ॲक्शन घ्यावी लागेल अशी संधी त्यांना मिळणार नाही, किंवा मला खाली पाहावे लागेल असेही माझ्या हातून काही होणार नाही. पाहायचे असेल तर बरच अशी माझी वृत्ती राहिली तर तुला आनंद वाटेल ना ?

फार लांबले पत्र !

सर्वस्वी तुझाच
गोपाळ

पूर्ण : बुधवारी रात्री ११
१४-७-१९५९
(Censored XX Jailor, Nasik Road Central Prison)

सुटकेसंबधीचा म्हणजे सुटका कोठवर नाही, यासंबंधी निर्णय आला आणि काही दिवस मनःस्वास्थ्य बिघडले. माझ्यावर झालेल्या अन्यायाला वाचा फोडण्याचा मार्ग कसा

सापडेल, याचा मी विचार करू लागलो. न्यायालयात जाता येते ? विधी काय आहे ? कोणत्या अधिकाराच्या आधाराने आपणास आपले म्हणणे मांडता येईल ? मला कोणत्याच गोष्टीचे ज्ञान नव्हते.

मला एक ठाऊक होते, माझ्यावर अन्याय झाला होता, आणि न्यायालय अन्यायाचे निवारण करणारी संस्था आहे. हा श्रीमंत, हा निर्धन, हा पंडित, हा स्वामी, हा सेवक, हा शासक, हा नागरिक असा भेदभाव न्यायाच्या कामात न्यायालय करीत नाही हा माझा विश्वास होता.

हा प्रश्नच वेगळ्या स्वरूपाचा होता. जन्मठेप म्हणजे काय ? शिक्षेच्या कार्यवहनात प्रभावी शासनसंस्थेचा म्हणजे Executive चा अधिकार किती ? न्यायालय कोठे हस्तक्षेप करू शकेल ? अशा प्रश्नांची साधकबाधक चर्चा कचित केव्हा तरी झाली असेल, तेवढीच. नेहमी येणारा हा विषय नव्हता आणि स्वाभाविकपणे वकीलवर्ग या विषयांचा अनभ्यस्त होता.

ऑगस्ट १९५७ मध्ये मी एक बंदीप्रत्यक्षीकरण आवेदन Habas Corpus मुंबई उच्च न्यायालयात वकिलांकरवी प्रविष्ट केले होते. ते फेटाळले गेले. वकिलांचा दोष नव्हता. कारण विषयच नवीन म्हणून त्याची सर्व अंगे बघितली गेली नव्हती. माझे समाधान झाले नाही.

संविधान, भारतीय दंडविधान म्हणजे Indian Penal Code, दंडसंहिता म्हणजे Criminal Procedure Code, बंदिगृह विधी म्हणजे Prisons Acts अशी काही पुस्तके मी मागविली. दिल्लीचे श्री. गणपतराय यांच्याशी पत्रव्यवहाराने संपर्क ठेवला. स्वतःच आपले म्हणणे मांडावयाचे अशी मनाची सिद्धता केली आणि १९५७ च्या डिसेंबरमध्ये मी पहिले आवेदन सर्वोच्च न्यायालयाला धाडले.

卐 卐

चौदा

कोंडमारा

अक्षर वळणदार येण्यासाठी आपण अक्षरे गिरवतो त्याप्रमाणे माझे सर्वोच्च न्यायालयातील प्रयत्न होते. कधी न्यायालयाने बोलवावे आणि पूर्वश्रवणाचे वेळी पाच मिनिटातच आवेदन फेटाळून लावावे; कधी न्यायमूर्तींनी पूर्वश्रवणात आवेदन प्रविष्ट करून घ्यावे, पण अंतिम श्रवणाचे वेळी काही तांत्रिक अडचणी येऊन आवेदन काढून घ्यावे लागावे. कधी न्यायालयाने आवेदन वाचावे आणि त्यांच्या मताने आवेदनात काही नवीन विधेय न आढळल्याने मला न बोलावताच आवेदन काढून टाकावे; कधीतरी पंजीकारानेच म्हणजे रजिस्ट्रारनेच आवेदन परत धाडावे; काही वेळा तांत्रिक दोषांमुळे तर काही वेळा आवेदन करण्याजोगे समर्पक युक्तिवाद न आढळल्यामुळे; असे सारखे चालले होते. हे सर्व मी सहन करीत होतो.

माझे मन स्वस्थ नव्हते. शासनाचा पक्ष बलिष्ठ असेल पण तो न्यायाचा नव्हता आणि ते तर मला सिद्ध करता येत नव्हते.

प्रत्येक पराभवात मला काही ना काही ज्ञान मिळत असे. त्याच्या सहाय्याने मी पुढचे प्रयत्न करी. डिसेंबर १९५७ ते ऑगस्ट १९६४ या सात वर्षांच्या अवधीत माझी एकूण बावीस आवेदने झाली होती.

वकील देणे मला शक्य नव्हते, कारण नुसता वकील उभा करणे यापेक्षा या विधीतील बारकावे त्याच्या लक्षात आणून देणे मला महत्त्वाचे वाटत होते. आणि कोणाही वकिलाला अशी सवड काढणे शक्य झाले नसते. मला सुट्टीवर सोडले असते तरच ते शक्य झाले असते.

आर्थिक प्रश्न होता तो वेगळाच. नुसते प्रारूप - म्हणजे ड्राफ्ट - करण्यालाच शतकांनी रुपये लागतात. मला ते शक्य नव्हते.

कधी काही वकिलांचा परामर्श घेतला होता. पण सर्वोच्च न्यायालयाने अनेक आवेदने

फेटाळून लावलेली बघताच आवेदन चालविण्याचा त्यांना धीर होत नसे. शासनाकडे विनंती करून सुटका करून घ्यावी असा परामर्श काही वकील देत असत. त्यांच्या सांगण्यात आत्मीयता असली तरी खरोखर, शासनाकडे जाण्यास वकिलांच्या परामर्शाची गरज नव्हती. मला न्याय पाहिजे होता. त्यासाठी कोणा विधिपंडिताने सहाय्य दिले तर ते हवे होते. मला माझा अधिकार न्यायालयाकडून प्रस्थापित करून घेण्याची इच्छा होती. माझे गुण हाच घटक शेवटी प्रधान धरला जाऊन त्यावर आधारलेली अधिकारपूर्ण सुटका मला हवी होती.

२१-११-१९५७ ला सर्वोच्च न्यायालयाला मी आवेदन केले होते. (Petition in the Nature of Habeas Corpus No. 144 of 1957)

स्वतः आवेदन चालविण्यासाठी अनुज्ञा मी मागितली होती. त्या विनंतीला अनुसरून मला न्यायालयात आणण्याचा आदेश न्यायालयाने धाडला

पूर्वश्रवणासाठी २३-१२-१९५७ हा दिवस नेमला होता. त्याआधीच चार-पाच दिवस मी दिल्ली बंदिगृहात गेलो होतो. सकाळी साडेनऊबाजेपर्यंत मी न्यायालयाच्या परिसरात पोहोचलो होतो.

न्यायालय तेव्हा संसदभवनाच्या (Parliament House च्या) विभागात भरत असे. न्यायालयाच्या प्रांगणात गेल्यावर मी त्या वास्तूची भव्यता प्रथमच बघत होतो.

उच्च न्यायपीठ, न्यायमूर्तींची शोभिवंत आसने, वकीलवर्गासाठी आणि प्रेक्षकांसाठी समोरील अर्धगोलात मांडलेल्या मऊ बैठकीच्या खुर्च्या, पायाचा आवाज होऊ नये म्हणून पसरलेले गालिचे, मंदमंद फिरणारे पंखे, अदृश्य दिव्यांचा प्रकाश असे आपल्या सर्वोच्च न्यायालयाचे वैभव होते. सर्वोच्च न्यायालयाची स्वतंत्र वास्तू जवळ जवळ ऐंशी लाख रुपये व्यय करून त्या दिवसात बांधली जात होती. त्या वास्तूचे पुढे सात-आठ महिन्यांनी म्हणजे ४-५-१९५८ ला उद्घाटन झाले आणि सर्वोच्च न्यायालय त्या ठिकाणी गेले.

सर्वोच्च न्यायालयाची भव्यता पाहण्याची मला प्रथमच संधी मिळाली होती. मी न्यायालयात जाऊन बसलो. वकील येत होते. ऐकू येईल न येईल इतपत हळू आवाजात ते आपापसात बोलत होते. गोंगाटाने जसा कोणी मनुष्य गडबडून भांबावेल तसे माणसे आहेत पण कृत्रिम शांतता पाळली जात आहे हे अनुभवूनही मी भांबावलो. त्या शांततेचेही एक दाबासारखे आवरण माझ्या मनावर चढले.

स्वतंत्र हिन्दुस्थानाच्या सर्वोच्च न्यायालयाची भाषा इंग्रजी आहे. इंग्रजीतून आवेदने करायची, इंग्रजीतून ती मांडायची आणि इंग्रजीतून न्यायपत्र ऐकायचे.

वकीलवर्गात बहुधा पन्नाशी उलटलेले वकील दिसत होते. विधीच्या ज्ञानाबरोबर वयाने येणारा अनुभवही त्यांच्याजवळ होता. म्हणून सर्वोच्च न्यायालयात न्यायदानाच्या कामात सहाय्य देण्याची त्यांच्यात क्षमता आलेली होती.

वकिलांच्या तुलनेने माझे वय काय, ज्ञान काय, शिक्षण काय, अनुभव काय असा विचार मनाला घासून जात होता. या उत्तुंग वातावरणात आपल्याला आपले विचार बोलता येतील का अशीही भीती वाटत होती. पण एक विश्वास होता तो असा की, माझे शिक्षण, वय, अनुभव, ज्ञान या गोष्टी न्यायालय जाणणार होते आणि वकिलांशी माझी तुलना ते करणार नव्हते. मी माझेच प्रकरण मांडणार होतो. त्यामुळे कोणा वकिलाची स्पर्धाही मला करायची नव्हती.

पाच न्यायमूर्तींचे न्यायासन होते. सांविधानिक प्रश्नावर (Constitutional Point) सहसा पाच न्यायमूर्तींपुढे चर्चा होते. माझे गाऱ्हाणे मी त्यांच्यापुढे मांडले. एकेक न्यायमूर्ती प्रश्न विचारीत होते. त्यांना यथामती उत्तरे देत होतो. पंधरा मिनिटांच्या चर्चेनंतर पूर्वश्रवणातच आवेदन काढून टाकले गेले.

मला मिळालेली सूट शासनाने विलोपित (Cancel) केली असेल म्हणून त्या सुट्टीचा लाभ मला मिळाला नाही अशी न्यायमूर्तींनी धारणा करून घेतली होती. तसे झालेले नाही हे सिद्ध करण्यास माझ्याजवळ माझी इतिहासपत्रिका नव्हती किंवा आणखी काही पुरावा नव्हता. आवेदन फेटाळले गेल्याबर तीन-चार दिवसांतच मी नाशिकला परत आलो. लागलीच दुसरे आवेदन लिहिण्यास घेतले. दिनांक २-१-१९५८ ला अधीक्षकांच्या हाती आवेदन दिले आणि चार-पाच दिवसांनी प्रतिज्ञापत्र (Affidavit) केले.

न्यायमूर्तींच्या धारणेचे मी निरसन केले होते. सूट ही माझी मिळकत आहे. तिचा शासनाला अपहार करता येणार नाही असे विधान मी मांडले होते. दि. १७-२-१९५८ हा दिवस पूर्वश्रवणासाठी नेमल्याचे मला ८-२-१९५८ ला कळविले. न्यायालयात मला उपस्थित ठेवण्याचा आदेश न्यायालयाने अधिकाऱ्यांना दिला.

दि. १७-२-१९५८ ला पंचवीस मिनिटे चर्चा झाली. माझे म्हणणे प्रथमदर्शनी पटल्याने न्यायमूर्तींनी शासनाला उत्तर देण्यास सांगितले आणि ३-३-१९५८ हा अंतिम श्रवणासाठी दिवस नेमला. (Petition No. 10 of 1958)

शासनाने उत्तर दिले. निर्णय माझ्या विरुद्ध गेला. आमच्यासमोर आलेल्या कारासंहितेच्या (Jail Manual) नियमांवरून असे दिसते की, जन्मठेपेच्या बंद्यांची शिक्षा दंडसंहिता धारा ४०१ च्या आधारे (Criminal Procedure Code Section 401) थांबविण्याची असते. तो अधिकार शासनानेच वापरण्याचा असतो. म्हणून जन्मठेप असलेल्या बंद्यांची सुटका केवळ शासन करू शकते असा न्यायमूर्तींच्या न्यायपत्राचा आशय होता. धारा ४०१ ही दयेचा वापर करण्याचा शासनाला अधिकार देणारी धारा आहे.

त्यानंतरही मी आवेदन करीत राहिलो. कधी न्यायालय बोलबीत असे. पण कारासंहितेच्या नियमांना धक्का देणारे विधान माझ्याजवळ नसल्याने मला परतावे लागे.

दिनांक ५-९-१९६० या दिवशी माझ्या सातव्या आवेदनाचे पूर्वश्रवण ठरले होते. न्यायालयाने शासनाला उत्तर देण्यास सांगितले. १२-१०-१९६० ला अंतिम श्रवणाच्या वेळी आवेदन काही तांत्रिक कारणासाठी परत घेतले. लगेच दुसरे आवेदन करून त्यात ती तांत्रिक अडचण नाहीशी करण्याचा हेतू होता. दिल्ली बंदिगृहातून पुढचे म्हणजे आठवे आवेदन दिले. मध्यंतरी मला नाशिकला परत धाडले.

दिनांक १४-११-१९६० ला आठव्या आवेदनाची सुनावणी झाली. शासनाला उत्तरासाठी बोलावले गेले. दिनांक १६-१२-१९६० या दिवशी आवेदनावर दोन तास चर्चा झाली. निर्णय राखून ठेवला गेला. माझे समाधान झाले नव्हते, कारण निर्णय माझ्याविरुद्ध जाणार आहे हे दिसून येत होते.

दिनांक १२-१-१९६१ ला निर्णय दिला गेला. शिक्षेची व्याख्या करताना न्यायमूर्तींनी प्रिव्ही कौन्सिलच्या एका तीस वर्षांपूर्वीच्या निर्णयाचा आधार घेतला. सीमापार किंवा निष्कासन म्हणजे ट्रान्सपोर्टेशन आणि बंदिवास म्हणजे इंप्रिझनमेंट यात अंतर नाही; बंदिवास या शिक्षेत ते एक वेगळेच नाव आहे; म्हणून बंदी अंदमानात ठेवला काय किंवा हिन्दुस्थानातील कोणा कारागृहात ठेवला काय सारखेच, असा प्रिव्ही कौन्सिलचा निर्णय होता. सर्वोच्च न्यायालयाने तो निर्णय प्रमाणभूत, भारदस्त म्हणून स्वीकारला आणि न्यायमूर्ती खोलात गेले नाहीत. त्यापुढे जाऊन सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, आजन्म निष्कासन किंवा आजन्म बंदिवास प्रथमदर्शनी बंधाच्या उरलेल्या आयुष्यापर्यंत निष्कासन किंवा बंदिवास अशा अर्थी घेतला पाहिजे. मृत्यूचा दिवस कोणाला ठाऊक नसल्याने सूट त्यातून उणे करणे शक्य होणार नाही म्हणून सूट धरून शिक्षा पूर्ण झाल्याचा वाद मांडता येणार नाही; दंडसंहिता ४०१ प्रमाणे आज्ञा काढली गेल्यावाचून बंधाला स्वातंत्र्याचा अधिकार नाही; असा सारांश त्या निर्णयपत्राचा आहे.

रोगापेक्षा उपाय भयंकर अशी माझी अवस्था झाली. धारा ४०१ हा खरोखर दया करणारा अधिकार, त्यावर अडून राहून बंधांना सडवत मारण्याचा अधिकार शासनाला मिळाला होता. चांगले बागा, वाईट बागा, काम करा, करू नका; सूट मिळवा, मिळवू नका; अधिकाऱ्यांची आज्ञा पाळा, पाळू नका; शासनाच्या इच्छेनेच सुटका हाच एक घटक राहिल्यावर समान न्यायाच्या आश्वासनाला काही अर्थच नाही.

बंधाने स्वतःच्या गुणावर शिक्षेतली सूट मिळवावी, ती टिकवावी आणि मग इतर घटक विरुद्ध गेले तरीही अंती केवळ स्वतःचे गुण हाच प्रधान घटक ठरून त्यातून स्वतःची सुटका करून घ्यावी, असा धरबंधच राहिला नाही. शासनाने कोणाला दोन वर्षात सोडावे, कोणाला पाच वर्षात सोडावे, कोणाला शिक्षेचा आरंभ होण्याच्या आधीच सोडावे तर कोणाला त्याने कितीही अवधी प्रत्यक्षात भोगला, कितीही सूट जमवून ठेवली तरी अद्याप त्याचे प्राण

आहेत, त्यांच्यात धुगधुगी आहे म्हणून त्याची शिक्षा पूर्ण झाली नाही आणि त्याला आत ठेवण्याचा आपला अधिकार आहे अशा समजुतीने त्याच्या सुटकेची आज्ञाच देऊ नये, इतक्या अंदाधुंद व्यवहाराला मोकळीक मिळाली.

अंधारात चालणाऱ्या अंदाधुंदीची प्रकरणे न्यायालयाच्या प्रकाशात मांडण्याइतके सामर्थ्य कोणा बंद्यात राहात नाही म्हणून सर्वोच्च न्यायालयापुढे तो घटक येऊ शकला नाही. मला माझी बाजू मांडता आली नव्हती असेही असेल. न्यायमूर्तींना माझे म्हणणे स्पष्ट झाले नव्हते, असे त्या निर्णयपत्रावरून दिसले.

जन्म म्हणजे जन्म असे सांगण्यास न्यायालय काय करायचे आहे ? सर्वोच्च न्यायालय काय करायचे आहे ? कोणाही सामान्य व्यक्तीला तो अर्थबोध होतो. जन्मठेप ही शिक्षा स्वातंत्र्य हिरावण्यासाठी आहे; जन्म हिरावण्यासाठी नव्हे ! जन्म हिरावण्याची एक विधिलिखित शिक्षा आहे ती फाशीची. जन्मठेपेचा क्रम त्या खालचा आहे. स्वातंत्र्य हिरावण्याच्या या दुसऱ्या क्रमाच्या शिक्षेचे पर्यवसान स्वातंत्र्य पुन्हा देण्यातच झाले पाहिजे. कारण मृत्यूत परिणती होणारी शिक्षा वेगळी आहे. आणि मृत्यूनंतर स्वातंत्र्य दिले असे म्हणता येत नाही हे वस्तुस्थितीवर आणि तर्कवादावर आधारलेले घटक विचाराहं होते. जन्म तर म्हटले आहे. आणि जन्म घेणे तर विधिविहित नाही, अशा परिस्थितीत जन्म याचा अर्थ काय याची फोड करण्यास न्यायालय हवे होते.

पाणी डोळ्यांना तर स्वच्छ दिसत आहे आणि त्याच पाण्याने रोग होत आहेत असा आपणास अनुभव आहे, अशा स्थितीत आपण सूक्ष्मदर्शक यंत्रे वापरून पाण्यात रोगाचे मूळ शोधून काढतो. त्या सूक्ष्मदर्शक यंत्राचे कार्य न्यायालयाने करावे अशी माझी अपेक्षा होती.

निर्णयाने मी अगतिक झालो. सर्वोच्च न्यायालयाचे निष्कर्ष कसे खोडायचे ? आणि खोडले तर ते कोणाकडे मांडायचे ? बंद्याला स्वतःच्या मृत्यूचा दिवस सांगता येत नसेल. शासनालाही सांगता येत नाही. सूट देण्याची क्रिया जर प्रामाणिक होती असे मानले तर सूट कामाला यावी याचे उत्तरदायित्व दात्यावरच नव्हते काय ? जन्मठेपेच्या बंद्याला मृत्यूचा दिवस सांगता येत नाही आणि म्हणून सुट्टीचा वापर शिक्षा त्या प्रमाणात घटविण्यास करता येत नाही, यावर जर शासनाला चिकटून राहायचे होते तर रक्त द्यावे आणि परतफेडीत पैसे किंवा सूट मिळवावी असा व्यवहार जन्मठेप्याशी करणे कोणत्या विधीस धरून होते ? कोणत्या नीतीला धरून होते ? रक्त खरे घ्यायचे आणि सूट निरर्थक पदरात टाकायची हा खोटा व्यवहार बंद्याची असहाय्य अवस्था असते म्हणूनच केला जातो ना ? बाहेर अशा प्रकारचा खोटा व्यवहार कोणी केला तर त्याला दंडविधानाप्रमाणे शिक्षा होऊ शकेल. शासन बलिष्ठ असेल पण ते प्रामाणिक नव्हते. न्यायनिष्ठ नव्हते. निर्णय मान्य करण्याची माझी सिद्धता आणि सर्वोच्च न्यायालयापुढेच त्या निर्णयपत्राचे खंडन करणे फार अवघड होते.

मी मिळविलेल्या सुट्टीच्या संबंधात शासन अयोग्यपणे वागेल असे वाटत नाही, अशी आशा न्यायमूर्तींनी आपल्या निर्णयपत्रात व्यक्त केली होती. योग्य आणि अयोग्य यांच्या कक्षा ठरविल्यावाचून वरील आशा व्यक्त केली गेली होती. म्हणूनच त्या आशेचे मूल्य वैधदृष्ट्या शून्य होते. पंजाब उच्च न्यायालयाने माझ्या संबंधात केलेल्या दयेच्या भलावणीची शासनाने काय वासलात लावली होती ते मला ठाऊक होते. न्यायालयाच्या शब्दाला मान देणे म्हणजे प्रतिशोधाच्या भावनेचा अभाव दाखविणे अशा विचाराने त्या वेळच्या राज्यकर्त्यांनी न्यायालयाचा अभिप्राय धुडकावून लावला होता. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या या आशेच्या अभिव्यक्तीला शासन काय मूल्य देईल हे मी मनोमन जाणून होतो. पुन्हा मला न्यायालयाकडून पाहिजे होते ते दयेचे एखादे प्रशस्तिपत्रक नव्हे, तर माझा अधिकार म्हणून माझे स्वातंत्र्य पाहिजे होते. स्वातंत्र्य मिळवण्याच्या माझ्या खटपटीत जन्मही हिरावून बसण्याची शक्यता निर्माण झाली होती. शासनाला त्यासाठी वेगळे प्रयास पडणार नव्हते. धारा ४०१ प्रमाणे काढण्याची आज्ञा कधी काढायचीच नाही आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयपत्रामागे लपायचे. अन्याय लपविण्याचे शासनाच्या हाती फार मोठे साधन मिळाले होते.

या निर्णयाचे पडसाद काही वृत्तपत्रातून उमटले. शासनाला मिळालेल्या या अनिर्बंध अधिकाराचा वापर अन्याय्यपणे होईल अशी भीतीही काहींनी व्यक्त केली होती.

निर्णयाने जितका मी अस्वस्थ झालो होतो, तितकीच माझी पत्नीही अस्वस्थ झाली. हृदयाचे बुडबुडे कोठेतरी उमटवावेत या हेतूने दैनिक 'मराठा' या वृत्तपत्रात एक पत्र तिने लिहिले. आचार्य अत्रे यांनी ते समग्र पत्र दिनांक २६-१-१९६१ ला छापले. पत्नीची मनःस्थिती कशी झाली होती याची कल्पना त्या पत्रावरून येते. काही भाग असा आहे.

संपादक, 'मराठा'
स. न. वि. वि.

आपण 'सांज मराठा' दि. १३-१-१९६१ च्या अंकात माझे पती गोपाळ विनायक गोडसे यांची शिक्षा आणि सुटका यासंबंधात लिहिलेला अग्रलेख वाचला. आपण एका अन्यायाकडे लोकांचे लक्ष वेधलेत, यासाठी मी आभारी आहे.

दुर्दैव असे की, सरकार स्वतःला राज्यकर्ते न समजता राजा समजते. एका जन्मठेप्याची शिक्षा ती चालू होण्यापूर्वीच आम्ही स्थगित किंवा क्षमित करू दुसऱ्याची शिक्षा आम्ही इतकी लांबवत ठेवू की ती भोगताभोगताच त्याचे प्राण जावेत. आम्हाला या संबंधात कोणी विचारता कामा नये. सोडणे न सोडणे सर्वस्वी आमच्या इच्छेचा प्रश्न आहे. ज्याच्यावर आमची कृपादृष्टी फिरेल त्याच्या सुट्टीच्या दिवसाचे (रेमिशनचे) सोने होईल. ज्याच्यावर

आमची अवकृपा होईल त्याच्या सुट्टीच्या दिवसाची माती होईल, या दर्पाने व्यवहार चाललेले प्रत्ययास येतात. श्री. गोपाळ गोडसे यांच्या प्रकरणात पंजाब वरिष्ठ न्यायालयाच्या तिन्ही न्यायमूर्तींच्या, शिक्षा सौम्य करावी म्हणून दिलेल्या स्पष्ट अभिमताची जिथे सरकारने पत्रास ठेवली नाही तिथे त्यांनी मिळविलेल्या सुट्टीच्या दिवसांची माती केली गेली, यात नवल काहीच नाही ! राजाचा कृपाप्रसाद मिळविणे सोपी गोष्ट नव्हे.

तुका म्हणे तेथे पाहिजे जातीचे ! येरा गबाळाचे कामे नोहे !

शिक्षा लागतेवेळी गोपाळ राजाच्या जातीचा चार आणे सभासद नव्हता. त्याला कृपाप्रसाद कसा प्राप्त होणार !

त्यानंतर तुलनेसाठी म्हणून माझ्या पत्नीने एक उदाहरण दिले आहे. तीन हत्यांच्या संबंधात जन्मठेप झालेल्या एका बंधावर शासनाने कशी कृपा केली आणि त्याला किती लवकर सोडले याचा वृत्तान्त देऊन, तो बंदी तालुका काँग्रेस कमिटीचा पदाधिकारी होता, हे दाखवून दिले आहे. ती म्हणते, त्याच्या सुटकेचा तिळमात्र दुस्वास नाही, प्रश्न आहे कायदा कसा वापरला जात आहे हा. काय गमक बघून लवकर सुटका करतात आणि काय गमक बघून उशिरा सोडतात, हे विचारण्याचा अधिकार न्यायालयासही जर नाही तर बिचाऱ्या जनतेला कसा असणार ? राजाची मर्जी ती !'

सावित्रीने यमाची याचना करून आपला पती परत मिळवला, तसेच मला सरकारची याचना करून माझा पती परत मिळवता येईल अशी माझी भावना होती. नम्र विनंती करावी, कोणी मंत्री किंवा उपमंत्री यांची भेट घ्यावी. त्यांनी 'विचार करतो' 'अटीवर सोडू,' 'तसे आवेदन धाडा' अशी आश्वासने द्यावीत. भोळेपणाने आवेदन धाडावे, अनेक स्मरणपत्रे धाडावीत अन् सहा महिन्यांनी दोन ओळींचे उत्तर यावे. 'आपल्या विनंतीचा विचार करता येत नाही.' मुंबई विधानसभेत दिनांक १०-२-१९६० हा सुटकेचा दिनांक दिला होता. त्यासंबंधी सभापतींना लिहावे; त्यांनी सांगावे, 'मला काही करता येत नाही. गृहविभागाला विचारा.' गृहविभागाला विचारता त्यांनी सांगावे, 'अहो, तो नुसता थातुरमातुर दिवस होता. (म्हणजे विचारणाराच्या तोंडावर फेकण्यासाठी) तो काही खरा दिवस नव्हता ! फसलात तुम्ही ! असे करा, केन्द्र सरकारला विचारा.' केन्द्र सरकराने उत्तर द्यावे, 'मुंबई राज्याचा प्रश्न आहे तो ! आणि पुन्हा कैद्याची बागणूक चांगली नको का ?' बागणूक चांगली आहे हे बंदिशाळेचे प्रशस्तिपत्र घेऊन मुंबई राज्याकडे जावे तो उत्तर मिळावे, 'ते खरे, पण आमच्या मर्जीचा प्रश्न आहे हा. अन् खरे म्हणजे आम्ही नुसते त्यांना आमच्या राज्यात ठेवले आहे इतकेच. ते खरे केन्द्र शासनाचेच कैदी आहेत.' असा माझा छळ या शासनाने अनेक वर्षे चालविला आहे. सावित्रीच्या त्या पौराणिक कथेतील एक महत्त्वाची गोष्ट माझ्या दृष्टीतून सुटली होती. यमाला हृदय होते !

पंजाब वरिष्ठ न्यायालयाने दिलेल्या अभिमताचा उपयोग गोपाळला चौदा वर्षांच्या प्रतिवृत्ताच्या वेळी तरी होईल, या आशेने गोपाळचे वृद्ध माता-पिता जीव धरून होते. एक मुलगा फाशी गेलेला, दुसरा तुरुंगात खितपत पडलेला, या आघातांनी आधीच ते जीर्ण झाले होते आणि चौदा वर्षांच्या प्रतिवृत्ताचा निर्णय आला. 'पंधरा वर्षे प्रत्यक्ष म्हणजे पंचवीस वर्षांहून अधिक मुदत सुट्टीत दिवस धरून झाल्यावर चौदा वर्षांचे प्रतिवृत्त पाठवा; त्यानंतर सोडायचे की नाही याचा विचार करता येईल.' हा तो निर्णय. न्यायालयाच्या अनुकूल अभिमताची इतकी प्रतिकूल संभावना, इतकी अवहेलना कोण्या राज्यात कधी केली असेल काय ? हा धोंडा डोक्यात पडल्यावर आता आपल्याला गोपाळ जिवंतपणे पाहता येणार नाही, ही माता-पित्यांची खात्री झाली आणि पंधरा-वीस दिवसांतच त्यांनी त्याची नाशिक बंदिगृहात भेट घेतली. बंदिगृहाच्या त्या दोन-तीन पायऱ्या चढण्याचे त्राणही त्यांच्या अंगात राहिले नव्हते. वीस मिनिटे झाली. अधिकाऱ्यांनी निर्विकारपणे 'उठा' म्हणून सांगितले आणि गोपाळची माता पायऱ्यांखाली उतरताच जी बसली, ती बसली. ती पुन्हा उठली नाही तीन-चार दिवसांतच तिचे प्राणोत्क्रमण झाले. 'गोपाळ भेटायला हवा होता' यापेक्षा तिचे शेवटचे शब्द काय असणार ! बडिलांच्या दुःखात आणखी भर पडली. थोड्या दिवसांत बडिलांचेही देहावसान झाले.

आता जन्मठेपेचा कैदी अंदमानाला धाडीत नाहीत. कायदा बदलला आहे. गोपाळपुरते भारतातच अंदमान निर्माण करण्यात आले. माता-पिता जिवंत असताना शासकांनी गोपाळला बाहेर सोडले नाही, थोड्या दिवसांपुरतेही सोडले नाही आणि कायद्याच्या कक्षेत राहूनही आम्ही कसा क्रूरपणा करू शकतो, ब्रिटिशांपेक्षाही आम्ही कसे बुद्धिमान आहोत, हे सिद्ध करून आसुरी आनंद त्यांनी अनुभवला. मैथिलीशरणांनी ऊर्मिलेच्या तोंडी घातलेले शब्द आज मला म्हणण्याची वेळ त्यांनी आणली आहे.

पतिको निष्कासन मिला मुझको कारागार,
मृत्युदण्ड उस तातको राज्य तुझे धिक्कार !

अंतर एवढेच आहे, राज्यलालसेतून निर्माण झालेल्या घटनांनी तिच्यावर आपत्ती ओढवली होती म्हणून तिने राज्याचा धिक्कार केला; तर राज्यकर्त्यांच्या क्रूर वागणुकीने माझ्यावर आपत्ती आली आहे म्हणून मला राज्याचा, त्या क्रौर्य आणणाऱ्या सत्तान्धतेचा धिक्कार करावा लागत आहे. न्यायात पक्षपात न करणारे राज्यकर्ते राज्य करोत.

आपली,
सौ. सिंधू गोडसे

सर्वोच्च न्यायालयाला पुन्हा जायचे मी ठरविले. वर्तमानपत्रातून अधूनमधून बंधासंबंधी

आणि बंदिगृहासंबंधी माहिती येत असे. मी त्याची टिपणे ठेवी. न्यायालयाचे काही विशेष निर्णय आले तर ते वाचून त्यात मला उपयुक्त वाटणारा भाग मी उतरून घेई. आतापर्यंतच्या माझ्या न्यायालयीन प्रयत्नातून मला थोडासा अनुभव मिळालेला होता. त्या सर्वांचा उपयोग करून एक नवीन आवेदन करावे असे मला वाटले.

निर्णयानंतर चार-पाच महिने माझे डोके त्याच विषयाभोवती रात्रंदिवस भ्रमत होते. नित्य व्यवहारावर अपरिहार्यतेने परिणाम होत असे. कामात व्यत्यय न येऊ देता मला माझे लेखन करावयाचे होते, पण व्यक्तिगत नित्यक्रमात माझे लक्ष नसे. कधी स्नानाला म्हणून जावे आणि स्नान न करताच परत यावे आणि काही वेळ गेल्यावर काही तरी निमित्ताने लक्षात यावे की, आपण स्नान केलेच नाही. काही दिवस आजारी होतो. ऊन पाण्याने स्नान करण्यास डॉक्टरांनी सांगितले होते. एक दिवस ऊन पाण्याची बादली मी नळाखाली ठेवली. पाणी येत होते. मी भांडी भरभरून अंगावर येत होतो. पाण्याचा ऊनपणा केव्हाच नाहीसा होऊन गेला होता आणि तरी माझे स्नान चालू होते.

स्नानासाठी एक आडोसा केला होता. एकदा माझे स्नान झाले आणि मनात घोळत असलेला विचार लिहिण्यासाठी मी बाहेर पडलो. कल्पना अशी होती की, मी कपडे घातले आहेत. चार-पाच पावले जाताच जाणीव झाली. पुन्हा परतलो, कपडे घातले आणि बाहेर आलो. 'वेड लागले' या व्याख्येत मी गेलो नव्हतो एवढेच. पण मला वाटे मला वेड लागले तर यातनांतून तरी माझ्या मनाला मुक्तता मिळेल.

करकरे जवळ असत. ते मला बळाने जेवणास बसवीत. इतर व्यवहाराबरही लक्ष ठेवीत. पण अशा प्रकारे सडत जगण्यात काय अर्थ आहे. मरायचे आहे तर आपण दुसऱ्याला लगेच जागा देऊ का नये, कोणाचा तरी घास आपण का संपवायचा असे मला वाटत असे. माझ्या लेखनावरही अशा विचारांची छाया पडली होती.

प्रसंग पडल्यावर माणसाला मरणाचे भयही वाटेनासे होते. या ठिकाणी मरणाचे भय नव्हे, तर जिवंत ठेवायचे आणि सडवायचे या अभिनव प्रयोगाचा मी बळी झालो होतो. बंद्यांना सुधारलेली बागणूक द्यावी; त्याच्या अपराधाचा उल्लेख त्याच्या कानावर सारखा आदळून त्याला टोचू नये. त्याच्यातील स्वत्व जिवंत राहील अशी दक्षता घ्यावी. त्याच्या गुणांचे मूल्यमापन करावे. त्याचे श्रम विनाप्रतिदान घेऊ नयेत. त्याची पिळवणूक करू नये अशा प्रणालीचे शिक्षण बंदिगृहातील अधिकाऱ्यांना देण्यासाठी स्वराज्यात बर्गही काढले आहेत. बंद्यांशी बागण्याची ही अभिनव पद्धत The New Prison Way म्हणून ओळखली जाते. प्रत्यक्षात अभिनवता असेल तर ती या संबंधात तरी क्रूरपणात होती. नवीन बागणुकीची प्रसिद्धी केली जात असे. त्यामुळे लोकांना वाटे की बंदिगृहात सुखसमाधान आहे.

पूर्वी एका लेखात मी म्हटले आहे, फाशीची क्रिया ही त्या शिक्षेतील भयानकता नव्हे. एका माणसाला दंड म्हणून मारायचेच आहे असे म्हटल्यावर थोड्यात थोड्या वेळात

तो मरेल याची दक्षता विधी घेत असतो. दुसऱ्याच्या दुःखाची जाणीव ठेवून तो विधी केला गेला. म्हणून त्या शिक्षेत माणुसकी आली. छळत छळत मारण्याची क्रिया विधीला बघवणार नाही, पण एखाद्याला सांगायचे, तुझी शिक्षा फाशीच्या शिक्षेपेक्षा सौम्य आहे आणि व्यवहार असा करायचा की त्याच्या गळ्याभोवती दोर न अडकवता त्याच्या तंगड्या दोराने बांधून त्याला लटकवत ठेवायचे. मनात समजायचे फाशीच्या मरणापेक्षा याचे मरण उशिरा होईल. फाशीचे मरण रक्तांकित समजले गेले तर हे मरण रक्तविहीन होईल, म्हणून ही शिक्षा सौम्य आहे, म्हणून यात दयापूर्ण दृष्टिकोन आहे. अशा पद्धतीने त्या व्यक्तीच्या शरीराला जे क्लेश होतील तेच क्लेश शासनाच्या या सौम्य शिक्षेच्या तथाकथित दयापूर्ण कार्यवहनाने मनाला होत असत. अधिकाऱ्यांना फसवणुकीचे काही वाटेनासे झाले. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयपत्रांतील काही विसंगती शासनाच्या लक्षात आली नव्हती असे नाही, पण माझ्यावर अत्याचार करण्यास त्या निर्णयपत्राचे आच्छादन घेता येत असल्याने ती विसंगती दूर करून घ्यावी असे शासनाला वाटले नाही.

फाशी, जन्मठेप, काळेपाणी, कारावास, आजन्म कारावास, सश्रम कारावास, अश्रम कारावास इत्यादी शिक्षांची उपपत्ती, त्यांचे कार्यवहन, त्यातील स्थित्यंतरे, न्यू साउथ वेल्स (ऑस्ट्रेलिया), अंदमान यांचा निष्कासनासाठी उपयोग, काही शतकांपूर्वीची दंडपद्धती, सूटपद्धतीचा प्रारंभ, सूटपद्धतीचा हेतू, मनुष्यातील अपराधप्रवृत्तीचा उगम, बंदिगृह-पद्धतीचा आरंभ, प्रिव्ही कौन्सिलच्या धारणेतील दोष, सर्वोच्च न्यायालयाच्या विधानातील विसंगती अशा अंगभूत विषयांची चर्चा करणारे आवेदन मी लिहू लागलो. पानामागून पाने मी लिहीत होतो. आवेदनाला मोठे स्वरूप येत होते, अर्धवट झोपेतही त्याच विषयाच्या विचारांनी मी पछाडलो. कधी रात्री अपरात्री दचकून जागा होई. लगेच लिहिण्यास घेई.

माझा एक प्रबंध निर्माण झाला होता. त्यासाठी मी काही मूलभूत माहिती गोळा केली होती. माझ्या बुद्धिप्रमाणेच संगतवार मांडणी केली होती. प्रबंधाच्या स्वरूपातच ते आवेदन धाडावे असे वाटले. त्याला मी नाव दिले : 'भारतीय विधीप्रमाणे जन्मठेपेच्या शिक्षेचे पर्यवसान कैद्याच्या मरणातच व्हायचे असते काय ?' (Has a life convict to die in prison under the Indian Law ?)

कागद लिहून होतील तसे मी घरी पाठवी. ते टंक होऊन येत. त्याच क्रमात एक पुढके मी धाडले. ती आठवड्यात ते कागद येतील असे वाटत होते. तोच एक वार्ता येऊन धडकली. पानशेत फुटले आणि अर्धे पुणे जलमय झाले !

दोन-तीन दिवसांनी वृत्तपत्रात जलग्रस्त भागाचे विवरण, काही छायाचित्रे आणि काही मानचित्रे येऊ लागली. मी धाडलेले कागद जेथे टंक होणार होते ते घर पाण्यात बुडालेले होते असे मानचित्रावरून दिसून आले. श्री. दत्तात्रय (थोरले बंधू) यांचे एरंडवण्याचे घर

आणि माझी पत्नी आणि मुले राहात असलेले श्री. भाऊराव अभ्यंकर यांचे जंगली महाराज रस्त्यावरील घर पाण्यात बुडाले होते हेही कळून आले. शेकडो माणसे मेली असावीत अशा प्रकारच्या वार्ता येत होत्या.

टपालवाटप व्यवस्था अस्ताव्यस्त झाली होती. घरचे वृत्त कळण्यास मार्ग नव्हता. जसजसे दिवस जात तसतशी चिंतेत भर पडे. करता येण्याजोगे काहीच नव्हते. संध्याकाळ होऊ लागली आणि मग खोलीत बंद होण्याची वेळ आली की, घरची मंडळी डोळ्यासमोर दिसत. उद्ध्वस्त पुण्याचे दर्शन किती भयानक असेल, किती उदासवाणे असेल याची मनोमन कल्पना करण्यात मोकळा वेळ निघून जाई.

चिखल तुडवीत मार्ग काढीत यावे, तसे एक पत्र आठ दिवसांनी आले. 'आम्ही सुखरूप आहोत, घर पाण्यात बुडाले होते, आमचा मजला (दुसरा) कोरडा राहिला. खालच्या मजल्यातील अन्नधान्याचा नाश झाला आहे. सर्व मंडळी इकडेच राहिली आहेत. सविस्तर वृत्त नंतर -' असा आशय होता. श्री. दत्तात्रय यांच्याकडून पत्र आले, 'वास्तू उभी आहे. घरातील अन्नधान्यापासून कपड्यापर्यंत सर्व वस्तूंचा नाश झाला आहे. सर्व मंडळी सुखरूप आहेत.'

केवळ दैव म्हणून घरची माणसे वाचली होती. आता लगेच पुढचा प्रश्न माझ्यासमोर उभा राहिला. माझ्या कागदांचे काय झाले ? कागद नाहीत असे कळले म्हणजे मला पुन्हा लिहिण्यास घेणे भाग होते. तेवढे त्राण माझ्यात होते काय, असे सारखे वाटे, पण कागदासंबंधी तेव्हा विचारणे योग्य नव्हते.

घरातील व्यवस्था लावण्यास दोन महिने लागले. मध्यंतरी एका पत्रात कागद सुरक्षित असल्याचे कळले. पाणी येत आहे असे दिसल्यावर एका उंच फळीवर मावतील तेवढ्या वस्तू टाकल्या होत्या आणि घरचे लोक निघून गेले होते. पाणी ओसरल्यावर ते परत आले. पाण्याची सर्वात अधिक पातळी त्या उंच फळीपर्यंत गेली होती. फळी आणि त्यावरील वस्तू कोरड्या राहिल्या होत्या. माझे कागद त्या कोरड्यात सापडले होते ! दैव !

आणखी दीड-दोन महिन्यांनी सर्व व्यवहार नीट चालू झाले. माझे कागद टंक होऊ लागले. टंकलिखित १७५ पाने झाली होती.

एवीतेवी एवढे श्रम घेतले आहेत आणखी काही व्यवस्था करून हे आवेदन मुद्रित स्वरूपात पाठवावे असे मला वाटले. पत्नीला शक्यता विचारली. माझ्यासाठी पडतील ते श्रम मनोभावे करण्याच्या तिच्या वृत्तीने एकदम होकार दिला. तिने अनेक ठिकाणी चौकशी केली. माझ्या सासऱ्यांनी हात दिला. आवेदन मुद्रित होण्याच्या मार्गाला लागले.

दिनांक २८-१०-१९६१ ला मी शपथ-पत्रक केले आणि टंकित प्रत सर्वांच

न्यायालयाला धाडली. आवेदन मुद्रित होत असून प्रती मागाहून धाडीन असे न्यायालयाला मी कळविले.

दोन महिन्यांनी माझ्या हाती पुस्तकांच्या काही प्रती आल्या. मोठ्या आकाराची १२० पाने होती. तीन-चार दिवसात प्रती तपासल्या. आवश्यक तेथे सुधारणा केल्या आणि सर्वोच्च न्यायालयात प्रती धाडल्या. आवेदनात काही नामोल्लेख होते. त्या व्यक्तींना एकेक प्रत धाडण्यासाठी अधिकाऱ्यांच्या हाती दिल्या.

सर्वोच्च न्यायालयाच्या पूर्वीच्या निर्णयपत्रातून मला पुष्कळ गोष्टी नवीन कळल्या होत्या. मी त्या पडताळून पाहिल्या. निष्कासन आणि बंदिवास म्हणजे ट्रान्सपोर्टेशन आणि इंप्रिझनमेन्ट एक नव्हेत असे मला दंडविधानाच्या काही धारांवरून आढळले. पण त्याला स्पष्टीकरणाची आवश्यकता होती. निष्कासनानंतर उभ्या केलेल्या भिंतींना विधीचा पायाच नव्हता; सावरकर आणि इतर क्रांतिकारक, तसेच दुसऱ्या अपराधांसाठी निष्कासित केलेल्या बंधांची शिक्षा अंदमानात बंदिगृहात भोगून घेतली, ती विधीने नव्हे, तर बळाने असे प्रमेय मी मांडले. त्यासाठी विधीतून आधार देऊन त्याचे स्पष्टीकरण केले. बंदिवास असेल तर तो चौदा वर्षांचाच होऊ शकेल, असेही विधान मांडून सूट पदरी असताना ती धरून चौदा वर्षांतच जन्मठेपेची शिक्षा पूर्ण झाली पाहिजे आणि बंदी सुटला पाहिजे अशा अधिकाराचा मी पुन्हा आग्रह धरला. विधिविषयक भागांची मी स्वतंत्र प्रकरणे केली. माझ्या शिक्षेचे कार्यवहन कोणत्या प्रकारे चालले आहे तेही एका प्रकरणात चित्रित केले. शासनाला कधीही नव्हता तो अधिकार कसा दिला गेला आहे ते न्यायालयाला दाखविले. माझे हे आवेदन शेवटचेच होईल, यापुढे प्रयत्न करण्याची शक्ती मला राहणार नाही, अशी तेव्हाची मनाची स्थिती होती. म्हणून जे काही या विषयावर मांडता येणे शक्य होते ते मी तेव्हा मांडले होते. आजही त्या आवेदनाच्या पुस्तकाच्या पंचवीस-तीस प्रती माझ्या जवळ आहेत.

यापुढे आपणास उद्योगात मनापासून लक्ष घालणे जमणार नाही असे मला दिसत होते. सहा वर्षे आम्ही-म्हणजे मी आणि करकरे-नाशिक बंदिगृहाच्या रासायनिक उद्योगशाळेत काम करीत होतो. त्या निर्माणीसंबंधी आत्मीयता उत्पन्न झाली होती. सूट निरर्थक ठरली होती. पण निर्माणी आपण उभी केली आहे, तिची घडी व्यवस्थित बसली आहे हे मानसिक समाधान वाटत असे. आमच्या अनुपस्थितीने ते कार्य शून्य होणार नव्हते. सूट निरर्थक ठरवली तरी ते कार्य उभे होते. ते कार्य आपल्या देशाचे होते. अल्प प्रमाणात असेल, पण शासनाच्या व्यापारविषयक योजना त्यातून कार्यान्वित होत होत्या. ते आम्हाला दिसत होते. स्वतःची हानी झाली, म्हणून त्या कार्याचे निर्मूलन करण्याचे कदाचित व्यक्तिगत प्रतिशोधात्मक समाधान मिळेल. पण त्यातून देशाच्या एका कार्याची हानी होईल हा विवेक जागृत असे. आमच्या राष्ट्रीय वृत्तीचा अधिकाऱ्यांना विश्वास असे म्हणून त्यांनी तशी शंका

घेऊन आम्हाला आडकाठी केली नाही.

स्वत:ची फसवणूक केली गेल्याने कार्यनाश केल्याची उदाहरणे बंदिगृहात होतात. उत्तम गालीचे करणार एक बंदी होता. तो सुटायला आला होता. एक वर्ष काम आले. ते त्या बंद्याच्या अंगावर टाकले. हे काम पुरे कर, तुला दहा दिवस विशेष सूट मिळेल, असे त्याला आश्वासन दिले.

विश्रांती आणि जेवणखाण दुर्लक्षून त्या बंद्याने फार परिश्रम केले आणि ते काम पुरे केले. अधिकाऱ्यांनी सूट देण्याची टोलवाटोलव केली. आश्वासित सुट्टीतला एकेक दिवस निघून जाऊ लागला. आठ दिवस राहिले आणि तो बंदी बैतागला. त्याने अधिकाऱ्यांना गयावया करून विचारले, आज सोडा, आठ दिवस पदरात पडतील, तेवढ्यातही मी समाधान मानेन, आपले उपकार मानीन, मला मुलामाणसात जाऊ द्या. ती तळमळत असतील. आपल्या आश्वासनाच्या आधारावर मी त्यांना सुटकेचा दिवस कळवून बसलो आहे. गेल्या दोन दिवसांपासून वाट बघत आहेत.

कसे कोणास ठाऊक, काही तरी दुष्टपणा अधिकाऱ्यांच्या मनात उद्भवला होता. गालिचाचे काम झाले होते. अधिकारी म्हणाले, 'आणखी आठ दिवसांनी काय होणार आहे ? शिक्षा देताना न्यायाधीशाने तुला सूट मिळेल असे थोडेच सांगितले होते ?'

तो बंदी विकल झाला. म्हणाला, 'विश्रांतीच्या वेळातही काम कर असेही न्यायाधीशाने सांगितले नव्हते. आपली नड होती. माझ्याजवळ कला होती. आपण सूट देऊ केलीत, मी माझी कला दिली.'

'जास्त बोलू नकोस. तुला आम्ही आठ दिवस उपाशी नाही ठेवणार. भाकरी देत जाऊ !' असे झोंबणारे उत्तर अधिकाऱ्यांनी दिले.

बंद्यांचा दीनवाणेपणा संपला. त्याच्या लीनतेची मर्यादा उलटली. तो उद्योगालयात गेला. त्याने कापणी घेतली आणि तो गालिचा तिरका फाडून टाकला. तो नीट करता येणेही शक्य नव्हते.

अंतर्गत विधी शासनाच्या संरक्षणास उभा राहिला. या बंद्याला पिटले. खोलीबंद केले. दंडाबेडी घातली, काही सूट कापली. त्याची सुटका लांबणीवर टाकली. बंदिगृहात कधीतरी होणाऱ्या उत्पातांचे मूळ पाहू गेले तर पुष्कळदा अधिकाऱ्यांची बागणूक त्याला कारणीभूत होते, असे आढळून येईल. आश्वासन दिले नसते तर उत्तम काम थोड्या अवधीत हाती पडले नसते, हे अधिकाऱ्यांना ठाऊक होते. तेव्हा आश्वासन पुरे करण्याचे उत्तरदायित्व त्यांचे होते.

अधिकाऱ्यांशी वाद घेण्याचा माझा बेत होता. पण कामाची हानी न करता. त्या वादात आरंभापूर्वी आमच्या त्या उद्योगशाळेत एक लहानसा समारंभ केला. गेल्या सहा

वर्षांत उद्योगालयाची प्रगती कसकशी होत गेली, याचा आढावा घेणारे विवरण अधिकाऱ्यांना प्रस्तुत केले. उत्पादन, वितरण, त्यांचे वर्गीकरण, असे प्रकार दाखविणारे आलेख मांडून ठेवले होते. दिनांक ३०-९-१९६१ या दिवशी समारंभ झाला. माझ्यापुरते तरी, त्या उद्योगशाळेचा मी निरोप घेत होतो.

दिनांक २८-१०-१९६१ ला माझे आवेदन सर्वोच्च न्यायालयात प्रस्तुत झाले होते. शासनाने जन्मठेप म्हणजे पुरा जन्म असे शिक्षेचे कार्यवाहन करण्यास आरंभ केला तर त्यांच्या प्रबंधनाचे म्हणजे शिस्तीचे नियम कसे कोलमडून पडतील हे दाखविण्याचा माझा हेतू होता. माझा प्रत्येक वाद लिखित असे. तरीही शासनाविरुद्ध व्यक्ती असा विषम संघर्ष असल्याने आणि स्थानिक अधिकाऱ्यांसमोरच त्यांच्या नियमातील दोष मला दाखविण्याचे असल्याने मला कदाचित आणखी छळ सोसावा लागणार होता. कादचित त्या छळाचे पर्यवसान माझ्या मृत्यूतही होण्याची शक्यता होती.

बंद्याच्या गणवेशातील टोपीवरून त्याचा वर्ग ओळखला जातो. प्रथम दंडित (casual offender) असून शिक्षा पाच वर्षे किंवा त्याच्या आत आहे त्याला पांढरी टोपी. प्रथम दंडित पण पाच वर्षांपेक्षा अधिक शिक्षा उरलेली आहे त्याला पिवळी टोपी. सराईत दंडिताला (habitual offender) म्हणजे काही विशिष्ट अपराधासाठी अनेकदा शिक्षा लागलेल्याला काळी टोपी आणि पळून गेल्याच्या अपराधीसाठी शिक्षा लागलेल्याला तांबडी टोपी असे ते वर्गीकरण असे.

आम्हाला पिवळी टोपी होती. लिखित नियमांप्रमाणे याचा अर्थ आमची उरलेली शिक्षा पाच वर्षांपेक्षा अधिक होती.

सुटकेच्या अंतिम दिनांकावरून उर्वरित शिक्षेचा अवधी काढण्याचा असतो. अंतिम दिवस निर्धारित झालेला नव्हता. कारण शासनाने कोणतेच नियम पाळले नव्हते. कोणताच शब्द पाळला नव्हता आणि आता तर मृत्यू हाच सुटकेचा विधिपूर्वक दिवस असाच शासनाने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयपत्राचा अर्थ लावला होता.

ते गृहीत धरले तर मृत्यूची तिथी कोणालाच आधी सांगता येत नाही असेही न्यायालयाने म्हटले होते. मला पाच वर्षांनंतरच मृत्यू येणार हे कशावरून ? आधी कशावरून नाही. शासनाच्या वर्तनामुळे लिखित नियमांशी विसंगत ठरलेली टोपी मी परत केली. माझी कारणे लेखी दिली.

मला पांढरी टोपी देऊ केली. माझी उर्वरित शिक्षा या दिवसापासून पाच वर्षांच्या आत आली आहे असे लिहून द्या असे मी अधिकाऱ्यांना सांगितले. तसे ते करीनात ! कारण लिखित नियमाचा आणि अधिकाऱ्यांच्या लेखाचा आधार घेऊन मी सर्वोच्च न्यायालयात जाईन असे त्यांना वाटले. मी तीही टोपी घेण्यास नाकारले.

प्रत्येक बंद्याला एक बिल्ला दिला जातो. तो छातीवरील गुंडीला लावायचा असतो. पूर्वी तो लोखंडी कडीने गळ्यात अडकवीत, मग ही सुधारणा झाली. त्या बिल्ल्यावर बंद्याचा क्रमांक, त्याचे नाव, शिक्षेची धारा, शिक्षेचा दिनांक, शिक्षेचा अवधी आणि सुटकेचा दिनांक दाखविलेला असे.

माझ्या बिल्ल्यांवर सुटकेचा दिनांक तर दाखविला होता. पण शासनाच्या वर्तनाशी दिनांक दाखविणेच विसंगत होते. मृत्यू त्याच दिवशी थोडाच येणार होता ? तो कोणी शासनाचा सेवक नव्हे, की सांगितल्या क्षणी हात जोडून पुढे उभा राहील ! मी बिल्लाही नाकारला.

कामाच्या वेळी किंवा हिंडताना बंद्याने टोपी घातली पाहिजे, बिल्ला लावला पाहिजे ही नियमाची अपेक्षा. मी नियमभंग केला म्हणून माझी सूट कापण्यास आरंभ केला. हा त्यावर उपाय नव्हता. नियमातील दोष आणि शासनाच्या वर्तनातील असंबद्धता मी दाखविली होती. ते पडताळून पाहणे आणि सुधारणा करणे हा त्यावर उपाय होता.

सूट कापणे ही शिक्षा असते. त्याप्रमाणात त्या बंद्याची सुटका लांबणीवर पडते. माझ्या संबंधात सूट कापणे हे शिक्षेचे विडंबन होते. शासनाने स्वतःला वेडबावे त्यातला प्रकार होता. सूट असली तरीही मृत्यूच्या दिवशी सुटका आणि नसली तरीही तेच असा अंधेरीनगरीचा व्यवहार असल्याने, सूट कापल्याने शिक्षेचे केवळ नाटक होत होते.

शासनाने नियमातील दोष शोधला. पण तो फार उशिरा ! सुसंगती आणली गेली ती शासनाच्या सुधारणेशी. बिल्ल्यावर सुटकेचा दिनांक न लिहिण्याचा निर्णय शासनाने घेतला.

मला बिल्ल्यासाठी केलेल्या शिक्षा काढून टाकावयाच्या होत्या. पण ते केले नाही. पण माझा मूलभूत वाद मिटला नव्हता. ज्याला नुसतीच शिक्षा आहे आणि आता शासनाच्या तथाकथित माणुसकीच्या पद्धतीप्रमाणे सुटकेचा दिवस नाही त्याला बिल्ला काय करायचा ! बिल्ला नाही म्हणून तुला परत ढकलून देतो, किंवा माझ्या राज्यात घेत नाही, असे यम थोडेच म्हणणार ! सुटकेचा दिवस द्यायचा नाही, असा अर्थ काही सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयपत्रातून निघत नव्हता. पण हे हिसके देण्याचा आपला अधिकार आहे अशी दर्पपूर्ण वागणूक शासनाने दिली.

माझा संघर्ष चालू असतानाच एका अन्यायासाठी मला सर्वोच्च न्यायालयात जाण्याचे होते. माझे गाऱ्हाणे अधिकाऱ्यांविरुद्ध होते आणि त्यांच्याद्वारा मला ते सर्वोच्च न्यायालयाला कळविण्याचे होते. अधिकाऱ्यांनी आडकाठी आणली. मी पत्नीला भेटीत सांगितले. स्वाक्षरी न केलेले निवेदन तिला धाडले. सर्वोच्च न्यायालयाला लिहिले. अधिकारी आडकाठी आणीत आहेत असे गाऱ्हाणे मांडले.

ते आवेदन येते की नाही याची सर्वोच्च न्यायालयाने वाट पाहिली. मग एक दिवस अधिकाऱ्यांना त्यांनी कळविले, अशा प्रकारचे निवेदन आले असेल तर ते त्वरित धाडण्याची सोय करा. अडवले का ते सांगा आणि न्याय मागण्याच्या कामात आडकाठी आणू नका.

माझ्या पत्नीला कसे कळले याची छाननी झाली. पण अधिकाऱ्यांच्याच करवी माझा पत्रव्यवहार झालेला त्यांच्या निदर्शनास आला. हे होईपर्यंत, अन्यायातून मला अवभार (relief) मागण्याचा होता त्याचे महत्त्व संपले होते. सत्तेचा असा दुरुपयोग शासनाच्या विशिष्ट धोरणांमुळे होत असे.

卐 卐

पंधरा

श्वासासाठी धडपड

नाशिक बंदिगृहात माझे वाद चालू होते. सूट काढल्याचा काही उपयोग नाही हे शासनाला दिसून आले. माझी कोंडी केली तर मी वाद घेणार नाही, अधिकाऱ्यांना आणि शासनाला विचार करावयास लावणारे डोकेदुखीचे प्रश्न मी उपस्थित करणार नाही, मुकाट्याने शासनाचा बरबंटा अंगावर खेळवीत बसेन आणि मरणाची प्रतीक्षा करीत राहीन, अशा कल्पनेने मला दिनांक २०-१-१९६२ या दिवशी नाशिकहून मोटारने औरंगाबाद बंदिगृहात नेले.

माझे वाद असंबद्ध नव्हते, आडमुठेपणाचे नव्हते, कोणाला उपद्रव देणारे नव्हते. एक विधीचा प्रश्न सोडविण्याची माझी धडपड होती. शासनाजवळ सुसंगत उत्तर नव्हते. आपला खोटेपणा उघडा पडू नये म्हणून बळाचा वापर करण्याचा त्यांचा अत्यंत अपवित्र व्यवहार होता. पवित्रपणाचा आब आणला म्हणून 'अपवित्र' म्हटले आहे.

औरंगाबादला पोहोचलो त्या रात्रीआणि त्यानंतर दोन दिवस माझ्यासाठी एक प्रशाल (बॅरक) मोकळा केला होता. नंतर मला एक बाजूच्या एकलकोंडीत ठेवून दिले.

दिवसा कोंडून घेण्यास मी पहिल्याच दिवशी विरोध केला. ती शिक्षा असते. ती कशासाठी आहे हे बंद्याला कळलेच पाहिजे, आणि तसा खटला करून शिक्षा देण्याचा अधिकार केवळ अधीक्षकांना आहे हे कनिष्ठ अधिकाऱ्यांच्या ध्यानात आणून दिले. बहुधा अधीक्षकांशी आहे हे कनिष्ठ अधिकाऱ्यांच्या ध्यानात आणून दिले. बहुधा अधीक्षकांशी ते अधिकारी बोलले. माझी कोठडी दिवसा उघडी राहू लागली.

मला बंद्यात मिसळून देईनात ! हेतू असा की असे वाद घेण्यास मी बंद्यांना प्रवृत्त करू नये ! मी अधिकाऱ्यांना पटवले, 'अधिक छळ सहन करण्याची ज्याची शक्ती असेल, ज्याचे मनोबल असेल, तोच असे वाद घेईल. ज्याचे त्याचे हित ज्याला त्याला कळते.

शिकवण्याने कोणी उभा राहणार नाही.' व्हॉलीबॉल किंवा हुतूतूसारखे खेळ मी बंद्यांसह खेळू लागलो.

नाशिकच्या रासायनिक निर्माणीत काम केलेले अनेक बंदी तेथे होते. मी तेथे आणला गेलो आहे याने त्यांना आनंद वाटला. सांगितले तर मला वाटते, माझ्यावर आत्मस्तुतीचा आरोप येईल, माझ्यावर त्या बंद्यांची नितांत भक्ती होती. रासायनिक उद्योगशाळेत त्यांना मिळालेली वागणूक हे त्याचे मुख्य कारण होते. सर्वोच्च न्यायालयातील माझ्या प्रयत्नांना अपयश आलेले पाहून ते खिन्न होत. औरंगाबादच्या बंद्यांनी एक कल्पना काढली. वर्गणी गोळा करावी तसे आपापल्या सुट्टीतील (रेमिशनमधील) दिवस गोळा करून त्यांनी मला नाशिकला पत्र लिहिले, 'आम्ही इतके दिवस (म्हणजे सूट) आपणास देण्यासाठी सोडून देण्यास काढले आहेत. न्यायालयासाठी किंवा शासनासाठी त्याचा उपयोग आपल्या सुटकेच्या संबंधात होत असेल तर त्वरित कळवावे. आपण फार सोसले आहे. रात्रंदिवस काम केले आहे. आम्हा अडाण्यांना सज्ञान केलेत; आमची ही विनंती आपण मानावी. आपण आपल्या मुला-माणसात जावे !' भोळी पण भावनेने ओथंबलेली ती पत्रे आजही माझ्याजवळ आहेत. काही महिने झाले म्हणजे अधिकारी पत्रे फाडून टाकतात. मला ती ठेवण्याची आहेत, असे मी सांगितले. अधिकाऱ्यांनी ती फाडली नाहीत. त्या बंद्यांना कुठे कृष्णसूचीत म्हणजे Black list मध्ये टाकतात की काय असे वाटले होते. पण तसे झाले नाही. पण ज्यांनी स्वतःची सूट मला देऊ केली त्यांना अशा कृष्णसूचीचेही भय नव्हते, हे उघड आहे.

बंदिगृहात आयोजित होणाऱ्या कार्यक्रमात मी भाग घेत असे. बंद्यांना काही मार्गदर्शन हवे असे तेही मी देत असे. शासनाशी असलेले संघर्ष चालूच होते.

प्रबंधाच्या स्वरूपात प्रस्तुत केलेल्या माझ्या आवेदनाला क्रमांक पडला होता. PetitionNo. 16 of 1962. दिनांक १२-४-१९६२ ला मला औरंगाबाद बंदिगृहात न्यायालयाचा निर्णय सांगण्यात आला - 'आवेदन फेटाळले.'

परिश्रमपूर्वक केलेले एक प्रकारचे संशोधन वाया गेले होते. उभ्या केलेल्या प्रश्नात खोल जाण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला होता. प्रश्न तितकाच अनिर्णित राहिला होता.

माझ्या मनावर निराशेची छाया पसरली. मन सारखे घराकडे धाव घेऊ लागले. घरावर उदासीनतेची छाया असे. पत्नीने अधूनमधून लिहिलेली पत्रे तिची विकल अवस्था दाखवीत असत. माझ्या मनावर त्याचा परिणाम होत असे. दोन वर्षांपूर्वी म्हणजे दिनांक ६-१२-१९५९ ला तिने लिहिले होते :

'प्रबल इच्छाशक्तीने तुझ्या कक्षेतील काही गोष्टी तू ठरवितोस आणि करतोस. काही दिवसांपूर्वी मीही असेच काहीतरी ठरवायची आणि ते करून टाकायची. पण सध्या काय

झाले आहे कोणास ठाऊक ! सबंध दिवस आणि रात्रीच्या अकराबारा वाजेपर्यंतचा वेळ कोठे जातो तेच कळत नाही. रात्री झोपताना सबंध दिवसाचा आढावा काढला तर आपण काही विशेष केले आहे असेही आढळून येत नाही. त्यामुळे पुष्कळ वेळा माझी जीवनाबद्दलची आसक्ती वाढण्याऐवजी त्या ठिकाणी एक प्रकारची अनासक्ती निर्माण होते. वाटते, करायचे काय असे घाण्याच्या बैलासारखे जिणे जगून ! परंतु लगेच दुसरे मन म्हणते; अग, दुसऱ्या कोणाला तुझ्या जिण्याचा उपयोग नसला, तर अपेक्षिलेले फळ मिळेल काय ? त्यापेक्षा आजपर्यंत ज्या स्वाभिमानाने तू जगण्याचा प्रयत्न केला आहेस त्याच स्वाभिमानाने तुझ्या मुलींना आणि बाहेर आल्यावर तुझ्या गोपाळला जगता येईल अशी परिस्थिती निर्माण करून नंतरच तुझ्या जीवनाबद्दलच्या निराशेचा विचार ! तोपर्यंत 'गोपाळ, गोपाळ' या एका मंत्रावर तुला तुझी वाटचाल चालू ठेवलीच पाहिजे ! नाहीतरी ज्याला आजवर देव म्हणून मानीत आलीस त्याचीच पूजा भंगण्याचे पाप तुला घ्यावे लागेल !

'आणि अशा प्रकारचे विचार ज्या वेळी मनात येतात त्या वेळेपासून पुन्हा माझ्या उत्साहाला भरती येते. आणि माझ्या भोवतालच्या मंडळींना अशक्य वाटणारी कामे मी हसत हसत केव्हाच करून टाकते. गोपाळ ! यावरून मी एक निष्कर्ष काढला आहे माणसाला कुठेतरी एक विश्वासाचे, मानबिंदूचे स्थान लागते की ज्याचा विचार मनात आल्याबरोबर कोणतेही साहस त्याच्या हातून पार पडावे ! ध्येय डोळ्यासमोर असल्याने निराशा नाहीशी व्हावी. पण इतके असूनही नित्य व्यवहारातील अडचणींना तोंड देता देता जीव मेटाकुटीला येतो.'

यानंतर कारखान्याच्या कामाचा काही आढावा सिंधूने दिला आहे. मी तिला एक कविता धाडली होती, 'केवढा दिवस हा !' त्याचे कौतुक तिने केले आहे. पत्र संपवताना आपण निरोप घेतो त्याचप्रमाणे तिने कळवळून लिहिले होते. 'खरेच गोपाळ ! केव्हा येशील आता तू घरी ? मला एकटीला राहण्याचा खरोखर कंटाळा आला आहे बघ ? रोज रात्री निजताना मी म्हणते, आपल्या गोपाळचा वनवासाचा एक दिवस संपला आणि आपल्या सौभाग्याचा तितकाच जवळ आला ! ऊर्मिलेची काय अवस्था झाली असेल याचे चित्र मला वाटते मी तंतोतंत रेखाटून दाखवीन. एखादे नाटक बसविल्यास ती भूमिका मी सहज रीतीने करून दाखवीन !'

माझी धाकटी मुलगी असिलता तेव्हा पाचवी-सहावीत होती. तिने एकदा बंदिपालांना एक कार्ड लिहिले, 'तुम्ही आमच्या बापूंना का सोडत नाही ? ताई (आई) आजारी आहे. बापू चांगले वागतात ना ? मग तुरुंग चांगले वागतात त्यांच्यासाठी असतो का ? मला तुरुंगात ठेवा. बापूंना सोडा.

'माझ्या मैत्रिणींच्या घरी आई-वडील असतात. आमच्या वडिलांना आमच्या घरी

धाडून द्या !'

अधीक्षकांनी ते पत्र वाचले. त्यांचा आठ-दहा वर्षांचा मुलगा नुकताच वारला होता. त्यांनी मला असिलतेचे पत्र दाखविले. पत्र वाचून मी परत दिले, पाहातो तो अधीक्षकांना भडभडून आले होते.

वाढत्या मुलींनी किती दिवस उद्विग्न अवस्थेत राहावयाचे ? पत्नीने कोठवर काबाडकष्ट करायचे ? त्यांच्या मनावरचे दडपण केव्हा दूर व्हायचे ? घराला घरपण पाहिजे की नाही ? काही कौटुंबिक आयुष्य त्यांना हवे की नको ? मला वाटायचे, आपण का मिंतीला टकरा देत बसायचे ? सत्तेपुढे शहाणपण चालत नाही. मला यातना सहन होईनात.

निर्णय कळला होता. संध्याकाळपर्यंतचा वेळ कसा तरी गेला. सर्वोच्च न्यायालयाने बोलावले असते तर आज बंद होतानाही मनाला उल्हास वाटला असता. आज मी बंद झालो तो संपूर्ण निराशेच्या अंधारात. मी खचलो. मन वाकले. कोलमडले.

रात्री मी आवेदन लिहिले. ते राष्ट्रपतींना उद्देशून होते. 'मला सोडण्याचा केवळ शासनाचा अधिकार आहे. माझी तेरा वर्षे झाली आहेत. आठ वर्षे सूट आहे. अशी एकूण एकवीस वर्षे झालेली आहेत. माझ्यावर दया करून मला सोडून द्यावे. मी क्षमा मागून सुटलो असे प्रसिद्ध केलेत, तरीही माझा प्रत्यवाय नाही. आपण अटीवर सोडलेत तरीही चालेल. मला बंधमुक्त करावे.'

टंक करण्यास विलंब होऊ नये म्हणून आवेदनाच्या आवश्यक तेवढ्या प्रती मी करून ठेवल्या. सकाळी ते आवेदन अधीक्षकांना द्यायचे मी ठरविले. रात्री बंदिपालांची चक्कर झाली. त्यांच्याशी मी माझे मन बोललो.

मला शांत झोप लागली.

पहाटे मी उठलो तो 'नाही, नाही' असे ओरडत ! पहाऱ्यावरचे प्रशाला रक्षक (वॉर्डर) दचकले. स्वप्न पडले की काय अशी त्यांनी चौकशी केली.

झोप मोडण्यापूर्वी थोडा वेळ बहुधा माझे अंतर्मन कार्यप्रवण झाले होते. स्वप्न असेल तर ते मला आठवत नव्हते. बाह्य मनाची अर्धवट जागृत अवस्था असेल. अंतर्मनाने कोठे तरी धक्का दिला असेल, झोपमोड होता होता मुखावाटे शब्द आले -

'नाही नाही !' किंवा अंतर्मनाने दिलेला धक्का तीव्र असावा. त्यातून बाह्य मनाला आणि बाह्य मनातून स्नायूंना हालचाल मिळून ते शब्द निघाले असतील आणि त्या शब्दांच्या आघाताने माझी झोप मोडली असेल.

काही गोष्ट हातून झाली आहे, तो अपराध होता हे मनाला पटले आहे, अशा अपराधासाठी क्षमायाचना करून त्याचे अंशतः परिमार्जन करण्याइतके मन मोठे असले पाहिजे. त्यात न्यूनपणा समजला जाऊ नये. मला त्यात न्यूनपणा वाटत नाही.

माझी क्षमायाचना म्हणजे राणा प्रतापच्या मनात अकबरापुढे नतमस्तक होण्याचा विचार यावा तशातलीही नव्हती. अकबराचे वर्चस्व परकीय होते. स्वातंत्र्य टिकविण्यासाठी राणा झुंजत होता. तो पराजित होता. परकीयांचे राज्यच अन्याय्य असते. तो मुख्य अन्याय दूर करण्यासाठी केलेली कोणतीही उपाययोजना देशाच्या दृष्टीने अपराधस्वरूप ठरूच शकत नाही. पराजय हा त्याचा अपराध नव्हता. राणाने क्षमा मागणे याचा अर्थ त्याने स्वराज्य टिकविण्यासाठी आणि मिळविण्यासाठी घेतलेली झुंज अपराधस्वरूप होती असा झाला असता. त्याने ते केले नाही. स्वाभिमानाचे दैवत म्हणून आज आपण राणा प्रतापचे गुण गातो.

या ठिकाणी, हे राज्य परकीय आहे किंवा हे राज्यकर्ते आमचे नव्हेत, अशी आमची भूमिका कधीच नव्हती. अवैध घटनेमागील हेतू असला तर तो हाच होता, की स्वराज्याची सीमा बळकट ठेवण्यासाठी या आमच्या राज्याने, या आमच्या राज्यकर्त्यांनी कणखरपणा स्वीकारावा, स्वत्व सांभाळावे, अन्याय सहन करू नये, दमदाटीला भीक घालू नये, मृगजळामागे धावू नये. तेव्हा आमच्याच राज्याचा जर आम्ही काही अपराध केला असेल तर त्यांची क्षमा मागण्यात आम्हाला मानहानी ती काय वाटावी !

प्रश्न असा होता की, राज्य आमचे असले, राज्यकर्ते आमचे असले तरी मी त्यांचा काही अपराध केला नव्हता. क्षमायाचनेने मी त्यांचा अपराध केलेला आहे असे खोटेच मानले असते, त्यांना खोटा मोठेपणा चिकटवला असता आणि क्षमा करण्याचा त्यांचा अधिकार आहे असा खोटा आरोप त्यांच्यावर केला असता. या तिन्ही गोष्टी मनाला न पटणाऱ्या होत्या. अपराध कोणाचा असेल तर तो राज्यकर्त्यांचा होता, माझा नव्हता.

निष्कासन म्हणजे transportation ही माझी न्यायविहित शिक्षा असताना त्यांनी मला बंदिगृहात डांबून ठेवले. नियत वेळेपलीकडे माझ्याकडून काम घेतले, त्यासाठी मला वेगळी सूट दिली; पण मी काम दिले ते खरे होते, सूट पदरात टाकली ती जिवंत ठेवली पण खोटी ठरविली. जसे काही बनावट चलन. रक्त खरे घेतले होते. सूट लिहून दिली; संमोदित केली, पण तिचा लाभ दिला नाही.

रक्तदानाच्या सुट्टीच्या संबंधात मी माझ्या आवेदनात शासनावर वक्रोक्तीने कठोर टीका केली होती. मी म्हटले होते,

शासन म्हणेल, 'न्यायर्षी ! बंधाचे रक्त घेतले हे खरे. पण त्यात चूक काय ? बंधाला अंदमानात धाडले असते, तर त्याला तेथली अरण्ये स्वच्छ करायला लावली असती आणि त्यात जळवांनी रांगडेपणाने त्याचे रक्त शोषले असते. त्याव्यतिरिक्त, विधीशी सर्वस्वी अनभिज्ञ असलेल्या जळवांनी त्या बंधाच्या त्या अभिलेखावर सुट्टीची नोंदही केली नसती ! शासनाने सुट्टीच्या नोंदीपासून बंधाला वंचित केलेले नाही. आता हा सूट कसली मागतो ? त्या प्राण्यांशी त्याने सुट्टीचा वाद घालून अधिकार सांगितला असता का ?

Government would argue' 'It is true my Lord, that the convict's blood has been extracted; but, My Lord, there is nothing wrong in it. Had the convict been sent to Andamans, the leeches would have sucked his blood in an indecent manner, while he would have been made to clear the jungles. Besides, My Lord, the leeches, absolutely ignorant of law, would have left the convict without an entry of remission on his record. Could the life-convict claim any remission from the creatures, My Lord ? If not, how could he claim remission from Government particularly when he has not been deprived of the entry of the remission... on his history ticket ?' [Supreme Court Petition (printed) No. 16 of 1962, Page 38-39.]

या टीकेचा परिणाम असा झाला की केन्द्र शासनाने रक्तदान आणि सूट हा विषय विधीशी पडताळून बघण्यासाठी एक समिती नेमली. समितीने निष्कर्ष काढला. रक्तदान आणि तज्जन्य सूट यांचा कारांतर्गत नियमांशी सुतराम संबंध नाही.

समितीच्या निष्कर्षाला अनुसरून शासनाने मला सांगायला हवे होते, 'तुझ्या रक्तदानाच्या सुट्टीचा लाभ आम्ही तुला देत आहोत, कारण त्याचा नियमाशी संबंध नाही आणि म्हणून तू रक्तदान करण्यास बांधलेला नव्हतास. आमच्या सांगण्याने तू रक्तदान केलेस, सूट आम्ही दिली आहे. तिचा आम्ही तुला उपभोग करून देत आहोत.' दुसरे, शासनाने सर्वोच्च न्यायालयाच्या निदर्शनाला हा समितीचा निष्कर्ष आणावयास हवा होता. पूर्वी केलेले विधान परत घेण्यास हवे होते. सर्वोच्च न्यायालयाच्या प्रतिष्ठेचा तो प्रश्न होता. सर्व घटक समोर येऊन न्याय होणे आवश्यक होते. मी त्यातून सुटणे हा प्रश्न गौण होता.

शासनाने ते केले नाही. आपल्या वर्तनात खोटेपणा राहिला तरी चालेल, पण प्रतिशोध पुरेपूर उगवला गेला पाहिजे हे धोरण शासनाधिष्ठित व्यक्तींनी ठेवले होते. माझा प्रत्येक वाद खरा होता, तर्कशुद्ध होता. शासनाला त्याचा प्रत्यय येत होता. पण त्यांनी मला न्याय दिला नाही. आपण खरे बोललो, न्याय केला, तर आपण तत्त्वच्युत होऊ अशी जणू शासनाची धारणा होती. अपराध राजकर्त्यांचा होता; माझा नव्हता.

सुट्टीचे मूल्य सर्वसामान्य नागरिकाला समजणार नाही. पैशाचा ढीग ओतला तरीही एक दिवसांची सूट सुद्धा मिळवता येणार नाही. एक दिवस सुट्टीचे रूपांतर पैशात होणार नाही. अमुक राशी दंड किंवा दंड न दिल्यास अमुक अवधी कारावास हा प्रकार वेगळा. त्याचा सुट्टीशी संबंध नाही. सूट याचा अर्थ जी न्यायालयाने शिक्षा दिली किंवा विधिप्रमाणे जी भोगायची त्या शिक्षेमधूनच अंशतः अवभार. दयेच्या पवित्र अधिकाराच्या धारेत सूट पद्धतीचा स्रोत आहे. प्रभारी शासनसंस्थेची म्हणजे Executive Government ची ती

कक्षा असते. माझ्या संग्रही जी सूट होती, त्या सुट्टीत आणखी एखाद्या दिवसाची भर शासनाने आपल्या दयेच्या अधिकारात स्वतः होऊन टाकली असती आणि मला बंदिवासाच्या अंतिम मर्यादेत म्हणजे चौदा वर्षांत सोडले असते, तर त्या एक दिवसाच्या दानासाठी शासनाचा मी जन्मभर उतराई राहावे, त्या उपकारांचा सतत उच्चार करावा, इतके ऋण माझ्या डोक्यावर राहिले असते. त्याचे कारण सुट्टीचे मूल्य काय हे मी ओळखत होतो. तो अधिकार किती पवित्र आहे हे मी जाणत होतो. मी शासनाला मुक्त मनाने म्हटले असते, 'आपण माझ्यावर दया केलीत. कारण तो एक दिवस अधिक मला बंदिवासात ठेवण्याचा आपला अधिकार होता.' त्या दयेला दया हा अर्थ होता.

आज शासनाने 'दया' करून मला सोडावे अशी मायाच उरली नव्हती. की अद्याप माझे प्राण आहेत, मी जिवंत आहे हा शासनाने अपराध मानायचा आणि म्हणून दयेच्या अधिकारात माझ्या सुटकेची आज्ञा काढायची आणि मी ती स्वीकारायची ? मला त्यात खरेपणा वाटला नाही. शासनाचाही आणि माझाही.

झोप मोडण्यापूर्वी माझ्या मनात या विषयाची छाननी झाली असेल. अंतर्मनानेच पूर्वपक्ष आणि उत्तरपक्ष रंगवले असतील. द्वंद्व झाले असेल.

'दया मागून आणि ती मिळवून काय साधणार आहेस तू ?'

'माझी विरहावस्था संपेल. घरच्या मंडळींना हायसे वाटेल. त्यांच्या प्रत्येक क्षणाच्या वेदना नाहीशा होतील. मला स्वतंत्र जगता येईल.'

'पण हे मिळवताना प्रामाणिकपणाचा बळी द्यावा लागणार आहे तुला.'

'पण मला यातना सहन होत नाहीत !'

'मग हे व्रत घेतलेस का ? तुला कोणी बोलावले होते ? सुखाची नोकरी होती. मुलाबाळात राहिला असतास. जीव धोक्यात का घातलास ?'

'तेव्हा मला असत्य वर्तनाची चीड आली होती.'

'तुला पश्चात्ताप होत आहे ?'

'नाही ! पण तसे म्हटल्यावाचून सुटका होणार नाही !'

'असत्यपणाची तुला चीड आली. तू स्वतःही आता खोटेपणा करणार ?'

'पण मी खोटेपणा केला आहे, हे काही शासनाला कळणार नाही.'

'आणि तुझ्या मनाला ? तू आणि शासन भिन्न असाल. तू आणि तुझे मन काही भिन्न नव्हेत. तू सूटशीलही. पण कौटुंबिक सुखाकडे खेचला गेलास आणि तो स्वार्थ साधण्यासाठी खोटे बोललास हे तुझ्या मनापासून तुला लपविता येईल काय ?'

'पण हा विरह मी किती दिवस सहन करू ?'

'तू याचना केलीस त्याचे उत्तर अनुकूलच यायला पाहिजे, अशी तुझी कल्पना

आहे ? तू एककल्ली झाला आहेस. तू शासनाला दाता मानीत आहेस. तू दान मागत आहेस. ध्यानात ठेव, दान देणे न देणे हा दात्याचा अधिकार असतो. दान मिळालेच पाहिजे हा याचकाचा अधिकार असू शकत नाही. एकपक्षी विचार का करतोस ?'

'पण माझ्या शरणागतीने अनुकूल विचार होईल. मी बाहेर जाईन.'

'समज, खरे आहे. तू बाहेर केव्हा जाशील ? उद्या ? आज विनंती केलीस की उद्या उत्तर येणार आहे ? तुझे उरलेले आयुष्य किती आहे ठाऊक आहे ? निर्णय येण्याच्या आतच तू मरणार नाहीस कशावरून ?'

'म्हणजे इतके भोगल्यानंतर मी मरणार ? मला चार दिवसांचे स्वातंत्र्यही उपभोगता येणार नाही ? माझी इतकी सूट...'

'सूट गेली खड्ड्यात ! मरायला सूट लागत नाही आणि सूट असल्यानंतरही मरण येते. दरिद्रीही मरतो आणि श्रीमंतही मरतो. तू तोवर मरशील किंवा मरणार नाहीस. सर्व शक्यता विचारात घेतल्या पाहिजेत तुला. तू अमरपत्र घेऊन नाही आलास. माणसे मरतात. तुलाही मरायचे आहे. प्रत्येकाला जीवनात सुख उपभोगायला मिळतेच असे नाही. कधी माणसे क्रूर होतात, कधी नियती क्रूर होते. प्रत्येक क्रूरतेला उपचार नसतो. फाटलेल्या पंजाबकडे आणि बंगालकडे पहा. त्या लोकांचा काय अपराध होता ? कितीतरी जणांनी आयुष्यात शब्दानेही कोणाला दुखविले नसेल. काय झाले तिथे ! भर तारुण्यात कुटुंबेच्या कुटुंबे उद्ध्वस्त झाली. पत्नीहीन पुरुष आणि पतिहीन स्त्रिया तळपत्या सूर्याखाली उघड्या पडल्या, मुले पोरकी झाली, आई-बाप अपत्यहीन झाले. आश्रय शोधण्यासाठी ते देशभर सैरावैरा भटकत राहिले. मिळाले सुख त्यांना ? लाभले जीवन त्यांना ?'

'ते शरणार्थी होते.'

'शरणार्थी ? शरण जाण्यासाठी नाही, तर पौरुष टिकविण्यासाठी त्यांनी अनावर घाव झेलले. स्वत्व टिकविण्यासाठी धडपड केली. त्यांनी आघात झेलले आणि इतर प्रांतांना झळ लागली नाही. ते पौरुषार्थी; ते स्वत्वार्थी. धर्मांतर करून का होईना पण जिणे जगू द्या म्हणून जे शरण गेले ते शरणार्थी ! तुला व्हायचे आहे शरणार्थी ? न केलेल्या अपराधासाठी क्षमा माग, स्वतःला फसव, आपल्याच शासनाला सुधारू नकोस, तर फसव आणि जा बाहेर !'

'पण माझ्या घराला घरपणच नाही; कारण मी बंदीत आहे.'

'पुन्हा, तेच ! तू विस्तवात हात घालताना विचार करायचा होतास. लग्नात तू आणि तुझी पत्नी हाताला हात लावून अग्नीला आहुती दिल्यात. एकमुखाने तुम्ही मंत्र म्हटलेत. तुम्ही बांधले गेलात. नंतर स्वतःच्या कृतीने आपण पत्नीला आणि मुलांना दुःखात लोटीत आहोत, घराचा घरपणा नाहीसा करीत आहोत, हे तेव्हा नाही कळले तुला ? त्यांच्या सुखासाठी

तुला बाहेर जावेसे वाटत आहे, हे खोटे आहे ! सुख तुला हवे आहे. तू त्यांचे आवरण घेत आहेस.'

'त्यांना आधार काय ?'

'इतके दिवस काय होता ? त्यांचे सुखदुःख विधाता बघेल. तुझ्यापुरता विचार तू कर. कुटुंबच्या कुटुंब या क्रियेत होरपळणार असेल, तर अनेक निरपराध कुटुंबांची धुळधाण झालेली आहे, त्यातच तुझ्या कुटुंबाची होईल. तू किंवा त्यांनी सुख बघूच नये असे तुझे किंवा त्यांचे विधिलिखित असेल तर त्याला तू काय करणार ? विधात्याची ती इच्छा समजून तुला ते बघायलाच पाहिजे.'

'सुख मिळवण्याचा प्रयत्नही करू नये का ? यश येणे न येणे माझ्या हाती नाही हे मी समजतो.'

'असला प्रयत्न ? याममार्गाने वाटचाल ? जे खोटे आहे असे तू जाणतोस ते तू करणार ? या मार्गाने तुला सुटका मिळाली तरीही एक शल्य तुला रात्रंदिवस सतावत राहील - आपण खोटे बोललो आणि शासनाला खोटे बोलायला लावले. बंदिवासाच्या यातना काहीच नव्हेत, इतक्या वेदनामय सुटकेनंतरच्या त्या शल्याच्या यातना असतील.'

मला वाटते, कोण्या ऋषीने तो जणू शाप उच्चारला आहे, सुटकेनंतर ते शल्य मला झोंबू लागले आहे, असा भास होऊन जाणिवेचे मन 'नाही नाही' म्हणत परत फिरले होते.

मी आता परत जागा झालो होतो. काही वेळाने,

उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत्
आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः ।

हा गीतेतील श्लोक मनात घोळू लागला.

प्रातर्विधी आटोपला. कागदापाशी येऊन बसलो. त्या दिवसात मला अशक्तपणा आलेला होता. पण लिहिणे सुटणे शक्य नव्हते. अधिकाऱ्यांनी मला एक बैठे पटल (desk) दिले होते. त्यामुळे लिहिण्यासाठी वाकावे लागत नसे, मज्जारज्जूवर तेवढा ताण येत नसे. आवेदन समोरच होते. प्रत्येक प्रतीवर रहित (cancelled) अशी मोठी अक्षरे लिहिली आणि तिरक्या रेषा मारल्या. कागद माझेच असले तरी ते मोजून दिले जात. त्यांचे गणन द्यावे लागे. त्यामुळे कागद टाकता येत नसत.

अधीक्षक नवीनच आलेले होते. त्यांचा आणि माझा परिचय अद्याप नीटपणे व्हायचा होता. हळूहळू परिचय होत गेला. ते अधीक्षक या नात्याने मी त्यांच्याशीही फार भांडलो आहे. इतके असूनही ज्या काही अधिकाऱ्यांचा समंजस, उदार, सहानुभूत म्हणून मी आभारपूर्वक उल्लेख करीन त्यात त्यांचे प्रमुख स्थान राहील. त्यांचे नाव श्री. तोरसकर.

मी विषण्ण आहे हे अधिकारी जाणत होते. दुसऱ्या दिवशी त्यांची चक्कर आली.

कोणी काही बोलले नाहीत. मीही मुग्ध राहिलो.

तिसऱ्या दिवशी फेरीच्या वेळी मी अधीक्षकांना काही कागद दिले. ते टंक करून आणविण्याची विनंती केली.

दर्शनी पृष्ठ अधिकाऱ्यांनी पाहिले. प्रश्नार्थक मुद्रेने त्यांनी माझ्याकडे पाहिले. ते कागद म्हणजे सर्वोच्च न्यायालयाला धाडण्याच्या आवेदनाचे प्रारूप (draft) होते.

'तुम्ही परवा तर -' अधीक्षक म्हणाले.

'हो !' मी त्यांना मध्येच तोडले. दयेच्या आवेदनाचा विचार मी बंदिपालांजवळ बोललो होतो. ते त्यांनी अधीक्षकांना सांगितले होते. पण आता ते पाहात होते ते वेगळेच आवेदन होते. मी त्यांना सांगितले, 'दयेचे आवेदन मी देणार होतो पण आता बेत फिरवला आहे. हे पाहा, लिहिलेल्या आवेदनावर cancalled म्हणून ठेवले आहे.' असे म्हणून ते कागद दाखविले.

'बेत कसा काय फिरला तुमचा ?' अधीक्षकांनी कुतुहलाने विचारले. मी मागे एका लेखात म्हटल्याप्रमाणे, अधिकारी बंद्यांच्या विशिष्ट स्थित्यंतराचे निरीक्षण करीत असतात. त्यातून ज्ञान घेत असतात, अनुभव घेत असतात आणि त्यातून काही आडाखे बांधतात. मी दयेचेच आवेदन करायला पाहिजे अशी सूचना किंवा आग्रह अधीक्षकांच्या बोलण्यात अप्रत्यक्षपणेही नव्हता.

'मला दृष्टांत झाला !' मी काव्यात्मक भाषेत सांगितले.

तितक्याच खेळकरपणाने अधीक्षकांनी विचारले, 'कोण भेटले तुम्हाला ?'

'श्रीकृष्ण.'

'काय म्हणाला तो ?'

'क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ !'

त्यांना हसू आले ! माझ्या तोंडावरचे हसू फार दिवसांपासून पुसले गेले होते. मीही हसलो. मी पुन्हा उभा राहिलो आहे याने मनोमन वाटणाऱ्या समाधानाचा आविष्कार माझ्या हसण्यात होता. आभाळ अनेक दिवस ओलेचिंब राहिल्यावर प्रथमच सूर्याची किरणे झिरपत आल्याने जसा आल्हाद वाटतो, तसे मला वाटत होते.

आवेदन टंक झाले. चार दिवसात मी स्वाक्षरी केली. शपथपत्रक केले आणि आवेदन सर्वोच्च न्यायालयाला धाडण्यासाठी अधिकाऱ्यांजवळ दिले. मध्यंतरी सर्वोच्च न्यायालयाला सुट्टी होती. साडेतीन महिन्यांनी त्यांनी आदेश दिला, '६-८-१९६२ ला बंद्याला आमच्यासमोर आणा.' मी गेलो होतो.

आवेदनात सुटकेची प्रार्थना नव्हती. शासनाकडून मला अमूक गोष्टी कळल्याच पाहिजेत असा लहानसा अवभार (relief) मी मागितला होता. एक तांत्रिक आपत्ती

(objection) काढली गेली; आवेदन फेटाळले गेले.

सुटका मागितली नव्हती म्हणून अपयशाचा धक्का बसला नाही आणि सुटका मागून अपयश आले असते तरीही आता माझे मन बोथट झाले होते किंवा संशोधित (seasoned) झाले होते.

माझ्या न्यायालयीन आणि अन्य हालचालीसंबंधी मी घरी लिहीत असे. पाच दिवसांत मी औरंगाबादला पोहोचलो होतो, अपयश आल्याचे घरी कळविले होते.

स्वतःची बिकलावस्था विसरून, स्वतःचा तोल सांभाळून प्रसंगी माझाही तोल सांभाळणाऱ्या माझ्या पत्नीने दिनांक १६-८-१९६२ ला मला उत्तर लिहिले होते.

'तुझे पत्र मिळाले. पत्र वाचून थोडा वेळ वाईट वाटले. परंतु ते कुणाला दिसणार नाही याची दक्षता घेतली. गेले दोन दिवस त्यावरच विचार चालू आहे माझा.'

पुढील छेदकात, नेमके काय मांडले जावे याची सिंधूने तिच्या कल्पनेप्रमाणे चिकित्सा केली आहे. पुढे ती लिहिते -

'या गोष्टीचा विचार केल्यानंतर एकदा वाटते, एखादा विधिज्ञ पहावा. प्रदेय दोन-तीन सहस्र लागेल, काही हरकत नाही. थोडथा दिवसांनी तेवढी रक्कम साठवून मग तसा प्रयत्न करावा. परंतु तोपर्यंत तुझे प्रयत्न मात्र थांबविण्याचे कारण नाही. पंढरपूरची वारी मोक्ष मिळेपर्यंत करायची हा एकच विचार दृढ असतो वारकऱ्यांच्या मनात. तसेच आपले ! आपल्याला मोक्ष म्हणजे बंदिगृहातून मुक्तता मिळेपर्यंत प्रतिवर्षाची वारी चुकता उपयोगी नाही. वारकऱ्यांना तरी तेच तेच हाल आणि तेच कष्ट नाही का सहन करावे लागत ! पांडुरंगाचे दर्शन मिळेपर्यंत मनावर तोच तोच ताण पडत असतो प्रतिवर्षी ! म्हणून ते एखाद्या वारीस कंटाळा करतात काय ? नाही ! ते हाल, कष्ट सहन करीतच पांडुरंगाच्या दर्शनाचा लाभ ! एखादे वेळी कोणाच्या बशिल्याने दर्शन जरा त्वरित मिळते एवढेच !

'माझा विश्वास आहे,गोपाळ, आपल्यालाही तोच आनंद भोगायला मिळणार आहे एक दिवस ! पण त्या आनंदाचा क्षण येण्यास अजून कष्ट, मानहानी, अवहेलना, दुःख नि विरह यांचे माप भरावयाचे आहे.

'पुन्हा तू उभा रहा ! कष्ट बाबा गेले वाटणे स्वाभाविक आहे. पण दगडातून तेल निघेल या भावनेने केलेले प्रयोग बाबा गेल्याचे दुःख झाले म्हणून शास्त्रज्ञ गप्प बसले का ? नाही ! विजेच्या तारांमध्ये कोणत्या तारांचा उपयोग करता येईल यासाठी एडिसनचे किती सहस्र प्रयोग बाबा गेले ? पण नाद सोडून दिला का त्याने ? तो नाद सोडला असता तर आज आपल्याला रात्री बाटेल तेव्हा प्रकाश हात जोडून उभा राहिलेला दिसला नसता !

'सारे जरी मागे फिरले तरी मी तुझ्या पाठीशी, नव्हे तर तुझ्याबरोबर आहे. बघ ! पुन्हा प्रयत्न करू या ! आपण म्हणतो ना, जेथे जातो तेथे तू माझा सांगाती. म्हणून ?'

गेल्या दोन महिन्यांपासून औरंगाबाद बंदिगृहात माझी प्रकृती खालावत चालली होती. अन्नावरील वासना मंदावत होती. जिल्हा रुग्णालयाच्या मुख्य चिकित्सकांनी (Civil Surgeon) मला तपासले होते. बंदिगृहातील डॉक्टरही तात्पुरता उपाय करीत असत. त्याच स्थितीत मी ऑगस्टमध्ये दिल्लीला जाऊन आलो होतो.

दोन आठवड्यांनी प्रकृती आणखी बिघडली. दिवसाकाठी अर्धी भाकरीही मला जात नसे. पूरक अन्न म्हणून मला दूध, पाव देत असत. पण वासना होत नव्हती. भाजीचे किंवा डाळीचे पाणी हाच अन्नांश मला घ्यावासा वाटे.

दि. ३१-८-१९६२ ला रात्री प्रकृती अधिक बिघडली. दुसऱ्या दिवशी मला बंदिगृहाच्या रुग्णालयात उचलून न्यावे लागले. रुग्णालय शेजारच्या प्रशालांत (बॅरकमध्ये) होते. पण तेवढे चालण्याची शक्ती नव्हती. गेले तीन-चार दिवस अन्न जवळ जवळ पोटात गेलेच नाही.

मला कावीळ झाली होती. यकृत बिघडले होते. सिव्हिल सर्जन एरवीही आठवड्यातून एकदा किंवा कधी दोनदा बंदिगृहात येत. त्यांचा माझा परिचय झाला होता. मला तपासण्यासाठी त्यांना बोलावणे गेले होते.

रोगनिदान करण्यास आणि उपचार ठरविण्यास सहाय्य व्हावे म्हणून त्यांनी माझ्याकडूनही काही प्राथमिक माहिती घेतली. आणखीही काही बोलणे झाले. मी सुसंबद्ध बोलतो आहे की नाही, मेंदू कार्यक्षम आहे की नाही, माझ्या पराजयाचा मनावर कितपत परिणाम टिकून आहे हे बघण्याचा त्यांचा हेतू असेल. केव्हापासून खाऊ नये असे वाटू लागले ? कोठा स्वच्छ राहतो का ? त्रास होतो का इत्यादी प्रश्नांनंतर काही बोलणे झाले. मध्येच त्यांनी मला विचारले,

'पहिल्याने वजन किती होते ?'

'सहा पौंड.' मी सांगितले.

कदाचित माझा शब्द सुटला आहे म्हणून त्यांनी सूचक सुधारणा करून विचारले, 'एकशे सहा'

'नाही, नुसते सहा'

त्यांच्या लक्षात आले ! ते हसले. माझी कल्पना आहे, त्यांना बरे वाटले. मनाची खेळकर वृत्ती रोगनिवृत्तीला सहायक होते हे ते जाणत होते. मी दंडित खरा; पण परिचयानंतर अधिकारी मला बरोबरीच्या नात्याने वागवीत; अगदी त्यांच्यावरच माझ्या आक्षेपांचा आणि भांडणाचा रोख असला तरीही. एरवी मीही कोणाशी तसा खेळकरपणे आणि मोकळेपणे बोलू शकलो नसतो. डॉक्टरांनी मला सुधारून प्रश्न विचारला, 'तुम्ही औरंगाबाद बंदिगृहात आलात तेव्हा वजन किती होते ?

'एकशेपंचवीस' मी सांगितले, 'इतिहासपत्रिकेवर नोंदले आहे पाहा.'

'बाहेर काय सवयी होत्या ?' पुढचा प्रश्न.

मी हसलो.

'का ? हसलात का ?'

मी म्हटले, 'डॉक्टर, आज चौदा वर्षे मी रात्रंदिवस कोंडून पडलो आहे ! माझी प्रत्येक हालचाल कोणत्या ना कोणत्या नियमात होत आहे. बाहेरची कोणती सवय आता टिकून राहिली असेल ? यापुढे कधी सुटलोच तर सतत कोंडीचा परिणाम म्हणून आतल्याच सवयी मी बाहेर घेऊन जाण्याची पाळी येईल, इतका मी मुरलो आहे. बाहेर इकडे तिकडे वावरताना माझ्या चटकन मनात येईल, अरे आपला प्रशालरक्षक - वार्डर - कुठे आहे ? आरक्षी कुठे आहे ? आपण एकटेच कसे चाललो आहोत ? मी जसा पळून चाललो आहे असे कोणाला तरी वाटेल, असे माझ्याच मनात येईल. मी क्षणभर थांबेन, वळून बघेन ! पत्नीने तिच्या कल्पनेप्रमाणे सुग्रास अन्न करून माझ्यापुढे ठेवले तरी मी तिला बहुतेक सांगेन, असली कसली भाजी केलीस ? भाजीला कसा रापदार रंग पाहिजे. तेल आणि तिखट भाजीत नको घालू, पुस्तकावर लिही; म्हणजे भाजीला चव येईल. आणि याला का भात म्हणतात ? चांगला चिखल कर आणि त्याच्या पिंडासारख्या मुदी कर !' डॉक्टर, कोणती सवय मी टिकवून ठेवली असेल सांगा ? नाही म्हणायला श्वसन मात्र मी अगदी बाहेर करीतअसे तसेच अद्यापही करतो ! तीही सवय थोड्याच दिवसात मोडेल असे वाटते.'

'तुमची सवय तशीच चालू ठेवण्याची माझी धडपड राहील. तुम्ही फार लिहीत असता असे मला समजले आहे. न्यायालयातील भांडणातून थोडे दिवस मोकळीक घा. चांगले बरे व्हा. मग तुम्ही, शासन आणि न्यायालय बघून घ्या एकमेकांना !' डॉक्टरांनी धीर देण्यासाठी हे शब्द उच्चारले आणि ते निघून गेले. लिहू नका असे त्यांनी मला सांगितले असले, तरी बहुधा त्यांनी अधिकाऱ्यांना सांगितले होते, लिहिण्याची साधने त्यांच्याजवळ ठेवा, तो त्याच्या मनाला निरुपद्रवी विरंगुळा राहील.

डॉक्टर उपचार करतील, मनापासून करतील, औषधयोजनेत न्यून ठेवणार नाहीत हा माझा विश्वास होता. पण इतके असूनही मृत्यूनेही एक हातचा ठेवलेला असतो आणि तेथे डॉक्टरांचे उपचार अपुरे पडतात, हेही मला ठाऊक होते. मला सारखे वाटे, एक आवेदन सर्वोच्च न्यायालयापुढे सतत असावे. त्या अवधीत मृत्यू आला तर त्यानंतर तरी त्यांना बघता यावे, माझे गाऱ्हाणे निरर्थक नव्हते, शासनाने माझ्याशी क्रूरपणा केलेला होता. दोन आवेदनात मी अगदी थोडा अवधी ठेवू लागलो. तो अवधी अटळ असे. कारण प्रारूप करण्यात दोन दिवस, टंक होण्यात तीन-चार दिवस आणि शपथपत्रकांसाठी तीन-चार दिवस लागत ! मध्येच आपण गचकतो की काय अशी तेव्हा मात्र मला भीती वाटे !

प्रकृती बरी नसल्याची घरी सूचना गेली होती. पत्नी आणि मुली दिनांक ६-९-१९६२ च्या दिवशी मला भेटण्यास आली.

'मी बरा होईन असे मला वाटते. पण त्यापेक्षा महत्त्वाची गोष्टी म्हणजे सर्वोच्च न्यायालयात एक आवेदन विचारासाठी असले पाहिजे अशी माझी इच्छा आहे.' तुला कळविल्याबर तू लगेच येथे ये, तेथूनच टंक करून आण म्हणजे विलंब टळेल.' असे मी पत्नीला सांगितले. तिला मी म्हटले, 'जे आयुष्य आपण एकत्र घालविले तेवढेच आपले सुख. आपला जन्म अधिक सुख अनुभवण्यासाठी नसेलही आणि असेल तर आपण ते सुख नाकारणार का आहोत ? पुढचे मला ठाऊक नाही. तुलाही ठाऊक नाही. आयुष्य हा प्रश्न गौण मानून आपण हाती घेतलेला प्रश्न बेळी प्राणांतापर्यंत धसाला लावण्याची खटपट करण्यातच आपण समाधान मानू या ! माझे एक आवेदन न्यायालयापुढे आहे. पण कदाचित ते परत येईल अशी मला शंका येते. त्या गृहीताने मी पुढचे आवेदन लिहिण्यास घेतले आहे. हे बघ.'

मी पत्नीला त्या आवेदनातील विधाने त्रोटकपणे सांगितली. तिचा आणि मुलांचा निरोप घेतला, आमची भेट संपली. प्रकृतीला जपून राहा असे पुन्हा पुन्हा बजावत घरची मंडळी परतली. निघताना अश्रुपात नव्हता. पण त्यांची अंत:करणे जड होती हे दिसत होते.

आवश्यक ते सर्व उपचार आम्ही करीत आहोत असे अधिकाऱ्यांनीही घरच्या मंडळींना आश्वासन दिले. त्यांचे आश्वासन खरे होते.

कावीळ झालेले आणखी काही बंदी रुग्णालयात होते. मला मिळणारी औषधे त्यांना मिळत नव्हती, उपचारांतही काहीसा पक्षपात होता असे मला दिसले. मी अधीक्षकांच्या दृष्टोत्पत्तीस ती गोष्ट आणली. त्यांनी चौकशी केली. निधी (Fund) अपुरा असल्याने तसे होत असल्याचे त्यांना दिसले. अधीक्षकांचा चांगुलपणा असा की, आपल्या विशेष अधिकाराचा वापर करून त्यांनी मला दिली जाणारी औषधे त्या बंधांसाठीही आणवली. तुमच्यापुरते तुम्ही बघा असे ते मला म्हणाले नाहीत.

माझी बरे होण्याची प्रगती मंद होती. रुग्णालयात पडूनच मी औषधपाणी घेत होतो. ऑक्टोबर (१९६२) च्या उत्तरार्धात हिन्दुस्थानात खरोखरीच धक्का देणारी घटना घडली. ती म्हणजे चीनची ईशान्य सीमेवरील धडक. आपापसातील सर्व वाद दूर ठेवून सर्वांनी कंबरा कसून प्रथम आक्रमण थोपवावे अशी सहजप्रवृत्ती होण्याचा तो प्रसंग होता. दिनांक २८-१०-१९६२ ला आणीबाणी घोषित केली गेली होती.

दुसऱ्या महायुद्धात ब्रिटिशांनी बंधांचेही एक पथक उभारले होते आणि ते आघाडीवर धाडून त्यांच्याकडून युद्धोपयोगी कामे करून घेतली होती. उर्वरित शिक्षेची बंधांना सूट दिली होती. आघाडीवर असताना मी ते सर्व पाहिले होते. बंदिगृहातील विशिष्ट वर्गाचे बंदी निवडून

त्यांचा उपयोग केला जावा, अशी योजना मी शासनाकडे मांडली.

बंधांचा उत्साह अमाप होता. ते मला भेटत. काय करता येईल म्हणून विचारीत, रक्तदान आणि द्रव्यदान करण्याची अनुज्ञा अधिकाऱ्यांकडून सध्या मिळवा असे मी सुचवीत असे. आपणास आघाडीवर धाडले तर आपल्याला स्वतंत्रपणा मिळेल, बंदिवास संपेल, असा त्यांच्या मनात विचार असेलही. पण येथे निष्फळ खितपत पडण्यापेक्षा प्रसंगी प्राणार्पणानेही आपण आपल्या देशाची सेवा करू ही त्याच्यातली प्रामाणिक भावना होती. मी धाडलेल्या योजनेला प्रतिसाद मिळाला नाही.

पूर्वी एका लेखात सांगितलेच आहे, मनाला काहीतरी चाळा म्हणून ओळी जुळविण्याचा छंद मला लागला होता. मनातील भावना ओसंडू लागल्या म्हणून त्या कागदावर उतरवाव्यात, गद्यात लिहिण्यापेक्षा पद्यात लिहावे अशी अनेकदा ऊर्मी येई. मी आजारी होतो. धामधुमीच्या युद्धप्रसंगी प्रत्यक्ष करण्यासारखे मजजवळ काहीच नव्हते. क्षात्रवृत्त भारत रणाला चालला आहे आणि मी बंदिगृहात अंधरुणात खिळून आहे, या दुर्दैवाची उद्‌विग्नता मनाबाहेर वाहू लागली. 'क्षात्रवृत्त भारत' या कवितेच्या शेवटी मी लिहिले होते -

हवनाची मजला नाही -
संधि; चित्त अश्रू वाही;
पाय बांधलेला राही लोहकोंदणाला !
क्षात्रवृत्त भारत अवघा चालला रणाला । (१-११-१९६२)

पंडित नेहरूंचे त्या दिवसातील विचार वाचून मनाला बरे वाटे. शस्त्रास्त्रांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही, ज्याला मित्र म्हणून आपण आंधळ्या विश्वासाने समजतो तो खरा मित्र नसतो, आपण जागरूक राहिलो नाही हा आपला प्रमाद आहे, असे अनुभवातून निघालेले त्यांचे बोल राष्ट्राला 'भाई भाई' च्या स्वप्निल वातावरणातून भूतलावर आणतील अशी मला आशा वाटे.

थोड्याच दिवसांत एकपक्षीय शस्त्रबंदी झाली होती. त्यातही आपला पराजय होता.

आम्ही आपण होऊन प्रहार थांबवीत आहोत असे म्हणून शत्रूने आपणास जणू उपकृत केले होते ! पराजयाचे घाव आपण चाटत होतो आणि त्याच वेळी सामर्थ्याबाचून विश्वशांतीच्या कल्पना भाकड ठरतात हे आपणास पटू लागले होते.

दिनांक १९-११-१९६२ ला मी रुग्णालयातून उन्मुक्त म्हणजे Discharge झालो. नाडी मध्येच शीघ्र चालणे, हातापायांना कंप असणे, असे विकार राहिले होते म्हणून मी वैद्यकीय नियंत्रणात वा पथ्यावर होतो. आणखी दोन महिन्यांनी मी आपल्या कोठडीत आलो.

रक्तदानाची मागणी अद्यापही होती. जूनच्या मध्यात रक्तपेढी येणार आहे असे मला कळले. रक्त देण्यासाठी मी नाव नोंदवले. आणखी तीस-पस्तीस बंदीही होते.

रक्तदान आणि सूट या विषयात मी वाद घेत राहिल्याने माझ्या रक्तादानात व्यत्यय येईल असे मला वाटले. अधिकाऱ्यांना प्रत्यक्षपणे न बोलता मी बंधांच्या सर्वसामान्य मालिकेतच माझे नाव सरकवून दिले होते. दिनांक १८-६-१९६३ ला मी रक्तदान केले.

बंधांनी सूट किंवा पैसे अशी निवड रक्तदानाच्या प्रतिपादनासाठी केली होती. मी दोन्ही नको म्हटले होते. रुग्णालयाच्या कर्मचाऱ्यांनी अधिकाऱ्यांना माझे नाव विशेषत्वाने दाखविले ते त्या कारणासाठी !

माझ्यासाठी म्हणून विशेष पहारा ठेवलेला. त्यात मी अथाप पथ्यपाण्यासाठी डॉक्टरांच्या निपंत्रणात असलेला. तेव्हा मी रक्तदान करणार आहे हे बंदिगृहाच्या अधिकाऱ्यांपैकी कोणीच आधी पाहू नये याने वरिष्ठ अधिकाऱ्यांना कोसळल्यासारखे वाटले ! उद्या मी न्यायालयात वाद घातला की अमुक अधिकाऱ्यांनी मला खरी सूट मिळवून देतो असे आश्वासन दिल्याने मी रक्त दिले, तर काय करायचे ? अधिकाऱ्यांचा थरकाप उडाला.

मला त्यांच्या भीतीची कल्पना होती. खरोखरीच, स्वतःचा लाभ साधण्यासाठी कोणा अधिकाऱ्यांचा बळी घावा अशी माझी कल्पनाही नव्हती. अधीक्षक मला भेटले. त्यांच्याशी मी बोललो. 'हे रक्तदान विना-प्रतिदान' आहे; याविषयी कोणताही अधिकार मी कधी सांगणार नाही. देशरक्षणासाठी अनेकांनी प्राण अर्पण केले आहेत ते प्रतिपादनाच्या अपेक्षेने नव्हे. मी नुसते रक्तदानच केलेले आहे, आणि करीत राहणार आहे. कारण सध्या मला दुसरे काही करता येत नाही. आपल्याच देशासाठी केलेल्या या लहानशा कर्तव्यासाठी मी देशाकडून अपेक्षा ती काय करू ? व्यक्तीचे जीवित गौण समजले जाऊन देश समर्थ केला जावा अशी इच्छा आहे.'

पुढे अधिकारी जागरूक असत. प्रत्येक चार महिन्यांनी रक्तदान करण्यास मी नाव देत असे. 'विना-प्रतिदान' म्हणून मला अनुज्ञा मिळू लागली. रक्तदान करण्यापूर्वी माझी वैद्यकीय परीक्षा केली जात असे. शोणवर्तुलीचे प्रमाण म्हणजे Hemoglobin किंवा H B Percentage चिकित्सक बघत असत. वैद्यकीय दृष्ट्या अक्षम किंवा unfit ठरेपर्यंत मी रक्तदान करीत राहिलो.

सर्वोच्च न्यायालयातील माझी आवेदने कधी फेटाळली जात होती, कधी परत येत होती. १९६३ च्या मध्यापर्यंत हा क्रम चालू होता. ५ ऑगस्ट १९६२ ला न्यायालयाने बोलावले होते. मी गेलो होतो. पराजयाच्या माळेत आणखी एक फूल मी गुंफले होते.

सप्टेंबरच्या मध्यात अधीक्षक बदलले होते.

आजारीपणातून उठल्यावर मी काम करणार नाही, अशी सूचना मी अधिकाऱ्यांना दिली होती. काळ्या पाण्याचा बंदी सीमेबाहेर धाडला जाईपर्यंत सश्रम कारावासी समजावा

असा विधी होता. काळे पाणी १९५६ मध्ये बंद झाले, आजन्म निष्कासन याचे रूपांतर आजन्म बंदिवास असे झाले आणि त्याचे रूप आजन्म सश्रम बंदिवास झाले. बाहेर जाण्याचा अधिकारच नाही म्हटल्यावर काम केले काय आणि नाही केले काय सारखेच. काम केल्याने सूट मिळते, पण इतिहासपत्रिकेवर कुजत चाललेल्या सुट्टीचा प्रेतदहनासाठी लागणाऱ्या काडीइतकाही उपयोग नाही हे बघितल्यवार ती खोटी शेखी कशाला मिरवायची ? मी बरा झालो होतो. हलके काम करता येईल असे चिकित्सकांनी सांगितले होते. तरीही मला खरोखर कोणी कामाचा त्रास दिला नव्हता. पण मी काम करीत नाही असे दंडिताने म्हटल्याने अधिकाऱ्यांचा अधिकार डिवचला जातो. मला शासनाच्या वर्तनातील दंभ दाखवायचा होता. दिनांक १५-६-१९६३ ला मला कामासंबंधी विचारले. मी माझे निवेदन देत आहे म्हणून सांगितले. दिनांक १९-६-१९६३ ला एकाहत्तर पानी निवेदन अधिकाऱ्यांना दिले.

दिनांक १५-६-१९६३ ला माझी पत्नी भेटण्यास आली होती. अधिकाऱ्यांनी माझी विलक्षण कोंडी केली होती. मी भेट नाकारली. त्याची कारणे लिहून दिली. घरच्या मंडळींना परत धाडले. अधिकाऱ्यांच्या जिवावर आले पण माझी मनःस्थिती नीट ठेवली गेली नव्हती. मी घरी पत्रे धाडण्याचेही बंद केले होते. कारण अलीकडे प्रत्येक पत्रात काटछाट होऊ लागली होती. पत्रे अडविल्याचे मला कधी कधी पस्तीस दिवसांनंतर कळवीत असत.

कामासंबंधीच्या निवेदनाचा विचार करण्यास शासनाने पाच महिने घेतले. विचार काय केला तर सूट दिली जाते ती देऊ नका ! निर्णय सयुक्तिक होता, पण सुट्टीची परिणती शिक्षेच्या लघुकरणात होणार असती तर ! प्राणावर डोळा ठेवल्यावर सूट देणे आणि ती खोटी पाडणे म्हणजे दुःखावर डागण्या देण्यातला प्रकार होता. झाली एवढी फसवणूक पुष्कळ झाली, आता प्राण राहिले आहेत ते शासनाला सुखेनैव गिळू देत अशा स्थितीत मी गेलो होतो.

लहान लहान गोष्टीतही माझ्यावर चमत्कारिक बंधने येऊ लागली होती. नियमाच्या कक्षेचे भूत उभे करून पत्रे अडविणे चालूच होते. कोणा बंद्याशी बोलू न देणे, एकटेपणाची पराकोटी करणे. आपण अन्न देत आहोत हेच जणू उपकार आहेत असे भासविणे, आतल्या आतही जणू मला बांधून फिरवायचे आहे अशाप्रकारे माझ्याभोवती आरक्षी घुटमळत ठेवणे अशा गोष्टींनी माझे मनःस्वास्थ्य कोठल्या कोठे गेले होते. धर्मांतर न स्वीकारल्याने तापल्या तव्यावर ठेवून ठार मारल्याची उदाहरणे आपण इतिहासात वाचतो. माझ्या मनात येई, तापल्या तव्यावर तडफड होईल ती या मानाने फारच अल्पकाळ असेल. थोड्या वेळात तो मनुष्य अचेतन किंवा बेशुद्ध होईल, पुढील यातना त्याला कळणार नाहीत आणि मृत्यू येईल. माझी ही दीर्घकाळची तडफड अधिकाऱ्यांना बघवते तरी कशी !

मग मी विचार केला. शासन ही मनुष्यांनीच नियंत्रित केलेली एक अदृश्य शक्ती असते. माणसे बदलत असतात पण शासन ध्रुव असते. कधी नळी बदलली असेल तर कधी भांडे. पण ही गुडगुडी आमच्या पणजोबापासून चालत आलेली आहे असे सांगतात तसे ! एकच अधिकारी सतत आहे, त्याच्यासमोर तोच बंदी आहे असे झाले तर काही मर्यादेनंतर त्या अधिकाऱ्याला त्या बंद्याच्या वेदना बघवणार नाहीत. गांधीहत्या अभियोगातील आम्हा संशयितांकडून माहिती काढून घेण्यासाठी आरक्षी दलाने त्यांच्या शक्तीतील उपाययोजना केली. पण त्यांचे काम झाल्यावर हातात दंडा आहे म्हणून दणका द्यायचा आणि आरोपीचे विव्हळणे बघत बसायचे, असे त्यांनी केले नाही. कोणाही सुसंस्कृत मनुष्याला मग तो आरक्षी अधिकारी असो, काराधिकारी असो, सचिव असो की मंत्री असो, आपल्या समोर कोणाची सतत चाललेली तडफड बघवणार नाही. न्याय करायचा नाही, प्रतिशोध घ्यायचा, सूट सडवायची हे धोरण वरिष्ठांनी ठरविले, त्याचे कारण बंद्याची तडफड त्यांच्या समोर होणार नव्हती. आपली बदली होईल हा अधिकाऱ्यांचा विश्वास असे, त्यामुळे ते तेवढी वेळ मारून नेत. व्यक्तिशः त्यांच्यात सहृदयतेचा लोप झालेला असे असे नव्हे. माझ्या तडफडीमुळे काहींची सतत झोपमोड होत असलेली मला ठाऊक आहे; पण ते खाकी गणवेशात घुसले की आपण यंत्र आहोत, यंत्राचा एक भाग आहोत, मनुष्य नाही ही त्यांची भावना होई आणि तसे वर्तन होई.

सुटीचा संबंध न आणता दिनांक ९-२-१९६४ ला मला १५ वर्षे पूर्ण झाली होती. त्यामुळे सहा महिने माझे प्रकरण शासनाकडे धाडले गेले होते. १५ वर्षे होताच मला सोडायचे नव्हते तर निदान त्या दिवशी माझ्या सुटकेचा अंतिम दिनांक तरी सांगायला पाहिजे होता. पण त्याने मृत्यूच्या दोराखाली बंद्याला परस्पर तडफडत ठेवण्याच्या आनंदापासून ते वंचित झाले असते. पण माझा असा ग्रह झालेला आहे की त्या त्या वरिष्ठात भरपूर शिक्षितता असेल, पण सुसंस्कृतता नव्हती. तसा अंतिम दिनांक सांगितला असता तर माझ्या घरच्या मंडळींच्या मनाला तात लागलेली होती त्यातून त्यांना काहीसा अवभार मिळाला असता. शासनाने ते केले नाही.

माझ्या सुटकेनंतर म्हणजे १९६४ च्या नोव्हेंबरमध्ये सत्यनारायणाच्या समारंभात झालेल्या भाषणाचे निमित्त करून काही लोकांनी कोलाहल केला, 'गोडसे प्रवृत्ती मोकाट सुटली आहे !' कोलाहल करणारे लोक न्यायाधीश आहेत अशी धारणा करून घेऊन शासनाने खरेखोटे न बघताच अनेकांवर भारत संरक्षण विधीखाली निरवधी बंदिवास लादला. सतरा वर्षे सडत पडल्यावर पुन्हा निरपराध असूनही भितीआड मला वर्षभर राहावे लागले. माझ्या शिक्षेचे कार्यवहन शासनाने कसे केले होते याचे त्या कोलाहल करणाऱ्या लोकांना तेव्हा ज्ञान नव्हते. ते असते तर त्यांना माझ्याविषयी सहानुभूती वाटली असती आणि त्यांनी खोटा

कांगावा केला नसता. आता त्यांना त्यांची बागणूक तपासून बघता येईल, माझ्या प्रत्येक कथनाची सत्यासत्यता त्यांना शासनाला विचारता येईल. शासनाचे वर्तन साध्या मनुष्यतेलाही किती अशोभनीय होते हे त्यांना दिसून येईल. असो.

जीवनाविषयी मला उदासीनता येत होती. संघर्ष चालू होता, पण मनाचे संतुलन यापुढे कितपत टिकेल असे सारखे वाटत होते. जाचणुकीला त्रासल्याने मी एक दिवस सूचना दिली, दिनांक १६-४-१९६४ पासून मी आपल्या पापांनी कोठडीत बंद होणार नाही. अशी छळणूक करून कोठडीत मला जायला सांगून माझे प्रेत करून टाकायचे आता आपले कर्तव्य उरले आहे. आपले काम आपणच करा. मी सहकार्य देणार नाही. वधस्तंभाकडे जो चालत जात नाही त्याला उचलून नेतात.

माझा निषेधाचा प्रकार तांत्रिक असला तरी त्याचे कार्यवहन खरे करण्याचे होते. पुस्तकावर नव्हे. बंदीच्या वेळी मी कोठडीबाहेर बसून राहिलो. प्रशालरक्षक किंवा वॉर्डर म्हणजे बंधालाच बढती देऊन अंतर्गत प्रबंधाला सहाय्य करण्यासाठी केलेला अधिकारी : बेगळी टोपी आणि पट्टा त्याला दिलेला असतो. माझ्यावरचे जे दोन प्रशालरक्षक होते त्यांनाच मला उचलून आत ठेवण्यास सांगितले. त्यांनी नकार दिला, 'आम्ही प्रेत उचलून इकडचे तिकडे ठेवू, कोणी आपल्या अंगावर येते आहे, दुसऱ्या कोणा बंद्याच्या अंगावर जात आहे असे दिसले तर त्या बंद्याला नियंत्रणात आणू, पण प्रेतवत केलेल्या बंद्याला प्रत्यक्ष प्रेतासारखे बागवून त्याचे प्रेत करण्यास सहाय्य करायचे काम आम्हाला सांगू नका. आम्ही अधिकारी असलो तरी बंदी आहोत. उद्या आमच्यावर अशी पाळी येईल. त्यातून आपले आरक्षी येथे आहेत, त्यांना उचलू दे, बंद्याने उचलून घेण्यास विरोध केला आणि शिपायांचे सामर्थ्य अपुरे वाटले तर आम्ही आहोच !'

आज्ञाभंग केला म्हणून त्या दोन बंद्यांचे अधिकारीपद काढून घेतले. न सुधारणारे बंदी असे त्यांचे वर्गीकरण करून त्यांना त्वरित रत्नागिरी विशेष बंदिगृहात धाडून दिले. अवखळ बंद्यांना शिक्षा म्हणून तिथे पाठवतात.

अधिकाऱ्यांचे प्रशालरक्षकांना ते काम सांगणे कसे अव्यवहार्य आणि चूक होते हे मी एका पत्रास पानी निवेदनात काराविभाग प्रमुखांना कळविले होते. कारण तो प्रकार माझ्यामुळे झाला होता.

दुसरे दंडित आणले आणि मला बंद केले. माझी सूट कापण्याचा सपाटा चालविला. अधिकृतपणे ज्याला मृत्यूची शिक्षा आहे त्याला सूट देताना मी तरी कधी पाहिले नव्हते. समजा, त्याला सूट दिली म्हणजे पुस्तकावर नोंदवून ठेवली आणि ती कापत राहिले तर त्याच्या शिक्षेवर काय परिणाम होणार ! अधिकाऱ्यांना मी सांगितले, 'मला बाहेर जायची इच्छा होती हे तुम्हाला दिसत होते म्हणून त्या माझ्या वर्मावर बोट ठेवून तुम्ही शासनाच्या

बतीने मला यातना देत होतात. आता तुम्हाला त्या वर्मावर बोट ठेवता येणार नाही. मृत्यूच्या मी फार जवळ आहे. कापलेली सूट बघून मृत्यू दचकणार आहे काय ? कर्तव्यदक्ष अधिकारी असाल तर शासनालाच त्यांचे विडंबन थांबविण्यास सांगा.'

दिनांक २०-६-१९६४ ला अधीक्षक नेहमीप्रमाणे माझ्या कोठडीकडे आले. गळ्याभोवती टॉवेल ठेवून मी दाराच्या चौकटीत उभा राहिलो. नवे प्रशालरक्षक माझ्या फार जवळ उभे राहिले होते.

अधीक्षकांच्या हाती मी एक कागद दिला. माझ्या गळ्यात अडकविलेल्या दोरीचे बेढे चौकटीच्या आड्याला कोयंड्याला अडकवले. सर्वांचे लक्ष माझ्याकडे असल्याने मला लगेच उचलले. दोरी सोडून घेतली.

एका दोरीचा फास करून मी गळ्यात अडकवून ठेवलेला होता. पहारेकरी सारखे माझ्यावर पाळत ठेवून होते म्हणून शौचकुपात मी ती योजना केली आणि टॉवेल गळ्याभोवती ठेवून बाहेर आलो होतो.

माझ्या उद्दीपनाने सर्वजण स्तिमित झाले होते. मला बसवले. अधिकारीही बसले. मी त्यांना शांतपणे सांगितले, 'हा लबाडमा भोवती असताना कोणी मला फाशी घेऊ देईल ही शक्यता नाही. मी या स्थितीला पोचलो आहे हे आपल्या प्रत्यक्ष लक्षात यावे म्हणून हे केवळ नाटक केले आहे. आपण अधिक गळचेपी करू बघाल तर मी माझी सुटका करून घेईन आणि प्रेतच आपल्या हाती लागेल. आपले कोणतेही आणि कितीही पहारेकरी मला अडवू शकणार नाहीत. आपणाला प्रचीती बघायची असेल तर मी दाखवीन. पण केवळ त्या प्रयोगासाठीच आपण माझे प्राण घ्याल. पण माझी सिद्धता आहे.'

माझ्यावरील बंधने ढिली केली गेली होती.

अधून मधून काही हिसके बसत. बाटे आता जगणे पुरे झाले. आपण प्रयत्न केले, चालू आहेत, पण त्यांना यश येणे नाही. हिसके बसत. त्यातला एखादा वेगळा केला तर तेवढे निमित्त आत्महत्येस पुरे होते असे कोणासही वाटणार नाही. पण हा सतत चाललेला कोंडमारा अधिक तो हिसका हे बघितले तर सहनशक्ती संपणे स्वाभाविक होते असे कोणीही अनुमान करील.

मन कार्यक्षम आणि शांत असलेल्या एके दिवशी म्हणजे दिनांक २४-७-१९६४ ला मी अधीक्षकांना एक पत्र दिले. 'माझ्या मनाच्या एकात्मतेवर आता माझा विश्वास नाही; काहीतरी निमित्त होईल आणि मी जीवन संपवेन असे वाटते. त्यावेळी कदाचित काही लिहून ठेवण्याइतपतही मी थांबणार नाही.

'मृत्यूला मी समोर बघत आहे. तो मला भेडसावत नाही. या उच्च पातळीवर मी उभा असताना आपणाविषयी किंवा आणखी कोणाविषयी द्वेषभावना मनाला शिवत

नाही.

'माझा तसा मृत्यू झालाच तर आपणास संरक्षण मिळावे म्हणून या पत्राचा उपयोग करावा. अशा मृत्यूसाठी कोणाला तरी दोषी धरले जाऊ नये. माझी ही स्थिती करण्यास नेमके कोण कारणीभूत झाले, हे ठरविणे अशक्य असल्याने सर्वजण संशयाच्या लाभाचे अधिकारी आहेत.

'मी व्यक्त केलेल्या भावनांवर म्हणजे मला जीवन संपावेसे वाटते या विधानावर आपण विश्वास ठेवलाच पाहिजे असा आग्रह नाही. काहीच झाले नाही तर माझे विधान खोटे होते असे आपण निःशंकपणे समजावे.

'तोवर आपण मला नुसता मनमोकळा (frank) समजावे आणि तसा मृत्यू आलाच तर प्रामाणिक समजावे. मृत्यूनंतर आपल्या संरक्षणासाठी हे पत्र वापरावे.'

पत्र मोठे आहे. प्रस्तुत विषयापुरता वरील सारांश पुरेल.

अधिकारी मला भेटले. मला परावृत्त करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. मी सांगितले, आता परावृत्त करण्यात काही स्वारस्य नाही. कारण या घटकेला तरी मी हातात दोर घेऊन उभा नाही. आणि अधिकारी या नात्याने आपण मला परावृत्त करीत असाल तर मी एवढेच समजेन की, मला अधिक जिवंत ठेवण्याने मला छळण्याचा आनंद आपणास मिळतो म्हणून ही मनधरणी आहे. आपणास थोडी जरी सहृदयता असेल तर माझ्या मृत्यूने मी माझ्या यातना संपवून घेतल्या आहेत याने आपणास समाधान वाटले पाहिजे. ज्यांच्या हातात सुटका होती, त्यांच्याकडे माझ्या शिक्षेचे कार्यवहन का नाही सोपवले ? फसवणुकीचे पाप असेल तर ते आपल्याला असणार आहे, ते त्यांच्या वाट्याला गेले असते.

'काय होणार आहे मला ठाऊक नाही. आपल्या कल्पनेप्रमाणे काही अनिष्ट झाले तर माझे पत्र आपल्या संरक्षणाला राहीलच. मी स्वतःच्या घराचा उन्हाळा करावा आणि दुसऱ्या कोणाला कुठे खुपते आहे का याचा विचार करून जिवंतपणी प्रत्येक घटकेला मरणप्राय वेदना सहन कराव्यात याची मर्यादा केव्हा संपेल ते मी काय सांगू ?'

आमची भेट संपली.

कधी मला अन्याय तर दिसत असे. तो अन्याय कसा आहे हे सांगण्याची योजनाही मनात असे. पण ते कागदावर उतरवण्याची शक्ती राहात नसे. विवशतेमुळे मी ते अपमानित जिणे सहन करीत असे.

卐 卐

सोळा

पुन्हा प्रकाश

अतिशय अडचणीच्या परिस्थितीत आणि व्यग्र मन:स्थितीत असूनसुद्धा माझे सर्वोच्च न्यायालयातील प्रयत्न चालू होते. मला वाटते जीवनाची इच्छा मोठी चिवट असते. मेंदूचा चुराडा झाल्यावरही काही वेळा शरीराचे अवयव झटपटत असतात. त्यात मला वाटते, जाऊ घातलेले प्राण वाचविण्याची अंतरीची इच्छा कार्यान्वित होत असते. मला वाटते माझा मेंदू अद्याप धड होता.

औरंगाबाद बंदिगृहातून दि. २६-५-१९६४ या दिवशी मी एक प्रारूप टंक करून आणण्यास दिले होते. दुसऱ्या दिवशी म्हणजे दि. २७-५-१९६४ ला पंडित नेहरूंचे निधन झाले होते. दोन दिवस व्यवहार बंद होते. कागद परत येण्यास स्वाभाविकच उशीर झाला.

सिंधूने-माझ्या पत्नीने सर्वोच्च न्यायालयाच्या एका वकिलाची गाठ घेतली होती. त्यांनी आवेदन करण्यापूर्वी प्रारूप दाखविण्यास सांगितले होते. आवेदन चालविण्याचीही त्यांची इच्छा असावी.

पूर्वी निर्णय झालेला प्रश्न पुन्हा उपस्थित करायचा झाला तर त्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या वकिलांचे अनुमोदन लागते. त्याला तीस दिवसांचा कालावधी असतो. कालावधी उलटला आहे म्हणून न्यायालयाची विशेष अनुज्ञा घ्यायची आणि पूर्वीच्या प्रश्नाची पुन्हा मांडणी करायची असा माझ्या मनात विचार आला. कोण्या वकिलाचे सहाय्य तेवढ्यासाठी मिळत असेल तर ते मला हवे होते. मी टंक करून आणलेल्या प्रारूपाची एक प्रत सिंधूच्या माध्यमाने वकिलांकडे धाडून दिली. वेळ होता म्हणून एक प्रत माझे दिल्लीचे परिचित वकील लाला गणपतराय यांनाही धाडून दिली.

मी आता घरी पत्रव्यवहार चालू ठेवला होता. साधारणपणे एक वर्षाच्या खंडानंतर भेटीही येऊ लागलो होतो. काही पत्रव्यवहारानंतर मला त्या नवीन विधिज्ञांचा निर्णय कळला,

'प्रारूपात विचार करण्यासारखे काही नाही, मला प्रकरण घेता येत नाही !'

प्रत्येकाची आपापली धारणा असते. वकिलांना काही कळत नाही असे मला वाटले नाही. वकील आणि न्यायमूर्ती यांच्यात मतभेद होऊ शकतो. इतकेच काय, दोन न्यायमूर्तींतही मतभेद होतात. एक न्यायाधीश सुबुद्ध आणि दुसरा निर्बुद्ध असे आपण अनुमान काढीत नाही. मात्र वकिलांच्या मागे लागल्याने आवेदनाला विलंब झाला याचा मला खेद वाटला. 'प्रकरण घेता येत नाही' हा निर्णय मला विनाविलंब कळण्यास हवा होता.

मला माझ्या वादावर आणि विधानावर विश्वास होता. लाला गणपतराय यांनी काही सुधारणा मला सुचविल्या होत्या. मला ग्राह्य वाटल्या त्या सुधारणा मी प्रारूपात केल्या. प्रारूप नीट लिहिले, अनुमोदनाची अडचण नाहीशी केली. कारण आता 'त्याच प्रश्नाची पुन्हा तपासणी' असे स्वरूप मी ठेवले नाही आणि आवेदन टंक करून घेतले. दिनांक १४-८-१९६४ ला शपथपत्रक केले.

आवेदनाच्या एका भागात मी सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय कसा दोषपूर्ण आहे हे दाखविले होते त्यासाठी काही प्रमाणे दिला होती. मात्र तोच प्रश्न पुन्हा तपासायचा की नाही हे न्यायालयावर सोडले होते.

दुसऱ्या भागात मी काही मूलभूत प्रश्न उपस्थित केले होते. भारत संरक्षण विधीप्रमाणे नागरिकाचे मूलभूत अधिकार हिरावले गेल्यास त्याचा न्यायालयाकडे जाण्याचा अधिकार आणीबाणीच्या परिस्थितीत स्थगित केलेला आहे. तसे सर्वोच्च न्यायालयाने स्वत:च दिलेला एक निर्णय हेच प्रमाण समजून, मला न्यायालयाचे दार बंद करण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहे काय? प्राड्न्याय म्हणजे Res Judicata या स्वरूपाच्या आवेदनाला आडवा येतो?

जन्मठेपेच्या बंद्याचे स्वातंत्र्य हिरावलेले असते असे न्यायालयानेही म्हटले आहे. दंडप्रक्रिया संहिता धारा ४०१ ही दयेच्या अधिकाराची धारा. जन्मठेपेच्या बंद्याच्या सुटकेची आज्ञा शासनाने कधीच काढली नाही तर बंद्यांचे स्वातंत्र्य नव्हे तर आयुष्य हिरावले जाणार. सर्वोच्च न्यायालयाने न्यायालयाचे दार बंद केले तर अशा बंद्याला संरक्षण काय ?

शासन अयोग्यपणे वागेल असे वाटत नाही अशी श्रद्धा न्यायालयाने व्यक्त केली आहे. अयोग्यपणे म्हणजे काय याची न्यायालयाच्या मनात काही व्याख्या असली पाहिजे. ओघानेच, माझा चालू बंदिवास योग्य की अयोग्य हे बघण्याचा भार न्यायालयावर पडतो.

आणखी काही विधाने मांडून मी म्हटले होते, माझी प्रार्थना मान्य करणे न्यायालयाच्या कक्षेत असते तर मी फाशी मागितली असती, कारण सध्या मला जी वागणूक मिळत गेली आहे त्यातून फाशीने निश्चित निवृत्ती मिळेल आणि झटकन मिळेल. परंतु न्यायालय संविधानाला उत्तरदायी आहे, त्याला मला फाशीतून म्हणजे फाशी देऊन अवभार (relief)

देता येणार नाही. मलाही संविधानाच्या कक्षेत न्यायालयाकडून मुक्तता मागता येते; फाशी नव्हे.

मी वरील आवेदन पूर्ण करीत होतो. त्या दिवसाच्या म्हणजे ऑगस्ट १९६४ च्या पहिल्या आठवड्यात मी आणि करकरे यांच्या सुटकेसंबंधी महाराष्ट्र विधानसभेत काही प्रश्नोत्तरे झाली. केन्द्रशासनच या बंद्यांची दयेच्या अधिकारातून सुटका करू शकते; त्यांच्या सुटकेचा दिवस राज्यशासन सांगू शकणार नाही, अशा आशयाचे उत्तर दिले गेले होते. श्री. नानावटी जन्मठेपेचे बंदी असताना जेमतेम चार वर्षे शिक्षा होताच त्यांना कसे सोडले या प्रश्नाला शासनाने कवचाचे संरक्षण घेतले, 'लोकहिताच्या दृष्टीने ते सांगणे योग्य होणार नाही.'

प्रश्न विचारणाऱ्या सभासदांना संपूर्ण माहिती नसे आणि ती पुरविणे मला शक्य होत नसे. शासन काही अर्धसत्ये पुढे टाकून सभासदांना कसे हातोहात चकवते हे बघून माझ्या मनावर परिणाम होत असे.

जुलै १९५२ मध्ये मुंबई शासनानेच आमच्या सुटकेचा दिनांक १०-२-१९६० हा दिला होता. पुढे चौदा वर्षांच्या प्रतिवृत्ताच्या वेळी याच शासनाने आधी दिलेला दिनांक गुंडाळून ठेवून १५ वर्षे प्रत्यक्ष भोगून घेण्याचे अभिमत केन्द्राला कळविण्याचा दुष्टपणा केला होता. तो गुप्त अभिलेखाचा कागद न्यायालयानेच एकदा माझ्या हाती देवबला तेव्हा या शासनाचा दंभ बाहेर आला होता. नियमापलीकडे जाऊन रात्रंदिवस खरे काम घ्यायचे, खरे रक्त घ्यायचे आणि खोटी सूट चढवून ठेवायची एवढाच शासनाचा अधिकार होता ! माणुसकी प्रगत होत होती ना !

मी उपरोधात्मक विचार करी. सुटकेचा दिवस राज्यशासन सांगू शकणार नाही हे खरे आहे ! माझा मृत्यू केव्हा हे त्यांना आधी कसे कळणार ? मृत्यू आल्यावर ते दयेच्या अधिकारात पत्नीला तार पाठवणार, 'तुमच्या पतीची शिक्षा पूर्ण झाली. त्याला येऊन जायला औरंगाबादला या' आणि ती आनंदाने वेडी होऊन बंदिगृहाच्या दाराबर पोहोचली की, 'सुटलेल्या' नवऱ्याला ते तिच्या स्वाधीन करणार ! दयेचा विशेष अधिकार वापरून शासकीय अधिकारी शासनाच्या वतीने आशीर्वादही देणार, 'नांदा सौख्यभरे !'

माझे आवेदनही दिनांक १८-८-१९६४ ला सर्वोच्च न्यायालयाला धाडले गेले होते. त्याला क्रमांक पडला Petition No. 106 of 1964. एक पायरी उलटली होती. पंजीकाराने ते ग्राह्य आवेदन म्हणून स्वीकारले होते.

दिनांक १५-९-१९६४ या दिवशी आवेदन सांविधानिक न्यायालयापुढे ठेवले गेले. सांविधानिक न्यायासन (Constitution Bench) न्यूनतम पाच न्यायमूर्तींचे असते. प्राथमिक श्रवण करण्याजोगे आवेदनात काही आहे काय आणि तसे असल्यास मला बोलवायाचे

काय यावर न्यायासनाने निर्णय करण्याचा होता. निर्णय अनुकूल पडला. आवेदनाने दुसरी पायरी ओलांडली होती. दिनांक २८-९-१९६४ हा पूर्वश्रवणाचा दिवस ठरविला गेला. त्याची सूचना मला औरंगाबादला दिनांक १८-९-१९६४ ला मिळाली.

दिल्लीला जाण्यासाठी मी औरंगाबादहून २३-९-१९६४ ला निघालो. तीन दिवस दिल्ली बंदिगृहात राहून दिनांक २८-९-१९६४ ला न्यायालयात गेलो.

वीस मिनिटे चर्चा झाली. न्यायमूर्तींनी आवेदन वाचलेले होते. पण धारा ४०१ म्हणजे दयेचा अधिकार ही धारा त्यांच्या मनातून हलेना. मी नेट धरला, मला दया नको आहे, माझे स्वातंत्र्य हिरावलेले आहे. ४०१ चा उलट वापर केला जाऊन मला मृत्यू आला तर मला न्यायालयात येता येईल का? दयेचा अधिकार म्हणजे क्रूरपणाचा अधिकार नव्हे. स्वातंत्र्यहरण म्हणजे जन्महरण नव्हे. जन्महरणाची वेगळी शिक्षा विधीत आहे. स्वातंत्र्यहरणाच्या शिक्षेचा उपयोग जन्महरणासाठी करणे विधीविरुद्ध होईल, क्रूर होईल.

या वेळी तरी न्यायमूर्तींनी मी पूर्वी स्वत: केलेल्या उपपादनासंबंधी (arguments) चांगले उद्‌गार काढले होते. पण ४०१ पुन्हा त्यांना खटकू लागला. कारण तो अधिकार प्रभारी शासनसंस्थेचा म्हणजे Executive Governemnt चा; आणि माझी शिक्षा जन्मठेप !

मी पुन्हा वाद मांडला, माझे स्वातंत्र्य हिरवलेले आहे. ते मिळविण्यासाठी मी जिवंत असतानाच मला खटपट करता येईल. शासनाने ४०१ चा वापर केल्यावर मी आपणाकडे येईन कशाला? शासन तो वापर करीत नाही आणि तोवर आपणही हे दार माझ्यासाठी बंद ठेवायचे ही आपल्या अधिकारातील गोष्ट आहे काय ?

न्यायमूर्तींनी आपापसात चर्चा केली. काही अनुकूल, काही प्रतिकूल असे होता होता तीन-चार मिनिटात त्यांनी एकमताने निर्णय घेतला, पूर्वश्रवणाच्या वेळी शासनाला उपस्थित राहण्यास सांगायचे. आवेदन तिसरी पायरी चढले होते.

दि. १९-१०-१९६४ हा पुढचा दिनांक ठरला. तोवर मला दिल्ली बंदिगृहात ठेवण्याचा आदेश दिला गेला.

आवेदन दि. २८-९-१९६४ ला न्यायालयापुढे आले आणि मी उपपादन केले त्या आधी दोन-तीन दिवस दिल्ली संसदसभेत श्रीमती शकुंतला परांजपे यांनी आमच्या सुटकेचा प्रश्न उपस्थित केला होता. 'सोडणे न सोडणे आमच्या इच्छेचा प्रश्न आहे' अशा अर्थाचे उत्तर शासनाने दिले होते. शासनाला दयेच्या अधिकाराचा अवरोध झालेला होता ! मी अक्षरश: वळवळत होतो, प्राण काही गेलेले नव्हते. तोवर शासनाला मला सोडण्याची इच्छा कशी होणार ?

मला वाटते, 'आमचा अधिकार, आमची इच्छा' असे शासनाचे वारंवार म्हणणे पडल्याने त्याचा परिणाम न्यायमूर्तींच्या मनावरही होणे असंभवनीय नव्हते. त्यामुळेच बहुधा

मी त्या त्या अधिकाराच्या मर्यादेची फोड सुस्पष्टपणे केली असूनही, मला वीस मिनिटे वाद घ्यावा लागला होता.

न्यायालयाच्या अनुकूल निर्णयाने मला थोडा हुरूप आला होता. हे माझे बाविसावे आवेदन होते. मी दिल्ली बंदिगृहात परतलो. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे तेथेच राहू लागलो.

हे बंदिगृह मुख्य दिल्लीपासून बारा मैलांवर तिहार या उपनगरात वसलेले आहे. १९५९-६० मध्ये ते जवळ जवळ १० लाख रुपये व्यय करून बांधलेले आहे. ते अती अद्ययावत (ultra modern) म्हणून ओळखले जाते. क्षेत्र विशाल आहे. आतही प्रत्येक विभागाला मोठमोठी आवारे आहेत. बंद्यांना झोपण्यासाठी कट्टे आहेत. त्याखाली त्यांच्या वस्तू ठेवण्याची सोय आहे. पंखा ही दिल्लीतील चैन नव्हे तर आवश्यकता आहे. पंख्याची सोय केलेली आहे. शौचकूप उद्‌धावन पद्धतीचे आहेत.

मध्यभागी एक उघडे नाट्यगृह आहे. बंद्यांना बसता यावे अशा प्रकारे अर्धगोलाकार उतरण आहे आणि समोर रंगमंच आहे. वाचनालय आहे. आकाशवाणी ऐकण्याची सोय आहे. दिल्ली परिसरात दूरदर्शन यंत्र आहे.

बंद्यांना अशा प्रकारच्या सुखसोयी उपलब्ध करून दिल्या तर अपराध प्रवृत्तीला आळा कसा बसणार, अपराध वाढणार नाहीत काय अशा आशयाचे विचार आपण अधून मधून वृत्तपत्रातून वाचतो. एक स्वतंत्र विषय म्हणून माझे त्या संबंधातील विचार केव्हा तरी मी मांडीन.

दिल्ली बंदिगृहात मी 'ब' वर्गात राहत असे. त्याचे कारण होते. बंद्याचे स्थलांतर करताना त्याचे अधिपत्र म्हणजे वॉरंट किंवा त्याची प्रत आरक्षी दलाबरोबर त्या दुसऱ्या बंदिगृहात धाडण्याची असते. मला 'ब' वर्ग दिला तो दिल्ली शासनाने. त्याची नोंद तेथल्या अधिकाऱ्यांनी माझ्या अधिपत्रावर १९४९ च्या मार्चमध्ये केलेली होती. अधिपत्रावर खाडाखोड करणे दंडनीय असते. त्यावरील लेखात संशोधन (amendement) करण्याचे असेल तर मूळ अधिकारी करू शकेल किंवा त्याचा वरिष्ठ.

मुंबई शासनाने मे १९५२ मध्ये आमचा 'ब' वर्ग तोडून 'क' वर्ग केला. महाराष्ट्र शासन दिल्ली शासनाला वरिष्ठ नव्हे. म्हणून त्यांनी अधिपत्रावर संशोधन केले नाही. दडपून आमचा वर्ग तोडला आणि तशी वागणूक दिली. अधिपत्राची खरी प्रत माझ्या स्थलांतराच्या वेळी दिल्लीला धाडली जात असल्याने त्यावरील 'ब' वर्ग अबाधित असे. दोन व्यक्तींना चेपण्यासाठी आपल्या शासनाने किती बनवाबनवीच्या लटपटी केल्या होत्या हे पाहिले म्हणजे कोणत्याही पक्षाच्या प्रामाणिक मनुष्याला धक्का आणि हादरा बसेल !

माझ्या आवेदनाला चार प्रतिवादी होते. महाराष्ट्र शासन, केन्द्र शासन, अधीक्षक औरंगाबाद कारा व प्रमुख आयुक्त म्हणजे Chief Commissioner दिल्ली. दिनांक २९-

९-१९६४ ला न्यायालयाच्या दि. २८-९-१९६४ चा आदेश टंक झाला. माझ्या आवेदनाच्या प्रतीसमवेत त्या आदेशाच्या प्रती त्या कार्यालयांना तीन-चार दिवसांत पोहोचल्या.

मला कल्पना करता येते, रेचक घेतल्याने पोटात ढवळावे तसे ते कार्यालय ढवळू लागले होते. सर्वोच्च न्यायालय कसली दाद घेते या दर्पात शासन बागत होते. चार-पाच दिवसांपूर्वी संसद सदस्यांना सांगितलेला शासनाचा विचार न्यायालयालाही सांगायचा होता. 'सोडणे, न सोडणे आमच्या इच्छेचा प्रश्न आहे !' धारा ४०१ चे स्थगन करून बंद्याचा मृत्यू घडवून आणण्याचा आपला अधिकार आहे हा शासनाचा विश्वास होता ना ! बंद्याला गळ्याने नव्हे तर तंगड्यानी लटकवत ठेवणे न्याय्य आहे अशी त्यांची धारणा होती ना?

पण ढवळू लागले होते ते बेगळ्या कारणासाठी ! शासनाने न्यायालयाला अंधारात ठेवले होते. त्यांना सापडलेले सत्य त्यांनी न्यायालयाला पोहोचवलेले नव्हते. प्रतिशोध उगवता येत आहे ना, मग हिन्दुस्थानच्या सर्वोच्च न्यायालयाचा एखादा सर्वव्यापी निर्णय अपूर्ण माहितीवर म्हणून चुकीचा असला तरी चालेल ही त्या त्या व्यक्तींची राष्ट्रीय एकात्मतेची भावना होती.

संसद सदस्यांना गोलमोल उत्तरे देता येतात, कारण बेळी 'लोकहिता' च्या निमित्ताचे कवच शासनाला वापरता येते. न्यायालयात ते जमतेच असे नाही. न्यायालय खोदून विचारू शकते.

मी शासनाच्या अनेक गोष्टी न्यायालयाच्या विचारासाठी मांडल्या होत्या. त्या गोष्टीतील सत्यता न्यायालयाला पटली आणि न्यायालयाने शासनाला दोषी ठरविले तर खोटेपणाचा आरोप कुणी अंगावर घ्यावचा ? न्यायालय कोणातरी व्यक्तीला उत्तरदायी धरते. अधांतरी किंवा अदृश्य शासनाला नव्हे !

पुढे घडत गेलेल्या घटनांवरून अनुमान करता येते. आपली मूठ झाकली ठेवावयाची असा निर्णय शासनाने घेतला. मी आवेदनात उपस्थित केलेल्या आरोपांना न्यायालयासमोर उत्तर देणे नको आणि खोटेपणाचे प्रायश्चित्त न्यायालयाकडून घेणे नको !

प्रतिवाद्यांना जो आदेश गेला त्याची प्रत मला दिल्ली बंदिगृहात दि. ५-१०-१९६४ ला मिळाली होती. आवेदनासंबंधीचे आणखी लेखन करण्यात मी गुंतलेला असे.

दि. १०-१०-१९६४ हा शनिवार होता. हिन्दुस्थानचे गृहमंत्री श्री. गुलझारीलाल नंदा दिल्ली बंदिगृहात येणार असल्याच्या वार्ता होत्या. घासपूस चालू होती. श्री. नंदा बंदिगृहाची पाहणी करणार होते. सर्व बंद्यांना चार गोष्टी सांगणार होते. त्यासाठी उघड्या नाट्यगृहात बंदी जमणार होते.

काही कनिष्ठ अधिकाऱ्यांनी माझ्यासंबंधी काही धारणा करून घेतल्या होत्या. गृहमंत्री सभा घेतील तेव्हा मला सभेला जाऊ द्यायचे की नाही ? भारताचे गृहमंत्री ते.

मी बंदी हा असा ! काही झाले तर ? त्या अधिकाऱ्यांच्यात थोडसा खल होई. पण निर्णय होत नसे.

त्यांची घालमेल माझ्या कानावर येत होती. त्या स्थितीतही माझी करमणूक झाली. मला तीन-चार वर्षांपूर्वीचा एक प्रसंग आठवला. पूर्वग्रह आणि प्रत्यक्ष यात किती अंतर असते ते दर्शविणारा तो प्रसंग होता.

एका आवेदनासाठी मला दिल्लीला नेले जात होते. एक नायक (Head constable) आणि तीन आरक्षी (Constables) एवढे मार्गरक्षी दल (escort) होते. आरक्षीपैकी एक-दोघे पूर्वी एकदा बरोबर होते. त्यांचा परिचय झालेला होता. परिचयातून जेवढा विश्वास निर्माण व्हायचा तेवढा झालेला होता.

मार्गात मला हातबेड्या घालणे न घालणे मार्गरक्षीदलाच्या प्रमुखावर अवलंबून असे. बेड्या घातल्याने मी कधीच कुरकुर केली नाही. पण बहुधा झाले असे की, एक-दोन वेळा सोडून कोणी कधी बेडी वापरली नाही. प्रवासात आम्हा बंद्यांना घरचे कपडे वापरू देत.

झाले असे की, अमुक ठिकाणी मार्गरक्षीदल बदलायचे ते बदललेच नाही. हेच दल दिल्लीपर्यंत येणार होते. नायक नवीन होता. दिल्ली स्थानकावर तेथील मार्गरक्षीदल आणि वाहन आले नाही तर काय करायचे, कुठे थांबायचे, बंदिगृह तर बारा मैल दूर अशी त्याला थोडी चिंता पडली. 'दिल्लीत मी तुम्हाला मार्गदर्शन करीन, अडचण होणार नाही' असे मी सांगितले. काही खेपा झाल्याने मला तेथली पद्धत ठाऊक झाली होती.

नवी दिल्ली स्थानकावर आम्ही उतरलो. मार्गरक्षीदल किंवा वाहन आले नव्हते. आम्ही सामान उतरवले. दोन आरक्षी तेथे थांबले. दोघांना मी स्थानकाबाहेरील आरक्षी कार्यालयात घेऊन गेलो. मी दूरध्वनी दाखविला, पण नायकाचा दूरध्वनीशीही फारसा परिचय नव्हता.

मी पुढे झालो. एक गोलाकार अधिकारी तेथे बसले होते. वाहन मागविण्यासाठी दूरध्वनी करण्याची मी अनुज्ञा घेतली आणि मुख्य कार्यालयाचा क्रमांक बघून दूरध्वनी लावला.

'नायक अमुक, क्रमांक अमुक, नवी दिल्ली स्थानकावरून बोलतो आहे. एक बंदी आणला आहे. एक अधिक तीन असे दल आहे. बंद्याला तिहार बंदिगृहात नेण्याचे आहे. एक गाडी पाठवून द्या.' मी नायकाच्या वतीने बोललो.

उत्तर आले, 'गाडी सध्या नाही, न्यायालयात काही बंदी नेले आहेत. ते संध्याकाळी परत जाताना तीच गाडी आपल्याकडे येईल अशी व्यवस्था करतो.'

आणखी सहा-सात तास स्थानकावर थांबणे आले ! मला तर लवकर जायचे होते. काही अभ्यास करायचा होता. मी बोललो, 'बंदी गोपाळ गोडसे आहे. नथुरामचा भाऊ !

त्याला सर्वोच्च न्यायालयात जायचे आहे म्हणून इथे आणले आहे. असा भयंकर बंदी इथे सहा-सात तास बाबरत ठेवायचा काय ? विशेष व्यवस्था करून लवकर गाडी पाठवा.'

गोपाळ गोडसे आणि नथुरामचा भाऊ हे शब्द मी दूरध्वनीवर उच्चारले आणि समोर बसलेले गोलाकार अधिकारी टणकन् उठून उभे राहिले ! नायकाला म्हणाले, 'तुमचे दल एक अधिक तीन. त्यातले तुम्ही आणि दोघे इथे ! नुसत्या दोन आरक्षींच्या स्वाधीन अशा भयंकर (खतरनाक) बंद्याला ठेवले आहेत? तुम्ही जा, त्यांच्यावर लक्ष ठेवा. हे गाडीची व्यवस्था करतील आणि येतील.'

मी कोण याची वाच्यता न करताच ते दोघेजण बाहेर गेले आणि थोडेसे आड होऊन थोड्या अंतरावर उभे राहिले.

दूरध्वनीवरून मला उत्तर आले,' स्थान-अधिकाऱ्याला (station officer) ला विचारतो आणि व्यवस्था करतो. पंधरा मिनिटांनी दूरध्वनी करा.'

मी दूरध्वनी बंद केला. समोरच्या गोलाकृतीचे आभार मानले. पंधरा मिनिटांनी पुन्हा येईन असे सांगितले आणि बाहेर पडलो. जवळच खिदळत उभ्या असलेल्या त्या दोघांबरोबर मी फलाटावर पोहोचलो. मी त्यांना सांगितले, 'आणखी पंधरा मिनिटांनी पुन्हा जायचे आहे; तोवर काही बोलू नका !'

पंधरा मिनिटांनी मी आणि ते दोघेजण तेथे गेलो. मी पुढे झालो. दूरध्वनी नुकताच आला होता. त्या आधिकाऱ्याने मला सांगितले, 'गाडी क्रमांक अमुक अर्ध्या तासात येथे येईल असा निरोप आहे. तुम्ही सर्वजण बंदी आणि सामान घेऊन स्थानकाच्या पायऱ्यांपाशी राहा.'

मी होय म्हटले. त्याचे आभार मानले. बाहेर आलो.आम्ही फलाटावर गेलो.

अर्धा तास होऊन गेला होता. कुठे चहा घे, कुठे विड्या फूक असा वेळ आम्ही काढला होता. ते गोलाकार अधिकारी आमच्या दिशेने येत असलेले आम्ही पाहिले. कोणास ठाऊक आणखी काही निरोप आहे काय ? आम्हाला शंका आली. पण त्यांचे आमच्याकडे लक्षच गेले नाही. ते गडबडीने आणखी काही कामासाठी जात होते.

पाच मिनिटांनी ते परतले ते अगदी आमच्या जवळून गेले. त्यांचे कुतूहल जागे झाले होते. थोडे दूर उभे राहून क्षणभर आपल्या दृष्टीने ते तो भयंकर बंदी शोधीत होते. पण तो तर कुठे दिसत नव्हता. कुण्या आरक्षीने आपल्या थैल्यांत तर नाही कोंबले त्याला? पण छे ! भयंकर बंदी इतका लहान कसा असेल ! त्यांनी सहज घड्याळाकडे पाहिले. तेव्हापासून पाऊण तास झाला होता. मग इथले मार्गरक्षीदल येऊन त्या बंद्याला मोटारीत घालून तर नाही गेले ?

तेवढ्यात मोटार येऊन उभी राहिली. आमचे सामान आम्ही चढवू लागलो. ते

अधिकारी तेथेच थांबून बघत होते. थोड्या वेळाने ते थोडे पुढे सरकले. सूचक अर्थाने त्यांनी माझ्याकडे बघितले. मीही त्यांना दृष्टीने विचारले, 'काय ?'

मला ते म्हणाले, ' गोपाळ गोडसे कुठे आहे ?'

'आपल्या समोर उभा आहे, महाराज ! आज्ञा करावी !' मी अतिशय नम्रपणे म्हटले.

'आप !' म्हणण्यासाठी त्यांनी केलेला 'आ' दहा सेकंद तरी तसाच होता ! हा 'भयंकर' बंदी काही क्षणी तरी विनारक्षक होता हे त्यांच्या मनात येऊन बहुधा त्यांना धक्का बसला असेल !

ते मला म्हणाले, 'मला वाटले, आपण आवश्यक ती व्यवस्था करण्यासाठी आणि मार्गातील सुरक्षितता बघण्यासाठी बंदिगृहाच्या बतीने आलेले कोणी अधिकारी आहात !'

'माझी मार्गातील सुरक्षितता मीच बघतो.' मी त्यांना सांगितले. मोटार फुरफरली. आम्ही बंदिगृहाकडे निघालो. खदखदाटाने मोटारची फुरफुर फिकी पडली होती !

आज श्री. नंदा येणार. तेव्हा मला सभेला जाऊ द्यायचे की नाही याची चर्चा माझ्यापर्यंत येऊन थडकली. तेव्हा मी त्या कनिष्ठ अधिकाऱ्याची सोडवणूक केली. मी म्हटले,

'सर्व बंदी जाणार असतील तर माझ्याशी आपणास पक्षपात करता येणार नाही. पण हा झाला विधीचा दृष्टिकोण. तेथे जाण्यावाचून खरोखरीच माझे काही अडलेले नाही. त्यांना वाटले तर ते येथे येतील.'

मी हे सहज बोललो होतो. कारण काहीही असो, माझे बोलणे खरे झाले होते. मला स्वत:कडे मोठेपणा घ्यायचा नाही. श्री. नंदा काही झाले तरी स्वतंत्र हिन्दुस्थानचे लोकनियुक्त गृहमंत्री होते. मी एक दंडित होतो. मी लहान होतो आणि आहेही. श्री. नंदा मला भेटले. पण ते मला भेटण्यासाठी बंदिगृहात आले असे म्हणण्यापेक्षा त्यांनी बंदिगृहाला भेट दिली आणि त्यात ते मला भेटले, हे म्हणणेच योग्य होईल.

व्यक्तिशः श्री. नंदा यांच्याविषयी मला सहानुभूती वाटते. गांधीजींच्या देहबसनामुळे ज्यांना प्रामाणिक दु:ख झाले त्यात ते होते. गांधीहत्या ही एक कटू आणि कठोर घटना होती. पण गांधीजींवर प्रामाणिक श्रद्धा असलेल्यांना धक्का द्यावा हा त्या घटनेमागील हेतू नव्हता. म्हणून त्या घटनेने ज्यांना अंत:करणपूर्वक दु:ख झाले त्यांच्याविषयी सहानुभूती वाटते. कदाचित श्री. नंदा यांना ठाऊक नसेल पण मला त्यांचे प्रामाणिक दु:ख तेव्हा समजले होते.

एक-दोन विभाग बघून झाल्यावर श्री नंदांनी माझी चौकशी केली. मोटारीतूनच दौरा चालला होता. मोटार लगेच 'ब' वर्गाच्या विभागाकडे वळवली. तेथे आम्ही १४-१५

बंदी बाहेर उभे होते. दारात येताच श्री. नंदांनी माझी पुन्हा चौकशी केली. मी समोर असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

परस्पर नमस्काराने भेटीला आरंभ झाला. त्यांनी माझा हात हातात घेतला. त्या क्षणालाही माझ्या मनात आले, जे कनिष्ठ अधिकारी घटकाभरापूर्वी शंकाकुल झाले होते, त्यांच्या पोटात हे दृश्य बघून गोळा आला असेल.

मी येथे का आलो आहे ती मी श्री. नंदांना सांगितले. 'मला ठाऊक आहे' असे ते म्हणाले. मी म्हटले, जन्मठेप हा विषय माझ्यापुरता मर्यादित नाही. हा सामाजिक आणि वैध socio-legal असा संमिश्र प्रश्न आहे. आपण केन्द्रीय गृहमंत्री या नात्याने यात लक्ष घालावे असे वाटते. त्यासंबंधी काही बोलायचे असेल तर आपण बोलू.' एक तुळशीची डिक्षी मी श्री. नंदा यांना भेट दिली !

आमचे बोलणे चालू असताना स्फुर प्रकाशात (flash light मध्ये) काही छायाचित्रे घेतली जात होती. ते शासकीय चित्रकार होते.

'सभा संपल्यावर यांना कार्यालयात घेऊन या; तेथे निवांतपणे बोलता येईल.' असे श्री. नंदा यांनी अधिकाऱ्यांना सांगितले आणि ते पुढे सरकले.

सभेला जाण्यास मला कोणतीच आडकाठी नव्हती ! सर्व विभाग बघून झाल्यावर बंधांना नाट्यगृहात आणले होते. बंधांनी थोडा वेळ गायनाचा कार्यक्रम केला. श्री. नंदांना एक मानपत्र दिले.

श्री. नंदा यांनी बंधांना उपदेशाचे शब्द सांगितले. मग सभेमध्ये सूट घोषित केली. अशी सूट प्रत्यक्षतः धारा ४०१ मधून देतात. सुट्टीत वर्गीकरण होते. दहा वर्षे आणि वर शिक्षा असणाऱ्यास ४ महिने. ५ ते १० वर्षे असणाऱ्यास २ महिने, १ते६ वर्षे असणाऱ्यास ४५ दिवस, ६ महिने ते १ वर्षे असणाऱ्यास १ महिना, ३ महिने ते ६ महिने असणाऱ्यास १५ दिवस.

मलाही सूट मिळाली ! चार महिने म्हणजे १२० दिवस ! निरर्थक ! माझ्या आयुष्यासह प्रवास करणारी ! सुट्टीला गणन पण आयुष्याच्या लांबीला गणन नाही म्हणून सूट वंध्या !

संध्याकाळी मी कार्यालयात गेलो. कोणी प्रतिष्ठित व्यक्ती भेटण्यास यावी इतक्या सौजन्याने श्री. नंदा यांनी मला बसण्यास सांगितले.' मी तुमचे पत्र वाचले आहे' असे ते म्हणाले.

कोणते पत्र ते माझ्या लक्षात येईना, कारण मी त्यांना पत्र लिहिले नव्हते. कदाचित न्यायालयाने धाडलेला आदेश असेल अशी कल्पना करून मी बोलू लागलो.

मी त्यांना माझा मुद्रित प्रबंध दिला. म्हटले, ' हे एक फेटाळलेले आवेदन आहे. पण जन्मठेप या विषयाचा सर्वांगीण विचार व्हावा आणि कोणीही बंधावर अन्याय होऊ नये

म्हणून आपण हे पुस्तक बघावे.' माझी एक हिन्दी कविता 'उतमाङ्ग सिन्दूरविभूषित' त्या पुस्तकात परिशिष्ट म्हणून होती, तीही मी त्यांना दिली.

ते पुस्तक त्यांच्या बघण्यात नव्हते असे दिसले. मी त्यांना म्हटले, 'माझ्यासाठी मी न्यायालयात प्रयत्न करीत आहे. मरण हीच या शिक्षेची वैध परिणिती आहे असे न्यायालयाने मला सांगितले तर मी मरणच पत्करीन, न्यायालयाकडे मग मी येणार नाही पण आपण विचार करा. करकरे आणि मदनलाल यांना का सडवत ठेवले आहे ! त्यांना आपण मुक्त करावे.'

'तुम्ही सुटल्यावर काय कराल ?' श्री. नंदांनी प्रश्न केला.

मी म्हटले, 'अद्याप तरी प्रश्न उद्भवत नाही. पण मी सुटलोच तर राजकारण करीन. तरीही प्रथम मला व्यवसाय बघितला पाहिजे. माझ्या पत्नीने एक उद्योग उभा ठेवला आहे.'

ते म्हणाले, 'काही पूर्वग्रह (apprehensions) असतात. मी ते ठेवलेले नाहीत. अधिकारी तुमच्या वर्तनाविषयी सांगतात. येथील अधिकारी तुमच्यासंबंधी चांगले बोलले.'

मी म्हटले, 'सूट ही वर्तणुकीचे गमक. ती कशातूनच उणे करावयाची नाही म्हटल्यावर बंदी कसा वागतो याला अर्थ उरत नाही. सुट्टीचा उपयोग जन्मठेपेच्या बंद्यांना शिक्षेच्या लघुकरणात नको का ? आणि तसा करायचा असेल तर त्याच्या शिक्षेचा अंतिम अवधी त्याला पहिली सूट देताच, किंबहुना त्याने बंदिगृहात पाऊल ठेवताच ठरविण्यास नको का ?

'तसा अवधी आहे, आणि सुट्टीचा उपयोग होतो.' असे ते म्हणाले.

'प्रत्यक्षात काय झाले आहे ते आपण बघा.' असे मी सांगितले. मी त्यांना एक उदाहरण दिले.

'आताच आपण चार महिने सूट दिलीत. आपण नाटक केले नाहीत. तो बंदी तितका लवकर सुटावा हा आपला प्रामाणिक हेतू आज तरी दिसला. त्यांच्या सुट्टीचे गणन होऊन 'पिकलेले' बंदी परवापासून सुटतीलही. त्या त्या वेळी त्या त्या अधिकाऱ्यांनी ठेवलेला हा प्रामाणिक हेतू माझ्या संबंधात पुढे मुरगळून टाकलेला आपणास दिसेल. मी अस्वस्थ झालो तो त्या वंचनेसाठी. सुट्टीतून माझा अधिकार प्रस्थापित करायला मी न्यायालयाकडे येत राहिलो आहे. दयेसाठी आपणाकडे मी आलो असतो. आपणास ठाऊक आहे, नथुरामने दया मागितली नव्हती. शिक्षा न्यायोचित आहे ही त्याची धारणा होती. इतकी सूट असूनही शेवटी मरण हे न्यायाला माझ्या संबंधात संमत असेल तर तसे होऊ दे. म्हणून मी आपणास प्रथम बोललो आहे की, तशा स्थितीत मी मरण पत्करीन. करकरे आणि मदनलाल यांना आपण सोडून द्यावे.'

'तुम्हाला मी शुभेच्छा व्यक्त करतो, किंवा तुमचे कल्याण होवो. I wish you well असे श्री नंदा म्हणाले. आमची भेट संपली.

बंदिगृहाबाहेरील आणखी काही शासकीय अधिकारी त्या संभाषणाच्या वेळी उपस्थित होते. मला निश्चित सांगता येत नाही, आमचे भाषण ध्वनिमुद्रित झाले अशी माझी कल्पना आहे.

माझी श्री. नंदांशी कार्यालयात भेट होणार आहे हे कळल्यापासून दिल्लीतील काही सहबंद्यांना आनंद झाला होता. सहानुभूतीने त्यांनी मला सांगितले होते, 'श्री. नंदा येथे आपल्याला आपुलकीने भेटले. आपण पुन्हा भेटत आहात. आपण सांगा, बाहेर काहीही काम करायला सांगितलेत, वेळी ग्रामोद्योग, वेळी खादी भांडाराचे काम, तरी मी ते करीन. मला सोडून द्या. श्री. नंदा आपली विनंती ऐकतील.' या बंद्यांच्या प्रेमळ सूचनेसाठी मी त्यांचे आभार मानले. त्यांना माझा वाद कळला नव्हता आणि मलाही त्यांना तो विशद करून सांगायचे कारण वाटले नाही. तेच करायचे असते तर त्याला सर्वोच्च न्यायालयात धडका घ्यायचे कारण नव्हते. मला आढ्यता नव्हती. पण बंद्यांनी सुचविल्याप्रमाणे विनंती करण्यात एकच झाले असते. मी स्वत:ची आणि शासनाची वंचना केली असती. मला ते नको होते. इतक्या उशिरा तरी शासनाला त्याचा प्रमाद कळू दे की असे मला वाटत होते.

माझ्या न्यायालयातील आवेदनावरून मी लक्ष काढून घेतले नव्हते. शासनाला पळवाटा राहू नयेत म्हणून दि. १०-१०-१९६४ ला मी पूरक विधाने न्यायालयात धाडली होती.

श्री. नंदा यांची बंदिगृहाला भेट केवळ माझ्यासाठी होती असे जरी माझे म्हणणे नसले तरी एक गोष्ट स्पष्ट होती. माझे आवेदन आणि पूरक विधाने शासकीय विधिज्ञांनी वाचून अभ्यासली असतील तर उत्तर देण्याच्या प्रपंचात पडू नये असा त्यांनी शासनाला परामर्ष दिला असला पाहिजे. तेव्हा दोन मार्ग शासनाला मोकळे होते. एक माझ्या आवेदनाला विरोध न करणे; दुसरे, आवेदनासाठी योजलेला दिवस उगवण्यापूर्वीच माझी मुक्तता करणे. श्री नंदा यांची भेट त्या दृष्टीने झाली होती हे स्पष्ट होते.

सोमवारी म्हणजे दि. १२-१०-१९६४ ला श्री. नंदा यांनी दिलेली सूट धरून जे बंदी सुटण्यास योग्य झाले होते त्यांना सोडण्याची धावपळ चालू होती. अशी सूट म्हणजे बंदिगृहात केवढा आनंदोत्सव असतो ! कोमजलेली मने टवटवतात; सुकलेल्या मनाला पालवी फुटते. मला आठवले, १९५० च्या जानेवारीत याच परिसरात असेच बंदी सुटले होते. लवकर सुटण्याचा विश्वास देणारी चाळीस महिन्यांची सूट आम्हाला मिळाली होती ! कारण अशी सूट कोणत्याही कारणासाठी कापता येत नाही. शुद्ध दया असेच तिचे स्वरूप असते.

सुटीच्या यथार्थतेसाठी केलेल्या डोकेफोडीने आणि त्यात आलेल्या अपयशाने माझे

मन बोथट झाले होते. भावना झिजल्या होत्या. म्हणून आज मिळालेल्या चार महिने सुटीचा माझ्या मनावर कोणताच परिणाम झाला नाही. मनाचा तो कोपरा बाजूला ठेवला तर, बंदी सुटत होते, आपापल्या मुलांमाणसात जात होते. याने त्यांना वाटत असलेला आनंद बघून मनाला संतोष वाटत होता. खरे वाटणे अवघड आहे, परंतु फाशीची शिक्षा असणारा बंदीही स्वत:वरील प्रसंग विसरून कोणत्या नवीन बंद्याला सांत्वन देत असतो,'अरे तुझे दिवस लवकर निघून जातील, असा विषण्ण होऊ नको.' दुसऱ्याच्या दु:खात तो सहानुभूती व्यक्त करतो. दुसऱ्याच्या आनंदात सहभागी होतो.

दि. १३-१०-१९६४ उजाडला. तो मंगळवार होता. आमच्या कोठड्या उघडल्या गेल्या होत्या. थोडा वेळ गेला होता.

एक बंदिपाल येऊन उभे राहिले,' का? इतके सकाळीच ?' मी सहज विचारले.

'तुमच्या सुटकेची आज्ञा आली आहे ! सामान आवरा. साडेसातच्या आत तुम्हाला बाहेर काढायचे आहे !' ते म्हणाले.

तेव्हा सात वाजायला आले होते.

मनानेच काय पण शरीरानेही उड्या माराव्यात असे ते शब्द होते. पण छळणुकीने माझे मन इतके मथ्थड झाले होते की, त्या तथाकथित दयेच्या तुकड्याचा मला मनानेही आनंद उपभोगता येईना !

एखाद्या बोलपटात रडारडीचे प्रसंग इतके असावेत आणि प्रेक्षकांच्या भावना त्या दृश्यांनी एवढ्या ताणलेल्या असाव्यात की त्या कथेचा शेवट आनंदमय दाखवला असला तरीही त्या समारोपाशी त्यांना एकरूप होता येऊ नये, तशी माझ्या मनाची अवस्था झाली होती.

दया म्हटले की ती जशी अस्थानी आणि अवेळी असू नये तशीच ती वेळ उलटून गेल्यावरही असू नये. दयेतील रुची ठराविक अवधीनंतर नाहीशी झालेली असते. मला एक उर्दू शेर आठवला, मला वाटते गालिबचा असेल,

कर गये बेवख्त कुर्बानी तो फिर क्या फायदा
सर से ऊँचा हो गया पानी तो फिर क्या फायदा

दया नीरस होऊ नये म्हणूनच काळ्यापाण्याच्या किंवा आजन्म निष्कासनाच्या बंद्याच्या शिक्षेचे परिवर्तन बंदिवासात करण्याचे असेल तर दंडसंहिता (Criminal Procedure Code) धारा ५५ प्रमाणे किंवा भारतीय दंडविधान (Inidan Penal Code) धारा प्रमाणे तो बंदिवास १४ वर्षांपर्यंतच ठेवला पाहिजे असे शासनावर बंधन आहे. असे परिवर्तन बंद्यांच्या संमतीवाचून करण्याचा शासनाचा अधिकार आहे, म्हणजेच अशी प्राप्त झालेली दया नाकारण्याचा अधिकार बंद्याला राहत नाही.

पण माझी शिक्षा बंदिवासात तर परिवर्तित केली होती, कारण कार्यवहन तसेच चालू होते. मात्र बंदिवासाच्या मर्यादिला कोणतेच माप लावले नव्हते. १४ वर्षे केव्हाच उलटून गेली होती.

सुटकेची आज्ञा शासनाने धारा ४०१ प्रमाणे काढली. म्हणजे दयेच्या अधिकाराचा वापर करून इतक्या उशिरा ही आज्ञा काढल्याने त्या पवित्र अधिकारातील दया या भावनेचा चोथा होऊन गेला होता. रुची नाहीशी झाली होती. केवळ मी जिवंत आहे एवढेच गमक ही 'दया' समजली जाण्यास पुरेसे आहे काय ?

ही दया स्वीकारलीच पाहिजे असे माझ्यावर बंधन नव्हते. कारण आज्ञा ४०१ ची होती. न्यायालयात याचा खल होऊ दे या विचाराने दया स्वीकाराची असे मला वाटेना !

दोन्ही पक्षी विचलित न होता मी बंदिपालांना म्हटले, 'मला अधीक्षकांना भेटायचे आहे.'

'का ?' म्हणून त्यांनी विचारले.

मी म्हटले, 'माझे आवेदन विचाराधीन आहे तोवर मला बंदीतच रहायचे आहे. मला अधीक्षकांना तशी विनंती करायची आहे.'

बंदिपालांना हा अनुभव नवीन होता. अनेक वेळी अनेक धक्के खाल्ल्यानंतर आणि इतक्या वर्षांच्या कोंडमाऱ्यानंतर या बंधाला सुटका मिळत आहे आणि हा तर बाहेर जायचे नाही असे म्हणत आहे याचा त्यांना अर्थबोध होईना ! आनंदातिशयाने माणसे भ्रमिष्ट होतात, वेडी होतात. माझ्यात तसे वैगुण्यही बंदिपालांना दिसेना.

बंदिपालावर आणखी काय प्रतिक्रिया होत आहे हे बघण्यासाठी मला वेळ नव्हता. ते काहीतरी बोलले. मी तिकडे दुर्लक्ष केले. कदाचित मला उचलून बाहेर टाकतील या शंकेमुळे मी चटकन दोन कागद घेतले, अधीक्षकांना लिहिले -

'महोदय, माझे आवेदन क्रमांक १०६, १९६४ चे सर्वोच्च न्यायालयात विचाराधीन आहे. दि. १९-१०-६४ ला प्राथमिक सुनावणी आहे.

दया करणे हा शासनाचा विशेषधिकार म्हणजे (Privilege) आहे; म्हणजेच त्या विशेषाधिकारापोटी दिली गेलेली दया न स्वीकारण्याचा मला अधिकार आहे असे एक विधेय मी आवेदनात मांडले आहे.

आवेदनाचे श्रवण होईपर्यंत दयेच्या आज्ञेचे कार्यवहन थोपवून धरावे ही विनंती. यात माझा (दयेची आज्ञा काढणाऱ्या) कोण्या संबंधित अधिकाऱ्यांचा अवमान करण्याचा हेतू नाही.

आभार....

अधीक्षकांना भेटण्यासाठी मी कार्यालयाकडे गेलो. दहा-पंधरा मिनिटे थांबावे

लागले, तोवर माझे सामान देवडीत येऊन पडले होते. विनंती मानली जाणार नाही हे दिसतच होते. पण झाला असता तर माझ्या लेखी विनंतीचाच उपयोग होणार होता. तोंडी विनंतीचा नव्हे.

अधीक्षकांची भेट झाली. माझी विनंती मान्य करणे त्यांना शक्य नव्हते ! त्यांनी आवेदन ठेवून घेतले. आमचे काही बोलणे झाले. मी बाहेर आलो.

करकरे आणि मदनलाल यांनाही सोडण्याचा आदेश दिला गेला असल्याचे मला कळले. मला समाधान वाटले.

नोंदवह्यावर करण्याच्या स्वाक्षऱ्या मी केल्या. मला प्रवासाचे अधिपत्र (वॉरंट) दिले गेले. सामान तपासले गेले. ते बंदिगृहाबाहेर ठेवले गेले.

अकाली आलेले वार्धक्य खांद्यावर घेऊन मी बंदिगृहाबाहेर पाय ठेवला आणि स्वातंत्र्याचा पहिला श्वास घेतला.

खरे का हे ? मी सुटलो होतो ! बंदिगृहाचा कोणी अधिकारी माझ्या मागे नव्हता, कोणी आरक्षी नव्हता. 'एकटा कुठे चाललास' म्हणून मला दटावण्यास कुणी दंडा घेऊन उभा नव्हता. 'तुझी टोपी कुठे आहे ? तुझा बिल्ला कुठे आहे ?' असे विचारून मला मागे फिरावयास लावू बघणारा शब्द आसपास ऐकू येत नव्हता. 'काम का करीत नाहीस ? तुझा खटला करू?' असे धमकावणारा अधिकारी कोठे दिसत नव्हता. सुट्टीचे खोटे दान करणारे खाकी यंत्र कुठे आढळत नव्हते. स्वत:च्या करमणुकीसाठी खोटी सूट कापणारे यंत्रही उपस्थित नव्हते ! मी सुटलो होतो. अगदी खरे !

मगरीला एखादा अबघड आणि अबजड मासा धडपड करूनही घशाखाली उतरवता येऊ नये, न जाणो आपलाच घसा रूंद होईल असे वाटून मगरीने तो मासा सोडून द्यावा, पण स्वत:चे श्रेष्ठत्व मिरवण्यासाठी त्या माशाला म्हणावे, 'तुझ्यावर मी दया केली आहे. तुला जीवदान दिले आहे.' तशातली माझी सुटका होती. मला सुरक्षित ठेवून माझ्या शिक्षेचे कार्यवहन करण्यासाठी म्हणून त्या दाराने जबडा उघडा होता. न्यायालयाला त्याने तसे सुरक्षिततेचे आश्वासन दिले होते. मग त्याच्या मनात पाप आले. त्याला वाटले, न्यायालय झोपले होते ! कुंपणाने शेत खाऊ बघावे तसे मला रिचविण्याची आणि पचविण्याची त्याला भूक सुटली होती !

एरवी त्या दाराला ते शक्य झाले असते. कारण माझ्या अंगी अबजडपणा आणि अबघडपणा नव्हता. न्यायालय माझ्या ओरडण्याने जागे झाले होते. काय गोंगाट आहे हे बेळी भिंत फोडून आत येऊन बघण्याची त्याची शक्ती होती. मला अबजडपणा आणि अबघडपणा त्या बेळी आला होता. दार स्तंभित झाले होते. मी त्याच्या घशाखाली उतरेना !

मला बाहेर फेकून देणेच आपल्या हिताचे आहे हे ओळखून दाराने मला बाहेर फेकले

होते !

शासनाने माझ्यावर धरलेला दात चांगला खोलवर हृदयापर्यंत पोहोचला होता. तरीही मी जिवंत होतो. माझे हृदय भेदून जाण्याच्या आतच शासनाला दात उचलावा लागला होता. आपल्या पूर्वजांनी ही न्यायालयाची कुव्यवस्था का करून ठेवली असा खेदही कदाचित त्या त्या व्यक्तींना झाला असेल !

बाहेर आल्यावर एका वाहनाने मी श्री. गणपतराय यांच्या घरी गेलो. कृतज्ञता व्यक्त करावी असे ते दिल्लीतील माझे पहिले स्थान होते. अगदी शेवटपर्यंत म्हणजे माझ्या शेवटच्या आवेदनासाठी पूरक विधाने धाडण्याची होती त्यांच्या टंकलेखनापर्यंतही त्यांनी मला त्वर्यपणे सहाय्य दिले होते.

ते घरी नव्हते. आपल्याला मोकळे हिंडता येते का हे बघण्यासाठी मी बाहेर बडलो. दिल्लीतील गुप्तचर माझ्यामागे होते. त्यांचीही गाडी होती. पण मला हटकण्यासाठी किंवा माझी अडचण करण्यासाठी ते गुप्तचर नव्हते. ते दोन असले काय किंवा दोनशे असले काय मला कोणताही त्रास देत नाहीत तोवर त्यांच्यासंबंधी कुरकुर करण्याचे मला कारण नव्हते. आजही असे गुप्तचर असतात, पण माझ्या व्यवहारात खीळ घालण्यासाठी नव्हे. आणि मी त्यांना भ्याबे असे माझ्याजवळही काही नसल्याने प्रसंगी त्यांच्या उपस्थितीसंबंधी विचारण्याचेही मला कधी कारण पडत नाही.

मी थोडा भटकत होतो तो दिल्लीतील काही अनोळखी म्हणजे मला अपरिचित असलेल्या लोकांनी मला गाठले. मला त्यांनी कसे ओळखले ? त्यांना मी सुटल्याचे एवढ्यात समजले कसे ? मला प्रश्न पडला. कारण माझ्याकडे म्हणून ते आले होते. वार्ता कशीही पसरते. पण माझी कल्पना आहे, मी कुठे आहे याचे मार्गदर्शन शासकीय व्यवस्थेतील गुप्तचर विभागाकडून होणेच शक्य होते. कदाचित मी कोणाशी कसे कोणाशी कसे बोलतो याचा अदमास घेण्यासाठी ती व्यवस्था असेल. भेटणाऱ्या मंडळीत गुप्तचरही असतील ! असेनात का ?

मला ते लोक प्रेमाने भेटले. त्यांनी स्वत:चा परिचय दिला. त्यातल्या दोन-तीन जणांनी मला त्यांच्या घरी बोलावले. वेळ झाल्यास येईन असे मी सांगितले. दोघा-तिघांनी मला एका खानावळीत जेवण्यास नेले. आम्ही जेवण केले.

मध्यंतरी मी श्री. गणपतराय यांच्याकडे येऊन त्यांना भेटलो होतो. एका नवपरिचिताबरोबर मग त्यांच्याकडे गेलो.

माझी सुटका ही अवमानित सुटका आहे ही मनाला टोचणी वाटत होती. नि:पक्षपणे मला वाटे की, शासनाने स्वत:चा दयेचा अधिकार असा चोळामोळा करून वापरणे त्याच्यासाठीही योग्य नाही. शासन स्वत:चीच फसवणूक करून घेत आहे. मूळ प्रश्नाची सोडवणूक माझ्या या सुटकेने झालेली नाही. काय करावे याचा मी विचार करीत होतो.

मी सर्वोच्च न्यायालयाला एक आवेदन लिहिले. आवेदन क्रमांक १०६ चा संदर्भ देऊन मी म्हटले -

'माझ्यावर लादलेली ही दया नाकारण्याचा मला अधिकार आहे की नाही याचा विचार वरील आवेदन श्रवणासाठी येईल तेव्हा व्हावा. नाहीतर संविधानाच्या १४ व्या परिच्छेदाला अनुसरून (न्यायाची समानता Equality before law) मी केव्हा सुटायला पाहिजे होते हे बघितले जावे.

'मी दि. १९-१०-१९६४ ला न्यायालयात उपस्थित होईन.'

समक्ष न्यायालयात गेलो. लागलीच सुटकेच्या आड़ेला स्थगनाची आज्ञा (Stay order against Release order) मिळाली तर बघावे हा विचार होता. न्यायालयाला दसऱ्याची सुट्टी होती. तेथल्याच प्रेषणालयात मी माझे आवेदन टाकले.

समजा, मला तशी आज्ञा मिळाली असती, किंवा त्यापूर्वी अधीक्षकांनी शासनाशी बोलणे करून माझी विनंती मानली असती तर जो बंदिवास आला असता तो माझ्या इच्छेने आला असता. एक कठीण प्रश्न सोडविण्यासाठी थोडा बंदिवास भोगावा लागला तर ते मूल्य काही फार नव्हते. त्या अवधीत, शासनाने मला डांबले आहे असा अंकुश राहिला नसता. न्यायालयाला तशी आज्ञा देता आली असती की नाही हा एक वादाचा विषय होता. माझ्याजवळ माझी विधाने होती.

श्री नंदा पांची गाठ घेण्याचा मी प्रयत्न केला. त्यांनी सदिच्छा व्यक्त केल्या होत्या. मी आज मुक्त होतो. त्या सदिच्छेसाठी आभार मानणे उचित होते पण ते कोणत्यातरी बैठकीत होते. त्यांचे कार्यवाह भेटले. मी त्यांना चिठी दिली.

'सर्वोच्च न्यायालयातील माझा प्रयत्न (दया न स्वीकारणे माझा अधिकार आहे हे आवेदन) एका प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी आहे. कोणाचा अवमान करण्यासाठी नव्हे. आपण सदिच्छा व्यक्त केल्यात. आभार.'

माझ्यावर आजवर झालेल्या अन्यायाला समजा श्री. नंदा उत्तरदायी असले तरी सर्वस्वी तेच उत्तरदायी नव्हते. कोणाही विशिष्ट व्यक्तीवर दोषारोपण करता येईल अशी स्थिती नव्हती. गेल्या आठ वर्षांपासून कितीतरी व्यक्ती बदलल्या होत्या. कितीतरी दिवंगत झालेल्या होत्या.

हिन्दुसभाभवनात मला नथुरामचे मित्र भेटले. नथुराम हिन्दुसभेचा कार्यकर्ता होता. अनेक प्रांत तो फिरला होता. त्याचा मित्रपरिवार सर्व प्रांतात होता. हिन्दुसभेने गांधीहत्या या घटनेचा निषेध केला होता. परंतु नथुराम आमचा नव्हे असे हिन्दुसभेने म्हटले नव्हते. किंवा नथुरामच्या त्या मित्रगणानेही म्हटले नव्हते. नथुरामच्या कृतीमागील राजकीय मूल्यमापन जसे सरदार पटेल आणि काही काँग्रेसचे धुरीण यांनी केले होते, तसेच ते नथुरामच्या या

मित्रगणानेही केले होते. तसेच ते मूल्यमापन केले म्हणून सरदार पटेल आदिंनी गांधीहत्येचा आदेश दिला असे आपणास म्हणता येत नाही. तसेच हिन्दुसभेने हा आदेश दिला असेही म्हणणे अन्यायाचे होईल.

मी सुटलो यासाठी त्या मित्रगणाने समाधान व्यक्त केले. दिल्लीतील वास्तव्यासंबंधी मला विचारले. रात्री मी जाणार असल्याचे मी त्यांना सांगितले.

मी सुटलो असल्याची तार मी घरी पाठवली होती. रात्रीच्या डेहराडून किंवा पठाणकोट गाडीने येत आहे असेही कळविले होते. दि. १५-१०-१९६४ ला म्हणजे दसऱ्याला मी घरी पोहोचणार होतो.

दि. १४-१०-१९६४ ला सर्वदूर बातां पसरली, मी सुटलो ! गाडी गुजराथमधून येत होती. काही स्थानकावर लोक अदमासाने मला बघण्यास येत. मी दिली तरच ओळख कारण मी तसा परिचित नव्हतो. दहा माणसांतून मला निवडून काढावे असे काही वेगळेपणही माझ्यात नव्हते.

एका स्थानकावर एक घोळका मी पाहिला. कुतुहलाने बाहेर पाहिले. अगदी योगायोग ! मला ओळखत असलेल्या पण मी विसरून गेलेल्या एका गृहस्थाने मला पाहिले. ओळख कुठली, तर तो एका बंदिगृहात होता आणि मी म्हणे त्याला काही सूट देवविली होती ! तो ते बाहेर बोलत असे.

'चला, चला' म्हणत तो घोळका माझ्या डब्याजवळ आला. मला पुष्पहार घातला. गेला ! जयजयकार झाले.

मी पुढारी झालो की काय ? मी स्वत:चेच निरीक्षण करू लागलो. पुढाऱ्याचे कोणतेच गुण माझ्या अंगी मला आढळेनात ! त्या हाराने मी अवघडलो. पण प्रश्न थोड्या वेळाचाच होता. कारण गाडी थोड्या वेळात हलणार होती.

'मी याच गाडीने येणार असे तुम्हाला काय ठाऊक?' मी विचारले. तो ओळखीचा गृहस्थ म्हणाला, 'आम्ही आणखी एक-दोन गाड्या बघणार होतो. हे लोक मागे लागले, तू आम्हाला येऊन चल; भेट झाली तर झाली, नाहीतर नाही. येऊन जाऊन काही तास ताटकाळत रहावे लागेल इतकेच ना !'

तरीही मला विश्वास वाटेना ! असे तर नसेल ना, की दिल्लीच्या कोणीतरी, कदाचित गुप्तचर विभागापैकी कोणीतरीसुद्धा, निश्चित गाडीची तार धाडली असेल. मला ठाऊक नाही.

गाडी सुटण्यापूर्वी मिनिटभर एक मिठाईची करंडी माझ्या डब्यात टाकली गेली. एक गृहस्थांनी मला चिठ्ठी दिली.' आपल्या कुटुंबासाठी ! सुखी व्हा !' गाडी सुटली.

दादरहून मी कल्याण स्थानकावर आलो. घरची मंडळी तेथे येण्याची शक्यता होती.

मी उतरलो, इकडे तिकडे पाहिले. ओळखीची तोंडे दिसू लागली. किती लोक हे ! ती ! चाळीस ! पन्नास ! आणि सर्व नातेवाईक ! अगदी थोडे मित्र !

वडील बंधु दत्तात्रय आणि कुटुंबीय मंडळी, धाकटा भाऊ गोविंद, सर्वजण मला प्रथमच मुक्त बघत होते. मी त्यांच्यात होतो.

मानसपुत्र नानाला आनंद व्यक्त करण्यात संकोच वाटत नव्हता ! मोठी मुलगी विद्युल्लता वर्ध्याला होती.

माझी दृष्टी भिरभिरत होती पत्नीला शोधण्यात ! आमची दृष्टिभेट झाली ! पण तिचे तिला कळले नि माझे मला ! अशक्य वाटणारा दिवस तिला दिसला होता. मनातून ओसंडणारा आनंद तिने दाबून ठेवला होता !

आम्ही सर्वजण स्थानकाच्या प्रतीक्षालयात बसलो. मी स्नान केले. सर्वांनी चहा घेतला. मग मी त्यांना सांगितले,' दोन दिवसांनी मला पुन्हा न्यायालयात जायचे आहे.'

आता आणखी काय उरले आहे अशी चिंता त्यांच्या मुद्रेवर उमटली. मी त्यांचे समाधान केले. 'एक तांत्रिक प्रश्न आहे. त्यासाठी काही बंदिवास आलाच तर मी स्वतः होऊन तो घेणार आहे. हा प्रश्न सोडविण्यासाठी वेगळा मार्ग माझ्यापुढे नव्हता, निदान मला तरी सापडला नाही.' सर्व वस्तुस्थिती समजावून सांगितल्यावर मला अनुमती मिळण्यास वेळ लागला नाही.

आम्ही पुण्याच्या गाडीत बसलो. पुण्याच्या स्थानकावर आणखी पुष्कळ मंडळी उपस्थित होती. ज्या व्यक्तींना मी कृतज्ञता दाखवावी त्यात श्री. ग. वि. केतकर होते. कोणतीही भीती न बाळगता त्यांनी आमच्या सुटकेचा प्रश्न लोकांपुढे मांडला होता. ते मला भेटले.

सतरा वर्षांनंतर माझ्या घरी दसरा साजरा होत होता! सनई-चौघडा वाजत होता. दारावर तोरण होते. अंगणात रांगोळ्या काढल्या होत्या. पंचारती घेऊन सुवासिनी उभ्या होत्या.

श्री. भाऊराव अभ्यंकर आणि त्यांची पत्नी माझ्या पत्नीला मुलगी म्हणून मानतात, नव्हे तिला ते तसे वागवतात, याचा उल्लेख मी पूर्वी एका लेखात केलेला आहे. त्यांच्या 'जावयाचे' आगमन झाले, मुलीला सौभाग्य मिळाले! त्यांचा दुहेरी आनंद दुथडी वाहात होता !

पंचारती ओवाळून घेताना माझ्या भावना उचंबळल्या, मी त्यांना बांध घातला नाही. जे अश्रू घेऊ बघत होते त्यांना घेऊ दिले. इतकी वर्षे त्यांना मी थोपवून धरले होते. आता थांबविण्याचे काही कारण नव्हते.

जवळ जवळ एका पिढीचे अंतर पडले होते. मी अंगाखांद्यावर खेळवलेल्या काही

बाहुल्या स्वत:च्या पिछांना कडेवर घेऊन उभ्या असलेल्या मी बघत होतो.

माझ्या स्मृती पुसट होऊन गेल्या होत्या. त्यात काही खेळीमेळीतले परिचित येत आणि मला अहो-जाहो म्हणत ! माझ्या गोपाळ नावापुढे 'राव' लावीत ! मला कसे तरीच वाटे ! मी मोठा केव्हा झालो ! मला वाटे, शीतलेत (Refrigerator) ठेवलेला पदार्थ तसाच राहतो तसा मीही बंदिगृहात काही वाढलेला नाही! मला अरे जारे कुणीच म्हणणार नाही काय? मला ती भूक वाटू लागली.

मला अधिकाराने अरे जारे म्हणणारी घरातील तीन माणसे दिवंगत झालेली होती ! आई, वडील आणि नथुराम ! आठवण होताच मी घरात गेलो. त्यांची छायाचित्रं होती. त्यांना मी वंदन केले.

सर्व दिवस लोकांची रीघ लागली होती. पुढेही अनेक दिवस तो क्रम चालू होता. आणि ती आमची पहिली रात्र होती - अश्रूंनी ओलीचिंब !

दि.१९-१०-१९६४ ला मी सर्वोच्च न्यायालयात पोहोचलो. आवेदन पुढे आले. मी उभा राहिलो. माझी पुरवणीही न्यायमूर्तींनी वाचली होती.

मूळ आवेदनाच्या अंगभूत इतर आवेदने होती. मूळ आवेदन आता विचारात घेण्याचे न्यायालयाला कारण वाटले नाही. कारण माझी सुटका झाली होती. आवेदन अफलित (infructuous) झाले होते. बुंधा तोडल्यावर फांद्या पडतात तसे मुख्य आवेदन अफलित झाल्याने अंगभूत आवेदनेही कोलमडली होती.

न्यायालयातून हा प्रश्न सोडवून घेण्यास मी असमर्थ ठरलो. माझा शेवटचा पराजय होता !

गांधी हत्याकांडातील एका चिरपराजित दंडिताची अशी कथा आहे.

卐 卐

प्रयोजन

माझ्या आयुष्यातील एक लहानसा काळ असा होता की, कोठे खुट्ट झाले की मी सतर्क व्हावे, कोठे खुट्ट होते की काय हे मी सारखे बघत राहावे. कोण्या अनोळखी माणसाने मला थोडा वेळ अधिक बघितले की मला वाटावे, याला काही तरी समजले असावे! हा बहुतेक आरक्षी विभागाचा गुप्तचर असेल! फलाटावरून वावरताना, मोटारीतून जाताना, आगगाडीत प्रवास करताना मी मनातल्या मनात काहीतरी दडवून ठेवीत असे, त्याची मला सारखी जाणीव राही. त्या आंदोलनाचा बाहेर मागमूस उमटू द्यायचा नाही असा मी प्रयत्न करी. पण मनात होते ते मनापाशी मी थोडेच लपवू शकणार होतो ?

तो लहानसा काळ होता. गांधीहत्येच्या दिवसाच्या आगचे मागचे थोडे दिवस. मला संशयित म्हणून पकडले. आरोपी करून न्यायालयापुढे नेले. संशयाला जागा राहू नये इतक्या समाधानकारकपणे माझ्यावरील आरोप सिद्ध झाला. मला न्यायालयाने शिक्षा दिली. शासनाने शिक्षेचे कार्यवहन केले. माझ्या स्वातंत्र्यासाठी मी भांडत असतानाच दि. १३-१०-१९६४ ला माझी दिल्ली बंदिगृहातून सुटका झाली.

सुटकेनंतर माझ्यात एक स्थित्यंतर झाले. ज्याचे भय बाळगावे असे कोणतेच दडपण मनावर राहिले नाही. मी बिनाअट सुटलो. त्याचा अर्थ मला नागरिकाचे सर्व अधिकार मिळाले - मतदानाचासुद्धा! समाजधारणेला आवश्यक त्या सर्व विधीला आणि नियमांना मी कोणाही नागरिकांप्रमाणे बांधलेला आहे; त्याचबरोबर दुसऱ्याच्या अधिकारावर अतिक्रमण न करताना कोणाही नागरिकाला जे अधिकार उपभोगता येतात ते उपभोगण्यालाही मला मोकळीक मिळाली.

जिज्ञासा हा मनुष्याला स्थायीभाव असतो. थोडे दिवस कोठे गावाला जाऊन आले तरी आसपासचे लोक विचारतात, तिथले काय वर्तमान आहे ? पाऊसपाणी कसे आहे ? पिके कशी काय आहेत ? गिरण्या चालू आहेत का ? धरणाचे काम कुठवर आले ? दादा काय म्हणत होता ? मामी माहेरी गेली का ? नळाला पाणी येते का ? तांदूळ मिळतो का ? एक ना दोन ! अर्धवट माहिती असलेल्या आणि मुळीच माहिती नसलेल्या गोष्टीतही कुतूहल दाखविले जाते.

गांधीजींचे जीवन हे जसे देशव्यापी तसा त्यांचा देहांतही देशव्यापी ठरला. त्यांचा देहांत हत्येने झाला हा दैवदुर्विलास होता आणि बरबर पाहू जाता, त्यांच्या म्हणून मानल्या गेलेल्या तत्त्वाशी त्यांच्या मृत्यूची घटना विरोधी होती, यामुळे ती डोळ्यात विशेष भरली.

इतिहासाने गांधीहत्येची अटळपणे नोंद केली. अर्थातच इतिहास वाचणाराचे कुतूहल जागे झाले. ही हत्या करणारे कोण ? ते क्रूर होते काय ? गांधीजींशी त्यांचा व्यक्तिगत हेवादावा होता काय ? त्यांना काही चरित्र होते काय ? त्यांचे पुढे काय झाले ? त्यांचे म्हणणे काय होते ? अशापेक्षा अशी घटना झाली नसती तर ? राजकारणाची तेव्हाची परिस्थिती काय होती ? जनता कोणत्या अवस्थेतून जात होती ? लोकांची मन:स्थिती काय होती ? असे गांधीहत्या या घटनेशी संबद्ध प्रश्न त्यांच्या मनात उभे राहात. आजही राहतात.

मी गांधीहत्येतील एक दंडित. सुटकेसाठी मी न्यायालयात प्रयत्न करी, त्याला वृत्तपत्रे आणि पुष्कळदा नभोवाणीसुद्धा प्रसिद्धी देई. माझा उल्लेख यथार्थपणे गांधीहत्या अभियोगातील दंडित म्हणून केला जाई. माझ्या सुटकेचे वृत्तही सर्वत्र दिले गेले होते. परिचित किंवा अपरिचित व्यक्तींनी मी सुटल्यावर माझ्याकडून आपली जिज्ञासा पुरवून घेण्याची इच्छा व्यक्त करावी हे स्वाभाविकच होते.

बंदिवास भोगलेल्यांची चरित्रेही अनेकांनी वाचली आहेत. ती बहुतेक ब्रिटिशांच्या राजवटीतील होती. मी स्वराज्यात बंदिवास भोगला होता. त्यात पुन्हा गांधीजींच्या तत्त्वज्ञानाचे संस्कार बहुधा प्रत्येक आठवड्याला लोकांवर केले जात होते. मी बंदिवास भोगला तो कसा होता ? गांधीजींचे तत्त्वज्ञान आणि ते तत्त्वज्ञान लोकांवर संस्कारित करणाऱ्या शासनाचा व्यवहार, यात मेळ होता काय ? हृदयपरिवर्तन केले गेले काय ? संस्कारांनी ते आपोआप झाले काय ? शिक्षेच्या भयानकतेने मत बदलले काय ? ज्यांना शिक्षा झाल्या त्या सर्वांवर गांधीजींच्या तत्त्वज्ञानाचा किंवा शासनाच्या व्यवहाराचा काय परिणाम झाला ! खायला काय देत असत ? मारपीट करीत असत ? भेटी होत असत काय ? सूट मिळे काय ? सुट्टी (फर्लो) मिळत असे काय ? अशा प्रकारचे माझ्या कारावासाशी संलग्न प्रश्नही मला विचारले जातात. प्रश्न बहुधा तत्त्वज्ञान आणि व्यवहार यांच्या तुलनेसाठी विचारले जात.

गांधीहत्या या घटनेला राजकीय आणि ऐतिहासिक महत्त्व असल्याने त्यातील 'काय झाले' हे कळण्याची जिज्ञासा गांधीजींवर श्रद्धा असणाऱ्यांना, श्रद्धा नसणाऱ्यांना, इतिहास वाचणाऱ्यांना, चिकित्सकतेने वाचणाऱ्यांना सारखीच आहे. मला थोड्याच दिवसांत त्याची कल्पना आली.

एक उत्तरदायी नागरिक या नात्याने स्वत:च्या सीमा ओळखून आणि नागरिक या नात्याने मला मिळालेल्या भाषण आणि लेखनस्वातंत्र्याचा उपयोग करून जिज्ञासूंचे कुतूहल पुरे करावे असे मला वाटू लागले. पण या विषयावर मी तोंड आणि लेखणी उघडण्यापूर्वी एका

कल्पित निमित्ताने मला अकल्पितपणे पकडले. तो एक वर्षाचा बंदिवास मी भोगला.

पुन्हा बाहेर आल्यावर मी माझ्या विचारांना कृतीत उतरवू लागलो. काही लेख लिहले. 'पैंजण मासिकाचे संपादक श्री. ग. वा. बेहेरे यांचा आणि माझा, श्री. अ.ज. करंदीकर यांच्या वादग्रस्त लेखांमुळे परिचय झाला होता. श्री. बेहेरे यांना मी माझे लेख दाखविले.

संपादकीय दृष्टिकोनातून त्यांनी लेख तपासले; कारण त्यांना मासिक चालवायचे होते, थांबवायचे नव्हते ! खरोखरीच त्यात काही आक्षेपार्ह नाही, कोणाला डिवचून चिडवले नाही, न्याय्य शिक्षेसंबंधी कुरकुर केलेली नाही, गांधीजींसंबंधी अनुदार उद्‌गार नाहीत, पण त्याचबरोबर इतिहासाशीही कोठे प्रतारणा केलेली नाही, हे पडताळून त्यांनी लेख प्रसिद्ध करण्याचा पत्कर घेतला.

केवळ नावामुळेच पुष्कळदा पूर्वग्रह होतात. त्याला काही विकृत तर काही अर्धवट पार्श्वभूमी कारण असते. मी कसा आहे हे लोकांना कसे कळणार ? त्यांना ते कळावे असे मला वाटत होते. कोणी मला भेडसावू नये तसेच कोणी मला भिऊही नये ही माझी इच्छा होती. माझे लेख लोकांसमोर आणून मी कसा आहे ते श्री. बेहेरे यांनी लोकांना दाखविले. त्यांनी मला समाजात स्थान दिले. समाजात उभे केले; अगदी शांतपणे, सावकाशपणे. मला शासनाने सोडले ते माझे याच समाजात पुनर्वसन होण्यासाठी. शासनाची तशी इच्छा असते. शासनाचा एक लहानसा विभाग सुटलेल्या बंद्यांच्या पुनर्वसनाची खटपट करतो. श्री. बेहेरे यांनी ते कार्य केले आहे.

हे लेख मी लिहिले. त्या अर्थाने मी लेखक आहे. पण 'लेखक' याची एक व्याख्या केली जाते. गाणे म्हणताना गायकाने, स्वर, लय, ताल, चढ-उतार इत्यादींचा समन्वय आणि बंधन पाळावे अशी श्रोत्यांची अपेक्षा असते. लेखकानेही आपल्या लिखाणात सौंदर्याची तंत्रे सांभाळून आपले मन वाचकाला कळवावे अशी वाचकांची अपेक्षा असते.

केळीचे एक पान उमलते तो त्यात दुसरे असते. ते विकसित होताच त्यातून तिसरे पान डोकावते. त्याप्रमाणे एका विचारातून दुसरा विचार इतक्या सहजतेने मांडला जावा की, वाचकाला आपले मानसिक स्थलांतर केव्हा झाले हे कळूच नये, हे लेखकाचे कौशल्य. वाचकांची तशी अपेक्षा असते.

राखलेल्या उद्यानात झाडांच्या सरळ रांगा, फुलझाडीचे वर्गवारीने वाफे, रेखीव रस्ते, योजनाबद्ध पाट, गवताने आच्छादलेल्या भुईचे भूमितीच्या आकृतीतील गालिचे, त्या गालिच्याच्या प्रमाणबद्ध फुलेरी कडा, याने माणसे मोहून जातात. लेखकाने असे राखलेले उद्यान आपणापुढे ठेवावे अशी वाचकांची अपेक्षा असते.

'लेखक' या व्याख्येत मी कुठे उभा राहतो ठाऊक नाही. पण मी त्या वर्गातला

लेखक नाही, हे मी जाणतो. ते मला मोठे संरक्षण आहे. वाचक त्या मानानेच माझ्याकडून अपेक्षा ठेवतील.

रेखीवपणाचा ताळमेळ नसलेले ते रान. वाऱ्याने भिरकावलेले बीज कुठेही पडावे, निसर्गाने ते मातीत गाडावे, आकाशाने त्यावर पाणी ओतावे. पडल्या ठिकाणीच त्या बीजाने अंकुरावे; त्याचे कधी रोपटे व्हावे तर कधी वृक्ष, कोणते झाड कुठे उगवावे याचा नियम नसावा. निसर्ग देईल ती जागा आणि देईल ते संरक्षण अशा अनियमित निसर्गनियमाने असंबद्धपणे वाढते ते रान.

सुचलेल्या विचारांना राखीव उद्यानाचे स्वरूप देण्याची मी खटपट केली नाही. जसे उत्पन्न होतील तसे विचार उगवू दिले. ते त्या ठिकाणीच ठेवले. या अनियमित अरण्यानेही वाचकांची जिज्ञासापूर्ती होऊ शकेल असे वाटले, तेव्हा ते लोकांसमोर ठेवले. नेहमी नगरातील नळाच्या पाण्याची सवय असली तरी रानांतल्या झऱ्यावर पाणी प्याल्याने तहान भागणार नाही असे थोडेच आहे !

एकोणीस - वीस वर्षे हा काही लहान काल नव्हे. या अवधीत माझ्या स्मृती अंधुक झाल्या. पुसट झाल्या. काही तर पूर्ण धुतल्या गेल्या. पण त्या बाहेरच्या स्मृती. ज्या प्रकरणात मी जवळजवळ अठरा वर्षे बंदिवासात होतो, त्या प्रकरणाशी संलग्न स्मृती, अठरा - वीस वर्षांपूर्वीचे सुस्थितीतील छायाचित्र आज जितके स्पष्ट दिसेल तितक्या स्पष्ट आहेत. त्याचे कारण होते. बंदिवासाचे कारण काय तर अमुक हे प्रत्येक घटकेला मनात जाणवत होते. मनावर आणखी काही चित्रे उमटण्यास अवसर नव्हता. उमटलेले चित्र पुसले गेले नाही. त्यात पुन्हा शासनही अधूनमधून आठवण देत असे,' तू गांधीहत्याकांडातील दंडित आहेस.' ते चित्र मग पुसले कसे जाणार ?

एका परीने ते बरे झाले ! 'इतिहास' जतन करून ठेवला गेला. तो जसाच्या तसा बघताना वाचकांना, विशेषतः इतिहासाच्या अभ्यासकांना, त्यातून नवीन मनोविश्लेषणात्मक विचार सुचतील. गांधीजींच्या जीवनाशी त्यांचा मृत्यू निगडीत होता, त्या मृत्यूच्या दुर्दैवी घटनेशी मी निगडीत होतो. म्हणून गांधीजींच्या जीवनाच्या अंतिम पर्वाचेच हे पान आहे. नियतीने माझा त्याशी संबंध जोडला. म्हणून त्या इतिहासस्वरूप पृष्ठाचे नाव आहे, 'गांधी हत्या आणि मी !'

卐 卐

पुन्हा एकदा

लेखन स्वातंत्र्याच्या मंचावरून आज 'गांधीहत्या आणि मी' वाचकांसमोर नव्याने येत आहे. पहिली आवृत्ती दि. १२-१०-१९६७ ला प्रसिद्ध झाली. जवळजवळ दोन महिन्यांनी दिल्ली शासनाने पुस्तकावर बंदी घातली. एका राज्याच्या बंदीकरण आदेशाची कक्षा हिंदुस्थानभर असल्याने पुस्तकाच्या पुनरावृत्तीची योजना कुंठित झाली.

दि. २५-१-१९६८ ला माझ्या घराची झडती झाली आणि एक प्रत आरक्षींनी स्वाधीन घेतली. दि. २७-१-१९६८ ला श्री. बेहेरे यांच्या 'अस्मिता प्रकाशन' च्या कार्यालयातून दोन प्रती समपहृत झाल्या.

जन्मठेप या शिक्षेतून सुटकेसंबंधीचे धोरण शासनाने माझ्यासाठी अत्यंत प्रतिशोधात्मक किंवा सूडबुद्धीने आणि क्रूर ठेवले होते याचा वृत्तान्त माझ्या या पुस्तकात आला आहेच. गांधीहत्येतील दंडित म्हणून प्रावकाश नाही, गांधीहत्येतील दंडित म्हणून रक्तदान खरे घ्यायचे आणि पदरात सूट खोटी टाकायची आणि वर पांढऱ्या टोप्या घालून दंडितांनाही सद्वर्तनाचा उपदेश करीत फिरायचे, असला दांभिक व्यवहार शासनाधिष्ठित महाभागांनी केला. माझ्या भावना कटू केल्या गेल्याने मी गांधीहत्येच्या कारणमीमांसेसहित सर्व विषय चिडून लिहिले असते तर ते समर्थनीयच ठरले असते. परंतु सर्व मनस्ताप गिळून मी फार संयमाने विषयाची मांडणी केली होती.

गांधीहत्येच्या संबंधात एकच बाजू आज वीस - बावीस वर्षे लोकांना आग्रहपूर्वक सांगितली जात आहे. कटाशी संबंध असणाऱ्यांचे म्हणणे काय होते हे इतिहास या दृष्टीने लोकांसमोर मांडण्यात मी कोणाचा अपराध करीत नव्हतो. कटातील सर्व दंडितांनी आपापल्या शिक्षा भोगल्या. एक नव्हे, दोन व्यक्तींना फाशी दिले गेले. आडमाप जन्मठेप भोगून घेतल्या गेल्या. अधिकृतपणे हे दंडित मुक्त झाले. त्यामुळे या इतिहासकथनाने लोकांची सहानुभूती मिळवून शिक्षेत शिथिलता आणण्याचा प्रश्न नव्हता. इच्छा एवढीच होती की, दंडितांकडे तिरस्काराने बघण्यास शिकविले गेले आहे; लोकांनी त्या वेळच्या राजकीय परिस्थितीची कल्पना करून या सर्व घटनेकडे बघावे, मग त्यातून कोणास तिरस्कार स्थिर ठेवण्याचा असला तर सुखाने ठेवावा.

पुस्तक वाचल्यानंतर अनेक जणांनी एकाच घटनेची दुसरी बाजू उजेडात आणली म्हणून धन्यवाद देणारी पत्रे धाडली आहेत. आजपर्यंत झालेल्या एकांगी प्रचाराने वस्तुस्थिती कशी दडपून ठेवली होती याचेही वृत्त अनेकांनी कळविले.

शासनाला परिणामाची कल्पना होती हे गृहीत धरलेच पाहिजे. त्यामुळे गांधीजींमध्ये नसलेले गुण त्यांना चिकटवून त्यांच्या नावाचे भांडवल करून स्वत:चे आसन स्थिर ठेवण्याचा

धंदा करणाऱ्यांचे व्यवसायस्वातंत्र्य (?) अबाधित राहावे, त्याला जराही धक्का लागू नये अशा व्यापारी हेतूने ही बंदी घातली गेली, असा निष्कर्ष निघतो. तसेच गांधीहत्या अभियोगातील दंडिताशी मितीआड केलेला आपला दुर्व्यवहार तो दंडित मितीबाहेर आल्यावर लोकांसमोर येऊ नये हा सराईत दंडितात कोठे कोठे असणारा दडेली व्यवहार या बंदीकरणामागे होता.

बंदीकरणाला निमित्त दाखवले गेले, पुस्तक हिंदुस्थानातील हिंदू आणि मुसलमान यांच्यात वैमनस्य निर्माण करते.

पुस्तकाच्या नैर्बंधिकतेविषयी माझा विश्वास होता, तसाच श्री बेहेरे यांचाही. न्यायालयातून ती निर्दोषता सिद्ध करून घेण्याच्या प्रयत्नात आम्ही होतो. सर्वश्री माधवराव पाठक, मोहनराव जोशी, माधवराव परांजपे, तसेच त्यांचे सहाय्यक श्री. कामथ, श्री. टिपणीस आदी विधितज्ज्ञांनी आम्हाला मोलाचे सहाय्य दिले. श्री. माधवराव परांजपे यांनी अभिवक्तव्य केले.

त्यांच्या अविश्रांत श्रमाचे फळ म्हणजे दि. ६-८-१९६९ चा मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय. भाषणस्वातंत्र्याच्या प्रश्नावरील या निर्णयाचे महत्त्व संविधानाने व्यक्तीला आश्वासिलेले अधिकार स्थिर ठेवण्याच्या दृष्टीने अतिशय आहे. न्यायमूर्ती मोदी, न्यायमूर्ती ब. शां. देसाई आणि न्यायमूर्ती चंद्रचूड यांचे न्यायासन होते. न्यायमूर्ती चंद्रचूड यांनी निर्णयपत्र लेखापित केले आहे. न्यायप्रक्रियेच्या इतिहासातही या निर्णयपत्राची नोंद झाल्याबाचून राहणार नाही इतकी महती मुद्रणस्वातंत्र्याच्या या प्रश्नाची आहे. शासनाचा आक्षेप आणि पुस्तकाची अनाक्षिप्तता पडताळण्यासाठी वाचकांनी न्यायपत्राच्या श्री. वि. श्री. जोशी यांनी केलेल्या सारांशावरून दृष्टी फिरवावी. मुद्रण - स्वातंत्र्याचा, लेखन - स्वातंत्र्याचा आमचा अधिकार न्यायालयाने संमोदित केला आहे. संविधानाने उभारलेल्या या मूलभूत मंचावर उभे राहून या ठिकाणी हेही सांगणे स्थलोचित होईल की शासनाने यापुढे सत्तांध बनून आणि पूर्वग्रहाचे विकारी होऊन असल्या क्षुद्र कृती करू नयेत.

पुस्तकात काहीही परिवर्तन केलेले नाही. त्या दृष्टीने काही सूचना खरोखरीच विचारार्ह होत्या; पण त्या दूर ठेवणे भाग पाडले. नथुरामचे मृत्यूपत्र मूळ स्वरूपात बघण्याची वाचकांची इच्छा मात्र छायाचित्राच्या माध्यमाने पुरी करता येत आहे. मराठी अनुवादही मुद्रित केला आहे.

शासनाने मला या संघर्षात ओढले त्याचा परिणाम म्हणून माझ्यावर वाचकांच्या-प्रमाणेच अधिवक्त्यांच्या आणि आणखी सहाय्यभूत व्यक्तींच्या ऋणाचा भार वाढला आहे, तो मी नम्रतापूर्वक वाहत आहे.

दि. २४-९-१९६९ गोपाळ विनायक गोडसे

मृत्युपत्र

प्रिय बंधो, चि. दत्तात्रय वि. गोडसे

माझ्या विम्याचे पैसे आले तर त्याचा विनियोग घरच्या कामी करणे. रु. २००० आपल्या पत्नीला, रु. ३००० गोपाळच्या पत्नीला आणि रु. २००० आपल्याला माझ्या मृत्यूनंतर मिळावेत असा मी विम्याच्या कागदपत्रांवर लेख केला आहे.

माझी उत्तरक्रिया करण्याचा अधिकार आपणास मिळाल्यास कोणत्याही प्रकारे ते काम करावे, परंतु माझी एकच विशेष इच्छा इथे लिहीत आहे.

जिच्या तीरावर प्राचीन द्रष्ट्यांनी वेदरचना केली ती सिंधू नदी आपल्या भारतवर्षाची सीमारेषा आहे.

ती सिंधू नदी ज्या शुभ दिवशी पुन्हा भारतवर्षाच्या ध्वजाच्या छायेत स्वच्छंदतेने वाहत राहील त्या दिवसात माझ्या अस्थींच्या रक्षेचा काही अंश त्या सिंधू नदीत प्रवाहित केला जावा.

ही माझी इच्छा सत्यसृष्टीत येण्यासाठी आणखी एक - दोन पिढ्यांचा कालावधी लागला तरी चिंता नाही. त्या दिवसापर्यंत तो अस्थींचा अवशेष तसाच ठेवा आणि आपल्या आयुष्यात तो शुभदिवस आला नाही तर आपल्या वारसांना माझी इच्छा सांगत राहा.

माझे न्यायालयातील वक्तव्य शासनाने कधी बंधमुक्त केले तर त्याच्या प्रकाशनाचा अधिकार मी आपल्याला देत आहे.

१४-११-४९ **नथुराम वि. गोडसे**

न्यायालयाची मुद्रा

अभिप्रमाणित

दंडाधिकारी, प्रथम वर्ग (स्वाक्षरी)

मी आज १०१ रुपये आपणास दिले आहेत ते आपण सौराष्ट्र सोमनाथ पुनरुद्धार होत आहे, त्याच्या कळसाच्या कार्यासाठी धाडून द्यावेत.

नथुराम वि. गोडसे

१५-११-४९ : सुप्रभात ७। वाजता

(दि. १५ नोव्हेंबरच्या नथुरामच्या स्मरणासाठी घरी जमणाऱ्या लोकांना हे मृत्यूपत्र

सांगितले जाते. शासनाचे आरक्षी अधिकारी अनुज्ञेने उपस्थित असतात.)

रुपये १०१ नथुरामच्या इच्छेप्रमाणे सोमनाथ पुनरुद्धार मंडळाला धाडले होते. त्याची पोहोच कै. न. वि. गाडगीळ यांच्या हातची आहे. (लेखक)

卐 卐

निर्णयपत्र

मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या सर्वसंमत निर्णयपत्राची २१७ टंकित पाने आहेत. विधिविषयक चर्चा, आक्षिप्त भागासहित पुस्तकातील प्रकरणांचा सारांश, शासनाने घेतलेल्या आक्षेपांचे निराकरण, अभिवक्तव्यात घेतल्या गेलेल्या आक्षेपांना उत्तर, असे ठळक भाग न्यायपत्राचे आहेत. श्री. वि. श्री. जोशी यांनी केलेल्या भाषांतराचा महत्त्वाचा भाग येथे दिला आहे.

'पुस्तकाचा मुख्य विषय, लेखकाने सर्वसाधारणपणे वापरलेल्या भाषेचे स्वरूप, तिचा रोख आणि प्रभाव, इतिहासातील घटनांचे, हिन्दू तत्त्वज्ञानाच्या शाश्वत तत्त्वाचे आणि पौराणिक गोष्टीचे लेखकाने दिलेले भरपूर संदर्भ, त्यातील उपमा, उत्प्रेक्षा, गर्भित अर्थ ह्या आणि इतर प्रकारच्या वाक्प्रचारांचा त्यानं केलेला पुष्कळसा अनिर्बंध उपयोग यांच्यामुळे लेखकाच्या भाषेत निर्माण झालेले सामर्थ्यच नव्हे, तर शैलीचे निश्चित सौंदर्य आणि वाचकांनी आपल्या कथनापासून घ्यावा असं त्याला वाटतं, तो बोध किंवा पुस्तकाच्या लक्षपूर्वक वाचनानं घेणं शक्य आहे तो बोध यांची कल्पना यावी म्हणून आम्ही पुस्तकातील लिखाणाचं आतापर्यंत विश्लेषण केलं आहे.

आम्ही ह्या पुस्तकाचा सर्वांगीण विचार केला आहे. परंतु 'हिन्दू आणि मुसलमान ह्यांच्यात वैमनस्याची आणि द्वेषाची भावना फैलावणारं लिखाण त्यात आहे' ह्या म्हणण्याशी सहमत होण्यास आम्ही असमर्थ आहोत, असंच आम्हाला वाटतं. आमचं स्पष्ट असं मत आहे की, त्यात तसलं लिखाण नाहीच. १५३ अ या भारतीय दंड विधानाच्या धारेखाली ज्याच्या प्रकाशनामुळे शिक्षा होईल असं लिखाण तर त्यात निश्चितच नाही. तसं सांगण्याचं झालं तर हिन्दू आणि मुसलमान ह्यांच्यात शत्रुत्व किंवा द्वेष निर्माण व्हावा, या हेतूनं लिहिलेलं काहीही लिखाण त्यात नाही याविषयी आमचं समाधान झालेलं आहे. पुस्तक जर सरळ अर्थानं वाचलं तर लेखकाचासुद्धा तसा हेतू नाही. अर्थात लेखकाच्या अशा हेतूनं जर असलं लिखाण स्वतंत्रपणे विचार केल्यावर १५३ अ ह्या धारेखाली येणार असेल, तर काही अर्थ नाही हे पण ह्याच वेळी सांगितलं पाहिजे.

राजद्रोहीच्या आज्ञेत घेतलेला पुस्तकावरील आक्षेप साधार आहे काय ? ते प्रथम

म्हणजे त्याचा विषय काय ते पाहून ठरविता येईल. स्थूलमानानं पाहता याचा विषय गांधीजींची हत्या हा आहे. पण असं म्हणणं हे केवळ अत्यंत ढोबळ स्वरूपात हा मुद्दा सांगणं होय. कारण, कट कुठं कुठं आणि का झाला, प्रार्थनासभेतील शेवटी गांधीजींच्या मृत्यूत परिणत पावणारी प्रत्यक्ष घटना, तपासाची दिशा, न्यायालयाचे निर्णय, फाशीच्या शिक्षेची प्रत्यक्षता, तीन आरोपींचा बंदिवास आणि सुटका, ह्याचं पुस्तकात निर्विकार वर्णन आहे असं नाही. ह्या घटनांच्या धाग्याभोवती लेखकाने आपला प्रतिपाद्य विषय गुंफला आहे.

पुस्तकामधील मुख्य विषय

पुस्तकातलं मुख्य प्रेरणा देणारंच काय, पण कदाचित निर्णायक प्रभाव पाडणारं मध्यवर्ती प्रतिपादन त्यात हे आहे की, गांधीजींचा वध हे काही एखाद्या माथेफिरूचं कृत्य नव्हतं. ती एक राजकीय हत्या होती आणि तिचं कारण मुसलमानांचा काहीही मूल्य देऊन आपण अनुनय केला पाहिजे ह्या गांधीजींनी अखंडपणे अंगिकारलेल्या मनोवृत्तीत होतं. देशाची फाळणी झाली आणि तिच्यामुळं उद्‌भवलेल्या हाहाःकारातही गांधीजींनी मुसलमानांचा अनुनय तसाच ठेवला. पाकिस्तानी टोळ्यांच्या काश्मीरवरील स्वारीमुळं हिंदुस्थान सरकारनं पाकिस्तानचे पैसे देण्याचं नाकारलं, पण १३ जानेवारी १९४८ ला अंशतः सरकारला ती रक्कम देण्यास उद्युक्त करण्यासाठी गांधीजींनी उपोषण केले आणि (पाकिस्तानला) ५५ कोटी रुपये देण्याचं ठरल्याचं सरकारनं घोषित केल्यावर गांधीजींनी उपोषण सोडलं. पुस्तकाचा प्रतिपाद्य विषय हा की, गांधीजींची हत्या हे देशाची फाळणी करण्याच्या निर्णयाचं आणि वरील पैसे पाकिस्तानला देण्याचं मूल्य आहे.

इतरही विषयांनी पुस्तकाचा बराचसा भाग व्यापलेला आहे. नवव्या 'दूरत्वाचे दिवस' ह्या प्रकरणात लेखकाची पत्नी सिंधू हिला त्याच्या अनुपस्थितीत भोगाव्या लागलेल्या हालअपेष्टांचा हृदय हेलावणारा वृतांत आहे. ह्यात प्रतिपादन हे आहे की, गांधीजींच्या हत्येसारख्या राष्ट्रव्यापी अपराधात अंग असलेल्या मनुष्याच्या बायका - मुलांस एक प्रकारची अप्रत्यक्ष शिक्षा भोगावी लागली.

दंडितांचं कारागरातील जीवन, अधिकाऱ्यांची सहानुभूतिपूर्ण वागणूक आणि बंदिवानाच्या एका विशिष्ट वर्गाविषयी सरकारचं खुनशी धोरण हा एक विषय ह्या पुस्तकात दिला आहे.

ह्या पुस्तकाचा भर हिन्दुस्थानातील हिंदू आणि मुसलमान राजकीय संबंधांवर नाही. प्रचलित काळातील जातीय संबंधाच्या प्रश्नाचा तर ते मुळीच विचार करीत नाही. अविवाद्य अशा ऐतिहासिक घटनेचं त्यात विवरण आहे. लेखकानं इतिहासाला विकृत स्वरूप दिलेलं नाही, त्याविषयी आमचं समाधान झालं आहे.... प्रकाशकाचं म्हणणं आहे की, गांधीहत्या

हा आता इतिहास आहे, या आपत्तीची खरी कारणं कोणती ते पाहण्याचा त्यात प्रयत्न केलेला आहे आणि हे म्हणणं पुष्कळसं रास्त आहे. पुस्तकाचा प्रतिपाद्य विषय मुसलमान हे वास्तवत:च परके आहेत आणि त्यांच्या अन्याय्य मागण्या ठोकारण्यासाठी हिन्दूंनी सज्ज झालं पाहिजे हा आहे, हे ॲडव्होकेट जनरल ह्यांचं म्हणणं मान्य करू शकत नाही.

हे झालं पुस्तकाच्या प्रतिपाद्य विषयासंबंधी. पण उपमा, उत्प्रेक्षा, गर्भित अर्थ यांविषयी म्हणायचं तर ती असंख्य आहेत, इतकी की त्यांची मोजदाद करणंच आम्ही सोडून दिलं. पण ह्या गोष्टीचा उपयोगही गांधीजींच्या अनुनयाच्या धोरणातून पाकिस्तानची निर्मिती झाली आणि त्या अनुनयाच्या वेदीवर त्यांचा बळी पडला ह्याच संदर्भात केलेला आहे.

लेखकाची भाषा

पुस्तकातील भाषा उपमा, उत्प्रेक्षा आणि इतर भाषालंकारांनी परिपूर्ण अशी आहे. त्यांच्या योगानं लेखकाची भाषा मनोवेधक आणि जडही झाली आहे. ले. गव्हर्नर म्हणतात की, आपल्या संस्कृतच्या ज्ञानामुळं संस्कृतप्रचुर भाषेत लिहिलेलं मराठी वाचणं आणि अशा लिखाणाचं तथ्य कळणं त्यांना शक्य झालं आहे. आता मराठी भाषा आम्हाला तशी चांगली समजते; पण तरीही पुस्तकांतील कित्येक उतारे आक्षेपार्ह स्वरूपाचे आहेत असं का म्हणण्यात आलं आहे हे समजण्यासाठी आम्हाला ते विशेष लक्षपूर्वक वाचावं लागलं. सर्वसाधारण वाचकास पुस्तकातील शब्दसंपत्तीचं आकलन करून घेण्यास इतका वेळ किंवा इतकं ज्ञानही नसतं. पुस्तकातील एखाद्या ठिकाणचं आगलावं लिखाण उकरून काढण्याकरिता तर आम्हाला त्यात खोलवर शिरावं लागलं.

पुस्तकाला बोध असा नाहीच, कदाचित अनुनयानं देशाचा काहीही लाभ होत नाही हा बोध अभिप्रेत असला तर निराळी गोष्ट. लेखकाला त्यातून काहीही तात्पर्य काढायचं नाही.

महत्त्वाच्या उताऱ्यापैकी एक 'शोध' ह्या प्रस्तावनेत आहे. तीतील सर्व उतारे आम्ही उद्धृत केले आहेतच. त्यातून वाचकाच्या मनावर प्रकाशकाला बिंबवायचं आहे ते हे की, वधकऱ्यानं गांधीजींचा वध वैयक्तिक हेतूनं केला नाही तर गांधीजींच्या धोरणानं देशाची फाळणी झाली म्हणून. 'सावरकर आठवतील', असं म्हणताना त्याला म्हणायचं आहे की, हिन्दूस्थान एक आणि अखंड ठेवण्यावर सावरकरांचा कटाक्ष होता. तेव्हा ज्यांची घरंदारं फाळणीच्या रक्तपातात गेली त्यांना सावरकर आठवतील आणि नथुराम आठवेल तो वरील कारणांमुळे. अर्थात ह्यावरून प्रकाशकाच्या आणि लेखकाच्या प्रतिपादनाशी आम्ही सहमत आहोत असे कोणी समजता कामा नये हे स्पष्ट केलं पाहिजे. उलट आमचं स्वत:चं तर मत असंच आहे की, गांधीजींनी शेकडो हिन्दुंचे आणि मुसलमानांचे प्राण वाचवले होते, पाकडे कोणत्याही इतिहासकाराला दुर्लक्ष करता येणार नाही ! पण पुस्तकासंबंधी आक्षेप आहे तो

हिन्दू आणि मुसलमानांत वैमनस्य फैलावणारं लिखाण त्यात आहे हा आणि तो आक्षेप सिद्ध होतो काय तेच फक्त आम्हाला पाहावयाच आहे.'

विद्वान ॲडव्होकेट जनरलनी असंही प्रतिपादन केलं की, हे पुस्तक 'सत्याचा शोध' आहे आणि आपण इतिहास सांगत आहो हा लेखक नि प्रकाशक ह्यांचा दावा सर्वस्वी खोटा आहे. पण हे म्हणणं मान्य करणं कठीण आहे. पुस्तकाचा उद्देश इतिहास विकृत करून नथुरामचा उदोउदो करणं आणि त्या योगानं हिन्दू-मुसलमानांत वैमनस्याची भावना पसरवणं हा नाहीच.

इतिहास विकृत केला नाही

आता ह्या मुद्यावर आलोच आहोत, तर गांधीजींचा उपवास आणि पाकिस्तानला द्यावयाचं देणं ह्यांच्यातील कार्यकारणभाव दाखविण्यास लेखकास काही आधार आहे काय ते पाहू या. ॲडव्होकेट जनरल म्हणतात की, गांधीजींनी तो उपवास दुसऱ्याच कारणासाठी केला होता आणि म्हणून लेखकाने आपल्या सोयीसाठी इतिहासच ह्या गोष्टीत विकृत केला आहे. पण लेखकाने पुस्तकात 'इंडियन इन्फर्मेशन' च्या २ फेब्रुवारी १९४८च्या अंकातील उतारे दिले आहेत. यावरून सरदार पटेल आणि श्री. षण्मुखम् चेट्टी ह्यांनी काश्मीर प्रश्न सुटेपर्यंत पाकिस्तानला पैसे देऊ नयेत असं म्हटलं होतं आणि तो निर्णय नंतर मागे घेतला गेला, तो गांधीजींच्या विनंतीवर असं दिसून येतं. त्यामुळे गांधीजीच पैसे देण्यास सरकारला उद्युक्त करण्यासंबंधात उत्तरदायी आहेत, असं ह्या आधारावर लेखकानं म्हटलं तर त्यात त्यानं इतिहासातील घटना आपल्या सोयीसाठी विकृत केली आहे असं आम्हाला वाटत नाही.'

'प्यारेलाल यांच्या Mahatma Gandhi : Last Phase' ह्या पुस्तकाकडेही आमचं लक्ष वेधण्यात आलं होतं. आपल्या पुस्तकात ७११ पानावर प्यारेलाल म्हणतात की, उपोषण सुरू झाल्यावर चोवीस तासात हिन्दुस्थान संघराज्याचं मंत्रिमंडळ बिर्ला हाऊसच्या हिरवळीवर गांधींच्या भोवती रोख शिलकीतील पाकिस्तानच्या भागाच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी जमलं. दि. १५ ला सरकारने ५५ कोटी रुपये लागलीच देण्याचं ठरविल्याचं घोषित केलं..... गांधीजी म्हणाले की, त्या निर्णयामागील हेतू माझा उपवास हाच होता.

हा प्यारेलाल ह्यांचा वृत्तात इतक्या विस्तृतपणे आम्ही दिला आहे कारण पुन्हा पुन्हा आमच्यापुढं असं प्रतिपादण्यात आलं की लेखकानं इतिहास विकृत केला आहे. श्रीयुत प्यारेलाल ह्यांच्याच पुस्तकावरून आवेदकाचं म्हणणं पुष्कळसं साधार ठरतं. त्यामुळं उपवासासंबंधी किंवा घटनांसंबंधी त्यानं इतिहास विकृत केला असा आरोप करता येत नाही.

आता नथुरामसंबंधीच्या उताऱ्याचा आपण विचार करू. ते उतारे असं दाखवतात

की, नथुरामशी संबंध आलेल्या सर्वांना त्याच्याविषयी व्यक्ती म्हणून आदर वाटत असे. लेखक म्हणतो की, तुरुंगाच्या अधिकाऱ्यांनी त्याला नीट वागवलं, न्यायाधीशांनी त्याची वाहवा केली. न्यायालयातील प्रतिष्ठित स्त्रियांना हुंदके आले आणि त्यांनी अश्रू ढाळले. त्यांनी त्याच्यासाठी स्वेटर विणले, दुसऱ्या काही उताऱ्यात सरदार पटेलांविषयी त्यांनी आरोपींना 'ब' वर्ग दिला म्हणून कृतज्ञता व्यक्त केलेली आहे. ह्या उताऱ्यासंबंधी आक्षेप हा आहे की, नथुरामच्या कार्याविषयी सरदार पटेलांसारख्या कट्टर काँग्रेस चाहत्यांनाही सहानुभूती होती असं ते दाखवितात.

आता पहिल्या उताऱ्यातील घटना कपोलकल्पित आहे असं आम्हाला दाखविण्यात आलेलं नाही. खरं म्हणजे पंजाबच्या वरिष्ठ न्यायलयात ज्यांच्यापुढं पुनर्न्यायाचं काम चाललं त्यांच्यापैकी एक न्यायाधीश श्री. जी. डी. खोसला ह्यांनी आपल्या 'मर्डर ऑफ द महात्मा' ह्या पुस्तकात जे म्हटले आहे, त्यावरून नथुरामविषयी इतरांच्या काय भावना होत्या त्याविषयीचे पुस्तकातील संदर्भ खरेच ठरतात.

सरदार पटेलांसंबंधीच्या उताऱ्याविषयी म्हणायचं तर प्यारेलालच्या पुस्तकावरून आणि मौलाना आझाद ह्यांच्या 'India Wins Freedom' ह्या पुस्तकावरून सरदार पटेलांचा पाकिस्तानला रोख देणं देण्यास कसून विरोध होता, असंच स्पष्ट होतं असं दिसतं.

अर्थात आरोपींना 'ब' वर्ग सरदार पटेल ह्यांच्या आपुलकीमुळे मिळाला हा तर्क समर्थनीय आहे की नाही ते सांगता येत नाही. पण तो निश्चित असत्यच आहे असं समजण्यालाही स्पष्ट कारण दिसत नाही. दुसरं म्हणजे त्या समजुतीमुळे नथुरामचं कृत्य स्तुत्य होतं असं पटेलांचं मत होतं असा काही अर्थ निघत नाही.

ॲड. जनरल ह्यांचं म्हणणं आहे की, नथुरामचा गौरव करण्यात लेखकाचा हेतू तो आणि गांधीजी हे एकाच पातळीवरचे आहेत किंबहुना नथुरामचं स्थान अधिक वरचं आहे असा दाखविण्याचा प्रयत्न आहे. अर्थात पुस्तकात मध्यवर्ती सूत्र हे आहे. नथुरामचं कृत्य त्याच्या हेतूपासून निराळं काढलं पाहिजे. एखाद्याचं कृत्य धिक्कार करण्यासारखं असलं तरी हेतू स्तुत्य असू शकतो, परंतु ॲडव्होकेट जनरल ह्यांनी काढलेला अर्थ मात्र फार ओढून-ताणून काढल्यासारखा आहे. सर्वसाधारण वाचकांच्या आवाक्यात असं घडणार नाही.

७६, ११७ आणि १२९ पानांवरील पुस्तकातील उताऱ्यांचा आणखी गट आहे. ह्या उताऱ्यातील लिखाणात हे सगळ्यात दुष्ट लोक आहेत, ते हिन्दुस्थानच्या ऐक्याचे विरोधक आहेत, आणि स्वातंत्र्य चळवळीलाही त्यांचा विरोध होता असंच प्रतिपादण्याचा लेखकाचा हेतू आहे असं आमच्यापुढे सांगण्यात आलं. आता लेखकानं मुसलमानांनी हिन्दुस्थानच्या स्वातंत्र्याला विरोध केला असं म्हटलं आहे खरं, पण सावरकरांनी 'याल तर तुमच्यासह' ह्या सूत्रबद्धवचनात हे सत्य सांगितलं असून रा. स्व. संघाला स्वातंत्र्यातील अडथळे दूर करणारा

एक समर्थ हिन्दू समाज बनवायचा होता असंही लेखक म्हणतो. असले तुटक उतारे हिन्दू - मुसलमान वैमनस्य पसरवतील ह्याच्याशी सहमत होण्यास आम्ही असमर्थ आहोत. मुस्लिम लीगचे काही सदस्य ब्रिटननं प्रदेश सोडून जावा ह्या गोष्टीस विरोध करीत असत अशी कित्येकांची समजूत होतीच की नाही ?

लेखकानं चवथ्या उताऱ्यात असं म्हटलं आहे की, गोडसे, आपटे ह्यांनी म्हटलं की त्यांची (शेवटची) एकच इच्छा होती की, त्यांच्या रक्षा सिंधू नदीत टाकल्या जाव्या. पण ह्यातही काही असेल तर हेच की हिन्दुस्थानचं म्हणून जे एकेकाळी होतं आणि पाकिस्तानला गेलं आहे ते हिन्दुस्थाननं परत मिळवावं. आमच्या मते जे मुसलमान हिन्दुस्थानचे नागरिक आहेत, त्यांना वा संदेशानं बाईट वाटण्याची शक्यता नाही. कारण गमावलेला प्रदेश परत मिळविण्याचा प्रश्न हा राजकीय आहे, जातीय नव्हे.

आक्षेपार्ह काही नाही

शेवटी काही उताऱ्यात काही परिस्थितीत राजकीय हत्या न्याय्य आणि स्तुत्य आणि पाकिस्तानाविरुद्धची आणि मनात पाकिस्तानी असणाऱ्यांविरुद्धची प्रतिशोधाची रक्तपिपासू कृतीही न्याय्य आणि स्तुत्य आहे असं दर्शवलेले आहे, असं आमच्यापुढं प्रतिपादण्यात आलं. आम्ही हे सर्व उतारे पुनः पुनः वाचले. पण बंदी आज्ञेत उल्लेखिलेल्या कारणासाठी ते आक्षेपार्ह आहेत असं मत बनविण्यास आम्ही असमर्थ आहोत. उदाहरणार्थ त्यातील एक मातापितरांना अंबाला तुरुंगातून १५ नोव्हेंबर १९४९ ला फाशी जाण्यापूर्वी नथुरामनं लिहिलेल्या पत्रातील उतारा आहे. त्यात त्यानं म्हटलं आहे की, भगवान श्रीकृष्णानं युद्धात आणि इतरत्र बऱ्याच गर्विष्ठ आणि महत्त्वपूर्ण व्यक्तींना जगाच्या कल्याणासाठी ठार मारलं होतं. अर्जुनाला तर नातेवाईकांचाही वध करण्याचा उपदेश केला होता. या उताऱ्याचा अर्थ इतकाच की, वधकऱ्याच्या कृत्यात गुन्हेगारी असते, पण तिचं मूल्यामापन तिच्या मागील हेतूचा विचार करून आणि त्या व्यक्तीच्या इतर गुणांपासून ती निराळी काढूनच केलं पाहिजे. गांधींच्या हत्येची त्यात प्रशंसा आहे हे निःसंशय पण हिन्दू - मुसलमान प्रश्नाशी हे सर्व संबद्ध नाही. एखादं वाक्य किंवा उतारा संदर्भापासून अलग केला तर भावक्षम मनासाठी तसं साहित्य ज्वालाग्राहीही ठरू शकेल, पण अशी प्रक्रिया गृहीत धरता येत नाही. पुस्तक समग्रपणे वाचलं पाहिजे आणि तसं वाचलं तर असल्या आक्षेपापासून त्याला मुक्तच करायला लागेल.

पुस्तकाचा एकूण परिणाम

अॅडव्होकेट जनरलनी पुढे म्हटले आहे की, पुस्तकाच्या भावनांना कित्येक अंतःकरणात प्रतिसाद मिळेल. हिन्दुंना मुसलमानांविरूद्ध 'त्यांना सरकार आत्मीयतेनं वागवतं म्हणून' भडकवीत आहे आणि वाचकांवर त्याचा एकंदर परिणाम हा होईल की, गांधीजी हे

एक पाषाणहृदयी, फक्त मुसलमानांचं हित पाहणारे राक्षस होते. आता, पुस्तकाला बऱ्याच अंत:करणात प्रतिसाद मिळेल हे खरेच, कारण त्याची भाषा प्रभावी आहे आणि रचना हेतूपूर्ण आहे. पण स्पष्ट बोलायचं तर त्याचा एकूण परिणाम मात्र जातीय भावना चेतविणारा नाही. त्यात अशा भावनेला आवाहन नाही. वाचकांच्या मनात, ते वाचून खाली ठेवल्यानंतर बराच वेळ रेंगाळत राहील ते हे की, देशाच्या अखंडतेचा भंग होता कामा नये, गांधीजींच्या अनुनयाच्या धोरणानंच फाळणी झाली आणि तिच्या मागोमाग आलेल्या अवर्णनीय आपदा झाल्या. वाचकाला कळवळा येईल तो ह्या आपदांचा वृतांत वाचून आणि लेखकाच्या वयोवृद्ध मातापितरांच्या, त्यांच्या पत्नीच्या आणि मुलाबाळांच्या हालअपेष्टांचा वृत्तान्त वाचून.

बॅरिस्टर सावरकरांच्या राजकीय तत्त्वज्ञानाचं विवेचन करणाऱ्या आठव्या प्रकरणाकडेही आमचं लक्ष वेधण्यात आलं आहे, पण त्यातील, 'हिन्दू राष्ट्र आणि मुसलमान राष्ट्र ह्यांच्यात जणू युद्ध सुरू झालं आहे, मुस्लिम राष्ट्राचा सेनानी मारला गेला आहे, आणि प्रतिशोधानं पेटलेल्या मुस्लिम राष्ट्राने हिन्दुराष्ट्राच्या सेनानीला घेरण्याची प्रतिज्ञा केली आहे, अशा अयथार्थ अभिनिवेशानं शासनानं ज्वलंत राष्ट्रभक्त सावरकरांना घेरण्याचे ठरविले.' ह्या उताऱ्याचा खरे म्हणजे शासनावरच रोख आहे. त्यात जोर दिला आहे, तो सरकारच्या पक्षपाती वृत्तीवर. त्यामुळे कदाचित सरकारविरुद्ध अनादर निर्माण होईल, पण तो विषय अगदीच निराळा आहे.

न्यायलयाने राजद्रुतीची आज्ञा आवेदकांच्या मूलभूत हक्कांना बाध आणणारी म्हणून घटनाबाह्य ठरविली. न्यायालयीन व्ययापोटी दिल्ली शासनाने लेखकाला रु ३००० आणि प्रकाशकास रु. १००० देण्याचा आदेश दिला.

卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐



काँग्रेसला फाळणी स्वीकारायची असेल तर माझा मृतदेह ओलांडूनच ती करता येईल.

–महात्मा गांधी.

स्वतःच्या देशाशी भक्तिभाव हे पाप ठरत असेल तर ते पाप मी केले आहे, असे मी मान्य करतो. ते पुण्यप्रद असेल तर तज्जन्य पुण्यावर माझा नम्र अधिकार आहे.

–नथूराम गोडसे.